कार्यालयीन वापराकरिता

महाराष्ट्र शासन

# वेतनत्रुटी निवारण समिती

# अहवाल

श्री. के. पी. बक्षी
अध्यक्ष, प्रधान सचिव (सेवा),
सामान्य प्रशासन विभाग

श्री. श्रीकांत देशपांडे
सदस्य, सचिव (लेखा व कोषागारे),
वित्त विभाग

२०१२

मुंबई

# वेतनत्रुटी निवारण समिती

# अहवाल

श्री. के. पी. बक्षी
अध्यक्ष, प्रधान सचिव (सेवा),
सामान्य प्रशासन विभाग

श्री. श्रीकांत देशपांडे
सदस्य, सचिव (लेखा व कोषागारे),
वित्त विभाग

मुंबई,
दिनांक १५ मे २०१२

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रकरण - १- प्रस्तावना | १-२ |
| २ | प्रकरण - २- समितीचा दृष्टीकोन | ३-१० |
| ३ | प्रकरण - ३- प्रशासकीय विभागांचे प्रस्ताव व त्यावरील समितीच्या शिफारशी | |
| | ३.१ (अ) - कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग<br>अ) कृषि आयुक्तालय<br>ब) पशुसंवर्धन आयुक्तालय<br>३.१ (ब) - कृषि विद्यापीठे | ११-३९ |
| | ३.२ - सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग<br>सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था | ४१-४५ |
| | ३.३ - रोजगार व स्वयंरोजगार विभाग<br>रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय | ४७-५२ |
| | ३.४ - वित्त विभाग<br>अ) लेखा व कोषागारे संचालनालय<br>ब) स्थानिक निधी लेखा संचालनालय | ५३-५८ |
| | ३.५ - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग<br>अ) नियंत्रक, शिधावाटप<br>ब) नियंत्रक, वैधमापनशास्त्र<br>क) विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी | ५९-६२ |
| | ३.६ - सामान्य प्रशासन विभाग<br>अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द)<br>ब) सैनिक कल्याण विभाग<br>क) संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद<br>ड) मंत्रालय चौरस आहारगृह व मंत्रालय उपाहारगृहे<br>इ) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | ६३-७७ |
| | ३.७ (अ) - उच्च व तंत्र शिक्षण विभाग<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय<br>३.७ (ब) - अकृषि विद्यापीठे | ७९-९६ |
| | ३.८ - गृह विभाग<br>अ) पोलीस महासंचालक<br>ब) नागरी संरक्षण संचालनालय<br>क) सरकारी अभियोग संचालनालय<br>ड) परिवहन विभाग<br>इ) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क<br>फ) कारागृह महानिरीक्षक, पुणे | ९७-१२२ |

| | | |
|---|---|---|
| | ३.९ - उद्योग, उर्जा व कामगार विभाग<br>अ) भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालय<br>ब) कामगार आयुक्त<br>क) श्रमिक भरपाई आयुक्त<br>ड) सुती, रेशमी वस्त्रनिर्माण, साखर व सहकार बँक उद्योगाकरीता वेतन मंडळ<br>इ) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | १२३-१३१ |
| | ३.१० - विधी व न्याय विभाग<br>अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द)<br>ब) लघुवाद न्यायालय, मुंबई<br>क) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण - मुंबई उच्च न्यायालय सेवा समिती व उप समित्या | १३३-१३९ |
| | ३.११ (अ) - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग<br>अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय<br>ब) आयुर्वेद संचालनालय<br>क) अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन<br>३.११ (ब) - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | १४१-१५८ |
| | ३.१२ - नियोजन विभाग<br>अर्थ व सांख्यिकी संचालनालय | १५९-१६२ |
| | ३.१३ - सार्वजनिक आरोग्य विभाग<br>अ) आरोग्य सेवा संचालनालय<br>ब) राज्य कामगार विमा योजना आयुक्तालय | १६३-१७७ |
| | ३.१४ - सार्वजनिक बांधकाम विभाग<br>अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द)<br>ब) सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व मंडले )<br>क) संचालक, उपवने व उद्याने<br>ड) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन | १७९-१९५ |
| | ३.१५ - महसूल व वन विभाग<br>अ) महसूल विभाग<br>ब) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख<br>क) मुख्य वनसंरक्षक | १९७-२१४ |
| | ३.१६ - ग्रामविकास व जलसंधारण विभाग | २१५-२३० |
| | ३.१७ - शालेय शिक्षण व क्रीडा विभाग<br>अ) शिक्षण संचालनालय<br>ब ) महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् | २३१-२४० |
| | ३.१८ - सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग<br>समाजकल्याण संचालनालय | २४१-२४२ |
| | ३.१९ - आदिवासी विकास विभाग<br>आयुक्त, आदिवासी विकास | २४३-२४७ |

| | | |
|---|---|---|
| | ३.२० - जलसंपदा विभाग<br>अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द)<br>ब) पाटबंधारे विभाग (मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व सर्व प्रादेशिक मंडले यांसहित)<br>क) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी व संशोधन संस्था, नाशिक | २४९-२६९ |
| | ३.२१ - पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग<br>संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा | २७१-२८३ |
| | ३.२२ - वाहनचालक संवर्ग | २८५-२८९ |
| ४ | प्रकरण - ४ - सुधारित वेतनसंरचनेतील (सहावा वेतन आयोग) वेतनत्रुटींच्या प्रस्तावांसंबंधी समितीने सादर केलेले स्वतंत्र अहवाल<br>४.१- सार्वजनिक आरोग्य विभाग<br>४.२ - विधी व न्याय विभाग | २९१-२९८ |
| ५ | ऋणनिर्देश | २९९ |
| ६ | परिशिष्ठ - १ समितीने सादर केलेले पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्यांशी संबंधित स्वतंत्र अहवाल<br>१) वित्त विभाग<br>२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग<br>३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग<br>४) सार्वजनिक आरोग्य विभाग<br>५) जलसंपदा विभाग | ३०१-३१६ |
| ७ | जोडपत्र - अ - समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले प्रशासकीय विभागप्रमुख / विभागप्रमुख आणि अधिकारी / कर्मचारी संघटनांची यादी | ३१७-३२१ |
| ८ | जोडपत्र - ब - वेतनत्रुटी निवारण समितीची नियुक्ती व मुदतवाढ इत्यादीसंबंधीचे शासन निर्णय. | ३२३-३४८ |

# प्रकरण - १

## प्रस्तावना

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या ( हकीम समिती ) शिफारशींच्या आधारे दि.१ जानेवारी, २००६ पासून सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. सुधारित वेतनसंरचनेत त्रुटी राहण्याची शक्यता लक्षात घेऊन संभाव्य त्रुटींचे निवारण करण्याकरीता वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर १२०९/ प्र.क्र.३८/ सेवा-९ दि.२१ मे, २००९ अन्वये प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीच्या स्थापनेच्या वेळेस तत्कालीन प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग (श्री. सुधीर श्रीवास्तव) हे समितीचे सदस्य होते. अहवाल सादर करण्यासाठी समितीस नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याची मुदत देण्यात आली होती. समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे होती :-

अ) राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना " राज्य वेतन सुधारणा समिती, २००८" च्या शिफारशींच्या अनुषंगाने विहित केलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे परीक्षण करून योग्य सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करणे.

ब) मा. मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळाने निर्णय घेऊन समितीकडे सोपविलेल्या विनिर्दिष्ट प्रस्तावांबाबत शिफारस करणे.

समितीला आपल्या कामासाठी स्वत:ची कार्यपद्धती ठरविण्याची मुभा देण्यात आली होती.

२. ज्या संवर्गांच्या सुधारित वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आहेत अशी प्रशासकीय विभागाच्या सचिवांची / विभागप्रमुखांची खातरजमा झाली असेल, त्या संवर्गाचे वेतनत्रुटी निवारणाचे प्रस्ताव त्यांनी तपासून आवश्यक त्या समर्थनासह ४ प्रतींमध्ये दि.२० जुलै, २००९ पर्यंत समितीकडे सादर करावयाचे होते. समितीकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची संघटनांची मागणी विचारात घेऊन वित्त विभागाच्या दि.१० ऑगस्ट, २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रस्ताव सादर करण्याची मुदत दि.३१ ऑगस्ट, २००९ पर्यंत वाढविण्यात आली होती.

३. दरम्यान समितीचे सदस्य प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांची प्रधान सचिव, नियोजन विभाग या पदावर नियुक्ती झाली होती. तथापि, शासन निर्णय दि.२० ऑगस्ट, २०१० अन्वये प्रधान सचिव, नियोजन विभाग यांनाच समितीचे सदस्य म्हणून कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तद्नंतर त्यांची प्रधान सचिव, वित्त विभाग या पदावर नियुक्ती झाल्यानंतर शासन निर्णय दि.६ जुलै, २०११ अन्वये त्यांची समितीच्या सदस्यपदी नियुक्ती कायम ठेवण्यात आली होती.

तद्नंतर वेतनत्रुटी निवारण समितीच्या सदस्यपदी दि.७ सप्टेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार सचिव ( लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांची नियुक्ती करण्यात आली होती.

४. वेतनत्रुटी निवारण समितीच्या बैठकांना संबंधित प्रशासकीय विभागांचे सचिव आणि विभागप्रमुख तसेच संबंधित कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींना (प्रशासकीय विभागांमार्फत) बोलाविण्यात आले होते (जोडपत्र-अ). विविध प्रशासकीय विभागांकडून समितीच्या विचारार्थ सुमारे ४७१ संवर्गांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते, त्यापैकी ४३६ संवर्गांसंबंधीच्या शिफारशी या अहवालात समाविष्ट आहेत. उर्वरित प्रस्ताव वेतनत्रुटीशी संबंधित नसल्याने त्याबाबत वित्त विभागाच्या सहमतीने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या होत्या. माहे ऑगस्ट, २००९ ते मे, २०१२ या कालावधीत विविध संघटनांचे प्रतिनिधी, प्रादेशिक विभाग प्रमुख आणि प्रशासकीय विभागांच्या सचिवांसमवेत बैठका घेऊन समितीने त्यांची मते जाणून घेतली. वेतनत्रुटी निवारण समितीच्या विचारार्थ प्राप्त झालेल्या

प्रस्तावांसंदर्भात चर्चा करण्यासाठी ऑगस्ट, २००९ ते मे, २०१२ या कालावधीत समितीच्या एकूण ४९ बैठका घेण्यात आल्या.

५. समितीच्या विचाराधीन असलेल्या विविध प्रस्तावांपैकी सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाच्या प्रस्तावासंबंधी प्राथम्याने अहवाल करण्याविषयी शासनाचे निदेश होते. त्यानुसार या संवर्गाच्या वेतनत्रुटीविषयीचा स्वतंत्र अहवाल सादर केला आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या आदेशांनुसार आस्थापना अधिकारी, उच्च न्यायालय विधी सेवा समिती, मुंबई आणि उच्च न्यायालय विधी सेवा उप समिती, औरंगाबाद व नागपूर या संवर्गाच्या वेतनत्रुटीविषयीचा स्वतंत्र अहवाल सादर केला आहे. अहवालाच्या प्रकरण-४ मध्ये हे दोन्ही अहवाल समाविष्ट केले आहेत.

तसेच शासनाने काही न्यायालयीन प्रकरणांतील आदेशांनुसार पाचव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटीसंदर्भातील काही विशिष्ठ प्रकरणे विचारार्थ समितीकडे सोपविली होती. त्यासंदर्भात स्वतंत्रपणे बैठका घेऊन त्या संवर्गाच्या वेतनत्रुटीसंबंधीचे अहवाल स्वतंत्रपणे (परिशिष्ठ-१) शासनास सादर केले आहेत.

--------

# प्रकरण - २

## समितीचा दृष्टीकोन

### २.१ पार्श्वभूमी

२.१.१ चौथ्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाच्या निर्णयानुसार केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना विहित केलेल्या सुधारित वेतनश्रेणींच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. एन. बी. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली 'वेतन समानीकरण समिती' नियुक्त करण्यात आली होती. या समितीने शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्य शासनाकडील पदांची केंद्र शासनाकडील पदांशी समकक्षता निश्चित केली. तसेच राज्य शासनाकडील ज्या पदांना केंद्र शासनाकडे अशी समकक्ष पदे आढळून आली नाहीत, त्या पदांना समुचित सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती.

२.१.२ राज्य शासनाकडील ज्या पदांची केंद्र शासनाकडील पदांशी समकक्षता प्रस्थापित होऊ शकली नाही त्या पदांना सुधारित वेतनश्रेण्यांची शिफारस करताना पदांची सुधारणापूर्व वेतनश्रेणी, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे कुशल - अकुशल व तांत्रिक - अतांत्रिक स्वरूप, पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठीची किमान शैक्षणिक अर्हता, पदवी / पदविकेचे स्वरुप, पदोन्नती साखळी इत्यादी बाबी विचारात घेतल्या होत्या. परिणामी विविध प्रशासकीय विभागांमधील पदांचे यथोचित मूल्यमापन झाले. या निकषांच्या आधारे राज्य शासनाकडील विविध प्रशासकीय विभागांमधील बहुतांश पदांचे व वेतनश्रेणींचे सुसुत्रीकरण करण्यात आले. मात्र अशा प्रकारे मूल्यमापनाच्या आधारे वेगवेगळ्या प्रशासकीय विभागांमधील पदांना अथवा एकाच विभागामधील वेगवेगळ्या पदांना एकच वेतनश्रेणी विहित केली असली तरी त्यांच्यामध्ये थेट समकक्षता प्रस्थापित करण्यात आली नव्हती.

२.१.३ तथापि, एखाद्या विभागातील ज्या संवर्गातील पदे अन्य विभागांच्या आस्थापनेवर आहेत त्या पदांना मूळ विभागातील पदाप्रमाणेच सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करण्यात आली होती. म्हणजेच राज्यातील विविध प्रशासकीय विभागांर्तगत संवर्गांमध्ये समकक्षता प्रस्थापित करण्यात आली होती.

२.१.४ चौथ्या वेतन आयोगामध्ये स्वीकारलेली तत्वे सर्वसाधारणपणे पुढे पाचव्या व सहाव्या वेतन आयोगातही विचारात घेण्यात आली आहेत. तथापि, सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केलेली सुधारित वेतनसंरचना राज्य शासनाकडील समकक्ष पदांना जशीच्या - तशी लागू न करता हकीम समितीने त्यामध्ये काही प्रमाणात बदल सुचवून तुलनेने काही प्रमाणात निम्न सुधारित वेतनसंरचनेची शिफारस केली आहे. या संदर्भात हकीम समितीच्या अहवालातील परिच्छेद ३.४.२ मध्ये विवेचन केले आहे.

### २.२ मूल्यमापनाविषयक आधारभूत बाबी

२.२.१ विविध प्रशासकीय विभागांकडून समितीच्या विचारार्थ प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे मूल्यमापन करताना वेतन समानीकरण समिती (वरील परिच्छेद क्र.२.१.२ व २.१.३) व राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ (सुकथनकर समिती, अहवाल भाग-१ व २) त्याचप्रमाणे राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ (हकीम समिती) या समित्यांनी स्वीकारलेला दृष्टीकोन विचारात घेतला आहे.

तथापि, वेतन समानीकरण समितीने केंद्र शासनाकडील पदांशी समकक्ष ठरविलेल्या राज्य शासनाकडील पदांना केंद्र शासनाप्रमाणे जशीच्या - तशी सुधारित वेतनसंरचना लागू करण्याच्या मुद्यासंदर्भातील या समितीच्या मतांविषयी परिच्छेद २.३ मध्ये स्वतंत्रपणे विवेचन केले आहे.

२.२.२ केंद्र शासनाप्रमाणेच राज्य शासनानेदेखील वेतनबँड आणि ग्रेड वेतनावर आधारित सुधारित वेतनसंरचनेची संकल्पना स्वीकारली आहे. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांना सुधारित वेतनसंरचनेत पाच वेतनबँड विहित करण्यात आले आहेत. त्यामुळे साहजिकच अनेक वेतनश्रेण्यांना एकच वेतनबँड मंजूर केला आहे. त्यामुळे अशा एकाच वेतनबँडमध्ये समाविष्ट असलेल्या वेतनश्रेण्यांपैकी तुलनेने उच्च वेतनश्रेणीतील संवर्गांना वेतनबँड मंजूर करताना त्रुटी निर्माण झाली आहे असे ग्राह्य धरणे योग्य ठरत नाही कारण असुधारित वेतनश्रेणीच्या आनुषंगाने प्रत्येक संवर्गास स्वतंत्रपणे ग्रेड वेतन विहित करण्यात आले आहे. तसेच पदाचा दर्जा ग्रेड वेतनाशी निगडित आहे.

२.२.३ पाचव्या वेतन आयोगामध्ये पदोन्नतीच्या व निम्न पदास एकच वेतनश्रेणी अनुज्ञेय असल्यास पदोन्नतीच्या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात येत होते. पाचव्या वेतन आयोगामध्ये ज्या पदोन्नतीच्या व निम्न पदांना एकच वेतनश्रेणी अनुज्ञेय होती, त्या पदांच्या बाबतीत सुधारित वेतनसंरचनेत एकच वेतनबँड व ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरणे नैसर्गिक आहे. अशा प्रकरणी सहाव्या वेतन आयोगामध्ये पदोन्नतीच्या पदास समुचित अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील शिफारस (परिच्छेद ३.७.२) शासनाने स्वीकारली असल्याने पदोन्नतीच्या पदास अतिरिक्त ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरते. त्यामुळे पदोन्नतीच्या पदाचा तुलनेने उच्च दर्जा अबाधित राहतो. यास्तव अशा प्रकरणी केवळ पदोन्नतीच्या व निम्न पदांना एकच वेतनसंरचना मंजूर केली आहे या कारणास्तव पदोन्नतीच्या पदास अधिक उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय ठरत नाही असे समितीचे मत आहे. मात्र, याखेरीज पदोन्नतीच्या पदास उच्च वेतनसंरचना देण्याच्या मागणीसंदर्भातील अन्य गुणवत्तेचे मुद्दे उपस्थित केले असल्यास ते समितीने विचारात घेतले आहेत.

२.२.४ कोणत्याही संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना सर्वसाधारणत: त्या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे कुशल - अकुशल व तांत्रिक - अतांत्रिक स्वरूप, पदाचा दर्जा, पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठीची किमान शैक्षणिक अर्हता, पदवी / पदविकेचे स्वरुप, पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सार्वजनिक / प्रशासकीय व्यवस्थेतील स्थान व सेवेचे महत्व आणि त्यानुषंगाने येणाऱ्या विशिष्ठ जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊन त्या संवर्गाच्या मूल्यमापनांती वेतनश्रेणी विहित केली जाते.

वरील निकषांच्या आधारे स्वतंत्र मूल्यमापनानुसार विविध संवर्गांच्या वेतनश्रेण्या विहित / सुधारित करताना वेगवेगळ्या विभागांमधील वेगवेगळ्या संवर्गांना तसेच एकाच विभागांतर्गत वेगवेगळ्या संवर्गांना एखाद्या विशिष्ठ वेतन आयोगामध्ये समान वेतनश्रेणी मंजूर केली जाते. अशा प्रकारे समान वेतनश्रेणी अनुज्ञेय केली गेली असली तरी, त्या सर्व संवर्गांमध्ये आपापसात समकक्षता प्रस्थापित केली आहे असे मानता येत नाही कारण विहित केलेली वेतनश्रेणी स्वतंत्र मूल्यमापनाच्या आधारे मंजूर केलेली असते. वेगवेगळ्या पदांना समान वेतनश्रेणी मंजूर करताना त्यांची आपापसात सांगड घातली गेली असल्यासच त्या पदांमध्ये समकक्षता आहे असे म्हणणे उचित ठरते.

एखाद्या विशिष्ठ वेतन आयोगामध्ये समान वेतनश्रेणीमध्ये असलेल्या संवर्गांपैकी काही संवर्गांना तदनंतर प्रशासकीय संरचनेची पुनर्रचना / आकृतीबंधातील बदल, नव्याने सोपविलेल्या जिकीरीच्या व विशिष्ठ स्वरूपाच्या जबाबदाऱ्या अथवा अन्य प्रशासकीय कारणास्तव तुलनेने उच्च वेतनश्रेणी मंजूर केली असल्यास इतर संवर्गांनादेखील तीच उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याची मागणी समर्थनीय ठरत नाही. कारण, श्रेणीवर्धनासाठी विचारात घेतलेले मुद्दे / निकष इतर संवर्गाच्याबाबतीत लागू ठरतातच असे नाही. त्यामुळे असे श्रेणीवाढीचे प्रस्ताव वेतनत्रुटी समजता येणार नाहीत.

थोडक्यात, कोणत्याही संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना विविध निकष विचारात घेतले जातात. अशा प्रकारे वेतनश्रेणी विहित करताना विविध संवर्गांना स्वतंत्र मूल्यमापनाअंती समान / समकक्ष वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते. अशा समान / समकक्ष वेतनश्रेणीतील संवर्गांमध्ये थेट समकक्षता प्रस्थापित

झालेली नसली तरी वेतनश्रेणींच्याबाबतीत सापेक्षता निर्माण होते. तथापि, एखाद्या संवर्गास वरील परिच्छेदात नमूद कारणास्तव तुलनेने उच्च वेतनश्रेणी लागू केल्यास त्या संवर्गाची अन्य संवर्गांशी असलेली वेतनश्रेणीची सापेक्षता भंग पावते; किंबहुना अशा परिस्थितीत ते साहजिकच आहे.

२.२.५ लिपिकवर्गीय संवर्गांची वेतनसंरचना

लिपिकवर्गीय संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग (Common Cadre) असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. या संवर्गांमध्ये कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, मुख्य / प्रमुख / प्रथम लिपिक व सहाय्यक अधीक्षक / अधीक्षक पदोन्नती साखळी प्रामुख्याने आढळून येते. त्यापुढे काही विभागांमध्ये प्रशासन अधिकारी हा संवर्गदेखील आहे.

सर्वच प्रशासकीय विभागांमधील कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक आणि अधीक्षक या संवर्गांना वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) केंद्र शासनाकडील अनुक्रमे कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक आणि अधीक्षक या संवर्गांशी समकक्षता प्रदान केली आहे. त्यानुसार या संवर्गांना चौथ्या वेतन आयोगात वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या होत्या. तर उर्वरित संवर्गांना मूल्यमापनांती शिफारस केलेल्या वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. त्यानंतर पुढे पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनश्रेण्या / वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

सर्वच प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत असलेले हे सर्वसाधारण संवर्ग असल्यामुळे कोणत्याही विभागातील या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये बदल करणे वरील पार्श्वभूमीवर श्रेयस्कर ठरत नाही असे समितीचे मत आहे.

२.२.६ शासनाच्या काही विभागांमधील काही संवर्गातील पदांवर दुसऱ्या संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदलीने नियुक्ती करण्यात येते. हे संवर्ग आपापसात बदलीपात्र असतात. म्हणजेच एका संवर्गातून दुसऱ्या संवर्गात आणि त्याउलट बदलीने नियुक्ती करण्यात येते. अशा आपापसात बदलीपात्र संवर्गांच्या बाबतीत दोन्ही संवर्गांची वेतनसंरचना समान असावी असे समितीचे मत आहे.

तसेच शासनाच्या काही विभागांमधील काही संवर्गातील पदांवर त्याच विभागातील दुसऱ्या संवर्गातील अथवा अन्य विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदलीने किंवा प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते. मात्र असे संवर्ग आपापसात बदलीपात्र असतातच असे नाही. म्हणजेच एका संवर्गातून दुसऱ्या संवर्गात बदलीने / प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येते. परंतु, त्याउलट दुसऱ्या संवर्गातून पहिल्या संवर्गात बदली / प्रतिनियुक्ती होत नाही. अशा संवर्गांच्या बाबतीत ज्या संवर्गातून बदली / प्रतिनियुक्ती होते त्या संवर्गाची वेतनश्रेणी / वेतनसंरचना कर्तव्ये व जबाबदाऱ्या अथवा प्रशासकीय कारणास्तव उंचावून दिल्यास, ज्या संवर्गात बदली / प्रतिनियुक्ती दिली जाते त्या संवर्गाची वेतनश्रेणी / वेतनसंरचना उंचावून देणे समर्थनीय ठरत नाही. तसेच ते प्रशासकीय दृष्टीकोनातून उचितदेखील नाही कारण ज्या संवर्गातून बदली / प्रतिनियुक्ती दिली जाते त्या संवर्गाची वेतनश्रेणी / वेतनसंरचना त्या संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अथवा आनुषंगिक प्रशासकीय कारणास्तव उंचावून दिलेली असते. ही परिस्थिती ज्या संवर्गात बदली / प्रतिनियुक्ती दिली जाते त्या संवर्गास लागू ठरत नाही.

काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये उच्च वेतनसंरचनेतील संवर्गातून तुलनेने निम्न वेतनसंरचनेतील संवर्गात नियुक्ती दिली जात असल्यास अशा नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यास त्याच्या संवर्गाच्या वेतनसंरचनेत वेतन मिळणे नैसर्गिक आहे. अशा बाबतीत निम्न संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी संवर्गबाह्य पदावरील अधिकारी / कर्मचाऱ्याच्या वेतनसंरचनेचा आग्रह धरणे सयुक्तिक नाही.

२.२.७ रू.७४५०-११५०० आणि रू.७५००-१२००० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांच्या सुधारित वेतनसंरचनेबाबत -

राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मध्ये तहसिलदार आणि पोलिस निरिक्षक या संवर्गांना वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० आणि रू.५००० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेची शिफारस केली आहे. हीच वेतनसंरचना विवक्षितपणे उचित शासन आदेशाद्वारे पूर्वी वर्ग-१ म्हणून घोषित केलेल्या (सध्याच्या गट-अ मधील) रू.७४५०-११५०० आणि रू.७५००-१२००० या विद्यमान वेतनश्रेणीतील पदांना लागू होईल अशीही शिफारस केली आहे व सदर शिफारस शासनाने स्वीकारली आहे.

शासनाच्या विविध विभागांमध्ये रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्ग आहेत. तथापि, या शिफारशीबाबत निर्णय घेताना मंत्रीमंडळाने केवळ तहसिलदार संवर्गास जाणीवपूर्वक वेतनबँड पीबी-२ (रू.९३००-३४८००) ऐवजी वेतनबँड पीबी-३ (रू.१५६००-३९१००) मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे रू.७४५०-११५०० आणि रू.७५००-१२००० या असुधारित वेतनश्रेण्यांमधील इतर संवर्गांनादेखील वेतनबँड पीबी-३ मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीत शासनाच्या विविध विभागांमध्ये सुमारे १०० पेक्षा अधिक संवर्ग आहेत. रू.७४५०-११५०० आणि रू.७५००-१२००० या दोन्ही वेतनश्रेण्यांना समकक्ष वेतनबँड पीबी-२ ची शिफारस केलेली असल्याने आणि वरील परिच्छेद २.२.४ मधील विवेचन विचारात घेता सरसकट सर्व पदांना वेतनबँड पीबी-३ मंजूर करण्याची मागणी मान्य करणे योग्य ठरत नाही.

मात्र, या वेतनश्रेण्यांतील वर्ग-१ (गट-अ) मधील पदांना रू.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेय असूनही काही संवर्गांना ते मंजूर न केल्याचे समितीस आढळून आले आहे. अशा प्रकरणी समितीस वेगळी शिफारस करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. याबाबतीत संबंधित प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाच्या सहमतीने कार्यवाही करण्याची सूचना केली आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे ज्या संवर्गांना रू.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेय असूनही अद्याप ते मंजूर केलेले नाही आणि त्या संवर्गांचे प्रस्ताव समितीच्या विचारार्थ सादर केलेले नाहीत अशा संवर्गांच्या बाबतीतदेखील संबंधित प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाच्या सहमतीने कार्यवाही करणे योग्य राहील असे समितीस वाटते.

२.२.८ रू.८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांच्या सुधारित वेतनसंरचनेतील वेतनबँडबाबत -

राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने असुधारित वेतनश्रेण्यांसाठी सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करताना राज्य शासनाकडील ज्या वेतनश्रेण्या केंद्र शासनाकडील वेतनश्रेण्यांप्रमाणे आहेत, त्या वेतनश्रेण्यांसाठी केंद्र शासनाप्रमाणेच वेतनबँड व ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली होती व शासनाने सदर शिफारस स्वीकारुन त्यानुसार असुधारित वेतनश्रेण्यांसाठी सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. केंद्र शासनाने सहाव्या वेतन आयोगात रू.८०००-१३००० (गट-अ सेवाप्रवेश / Group-A Entry) ही वेतनश्रेणीची नवीन संकल्पना स्वीकारुन या वेतनश्रेणीसाठी वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन तर याच वेतनश्रेणीतील गट-ब मधील संवर्गांसाठी वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना विहित केली आहे. याआधारे राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने केलेल्या शिफारशीनुसार राज्य शासनाकडील रू.८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीतील पूर्वीपासून गट-अ (वर्ग-१) मध्ये असलेल्या संवर्गांना वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन तर पूर्वी वर्ग-२ मध्ये असलेल्या

विद्यमान गट-अ मधील तसेच गट-ब मधील संवर्गांना वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे.

राज्य शासनाकडील तत्कालीन महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वर्ग-२ ( वैद्यकीय अधिकारी ) व तत्सम / समकक्ष संवर्गांना चौथ्या वेतन आयोगात रु.२२००-४००० आणि तत्कालीन पशुधन विकास अधिकारी, वर्ग-२ (पशुवैद्यकीय पदवीधर) या संवर्गास पाचव्या वेतन आयोगात रु.८०००-१३५०० ह्या वर्ग-१ संवर्गाच्या वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. तद्नंतर हे संवर्ग गट-अ मध्ये श्रेणीउन्नत झाले. या संवर्गांना वरील शिफारशीच्या आधारे वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली होती.

अ) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वैद्यकीय अधिकारी) संवर्गाच्या वेतनसंरचनेतील त्रुटीबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीच्या विचारार्थ प्राप्त झाला होता. त्याबाबत दि.१ ऑगस्ट, २००९ रोजी स्वतंत्र अहवाल सादर केला आहे (प्रकरण क्र.४). पाचव्या वेतन आयोगपूर्व वेतनश्रेणीच्या आधारे समकक्षता ठरविणे योग्य वाटत नसल्यामुळे वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची पाचव्या वेतन आयोगातील रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी विचारात घेऊन अन्य विविध विभागांतील संवर्गांप्रमाणेच या संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केली आहे. सदर शिफारस स्वीकारून शासनाने या संवर्गास शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपुर १२०९/प्र.क्र.१५३/ सुधारणा-५/सेवा-९, दि.४ नोव्हेंबर, २००९ अन्वये वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे.

ब) पशुधन विकास अधिकारी (पशुवैद्यकीय पदवीधर) या संवर्गासदेखील शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपुर १२०९/सुधारणा-३/प्र.क्र.१३७/सेवा-९, दि. २५ ऑगस्ट, २००९ अन्वये वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे.

क) मात्र महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गाप्रमाणे ज्या तत्कालीन वर्ग-२ मधील इतर वैद्यकीय अधिकारी / तत्सम समकक्ष संवर्गांना चौथ्या वेतन आयोगात रु.२२००-४००० ही वर्ग-१ संवर्गाची वेतनश्रेणी मंजूर केली होती ते संवर्ग सध्या गट-ब मध्येच असल्याचे दिसून येते. अशा संवर्गांना वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० मंजूर केल्यामुळे त्यांची महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गाशी असलेली समकक्षता बाधित झाली आहे. ही बाब त्यांना तत्कालीन स्थितीत रु.२२००-४००० ही वर्ग-१ संवर्गाची वेतनश्रेणी मंजूर करण्याच्या उद्देशांशी विसंगत ठरते.

ड) राज्य शासनाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले वैद्यकीय संवर्ग वगळता रु.८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीमध्ये नामनिर्देशनाने (Direct Entry) नियुक्ती केले जाणारे गट-ब मधील कोणतेही संवर्ग आढळून येत नाहीत. त्यामुळे रु.८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीतील गट-ब मध्ये थेट नियुक्तीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कक्ष अधिकारी संवर्गासारख्या अपवादात्मक संवर्गास ४ वर्षांच्या नियमित सेवेनंतर रु.८०००-१३५०० ही असुधारित वेतनश्रेणी (सुधारित ग्रेड वेतन रु.५४००) अनुज्ञेय केली होती. मात्र या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्ती रु.६५००-१०५०० या असुधारित वेतनश्रेणीत (सुधारित वेतनसंरचना - वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन) करण्यात येत होती. म्हणजेच विशिष्ठ वर्षांची नियमित सेवा विचारात घेऊन या संवर्गास गट-अ च्या उच्च वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय केला आहे.

इ) वरील सर्व परिस्थितीचा साकल्याने विचार केल्यास रु.८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० ऐवजी वेतनबँड पीबी-३:

रु.१५६००-३९१०० मंजूर उचित होईल असे समितीचे मत आहे. त्यामुळे रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणीचा लाभ पुढे चालू राहून ही असुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यामागचा उद्देश सफल होईल.

२.२.९ विशेष वेतनाबाबत -

पाचव्या वेतन आयोगापर्यंत विविध विभागांमधील काही पदांना विशेष वेतन अनुज्ञेय करण्यात आले होते. तसेच पाचव्या वेतन आयोगामध्ये पदोन्नतीचे पद व त्या पदाच्या निम्न पदास एकच वेतनश्रेणी अनुज्ञेय झाली असल्यास पदोन्नतीच्या पदास समुचित विशेष वेतन अनुज्ञेय केले होते.

सहाव्या वेतन आयोगामध्ये राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशीनुसार (अहवालातील परिच्छेद क्र.३.२५) पोलीस शिपाई, नाईक आणि हवालदार हे संवर्ग वगळता इतर संवर्गांची विशेष वेतन बंद करण्यात आली आहेत. पोलीस शिपाई, नाईक आणि हवालदार या संवर्गांच्या कर्तव्यांचे स्वरुप विचारात घेऊन त्यांची विशेष वेतने विद्यमान दराने पुढे चालू ठेवली आहेत. पदोन्नतीचे पद व त्या पदाच्या निम्न पदास एकच वेतनसंरचना अनुज्ञेय झाली असल्यास पदोन्नतीच्या पदास समुचित अतिरिक्त ग्रेड वेतन अनुज्ञेय (अहवालातील परिच्छेद क्र.३.७.२) केले आहे.

शासनाकडील काही संवर्गातील विशिष्ठ पदांशी निगडीत कर्तव्यांच्या अनुषंगाने पदधारकास संबंधित क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान असणे अपेक्षित असते किंबहुना ते ज्ञान आवश्यकच ठरते. त्यामुळे अशा पदधारकांना त्या क्षेत्रातील नवीन बाबी, आधुनिक तंत्रज्ञान आणि विशिष्ठ घडामोडींच्यासंदर्भात अद्ययावत माहिती करुन घ्यावी लागते. थोडक्यात, कर्तव्यांचा विचार करता पदधारकांना अभ्यासूवृत्ती (Academic Interest) जोपासावी लागते. या बाबींचा विचार करता अशा पदांवर काम करण्यासाठी अभ्यासूवृत्तीच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अशा पदांना विशेष वेतन अनुज्ञेय करणे योग्य राहील असे समितीचे मत आहे.

तसेच काही पदांवर काम करताना जास्त जोखीम पत्करावी लागते. कर्तव्याचे स्वरुप थेट जोखमीशी निगडित असल्याने, कर्तव्य पार पाडताना प्रसंगी जिवितास धोकादेखील उद्भवू शकतो. म्हणून अशा पदांनांही विशेष वेतन अनुज्ञेय करणे योग्य राहील असे समितीचे मत आहे.

२.३ केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याबाबत -

२.३.१ दि.१ एप्रिल, १९७६ पासून राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत शिफारस करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती श्री.आर.आर. भोळे यांच्या अध्यक्षतेखाली वेतन आयोगाची नियुक्ती करण्यात आली होती. भोळे वेतन आयोगाच्या शिफारशींवर निर्णय घेताना (१९७७ मध्ये) राज्य शासनाने असाही निर्णय घेतला की, " राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या सुधारण्याकरीता स्वतंत्र आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांकरीता वेतन आयोग नियुक्त करील त्या वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे वेतनश्रेणीविषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. यासाठी वेतननिश्चितीचे सूत्रदेखील केंद्र शासनाप्रमाणे असेल."

२.३.२ उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने वेतन समानीकरण समितीने केंद्र शासनाकडील पदांशी समकक्ष ठरविलेल्या राज्य शासनाकडील पदांना केंद्र शासनाप्रमाणे जशीच्या - तशी सुधारित वेतनसंरचना लागू करण्याचे प्रस्ताव समितीस प्राप्त झाले आहेत. यासंदर्भात निर्णय घेताना पुढील मुद्यांचा विचार करणे अपरिहार्य आहे असे समितीस वाटते :-

अ) केंद्र शासनाकडे काही संवर्गांना उच्च वेतनश्रेणी / वेतनसंरचना विहित करताना तेथील पदसंरचना / पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सेवेतील स्थान / महत्त्व इ. बाबी विचारात घेतल्या जातात. केंद्र शासनाकडे काही प्रसंगी संवर्गांची श्रेणीवाढ करताना संवर्गांचे सुसूत्रीकरण

करणेदेखील अभिप्रेत असल्याचे दिसून येते. या सर्व बाबी राज्य शासनाकडील संवर्गांच्याबाबतीत लागू ठरतीलच असे नाही.

ब) केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांचे कार्यक्षेत्र व्यापक असून त्यांची भारतात कोठेही नेमणूक / बदली होऊ शकते. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे भौगोलिक क्षेत्र केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या तुलनेत मर्यादित आहे.

क) केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांची स्वत:ची भाषा, संस्कृती यापेक्षा वेगळी भाषा, संस्कृती असलेल्या वातावरणात तसेच स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेऊन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यरत रहावे लागते. राज्य हा घटक विचारात घेतल्यास साधारणत: समान भाषिक व सांस्कृतिक वातावरण असते. त्यामुळे राज्यातील व्यक्तिंना राज्याच्या सेवेत काम करताना केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे भाषिक / सांस्कृतिक अडचणी येत नाहीत. ही बाब विचारात घेता केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेने कठीण परिस्थितीत काम करावे लागते.

ड) वरील कारणांमुळे केंद्र शासनाच्या काही संवर्गातील कर्मचाऱ्यांसोबत त्यांच्या नेमणूकीच्या ठिकाणी त्यांचे कुटुंबीय बऱ्याच प्रसंगी राहू शकत नाहीत. यामुळे त्यांना कुटुंबाची व्यवस्था अन्यत्र करावी लागते. परिणामी दूरवरुन कुटुंबाची देखभाल करणे क्रमप्राप्त ठरते. या बाबी जिकीरीच्या तसेच खर्चिकदेखील आहेत. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्याबाबतीत अशी परिस्थिती अपवादानेच उद्‌भवते.

इ) केंद्र शासकीय कर्मचारी त्यांच्या राज्याव्यतिरिक्त इतर राज्यांमध्ये नियुक्तीवर असताना त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक निवडीस मर्यादा येतात. त्यामुळे प्रसंगी पाल्यांना मातृभाषेतील शिक्षणासारख्या सुविधेपासून वंचित रहावे लागते.

ई) राज्य शासकीय सेवेतील पदांसाठी राज्यस्तरावर स्पर्धा परीक्षा होतात. केंद्र शासनाकडील बहुतांश सेवेत अखिल भारतीय स्तरावर स्पर्धा परिक्षांद्वारे नेमणूक होत असल्याने परीक्षेकरीता तुलनेने स्पर्धा मोठ्या प्रमाणावर असते.

फ) केंद्र शासनाचे आणि राज्य शासनाचे उत्पन्नांचे स्त्रोत भिन्न आहेत. तसेच राज्य शासनाच्या साधनसंपत्तीच्या तुलनेत केंद्र शासनाची साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे वेतन व भत्त्यांच्या खर्चाच्या संदर्भात राज्य शासनावर मर्यादा येतात. या कारणास्तव केंद्र आणि राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात काही अंशी तफावत येणे स्वाभाविक आहे.

ग) केंद्र शासनाकडील पदांशी समकक्ष ठरविलेल्या राज्य शासनाकडील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार चौथ्या व पाचव्या वेतन आयोगात केंद्र शासनाकडील पदांप्रमाणे वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अशा संवर्गांच्या वेतनमानाचा स्तर इतर संवर्गांच्या तुलनेत चांगल्या प्रकारे उंचावला गेला आहे आणि त्या असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष अशी सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे.

उपरोक्त सर्व कारणांमुळे प्राप्त परिस्थितीत केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाची तुलना करणे सयुक्तिक वाटत नाही. वास्तव सहाव्या वेतन आयोगामध्ये केंद्र शासनाने पुन्हा काही संवर्गांना मंजूर केलेल्या समकक्षतेपेक्षा उच्च वेतनसंरचनेबाबत आग्रही भूमिका घेणे उचित होणार नाही असे समितीस वाटते.

२.४ इतर आनुषंगिक बाबी

२.४.१ वेतनत्रुटी निवारण समितीच्या बैठकांना प्रशासकीय विभागांच्या सचिवांना आमंत्रित करण्यात आले होते. परंतु काही प्रशासकीय विभागांचे सचिव बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे त्यांची मते समितीस जाणून घेता आली नाहीत.

तसेच काही प्रस्तावांच्या संदर्भात प्रशासकीय विभागांनी संघटनांच्या मागणीबाबत कोणतेही अभिप्राय दिले नाहीत तर काही प्रकरणी संघटनांच्या मागणीशी प्रशासकीय विभाग सहमत नव्हते. संघटनांनीदेखील काही प्रकरणी त्यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ अभिप्राय दिले नसल्याचे आढळून आले.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असली तरी, संवर्गांचे मूल्यमापन करताना समितीने वेतनसंरचना विहित करण्याशी निगडीत विविध घटकांचा सर्वंकष विचार केला आहे.

२.४.२ समितीच्या विचारार्थ प्राप्त प्रस्तावांचा विचार करता असे निदर्शनास आले की, काही प्रस्ताव हे पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणींशी निगडीत आहेत तर काही प्रस्ताव संवर्गांची श्रेणीवाढ / दर्जावाढीशी संबंधित आहेत. तसेच काही संवर्गांचा अंतर्भाव महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारित वेतन ) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीमध्ये नसल्यामुळे त्या संवर्गांचा समावेश अनुसूचीमध्ये करण्याविषयीचे किंवा अनुसूचीमध्ये पदनाम अथवा वेतनश्रेणी / वेतनसंरचनेची योग्य नोंद नसल्यामुळे अशा नोंदी सुधारण्याबाबचे प्रस्तावदेखील समितीस प्राप्त झाले आहेत. समितीच्या कार्यकक्षेमध्ये नसलेले वर नमूद तसेच अन्य प्रस्ताव समितीने विचारात घेतले नाहीत.

२.४.३ संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत विहित कार्यपद्धतीनुसार प्रशासकीय विभाग व संघटनांच्या अभिप्रायांसह समितीच्या विचारार्थ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. समितीने प्रस्तावांबाबत प्रशासकीय विभागांचे सचिव, विभागप्रमुख आणि अधिकारी / कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत चर्चा केली आहे. या व्यतिरिक्त काही संघटनांनी तसेच अधिकारी / कर्मचाऱ्यांनी वैयक्तिकरित्या समितीच्या विचाराधीन प्रस्तावांच्या अनुषंगाने समितीस आणि वित्त विभागासदेखील निवेदने सादर केली आहेत. समितीस या निवेदनांद्वारे पूरक माहिती उपलब्ध झाली. प्रस्तावांची तपासणी करताना समितीने ही निवेदनेही विचारात घेतली आहेत.

२.४.४ समितीच्या विचारार्थ प्राप्त प्रस्तावांमधील काही संवर्गांच्या वेतनश्रेणी / वेतनसंरचनेबाबतची प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याचे निदर्शनास आले आहे. काही संवर्गांच्याबाबतीत अशी न्यायालयीन प्रकरणे असल्याचे समितीच्या निदर्शनास आले नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा न्यायप्रविष्ट प्रकरणातील संवर्गांच्या वेतनसंरचनेसंदर्भात समितीच्या शिफारशी ह्या मा.न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहतील.

२.४.५ विविध संवर्गांच्या वेतनसंरचनेसंबंधी शिफारशी करताना समितीने सेवाप्रवेश नियमांचा आधार घेतला आहे. बहुतांश संवर्गांचे सेवाप्रवेश नियम बऱ्याच वर्षांपूर्वी विहित केले आहेत. दरम्यानच्या काळात त्यामध्ये काही सुधारणा झाल्या असल्यास व त्या समितीच्या निदर्शनास आल्या नसतील तर समितीने केलेल्या शिफारशी गैरलागू ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शिफारशींची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यापूर्वी संबंधित प्रशासकीय विभागांनी सेवाप्रवेश नियमांबाबत खातरजमा करणे योग्य होईल.

---------------

## प्रकरण - ३

## प्रशासकीय विभागांचे प्रस्ताव व त्यावरील समितीच्या शिफारशी

---

### ३.१ (अ)- कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) कृषि आयुक्तालय | | | | | |
| १ | संचालक (म.कृ.से; गट-अ) | १४३००- १८३०० | ३७४००-६७००० | ८७०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| २ | कृषि सह संचालक (म.कृ. से; गट-अ ) | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| ३ | अधीक्षक कृषि अधिकारी (म.कृ.से; गट-अ) | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ४ | महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ५ | महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब | ६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु.४००/-) | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ६ | कृषि अधिकारी, [म.कृ.से; गट-ब (कनिष्ठ)] | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| ७ | कृषि पर्यवेक्षक (गट-क) | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| ८ | कृषि सहाय्यक (गट-क) | १) ४०००-६०००<br>२)४५००-७००० (सात वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | ५२००-२०२००<br>५२००-२०२०० | २४००<br>२८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| ९ | प्रशासन अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| १० | सहाय्यक प्रशासन अधिकार | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४८०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| १२ | सहाय्यक अधीक्षक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| १३ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| १४ | लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |
| | ब) पशुसंवर्धन आयुक्तालय | | | | | |
| १ | पशुधन विकास अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| २ | सहाय्यक पशुधन विकास अधिकारी | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ३ | पशुधन पर्यवेक्षक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ९३००-३४८०० | ४२०० |

अ) कृषि आयुक्तालय

१)संचालक (म.कृ.से; गट-अ)

संघटनेचे अभिप्रायः-

१) कृषि विभागात आयुक्त, कृषि हे भारतीय प्रशासन सेवेतील प्रशासकीय प्रमुखपद आहे, तर शासन निर्णय दि. २९ मे, १९९८ अन्वये १) संचालक, मृद्संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, २) संचालक, कृषि विस्तार आणि ३) संचालक, फलोत्पादन इत्यादींना त्या-त्या विभागांचे राज्यस्तरीय तांत्रिक विभागप्रमुख म्हणून घोषित केले आहे.

२) रॉयल कमिशनने (१९२८) पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे :- The Director of Agriculture should be placed on terms of equality with other important departments.

३) राष्ट्रीय कृषि आयोगाने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत :-

अ) To facilitate quicker decision the heads of technical directorates can be granted ex-officio secretariate status.

ब) The various directorates connected with agricultural development should be specially declared as technical organizations & a provision to the effect that the post of directors of these directorates should be held by technical officers, be incorporated in the recruitment rules.

४) चौथ्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी राज्यातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यासाठी नेमलेल्या न्या. नाईक यांच्या अध्यक्षतेखालील वेतन समानीकरण समितीने फलोत्पादन संचालक (वेतनश्रेणी रु. २०००-२२५०) पदास अहवालातील परिच्छेद ३.२९ नुसार रु. ५१००-५७०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. तथापि, ही शिफारस डावलून या पदास चौथ्या वेतन आयोगात रु.४५००-५७०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. त्याआधारे या पदास पाचव्या वेतन आयोगात निम्नस्तरीय वेतनश्रेणी रु. १४३००-१८३०० लागू करण्यात आली आहे. तरी चौथ्या वेतन आयोगात त्या पदाशी समकक्ष वेतनश्रेणी रु. ४५००-५७०० असलेल्या पाटबंधारे विभागातील मुख्य अभियंता श्रेणी-२ यांना चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत मध्यावधी सुधारणा करुन दि. १४ डिसेंबर, १९९५ रोजी सुधारित वेतनश्रेणी रु. ५४००-६५०० लागू करण्यात आली. त्यामुळे या दोन पदांमधील समकक्षता बाधित झाली आहे. पाचव्या वेतन आयोगात मुख्य अभियंता श्रेणी-२ पदास रु.१६४००-२०९०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.

५) शासन निर्णय, १९९२ अन्वये मंत्रालय स्तरावर वेगळा जलसंधारण विभाग निर्माण करण्यात आला आहे. त्यात संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, संचालक, सामाजिक वनीकरण, मुख्य अभियंता (लघु पाटबंधारे) व संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांचा समावेश करण्यात आला आहे. मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन हे स्वतंत्र संचालनालय असून संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन हे त्याचे प्रमुख आहेत.

६) कृषि व पदुम विभागाच्या शासन निर्णय दि. २४ ऑगस्ट, २००५ अन्वये महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या राज्यस्तरीय मंडळाचे सदस्य सचिव म्हणून संचालक, फलोत्पादन यांना जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

७) ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय दि. १४ डिसेंबर, २००६ अन्वये केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, नदी-खोरे प्रकल्प, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाचे अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम व एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम तसेच राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रम, रोजगार हमी योजनेअंतर्गत मृद् व जलसंधारण इत्यादी योजनांचा समावेश आहे. या सर्व योजनांच्या माध्यमातून पाणलोट क्षेत्र आधारित क्षेत्रिय विकासाची कामे जसे - मृद्संधारण, जलसंधारण, वनीकरण व इतर कामे केली जातात.

८) या शासन निर्णयाद्वारे पाणलोट विकासाचा कार्यक्रम एकात्मिकरीत्या राबविण्याच्या दृष्टिने राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचे सदस्य सचिव म्हणून संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांना घोषित करण्यात आले आहे.

९) राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांचा समन्वय साधून परिणामकारक अंमलबजावणीसाठी संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

१०) महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत राज्याच्या सिंचन क्षेत्राच्या विकासासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेऊन लाभक्षेत्रातील कृषि उत्पादन वाढीसाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यस्तरावर स्थापन करण्यात आलेल्या स्टेट पॉलिसी सपोर्ट ग्रुपचे सदस्य व नोडल अधिकारी संचालक, कृषि विस्तार हे आहेत.

११) वरील विवेचनाचा सहानुभूतिपूर्वक विचार करुन मंत्रीमंडळाने दि. १६ जुलै, २००४ रोजी धोरणात्मक निर्णय घेऊन संचालक, कृषि संवर्गास रु.१६४००-२०९०० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

१२) सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीच्या राज्य वेतन सुधारणा समितीने या संवर्गास सुधारित वेतन संरचनेत वेतनबँड रु.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. इतर विभागांतील समकक्षता व मंत्रिमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी मंजूर केलेली वेतनश्रेणी लक्षात घेता सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.३७४००-६७००० अधिक रु.८९०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

२) कृषि सह संचालक (म.कृ. से; गट-अ )

संघटनेचे अभिप्रायः-

१) कृषि सह संचालकांना शासन निर्णय दि. १४ नोव्हेंबर, १९८३ अन्वये संभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांना विभागीय खरीप हंगामपूर्व बैठका आयोजित कराव्या लागतात. या बैठकांना मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा. कृषिमंत्री, मा. रोहयो / पणन मंत्री व संभागातील सर्व लोकप्रतिनिधी तसेच मा.विभागीय आयुक्त, मा.जिल्हाधिकारी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित असतात.

२) कृषि सह संचालक यांना गट-क संवर्गातील तांत्रिक व अतांत्रिक पदांचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

३) कृषि सह संचालक यांना संभागातील मृद, जलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, फलोत्पादन, कृषि विस्तार, सांख्यिकी व गुणवत्ता नियंत्रण इ. कामांवर तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रण ठेवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडावी लागते.

४) इतर विभागांतील संभाग प्रमुख असलेल्या सह संचालक, न्यायसहाय्यक आणि वैज्ञानिक प्रयोगशाळा, सह संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण त्याचप्रमाणे मुख्य अभियंता व प्राचार्य, जलसंपदा विभाग यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांच्या तुलनेत कृषि सह संचालक यांना अधिक कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

५) वरील विवेचनाच्या अनुषंगाने सहानुभूतिपूर्वक विचार करुन मा. मंत्रिमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी धोरणात्मक निर्णय घेऊन कृषि सह संचालक संवर्गास रु.१४३००-१८३०० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

६) सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीच्या राज्य वेतन सुधारणा समितीने या संवर्गास सुधारित वेतन संरचनेत वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. इतर विभागांतील समकक्षता व मा. मंत्रीमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी मंजूर केलेली वेतनश्रेणी लक्षात घेता सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

३) अधीक्षक कृषि अधिकारी (म.कृ.से; गट-अ)

संघटनेचे अभिप्राय:-

१) जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच त्यांच्या कार्यक्षेत्राचा विचार करता, अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये तीन पटीने वाढ झाल्याचे दिसून येते.

२) जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता यांचे कार्यक्षेत्र लाभक्षेत्रापुरते मर्यादित आहे. तर अधीक्षक कृषि अधिकारी यांना लाभक्षेत्र व लाभक्षेत्राबाहेरील अभियांत्रिकी पद्धतीच्या मृद व जलसंधारणाच्या कामांवर तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रण ठेवावे लागते. त्याचप्रमाणे फलोत्पादन व कृषि विस्तार योजनांची अंमलबजावणी करावी लागते. तसेच गुणवत्ता नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारीदेखील पार पाडावी लागते.

३) जिल्ह्याचा कृषि उत्पादन आराखडा तयार करण्याची जबाबदारी त्यांना पार पाडावी लागते.

राष्ट्रीय कृषि आयोगाने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे :-

District Level Agricultural Officer's scale of pay should be higher than that of any one on the existing district level officers whose work is required to co-ordinate.

४) वरील विवेचनाचा व वेगवेगळ्या आयोगांनी केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सहानुभूतिपूर्वक विचार करुन मंत्रिमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी धोरणात्मक निर्णय घेऊन अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गास रु.१२०००-१६५०० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

५) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी / उपायुक्त (विकास/ आस्थापना) व प्रकल्प संचालक, गट-अ या पदांच्या जबाबदारीत कोणतीही वाढ झालेली नसताना सहाव्या वेतन आयोगात रु.७६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. परंतु जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हे जिल्हास्तरीय प्रमुखाचे पद असूनसुद्धा या पदास रु.६६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे.

६) सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीच्या राज्य वेतन सुधारणा समितीने या संवर्गास सुधारित वेतन संरचनेत वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे.

७) इतर विभागांतील समकक्षता व मंत्रीमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी मंजूर केलेली वेतनश्रेणी लक्षात घेता सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

४) महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ

संघटनेचे अभिप्राय:-

१) महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ संवर्गात विशेष वेतन व विशेष वेतनरहीत पदे आहेत. या संवर्गातील उप विभागीयस्तरावरील कार्यालयप्रमुख पदास आहरण व संवितरणाचा अधिकार आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रात ४ ते ५ तालुक्यांचा समावेश होतो. त्यांचे सध्याचे कार्यक्षेत्र पाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता पदापेक्षा अधिक आहे.

२) चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यासाठी नेमलेल्या न्या. नाईक यांच्या अध्यक्षतेखालील वेतन समानीकरण समितीने कृषि विभागातील रु.६८०-१५०० अधिक विशेष वेतन रु.१०० या वेतनश्रेणीतील म.कृ.से.,गट-अ संवर्गातील पदांना रु.३०००-४५०० ही वेतनश्रेणी देण्याची शिफारस केली होती. तर त्यांच्याशी समकक्ष असलेल्या जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (वेतनश्रेणी रु.१०००-१५००) पदास रु.३०००-४५०० ही वेतनश्रेणी देण्याची शिफारस केली होती.

३) प्रत्यक्षात चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी लागू करताना म.कृ.से., गट-अ संवर्गातील विशेष वेतन असलेल्या पदांना वेतन समानीकरण समितीची शिफारस डावलून निम्नस्तरीय वेतनश्रेणी रु.२२००-४००० (अधिक विशेष वेतन रु.२००) मंजूर केली आहे. तर त्यांच्याशी समकक्ष असलेल्या कार्यकारी अभियंता पदास वेतन समानीकरण समितीने शिफारस केल्याप्रमाणे रु.३०००-४५०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. त्यामुळे या दोन पदांमधील समकक्षता बाधित झाली आहे.

४) म.कृ.से., गट-अ संवर्गाशी समकक्ष असलेल्या कार्यकारी अभियंता पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये कोणतीही वाढ केलेली नसताना त्यांना वरची वेतनश्रेणी मंजूर केली आहे. मात्र म.कृ.से., गट-अ संवर्गातील पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये तिपटीने वाढ झाली असताना त्यांना निम्न वेतनश्रेणी दिल्यामुळे या दोन पदांमधील समकक्षता बाधित झाली आहे. म.कृ.से., गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांना खाजगी नर्सरींना परवाना देण्याचे अधिकार आहेत. त्याचप्रमाणे ते जिल्हास्तरीय ॲग्रीकल्चर टेक्नॉलॉजी एजन्सी मॅनेजमेंट (आत्मा) कमिटीचे सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत.

५) म.कृ.से., गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांना कृषि विस्तार, फलोत्पादन आणि मृद् व जलसंधारण कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार आहेत.

६) वरील विवेचनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन राज्य मंत्रीमंडळाने दि. १६ जुलै, २००४ रोजी धोरणात्मक निर्णय घेऊन या संवर्गास रु.१०६५०-१५८५० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

७) सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीच्या राज्य वेतन सुधारणा समितीने या संवर्गास सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. इतर विभागांतील समकक्षता व मंत्रीमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी मंजूर केलेली वेतनश्रेणी लक्षात घेता सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

५) महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब

संघटनेचे अभिप्राय:-

१) महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब संवर्गातील अधिकारी हे तालुकास्तरीय कार्यालयप्रमुख आहेत. त्यांना आहरण व संवितरणाचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

२) कृषि विभागातील म.कृ.से; गट-ब संवर्गातील पदांना व पशुधन विभागातील जिल्हा पशुधन अधिकारी / तंत्र अधिकारी / सहाय्यक संचालक या पदांना भोळे वेतन आयोगात वर्ग-२ राजपत्रित दर्जासह रु.६००-११५० ही वेतनश्रेणी होती. तथापि, भोळे वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत दि.१८ मे, १९७८ रोजी मध्यावधी सुधारणा करुन जिल्हा पशुधन अधिकारी (जिल्हा परिषद) या पशुधन विभागातील तत्सम पदांना वर्ग-१ दर्जासह रु.६८०-१२५० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्यामुळे म.कृ.से; गट-ब संवर्गाची त्यांच्याशी असलेली समकक्षता बाधित झाली आहे. असे करताना सहाय्यक संचालक, पशुधन यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

३) पशुधन विभागातील गट-क संवर्गातील पशुधन विकास अधिकारी या पदास भोळे वेतन आयोगात रु.५००-९०० ही वेतनश्रेणी होती. दि. १२ व २५ सप्टेंबर, १९७९ रोजी मध्यावधी सुधारणा करुन त्या पदास वर्ग-२ दर्जासह रु.६००-११५० ही सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली. त्यामुळे म.कृ.से; गट-ब संवर्गाची त्या संवर्गाशी असलेली वरिष्ठता बाधित झाली आहे. असे करताना पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ करण्यात आलेली नव्हती.

४) चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी राज्यातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यासाठी न्या. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या वेतन समानीकरण समितीने उप अभियंता, पशुधन विकास अधिकारी, वैद्यकीय अधिकारी (महिला व बालकल्याण विभाग) आणि म.कृ.से; गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना रु.२०००-३५०० अशी एक समान वेतनश्रेणी प्रस्तावित केली होती. त्याप्रमाणे या पदांना चौथ्या वेतन आयोगात रु.२०००-३५०० अशी एकसमान वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती.

५) मात्र, चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत मध्यावधी सुधारणा करुन दि.१४ डिसेंबर, १९९५ रोजी उप अभियंता पदास वर्ग-१ दर्जासह सुधारित वेतनश्रेणी रु.२२००-४००० लागू करण्यात आली. त्यामुळे कृषि पदवीधर असलेल्या म.कृ.से; गट-ब संवर्गातील पदांची त्यांच्याशी असलेली समकक्षता बाधित झाली आहे. असे करताना उप अभियंता पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नव्हती.

६) चौथ्या वेतन आयोगात एम.बी.बी.एस. पदवीधर वैद्यकीय अधिकारी पदास रु.२२००-४००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. तर कृषि पदवीधर असलेल्या म.कृ.से; गट-ब संवर्गातील पदांना रु.२०००-३५०० वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. त्यामुळे एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी पदाबरोबरची म.कृ.से; गट-ब संवर्गातील पदांची समकक्षता बाधित झाली आहे. असे करताना एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ करण्यात आलेली नाही. एम.बी.बी.एस. वैद्यकीय पदवीधरांसाठी वैद्यकीय अधिकारी हे Entry Cadre आहे तर B.Sc.(Agri.) पदवीधरांसाठी कृषि पर्यवेक्षक हे Entry Cadre आहे. कृषि पर्यवेक्षक या पदाच्या पदोन्नतीच्या तिसऱ्या टप्प्यावर म.कृ.से; गट-ब संवर्गातील पदे आहेत. त्याचप्रमाणे चौथ्या वेतन आयोगात एम.बी.बी.एस. पदवीधरांव्यतिरिक्त इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांना व म.कृ.से; गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना एकसमान वेतनश्रेणी रु.२०००-३५०० मंजूर होती. तथापि, पाचव्या वेतन आयोगात एम.बी.बी.एस. पदवीधरांव्यतिरिक्त इतर वैद्यकीय पदवीधर वैद्यकीय अधिकाऱ्यांना रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे कृषि पदवीधर असलेल्या म.कृ.से; गट-ब संवर्गाशी त्या पदाशी असलेली चौथ्या वेतन आयोगातील समकक्षता बाधित झाली आहे.

७) पशुधन विकास अधिकारी पदाच्या पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत मध्यावधी सुधारणा करुन सुधारित वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० वर्ग-१ दर्जासह मंजूर करण्यात आली आहे. तर म.कृ.से; गट-ब संवर्गाच्या पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत मध्यावधी सुधारणा होऊनही निम्नस्तरीय वेतनश्रेणी रु.६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु. ४००) मंजूर करण्यात आली आहे.

मात्र, म.कृ.से; गट-ब संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये तीन पटींनी वाढ करण्यात आली असल्याची बाब दुर्लक्षिण्यात आली आहे.

८) जलसंपदा विभागातील शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ यांच्या चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत दि.१४ डिसेंबर, १९९५ रोजी मध्यावर्धी सुधारणा करताना रु.२०००-३५०० ही वेतनश्रेणी वर्ग-२ दर्जासह मंजूर केली आहे आणि त्यांचे पदोन्नतीचे पद असलेल्या उप अभियंता पदालादेखील वर्ग-१ दर्जासह रु.२२००-४००० वेतनश्रेणी मंजूर करण्यात येऊन या पदाची वरिष्ठता अबाधित राखण्यात आली आहे.

९) मात्र, कृषि विभागातील कृषि अधिकारी संवर्गाची वेतनश्रेणी चौथ्या वेतन आयोगात रु.१६४०-२९०० होती. तर त्याचे पदोन्नतीचे पद असलेल्या म.कृ.से; गट-ब संवर्गाची वेतनश्रेणी रु.२०००-३५०० होती. चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत मध्यावर्धी सुधारणा करुन दि.८ डिसेंबर, १९९४ रोजी कृषि अधिकारी संवर्गास रु.२०००-३२०० ही वेतनश्रेणी मंजूर केली. मात्र, म.कृ.से; गट-ब संवर्गास चौथ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत सुधारणांचा लाभ देण्यात आला नाही. पाचव्या वेतन आयोगात कृषि अधिकारी संवर्गास रु.६५००-१०५०० तर पदोन्नतीच्या म.कृ.से; गट-ब संवर्गास रु.६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु.४००) अशी एकसमान वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे म.कृ.से; गट-ब संवर्गातील पदांची वरिष्ठता बाधित झालेली आहे.

१०) ज्याप्रमाणे शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ यांचे पदोन्नतीचे पद असलेल्या उप अभियंता पदाची वरिष्ठता व दर्जा अबाधित ठेवण्यात आला, त्याप्रमाणे कृषि अधिकारी पदाचे पदोन्नतीचे पद असलेल्या म.कृ.से; गट-ब संवर्गातील पदांची वरिष्ठता व दर्जा अबाधित ठेवण्यात यावा.

११) म.कृ.से; गट-ब संवर्गातील ५० टक्के पदे कृषि अधिकारी संवर्गातून पदोन्नतीने भरली जातात. कृषि अधिकाऱ्यांना पदोन्नतीसाठी २० ते २५ वर्षांचा कालावधी लागतो. त्यानंतर म.कृ.से; गट-ब संवर्गात पदोन्नतीने आलेल्या कृषि अधिकाऱ्यांस वरची वेतनश्रेणी न मिळता त्याच वेतनश्रेणीत रु.६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु.४००) मध्ये काम करावे लागते. त्यावेळी त्यांनी वेतनश्रेणीचा अंतिम टप्पा पार केलेला असतो. सेवानिवृत्तिच्या वेळी विशेष वेतनाचा निवृत्तिवेतन निश्चित करताना काहीही लाभ मिळत नाही. मात्र, म.कृ.से; गट-ब संवर्गात पदोन्नत होऊन आलेल्या कृषि अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात वाढ होते. अशी अभूतपूर्व कुंठीतता म.कृ.से; गट-ब संवर्गात पदोन्नत झालेल्या ५० टक्के कृषि अधिकाऱ्यांच्या वाट्यास येते.

१२) म.कृ.से; गट-ब संवर्गातील तालुका कृषि अधिकारी यांच्या अधिनस्त ४ ते ६ मंडळ कृषि अधिकारी कार्यरत असतात. त्यांचे कार्यक्षेत्र उप अभियंता, वैद्यकीय अधिकारी व पशुधन विकास अधिकारी यांच्यापेक्षा तुलनेने जास्त आहे. त्यांना तालुक्याचा कृषि उत्पादन आराखडा व एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास योजनेचा प्रकल्प आराखडा तयार करावा लागतो. यामध्ये जलसंपदा विभाग (स्थानिक / राज्यस्तर), भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या कामांचा समावेश असतो. फलोत्पादन, कृषि विस्तार व सांख्यिकी योजनेच्या कामांची अंमलबजावणी करावी लागते. तसेच तालुक्याची आणेवारी ठरविताना महसूल विभागाला पीक कापणी प्रयोग घेऊन ते सहाय्य करतात. तालुका कृषि अधिकारी हा तालुक्यातील कृषिक्षेत्राच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे.

१३) वरील वस्तुस्थिती लक्षात घेऊन मंत्रीमंडळाने दि. १६ जुलै, २००४ रोजी धोरणात्मक निर्णय घेऊन म.कृ.से; गट-ब संवर्गास वर्ग-१ दर्जासह रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

१४) पशुधन विभागातील गट-क संवर्गातील पशुधन विकास अधिकारी या पदास प्रत्येक वेतन आयोगाच्या सुधारणा समितीने कोणतीही सुधारित वेतनवाढ सुचविलेली नाही, परंतु त्यानंतर चार वेळा मध्यावर्धी सुधारणा करुन गट-क दर्जाच्या या पदास गट-अ पदाचा दर्जा व वेतनश्रेणी देण्यात

आली आहे. मात्र तालुका कृषि अधिकारी या तालुकास्तरीय पदाच्या वेतनश्रेणीत एकदाही मध्यावधी सुधारणा केली नाही.

१५) तहसिलदार या पदास तालुका कृषि अधिकारी या पदाच्या समकक्ष वेतनश्रेणी व दर्जा होता. परंतु त्यांना वर्ग-१ दर्जा व वरची वेतनश्रेणी देण्यात आली. जबाबदारीत कोणतीही वाढ झालेली नसताना हा बदल केला आहे.

१६) केंद्र सरकारच्या कृषि विभागातील Central Fertilizer Quality Control and Training Institute, Faridabad, Haryana या संस्थेतील उप संचालक या पदाच्या समकक्ष विश्लेषण रसायनशास्त्रज्ञ या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. शैक्षणिक अर्हता समान आहे. तरी त्या पदास मंजूर असलेला वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

१७) सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीच्या राज्य वेतन सुधारणा समितीने या संवर्गास सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. इतर विभागातील समकक्षता व मंत्रिमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी मंजूर केलेली वेतनश्रेणी लक्षात घेता सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

६) कृषि अधिकारी [म.कृ.से; गट-ब (कनिष्ठ)]

संघटनेचे अभिप्राय:-

१) कृषि अधिकारी संवर्गातील अधिकारी हे फलोत्पादन रोपवाटिका प्रमुख, मंडळस्तरावरील कार्यालयप्रमुख असून, कृषि चिकित्सालयाचेही प्रमुख आहेत. त्यांना संवितरणाचे अधिकार आहेत. या संवर्गास बडकसपूर्व व बडकस तसेच भोळे वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत वर्ग - ३ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी व शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी - २ यांच्यापेक्षा वरची वेतनश्रेणी होती.

२) प्रथमत: पशुधन विभागातील वर्ग-३ संवर्गातील पशुधन विकास अधिकारी या पदाच्या भोळे वेतन आयोगातील रु.५००-९०० वेतनश्रेणीमध्ये दि. १२ व २५ सप्टेंबर, १९७९ रोजी मध्यावधी सुधारणा करुन वर्ग-२ दर्जासह रु.६००-११५० ही सुधारित वेतनश्रेणी देण्यात आली होती. त्यानंतर कृषि अधिकारी पदाच्या भोळे वेतन आयोगाच्या रु.५००-९०० वेतनश्रेणीमध्ये मध्यावधी सुधारणा करुन, त्यास वर्ग-२ (कनिष्ठ) दर्जासह सुधारित वेतनश्रेणी रु.५५०-९०० दि.२६ जून, १९८१ रोजी लागू केली. त्यामुळे कृषि अधिकाऱ्यांची बडकस आयोगाच्या वेतनश्रेणीतील वरिष्ठता बाधित झाली आहे.

३) त्यानंतर शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ पदाच्या भोळे वेतन आयोगाच्या रु.५००-९०० वेतनश्रेणीमध्ये मध्यावधी सुधारणा करुन कृषि अधिकाऱ्यांपेक्षा वरची वेतनश्रेणी रु.६००-९०० वर्ग-२ (कनिष्ठ) दर्जासह दि.१६ एप्रिल, १९८४ रोजी लागू करण्यात आली आहे. त्यामुळे कृषि अधिकारी पदाची या संवर्गाशी असलेली भोळे व भोळेपूर्व आयोगाच्या वेतनश्रेणीतील ज्येष्ठता बाधित झाली आहे.

४) वर्ग-३ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस. व्यतिरिक्त ॲलोपॅथिक पदवीधर) पदास भोळे वेतन आयोगात कृषि अधिकाऱ्यांपेक्षा निम्न वेतनश्रेणी रु.३९५-८०० मंजूर होती. ती चौथ्या वेतन आयोगात रु.२०००-३५०० करण्यात आली तर वैद्यकीय पदवीधरांना भोळे वेतन आयोगात रु.३६५-७६० वेतनश्रेणी मंजूर होती आणि चौथ्या वेतन आयोगात रु.१६४०-२९०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती.

५) पाचव्या वेतन आयोगामध्ये पशुधन विकास अधिकारी पदास दि.२० मार्च, १९९९ रोजी रु.८०००-१३५०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली व दि.२५ मे, २००४ रोजी वर्ग-१ दर्जा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे वर्ग-३ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी पदावरील आयुर्वेदिक

वैद्य, युनानी व हकीम यांना देखील रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी दि.२२ फेब्रुवारी, २००६ रोजी लागू केली आहे.

६) वरील विवेचानावरुन कृषि पदवीधर असलेल्या वर्ग-३ संवर्गातील कृषि अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची वर्ग-३ संवर्गातील वैद्यकीय, पशुवैद्यकीय व अभियांत्रिकी पदवीधरांबरोबरची वरिष्ठता / समकक्षता बाधित झाली आहे.

७) कृषि अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नतीसाठी २० ते २५ वर्षांचा कालावधी लागतो. त्यानंतर त्यांना म.कृ.से; गट-ब संवर्गात त्याच वेतनश्रेणीत रु.६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु.४००) पदोन्नती मिळते. मंडळ स्तरावरुन तालुका कार्यालयप्रमुख म्हणून पदोन्नती मिळाल्यावर अधिक कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. मात्र त्यांना वेतनश्रेणीत कोणतीही वाढ मिळत नाही. म्हणून संपूर्ण सेवा कालावधीत एकाच वेतनश्रेणीत काम करावे लागण्याची अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते.

केंद्र सरकारच्या कृषि विभागातील Central Fertiliser Quality Control and Training Institute, Faridabad, Haryana या संस्थेतील विश्लेषक या पदाच्या समकक्ष विश्लेषक कृषि अधिकारी, खत चाचणी प्रयोगशाळा या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. शैक्षणिक अर्हता समान आहे. तरी या पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

८) सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीच्या राज्य वेतन सुधारणा समितीने या संवर्गास सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. इतर विभागांतील समकक्षता व मंत्रीमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी मंजूर केलेली वेतनश्रेणी लक्षात घेता सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे अशी मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

७) कृषि पर्यवेक्षक (गट-क)

संघटनेचे अभिप्राय:-

१) कृषि पर्यवेक्षक संवर्गातील अधिकारी हे सजास्तरावरील प्रमुख अंमलबजावणी करणारे अधिकारी आहेत. सदरचे पद कृषि विभागातील कृषि पदवीधरांसाठी एन्ट्री कॅडरचे पद आहे.

२) क्षेत्रिय स्तरावर एका कृषि पर्यवेक्षकास २०-२५ गावांच्या समुहातील सरासरी ६००० शेतकरी कुटुंबे किंवा सरासरी ९००० हेक्टर निव्वळ पेरणी क्षेत्रातील किंवा १८,००० हेक्टर भौगोलिक क्षेत्रातील फलोत्पादन, मृद्संधारण व कृषि विस्तार या ३ योजनांतर्गत एकुण ७६ उपयोजनांची पर्यवेक्षकीय जबाबदारी पार पाडावी लागते.

३) कृषि पर्यवेक्षक संवर्गात कृषि पदवीधर [ B.Sc.(Agri.)/ B.Tech.(Agri.) ] व उच्च शैक्षणिक अर्हताधारक कार्यरत आहेत.

४) वेतन समानीकरण समितीच्या (न्या. नाईक समिती) शिफारशीनुसार चौथ्या वेतन आयोगात कृषि पर्यवेक्षक या तांत्रिक संवर्गास रु.१४००-२६०० वेतनश्रेणी लागू होती. बडकसपूर्व कृषि पर्यवेक्षक, शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२, पशुधन विकास अधिकारी व वैद्यकीय अधिकारी या अराजपत्रित वर्ग-३ संवर्गातील पदांना एकसमान वेतनश्रेणी रु.२००-४०० मंजूर होती.

५) कृषि पर्यवेक्षक हे पद कृषि विभागातील तांत्रिक संवर्गातील कृषि सहाय्यक पदाचे पदोन्नतीचे पद आहे. तर शाखा अभियंता हे जलसंपदा विभागातील तांत्रिक संवर्गातील कनिष्ठ अभियंता पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

६) कृषि पर्यवेक्षक पदासाठी कृषि पदवी ही शैक्षणिक अर्हता आहे; तर शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-२ या पदांसाठी अभियांत्रिकी पदविका व पदवी ही शैक्षणिक अर्हता आहे. या पदावर काम करणाऱ्या अभियांत्रिकी पदवीधरास सहाय्यक अभियंता श्रेणी-२ असे संबोधून वर्ग-२ दर्जासह रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आली होती. त्या अनुषंगाने त्यांना ६व्या वेतन आयोगात वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड पे रु.४४०० मंजूर करण्यात आला आहे.

७) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील वैद्यकीय अधिकारी वर्ग-३ संवर्गातील पदांची भोळे वेतन आयोगातील वेतनश्रेणी (१) रु.३९५-८०० (एम.बी.बी.एस. व्यतिरिक्त ॲलोपॅथी) (२) रु.३६५-७६० (इतर) कृषि पर्यवेक्षकांच्या रु.४१०-७६० वेतनश्रेणीपेक्षा कमी होती. त्यानंतर पुढील चौथ्या व पाचव्या वेतन आयोगामध्ये त्यांच्या वेतनश्रेणी व दर्जात वाढ करण्यात आली व त्या अनुषंगाने सहाव्या वेतन आयोगात सुध्दा वाढ करण्यात आली. असे करतांना त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. मात्र, कृषि पर्यवेक्षकांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये तीन पटीने वाढ झाली आहे.

८) कृषि पर्यवेक्षकास पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाची तसेच लाभक्षेत्रातील मध्यम व लघु प्रकल्पातील आऊटलेटनंतरची शेतीला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ देण्यासाठी आवश्यक असणारी भाग १ व २ ची कामे कृषि सहाय्यकांमार्फत करावी लागतात.

९) कृषि विभागाची अभियांत्रिकी स्वरुपाची कामे कृषि पर्यवेक्षक हे स्वतःच्या पर्यवेक्षणात कृषि सहाय्यकांच्या माध्यमातून कुशल, अकुशल मजूरांकडून करुन घेतात आणि मजूरांचे पगार अदा करतात. त्याउलट शाखा अभियंता मात्र निविदा पध्दतीने ठेकेदारांकडून कामे करुन घेतात. त्यामुळे साहजिकच कृषि पर्यवेक्षकांची जबाबदारी मुलतःच जास्त आहे.

१०) कृषि पर्यवेक्षकांना पदोन्नतीसाठी २० ते २५ वर्षांचा कालावधी लागतो. मात्र शाखा अभियंता आणि सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ यांना आश्वासित प्रगती योजनेमुळे १२ वर्षांनी त्यांच्या पदोन्नतीच्या उप अभियंता पदाची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० लागू होते. ही बाब कृषि पर्यवेक्षकांवर अन्याय करणारी आहे.

११) कृषि पर्यवेक्षकांच्या वेतनश्रेणीवाढीचा प्रस्ताव मंत्रीमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजी स्वीकृत केला आणि तो दि.२१ जुलै, २००४ रोजी कायम केला होता. यामध्ये कृषि पर्यवेक्षक संवर्गास रु.६५००-१०५०० वेतनश्रेणी गट-ब (कनिष्ठ) राजपत्रित दर्जासह मंजूर केली होती. त्या अनुषंगाने सहाव्या वेतन आयोगामध्ये कृषि पर्यवेक्षक संवर्गास वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४४०० मंजूर होणे आवश्यक होते. तथापि सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केल्यामुळे या संवर्गावर अन्याय झाला आहे.

वरील बाबींचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन कृषि क्षेत्राच्या विकासासाठी नेमलेल्या विविध समित्यांच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

८) कृषि सहाय्यक (गट-क)

संघटनेचे अभिप्रायः-

१. समकक्षता - केंद्र शासनाच्या सेवेत कृषि सहाय्यक या संवर्गास समकक्ष असलेले पद अस्तित्वात नाही. त्यामुळे केंद्र शासनातील पदांशी या पदाच्या तुलनीयतेचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि सेवा प्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच बडकस आयोगापूर्वीची वेतनश्रेणी यांचा

विचार करता कृषि सहाय्यक हे पद राज्य शासनाच्या जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाशी समकक्ष आहे.

(१.१) शैक्षणिक पात्रता (कनिष्ठ अभियंता) :- जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदासाठी अभियांत्रिकी पदवी (१२ + ४) किंवा अभियांत्रिकी पदविका (१० + ३) किंवा (१० + २) तसेच अर्हताविरहित अशी शैक्षणिक पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे.

(१.२) शैक्षणिक पात्रता (कृषि सहाय्यक) :- कृषि पदवी (१२ + ४), कृषि पदविका (१० + २) अशी शैक्षणिक पात्रता निश्चित करण्यात आलेली असून सध्या ७० टक्केपेक्षा अधिक कृषि सहाय्यक हे कृषि पदवी आणि कृषि पदव्युत्तर पदवीधारक आहेत.

(१.३) तांत्रिक आणि व्यावसायिक पात्रता :- उपरोक्त दोन्ही पदांसाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक पात्रता या तांत्रिक आणि व्यावसायिक आहेत. केंद्र शासनाने आदेश क्रमांक 8-48/76-Gen I co ord, GOI Ministry of Agriculture & Irrigation, Deptt. Of Agriculture, New Delhi, dated 29th May, 1976 अन्वये कृषि विभाग तांत्रिक असल्याचे घोषित केले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, परिपत्रक क्रमांक आकृवि - ७५८२/१०१६२/१५-अे दि.२२ ऑक्टोबर, १९८१ अन्वये कृषि पदवी तांत्रिक व व्यावसायिक असल्याचे घोषित केले आहे.

(१.४) कर्तव्ये व जबाबदाऱ्या :- कृषि सहाय्यक आणि जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता या दोन्ही पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच असून, कृषि सहाय्यकाकडे नियमित कामांव्यतिरिक्त इतर अनेक योजनांच्या कामाचा भार आहे. कृषि सहाय्यकांना पीक संवर्धन, निविष्ठा पुरवठा, फलोत्पादन विकास, बीजोत्पादन, बीज प्रमाणीकरण, कृषि विस्तार व प्रशिक्षण, सांख्यिकी, व्यापारक्षम शेती, सेंद्रीय शेतीस प्रोत्साहन देणे, माती परिक्षण व पाणी परिक्षण, कीड रोगाचे सर्वेक्षण करून त्यानुसार उपायोजना करणे, आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचानामे करून त्यांना मदत वाटप करणे, निर्यातक्षम मालाची उत्पादन प्रक्रिया व काढणीपश्चात हाताळणीसंबंधीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे यांसारखी विविध प्रकारची कामे पार पाडावी लागतात. कृषि सहाय्यक एकाच वेळी वैद्यकीय व पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वनस्पतींवरील डॉक्टर आहे, त्याचवेळी तो जलसंपदा विभागातील अभियंत्याप्रमाणे पाणलोट विकासाची अभियांत्रिकी स्वरुपाची कामे करीत असल्याने अभियंतादेखील आहे. त्यामुळेच सेवा प्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचा विचार करता कृषि सहाय्यक हे पद जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाशी समकक्ष आहे.

२. वेतनश्रेणी - सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच असल्याने कृषि सहाय्यकास बडकस आयोगापूर्वी पदविका धारकास (१०+२) रु.१००-१८० तर पदवीधारकास (१२+४) रु.१४५-२५० अशा दोन वेतनश्रेण्या होत्या. त्यावेळी जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता संवर्गास रु.१३०-२५० ही कृषि सहाय्यकापेक्षा कमी वेतनश्रेणी मिळत होती.

बडकस आयोगात मात्र कृषि सहाय्यकास रु. ११५-२५० आणि कनिष्ठ अभियंता संवर्गास रु.२४०-३६० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. म्हणजेच, पूर्वी रु.१४५-२५० ही वेतनश्रेणी घेणाऱ्या कृषि सहाय्यकास कनिष्ठ अभियंत्यापेक्षा कमी वेतनश्रेणी मंजूर करून त्याची वरिष्ठता बाधित करण्यात आली. या बडकस आयोगापूर्व वेतनत्रुटीच्या आधारे कृषि सहाय्यकावर प्रत्येक वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत अन्याय करण्यात आलेला आहे.

पाचव्या वेतन आयोगामध्ये कृषि सहाय्यकास रु.४०००-१००-६००० आणि सात वर्षांनंतर रु.४५००-१२५-७००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. तर कनिष्ठ अभियंता संवर्गास रु.५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. म्हणजेच बडकस आयोगपूर्व प्रत्यक्षात कनिष्ठ अभियंता संवर्गापेक्षा वरच्या वेतनश्रेणीत काम करणाऱ्या कृषि सहाय्यकास वेतनत्रुटी ठेऊन कनिष्ठ अभियंत्यापेक्षा कमी वेतनश्रेणी देण्यात आलेली असून, त्याची समकक्षता बाधित करण्यात आली आहे. असे असूनही पाचव्या वेतन आयोगात मिळणाऱ्या वेतनश्रेणीचाच विचार करून सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनसंरचना निश्चित केली आहे. त्यामुळे कृषि सहाय्यकास वेतनबँड

रु.५२००-२०२०० आणि त्यास समकक्ष असलेल्या कनिष्ठ अभियंता या संवर्गास रु.९३००-३४८०० हा वेतनबँड मंजूर केला आहे. असे झाल्यामुळे बडकस आयोग, भोळे आयोग, पाचवा वेतन आयोग आणि सहाव्या वेतन आयोगात कृषि सहायक या संवर्गावर केलेला अन्याय कायम राहणार आहे. म्हणूनच सहाव्या वेतन आयोगात कृषि सहाय्यकास समकक्ष असलेल्या कनिष्ठ अभियंता या पदाशी समकक्षता पुनर्प्रस्थापित करून या संवर्गास रु.९३००-३४८०० हा वेतनबँड निश्चित करण्यात यावा अशी आग्रही आणि न्याय्य मागणी आहे.

३. पदोन्नतीच्या संधी - महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय क्र.सीडीएस/१५८२/१५८/(२१५) आ (१०), दि.१६ एप्रिल, १९८४ नुसार पदवीधर व अन्य कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित दर्जा देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार तीन वर्षांची पदविका (१०+३) धारण केलेले कनिष्ठ अभियंते पाच वर्षांत, दोन वर्षांची पदविका (१०+२) धारण केलेली कनिष्ठ अभियंते सात वर्षांत, तर अर्हताविरहीत कनिष्ठ अभियंतेदेखील दहा वर्षांच्या सेवेनंतर राजपत्रित अधिकारी वर्ग-२ (कनिष्ठ स्तर) दर्जा आणि त्याप्रमाणे वेतनश्रेणी मिळण्यास पात्र होतात.

तथापि, कृषि सहाय्यकास २० ते २५ वर्षांपर्यंत पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होत नाहीत. तसेच पदोन्नतीनंतरही त्यांच्या पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी रु.५०००-१५०-८००० असल्याने कृषि सहाय्यकास कोणताही लाभ मिळत नाही.

४. केंद्र शासनाने कृषि क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शिफारशी करण्याकरिता रॉयल कमिशन (१९२८), इंडो- अमेरिकन टीम (१९५५), नालघर कमिशन (१९५८) व राष्ट्रीय कृषि आयोग (१९७६) या विविध समित्या / आयोगांची स्थापना केली होती. सदर आयोगांनी कृषि क्षेत्राकडे उच्च बुध्दिवंत आकर्षित करण्यासाठी शिफारशी केल्या आहेत. नालघर कमीशनच्या अहवालातील प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :-

४.१ It is well known fact that the scales of pay of the Agriculture Services are much less as compared to those of the general administrative services & even other technical services such as Engineering, Medical Education etc. (परिच्छेद २.२०)

४.२ The committee recommends that the scale of pay of gazetted as well as sub-ordinate Agriculture Services should not be lower than those for other services requiring comparable training periods particularly because the Agriculture Services do not enjoy the same social prestige, advantages & facilities that are available to other services. ( परिच्छेद २.२४ )

५. दि. ३० डिसेंबर, १९८६ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या राज्यांच्या कृषिमंत्र्यांच्या परिषदेतील शिफारशी खालीलप्रमाणे आहेत :-

५.१ उपरोक्त परिषदेच्या अहवालातील पृष्ठ क्रमांक ३१ परिच्छेद २-क प्रमाणे कृषि पदवी वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि पशुवैद्यकीय पदवीशी समकक्ष आहे. कृषि विभागातील तांत्रिक संवर्गाची इतर विभागांतील तांत्रिक संवर्गाच्या तुलनेत निर्माण झालेली असमानता दूर करण्याची आवश्यकता आहे.

५.२ अहवालातील पृष्ठ क्रमांक २ मधील मुद्दा क्र. ४ नुसार कृषि क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना इतर तांत्रिक सेवेतील उदा. अभियांत्रिकी आणि पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व दर्जा देण्याची शिफारस केली आहे.

६. ही वस्तुथिती असतानाही (Report of Equivalence Committee for revision of pay scales - Maharashtra State) या न्या. नाईक यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सन १९८७ मध्ये दिलेल्या अहवालातील पृ. क्र. ११, परिच्छेद क्र. ३.८ मध्ये पशुवैद्यकीय, वैद्यकीय व अभियांत्रिकी पदवीधरांना एन्ट्री लेव्हलसाठी रु.२२००-४००० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. मात्र कृषि पदवीधारकांना इतर अतांत्रिक पदवीधारकांबरोबर (उदा. बी.ए., बी.कॉम. इ.) तुलना करून एन्ट्री

लेव्हलसाठी रु.१२००-२०४० या वेतनश्रेणीची शिफारस करण्यात आली. त्यामुळे कृषि पदवीधरांची वैद्यकिय, अभियांत्रिकी आणि पशुवैद्यकीय पदवीधारकांशी असलेली समकक्षता बाधित झाली आहे.

७. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता कृषि सहाय्यकावर गेल्या तीन वेतन आयोगांच्या सुधारणांमध्ये झालेला अन्याय दूर करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळेच महाराष्ट्र राज्य कृषि सहाय्यक संघटनेने शासनाकडे वेळोवेळी वेतनत्रुटी सुधारण्यासाठी मागणी केलेली आहे.

८. याबाबत वेगवेगळे आयोग / समितीने केलेल्या शिफारशींचा विचार करुन दि.१६ जुलै, २००४ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत कृषि सहाय्यकांना रु.५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याचा निर्णयदेखील घेतलेला आहे. मात्र त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित न झाल्याने वेतनत्रुटी कायम राहिली आहे.

९. या सर्व वस्तुस्थितीचा विचार करुन कृषि सहाय्यक या संवर्गाची कनिष्ठ अभियंता (जलसंपदा विभाग) या संवर्गाशी बडकस आयोगपूर्व असलेली समकक्षता पुनर्प्रस्थापित करण्यासाठी सहाव्या वेतन आयोगात कृषि सहाय्यकांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करावी असे प्रस्ताविण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

समितीची शिफारस :-

अ) कृषि आयुक्तालय

१) संचालक (म.कृ.से; गट-अ)

२) कृषि सह संचालक (म.कृ. से; गट-अ )

३) अधीक्षक कृषि अधिकारी (म.कृ.से; गट-अ)

४) महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ

५) महाराष्ट्र कृषि सेवा, गट -ब

६) कृषि अधिकारी, [म.कृ.से; गट-ब (कनिष्ठ)]

७) कृषि पर्यवेक्षक (गट-क)

८) कृषि सहाय्यक (गट-क)

वरील संवर्गासाठी उच्च वेतनसंरचनेची मागणी करताना प्रामुख्याने जलसंपदा विभागातील अभियंता संवर्गाच्या वेतनश्रेणींशी तुलना केली आहे. तसेच अन्य विभागांतील मुख्य कार्यकारी अधिकारी / उपायुक्त (विकास/ आस्थापना) व प्रकल्प संचालक, गट-अ, वैद्यकीय अधिकारी व पशुधन विकास अधिकारी या संवर्गांशीदेखील तुलना केली आहे. रॉयल कमीशन ( १९२८ ), नालघर कमिशन (१९५८) व राष्ट्रीय कृषि आयोग (१९७६) च्या शिफारशींचाही संदर्भ दिलेला आहे. उपरोक्त पदांना मंत्रीमंडळाने दि.१६ जुलै, २००४ अन्वये मंजूर केलेल्या उच्च वेतनश्रेणी विचारात घेऊन त्या अनुषंगाने उच्च सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी केली आहे.

कृषि विभागातील विचाराधीन संवर्गांना केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी अथवा राज्य शासनाकडील जलसंपदा विभागातील अभियंता संवर्गाशी किंवा वर नमूद केलेल्या इतर विभागांतील संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. कोणत्याही संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना विचारात घेतले जाणारे सर्वसाधारण निकष म्हणजेच त्या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे स्वरूप, पदाचा दर्जा, पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठीची किमान शैक्षणिक अर्हता, पदवी / पदविकेचे स्वरूप, पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सार्वजनिक / प्रशासकीय व्यवस्थेतील स्थान व सेवेचे महत्व आणि त्यानुषंगाने येणाऱ्या विशिष्ठ जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊनच उपरोक्त संवर्गांना वेळोवेळी वेतनश्रेण्या विहित करण्यात आल्या आहेत.

वर नमूद केलेल्या कृषि संबंधित विविध आयोगांच्या शिफारशींनंतर तिसरा वेतन आयोग, चौथा वेतन आयोग व पाचव्या वेतन आयोगानुसार अनुक्रमे सन-१९७६, १९८६ व १९९६ पासून राज्य

शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेण्या लागू केल्या आहेत. सदर शिफारशींवर आता विचार करणे सयुक्तिक ठरणार नाही असे समितीचे मत आहे.

मंत्रीमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजीच्या निर्णयान्वये कृषि विभागातील संवर्गांना आणि इतर विभागांमधील काही संवर्गांना उच्च वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. मात्र त्याबाबत मंत्रीमंडळाने फेरविचार केला व त्यासंबंधीचे आदेश रद्द करून, प्रशासकीय विभागांनी वेतन असमानता समितीपुढे प्रस्ताव सादर करावेत असा निर्णय घेतला होता. त्याविषयीचे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपुर १२०४ / प्र.क्र.९ / सेवा-९ दि. ११ ऑगस्ट, २००४ अन्वये निर्गमित केले होते. तथापि, याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवली होती. यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या आदेशांनुसार स्थापन केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीच्या शिफारशींवर निर्णय घेऊन शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपुर १२०७ / प्र.क्र.२२ / सेवा-९ दि. २६ जुलै, २००७ अन्वये या संवर्गांचे श्रेणीवाढ / वेतनश्रेणीवाढीचे प्रस्ताव अंतिमतः अमान्य केले आहेत. त्यामुळे त्या वेतनश्रेणी विचारात घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

वरील विवेचन विचारात घेता प्रस्तुत संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी आढळून येत नाहीत. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये या संवर्गांना मंजूर केली आहे, त्यामध्ये वाढ करणे समर्थनीय वाटत नाही.

९) प्रशासन अधिकारी }
१०) सहाय्यक प्रशासन अधिकारी }
११) अधीक्षक }
१२) सहाय्यक अधीक्षक }
१३) वरिष्ठ लिपिक }
१४) लिपिक }

संघटनेचे अभिप्रायः- निरंक
प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक

<u>समितीची शिफारस</u> :-

वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

तसेच, कृषि संवर्गासोबतच प्रशासन अधिकारी या संवर्गासदेखील मंत्रीमंडळाने दि.१६ जुलै, २००४ रोजीच्या निर्णयान्वये उच्च वेतनश्रेणी मंजूर केली होती. वरील अ.क्र. १ ते ८ (संचालक ते कृषि सहाय्यक) संवर्गासंबंधीच्या शिफारशींमध्ये याबाबत विस्तृत विवेचन केले आहे.

ब) पशुसंवर्धन आयुक्तालय

१) पशुधन विकास अधिकारी

संघटनेचे अभिप्रायः- हा संवर्ग १९८१ साली निर्माण झाल्यानंतर सरळ सेवा भरतीचे व पदोन्नतीचे प्रमाण ८५:१५ असे ठेवण्यात आले. त्या वेळेस मंत्रिमंडळाचा असा निर्णय झाला होता की, ज्यांच्याकडे पदोन्नतीसाठी शासनाने निश्चित केलेली अर्हता नसेल म्हणजे सहाय्यक पशुधन विकास अधिकारी या संवर्गास १०% निवडश्रेणी मंजूर करण्यात आली होती. परंतू आजतागायत मंत्रिमंडळाचा सदर निर्णय अंमलात आलेला नाही. परिणामी अर्हता प्राप्त नसलेला संवर्ग निवडश्रेणीपासून वंचित आहे.

सुकथनकर समितीच्या शिफारशीनुसार पदोन्नत झालेल्या व सरळसेवा भरतीने नियुक्त झालेल्या दोन्हीही पशुधन विकास अधिकारी (गट-ब) यांना एकच रु.६५००-१०५०० वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. तद्नंतर मध्यंतरी शासनाने वेतनत्रुटी समितीच्या मान्यतेशिवाय एकतर्फी सरळ सेवेतून येणाऱ्या पशुधन विकास अधिकारी संवर्गाची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० अशी सुधारित केली. मात्र ही श्रेणी केंद्र शासनातील असिस्टंट व्हेटरनरी सर्जन (गट-अ) या पदाच्या आधारे मंजूर करण्यात

आली. तद्नंतर कालातंराने या सुधारित श्रेणीस गट-अ मध्ये वर्ग करण्यात आले आहे. परंतु आजतागायतदेखील पशुधन विकास अधिकारी गट-अ व गट-ब हे आंतरबदलीने एकमेकांच्या पदावर काम करीत असतात. म्हणजेच समान पद - समान काम - समान वेतन हे सर्वमान्य सूत्र उघडरीत्या डावलून सरळ सेवा व पदोन्नत अधिकाऱ्यांमध्ये पक्षपात करण्यात आला आहे ही अन्यायाची परिसीमा गाठली आहे.

तसेच या पदाच्या सेवा भरती नियमातील पदोन्नतीसाठी सेवांतर्गत पदविकेची अट जी ९ वर्षांपूर्वीच बंद करण्यात आली आहे, परंतु ती अट शिथील न करण्यात आल्याने या संवर्गात पदोन्नतीपासून कर्मचारी वंचित आहे. म्हणजेच १५% अर्हताधारक व १०% अर्हता नसलेल्या कर्मचाऱ्यांसाठी निवडश्रेणी ज्याची अद्याप अंमलबजावणी झाली नाही हे खेदाने नमूद करावेसे वाटते.

केंद्रीय सहाव्या वेतन आयोगाच्या प्रकरण ३.८ परिच्छेद ३.८.२५ व्हेटरनरीयन्स या भागाच्या परिच्छेदात नमूद केलेल्या शिफारशींचा बारकाईने अभ्यास केला असता आमची अशी धारणा झाली आहे की, रु.६५००-१०५०० (पशुधन विकास अधिकारी गट-ब) या संवर्गातील पशुवैद्यकीय संवर्गाच्या वेतनश्रेणीची दर्जा वाढ करुन या संवर्गास वेतनबँड पीबी :२ मध्ये रु.४६०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. त्याच धर्तीवर पाचव्या वेतन आयोगात शिफारस केलेल्या व संघटनेने मागणी केलेल्या पशुधन विकास अधिकारी गट-ब यांना रु.४६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- मान्य करण्यास हरकत नसावी.

समितीची शिफारस :-

राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ ने पशुवैद्यकीय पदवी ही किमान सेवाप्रवेश अर्हता अत्यावश्यक असलेल्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी पाचव्या वेतन आयोगात रू.८०००-१३००० या वेतनश्रेणीची शिफारस (अहवाल भाग-२, परिच्छेद-४.१५) केली होती. त्यानुसार पशुवैद्यकीय पदवीधारकांना रू.६५००-१०५०० ऐवजी रू.८०००-१३००० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे, तर पशुवैद्यकीय पदवीधारकांव्यतिरिक्त इतरांना रू.६५००-१०५०० वेतनश्रेणी मंजूर केली आहे. या वेतनश्रेण्यांना सहाव्या वेतन आयोगात अनुक्रमे वेतनबँड पीबी-३:रू.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन आणि वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

केंद्रीय सहाव्या वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद ३.८.२५ मधील शिफारशीनुसार केंद्र शासनाने रू.६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील निम-पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांना (Para-Veterinary Staff) वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. विचाराधीन पशुवैद्यकीय अधिकारी हा संवर्ग निम-पशुवैद्यकीय संवर्ग नाही. त्यामुळे रु.४६०० ग्रेड वेतनाची मागणी समर्थनीय नाही. तसेच केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे उचित होणार नाही असे समितीचे मत आहे. यासंबंधी या अहवालातील प्रकरण-२ परिच्छेद २.३ मध्ये विस्तृत विवेचन केले आहे.

उपरोक्त संवर्गास रू.६५००-१०५०० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे, त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

२) सहाय्यक पशुधन विकास अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- पशुधन पर्यवेक्षक पदावर २० ते २५ वर्षे सेवा झाल्यानंतर पदोन्नती मिळते. राज्यातील एकूण पदांपैकी ७०% पदे ही फक्त विदर्भात असल्याने लांबवरच्या पल्ल्याच्या बदलीमुळे मोठ्या प्रमाणात पदोन्नती नाकारल्यामुळे कर्मचाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. ही पदे तालुकास्तरावरील व जिल्हा व विभागीय स्तरावरील संस्था व कार्यालयांमध्ये आहेत. तसेच पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ संस्थाप्रमुख म्हणून कामकाज पाहतात. या पदाचे कामकाज पशुधन पर्यवेक्षकापेक्षा वरिष्ठ दर्जाचे आहे, त्यामुळे वेतनबॅण्ड पीबी:२ मधील रु.४३०० ग्रेड वेतन मंजूर व्हावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- मान्य करण्यास हरकत नसावी.

३) पशुधन पर्यवेक्षक

संघटनेचे अभिप्राय:- या पदासाठी B.V.Sc. & A.H. या पदवीधरांना प्रथम पसंती, दुग्ध व्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम (१० + २ ) व पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण ही शैक्षणिक अर्हता आहे. पशुधन पर्यवेक्षक हे राज्यातील ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ च्या ३२३८ संस्थांचे संस्थाप्रमुख म्हणून काम करत आहेत. या कामात कृत्रिम रेतन, गर्भधारणा तपासणी, वंध्यत्व तपासणी, खच्चीकरण, लसीकरण, अंतर्गत अवयव वगळता शस्त्रक्रिया, पशुवैद्यकीय सेवा उपचार तसेच वैरण विकास, विस्तार कार्य, कार्य मोहिमा, शेतकरी मेळावे, शेतकरी प्रशिक्षण शिबीरे आयोजित करणे तसेच ग्रामसभा, ग्रामस्थ दिन व पशुसुधार समितींना उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, शासनाच्या विविध योजना राबविणे व त्यांचा पाठपुरावा करणे या कार्याचाही सहभाग आहे. या शिवाय संस्था प्रमुख म्हणून ४७ नोंदवह्या व ५९ नस्त्या व विविध अहवाल हाताळावे लागतात. हे सर्व दैनंदिन कामकाज करताना सरकारी कामकाजाच्या वेळेपेक्षा चार ते पाच तास जास्त वेळ क्षेत्रिय कामासाठी द्यावे लागतात. पशुरुग्ण हाताळताना शेण, मलमूत्र, रक्त व खराब जखमा, कष्ट प्रसवन, वार काढणे व मायांग बसविणे ही कामे करताना मोठे शारीरिक कष्ट घ्यावे लागतात व अशा घाणीतून काम करावे लागते. तसेच जनावरे हाताळताना जनावरांच्या लाथा व शिंग मारणे इ. मुळे होणाऱ्या इजांना सामोरे जावे लागते. त्याशिवाय पशुपासून माणसांना होणारे विविध आजार (उदा.ब्रुसोलिसीस, रेबीज, ॲंथ्रक्स इ.) पशुवैद्यकांना होतात.

केंद्रीय सहाव्या वेतन आयोगाच्या प्रकरण ३.८ परिच्छेद ३.८.२५ व्हेटरनरीयन्स या भागाच्या परिच्छेदात नमुद कलेल्या शिफारशींचा बारकाईने अभ्यास केला असता आमची अशी धारणा झाली आहे की, रु.५०००-८००० (पशुधन पर्यवेक्षक) व रु.५५००-९००० (सहाय्यक पशुधन विकास अधिकारी) या दोन श्रेण्यांचे एकत्रीकरण केले असून त्यांना ग्रेड पे रु.४२०० देण्यात आला आहे. त्याच धर्तीवर पाचव्या वेतन आयोगात शिफारस केलेल्या व संघटनेने मागणी केलेल्या पशुधन पर्यवेक्षक यांना रु.४२०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

यासंदर्भात सहाव्या वेतन आयोगाच्या परिच्छेद क्र.३.८.२५ मधील शिफारशींकडे आम्ही आपले लक्ष गांभीर्याने वेधीत आहोत. सदर परिच्छेदात या क्षेत्रातील वास्तवता नजरेआड करुन पशुवैद्यकीय पदवीधर वगळता सर्वच संवर्गांना पॅराव्हेटरनरी संबोधिले आहे. पण प्रत्यक्षात बिगर पदवीधर पशुवैद्यकीय व्यावसायिक संवर्ग हा Basic Veterinary Practitioner असून पदवीधर व त्यावरील दर्जाचे व्यावसायिक हे व्हेटरनरी प्रॅक्टीशनर्स आणि स्पेशालिस्ट व्हेटरनरी प्रॅक्टीशनर्स आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून परिच्छेद क्र.३.८.२५ च्या संदर्भात आम्ही खालील वेतनश्रेण्यांची मागणी करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| पशुधन पर्यवेक्षक | वेतनबॅण्ड पीबी-१:<br>रु.५२००-२०२००<br>+ रु २४०० ग्रेड वेतन | वेतनबॅण्ड पीबी-२:<br>रु.९३०० ते ३४८००<br>+ ४२०० ग्रेड वेतन |
| पहिली पदोन्नती<br>सहाय्यक पशुधन विकास अधिकारी | वेतनबॅण्ड पीबी-१:<br>रु.५२००-२०२००<br>+ रु.२८०० ग्रेड वेतन | वेतनबॅण्ड पीबी-२:<br>रु.९३०० ते ३४८००<br>+ ४३०० ग्रेड वेतन |
| दुसरी पदोन्नती<br>पशुधन विकास अधिकारी | वेतनबॅण्ड पीबी-१:<br>रु.९३००-३४८००<br>+ रु.४४०० ग्रेड वेतन | पदोन्नती<br>वेतनबॅण्ड पीबी-२:<br>रु.९३०० ते ३४८००<br>+ ५४०० ग्रेड वेतन |

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- मान्य करण्यास हरकत नसावी.

समितीची शिफारस :-

२) सहाय्यक पशुधन विकास अधिकारी

३) पशुधन पर्यवेक्षक

चौथ्या वेतन आयोगामध्ये पशुधन पर्यवेक्षक या संवर्गास शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊन वेतन समानीकरण समितीने शिफारस केलेली समकक्षतेपेक्षा (रू.९७५-१६६०) उच्च वेतनश्रेणी (रू.१२००-१८००) मंजूर केली होती. परिणामी सहाय्यक पशुधन विकास अधिकारी संवर्गासदेखील समकक्षतेपेक्षा (रू.१२००-२०४०) उच्च वेतनश्रेणी (रू.१४००-२३००) देण्याची शिफारस समितीला करावी लागली होती. त्यानुसार या संवर्गास रू.१४००-२३०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. या वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतनश्रेण्या पाचव्या वेतन आयोगात मंजूर करण्यात आल्या होत्या. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन या संवर्गांना सहाव्या वेतन आयोगात योग्य सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. तसेच या संवर्गांना केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविण्यात आलेले नाही.

या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये कोणतीही त्रुटी असल्याचे आढळून येत नाही.

## ३.१ (ब) - कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
## (कृषि विद्यापीठे)

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| | अ) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | | | | | |
| १ | वैद्यकीय अधिकारी | १)८०००-१३५०० (एमबीबीएस)<br>२)६५००-१०५०० (इतरांसाठी) | १)९३००-३४८०० (एमबीबीएस)<br>२)९३००-३४८०० (इतरांसाठी) | ५,४००<br>४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | सहाय्यक अभियंता | ८०००-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ३ | शाखा अभियंता / विभागीय अभियंता | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| ४ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, विद्युत, यांत्रिकी) | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ५ | प्राचार्य (अधीक्षक) कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५८०० |
| | च) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली | | | | | |
| १ | सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | ९३००-३४८०० | ५,४०० |
| २ | अधीक्षक, कृषि तंत्र विद्यालय, कोसबाड हिल, ठाणे | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतनसंरचना | |
| ३ | वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (मत्स्य / वनशास्त्र) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| ४ | जीवशास्त्रज्ञ | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| ५ | जीवरसायनशास्त्रज्ञ | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| ६ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक (मत्स्य) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| ७ | तांत्रिक सहाय्यक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ८ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | कार्यदेशक पर्यवेक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| १० | नौका तंत्रज्ञ (गिअर टेक्निशियन) | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| ११ | वरिष्ठ यांत्रिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| १२ | प्रयोगशाळा सहाय्यक (मत्स्य) | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २००० | ५२००-२०२०० | २४०० |
| १३ | इंजिन चालक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | १)५२००-२०२००<br>(आय.टी.आय. प्रमाणपत्रधारकांसाठी)<br>२)५२००-२०२००<br>(इतरांकरीता) | २,४००<br><br>१९०० |
| १४ | मिस्त्री | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | १)५२००-२०२००<br>(आय.टी.आय. प्रमाणपत्रधारकांसाठी)<br>२)५२००-२०२००<br>(इतरांकरीता) | २,४००<br><br>१९०० |
| १५ | कनिष्ठ यांत्रिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |
| १६ | प्रक्षेत्र सहाय्यक, महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालय, कोसबाड हिल. | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | १)५२००-२०२००<br>२)५२००-२०२००<br>( सात वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर ) | २४००<br>२८०० |
| १७ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| १८ | लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |
| | क) मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी | | | | | |
| १ | वैद्यकीय अधिकारी | १)८०००-१३५००<br>(एमबीबीएस)<br>२)६५००-१०५००<br>(इतरांसाठी) | १)९३००-३४८००<br>(एमबीबीएस)<br>२)९३००-३४८००<br>(इतरांसाठी) | ५,४००<br><br>४४०० | १५६००-३९१०० | ५,४०० |
| २ | सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ३ | सहाय्यक लेखाधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| | ड) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला | | | | | |
| १ | प्राचार्य, जनता कृषि तंत्र विद्यालय, अमरावती | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतनसंरचना | |
| २ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| ३ | शाखा सहाय्यक - नि - टंकलेखक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |

अ) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

१) वैद्यकीय अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शासन निर्णयातील सुधारित मंजूरी योग्य असल्याने केलेले समर्थन योग्य नाही.

<u>समितीची शिफारस</u> :-

अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.२.८ मधील विवेचन विचारात घेता रु.८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीसाठी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच रु.६५००-१०५०० या असुधारित वेतनश्रेणीसाठी मंजूर करण्यात आलेल्या वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना योग्य आहे त्यामध्ये कोणतीही त्रुटी नाही.

२) सहाय्यक अभियंता / ३) शाखा अभियंता / विभागीय अभियंता / ४) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, विद्युत, यांत्रिकी)

संघटनेचे अभिप्राय:- महाराष्ट्र राज्य कृषि विद्यापीठांतर्गत अभियंत्यांना नवीन वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी लागू करताना सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व जिल्हा परिषदांमधील अभियंत्यांप्रमाणे तंतोतंत वेतननिश्चिती केली जात नाही. त्यामध्ये त्रुटी राहून जातात. वास्तविक पाहता शासनाकडील व विद्यापीठांतर्गत अभियंत्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. त्यामुळे वेतनामध्येसुद्धा समानता असणे आवश्यक आहे. तरी, कृषि विद्यापीठांतील अभियंत्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती करताना महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा महासंघ यांनी शासनाकडे मागणी केल्यानुसार सुधारित वेतनसंरचना लागू करण्याची विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- इतर विभागातील पदांशी समतुल्य पदे असल्याने समर्थन योग्य आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

२) सहाय्यक अभियंता

या संवर्गाची असुधारित वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० ही होती. अहवालाच्या प्रकरण -२ मधील परिच्छेद २.२.८ मधील विवेचन विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३) शाखा अभियंता / विभागीय अभियंता

राज्य शासनाकडे जलसंपदा विभाग / सार्वजनिक बांधकाम विभागातदेखील शाखा अभियंता हा संवर्ग आहे. त्या संवर्गांना अनुक्रमे रु.४६०० व रु.४८०० ग्रेड वेतन मंजूर करण्याचे प्रस्ताव त्या विभागांनी समितीच्या विचारार्थ सादर केले होते. तथापि, समिती सदर मागणीशी सहमत नसल्यामुळे समितीने त्या संवर्गांच्या ग्रेड वेतनात कोणतीही सुधारणा करण्याची शिफारस केलेली नाही. म्हणजेच राज्य शासनाकडील उपरोक्त संवर्गास वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना आहे. प्रस्तुत संवर्गासदेखील हीच वेतनसंरचना मंजूर केली आहे. राज्य शासनाकडील संवर्गापेक्षा उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही.

४) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, विद्युत, यांत्रिकी)

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग पत्र क्र. सवेआ-११०९/ प्र.क्र.४५०/६-अे, दि.३ मे, २०१० अन्वये प्राप्त माहितीनुसार या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी संबंधित क्षेत्रातील पदवी किंवा पदविका अशी शैक्षणिक अर्हता आहे.

नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विज्ञान शाखेची पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान अर्हता अत्यावश्यक असलेल्या तंत्रज्ञ अथवा अभियांत्रिकी संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांमध्ये वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. सदर वस्तुस्थिती आणि या संवर्गाची शैक्षणिक अर्हता विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५) प्राचार्य (अधीक्षक), कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव

संघटनेचे अभिप्राय:- कृषि विद्यापीठांच्या नियंत्रणाखालील (शासकीय) कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्य पदाची शैक्षणिक पात्रता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि संलग्न कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्य पदाची शैक्षणिक पात्रता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचे स्वरूप एकसमान असतानाही वेतनश्रेणीत मात्र फार मोठी तफावत आहे.

संलग्न कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्य पदास सहाय्यक प्राध्यापक पदाची सुधारित वेतनश्रेणी दि.१.१.१९८६ पासून लागू करुन कालबद्ध पदोन्नती (तीन स्तरीय वेतनश्रेणी ) तसेच सहाव्या वेतन आयोगाचा लाभ मिळावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- कृषि विद्यापीठातील प्राध्यापकांना सुधारित वेतनसंरचना लागू केल्याप्रमाणे.

<u>समितीची शिफारस</u> :-

कृषि विद्यापीठे / महाविद्यालयांमधील शिक्षकीय संवर्गांना भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या (ICAR) शिफारशींनुसार वेतनश्रेणी / वेतनसंरचना विहित करण्यात येते. त्यानुसार या शिक्षकीय संवर्गांना वेळोवेळी त्रिस्तरीय वेतनश्रेण्या / वेतनसंरचना मंजूर केली आहे. कृषि विद्यापीठांच्या नियंत्रणाखालील कृषि विद्यालयांमध्ये शिक्षकीय संवर्गातून नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे या पदावर नियुक्त होणाऱ्या शिक्षकीय संवर्गातील अधिकाऱ्यांना त्यांच्या शिक्षकीय संवर्गातील वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते.

प्रस्तुत अधीक्षक संवर्गास वर नमूद कृषि विद्यापीठे / महाविद्यालयांमधील शिक्षकीय संवर्गाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणी / वेतनसंरचना अनुज्ञेय ठरविलेली नसल्याने हे पद शिक्षकीय संवर्गाशी समकक्ष समजता येणार नाही. त्यामुळे या संवर्गाची मागणी समर्थनीय ठरत नाही. तथापि, या संवर्गात नियुक्तीसाठी विहित केलेली पदव्युत्तर पदवी (कृषि) (M.Sc. Agri.) ही अर्हता आणि या संवर्गाशी निगडीत शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या विचारात घेता वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

ब) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

१) सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- मूळ शासन निर्णयानुसार दिलेली वेचनसंरचना योग्य आहे, त्यामुळे समर्थन योग्य वाटत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :-

अकृषि विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांची संख्या विचारात घेता त्यांच्याकडील संवर्गांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची व्याप्ती निश्चितच अधिक आहे. त्यामुळे या संवर्गांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अकृषि विद्यापीठांतील संवर्गांशी तुलनीय आहेत असे म्हणता येणार नाही. या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

२) अधीक्षक, कृषि तंत्र विद्यालय, कोसबाड हिल, ठाणे

संघटनेचे अभिप्राय:- कृषि विद्यापीठांच्या नियंत्रणाखालील (शासकीय) कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्य पदाची शैक्षणिक पात्रता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि संलग्न कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्य पदाची शैक्षणिक पात्रता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचे स्वरुप एकसमान असतानाही वेतनश्रेणीत मात्र फार मोठी तफावत आहे.

संलग्न कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्य पदास सहाय्यक प्राध्यापक पदाची सुधारित वेतनश्रेणी दि.१.१.१९८६ पासून लागू करून कालबद्ध पदोन्नती (तीन स्तरीय वेतनश्रेणी ) तसेच सहाव्या वेतन आयोगाचा लाभ मिळावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- निरंक

<u>समितीची शिफारस</u> :-

कृषि विद्यापीठे / महाविद्यालयांमधील शिक्षकीय संवर्गांना भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या (ICAR) शिफारशींनुसार वेतनश्रेणी / वेतनसंरचना विहित करण्यात येते. त्यानुसार या शिक्षकीय संवर्गांना वेळोवेळी त्रिस्तरीय वेतनश्रेण्या / वेतनसंरचना मंजूर केली आहे. कृषि विद्यापीठांच्या नियंत्रणाखालील कृषि विद्यालयांमध्ये शिक्षकीय संवर्गातून नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे या पदावर नियुक्त होणाऱ्या शिक्षकीय संवर्गातील अधिकाऱ्यांना त्यांच्या शिक्षकीय संवर्गातील वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते.

प्रस्तुत अधीक्षक संवर्गास वर नमूद कृषि विद्यापीठे / महाविद्यालयांमधील शिक्षकीय संवर्गाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणी / वेतनसंरचना अनुज्ञेय ठरविलेली नसल्याने हे पद शिक्षकीय संवर्गाशी समकक्ष समजता येणार नाही. त्यामुळे या संवर्गाची मागणी समर्थनीय ठरत नाही. तथापि, या संवर्गात नियुक्तीसाठी विहित केलेली पदव्युत्तर पदवी (कृषि) (M.Sc. Agri.) ही अर्हता आणि या संवर्गाशी निगडीत शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या विचारात घेता वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३) वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (मत्स्य / वनशास्त्र) / ४) जीवशास्त्रज्ञ / ५) जीवरसायनशास्त्रज्ञ / ६) वरिष्ठ संशोधन सहाय्यक (मत्स्य) / ७) तांत्रिक सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शासन निर्णयामध्ये नमूद केलेली सुधारित वेतनसंरचना योग्य असल्याने समर्थन योग्य वाटत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :-

३) वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक (मत्स्य / वनशास्त्र)

४) जीवशास्त्रज्ञ

५) जीवरसायनशास्त्रज्ञ

६) वरिष्ठ संशोधन सहाय्यक (मत्स्य)

७) तांत्रिक सहाय्यक

या संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

८) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- इतर विभागातील कनिष्ठ अभियंता हे पद समतुल्य असल्याने सुचविलेली वेतनसंरचना लागू करण्यास हरकत नाही.

समितीची शिफारस :-

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग पत्र क्र. सवेआ-११०९/ प्र.क्र.४५०/६-ओ, दि.३ मे, २०१० अन्वये प्राप्त माहितीनुसार या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी संबंधित विषयातील पदवी किंवा पदविका अशी शैक्षणिक अर्हता आहे.

नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विज्ञान शाखेची पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान अर्हता अत्यावश्यक असलेल्या तंत्रज्ञ अथवा अभियांत्रिकी संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांमध्ये वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. सदर वस्तुस्थिती आणि या संवर्गाची शैक्षणिक अर्हता विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

९) कार्यदेशक पर्यवेक्षक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- कृषि विभागातील कार्यनिदेशक पर्यवेक्षक हे पद समतुल्य असल्याने सुचविलेली वेतनसंरचना लागू करण्यास हरकत नाही.

समितीची शिफारस :-

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग पत्र क्र. सवेआ-११०९/ प्र.क्र.४५०/६-ओ, दि.३ मे, २०१० अन्वये प्राप्त माहितीनुसार या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी कृषि अभियांत्रिकी पदवी किंवा अभियांत्रिकी (यांत्रिक / विद्युत) पदविका अशी शैक्षणिक अर्हता आहे.

नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विज्ञान शाखेची पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान अर्हता अत्यावश्यक असलेल्या तंत्रज्ञ अथवा अभियांत्रिकी संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांमध्ये वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. सदर वस्तुस्थिती आणि वर नमूद केलेली शैक्षणिक अर्हता विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१०) नौका तंत्रज्ञ (गिअर टेक्निशीयन)

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- निरंक

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) कामाचे तांत्रिक स्वरूप विचारात घेऊन या संवर्गास रु.१४००-२३०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रु. १४००-२३०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. तदूनंतर या संवर्गास पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

११) वरिष्ठ यांत्रिक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- कामाचे स्वरूप वेगळे असल्यामुळे समर्थन योग्य वाटत नाही.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने कामाचे तांत्रिक स्वरूप विचारात घेऊन या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष रु.९७५-१६६० या वेतनश्रेणीपेक्षा तुलनेने उच्च रु.१२००-१८०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रु.१२००-१८००

ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. तद्नंतर या संवर्गास पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१२) प्रयोगशाळा सहाय्यक (मत्स्य)

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- इतर कृषि विद्यापीठांतील प्रयोगशाळा सहाय्यक या पदाशी तुलना करता सदर पदास सुचविलेली वेतनसंरचना लागू करण्यास हरकत नाही.

समितीची शिफारस :-

या संवर्गाची किमान शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण ही आहे. तर इतर कृषि विद्यापीठांमधील प्रयोगशाळा सहाय्यक संवर्गाची शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अधिक पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण अशी तुलनेने उच्च आहे. त्यामुळे हा संवर्ग इतर विद्यापीठांतील प्रयोगशाळा सहाय्यक संवर्गाशी तुलनीय नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१३) इंजिन चालक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- मागणी केल्याप्रमाणे शिफारस करता येणार नाही.

समितीची शिफारस :-

या संवर्गातील आय.टी.आय. प्रमाणपत्र धारकांसाठी रू.२४०० ग्रेड वेतनाची मागणी आहे. इतर कृषि विद्यापीठांमध्ये काही संवर्गातील आय.टी.आय. प्रमाणपत्र धारकांसाठी तुलनेने उच्च ग्रेड वेतन (रू.२४०० ग्रेड वेतन) मंजूर केले आहे. त्याच धर्तीवर या संवर्गातील आय.टी.आय. प्रमाणपत्र धारकांसाठी रू.२४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१४) मिस्त्री

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पदावरील आय.टी.आय. प्रमाणपत्रधारक आणि प्रमाणपत्र नसलेले यांच्या कामाचे स्वरूप सारखेच असल्याने मागणी केल्याप्रमाणे शिफारस करता येणार नाही.

समितीची शिफारस :-

या संवर्गातील आय.टी.आय. प्रमाणपत्र धारकांसाठी रू.२४०० ग्रेड वेतनाची मागणी आहे. इतर कृषि विद्यापीठांमध्ये काही संवर्गातील आय.टी.आय. प्रमाणपत्र धारकांसाठी तुलनेने उच्च ग्रेड वेतन (रू.२४०० ग्रेड वेतन) मंजूर केले आहे. त्याच धर्तीवर या संवर्गातील आय.टी.आय. प्रमाणपत्र धारकांसाठी रू.२४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१५) कनिष्ठ यांत्रिक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- कामाचे स्वरूप वेगळे असल्यामुळे समर्थन योग्य वाटत नाही.

समितीची शिफारस :-

या संवर्गाला असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१६) प्रक्षेत्र सहाय्यक, महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालय, कोसबाड हिल, ठाणे

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पद कृषि विद्यापीठातील कृषि सहाय्यक पदाशी समकक्ष असल्याने समर्थन योग्य आहे.

समितीची शिफारस :-

सदर संवर्ग कृषि विद्यापीठातील कृषि सहाय्यक संवर्गाशी समकक्ष असल्याचे विभागाने नमूद केले आहे. या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी कृषि / उद्यान विद्या / वनशास्त्र मधील पदवी किंवा कृषि विद्यापीठ मान्यताप्राप्त २ वर्षांचा कृषि पदविका अभ्याक्रम उत्तीर्ण ही कृषि सहाय्यक संवर्गाप्रमाणे शैक्षणिक अर्हता विहित केली आहे. या संवर्गास कृषि विद्यापीठातील कृषि सहाय्यक संवर्गाप्रमाणे १) वेतनबँड पीबी-१: रु. ५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन, २) वेतनबँड पीबी-१: रु. ५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन ( सात वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर ) ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१७) वरिष्ठ लिपिक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- वरिष्ठ लिपिक हे पद सर्वसमावेशक असल्याने विद्यापीठातील त्या पदास वेगळी वेतनश्रेणी लागू करणे योग्य होणार नाही.

१८) लिपिक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- कनिष्ठ लिपिक हे पद सर्वसमावेशक असल्याने विद्यापीठातील त्या पदास वेगळी वेतनश्रेणी लागू करणे योग्य होणार नाही.

समितीची शिफारस :-

१७) वरिष्ठ लिपिक

१८) लिपिक

वर नमूद संवर्ग सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर विभागांतील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

क) मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

१) वैद्यकीय अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शासन निर्णयातील सुधारित मंजूरी योग्य असल्याने केलेले समर्थन योग्य नाही.

समितीची शिफारस :- .

अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.२.८ मधील विवेचन विचारात घेता रु.८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीसाठी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच रू.६५००-१०५०० या असुधारित वेतनश्रेणीसाठी मंजूर करण्यात आलेल्या वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना योग्य आहे त्यामध्ये कोणतीही त्रुटी नाही.

२) सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक

३) सहाय्यक लेखाधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- मराठवाडा कृषि विद्यापीठामध्ये सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक या संवर्गात एकूण १६ पदे मंजूर आहेत. सदर पदांना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. तथापि, पारंपारिक विद्यापीठांमध्ये तसेच मुक्त विद्यापीठामध्ये

सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक या पदावर पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

कृषि विद्यापीठे आणि पारंपारिक विद्यापीठे तसेच मुक्त विद्यापीठातील प्रशासकीय पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच असून कृषि विद्यापीठात सदर पदास प्रशासकीय व लेखा ही दोन्ही कर्तव्ये महाविद्यालयीन स्तरावर करावी लागतात. त्यामुळे कृषि विद्यापीठातील सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक या पदांना रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर होऊन त्यानुसार सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये सुधारित वेतन मंजूर होणे आवश्यक आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठामध्ये प्रशासकीय व आर्थिक बाबींचे काम मोठ्या प्रमाणावर आहे. या विद्यापीठांतर्गत ५३ मान्यताप्राप्त खाजगी व ८ घटक अशी एकूण ६१ कृषि तंत्र विद्यालये आहेत. विद्यापीठांतर्गत २४ खाजगी व १० घटक महाविद्यालये आणि २ कृषि विज्ञान केंद्रे तसेच ३७ मुख्य संशोधन केंद्रे / योजना कार्यरत आहेत. या सर्व संस्थांच्या प्रशासकीय लेखा विषयक बाबी पहाण्यासाठी सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक यांच्यावर कामाचा भार वाजवीपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम, १९९० च्या परिनियम ६० नुसार सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक ही पदे इतर अधिकारी संवर्गातील जबाबदारीची पदे आहेत. त्यामुळे त्या पदांना पारंपारिक विद्यापीठे आणि मुक्त विद्यापीठाप्रमाणेच रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर होणे गरजेचे आहे. सध्या विद्यापीठामध्ये भारतीय कृषि अनुसंधान परिषद पुरस्कृत छोट्या व मध्यम कालावधीसाठी अनेक तदर्थ योजना कार्यरत आहेत. सदर योजनांची लेखाविषयक व प्रशासकीय कामेही सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक यांना नियमित कामे सांभाळून पार पाडावी लागतात. पारंपारिक विद्यापीठे, मुक्त विद्यापीठे आणि कृषि विद्यापीठांमधील लेखा विषयक व प्रशासकीय कामे ही महाराष्ट्र नागरी सेवा नियमांन्वये पार पाडली जातात. त्यामुळे कामाचे स्वरुप सर्व विद्यापीठात सारखेच आहे. त्यामुळे या विद्यापीठांच्या प्रशासकीय / लेखा अधिकाऱ्यांच्या वेतनात तफावत असू नये अशी आग्रही मागणी आहे.

कक्ष अधिकारी या पदास पाचव्या वेतन आयोगात रु.६५००-१०५०० अशी वेतनश्रेणी आहे. सदर पदानंतर सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक ही पदोन्नतीची पदे आहेत. त्या पदांना रु.७४५०-११५०० ऐवजी रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देणे न्याय्य आहे. सहाव्या वेतन आयोगात दोन्ही पदांचा वेतनबँड एकच असून फक्त ग्रेड वेतनात फरक आहे.

शासनाने रु.७४५०-११५०० या वेतनश्रेणीतील इतर विभागातील अधिकारी संवर्गाचा अन्याय सहाव्या वेतन आयोगात दूर केला आहे. उदा. तहसिलदार या पदास रु.९३००-३४८०० ऐवजी रु.१५६००-३९१०० हा वेतनबँड मंजूर केला आहे. कृषि विद्यापीठातील सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक या पदांना रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करुन त्या आधारे सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- मागणी केल्याप्रमाणे शिफारस करता येणार नाही.

<u>समितीची शिफारस</u> :-

२) सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक नियंत्रक

३) सहाय्यक लेखाधिकारी

अकृषि विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांची संख्या विचारात घेता त्यांच्याकडील संवर्गांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची व्याप्ती निश्चितच अधिक आहे. त्यामुळे या संवर्गांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अकृषि विद्यापीठांतील संवर्गांशी तुलनीय आहेत असे म्हणता येणार नाही. या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

ड) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

१) प्राचार्य, जनता कृषि तंत्र विद्यालय, अमरावती

संघटनेचे अभिप्राय:- कृषि विद्यापीठांच्या नियंत्रणाखालील (शासकीय) कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्य पदाची शैक्षणिक पात्रता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि संलग्न कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्य पदाची शैक्षणिक पात्रता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचे स्वरुप एकसमान असतानाही वेतनश्रेणीत मात्र फार मोठी तफावत आहे.

संलग्न कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्य पदास सहाय्यक प्राध्यापक पदाची सुधारित वेतनश्रेणी दि.१.१.१९८६ पासून लागू करुन कालबद्ध पदोन्नती (तीन स्तरीय वेतनश्रेणी ) तसेच सहाव्या वेतन आयोगाचा लाभ मिळावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदरचे पद प्रशासकीय असल्यामुळे प्राध्यापकासाठी मंजूर केलेली वेतनश्रेणी लागू करता येणार नाही.

<u>समितीची शिफारस</u> :-

कृषि विद्यापीठे / महाविद्यालयांमधील शिक्षकीय संवर्गांना भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या (ICAR) शिफारशींनुसार वेतनश्रेणी / वेतनसंरचना विहित करण्यात येते. त्यानुसार या शिक्षकीय संवर्गांना वेळोवेळी त्रिस्तरीय वेतनश्रेण्या / वेतनसंरचना मंजूर केली आहे. कृषि विद्यापीठांच्या नियंत्रणाखालील कृषि विद्यालयांमध्ये शिक्षकीय संवर्गातून नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे या पदावर नियुक्त होणाऱ्या शिक्षकीय संवर्गातील अधिकाऱ्यांना त्यांच्या शिक्षकीय संवर्गातील वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते.

प्रस्तुत अधीक्षक संवर्गास वर नमूद कृषि विद्यापीठे / महाविद्यालयांमधील शिक्षकीय संवर्गाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणी / वेतनसंरचना अनुज्ञेय ठरविलेली नसल्याने हे पद शिक्षकीय संवर्गाशी समकक्ष समजता येणार नाही. त्यामुळे या संवर्गाची मागणी समर्थनीय ठरत नाही. तथापि, या संवर्गात नियुक्तीसाठी विहित केलेली पदव्युत्तर पदवी (कृषि) (M.Sc. Agri.) ही अर्हता आणि या संवर्गाशी निगडीत शैक्षणिक व प्रशासकीय जबाबदाऱ्या विचारात घेता वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२) वरिष्ठ लिपिक / ३) शाखा सहाय्यक - नि - टंकलेखक

संघटनेचे अभिप्राय:- बिगर कृषि विद्यापीठातील लिपिक ( शाखा सहाय्यक) व वरिष्ठ लिपिक या पदांसाठी सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या ह्या समान आहेत. तसेच दोन्ही ठिकाणच्या पदांची शैक्षणिक अर्हतादेखील समान आहे. त्यामुळे कृषि विद्यापीठातील या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर वेतनसंरचनेतील तफावतीमुळे अन्याय झाला आहे. बिगर कृषि विद्यापीठांतील लिपिकांपेक्षा कृषि विद्यापीठांतील शाखा सहाय्यक व वरिष्ठ लिपिकांना शैक्षणिक कामाव्यतिरिक्त संशोधन व विस्तार शिक्षण या कामाची जबाबदारीदेखील पार पाडावी लागत आहे.

लिपिकांच्या (शाखा सहाय्यक) कामाच्या जबाबदाऱ्या व शैक्षणिक पात्रता ह्या प्रयोगशाळा परिचर व वाहनचालक पदांपेक्षा उच्च दर्जाच्या आहेत. प्रयोगशाळा परिचर व वाहनचालक यांना सुधारित वेतनश्रेणी देऊन लिपिक वेतनश्रेणीत आणले आहे. परंतु लिपिकांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार व कामाच्या महत्वाच्या जबाबदाऱ्यांनुसार वेतनश्रेणीत झालेला अन्याय मात्र दूर झालेला नाही.

पारंपारिक बिगर कृषि विद्यापीठातील लिपिक व वरिष्ठ लिपिक या पदांना जी वेतनश्रेणी दिली त्याप्रमाणे कृषि विद्यापीठातील लिपिक ( शाखा सहाय्यक) व वरिष्ठ लिपिक या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि उच्च शैक्षणिक पात्रतेचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य स्तरावर समान पदास समान वेतन या न्याय्य तत्त्व प्रणालीप्रमाणे या पदांना अनुक्रमे रु.१२००-२०४० व रु.१४००-२३०० ही सुधारित वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- ही पदे सर्वसमावेशक असल्याने विद्यापीठातील त्या पदास वेगळी वेतनश्रेणी लागू करणे योग्य होणार नाही.

समितीची शिफारस :-

२) वरिष्ठ लिपिक

३) शाखा सहाय्यक - नि - टंकलेखक

वर नमूद संवर्ग सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर विभागांतील लिपिकवर्गीय संवर्गांप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

# ३.२ - सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रूपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रूपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था | | | | | |
| १ | अपर आयुक्त व विशेष निबंधक (वित्त) / पणन संचालक | १४३००-१८३०० (अधिक विशेष वेतन रु.८००) | ३७४००-६७००० | ८८०० | ३७४००-६७००० | ९१०० |
| २ | सह निबंधक, सहकारी संस्था | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ३ | जिल्हा उप निबंधक / उप निबंधक | ८०००-१३५०० (अधिक विशेष वेतन रु. ४००) /८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ४ | विशेष लेखा परीक्षक, गट-अ | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ५ | सहाय्यक निबंधक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५००० |
| ६ | विशेष लेखा परीक्षक, गट ब | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५००० |

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था

१) अपर आयुक्त व विशेष निबंधक (वित्त) / पणन संचालक

२) सह निबंधक, सहकारी संस्था

३) जिल्हा उप निबंधक / उप निबंधक

४) विशेष लेखा परीक्षक, गट-अ

५) सहाय्यक निबंधक

६) विशेष लेखा परीक्षक, गट-ब

संघटनेचे अभिप्राय :-

सहकारी संस्थांची वाढलेली संख्या व त्या अनुषंगाने वाढलेले कामकाजाचे स्वरुप तसेच या संस्थांच्या निवडणूका पार पाडणे इ. बाबी लक्षात घेता इतर विभागांतील अधिकाऱ्यांपेक्षा कामाचा ताण जास्त असूनही वेतनश्रेणी बाबत अन्याय झाला आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

१) अपर आयुक्त व विशेष निबंधक (वित्त) / पणन संचालक

अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था / पणन संचालक ही पदे अपर निबंधक, सहकारी संस्था या संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात येतात. पाचव्या वेतन आयोगामध्ये या दोन्ही पदांना

एकच वेतनश्रेणी (रु.१४३००-१८३००) होती. परंतु अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था / पणन संचालक या पदांना रु.८००/- दरमहा विशेष वेतन होते. सहाव्या वेतन आयोगात या दोन्ही पदांना रु.३७४००-६७००० ही वेतनश्रेणी असून अपर निबंधक, सहकारी संस्था या पदास रु.८७०० ग्रेड वेतन तर अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था / पणन संचालक या पदास रु.८८०० इतके ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था / पणन संचालक या पदांना आता विशेष वेतन मंजूर केलेले नसल्याने त्यांना किमान रु.४०० ग्रेड वेतन वाढवून रु.९१०० ग्रेड वेतन देण्याची विनंती करण्यात येत आहे.

२) सह निबंधक, सहकारी संस्था

शासनाने दि.३१ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयान्वये विभागाचा सुधारित आकृतिबंध मंजूर करण्याबाबतचे आदेश काढलेले आहेत. सह निबंधक (प्रशासन) संवर्गात एकूण २८ मंजूर पदे आहेत. सन १९८१ मध्ये अस्तित्वात असलेल्या सहकारी संस्थांच्या मानकांची भारता ३६९३५ इतकी होती. सन २००७ अखेरपर्यंत मानकांची भारता १०८३९९ इतकी प्रचंड प्रमाणावर वाढलेली आहे. सदरची वाढ ही जवळपास तिप्पट आहे. नागरी बँका, नागरी पतपुरवठा संस्था व सहकारी संस्था यामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच त्यांच्या कार्याची व्याप्ती व आर्थिक उलाढाल दिवसेंदिवस वाढतच आहे. गृहनिर्माण सहकारी संस्थांमध्ये झालेली प्रचंड वाढ त्याचबरोबर त्या अनुषंगाने वाढणाऱ्या तक्रारींचे प्रमाण लक्षात घेता कामाचा ताण प्रचंड वाढला आहे. सहकारी संस्थांच्या निवडणुका, सदर संस्थेवरील नियंत्रण / सनियंत्रण करणे, वैद्यनाथन समितीची कामे, कर्ज माफी / व्याज माफीच्या अनुषंगाने करावी लागणारी अतिरिक्त कामे तसेच माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त झालेले अर्ज, अपीले विहित मुदतीत निकाली काढणे इ. बाबींच्या अनुषंगाने कामात वाढ झाली आहे. सह निबंधकांना संवैधानिक / अर्धन्यायिक स्वरुपाची कामे करावी लागतात. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता मागील तीन दशकांत सहकार चळवळीच्या अनुषंगाने कामाचा व्याप प्रचंड वाढला आहे. सह निबंधकांचे पद हे विभागीय स्तरावरील असल्याने त्यांना त्यांच्या विभागाच्या अखत्यारीतील सहकारी संस्थांच्या कामकाजावर लक्ष ठेवावे लागते.

सहकार विभागाच्या व्यतिरिक्त अन्य विभागांतील विभागीय स्तरावरील समकक्ष पदे पाहता असे दिसून येते की, सह निबंधक संवर्गाला देण्यात आलेल्या वेतनश्रेणीत अन्याय झालेला दिसतो. सदर वेतनश्रेणीतील अन्याय बडकस आयोगापासून पुढील प्रत्येक आयोगामध्ये झालेला आहे. याबाबत विविध विभागातील समकक्ष पदे व वेतनश्रेणीचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे :-

| वेतन आयोग | सह निबंधक / सह संचालक (सहकार) | सह संचालक (आरोग्य / उद्योग) | सह संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण) | सह संचालक (कृषि) |
|---|---|---|---|---|
| | (रुपये) | (रुपये) | (रुपये) | (रुपये) |
| १.४.१९६६ (बडकस आयोग) | ९५०-१६०० | १५००-१९२५ | १५००-१९२५ | १३००-१६०० |
| १.४.१९७६<br>(भोळे आयोग) | ११००-१७०० | १५००-१९२५ | १५००-१९२५ | १५००-१९२५ |
| १.१.१९८६<br>(चौथा वेतन आयोग) | ३२००-४६२५ | ३७००-५००० | ३७००-५००० | ३७००-५००० |
| १.१.१९९६<br>(पाचवा वेतन आयोग) | १०६५०-१५८५० | १२०००-१६५०० | १२०००-१६५०० | १२०००-१६५०० |
| १.१.२००६<br>(सहावा वेतन आयोग) | वेतन बँड<br>:१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन :६६०० | आरोग्य<br>वेतन बँड:<br>१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन :७९००<br>उद्योग<br>वेतन बँड<br>:१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन :७६०० | वेतन बँड :<br>१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन :७६०० | वेतन बँड :<br>१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन :७६०० |

विभागीय स्तरावरील ही सर्व पदे समकक्ष दर्जाची असल्याने तसेच त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच असल्याने या सर्व समकक्ष पदांना एकच वेतनश्रेणी देणे न्यायोचित होते. सह निबंधक संवर्गात

एकूण २८ मंजूर पदे आहेत. सदर संवर्गातील अधिकाऱ्यांना अप्पर निबंधक, सहकारी संस्था या संवर्गात पदोन्नती देण्यात येते. अपर निबंधक संवर्गात ५ मंजूर पदे आहेत. सबब सह निबंधकांना पदोन्नतीच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे या संवर्गातील अधिकाऱ्यांना वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतनाऐवजी वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी.

सह निबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) संवर्गात १५ मंजूर पदे आहेत. त्या अधिकाऱ्यांना त्यांच्या विभागातील जिल्ह्यांमधील सहकारी संस्थांचे वार्षिक तपासणी कार्यक्रम मुदतीत पूर्ण करुन घेणे, सहकारी संस्थांचे फेर लेखापरीक्षण, चाचणी लेखापरीक्षण, विशेष लेखापरीक्षण करण्याकरिता लेखापरीक्षक उपलब्ध करुन देऊन लेखापरीक्षण मुदतीत करुन घेणे इ. कामे करावी लागतात. राज्यातील वाढलेल्या सहकारी संस्थांची संख्या लक्षात घेता कामाची व्याप्ती वाढली आहे. त्यामुळे या संवर्गातील अधिकाऱ्यांना वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतनाऐवजी वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी.

३) जिल्हा उप निबंधक / उप निबंधक

४) विशेष लेखा परीक्षक, गट-अ

सहकार विभागाच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये विभागामार्फत ज्या निरनिराळ्या योजना राबविल्या जातात त्या योजनांसाठी वार्षिक आर्थिक तरतूद मंजूर केली जाते, तिच्या विनियोगाबाबत जिल्ह्यातील उप निबंधक यांच्याकडून नियंत्रण ठेवण्यात येते. राज्यातील सहकार चळवळ राबविण्याच्या दृष्टीकोनातून सहकारी संस्थांचे निबंधक या नात्याने विभागामार्फत निरनिराळे कायदे / कामे यांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार उप निबंधक यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. उक्त कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आलेली आहे. अशा कायद्यांची अंमलबजावणी करताना त्यांच्याकडून अर्धन्यायिक कार्यवाही करण्यात येते. याशिवाय महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ ची अंमलबजावणी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडील, मा. लोकआयुक्त यांच्याकडील व निरनिराळी न्यायालयीन प्रकरणे, सहकारी गृहनिर्माण संस्थांची वाढती संख्या व पर्यायाने निर्माण होणाऱ्या तक्रारी व त्यांचे निराकरण या स्वरुपाच्या कामकाजात प्रचंड वाढ झाली आहे.

सहकार विभागातील जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था हे पद इतर विभागांतील उप संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), उप संचालक (कृषि), उप जिल्हाधिकारी (महसूल) या पदांना समकक्ष पद आहे. बडकस आयोग व भोळे आयोगामध्ये उप निबंधकांसह या सर्व पदांसाठी एकच वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. मात्र चौथ्या व पाचव्या वेतन आयोगामध्ये फक्त उप संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण) व उप जिल्हाधिकारी (महसूल) या पदांना वरची वेतनश्रेणी देण्यात आली. याबाबतचा तुलनात्मक वेतनश्रेणीनिहाय तक्ता खालीलप्रमाणे आहे :-

| वेतन आयोग | उप निबंधक / उप संचालक (सहकार) | उप संचालक (आरोग्य / उद्योग) | उप संचालक (व्यवसाय प्रशिक्षण व प्रशिक्षण) | उप संचालक (कृषि) |
|---|---|---|---|---|
| | (रुपये) | (रुपये) | (रुपये) | (रुपये) |
| १.४.१९६६ (बडकस आयोग) | ४१०-१२०० | -- | ४१०-१२०० | ४१०-१२०० |
| १.४.१९७६ (भोळे आयोग) | ६८०-१५०० | -- | ६८०-१५०० | ६८०-१५०० |
| १.१.१९८६ (चौथा वेतन आयोग) | २२००-४००० | ३२००-४६२५ | २२००-४००० | ३२००-४६२५ |
| १.१.१९९६ (पाचवा वेतन आयोग) | ८०००-१३५००( जिल्हा उप निबंधकांना विशेष वेतन रु. ४००/- ) | १०६५०-१५८५० | ८०००-१३५०० | १०६५०-१५८५० (निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी या पदांना ) |
| १.१.२००६ (सहावा वेतन आयोग) | वेतनबँड :१५६००-३९१०० ग्रेड वेतन : ५४०० | आरोग्य -वेतनबँड : १५६००-३९१०० ग्रेड वेतन : ७६०० | वेतनबँड : १५६००-३९१०० ग्रेड वेतन : ६६०० | वेतनबँड : १५६००-३९१०० ग्रेड वेतन : ५४०० |

ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता जिल्हा उपनिबंधक / उपनिबंधक, सहकारी संस्था यांना वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतनाऐवजी वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्याची विनंती करण्यात येते.

राज्यातील वाढलेल्या सहकारी संस्था तसेच त्यांचा वाढता व्यवहार / उलाढाल, त्याचप्रमाणे अडचणीतील / समस्याप्रधान पतसंस्था, बँका इ.मधील कामाचा व्याप वाढला आहे. शासकीय लेखापरीक्षकांकडून सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करुन घेण्यासाठी जनतेची वाढती मागणी, कर्जमाफीचे कामकाज, माहितीचा अधिकार इ. बाबी लक्षात घेता विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, गट-अ या संवर्गातील अधिकाऱ्यांना वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतनाऐवजी वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्याची विनंती करण्यात येते.

५) सहाय्यक निबंधक

६) विशेष लेखापरीक्षक, गट-ब

तालुका पातळीवर काम करताना सहाय्यक निबंधक हे तालुक्यातील सहकारी संस्थांचे निबंधक असून त्यांना सहकारी संस्था, त्यांचे नियंत्रण, प्रशासकीय कामे, वैधानिक कामे, समन्वय, अडी-अडचणींचे निराकरण व या संस्थेशी संबंधित जनतेच्या तक्रारी, अडचणी यांचे समन्वयन, लोकशाही दिनाची कामे, माहितीचा अधिकार व कायदा यांची विहित कालमर्यादेत करावयाची अंमलबजावणी, निवडणूका इ. महत्वाची कामे करावी लागतात. ही कामे करणारा तालुक्यातील सहाय्यक निबंधक हा सहकार खात्यातील सर्वोच्च राजपत्रित अधिकारी असतो. या अधिकाऱ्याला कामे करताना महसूल, कृषि व इतर खात्यांशी तसेच तालुका/जिल्ह्याच्या लोकप्रतिनिधींशीही समन्वय ठेवावा लागतो. तालुका कृषि अधिकारी व तहसिलदार या पदांना चौथ्या वेतन आयोगामध्ये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचीच वेतनश्रेणी देण्यात आली होती. पाचव्या वेतन आयोगापासून तालुका कृषि अधिकारी व तहसिलदार या पदांची वेतनश्रेणी वाढविण्यात आली, मात्र सहाय्यक निबंधकाची वेतनश्रेणी त्याप्रमाणात वाढविण्यात आली नाही. याबाबतचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे :-

| वेतन आयोग | सहाय्यक निबंधक / सहाय्यक संचालक (सहकार) | तालुका कृषि अधिकारी | तहसिलदार |
|---|---|---|---|
| | (रुपये) | (रुपये) | (रुपये) |
| १.१.१९८६<br>(चौथा वेतन आयोग) | २०००-३५०० | २०००-३५०० | २०००-३५०० |
| १.१.१९९६<br>(पाचवा वेतन आयोग) | ६५००-१०५०० | ८०००-१३५०० | ७४५०-११५०० |
| १.१.२००६<br>(सहावा वेतन आयोग) | वेतनबँड : ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : ४४०० | वेतनबँड : ९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : ४६०० | वेतनबँड :<br>१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : ५००० |

तालुकास्तरावरील इतर विभागांतील समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधताना त्यांच्याइतकेच किंबहुना जादा काम सोसणाऱ्या सहाय्यक निबंधक ह्या या खात्याच्या अधिकाऱ्याला मात्र कमी वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. त्यामुळे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतनाऐवजी तहसिलदार संवर्गाप्रमाणे वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन ही वेतनश्रेणी देण्याची विनंती करण्यात येत आहे. राज्यातील वाढलेल्या सहकारी संस्था तसेच त्यांचा वाढता व्यवहार / उलाढाल, त्याचप्रमाणे अडचणीतील / समस्याप्रधान पतसंस्था, बँका इ. मधील कामाचा व्याप वाढला आहे. शासकीय लेखापरीक्षकांकडून सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करुन घेण्यासाठी जनतेची वाढती मागणी, कर्जमाफीचे कामकाज, माहितीचा अधिकार इ. बाबी लक्षात घेता विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, गट-ब यांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतनाऐवजी वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्याची विनंती करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

१) अपर आयुक्त व विशेष निबंधक (वित्त) / पणन संचालक

अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था / पणन संचालक ही पदे अपर निबंधक, सहकारी संस्था या संवर्गाची पदोन्नतीची पदे आहेत. पाचव्या वेतन आयोगामध्ये या दोन्ही संवर्गांना एकच रु.१४३००-१८३०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरत असल्याने पदोन्नतीच्या संवर्गास दरमहा रु.८००/- विशेष वेतन मंजूर केले होते.

पाचव्या वेतन आयोगामध्ये ज्या पदोन्नतीच्या व निम्न पदांना एकच वेतनश्रेणी अनुज्ञेय होती, त्या पदांच्या बाबतीत सुधारित वेतनसंरचनेत एकच वेतनबँड व ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरत असल्याने सहाव्या वेतन आयोगामध्ये अशा प्रकरणी पदोन्नतीच्या पदास समुचित अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने केलेली शिफारस (परिच्छेद ३.७.२) स्वीकारून शासनाने पदोन्नतीच्या पदांना अतिरिक्त ग्रेड वेतन अनुज्ञेय केले आहे. अशा प्रकरणी विशेष वेतन मंजूर करताना असुधारित वेतनश्रेणीतील किमान वेतन विचारात घेऊन सुसूत्रतेच्या दृष्टीने विशेष वेतनाचे चार टप्पे निश्चित केले आहेत. त्यानुसार विद्यमान वेतनश्रेणीतील रु.१२००० पेक्षा जास्त किमान वेतन असलेल्या संवर्गांना रु.१०० अतिरिक्त ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरविले आहे.

मागणी केल्याप्रमाणे या संवर्गांना रु.९१०० ग्रेड वेतन मंजूर केल्यास ते रु.१४३००-१८३०० वेतनश्रेणीपेक्षा उच्च रु.१६४००-२०००० आणि रु.१६४००-२०९०० या वेतनश्रेण्यांना सुधारित वेतनसंरचनेत अनुज्ञेय असलेल्या रु.८९०० ग्रेड वेतनापेक्षा अधिक होईल किंबहुना ही बाब विचारात घेऊनच रु.१०० अतिरिक्त ग्रेड वेतन विहित केले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गास रु.९१०० इतके ग्रेड वेतन मंजूर करणे उचित होणार नाही.

२) सह निबंधक, सहकारी संस्था

३) जिल्हा उप निबंधक / उप निबंधक

४) विशेष लेखा परीक्षक, गट-अ

५) सहाय्यक निबंधक

६) विशेष लेखा परीक्षक, गट-ब

प्रशासकीय विभागाने या संवर्गाची सार्वजनिक आरोग्य विभाग, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषि विभाग आणि महसूल विभागांतील संवर्गांशी तुलना केली आहे व त्यानुसार त्या विभागांतील संवर्गाप्रमाणे उच्च सुधारित वेतनसंरचनची मागणी केली आहे. मात्र हे संवर्ग आणि इतर विभागांतील संवर्गामध्ये आपापसात समकक्षता प्रस्थापित केलेली नाही. विचाराधीन संवर्ग आणि तुलना केलेल्या इतर संवर्गांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या भिन्न स्वरूपाच्या आहेत.

विचाराधीन संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नसल्याने उच्च वेतनसंरचनेची मागणी स्वीकारार्ह नाही.

## ३.३ - रोजगार व स्वयंरोजगार विभाग

**प्रस्तावाचा सारांश**

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतन संरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय | | | | | |
| १ | उप संचालक | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० | ७,६०० |
| २ | सहाय्यक संचालक | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४,६०० | १५६००-३९१०० | ६,६०० |
| ३ | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| ४ | कनिष्ठ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | या संवर्गासंदर्भात विशिष्ठ मागणी नाही. | |
| ५ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २,४०० | | |
| ६ | लिपिक - टंकलेखक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १,९०० | | |

रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय

संघटनेचे अभिप्राय :-

१) उप संचालक - महाराष्ट्र शासनाच्या निरनिराळया विभागांतील समकक्ष पदांसाठी रु.७६००/- एवढे ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे.

२) सहाय्यक संचालक - महाराष्ट्र शासनाच्या निरनिराळया विभागांतील पूर्वीच्या रु.७४५०-११५०० या वेतनश्रेणीतील पदांसाठी सुधारित वेतन बँड रु. ९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.६६०० मंजूर करण्यात आले आहे.

३) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी - महाराष्ट्र शासनाच्या निरनिराळया विभागांतील पूर्वीच्या रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील पदांसाठी सुधारित वेतन बँड रु. ९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर करण्यात आले आहे.

४) कनिष्ठ रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी }<br>
५) वरिष्ठ लिपिक }<br>
६) लिपिक- टंकलेखक }<br>
या संवर्गासंदर्भात संघटनेची विशिष्ठ मागणी नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

(१) अतिरिक्त कामकाजाचा भार

१) राज्यातील बेरोजगारीचा ज्वलंत प्रश्न विचारात घेऊन शासनाने रोजगार व स्वयंरोजगार या स्वतंत्र विभागाची घोषणा १ मे, १९९७ रोजी केली. सेवायोजन विभागाच्या मूळ कामकाजाशिवाय या विभागाकडे स्वयंरोजगाराचे समन्वयन व संनियंत्रण हे महत्वाचे अधिकचे काम सोपविण्यात आले. त्यामुळे या यंत्रणेमार्फत सेवायोजनाची कामे करुन स्वयंरोजगाराचे अधिकचे काम करण्यात येऊ लागले आहे.

२) सेवायोजन कार्यालयाचे पूर्वीचे नाव बदलून रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र असे करण्यात आले. त्यामुळे, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांना, बेरोजगारांना स्वयंरोजगाराची माहिती व मार्गदर्शन करणे, स्वयंरोजगार योजना राबविणाऱ्या शासनाच्या इतर विभागांशी संपर्क साधून बेरोजगारांना स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणे, स्वयंरोजगार प्राप्त झालेल्या उमेदवारांची सांख्यिकी माहिती सर्व विभागांकडून संकलित करुन ती शासनास उपलब्ध करणे, बेरोजगारांची नोकरीची मानसिकता बदलण्यासाठी स्वयंरोजगार मेळावे आयोजित करणे, बेरोजगारांना नोकरीस पर्याय म्हणून त्यांच्या सहकारी सेवा संस्थांची स्थापना करुन त्यांना नोंदणीसाठी मार्गदर्शन व सहाय्य करणे, या संस्थांना आर्थिक अनुदान मंजूर करुन त्याचे वाटप करणे, सेवा संस्थांना शासकीय/निमशासकीय कार्यालयांतील सेवा विषयक कामे मिळवून देण्यासाठी आवश्यक प्रयत्न करणे, संबंधित कार्यालयांशी संपर्क साधणे, काम वाटप समितीचे सदस्य सचिव म्हणून सर्व कामे करणे, त्यांच्या अडीअडचणी सोडविणे, बेरोजगारांना रोजगारक्षम करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षणाचे आयोजन करणे इ. वाढीव कामे करावी लागत आहेत.

३) सन १९९८ मध्ये "आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ" व सन १९९९ मध्ये "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ" अशी दोन नवीन महामंडळे रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या अधिपत्याखाली निर्माण करुन त्यांचे अतिरिक्त कामकाज या संघटनेकडून करण्यात येऊ लागले आहे. यापैकी "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे" कामकाज अल्पसंख्यांक विभागाकडे नुकतेच हस्तांतरीत झाले आहे.

(२) यंत्रणेतील पदांच्या आढाव्यात पदांची संख्या कमी केल्यामुळे झालेला परिणाम

या यंत्रणेतील अतिरिक्त कामे वाढत असताना शासनाने रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयातील पदांचा आढावा घेऊन मूळच्या १२७३ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात करुन ती ९४५ इतकी केली आहे. यामुळे उर्वरीत अधिकारी/कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त कामाचा बोजा वाढला आहे.

(३) रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेकडून राष्ट्रीय सेवायोजन नियमावलीतील मार्गदर्शक तत्वांनुसार व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार करण्यात येणारी कामे.

अ) राष्ट्रीय सेवायोजन नियमावलीतील मार्गदर्शक तत्वांनुसार करण्यात येणारी कामे -

१. बेरोजगारांची नाव नोंदणी, नोंदणीचे नुतनीकरण, शैक्षणिक पात्रतेत झालेली वाढ नोंदविणे, उद्योजकांकडून अधिसूचित झालेल्या रिक्त पदांसाठी योग्य उमेदवारांची पाठवणी करणे, अनुभवाची नोंद करणे इ.

२. उमेदवाराला त्याच्या आवडी, कल, आकांक्षा आणि शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन व्यवसाय मार्गदर्शन करणे.

३. पदव्युत्तर पदविकाधारकांसाठी विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्रे चालविणे.

४. अपंगांसाठी विशेष रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र चालविणे.

५. नियोजन आयोग व नियोजन मंडळासाठी आवश्यक असलेली सेवायोजन क्षेत्र माहिती गोळा करणे, त्यांचे संस्करण करणे, विश्लेषण करणे इ.

६. डीजीई अँड टी, नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय सेवायोजन नियमावलीमध्ये विहित केलेली सांख्यिकी माहितीची विवरणपत्रे (तिमाही, वार्षिक) तयार करुन पाठविणे. याशिवाय,

ब) राज्य शासनाने बेरोजगारांसाठी सुरु केलेल्या खालील योजना राबविणे -

१. पदवीधर सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत तहसिलदार कार्यालयामार्फत महिन्यातून १५ दिवस दररोज ४ तास याप्रमाणे किंवा रोजगार मिळेपर्यंत रु.३०० मानधनाचे काम देणे. तसेच पदवीधर नसलेल्या उमेदवारांना तहसिलदारांमार्फत मानधन मिळण्यासाठी याद्या पाठविणे.

२. आदिवासी उमेदवारांना स्पर्धात्मक परिक्षेसाठी प्रशिक्षण मिळण्याकरीता मार्गदर्शन केंद्रे चालविणे.

३. रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांमध्ये उमेदवाराला विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम करणे.

४. बेरोजगारांची नोकरीबाबतची मानसिकता बदलण्यासाठी रोजगार मेळावे, शिबीरे आयोजित करणे.

५. स्वयंरोजगार कार्यक्रमाचे समन्वयन व संनियंत्रण ही महत्वाची जबाबदारी शासनाने या विभागावर सोपविली आहे; त्याची अंमलबजावणी करणे.

क) रोजगार व स्वयंरोजगार धोरणाची अंमलबजावणी -

शासनाने दि.६ ऑक्टोबर, २००० रोजी स्वयंरोजगाराचे धोरण जाहीर केले आहे. शासनाचे स्वयंरोजगाराबाबतचे धोरण थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :-

स्वयंरोजगारांच्या योजनांचे पुर्नविलोकन करुन वस्तुनिष्ठ आढावा घेणे, स्वयंरोजगारासाठी उद्योग व्यवसायांचे गावनिहाय सर्वेक्षण करुन वर्धनक्षम व्यवसायाची निवड करण्यासाठी सहाय्य करणे व यामध्ये स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेणे, उद्योगधंद्यांतील प्रातिनिधीक संस्थांच्या सल्ल्याने अभ्यासक्रमाचा सातत्याने आढावा घेवून त्यात योग्य ते बदल करणे, खाजगी संस्था तसेच उद्योगधंद्यांच्या प्रातिनिधीक संस्थांना प्रशिक्षण व तांत्रिक शिक्षण देण्यासाठी प्रोत्साहन देणे, स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्ती, संस्था व महिलांचे गट यांना त्यांच्या मालाच्या विक्रीकरीता योग्य जागा किंवा सुविधा मिळवून देण्यास सहाय्य करणे, नगर विकास आराखड्यात स्वयंरोजगार निर्मितीच्या छोट्या व्यवसायांकरीता जमीन /जागा आरक्षित करणे, शहरी भागात रहिवाशांच्या सोयीकरीता व दैनंदिन जीवनात मदत करण्याकरीता सेवा सोसायट्या स्थापन करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना लागणाऱ्या मालापैकी काही बाबी स्वयंरोजगार उद्योजकांकरीता राखीव ठेवणे, स्वयंरोजगार योजनेंतर्गत महिला गटांसाठी विशेष कार्यक्रम, रोजगार निर्मितीला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी औद्योगिक व कामगार कायद्यांमध्ये तसेच धोरणांमध्ये योग्य ते बदल करणे आणि आर्थिक व्यवस्थेमुळे निर्माण होणाऱ्या व्यवसाय व स्वयंरोजगाराच्या नवीन संधींची दखल घेऊन पारंपारिक उद्योग व्यवसायात योग्य तो बदल करण्याबाबतची कामे या विभागामार्फत करण्यात येतात.

(४) सेवायोजन कार्यालये (रिक्त पदे सक्तीने अधिसूचित करणे) अधिनियम, १९५९ व त्याअंतर्गत नियमावली, १९६० ची अंमलबजावणी -

रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाकडे "सेवायोजन कार्यालये (रिक्त पदे सक्तीने अधिसूचित करणे) अधिनियम, १९५९ व त्याअंतर्गत नियमावली, १९६० ची अंमलबजावणी करण्याचे महत्वाचे काम सोपविण्यात आले आहे. सदर अधिनियम सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रास लागू आहे. अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी या यंत्रणेतील अधिकाऱ्यांना विविध आस्थापनांना भेटी देवून तपासणी करावी लागते. अंमलबजावणी न करणाऱ्या कसुरदार आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करावी लागते. हे महत्वाचे काम या अधिकाऱ्यांना करावे लागते. त्यामुळे या अधिकाऱ्यांचा संपर्क सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी येत असतो. त्यासाठी समतुल्य वेतनश्रेणीतील अधिकारी असल्यास खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजकांकडून योग्य प्रतिसाद मिळतो.

(५) पाचव्या वेतन आयोगामध्ये यंत्रणेतील पदांच्या वेतनश्रेणीवर झालेला अन्याय -

(१) संघटनेने सध्याच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्याची मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष. सदर बाब केवळ या संघटनेकडून कोणत्याही प्रकारचा महसूल मिळत नाही म्हणूनच दुर्लक्ष करण्यात आले असावे

असे वाटते. कारण त्याच वेळी महसूल, विक्रीकर, सहकार खात्यातील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेण्यांमध्ये मात्र भरीव वाढ करण्यात आली आहे. रोजगार व स्वयंरोजगार संघटना समाजाच्या व शासनाच्या दृष्टीने बेरोजगारीचा अत्यंत महत्त्वाचा व ज्वलंत प्रश्न हाताळत असून अशा सेवेकडून महसूलाची अपेक्षा करणे योग्य नाही. बेरोजगारी ही सामाजिक समस्या असून सदर कार्यालये ही जागतिक कामगार संघटनेच्या (ILO) शिफारशींनुसार निर्माण करण्यात आलेली आहे व सदर सेवा ही विनामुल्य आहे.

(२) महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वेतनश्रेणीमध्ये वेळोवेळी वाढ करण्यात आली असून चौथ्या वेतन आयोगामध्ये रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी व प्राध्यापक हे सम वेतनश्रेणीमध्ये होते. तथापि, पाचव्या वेतन आयोगानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने प्राध्यापकांच्या वेतनश्रेण्यांत भरीव वाढ केली असून नुकतेच आयोगाने जाहीर केलेल्या वेतनसंरचनेनुसार प्राध्यापकांना रु.३७००० ची नवीन वेतनसंरचना जाहीर झाली आहे. या तुलनेत रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी, गट-ब हा केवळ रु.९३०० ची वेतनश्रेणी घेणार आहे. याचे मुख्य कारण रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी हे प्राध्यापकांच्या तुलनेत संख्येने अत्यल्प असल्याने व त्यांची स्वतंत्र व प्रभावी अशी संघटना नसल्यामुळेच घडले आहे.

(३) शाळा / महाविद्यालयातील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवार नोकरीसाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नोंदणी करतात. अशा उमेदवारांना योग्य प्रकारचे व्यवसाय मार्गदर्शन, नोकरीच्या संधींबाबतची सद्य:स्थिती, नोकरी मिळण्यासाठी कशाप्रकारचे शिक्षण अथवा प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे (उदा. टायपिंग, संगणक ज्ञान, एमएच-सीआयटी इ.) याची माहिती देवून त्यांना रोजगारक्षम करण्यात येते. म्हणजेच पारंपारीक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर येणाऱ्या मुलांना विशिष्ट प्रकारचे मार्गदर्शन करुन त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी पारंगत करतात. म्हणजेच प्राध्यापकांपेक्षाही अत्यंत महत्वाचे काम हे अधिकारी करीत असतात. मात्र वेतनश्रेणीची वेळोवेळी मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे चौथ्या वेतन आयोगापासून या यंत्रणेतील अधिकारी अत्यंत कमी वेतनश्रेणीवर काम करीत आहेत.

(४) व्यवसाय मार्गदर्शन करणाऱ्या अधिकाऱ्यांची शैक्षणिक पात्रता किमान द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी निश्चित केली आहे. तसेच विशिष्ट विषयातील पदवी आवश्यक असते. सदर शैक्षणिक पात्रता ही कोणत्याही महाविद्यालयात शिक्षण देत असलेल्या प्राध्यापकापेक्षा कमी नसते. तसेच सदर अधिकाऱ्यांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येते. असे असूनही प्राध्यापकांच्या तुलनेत रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकाऱ्यांची वेतनसंरचना फारच कमी आहे.

(६) कार्यालय प्रमुख म्हणुन जबाबदाऱ्या सांभाळणे -

मुख्यालयाचे उप संचालक यांना आयुक्तांच्या अनुपस्थितीत संपूर्ण यंत्रणेचा प्रमुख म्हणून काम करावे लागते तर विभागीय कार्यालयाचे ते प्रमुख आहेत. सहाय्यक संचालक (गट अ) हे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राचे नियंत्रण अधिकारी म्हणून काम करीत असतात. ते जिल्हास्तरावरील शासनाच्या विविध समित्यांचे सदस्य असल्यामुळे बैठकांना जावे लागते. सहाय्यक संचालकांच्या अनुपस्थितीत रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (गट ब) यांना सदर जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. किंबहुना त्यांना कार्यालय प्रमुख म्हणूनच काम करावे लागते.

(७) इतर राज्यातील सेवायोजन कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीशी तुलना -

(१) राष्ट्रीय सेवायोजन नियमावलीतील मार्गदर्शक तत्वांनुसार महाराष्ट्र राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांप्रमाणे इतर राज्यातील सेवायोजन कार्यालये कामकाज करतात. मात्र स्वयंरोजगाराचे काम करणारे महाराष्ट्र राज्य हे एकमेव राज्य आहे. तरीही गुजरात, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यातील सहाय्यक संचालक (गट अ ) व सेवायोजन अधिकारी (गट ब) यांच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्र राज्यातील अधिकाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनश्रेण्यांपेक्षा जास्त आहेत. उदा. सहाय्यक संचालक(गट अ) वेतन बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर करण्यात आले आहे.

(२) महाराष्ट्र राज्यात रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेत संचालक किंवा अतिरिक्त संचालक ही पदे नाहीत. त्यामुळे उप संचालक या पदावर यंत्रणेतील कार्यभार अवलंबून असतो. उप संचालक हे या यंत्रणेतील अत्यंत महत्वाचे पद आहे. त्यामुळे या पदाची वेतनश्रेणीवाढ पाचव्या वेतन आयोगात होणे आवश्यक होते. मात्र त्यांची वेतनश्रेणी रू.१००००-१५२०० अशीच राहिली. गुजरात राज्यात अतिरिक्त संचालकास वेतनश्रेणी रू.१२०००-१६५००/ वेतनबँड पीबी-३ व रू.७६०० ग्रेड वेतन दिले आहे. त्यामुळे उपसंचालक यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करताना सदर वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

(३) इतर राज्यातील सेवायोजन अधिकारी केंद्र शासनाने सेवायोजन कार्य नियमावतील नमूद केलेली कामे करतात. तर महाराष्ट्र राज्यात सेवायोजन कार्य नियमावलीत नमूद केलेली कामे तर केली जातातच पण शासनाने १९९७ पासून राज्यात अंगिकारलेल्या रोजगार व स्वयंरोजगारविषयक धोरणानुसार अतिरिक्त कामे केली जातात. इतर राज्यात रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेण्या अधिक आहेत.

(४) पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आला त्यावेळी या यंत्रणेतील वेतनश्रेणीत अन्याय झाला आहे. (गुजरात- सहाय्यक संचालक (वर्ग-१ व २) वेतनश्रेणी रू.८०००-१४०५०, मात्र महाराष्ट्र - सहाय्यक संचालक वेतनश्रेणी रू.७४५०-११५०० व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी वेतनश्रेणी रू.६५००-१०५००)

८. ग्रेड वेतनामधील अत्यल्प फरक -

रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेतील पदांसाठी विहित केलेले वेतनबँड व ग्रेड वेतन यांचा तुलनात्मक विचार करता गट क मधील लिपिक-टंकलेखक व वरिष्ठ लिपिक यांना मंजूर केलेल्या ग्रेड वेतनामध्ये रु.५०० इतका फरक आहे. वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी यांच्या ग्रेड वेतनात रु. १८०० इतका फरक आहे. मात्र कनिष्ठ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (गट क) व रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (गट ब राजपत्रित) यांच्या ग्रेड वेतनात केवळ रु.२००/- चा फरक आहे.

त्याचप्रमाणे रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (गट-ब, राजपत्रित) व सहाय्यक संचालक (गट-अ, राजपत्रित) यांच्या ग्रेड वेतनातील फरकसुध्दा केवळ रु.२००/- इतकाच आहे. ग्रेड वेतनातील पदनिहाय फरक पाहता गट क मधील तीन पदांतील फरक अनुक्रमे रु.५०० व रु.१८००/- इतका आहे. मात्र अराजपत्रित कनिष्ठ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (गट-क), रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (गट-ब, राजपत्रित) व सहाय्यक संचालक (गट-अ) यामधील फरक रु.२००/- इतका आहे.

रोजगार व स्वयंरोजगार यंत्रणेतील गट-क, गट-ब आणि गट-अ मधील पदनिहाय मंजूर केलेले ग्रेड वेतन विचारात घेता अराजपत्रित कनिष्ठ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (गट-क), रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी (गट-ब, राजपत्रित) व सहाय्यक संचालक (गट- अ) यांच्या ग्रेड वेतनातील फरक हा किमान रु.१०००/- ते रु.१२००/- इतका करण्याची आवश्यकता आहे. म्हणून पुढील तक्त्यात सुचविण्यात आलेली वेतनसंरचना योग्य असल्याचे या विभागाचे मत असून उपरोक्त नमूद केलेले विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन प्रस्तावित वेतनसंरचनेस मान्यता देण्यात यावी, ही विनंती.

९. प्रस्तावित वेतनसंरचना --

| अ.क्र. | पदनाम | असुधारित वेतनश्रेणी (रू.) | सुधारित वेतनसंरचना | प्रस्तावित वेतनसंरचना |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | उप संचालक | १००००-१५२०० | पीबी-३:रू.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रू.६६०० | पीबी-३:रू.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रू.७६०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | सहाय्यक संचालक | ७४५०-११५०० | पीबी-२:रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन रू.४६०० | पीबी -३:रू.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रू.६६०० |
| ३ | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी | ६५००-१०५०० | पीबी-२: रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन रू.४४०० | पीबी-२: रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन रू.५४०० |

४) कनिष्ठ रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी

५) वरिष्ठ लिपिक

६) लिपिक- टंकलेखक

या संवर्गासंदर्भात विभागाची विशिष्ठ मागणी नाही.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) उप संचालक

२) सहाय्यक संचालक

३) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी

४) कनिष्ठ रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी

या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविण्यात आलेले नाही. या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. विहित केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही.

मात्र, सहाय्यक संचालक या संवर्गाची पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रू.७४५०-११५०० ही होती. सहाव्या वेतन आयोगात शासनाने रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.४६०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. तथापि, विवक्षितपणे उचित शासन आदेशाद्वारे पूर्वी वर्ग-१ म्हणून घोषित केलेल्या (सध्याच्या गट-अ मधील) रू.७४५०-११५०० आणि रू.७५००-१२००० या विद्यमान वेतनश्रेणीतील पदांना वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या निकषानुसार सहाय्यक संचालक संवर्गास वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना अनुज्ञेय करण्याबाबत प्रशासकीय विभागाने वित्त विभागाशी विचारविनिमय करून पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

५) वरिष्ठ लिपिक

६) लिपिक - टंकलेखक

हे संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

## ३.४ - वित्त विभाग

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) (३) | सुधारित वेतन संरचना (रूपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतन संरचना (रूपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बँड | ग्रेड वेतन | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| | अ) लेखा व कोषागारे संचालनालय | | | | | |
| १ | संचालक संवर्ग संचालक, लेखा व कोषागारे, | १६४०० - २०००० | ३७४००-६७००० | ८९०० | ३७४००-६७००० | १०००० |
| २ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट-अ) (वरिष्ठ) उप संचालक | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ६९०० / ७६०० |
| ३ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट-ब) लेखा अधिकारी / लेखा परीक्षा अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| ४ | सहाय्यक लेखा अधिकारी / सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी /उप कोषागार अधिकारी (उच्चश्रेणी ) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| ५ | लघुलेखक ( उच्चश्रेणी ) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| ६ | लघुलेखक ( निम्नश्रेणी ) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| ७ | टिप्पणी सहाय्यक / उच्चस्तर लिपिक / कनिष्ठ लेखापाल | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | वरिष्ठ लिपिक / संग्रह पडताळक / मुद्रांक प्रमुख लिपिक / कनिष्ठ लेखापाल | ४०००-६००० (मुद्रांक प्रमुख लिपिक - विशेष वेतन रु.१००) | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| ९ | रोखपाल / कनिष्ठ लेखापाल | ४०००-६००० (रोखपाल - रोख रक्कम हाताळण्यासाठी विशेष वेतन) | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| | ब) स्थानिक निधी लेखा संचालनालय | | | | | |
| १ | उच्चस्तर लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २,४०० | ५२००-२०२०० | २,८०० |
| २ | ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २,४०० | ५२००-२०२०० | २,८०० |

अ) लेखा व कोषागारे संचालनालय

१) संचालक संवर्ग - संचालक, लेखा व कोषागारे

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शासनास लेखांकन पद्धतीबाबत सल्ला देणे, लेख्यांचे संकलन करणे, ३४ कोषागारे व ३०३ उप कोषागारे आणि अधिदान व लेखा कार्यालयावर नियंत्रण ठेवणारे, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गांच्या प्रशासनिक बाबी हाताळणारे विभागप्रमुख दर्जाचे पद आहे. केंद्र शासनाकडे महालेखानियंत्रक यांच्या यंत्रणेत महालेखानियंत्रक (रु.२६०००), अतिरिक्त महालेखानियंत्रक (रु.२४०५०-२६०००), प्रधान मुख्य लेखानियंत्रक (रु.२२४००-२४५००) व त्यानंतर मुख्य लेखानियंत्रक (रु.१८४००-२२४००) अशी पदे आहेत. केंद्र शासनाच्या विविध विभागांमध्ये मुख्य लेखानियंत्रकाचे पद असल्याच्या अनुषंगाने समकक्षता विचारात घेऊन ग्रेड वेतन सुधारित करणे आवश्यक वाटते.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) संचालक संवर्गास केंद्र शासनाकडील संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. विभागप्रमुख म्हणून कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रु.४५००-५७०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. पाचव्या वेतन आयोगात या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी रु.१४३००-१८३०० ही होती. परंतु राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ च्या शिफारशीनुसार (अहवाल भाग-२, परिच्छेद-४.३७) या संवर्गास रु.१६४००-२०००० ही तुलनेने उच्च वेतनश्रेणी मंजूर केली होती. सहाव्या वेतन आयोगात या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना या संवर्गास मंजूर केली आहे. राज्य सेवेतील विभागप्रमुखांना मंजूर केलेल्या विविध वेतनसंरचनेपैकी ही उच्चतम वेतनसंरचना आहे. तसेच मागणी केलेले ग्रेड वेतन रु.१०००० हे प्रशासकीय विभागप्रमुख असलेल्या सचिव संवर्गास मंजूर केले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गाच्या मागणीशी समिती सहमत नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन सुधारित समकक्ष वेतनसंरचना विहित केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट-अ) (वरिष्ठ) - उप संचालक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- लेखा व कोषागारे संचालनालयांतर्गत महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट-अ) (वरिष्ठ) मधील उप संचालक या पदास वेतनबँड रू.१५६००-३९१०० आणि ग्रेड वेतन रू.६६०० मंजूर केले आहे. तथापि, शासनाच्या अन्य विभागांत / कार्यालयांत उप संचालक या समान पद व समान अधिकार असलेल्या पदांसाठी रू.६९०० / ७६०० इतके ग्रेड वेतन मंजूर केले आहे. त्यामुळे या संवर्गाच्या ग्रेड वेतनात त्रुटी राहिल्याचे दिसून येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गाची असुधारित वेतनश्रेणी रू.१०६५०-१५८५० ही आहे. रू.१००००-१५२०० आणि रू.१०६५०-१५८५० दोन्ही वेतनश्रेण्यांना एकच सुधारित वेतनसंरचना ( वेतनबँड रू.१५६००-३९१०० अधिक रू.६६०० ग्रेड वेतन ) अनुज्ञेय आहे. काही विभागांमध्ये रू.१००००-१५२०० या वेतनश्रेणीतील संवर्गातून रू.१०६५०-१५८५० या वेतनश्रेणीतील संवर्गात पदोन्नती दिली जाते. काही विभागांमध्ये पदोन्नतीच्या तसेच निम्न संवर्गास पाचव्या वेतन आयोगात रू.१०६५०-१५८५० ही एकच असुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय झाली होती. त्यामुळे पदोन्नतीच्या पदास विशेष वेतन मंजूर केले होते. या दोन्ही प्रकरणी पदोन्नतीच्या व निम्न संवर्गाच्या सुधारित वेतनसंरचनेमध्ये फरक रहावा या दृष्टीने राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशीनुसार ( अहवाल परिच्छेद-३.७ ) पदोन्नतीच्या संवर्गास रू.६९०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. या संवर्गाच्या बाबतीत अशी परिस्थिती नाही. तसेच रू.१२०००-१६५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रू.७६०० ग्रेड वेतन अनुज्ञेय आहे.

या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन सुधारित समकक्ष वेतनसंरचना विहित केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

३) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट-ब) - लेखा अधिकारी / लेखा परीक्षा अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासन, वित्त मंत्रालय शासन निर्णय क्र. १/१/२००८-आयसी, दि.२९.८.२००८ मधील परिच्छेद (x)(c) व वित्त मंत्रालय अधिसूचना क्र.जीएसआर ६२२(इ), दि.२९.८.२००८ मधील भाग-ब, विभाग-II अंतर्गत XX अन्वये लेखा अधिकारी पदास वेतनबँड पीबी-२ व ग्रेड वेतन रू.५४०० मंजूर केले आहे.

४) सहाय्यक लेखा अधिकारी / सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी /
उप कोषागार अधिकारी (उच्चश्रेणी )

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासन, वित्त मंत्रालय शासन निर्णय क्र. १/१/२००८-आयसी, दि.२९.८.२००८ मधील परिच्छेद (x)(c) व वित्त मंत्रालय अधिसूचना क्र.जीएसआर ६२२(इ), दि.२९.८.२००८ मधील भाग-ब, विभाग-II अंतर्गत XX अन्वये सहाय्यक लेखा अधिकारी पदास वेतनबँड पीबी-२ व ग्रेड वेतन रू.४८०० मंजूर केले आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

३) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (गट-ब) - लेखा अधिकारी / लेखा परीक्षा अधिकारी

४) सहाय्यक लेखा अधिकारी / सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी / उप कोषागार अधिकारी (उच्चश्रेणी )

सहाय्यक लेखा अधिकारी / सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी / उप कोषागार अधिकारी (उच्चश्रेणी ) या संवर्गांना केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-२ अधिक रू.४८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे. तथापि, हे संवर्ग केंद्र शासनाकडील संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाहीत. ( यासंदर्भात परिशिष्ट-१ मधील स्वतंत्र अहवाल पहावा.) त्यामुळे केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही.

तथापि, या संवर्गाच्या लेखा व लेखापरीक्षण आणि कोषागार कामकाजविषयक कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता या संवर्गाला वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४३०० ग्रेड

वेतन या वेतनसंरचनेऐवजी वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची ही शिफारस स्वीकारल्यास प्रस्तुत संवर्ग व पदोन्नतीच्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-ब (लेखा अधिकारी / लेखा परीक्षा अधिकारी ) संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही एकच वेतनसंरचना अनुज्ञेय होईल. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास पदोन्नतीच्या पदास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यासंदर्भात राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार पदोन्नतीच्या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याबाबत कार्यवाही करता येईल.

५) लघुलेखक (उच्चश्रेणी )

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासन, वित्त मंत्रालय अधिसूचना क्र.जीएसआर ६२२(इ), दि.२९.८.२००८ मधील पहिली अनुसूची भाग-ब, विभाग-I(ii) मध्ये नमूद केल्यानुसार मंजूर केलेल्या वेतनबँड पीबी-२ व रु.४६०० ग्रेड वेतनानुसार प्रस्तावित.

६) लघुलेखक (निम्नश्रेणी)

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासन, वित्त मंत्रालय अधिसूचना क्र.जीएसआर ६२२(इ), दि.२९.८.२००८ मधील पहिली अनुसूची भाग-ब, विभाग-I(ii) मध्ये नमूद केल्यानुसार II अंतर्गत सचिवालयेतर कार्यालयांतील वरिष्ठ स्वीय सहाय्यक वा तत्सम पदांना मंजूर केलेल्या वेतनबँड पीबी-२ व रु.४६०० ग्रेड वेतनानुसार प्रस्तावित.

<u>समितीची शिफारस</u> :-

५) लघुलेखक (उच्चश्रेणी )

६) लघुलेखक (निम्नश्रेणी)

या संवर्गांना केंद्र शासनाकडील लघुलेखक संवर्गाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची विनंती केली आहे.

केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना मंजुरीसंदर्भात अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.३.२ मध्ये विस्तृत विवेचन केले आहे. केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरु नये असे समितीचे मत आहे. त्यामुळे वरील संवर्गांच्या मागणीशी समिती सहमत नाही.

या संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन सुधारित समकक्ष वेतनसंरचना विहित केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

७) टिप्पणी सहाय्यक / उच्चस्तर लिपिक / कनिष्ठ लेखापाल

८) वरिष्ठ लिपिक / संग्रह पडताळक / मुद्रांक प्रमुख लिपिक / कनिष्ठ लेखापाल

९) रोखपाल / कनिष्ठ लेखापाल

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सर्वसामान्य उच्चस्तर लिपिकापेक्षा कामाचे स्वरुप वेगळे असून महालेखापाल / महालेखानियंत्रक यांच्याकडील लेखापालाच्या समकक्ष अशा स्वरूपाचे काम कोषागारातील व संचालनालयातील या संवर्गातील कर्मचाऱ्यांना करावे लागते. स्थानिक निधी लेखा विभागाकडील कनिष्ठ लेखापरीक्षक या समकक्ष पदाला रु.२८०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

७) टिप्पणी सहाय्यक / उच्चस्तर लिपिक / कनिष्ठ लेखापाल

८) वरिष्ठ लिपिक / संग्रह पडताळक / मुद्रांक प्रमुख लिपिक / कनिष्ठ लेखापाल

१) रोखपाल / कनिष्ठ लेखापाल

स्थानिक निधी लेखा संचालनालयाची निर्मिती होण्यापूर्वी दि.२७ मे, २००८ पर्यंत मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा हे संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिनस्त कार्यरत होते. वरील संवर्ग तसेच स्थानिक निधी लेखा अंतर्गत असलेले उच्चस्तर लिपिक, ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक आणि कनिष्ठ लेखापरीक्षक समकक्ष तसेच आपापसात बदलीपात्र होते. वरील संवर्गांचा आता एकच कनिष्ठ लेखापाल हा एकच संवर्ग निर्माण केला आहे. या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. सेवाप्र-११.०७ / प्र.क्र.१९६ / १ / कोषा(प्रशा-३), दि. २ डिसेंबर, २००८ अन्वये विहित केले आहेत. स्थानिक निधी लेखा संचालनालयातील कनिष्ठ लेखापरीक्षक आणि कनिष्ठ लेखापाल यांचे सेवाप्रवेश नियम एकसमान आहेत.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता वरील संवर्गांनादेखील वेतनबँड पीबी-१: रु.५२००-२०२०० आणि रु.२८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

ब) स्थानिक निधी लेखा संचालनालय

१) उच्चस्तर लिपिक

२) ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक

संघटनेचे अभिप्राय:- उच्चस्तर लिपिक / ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक ही पदे एकाच संवर्गातील असून सुधारित वेतनसंरचनेत कनिष्ठ लेखापरीक्षक या पदास वेतनबँड पीबी-१: रू.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रू.२८०० लागू करण्यात आले आहे. त्यामुळे त्याच संवर्गातील उच्चस्तर लिपिक व ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक या पदांस सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड पीबी-२: रू.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रू.२८०० लागू करण्यात यावे.

शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. सेवाप्र-११.०७ / प्र.क्र.१९६ / २ / कोषा(प्रशा-३), दि.२ डिसेंबर, २००८ अन्वये स्थानिक निधी लेखा विभागातील गट-क मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित सेवाप्रवेश नियम विहित करण्यात आले आहेत. त्यानुसार कनिष्ठ लेखापरीक्षक / उच्चस्तर लिपिक / ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक या जुन्या अस्तंगत होणाऱ्या संवर्गांच्या समकक्ष कनिष्ठ लेखापरीक्षक हा संवर्ग नव्याने निर्माण करण्यात आला आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा हे संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिनस्त कार्यरत होते. शासन निर्णय दि.२८ मे, २००८ अन्वये स्थानिक निधी लेखा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली आहे. या संचालनालयातील कनिष्ठ लेखापरीक्षक / उच्चस्तर लिपिक / ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक ही पदे रु.४०००-६००० या असुधारित वेतनश्रेणीमध्ये होती. सदर पदांवरील कर्मचारी आपापसात बदलीपात्र आहेत. मात्र असे असूनही राज्य वेतन सुधारण समिती, २००८ च्या शिफारशीनुसार कनिष्ठ लेखापरीक्षक या पदास वेतनबँड रु.५२००-२०२०० आणि रु.२८०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. उच्चस्तर लिपिक आणि ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक यांना मात्र वेतनबँड रु.५२००-२०२०० आणि रु.२४०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. कनिष्ठ लेखापरीक्षक या संवर्गास ग्रेड वेतन रु.२८०० देण्याचे कारण या संवर्गाच्या आणि इतर संवर्गाच्या कामातील भिन्नता असल्याचे समितीने आपल्या अहवालातील परिच्छेद ३.२०.१ मध्ये नमूद केले आहे.

वस्तुत: कनिष्ठ लेखापरीक्षक / उच्चस्तर लिपिक / ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक या तीनही पदांचा एकच संवर्ग असून त्यांचे पदनाम मात्र वेगवेगळे होते. शासन निर्णय दि. २ मार्च, २००९ अन्वये या तीनही पदांचे एकत्रीकरण करुन कनिष्ठ लेखापरीक्षक हा एकच संवर्ग निर्माण करण्यात आला आहे. तसेच या संवर्गाकरीता सुधारित सेवाप्रवेश नियम तयार केले आहेत.

त्यामुळे कनिष्ठ लेखापरीक्षक / उच्चस्तर लिपिक / ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक यांची वेतनसंरचना एकच म्हणजे वेतनबँड रु.५२००-२०२०० आणि रु.२८०० ग्रेड वेतन असणे आवश्यक आहे. या वस्तुस्थितीचा विचार करुन उच्चस्तर लिपिक आणि ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक या पदांना देखील रु.२८०० ग्रेड वेतन देऊन त्रुटी दूर करावी अशी शिफारस करण्यात येते.

समितीची शिफारस :-

१) उच्चस्तर लिपिक

२) ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक

उच्चस्तर लिपिक, ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक आणि कनिष्ठ लेखापरीक्षक या तीन संवर्गांचा कनिष्ठ लेखापरीक्षक हा एकच संवर्ग निर्माण केला आहे. या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र. सेवाप्र-११.०७ / प्र.क्र.१९६ / २ / कोषा(प्रशा-३), दि. २ डिसेंबर, २००८ अन्वये विहित केले आहेत. हे तीन संवर्ग पूर्वीपासून आपापसात बदलीपात्र होते. सदर वस्तुस्थिती विचारात घेता उच्चस्तर लिपिक, ग्रामपंचायत दुय्यम लेखापरीक्षक या संवर्गांनादेखील वेतनबँड पीबी-१: रु.५२००-२०२०० आणि रु.२८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## ३.५ - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रूपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रूपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) नियंत्रक, शिधावाटप | | | | | |
| १ | शिधावाटप अधिकारी | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| २ | सहाय्यक शिधावाटप अधिकारी / कनिष्ठ लेखापाल | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ३ | शिधावाटप निरीक्षक / वरिष्ठ लिपिक / उप लेखापाल | ४०००-६००० | ५२००-२००० | २४०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| | ब) नियंत्रक, वैधमापनशास्त्र | | | | | |
| १ | उप नियंत्रक, वैधमापनशास्त्र | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| २ | सहाय्यक नियंत्रक, वैधमापनशास्त्र | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| ३ | निरीक्षक (निवडश्रेणी) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| ४ | निरीक्षक (कनिष्ठश्रेणी) | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| | क) विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी | | | | | |
| १ | तांत्रिक अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५००० |
| २ | सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५००० |
| ३ | सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५००० |
| ४ | खरेदी अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५००० |

अ) नियंत्रक, शिधावाटप

शिधावाटप अधिकारी / सहाय्यक शिधावाटप अधिकारी / कनिष्ठ लेखापाल / शिधावाटप निरीक्षक / वरिष्ठ लिपिक / उप लेखापाल

संघटनेचे अभिप्राय :- मुंबई शिधावाटप क्षेत्रातील शिधावाटप निरीक्षक या पदास पाचव्या वेतन आयोगात रू.४०००-६००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. तर पुरवठा आयुक्त कार्यालयातील

पुरवठा निरीक्षक या पदास रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली होती. सदर दोन्ही पदे गट क मधील असून या पदांवरील सरळसेवा भरतीसाठी पदवी परीक्षा उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता विहित केली आहे. दोन्ही पदांना क्षेत्रिय कामकाज करणे अपेक्षित आहे. तथापि, क्षेत्रिय कामकाजाचे स्वरुप भिन्न आहे. पुरवठा आयुक्त कार्यालयातील पुरवठा निरीक्षकांना गोदाम तपासणीचे कामकाज करावे लागते तर शिधावाटप यंत्रणेतील शिधावाटप निरीक्षकांना दुकान तपासणीचे काम करावे लागते. पहिला वेतन आयोग ते तिसरा वेतन आयोग या कालावधीत सदर दोन्ही पदांना समांतर वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. मात्र चौथ्या वेतन आयोगामध्ये पुरवठा निरीक्षक या पदास रू.१४००-२३०० तर शिधावाटप निरीक्षक या पदास रू.१२००-२०४० अशा दोन स्वतंत्र वेतनश्रेण्या दिल्या गेल्या. वेतनश्रेणीतील हीच तफावत पाचव्या वेतन आयोगातदेखील ठेवली गेली आहे. किमान सहाव्या वेतन आयोगामधील सदर तफावत दूर केली जावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पदे वेतनबँड २ मधील पदे जरी असली तरी वरिष्ठ ते कनिष्ठ अशा पदोन्नतीच्या शृंखलेतील पदे असल्याने, शृंखलेतील कनिष्ठ पदास म्हणजेच, शिधावाटप निरीक्षक /वरिष्ठ लिपिक/ उप लेखापाल या पदांस वेतनबँड रू.५२००-२०२०० अधिक रू.२४०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेऐवजी पुरवठा निरीक्षक या पदासाठी मंजूर केलेल्या वेतनबँड रू.९३००-३४८०० या सुधारित वेतनबँडसह रु.४२०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. सहायक शिधावाटप अधिकारी/ कनिष्ठ लेखापाल ही पदे वरील पदांपेक्षा वरिष्ठ गटातील पदे असल्याने दोन्हींसाठी एकच ग्रेड वेतन न ठेवता वरिष्ठतेच्या प्रमाणात सदर पदास रू.४२०० ऐवजी रू.४३०० ग्रेड वेतन देण्यात यावे. शिधावाटप अधिकारी हे पद वरील पदांपेक्षा वरिष्ठ गटातील पद असल्याने वरिष्ठतेच्या प्रमाणात सदर पदास रू.४३०० ऐवजी ४४०० ग्रेड वेतन देण्यात यावे.

समितीची शिफारस :-

१) शिधावाटप अधिकारी

२) सहाय्यक शिधावाटप अधिकारी / कनिष्ठ लेखापाल

३)शिधावाटप निरीक्षक / वरिष्ठ लिपिक / उप लेखापाल

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) वरिष्ठ लिपिक वगळता उर्वरित संवर्गांना राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष न ठरविता असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतनश्रेण्यांची शिफारस केली होती. तद्नंतर या संवर्गांना पाचव्या व सहाव्या वेतन आयोगात असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतनश्रेण्या / वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

वरिष्ठ लिपिक संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. या संवर्गास इतर प्रशासकीय विभागांतील वरिष्ठ लिपिक संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

ब) नियंत्रक, वैधमापनशास्त्र

१) उप नियंत्रक, वैधमापनशास्त्र / २) सहाय्यक नियंत्रक, वैधमापनशास्त्र / ३) निरीक्षक (निवडश्रेणी) / ४) निरीक्षक (कनिष्ठश्रेणी)

संघटनेचे अभिप्राय :- पाचव्या वेतन आयोगानुसार अन्न व औषध प्रशासन यंत्रणेतील अन्न निरीक्षक, सहायक नियंत्रक, सह आयुक्त या पदांची व या विभागाच्या वैधमापनशास्त्र यंत्रणेतील निरीक्षक वैधमापनशास्त्र, सहायक नियंत्रक, वैधमापनशास्त्र व उप नियंत्रक, वैधमापनशास्त्र या पदांची शैक्षणिक अर्हता व वेतनाचा तुलनात्मकदृष्टया विचार करता सदर पदांच्या वेतनात मोठ्या प्रमाणात तफावत होती. मात्र, सहाव्या वेतन आयोगात विविध वेतनश्रेणी एकवटल्याने मागणी केल्याप्रमाणे ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करण्यात यावी. निरीक्षक, वैधमापनशास्त्र हे राज्यस्तरीय पद असून प्रत्येक तालुक्यातील प्रमुख

आहे. तसेच, जिल्हा स्तरावर सहायक नियंत्रक तर विभागीय स्तरावर उप नियंत्रक, वैधमापनशास्त्र हे कायद्यांच्या अंमलबजावणीचे व ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने उपयुक्त काम करतात. सबब, दोन्ही पदांच्या कामकाजाचे स्वरुप विचारात घेऊन पाचव्या वेतन आयोगातील तफावत दूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने केलेल्या मागणीस अनुसरुन निरीक्षक वैधमापनशास्त्र, सहायक नियंत्रक, वैधमापनशास्त्र व उप नियंत्रक, वैधमापनशास्त्र या संवर्गाच्या वेतनातील पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार तफावत दूर करण्यासाठी निरीक्षक, वैधमापनशास्त्र (निम्नश्रेणी) या संवर्गास ग्रेड वेतन रु.४२०० ऐवजी रु.४४००, याप्रमाणे निरीक्षक, वैधमापनशास्त्र (निवडश्रेणी ) या संवर्गास ग्रेड वेतन रु.४३००ऐवजी रु.४६०० तसेच सहायक नियंत्रक, वैधमापनशास्त्र या पदासाठी ग्रेड वेतन रु.४४०० ऐवजी रु.५४०० तर उपनियंत्रक, वैधमापनशास्त्र या संवर्गासाठी ग्रेड वेतन रु.५४०० ऐवजी रु.६६०० याप्रमाणे मंजूर करण्यात यावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) उप नियंत्रक, वैधमापनशास्त्र

२) सहाय्यक नियंत्रक, वैधमापनशास्त्र

३) निरीक्षक (निवडश्रेणी)

४) निरीक्षक (कनिष्ठश्रेणी)

चौथ्या वेतन आयोगामध्ये वेतन समानीकरण समितीने उपरोक्त संवर्गांना राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष न ठरविता असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतनश्रेण्यांची शिफारस केली होती व त्यानुसार या संवर्गांना वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. तदूनंतर पाचव्या वेतन आयोगात राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७च्या अहवालातील (भाग-२) परिच्छेद ४.११ मधील शिफारशीनुसार निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) संवर्गातील नियुक्तीसाठी असलेली विज्ञान शाखेतील पदवी ही शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन, या संवर्गास समकक्ष रू.४५००-७००० या वेतनश्रेणीपेक्षा तुलनेने उच्च रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. तर उर्वरित संवर्गांना असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या.

या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

क) विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी

१) तांत्रिक अधिकारी / २) सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी / ३) सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी / ४) खरेदी अधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- उपरोक्त पदांच्या सेवाप्रवेश नियमांनुसार सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी या संवर्गातील पदांचे सेवा भरतीचे प्रमाण महसूल यंत्रणा व पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी ५०-५० टक्के असे विहित केले असून, ५० टक्के पदांवर पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने तर ५० टक्के पदांवर महसूल विभागातील तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली जाते. तहसिलदार या पदासाठी रु.७४५०-११५०० या विद्यमान वेतन श्रेणीसाठी सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन अशी वेतनश्रेणी लागु केलेली आहे. तर याच पदाशी समकक्ष पुरवठा विभागातील पदांना सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु. ४६०० ग्रेड वेतन लागू केले आहे. थोडक्यात, तहसिलदार संवर्गातील अधिकारी जेव्हा पुरवठा विभागाच्या सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, खरेदी अधिकारी या समकक्ष पदांवर प्रतिनियुक्तीने कार्यरत असतील तेव्हा त्यांना या पदाची कर्तव्ये जबाबदाऱ्या सांभाळताना सदर पदाच्या उच्च टप्प्यावरील वेतन दिले जाईल. मात्र त्याच पदावर तशाच स्वरुपाचे काम करणाऱ्या मूळ पुरवठा विभागातील पदांना कनिष्ठ वेतन लागू राहील.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- तांत्रिक अधिकारी, सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी व खरेदी अधिकारी, ही पदे महसूल विभागातील तहसिलदार या पदाशी

समकक्ष असून एकाच गटातील पदे असतानादेखील यापैकी फक्त तहसिलदार या पदाची वेतनसंरचना या पदाच्या समकक्ष इतर पदांपेक्षा वेगळी मंजूर झाली आहे. मात्र, या विभागाच्या सदर समकक्ष पदांचे सेवाप्रवेश नियम पहाता, महसूल यंत्रणेतील तहसिलदार जेव्हा या विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत असतात तेव्हा वर नमूद पदांच्या कर्तव्ये - जबाबदाऱ्यांसाठी त्यांना वरिष्ठ वेतन द्यावे लागेल. ही असमानता दूर करण्यासाठी पुरवठा विभागाच्या उपरोक्त पदांची वेतनसंरचना तहसिलदार पदाच्या वेतनसंरचनेशी समांतर अशी मंजूर करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) तांत्रिक अधिकारी

२) सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी

३) सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी

४) खरेदी अधिकारी

शासन अधिसूचना, अन्न व नागरी पुरवठा विभाग क्र.आरएसटी १८७५/२०३७४/चौदा, दि.२६ जुलै, १९८२ अन्वये तांत्रिक अधिकारी या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम विहित केले आहेत. त्यानुसार हा संवर्ग सामान्य राज्यसेवा वर्ग-दोन मध्ये वर्गीकृत आहे. तर शासन अधिसूचना, अन्न व नागरी पुरवठा विभाग क्र.इएसटी २८८१/२०९३२/चोवीस, दि.२१ मे, १९८४ अन्वये सहाय्यक विभागीय पुरवठा अधिकारी, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी आणि खरेदी अधिकारी या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम विहित केले आहेत. त्यानुसार हे संवर्ग वर्ग-दोन मध्ये वर्गीकृत आहेत.

महसूल व वन विभागातील तहसिलदार हा संवर्गदेखील दि. १ एप्रिल, १९९४ पर्यंत वर्ग-दोन मध्येच होता व त्या संवर्गाची तत्कालिन वेतनश्रेणी वर नमूद संवर्गांप्रमाणेच रु.२०००-३५०० ही होती. त्यामुळे वरील संवर्गातील ५०% पदांवर तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीने नियुक्ती करण्याची तरतूद आहे.

महसूल व वन विभागातील तहसिलदार संवर्गाशी निगडीत कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन प्रशासकीय दृष्टिकोनातून त्या संवर्गास दि. १ एप्रिल, १९९४ पासून रू.२०००-३५०० ऐवजी रू.२२००-३७०० ही वेतनश्रेणी मंजूर करून वर्ग-१ (गट-अ) दर्जा दिला आहे. तहसिलदार संवर्गाच्या श्रेणीवाढीमागील त्या संवर्गाची महसूल व वन विभागातील विशिष्ठ कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची पार्श्वभूमी विचारात घेणे आवश्यक आहे. तहसिलदार संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि उपरोक्त चारही संवर्गांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न स्वरूपाच्या आहेत.

वास्तविकत: तहसिलदार संवर्गाची वर्ग-१ (गट-अ) मध्ये श्रेणीवाढ झाल्यानंतर उपरोक्त चारही वर्ग-२ मधील संवर्गात तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीने नियुक्ती करण्याच्या तरतूदीचा फेरविचार करणे उचित ठरले असते. मात्र, ही बाब अनावधानाने दुर्लक्षित राहून तहसिलदार संवर्गाच्या रू.२२००-३७०० / रू.७४५०-११५०० या वेतनश्रेणीचा लाभ उपरोक्त चारही संवर्गांना देण्यात आल्याचे दिसते. म्हणजेच ही कार्यवाही तर्कसंगत असल्याचे आढळून येत नाही.

थोडक्यात, तहसिलदार संवर्गाची वर्ग-१ (गट-अ) मध्ये श्रेणीवाढ होऊन त्या संवर्गास रु.२२००-३७०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यापूर्वी वरील संवर्ग आणि तहसिलदार संवर्ग एकाच वेतनश्रेणीत आणि वर्ग-२ मध्ये होते. तहसिलदार संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांच्या अनुषंगाने श्रेणीवाढ झाल्यानंतर वरील संवर्ग तहसिलदार संवर्गांशी समकक्ष राहिले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे वरील संवर्गांना तहसिलदार संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करणे उचित होणार नाही किंबहुना ते विधीवत ठरणार नाही. त्यामुळे या संवर्गांच्या मागणीशी समिती सहमत नाही.

# ३.६ - सामान्य प्रशासन विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द) | | | | | |
| १ | सह सचिव | १४३००-१८३०० | ३७४००-६७००० | ८७०० | ३७४००-६७००० | १०,००० किंवा मुख्य अभियंता पदासाठी देण्यात येईल ते ग्रेड वेतन |
| २ | उप सचिव | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| ३ | अवर सचिव | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० | २२२००-४७००० | ६९०० |
| ४ | कक्ष अधिकारी | १) ६५००-१०५००<br>२) ८०००-१३५०० (४ वर्षांच्या नियमित सेवेनंतर) | ९३००-३४८००<br>९३००-३४८०० (४ वर्षांच्या नियमित सेवेनंतर) | ४४००<br>५४०० | ९३००-३४८००<br>१५६००-३९१०० (४ वर्षांच्या नियमित सेवेनंतर) | ४८००<br>५४०० |
| ५ | सहायक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| ६ | लिपिक-टंकलेखक | ३०५०-४५९० (१. अधिक विशेष वेतन रु.८० २. अधिक विशेष वेतन रु.१५०) | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |
| | मंत्रालयीन विभाग (खुद्द) व राज्य शासकीय लघुलेखक संवर्ग | | | | | |
| ७ | वरिष्ठ स्वीय सहाय्यक | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ८ | लघुलेखक (निवड श्रेणी) | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ९ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | ६५००-१०५०० (विधी व न्याय विभागातील प्रारुप शाखेतील दोन पदांसाठी विशेष वेतन रु.८०) | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १० | लघुलेखक (निम्न श्रेणी) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | लघुटंकलेखक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| | ब) सैनिक कल्याण विभाग | | | | | |
| १ | संचालक, सैनिक कल्याण विभाग | १)१२०००-१६५००<br>२)१४३००-१८३०० | १५६००-३९१००<br>३७४००-६७००० | ७६००<br>८७०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| २ | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ५००० | ३७४००-६७००० | ८७०० |
| ३ | प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| | क) संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद | | | | | |
| १ | संचालक | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| | ड) मंत्रालय चौरस आहारगृह व मंत्रालय उपाहारगृहे | | | | | |
| १ | व्यवस्थापक, कोकण भवन उपहारगृह | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| | इ) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | | | | | |
| १ | संचालक (माहिती) | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| २ | उप संचालक (माहिती / प्रदर्शने) | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ३ | जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती / प्रशासन) /वरिष्ठ उप संपादक/ जनसंपर्क अधिकारी / संशोधन अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ६६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सहाय्यक संचालक ( माहिती / प्रशासन) /माहिती अधिकारी / अधिपरिक्षक पुस्तके व प्रकाशने | ६५००-१०५०० <br> ७४५०-११५०० | ९३००-३४८०० <br> ९३००-३४८०० | ४४०० <br> ४६०० | १५६००-३९१०० | ५६०० |
| ५ | उप संपादक / माहिती सहाय्यक/ स्वागतकार- नि - माहिती सहाय्यक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |

अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द)

१) सह सचिव

संघटनेचे अभिप्राय:- क्षेत्रिय स्तरावरील मुख्य अभियंता हे मंत्रालयीन विभागात सह सचिव पदावर कार्यरत असतात. त्यामुळे मुख्य अभियंता पदासाठी जे ग्रेड वेतन देण्यात येईल ते किंवा रू.१०,००० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या तुलनेत मंत्रालयीन विभागातील सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना धोरणात्मक बाबींवर काम करावे लागते तसेच विधीमंडळाशी संबंधित कामकाजाच्या जबाबदाऱ्या तुलनेने जास्त आहेत. त्यामुळे संघटनेची मागणी मान्य करण्यास हरकत नसावी.

२) उप सचिव

संघटनेचे अभिप्राय:- मंत्रालयीन संवर्गातील सह सचिव व उप सचिव ही पदे संवर्गातील सर्वोच्च पदे असून विभाग प्रमुखांच्या थेट नियंत्रणाखाली असतात. दोन्ही पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या एकसमान आहेत. अवर सचिव व उप सचिव या दोन्ही पदांसाठी रु.१५६००-३९१०० हा एकच वेतनबँड मंजूर करण्यात आला आहे. दोन्ही पदांच्या ग्रेड वेतनामध्ये केवळ रु.१००० असा अल्पसा फरक केला आहे. अवर सचिव व उप सचिव यांच्याकडे असलेल्या कार्यासनांमध्ये मोठा फरक आहे. उप सचिव हे थेट सचिव/मुख्य सचिव तसेच मंत्री महोदय यांना कामाचा अहवाल देत असतात. सचिवांच्या अनुपस्थितीत मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याचे कामदेखील त्यांना करावे लागते. थोडक्यात, अवर सचिवांपेक्षा उप सचिवांच्या कामाची व्याप्ती मोठी आहे. हे विचारात घेता उप सचिव पदासाठी वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० व रु.८७०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभागांतील अधीक्षक अभियंता हे मंत्रालयीन विभागात उप सचिव म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्याकडे साधारणत: ३ कार्यासनांचा कार्यभार सोपविलेला असतो. तर मंत्रालयीन उप सचिव संवर्गातील अधिकाऱ्यांकडे ६ ते ७ कार्यासने देण्यात येतात. त्यामुळे या दोन्ही पदावरील अधिकाऱ्यांसाठी एकच वेतनबँड पीबी-४: रु. ३७४००-६७००० मंजूर करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- उप सचिव व सह सचिवांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या एकसमान आहेत. मात्र उप सचिव आणि अवर सचिव पदास एकच वेतनबँड पीबी-३ मंजूर करण्यात

आला आहे. उप सचिव व सह सचिव या दोन पदांच्या सुधारित वेतनबँडमध्ये रु.२२०००/- इतका मोठा फरक आहे. त्यामुळे उप सचिव व सह सचिव यांच्या वेतनमानात फार मोठी तफावत दिसून येते. या परिस्थितीत संघटनेची मागणी स्वीकारण्यास हरकत नसावी.

३) अवर सचिव

संघटनेचे अभिप्राय:- अवर सचिव हे पद मंत्रालयीन संवर्गातील कक्ष अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे पद असून सदर पदावर पदोन्नतीसाठी किमान १० ते १२ वर्षांचा कालावधी लागतो. या पदावर पदोन्नतीनंतर ग्रेड वेतनामध्ये रु.१२०० इतकी नाममात्र वाढ मिळते. त्यामुळे या पदासाठी नवीन वेतनसंरचना लागू करुन ग्रेड वेतन रु.६९०० मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- मंत्रालयीन संवर्गात अवर सचिव हे सह / उप सचिवांप्रमाणेच विभाग प्रमुखांना जबाबदार असतात. अवर सचिवांवर सोपविण्यात आलेल्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) सह सचिव

२) उप सचिव

३) अवर सचिव

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) मंत्रालयातील सह सचिव, उप सचिव आणि अवर सचिव या संवर्गांना केंद्र शासनाकडील अनुक्रमे संचालक, उप सचिव आणि अवर सचिव या संवर्गांशी समकक्ष ठरविले आहे. त्यानुसार या संवर्गांना चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगात वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या होत्या. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन या संवर्गांना सहाव्या वेतन आयोगामध्ये समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

४) कक्ष अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या कक्ष अधिकारी पदावरील अधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत. चार वर्षांच्या नियमित सेवेनंतर राज्य शासनाच्या कक्ष अधिकाऱ्यांना केंद्र शासनाप्रमाणे सुधारित ग्रेड वेतन लागू केले आहे. मात्र राज्य शासनाच्या कक्ष अधिकाऱ्यांना प्रारंभिक वेतनसंरचनेत केंद्र शासनाप्रमाणे रु.४८०० ग्रेड वेतन न देता रु.४४०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. ही तफावत अन्यायकारक आहे. तसेच केंद्र शासनाच्या धर्तीवर कक्ष अधिकारी पदास ४ वर्षांच्या सेवेनंतर वेतनबँड पीबी-३: रु.१५६००- ३९१०० मंजूर करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या कक्ष अधिकारी पदावरील अधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे संघटनेची मागणी मान्य करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

४) कक्ष अधिकारी

या संवर्गास केंद्र शासनाच्या सचिवालयातील कक्ष अधिकारी संवर्गाप्रमाणे रू.४८०० ग्रेड वेतन तसेच चार वर्षांच्या नियमित सेवेनंतर वेतनबँड पीबी-२: रू. ९३००-३४८०० ऐवजी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००- ३९१०० मंजूर करण्याची मागणी आहे. केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना मंजुरीसंदर्भात अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.३.२ मध्ये विस्तृत विवेचन केले आहे. केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरु नये असे समितीचे मत असल्याने केंद्र शासनाकडील समकक्षतेचा मुद्दा या संवर्गाच्या बाबतीतदेखील समितीने विचारात घेतलेला नाही.

तथापि, कक्ष अधिकारी संवर्गाच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांच्या संदर्भात पुढील बाबी विचारात घेणे समितीस आवश्यक वाटते:-

१) मंत्रालय हे राज्य शासनाचे मुख्यालय आहे. शासनाने निश्चित केलेल्या धोरणांसंबंधीची प्रशासकीय प्रक्रिया ही मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून पार पाडली जाते. धोरणात्मक निर्णय घेण्याची ही प्रक्रिया पार पाडणे आणि त्या निर्णयांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे या मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या प्रमुख जबाबदाऱ्यांसंबंधीचे कामकाज प्रशासकीय विभागांतर्गत विषयनिहाय स्थापन केलेल्या स्वतंत्र कार्यासन / कक्षांकडून पार पाडले जाते. कार्यासनाचे प्रमुख म्हणून या संपूर्ण कामकाजाची प्राथमिक व महत्त्वाची जबाबदारी ही कक्ष अधिकाऱ्यांवर सोपविली आहे.

कक्षाकडे सोपविण्यात आलेल्या विषयासंबंधी धोरणनिश्चितीसंबंधीची आनुषंगिक प्रशासकीय प्रक्रिया त्या कक्षातून सुरु केली जाते. या प्रक्रियेत मंत्रिमंडळास टिप्पणी सादर करताना संबंधित अधिनियम, नियम, उपनियम व प्रचलित धोरण, वैधानिक तरतुदी, त्यासंबंधीचे न्यायालयीन आदेश आदी बाबींचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

२) वरील धोरणात्मक निर्णयांप्रमाणेच विविध शासकीय व प्रशासनिक बाबींच्या विनियमनांसंबंधीचे अधिनियम, नियम व उपनियम शासनाकडून विहित केले जातात. या प्रक्रियेतदेखील कार्यासन पद्धतीत कक्ष अधिकारी संवर्गावर महत्वाची जबाबदारी येते.

३) विधानमंडळविषयक सर्व प्रकारचे अत्यंत संवेदनशील / जबाबदारीचे व कालमर्यादित कामकाज पार पाडणे ही मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची मूलभूत जबाबदारी आहे. या कामकाजासंदर्भात कक्ष अधिकाऱ्यांवर विवक्षित स्वरुपाची जबाबदारी सोपविली आहे.

४) प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या अखत्यारित वेगवेगळे विषय समाविष्ट आहेत. तसेच, प्रशासकीय विभागांतर्गतही कार्यासनांना वेगवेगळे विषय नेमून दिले आहेत. प्रत्येक विभागाशी संबंधित विषयाशी निगडीत अधिनियम, नियम, योजना भिन्न असल्याने त्यात मोठ्या प्रमाणावर विविधता आहे. नियतकालिक प्रशासनिक विभागांतर्गत आणि आंतरविभागीय बदल्यांमुळे कक्ष अधिकाऱ्यांना या विषयबदलास सतत सामोरे जावे लागते, ही अन्य संवर्गांच्या बाबतीत विशेषत्वाने न आढळणारी बाब समितीस प्रकर्षाने जाणवली आहे.

वरील विवेचन विचारात घेता या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांशी निगडीत बाबी या निश्चितच वेगळ्या स्वरुपाच्या आहेत, असे समितीचे मत आहे.

या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे.

तसेच, प्रकरण क्र. २ मधील परिच्छेद २.२.८ मधील विवेचन विचारात घेता, या संवर्गास चार वर्षांच्या नियमित सेवेनंतर वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु. ५४०० ग्रेड वेतन ऐवजी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु. ५४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे.

५) सहायक

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनाने दि.२५ सप्टेंबर, २००६ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने रु.६५००-१०५०० अशी वाढविली आहे. सहाव्या वेतन आयोगात राज्य शासनाकडील सहायक संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु.४३००/- इतके ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. त्याऐवजी रु.४६००/- इतके ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे अशी संघटनेची मागणी आहे.

सहायक पदावरील कर्मचाऱ्यांना विधानमंडळ कामकाज तसेच अन्य मंत्रालयीन महत्वाचे कामकाज पार पाडावे लागते. प्रस्तावांची तपशिलवार छाननी करताना कायद्यातील तरतूदी व तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करावा लागतो. टिप्पणीवर त्वरित निर्णय घेण्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांना सहाय्य करावे लागते.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासनाने सहायक व निम्नश्रेणी लघुलेखक या पदांची वेतनश्रेणी दि.२५ सप्टेंबर, २००६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढविली आहे. त्यानुसार सहायक संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु.४६००/- इतके ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :-

५) सहायक

केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना मंजुरीसंदर्भात अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.३.२ मध्ये विस्तृत विवेचन केले आहे. केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरु नये असे समितीचे मत आहे.

या संवर्गास सहाव्या वेतन आयोगामध्ये समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाची मागणी समर्थनीय वाटत नाही.

६)लिपिक- टंकलेखक

संघटनेचे अभिप्राय:- मंत्रालयीन लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरुप विचारात घेता त्यांना रु.२४०० ग्रेड पे मंजूर करण्यात यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- संघटनेची मागणी मंजूर करण्यास हरकत नसावी.

समितीची शिफारस :-

लिपिक-टंकलेखक हा सर्वसाधारण संवर्ग असून विविध प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. या संवर्गास इतर प्रशासकीय विभागांतील लिपिक-टंकलेखक संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

७) वरिष्ठ स्वीय सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनाने दि.२८ ऑक्टोबर, २००५ पासून या पदाच्या वेतनश्रेणीत वाढ केली आहे. वरिष्ठ स्वीय सहायक पदांची संख्या मर्यादित असून सदर पदावरील कर्मचारी मा. मंत्री महोदय, मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव इ. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे काम करीत असतात. त्यामुळे सदर पदास रु.६६०० ऐवजी केंद्र शासनाप्रमाणे रु.७६०० इतके ग्रेड वेतन देण्यात यावे.

महाराष्ट्र राज्यामध्ये सन १९९८ मध्ये केंद्र शासनाच्या धर्तीवर रु.१००००-१५२०० या वेतनश्रेणीत वरिष्ठ स्वीय सहायकाचे पद निर्माण केले आहे. परंतु केंद्र शासनाने दि.२८ ऑक्टोबर, २००५ पासून सदर पदाच्या वेतनश्रेणीत वाढ करुन रु.१२०००-१६५०० ही वेतनश्रेणी लागू केली. सदर पदांच्या वेतनश्रेणीत वाढ करताना केंद्र शासनाकडे खालील बाबींचा विचार करण्यात आला असावा.

(१) सदर संवर्गात पदोन्नतीच्या संधी मर्यादित स्वरुपाच्या असतात.

(२) सदर संवर्गातील पदे अत्यल्प असून, त्यांच्या पदाची जबाबदारी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किंवा मा.मंत्री महोदयांकडे कार्यरत असल्याने निश्चितच जास्त आहे.

(३) केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासनाकडे पदे व वेतनश्रेण्या देण्यात याव्यात असे शासनाचे धोरण असल्याने केंद्र शासनाकडील पदांशी समतुल्य वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

(४) महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, निर्णय क्रमांक पीएएल-२००५/८३८/(७०)/ का.सहा, दि.२९ सप्टेंबर, २००७ अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने सदरच्या वेतनश्रेणी मा. उच्च न्यायालयातील लघुलेखकांना लागू केल्या आहेत.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- मागणी वस्तुस्थितीवर आधारित असल्यामुळे मान्य करण्यास हरकत नसावी.

८) लघुलेखक (निवडश्रेणी)

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासन व मा. उच्च न्यायालयाप्रमाणे सदर पदास लागू करण्यात आलेल्या असुधारित वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० च्या आधारे वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० मंजूर करुन रु.६६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे. केंद्र शासनाने सदर पदांची वेतनश्रेणी सन-२००३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढविली आहे.

केंद्र शासनाने सदर पदांची वेतनश्रेणी सन-२००३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढविल्याने दि. २ फेब्रुवारी, २००५ रोजी मा.मुख्य न्यायमूर्ती व मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र.एचसीटी-२४०४/६५३/(९२)/का.तीन, दि. १८ मार्च, २००५ अन्वये स्वीय सहाय्यकांच्या वेतनश्रेणीत बदल करुन रु.७४५०-११५०० ऐवजी रु.८०००-१३५०० व काही पदांना श्रेणीवाढ करुन रु.१००००-१५२०० ही वेतनश्रेणी बहाल करण्याबाबतचे आदेश पुन्हा दि.७ जून, २००७ अन्वये निर्गमित करण्यात आले.

मा. उच्च न्यायालयातील लघुलेखक तसेच राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांतील लघुलेखक यांच्या सेवाशर्ती, शैक्षणिक व तांत्रिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच असून, उर्वरित लघुलेखकांना सदरच्या वेतनश्रेण्या लागू केलेल्या नाहीत. यास्तव, शासनाने विधी व न्याय विभागाकरीता घेतलेला निर्णय उर्वरित विभागांकरीता लागू करण्याची विनंती आहे.

सदर संवर्गात पदोन्नतीच्या संधी मर्यादित स्वरुपाच्या असतात. सदर संवर्गातील पदे अत्यल्प असून त्यांच्या पदाची जबाबदारी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किंवा मा.मंत्री महोदयांकडे कार्यरत असल्याने निश्चितच जास्त आहे.

केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासनाकडे पदे व वेतनश्रेण्या देण्यात याव्यात असे शासनाचे धोरण असल्याने केंद्र शासनाकडील पदांशी समतुल्य वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, निर्णय क्रमांक, दि. २९ सप्टेंबर, २००७ अन्वये सदरच्या वेतनश्रेणी मा. उच्च न्यायालयातील लघुलेखकांना लागू केलेल्या आहेत.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- या पदासाठी केंद्र शासनाने तसेच मा. उच्च न्यायालयाने वेतनबँड पीबी-३ व ग्रेड वेतन रु.६६०० मंजूर केले आहे ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत वेतनत्रुटी निवारण समितीने याबाबत योग्य निर्णय घ्यावा.

९) लघुलेखक (उच्चश्रेणी)

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनाने या पदासाठी रु.८०००-१३५०० ही असुधारित वेतनश्रेणी सन-२००३ पासून लागू केली आहे. या पदासाठी सर्व कार्यालयात कर्तव्ये, जबाबदाऱ्या व अर्हता एकसमान आहेत, हे विचारात घेऊन केंद्र शासन व मा. उच्च न्यायालयाच्या धर्तीवर वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

मा. उच्च न्यायालयातील लघुलेखक तसेच राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांतील लघुलेखक यांच्या सेवाशर्ती, शैक्षणिक व तांत्रिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच असून, उर्वरित लघुलेखकांना सदरच्या वेतनश्रेण्या लागू केलेल्या नाहीत. यास्तव, शासनाने विधी व न्याय विभागाकरीता घेतलेला निर्णय उर्वरित विभागांकरीता लागू करण्याची विनंती आहे.

सदर संवर्गातील पदे अत्यल्प असून, त्यांच्या पदाची जबाबदारी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किंवा मा.मंत्री महोदयांकडे कार्यरत असल्याने निश्चितच जास्त आहे.

केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासनाकडे पदे व वेतनश्रेण्या देण्यात याव्यात असे शासनाचे धोरण असल्याने केंद्र शासनाकडील पदांशी समतुल्य वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- या पदासाठी केंद्र शासनाने तसेच मा. उच्च न्यायालयाने वेतनबँड पीबी-३ व ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर केले आहे ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत वेतनत्रुटी निवारण समितीने याबाबत योग्य निर्णय घ्यावा.

१०) लघुलेखक (निम्नश्रेणी)

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनाने दि.२५ सप्टेंबर, २००६ अन्वये सदर पदाची वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने वाढवली आहे. मा. उच्च न्यायालयातील लघुलेखकांसाठी घेतलेला निर्णय लागू करण्याची विनंती आहे.

केंद्र शासनाने आदेश क्रमांक २०/२९/२००६-सीएस-II, दि.२५ सप्टेंबर, २००६ अन्वये सदर पदांची वेतनश्रेणी सन-२००३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढविली आहे. सदरची वेतनश्रेणी उच्चश्रेणी लघुलेखकांस लागू करुन, सहाव्या वेतन आयोगामध्ये त्याप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी.

मा. उच्च न्यायालयातील लघुलेखक तसेच राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांतील लघुलेखक यांच्या सेवाशर्ती, शैक्षणिक व तांत्रिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच असून, उर्वरित लघुलेखकांना सदरच्या वेतनश्रेण्या लागू केलेल्या नाहीत. यास्तव, शासनाने विधी व न्याय विभागाकरीता घेतलेला निर्णय उर्वरित विभागांकरीता लागू करण्याची विनंती आहे.

सदर संवर्गातील पदे अत्यल्प असून, त्यांच्या पदाची जबाबदारी ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे किंवा मा.मंत्री महोदयांकडे कार्यरत असल्याने निश्चितच जास्त आहे.

केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासनाकडे पदे व वेतनश्रेण्या देण्यात याव्यात असे शासनाचे धोरण असल्याने केंद्र शासनाकडील पदांशी समतुल्य वेतनश्रेणी लागू करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- वेतनत्रुटी निवारण समितीने योग्य निर्णय घ्यावा.

**समितीची शिफारस :-**

७) वरिष्ठ स्वीय सहायक

८) लघुलेखक (निवडश्रेणी)

९) लघुलेखक (उच्चश्रेणी)

१०) लघुलेखक (निम्नश्रेणी)

या संवर्गांना केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची विनंती केली आहे.

केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना मंजुरीसंदर्भात अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.३.२ मध्ये विस्तृत विवेचन केले आहे. केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरु नये असे समितीचे मत आहे. त्यामुळे वरील संवर्गांच्या मागणीशी समिती सहमत नाही.

११) लघुटंकलेखक

संघटनेचे अभिप्राय:- या संवर्गात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने ग्रेड वेतन रु. २८०० मंजूर करण्यात यावे.

मोफुसिल संघटनेचे अभिप्राय :- या संवर्गात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने त्या संवर्गाच्या ग्रेड वेतनामध्ये प्रस्तावित वाढ करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- वेतनत्रुटी निवारण समितीने योग्य निर्णय घ्यावा.

**समितीची शिफारस :-**

लघुटंकलेखक या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

ब) सैनिक कल्याण विभाग

१) संचालक, सैनिक कल्याण विभाग / २) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / ३) प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- १) सैन्यामध्ये अधिकारी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० मध्ये रुजू होतात व २० वर्षे सेवा केल्यानंतर कमीत कमी पीबी-४:

रु.३७४००-६७००० या वेतनबँडमधून सेवानिवृत्त होतात. सैन्य सेवेच्या तुलनेत महाराष्ट्र शासनाच्या सेवेत वेतनबँड व दर्जा खालावला जात असल्याने अधिकारी रुजू होत नाहीत. त्यामुळेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी संवर्गातील ३४ पदांपैकी १३ पदे गेल्या बऱ्याच वर्षांपासून रिक्त आहेत. वारंवार जाहिरात देवूनही अल्प प्रतिसाद मिळाला आहे व त्यातील काही उमेदवार रुजू झालेले नाहीत.

२) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी हे जिल्ह्यात एकमेव आहरण व संवितरण अधिकारी असल्यामुळे व सदरची पदे रिक्त असल्यामुळे जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या कल्याणार्थ योजना राबविताना ९,०६,००० माजी सैनिक व त्यांच्या अवलंबितांवर त्याचे गंभीर परिणाम होत आहेत.

३) त्याचप्रमाणे वेतननिश्चिती करताना निवृत्तिवेतन दुर्लक्षित करण्याची मर्यादा रु.१००० वरुन रु.४००० करण्यात यावी.

४) वरील शिफारशींनुसार संचालक, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व प्रभारी अधिकारी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र या पदांना वेतनबँड पीबी-४: रु.३७४०० - ६७००० मंजूर केल्यास ३५ अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्यांवर रु.१,८८,१८,०७२ इतका खर्च अपेक्षित आहे. या होणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के खर्च केंद्र शासनाकडून मिळतो व ५० टक्के खर्च महाराष्ट्र शासनाकडून केला जातो. यानुसार या अधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्यांसाठी प्रतिवर्षी रु.९४,०९,०३६ एवढा आर्थिक भार राज्य शासनावर पडणार आहे.

५) पुनर्नियुक्त सैनिकी अधिकाऱ्यांचे अंतिम वेतन संरक्षित करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय केंद्रीय सैनिक बोर्डाच्या दि. ७ जानेवारी, २००९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे.

समितीची शिफारस :-

१) संचालक, सैनिक कल्याण विभाग

२) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी

३) प्रभारी अधिकारी,छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक

या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

तथापि, गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रु.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रु.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक या संवर्गास रु.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाने तपासणी करून निर्णय घेणे योग्य होईल.

क) सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद

संचालक

संघटनेचे अभिप्राय:- सदर पद संरक्षण दलातील कर्नल समकक्ष अथवा त्यावरील पदाच्या दर्जाचे आहे. संरक्षण दलात कर्नल अथवा समकक्ष अधिकाऱ्यांकरीता वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु. ८७०० ग्रेड वेतन तसेच इतर संलग्न भत्ते देण्यात आले आहेत. संचालक पदास सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड पीबी-३:रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे संचालक पदावर संरक्षण दलातील निवृत्त कर्नल अथवा समकक्ष अधिकारी रुजू होणार नाही. त्याचा अप्रत्यक्ष परिणाम छात्रांच्या प्रशिक्षणावर होऊ शकतो. ही एकमेव संस्था आहे हे लक्षात घेता संचालक पदास प्रस्तावित वेतनसंरचना दिल्यास त्याचा परिणाम शासन सेवेतील इतर समकक्ष पदांच्या वेतनसंरचनेवर होणार नाही. तरी सहाव्या वेतन आयोगानुसार संरक्षण दलातील कर्नल समकक्ष अधिकाऱ्यांना मंजूर करण्यात आलेला वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु. ८७०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- या विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, सैनिक कल्याण विभाग व संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था ही समतुल्य पदे आहेत. त्यामुळे त्यांना समान वेतनसंरचना मंजूर करणे आवश्यक आहे.

समितीचे अभिप्राय :-

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

ड) मंत्रालय चौरस आहारगृह व मंत्रालय उपाहारगृहे

१) व्यवस्थापक, कोकण भवन उपाहारगृह

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- मंत्रालय उपाहारगृहांच्या आस्थापनेवर व्यवस्थापक संवर्गातील ३ समकक्ष पदे असून त्यापैकी व्यवस्थापक, मंत्रालय उपाहारगृह व व्यवस्थापक, विधान भवन उपाहारगृह या २ पदांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० आणि रु. ४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. मात्र व्यवस्थापक, कोकण भवन उपाहारगृह या समकक्ष पदास रु. ४३०० हे कमी ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. प्रत्यक्षात व्यवस्थापक, कोकण भवन उपाहारगृह या पदावरील कर्मचाऱ्यास व्यवस्थापकाच्या कर्तव्यांबरोबरच आहरण व संवितरण अधिकारी, कोकण भवन उपाहारगृह या पदाचा स्वतंत्रपणे अतिरिक्त कार्यभार सांभाळावा लागतो. त्यामुळे सदर पदास अन्य व्यवस्थापक पदापेक्षा कमी ग्रेड वेतन मंजूर केल्याने या पदावरील कर्मचाऱ्यावर अन्याय झाला आहे. तरी व्यवस्थापक, कोकण भवन या पदासही रु. ४४०० इतके समान ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

समितीची शिफारस :-

व्यवस्थापक, मंत्रालय उपाहारगृह व व्यवस्थापक, विधान भवन उपाहारगृह आणि व्यवस्थापक, कोकण भवन उपाहारगृह हे समकक्ष संवर्ग असल्याचे नमूद करून व्यवस्थापक, कोकण भवन उपाहारगृह या संवर्गास उर्वरित दोन संवर्गाप्रमाणे रू.४४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी केली आहे.

शासन अधिसूचना क्र.आरटीआर-१०९४/२४/९४/एमसीएस/एम, दि.२ नोव्हेंबर, १९८८ अन्वये विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार व्यवस्थापक, मंत्रालय उपाहारगृह व व्यवस्थापक, विधान भवन उपाहारगृह हे संवर्ग व्यवस्थापक, कोकण भवन उपाहारगृह या संवर्गाचे पदोन्नतीचे संवर्ग आहेत. त्यामुळे व्यवस्थापक, कोकण भवन उपाहारगृह हा संवर्ग उर्वरित संवर्गांशी समकक्ष नाही. या संवर्गास मागणी केलेले पदोन्नतीच्या संवर्गाचे ग्रेड वेतन मंजूर करणे उचित होणार नाही.

इ) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

१) संचालक (माहिती)

संघटनेचे अभिप्राय:- या पदासाठी पदवी आणि पत्रकारितेतील पदविका / पदवी तसेच पत्रकारितेच्या क्षेत्रातील १० वर्षांचा पर्यवेक्षकीय अनुभव अशी अर्हता विहित करण्यात आली आहे. हे पद महासंचालक (भा.प्र.से.) यांच्यानंतर महत्वाचे व्यवस्थापकीय जबाबदारी सांभाळणारे विभागप्रमुख दर्जाचे पद असल्याने या पदास वरची वेतनसंरचना देण्यात यावी.

हे पद शासनाची प्रतिमा निर्मिती आणि प्रतिमावर्धनाच्या कार्याशी संबंधित वृत्त, जनसंपर्क व पत्रकारीता या क्षेत्रातील विशेष (स्पेशलायझेशन) स्वरुपाच्या जबाबदारीचे पद आहे. या पदावरील अधिकाऱ्यास सातत्याने मल्टिमिडिया ॲप्रोच ठेवावा लागत असल्याने माध्यम तंत्रज्ञानानुसार या पदाचे काम तांत्रिक स्वरुपाचे झाले आहे.

आपत्कालिन परिस्थितीत शासनाची बाजू माध्यमांसमोर आणि जनतेसमोर मांडणे, तसेच शासनाच्या प्रतिमेस तडा जात असल्यास प्रसारमाध्यमांच्या नियंत्रण व व्यवस्थापनाद्वारे हे अधिकारी ' डॅमेज कन्ट्रोलर ' ची भूमिका पार पाडत असतात.

संचालक हे पद माहिती / प्रशासन / वृत्त-जनसंपर्क या शाखांसह आणि नागपूर, औरंगाबाद येथे कार्यरत आहे. हे पद १०० टक्के पदोन्नतीने भरले जाते.

केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयात संचालक हे पद रु.१४३००-१८३०० या वेतनश्रेणीतील असून संचालक (मिडीया-कम्युनिकेशन्स), संचालक (वृत्त), संचालक (प्रकाशन, जाहिरात) इ. शाखांमध्ये ते कार्यरत आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातील संचालक (माहिती) पदासदेखील रु.१४३००-१८३०० ही पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी म्हणजे सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- संचालक पदासाठी संघटनेने मागणी केलेली वेतनसंरचना देणे आवश्यक आहे, कारण तिसऱ्या वेतन आयोगात संचालक हे पद रु.१०००-१९२५, चौथ्या वेतन आयोगात रु.३७००-५००० आणि पाचव्या वेतन आयोगात रु.१२५००-१६५०० या वेतनश्रेणीत होते. मात्र याच पदाच्या वेतनश्रेणीत असलेले अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी), विक्रीकर उपायुक्त इ. पदांना शासनाने सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू केली असल्यामुळे संचालक (माहिती) पदासदेखील हीच वेतनसंरचना लागू करणे आवश्यक आहे.

२) उप संचालक (माहिती / प्रदर्शने / प्रकाशने / प्रशासन / वृत्त)

संघटनेचे अभिप्राय:- या पदासाठी पदवी अधिक पत्रकारितेतील पदविका/पदवी तसेच पत्रकारितेच्या क्षेत्रातील ७ वर्षांचा पर्यवेक्षकीय स्वरुपाचा अनुभव अशी अर्हता विहित करण्यात आली आहे. हे पद संचालकांनंतर महत्वाचे व्यवस्थापकीय जबाबदारी सांभाळणारे प्रादेशिक विभागप्रमुख दर्जाचे पद असल्याने या पदास वरची वेतनसंरचना देण्यात यावी.

शासनाची प्रतिमानिर्मिती आणि प्रतिमावर्धनाच्या कार्याशी संबंधित वृत्त, जनसंपर्क, प्रदर्शन, प्रकाशने आणि पत्रकारिता या क्षेत्रातील विशेष (स्पेशलायझेशन) स्वरुपाचे जबाबदारीचे पद आहे. या पदावरील अधिकाऱ्यास सातत्याने मल्टिमिडिया ॲप्रोच ठेवावा लागत असल्याने माध्यम तंत्रज्ञानानुसार या पदाचे काम तांत्रिक स्वरुपाचे झाले आहे.

आपत्कालिन परिस्थितीत शासनाची बाजू माध्यमांसमोर आणि जनतेसमोर मांडणे, तसेच शासनाच्या प्रतिमेस तडा जात असल्यास प्रसारमाध्यमांच्या नियंत्रण व व्यवस्थापनाद्वारे हे अधिकारी ' डॅमेज कन्ट्रोलर ' ची भूमिका पार पाडत असतात.

उप संचालक हे पद प्रादेशिक विभागप्रमुखाचे पद आहे व ते सरळसेवा आणि पदोन्नती अशा दोन्ही पध्दतीने भरले जाते. नवी दिल्लीबरोबरच अमरावती, लातूर, कोल्हापूर, कोकण, पुणे, नाशिक या विभागात आणि वृत्त, प्रदर्शने, प्रकाशने व प्रशासन या शाखांचे प्रमुख म्हणून उप संचालक काम पाहतात.

उप संचालक (प्रदर्शने) हे पद उप संचालक (माहिती) दर्जाचे असून उपयोजित कलेतील पदवी आणि त्या क्षेत्रातील तांत्रिक अनुभव अशी अर्हता असलेले पद आहे. त्यामुळे या पदाला उप संचालक (माहिती) या पदाप्रमाणे वरची वेतनसंरचना देणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या माहिती-प्रसारण विभागात वृत्त व प्रकाशन शाखेचे प्रमुखपद असलेल्या चीफ एडिटर, चीफ (मिडीया) व एडिटर-इन चीफ या समतुल्य पदाला पाचव्या वेतन आयोगात रु.१२०००-१६५०० ही वेतनश्रेणी दिली आहे. म्हणजे सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.१५६००-१९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू केली आहे. हीच वेतनसंरचना उप संचालक पदाला लागू करण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- उप संचालक (प्रदर्शने) हे पद तांत्रिक स्वरुपाचे असून केवळ महासंचालनालय नव्हे तर शासनाच्या सर्व विभागांना प्रदर्शननिर्मिती आणि व्यवस्थापनविषयक तांत्रिक स्वरुपाचा सल्ला देण्यासाठी त्याची निर्मिती करण्यात आली आहे. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनांच्या पार्श्वभूमीवर त्याचे अस्तित्व महत्त्वाचे असून अद्ययावत स्वरुपाची तांत्रिक माहिती आणि प्रतिमा असणाऱ्या व्यक्तींची त्यावर निवड करणे आवश्यक असते.

या बरोबरच उप संचालक (प्रकाशने) हे पदही लोकराज्य, महाराष्ट्र अहेड या शासनाच्या मानबिंदू असणाऱ्या प्रकाशनांबरोबरच विविध प्रकारची विशेष प्रकाशने, कॉफीटेबल बूक इ.च्या निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे असून त्यावर अद्ययावत ज्ञान आणि प्रतिभा असणाऱ्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येते.

विभागीय स्तरावरील उप संचालकांना वरील जबाबदाऱ्या अप्रत्यक्षपणे आणि अन्य प्रशासकीय स्वरुपाच्या जबाबदाऱ्या प्रत्यक्षपणे पार पाडाव्या लागतात. विभागीय पातळीवर विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी या सारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर त्यांना सतत संपर्कात राहून काम करावे लागते, त्यामुळे उप संचालक या पदासाठी सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू करणे आवश्यक आहे.

३) जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती / प्रशासन) / वरिष्ठ उप संपादक / जनसंपर्क अधिकारी / संशोधन अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती) / (प्रशासन) / वरिष्ठ उप संपादक / जनसंपर्क अधिकारी / संशोधन अधिकारी-गट अ (कनिष्ठ) हा संवर्ग माहिती-जनसंपर्क महासंचालनालयातील महत्त्वाचा संवर्ग आहे. हा संवर्ग क्षेत्रिय अधिकारी स्वरुपाचा आहे. या पदालादेखील पदवी आणि पत्रकारितेतील पर्यवेक्षकीय स्वरुपाचा किमान ५ वर्षांचा अनुभव अशी अर्हता आहे.

पदोन्नती आणि सरळसेवा या दोन्ही प्रकारे या पदांवर नियुक्ती केली जाते. त्यामुळे या संवर्गाला मागणी केलेली वेतनसंरचना देणे आवश्यक आहे.

उप संचालक (माहिती) या पदानंतर जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती) / वरिष्ठ उप संपादक / जनसंपर्क अधिकारी ही गट-अ कनिष्ठ या संवर्गातील व्यवस्थापकीय जबाबदारी सांभाळणारी कार्यालयप्रमुख दर्जाची पदे असल्याने या पदांना वरची वेतनसंरचना देण्यात यावी.

या पदावरील अधिकारी जिल्ह्यात जिल्हास्तरीय अधिकारी म्हणून क्षेत्रिय स्वरुपाचे काम करीत असतात. जिल्ह्याचे मा.पालकमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यासोबत हे अधिकारी जिल्हास्तरावर काम करीत असतात. जिल्ह्यातील सर्व विभागांची माध्यमविषयक सर्व जबाबदारी हे अधिकारी पार पाडत असतात.

मुख्यालयात मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, अन्य मंत्रीमहोदय व सचिव तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यांच्या नियमित संपर्कात राहून त्यांना माध्यमांविषयी अद्ययावत माहिती देणे, पत्रकार परिषदांचे आयोजन करणे, माध्यमांशी संवाद घडवून आणणे इ. महत्त्वाची जबाबदारी हे अधिकारी पार पाडतात.

मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.गृहमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी तसेच मा. मंत्रीमहोदयांचे विभागीय संपर्क अधिकारी म्हणूनही हेच अधिकारी जबाबदारी सांभाळत असतात.

आपत्कालिन परिस्थितीत शासनाची बाजू माध्यमांसमोर आणि जनतेसमोर मांडणे, तसेच शासनाच्या प्रतिमेस तडा जात असल्यास प्रसारमाध्यमांच्या नियंत्रण व व्यवस्थापनाद्वारे हे अधिकारी ' डॅमेज कन्ट्रोलर ' ची भूमिका पार पाडत असतात.

शासनाची प्रतिमानिर्मिती आणि प्रतिमावर्धनाच्या कार्याशी संबंधित वृत्त, जनसंपर्क, प्रदर्शन, प्रकाशने आणि पत्रकारीता या क्षेत्रातील विशेष (स्पेशलायझेशन) स्वरुपाचे जबाबदारीचे पद आहे. या पदावरील अधिकाऱ्यास सातत्याने मल्टिमिडिया अॅप्रोच ठेवावा लागत असल्याने माध्यम तंत्रज्ञानानुसार या पदाचे काम तांत्रिक स्वरुपाचे झाले आहे.

वृत्तपत्रीय लेखन, आकाशवाणी, दूरचित्रवाणी वाहिन्या व इंटरनेट अशा बहुविध माध्यमांमध्ये लेखन आणि आनुषंगिक कार्यक्रमांची निर्मिती हे अधिकारी करीत असतात. हे काम तांत्रिक आणि सर्जनशील अशा दोन्ही स्वरुपांचे आहे.

या संवर्गातील पदे ही तिसऱ्या व चौथ्या वेतन आयोगात उपजिल्हाधिकारी पदाच्या समकक्ष होती. मात्र, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगात ही पदे वेतनश्रेणीने अवनत झाली. कामाचे स्वरुप पाहता या पदाला वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या माहिती-प्रसारण विभागात जनसंपर्क अधिकारी पदाला रु.१००००-१५२०० ही पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी लागू आहे, तीच वेतनश्रेणी या संवर्गाला तातडीने लागू करण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- जिल्हास्तरावरील उप जिल्हाधिकारी, नगररचनाकार, विक्रीकर अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सहाय्यक आयुक्त (पशुसवंर्धन), कोषागार अधिकारी आणि जिल्हा माहिती अधिकारी यांचा दर्जा समकक्ष आहे. परंतु जिल्हा माहिती अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी तालुका पातळीवर काम करणाऱ्या तहसिलदारापेक्षाही कमी आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या रचनेत तर हा संवर्ग नायब तहसिलदाराच्या समकक्ष वेतनश्रेणीत आला आहे.

तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगात तहसिलदाराच्या बरोबरीचे हे पद प्रचंड फरकाने अवनत झाले आहे.

अवनत वेतनश्रेणी असल्याने या पदाची प्रतिष्ठाही खालावलेली दिसते. हा संवर्ग प्राधान्याने प्रसिध्दी आणि जनसंपर्क या विषयाशी निगडीत असल्याने प्रसारमाध्यमांचे समन्वयन आणि आवश्यक त्या बाबी जनतेपर्यंत पोहोचविण्यात यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे मागणी केलेली वेतनसंरचना लागू केल्यास हुद्दा, प्रतिष्ठा वाढण्याबरोबरच त्यांच्यावर झालेला अन्यायदेखील दूर होण्यास मदत होणार आहे.

४) सहाय्यक संचालक (माहिती / प्रशासन) / माहिती अधिकारी / अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने

संघटनेचे अभिप्राय:- सहाय्यक संचालक (माहिती) / माहिती अधिकारी / अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने ही गट-ब या संवर्गातील पदे असून या पदासाठी पदवी अधिक पत्रकारितेतील पदविका/पदवी तसेच पत्रकारितेच्या क्षेत्रातील ३ वर्षांचा पर्यवेक्षकीय अनुभव अशी अर्हता विहित करण्यात आली आहे.

शासनाच्या प्रतिमानिर्मितीच्या कार्याशी संबंधित वृत्त, जनसंपर्क, प्रदर्शन, प्रकाशने आणि पत्रकारिता या क्षेत्रातील विशेष (स्पेशलायझेशन) स्वरुपाचे जबाबदारीचे पद आहे. या पदावरील अधिकाऱ्यास सातत्याने मल्टिमिडिया ॲप्रोच ठेवावा लागत असल्याने माध्यम तंत्रज्ञानानुसार या पदाचे काम तांत्रिक स्वरुपाचे झाले आहे.

या पदावरील अधिकारी जिल्ह्यात जिल्हास्तरीय अधिकारी म्हणून क्षेत्रिय स्वरुपाचे काम करीत असतात. जिल्ह्याचे मा.पालकमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यासोबत हे अधिकारी जिल्हास्तरावर काम करीत असतात. जिल्ह्यातील सर्व विभागांची माध्यमविषयक सर्व जबाबदारी हे अधिकारी पार पाडत असतात.

मुख्यालयात मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, अन्य मंत्रीमहोदय व सचिव तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यांच्या नियमित संपर्कात राहून त्यांना माध्यमांविषयी अद्ययावत माहिती देणे, पत्रकार परिषदांचे आयोजन करणे, माध्यमांशी संवाद घडवून आणणे इ. महत्त्वाची जबाबदारी हे अधिकारी पार पाडतात.

मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री व मा.गृहमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, तसेच मा.मंत्रिमहोदयांचे विभागीय संपर्क अधिकारी म्हणूनही हेच अधिकारी जबाबदारी सांभाळत असतात. आपत्कालिन परिस्थितीत शासनाची बाजू माध्यमांसमोर आणि जनतेसमोर मांडणे, तसेच शासनाच्या प्रतिमेस तडा जात असल्यास प्रसारमाध्यमांच्या नियंत्रण व व्यवस्थापनाद्वारे हे अधिकारी ' डॅमेज कन्ट्रोलर ' ची भूमिका पार पाडत असतात.

वृत्तपत्रीय लेखन, आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी वाहिन्या व इंटरनेट अशा बहुविध माध्यमांमध्ये लेखन आणि कार्यक्रमांची निर्मिती हे अधिकारी करीत असतात. हे कामदेखील सर्जनशील स्वरुपाचे आहे. या संवर्गातील अधिकारी हे वृत्त, वृत्तचित्र (इलेक्ट्रॉनिक मिडिया), विभागीय संपर्क (जनसंपर्क), प्रकाशन, प्रशासन, आस्थापना, अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने या कार्यालयांमध्ये कार्यरत

आहेत; तर जिल्हा आणि विभागीय स्तरावर अनुक्रमे माहिती अधिकारी आणि सहाय्यक संचालक म्हणून महत्त्वाची जबाबदारी त्यांना पार पाडावी लागते. या संवर्गास वरची म्हणजे वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या माहिती-प्रसारण विभागात वृत्त, प्रकाशन, दूरदर्शन-आकाशवाणी, संशोधन शाखा, पत्र सूचना कार्यालय इ. ठिकाणी सहाय्यक संचालक हे पद कार्यरत आहे. या पदाला रु.८०००-१३५०० म्हणजे वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना निश्चित केली असल्याने हीच वेतनसंरचना या केंद्राशी समतुल्य पदाला लागू करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सहाय्यक संचालक (माहिती) / माहिती अधिकारी / अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने गट-ब या संवर्गातील अधिकारी तिसऱ्या व चौथ्या वेतन आयोगात तहसिलदार आणि सहायक संचालक (पशुसंवर्धन) यांच्या बरोबरीने होते. त्यांची तिसऱ्या व चौथ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी अनुक्रमे रु.६००-११५० आणि रु.२०००-३५०० अशी होती. मात्र, पाचव्या वेतन आयोगात सहाय्यक संचालक (माहिती) / माहिती अधिकारी / अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने गट-ब या संवर्गाला रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी मिळाली तर बरोबरीच्या तहसिलदार पदाला रु.७४५०-११५०० आणि सहाय्यक संचालक (पशुसंवर्धन) पदाला रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मिळाली.

सहाव्या वेतनसंरचनेत वेतन लागू करताना सहाय्यक संचालक (माहिती) संवर्गाला वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन मिळाले तर तहसिलदार आणि सहायक संचालक (पशुसंवर्धन) या पदाला अनुक्रमे वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन आणि वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन अशी वेतनसंरचना लागू झाली.

थोडक्यात सहाय्यक संचालक (माहिती) संवर्गाला पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात अवनत करण्यात आल्यामुळे त्यांना संघटनेने मागितलेली वेतनसंरचना देण्याची गरज आहे.

५) उप संपादक / माहिती सहाय्यक / स्वागतकार- नि - माहिती सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय:- हे पद उप संपादक / माहिती सहाय्यक / स्वागतकार-नि-माहिती सहाय्यक या संवर्गातील पद असून या पदासाठी पदवी अधिक पत्रकारीतेतील पदविका/पदवी तसेच पत्रकारीतेच्या क्षेत्रातील १ वर्षाचा अनुभव अशी अर्हता विहित करण्यात आली आहे. त्यामुळे या पदास वरची वेतनश्रेणी देण्यात यावी.

शासनाच्या प्रतिमानिर्मितीच्या कार्यात वृत्त, जनसंपर्क, प्रदर्शन, प्रकाशने इ. शाखांमध्ये कार्यरत या पदांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्याची गरज आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- महासंचालनालयाच्या अधिकारी / कर्मचारी संवर्गाचा उप संपादक / माहिती सहाय्यक हा मुख्य आधार आहे. या श्रेणीतील कर्मचाऱ्यांना महासंचालनालयाचा कणा म्हटले जाते. वरिष्ठांकडून मिळालेल्या मार्गदर्शनानुसार प्रत्यक्ष कामाची जबाबदारी घेऊन ती पूर्ण करण्याचे काम या कर्मचाऱ्यांना करावे लागते. बाहेरील वृत्तपत्रात आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांत अशा स्वरुपाचे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची सुप्रतिष्ठित स्थिती आणि त्यांना मिळणारे अधिक लाभ लक्षात घेऊन या पदाची श्रेणी वाढविणे ही आता एक महत्त्वाची गरज ठरती आहे. तेव्हा सहाव्या वेतन आयोगात या पदांसाठी वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्याची गरज आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) संचालक (माहिती)

२) उप संचालक (माहिती / प्रदर्शने )

३) जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती / प्रशासन) / वरिष्ठ उप संपादक / जनसंपर्क अधिकारी / संशोधन अधिकारी

४) सहाय्यक संचालक ( माहिती / प्रशासन) / माहिती अधिकारी / अधिपरिक्षक पुस्तके व प्रकाशने

५) उप संपादक / माहिती सहाय्यक/ स्वागतकार- नि - माहिती सहाय्यक

वरील संवर्गांना केंद्र / राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. वेतनश्रेणी विहित करताना विचारात घेतले जाणारे निकष म्हणजे कर्तव्ये व जबाबदाऱ्या, शैक्षणिक अर्हता व इतर आनुषंगिक बाबी विचारात घेऊन या संवर्गांना वेळोवेळी वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन या संवर्गांना सहाव्या वेतन आयोगात समकक्ष वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

तथापि, गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रू.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती / प्रशासन) / वरिष्ठ उप संपादक / अधिपरिक्षक पुस्तके व प्रकाशने / जनसंपर्क अधिकारी / संशोधन अधिकारी संवर्गास रू.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाने तपासणी करून निर्णय घेणे योग्य होईल.

# ३.७ (अ) - उच्च व तंत्र शिक्षण विभाग

### प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र.<br>(१) | पदनाम<br>(२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये)<br>(३) | सुधारित वेतनसंरचना (रूपये)<br>(४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रूपये)<br>(५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय | | | | | |
| | भाग-अ | | | | | |
| १ | प्राचार्य / उप प्राचार्य (म.शि.से.,गट-ब), औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ मुख्याध्यापक (गट-ब) शासकीय तांत्रिक माध्यमिक शाळा | ७५००-१२०००* | ९३००-३४८०० | ४,८०० | ९३००-३४८०० | ५,४०० |
| | अभियांत्रिकी अधीक्षक (गट-ब) शासकीय तांत्रिक माध्यमिक शाळा | १)७५००-१२००० *<br>२)८०००-१३५०० (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८००<br>१५६००-३९१०० (वरिष्ठ श्रेणी) | ४,८००<br>५४०० | | |
| २ | सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां.) | ७५००-१२०००* | ९३००-३४८०० | ४,६०० | ९३००-३४८०० | ५,४०० |
| ३ | प्रशिक्षण अधिकारी / गट निदेशक (कोपा, पिपिओ, डीटीपी) | १)६५००-१०५००<br>२)७५००-१२००० (वरिष्ठ श्रेणी) * | ९३००-३४८००<br>९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी) | ४,४००<br>४,६०० | ९३००-३४८००<br>९३००-३४८०० | ४,८००<br>५,४०० |
| | कनिष्ठ सर्वेक्षक - नि - प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) [कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक)**] | १)६५००-१०५००<br>२)७५००-१२००० (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८००<br>९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी) | ४,४००<br>४,८०० | ९३००-३४८००<br>९३००-३४८०० | ४,८००<br>५,४०० |
| ४ | प्रशिक्षण अधिकारी (वरिष्ठ) (हायटेक) | ७५००-१२०००* | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ५४०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रवीण शिल्पकारागीर (मेन्टेनन्स युनिट, अमरावती व पनवेल) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४,३०० | ९३००-३४८००<br>९३००-३४८००<br>(वरिष्ठ श्रेणी) | ४,८००<br>५,४०० |
| ६ | मिलराईट मेन्टेनन्स यांत्रिक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २,८०० | ९३००-३४८००<br>९३००-३४८००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>९३००-३४८००<br>(२० % पदांसाठी निवडश्रेणी ) | ४,६००<br>४,८००<br><br>५,४०० |
| | भाग-च | | | | | |
| १ | संचालक, प्रशिक्षण / संचालक, व्यवसाय शिक्षण | १६४००-२०००० | ३७४००-६७००० | ८,९०० | ३७४००-६७००० | १०,००० |
| २ | सह संचालक / अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७,६०० | १५६००-३९१०० | ८,७०० |
| ३ | उप संचालक / शिक्षणार्थी उप सल्लागार(वरिष्ठ) | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६,१०० | १५६००-३९१०० | ७,१०० |
| ४ | प्राचार्य, गट-अ / जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी / शिक्षणार्थी उप सल्लागार / सहाय्यक संचालक /सचिव, परीक्षा मंडळ / व्यवस्थापक, परिरक्षण पथक [व्यवस्थापक**] | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० | ७,६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्राचार्य / उप प्राचार्य, गट-अ (कनिष्ठ) / सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ) / मुख्याध्यापक / निरीक्षक / परीक्षा नियंत्रक / चर्मोद्योग विशेषज्ञ व अधीक्षक [चर्मतज्ञ-तथा-अधीक्षक **] | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० | ६,६०० |
| ६ | उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (अतां) / सहाय्यक संचालक (वरिष्ठ) (अतां) / उप सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई [उप सचिव, (अतां) **] | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ५,००० | ९३००-३४८०० | ५,४०० |
| ७ | प्रबंधक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था / सहाय्यक संचालक (प्रशासन)(अतां), व्य. शि. व प्र. संचालनालय (खुद्द) व विभागीय कार्यालये [सहाय्यक संचालक, (अतां)**] / | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ४,८०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहाय्यक सचिव (अतां), महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई | | | | | |
| | भाग- क | | | | | |
| १ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तथा शिकाऊ उमेदवारी योजनेतील निदेशक - शिल्पनिदेशक, गणित निदेशक, चित्रकला निदेशक, भाषा निदेशक, व्यवसाय निदेशक | १)५५००-९००० <br> २)६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी) <br> ३)७४५०-११५०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ९३००-३४८०० <br> ९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी) <br> ९३००-३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४,३०० <br> ४,४०० <br> ४,८०० | ९३००-३४८०० <br> ९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी) <br> ९३००-३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४,६०० <br> ४,८०० <br> ५,४०० |
| २ | लघुलेखक निदेशक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० <br> ९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी) <br> १५६००-३९१०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४,८०० <br> ५,४०० <br> ६,६०० |
| ३ | वसतिगृह अधीक्षक -नि-शारीरिक प्रशिक्षण निदेशक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २,८०० | ९३००-३४८०० <br> ९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी) <br> ९३००-३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४,६०० <br> ४,८०० <br> ५,४०० |
| | भाग-ड | | | | | |
| १ | कार्यालयीन अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४,३०० | ९३००-३४८०० | ४,४०० |
| २ | मुख्य लिपिक / प्रमुख लिपिक / लेखापरीक्षक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | ९३००-३४८०० | ४,३०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | वरिष्ठ लिपिक / टिप्पणी सहाय्यक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २,४०० | ९३००-३४८०० | ४,२०० |
| ४ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १,९०० | ५२००-२०२०० | २,४०० |
| ५ | नाईक / लोहमुद्रक / रोनिओचालक | २६१०-४००० | ४४४०-७४४० | १,६०० | ५२००-२०२०० | १,८०० |
| ६ | शिपाई | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १,३०० | ५२००-२०२०० | १,६०० |

* शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. आयटीआय-१००७/(१८७/०७)/व्यशि-१, दि.१९ जुलै, २०१० प्रमाणे अमुधारित वेतनश्रेणी

** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. आयटीआय-१००४/(२४७/०४)/व्यशि-२, दि. ३० सप्टेंबर, २००६ आणि शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. व्हीओसी/२१०५/(३९३/०५)/व्यशि-३, दि. २५ जुलै, २००७ नुसार सुधारित पदनाम

भाग-अ

१) प्राचार्य (गट-ब) / उप प्राचार्य (गट-ब) / मुख्याध्यापक / अभियांत्रिकी अधीक्षक / २) सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक)

संघटनेचे अभिप्राय :- केंद्रीय वेतन आयोगाप्रमाणे शिक्षकीय पदे (केंद्रीय वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद - ३.८.२२) व पूर्णवेळ शिक्षक पदाच्या पदोन्नतीची पदे ही पदे समकक्ष असून बदलीपात्र पदे आहेत तसेच दोन्ही पदांची ज्येष्ठतासूची एकच आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्राचार्य / उप प्राचार्य / मुख्याध्यापक / अभियांत्रिकी अधीक्षक / सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) ही पदे समकक्ष आहेत. आपापसात बदलीने पदस्थापना केली जाते व या पदांचे सेवाप्रवेश नियम व सेवाज्येष्ठतासूची एकत्रित आहे. या सेवा ज्येष्ठतासूचीच्या आधारे सदर पदावरील अधिकाऱ्यांना गट- अ (कनिष्ठ) (तांत्रिक) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना दिली जाते.

सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) हे पद वरील पदांशी समकक्ष असल्याने त्या पदास दिलेले ग्रेड वेतन रु.४६०० ऐवजी रु.४८०० असे सुधारित करणे आवश्यक आहे व तशी शिफारस करण्यात येत आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील माध्यमिक शिक्षकांना ज्या वेतनश्रेण्या मंजूर केलेल्या आहेत त्याच वेतनश्रेण्या या संचालनालयातील शिक्षकीय पदांनादेखील मंजूर करण्याचे धोरण अवलंबिलेले असल्याने समान वेतन या धोरणानुसार शालेय शिक्षण विभागाप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि संघटनेने केंद्र शासनाच्या शिक्षण विभागातील शिक्षकीय पदांना ज्या प्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड व ग्रेड वेतन मंजूर केले आहे. त्यानुसार मागणी केली आहे.

केंद्र शासनातील शिक्षण विभागातील पदे व राज्य शासनातील शिक्षकीय पदे यांचा दर्जा, कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने केंद्र शासनाने मंजूर केलेल्या वेतनसंरचनेप्रमाणे राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागातील गट-क मधील शिक्षकीय पदांना परिच्छेद ३.८.२२ प्रमाणे ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

१) प्राचार्य (गट-ब) / उप प्राचार्य (गट-ब) / मुख्याध्यापक / अभियांत्रिकी अधीक्षक

२) सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक)

प्राचार्य (गट-ब) / उप प्राचार्य (गट-ब) / मुख्याध्यापक / अभियांत्रिकी अधीक्षक या संवर्गांना असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामध्ये त्रुटी नाही. वेतन

समानीकरण समितीने या संवर्गांना केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्यासंदर्भात प्रकरण - २ परिच्छेद २.३.२ मधील विवेचन विचारात घेता मागणीशी समिती सहमत नाही.

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. आयटीआय-१००७/(१८७/०७)/व्यशि-१, दि.१९ जुलै, २०१० अन्वये सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) संवर्गास रु.७५००-१२००० ही पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सहाव्या वेतन आयोगात या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन ही आहे. या संवर्गास सदर समकक्ष वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३) प्रशिक्षण अधिकारी / गटनिदेशक (कोपा, पिपिओ, डीटीपी) / कनिष्ठ सर्वेक्षक - नि - प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) [कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक)]

संघटनेचे अभिप्राय :- सदर पद हे निदेशक पदाचे पदोन्नतीचे पद असून कर्तव्ये व जबाबदारीनुसार पर्यवेक्षकीय तथा व्यवस्थापन अशा जबाबदारीचे आहे. त्याकारणाने या पदास निदेशकांपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते. सुधारित वेतनसंरचनेमध्ये निर्माण झालेली त्रुटी ग्रेड वेतन रु.४६०० ऐवजी रु.४८०० असे सुधारुन दूर करावी व त्यानंतर केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना लागू करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सहाव्या वेतन आयोगात नमूद केलेल्या निदेशकांना निवडश्रेणीतील ग्रेड वेतन रु.४८०० मंजूर केले आहे. परंतु गटनिदेशक / प्रशिक्षण अधिकारी हे शिल्प निदेशक या संवर्गाचे पदोन्नतीचे पद आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीतील पृ. क्र.१४६ वर अ.क्र.६३ येथे गट निदेशक / प्रशिक्षण अधिकारी या पदास वरिष्ठ श्रेणीतील ग्रेड वेतन रु.४६०० दर्शविले आहे.

गट निदेशक / प्रशिक्षण अधिकारी या पदोन्नतीच्या पदास शिल्प निदेशकांपेक्षा ग्रेड वेतन कमी दर्शविले आहे. त्याऐवजी ते रु.४८०० इतके दर्शविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मंजूर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. आयटीआय-१००७/(१८७/०७)/व्यशि-१, दि.१९ जुलै, २०१० अन्वये प्रशिक्षण अधिकारी, प्रगत व्यवसाय प्रशिक्षण पद्धती योजना आणि गटनिदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील रु.६५००-१०५००, रु.७५००-१२००० (वरिष्ठ वेतनश्रेणी) ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

या संवर्गांना सहाव्या वेतन आयोगात रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे.

या संवर्गांना रु.७५००-१२००० (वरिष्ठ वेतनश्रेणी) या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन (वरिष्ठ वेतनसंरचना) ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. कनिष्ठ सर्वेक्षक - नि - प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) या संवर्गास वरीलप्रमाणे वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही.

या संवर्गाची वरीलप्रमाणे वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन, वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन (वरिष्ठ वेतनसंरचना) ही वेतनसंरचना शिल्प निदेशक संवर्गापेक्षा तुलनेने उच्च आहे.

४) प्रशिक्षण अधिकारी (वरिष्ठ) (हायटेक)

संघटनेचे अभिप्राय :- संबंधित पद हे गटनिदेशकाशी समकक्ष असलेल्या प्रशिक्षण अधिकारी या पदापेक्षा वरिष्ठ स्तरावरील आहे. त्यामुळे संबंधित पदाची वेतनश्रेणी वरिष्ठ आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-प्रशिक्षण अधिकारी हे पद गट निदेशकाशी समकक्ष आहे. प्रशिक्षण अधिकारी (वरिष्ठ) हे पद प्रशिक्षण अधिकारी या पदापेक्षा वरिष्ठ स्तरावरील पद आहे. महाराष्ट्र

नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीतील पृ. क्र.१४३ वरील अनुक्रमांक २० येथील पदास ग्रेड वेतन रु.४४०० दर्शविले आहे.

वास्तविक प्रशिक्षण अधिकारी (वरिष्ठ) (हायटेक) हे पद गटनिदेशक व प्रशिक्षण अधिकारी या पदांपेक्षा वरिष्ठ पद असल्याने सदर पदाला ग्रेड वेतन रु.४४०० ऐवजी रु.४८०० असणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :-

प्रशिक्षण अधिकारी (वरिष्ठ) (हायटेक) या संवर्गास शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. आयटीआय-१००७/(१८७/०७)/व्यशि-१, दि.१९ जुलै, २०१० अन्वये रू.७५००-१२००० ही पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सहाव्या वेतन आयोगात या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४८०० ग्रेड वेतन ही आहे.

या संवर्गास सदर समकक्ष वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५) प्रवीण शिल्पकारागीर (मेन्टेनन्स युनिट, अमरावती व पनवेल)

संघटनेचे अभिप्राय :-महाराष्ट्रातील एकूण ४१५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वीजेवर चालणाऱ्या यंत्रांची संख्या साधारणत: १५ ते २० हजार असून प्रति यंत्राची किंमत रु.१० हजार ते रू.१५ लक्ष आहे. सदर करोडो रुपये किंमतीच्या यंत्रांची देखभाल व दुरुस्ती तसेच प्रसंगी संबंधित यंत्राचे सुटे भाग तयार करणे ही या योजनेची उद्दीष्टे आहे. याकरीता लागणारा तंत्रज्ञ हा अतिकुशल व उच्च तंत्रज्ञानाचे ज्ञान असणारा असावा लागतो. करिता त्यांचे वेतनमान किमान गट निदेशक पदाशी समकक्ष असणे गरजेचे आहे. पूर्वी दोन्ही पदे समकक्ष होती.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्रवीण कारागीर (Master craftsman) व गटनिदेशक यांच्या वेतनश्रेण्या चौथ्या वेतन आयोगात समान होत्या. पाचव्या वेतन आयोगामध्ये गटनिदेशकांच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ झाली. तथापि, प्रवीण कारागीर पदाच्या वेतनश्रेणीत वाढ झाली नाही.

प्रवीण कारागीर हे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मौल्यवान किंमतीच्या यंत्रसामुग्रीची देखभाल व दुरुस्ती व तसेच प्रसंगी यंत्रांचे सुटे भाग तयार करणे ही महत्वाची जबाबदारी पार पाडत आहेत. त्यामुळे प्रवीण शिल्प कारागीर पदास रु.४३०० ऐवजी रु.४६०० ग्रेड वेतन मिळणे आवश्यक आहे अशी शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

चौथ्या वेतन आयोगात प्रवीण कारागीर आणि गट निदेशक या संवर्गांच्या वेतनश्रेण्या समान (रु.१६४०-२९००) असल्याने या संवर्गास गट निदेशक संवर्गाप्रमाणे रु.४६०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी केली आहे. तथापि, वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गास गट निदेशक संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. कामकाजाचे तांत्रिक स्वरुप विचारात घेऊन या संवर्गास तिसऱ्या वेतन आयोगातील रु.५००-९०० या वेतनश्रेणीशी समकक्ष रु.१६४०-२९०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस वेतन समानीकरण समितीने केली होती. गट निदेशक संवर्गाच्या कामकाजाचे तांत्रिक स्वरुप आणि शैक्षणिक जबाबदारी विचारात घेऊन त्या संवर्गासदेखील रु.१६४०-२९०० या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. तद्नंतर त्या संवर्गास वेळोवेळी द्विस्तरीय वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत.

थोडक्यात, प्रवीण शिल्पकारागीर हा शिक्षकीय संवर्ग नाही आणि गट निदेशक संवर्गांशी समकक्षदेखील नाही. त्यामुळे या संवर्गास गट निदेशक संवर्गाप्रमाणे रु.४६०० ग्रेड वेतन मंजूर करण्याच्या मागणीशी समिती सहमत नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना मंजूर केली असून त्यामध्ये त्रुटी नाही.

६) मिलराईट मेन्टेनन्स यांत्रिक

संघटनेचे अभिप्राय :-संबंधित पद वरील पदाच्या लगतचे सहाय्यक पद असून त्यांच्यामधील कुशलता वरीलप्रमाणे असावी लागते. यापूर्वी यांची समकक्षता शिल्पनिदेशकाप्रमाणे होती. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या दि.५ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयातील प्रपत्र-अ मधील अ. क्र. १३ येथील

पदाकरीता (तंत्र सहायक) शासनाने सुधारित वेतनश्रेणी दिली आहे. त्यामुळे संबंधित पदाला किमान शिल्पनिदेशकांची वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे. दोन्ही पदांची शैक्षणिक अर्हता सारखीच आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-मिलराईट मेन्टेनन्स यांत्रिक व शिल्प निदेशक या दोन्ही पदांच्या वेतनश्रेण्या चौथ्या वेतन आयोगात समान होत्या. पाचव्या वेतन आयोगामध्ये शिल्प निदेशक पदास रु.५०००-८००० व पुढे रु.५५००-९००० अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. मात्र, मिलराईट मेन्टेनन्स यांत्रिक या पदास पाचव्या वेतन आयोगात रु.४५००-७००० अशी वेतनश्रेणी मंजूर झाल्याने सहाव्या वेतन आयोगामध्ये या पदाच्या वेतनसंरचनेत त्रुटी राहिली आहे. सबब, शिल्प निदेशक व मिलराईट मेन्टेनन्स यांत्रिक या दोन्ही पदांस पूर्वीच्या समान वेतनश्रेणीनुसार ग्रेड वेतन रु. २८०० ऐवजी रु. ४३००, रु. ४४०० (वरिष्ठ वेतनश्रेणी ) व रु. ४८०० ( निवडश्रेणी ) मिळणे आवश्यक असल्याने शिफारस करण्यात येत आहे.

## समितीची शिफारस :-

तिसऱ्या वेतन आयोगात शिल्पनिदेशक आणि मिलराईट मेन्टेनन्स यांत्रिक या संवर्गांच्या वेतनश्रेण्या समान (रु.३६५-७६०) असल्याने या संवर्गास शिल्पनिदेशकाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी केली आहे. तथापि, वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गास शिल्प निदेशक संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. कामकाजाचे तांत्रिक स्वरुप विचारात घेऊन या संवर्गास तिसऱ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीशी समकक्ष रु.१४००-२३०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस वेतन समानीकरण समितीने केली होती. तर शिल्प निदेशक संवर्गाच्या कामकाजाचे तांत्रिक स्वरुप आणि शैक्षणिक जबाबदारी विचारात घेऊन त्या संवर्गास समकक्षतेपेक्षा तुलनेने उच्च रु.१४००-२६०० या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. तद्नंतर त्या संवर्गास वेळोवेळी त्रिस्तरीय वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत.

थोडक्यात, मिलराईट मेंन्टेनन्स यांत्रिक हा शिक्षकीय संवर्ग नाही आणि शिल्पनिदेशक संवर्गाशी समकक्षदेखील नाहीत. त्यामुळे या संवर्गास त्रिस्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याच्या मागणीशी समिती सहमत नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना मंजूर केली असून त्यामध्ये त्रुटी नाही.

भाग- ब

१) संचालक, प्रशिक्षण / संचालक, व्यवसाय शिक्षण

संघटनेचे अभिप्राय :- अतिरिक्त संचालक पदाचे पदोन्नतीचे पद आहे. विभागप्रमुख आहेत.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वरील भाग- अ) मधील अ.क्र.१ व २ येथील आणि खालील अ.क्र. ४ व ५ येथील पदांना केंद्र शासनाप्रमाणे ग्रेड वेतन वाढवून दिल्यास परिणामी याही पदांना संघटनेने मागणी केल्याप्रमाणे ग्रेड वेतन वाढविणे आवश्यक राहील.

संचालक, प्रशिक्षण / संचालक, व्यवसाय शिक्षण ही पदे गट-अ मधील पदोन्नतीची पदे असल्याने संघटनेच्या मागणीनुसार रु. १०००० ग्रेड वेतन मंजुरीची शिफारस आहे.

## समितीची शिफारस :-

वरील भाग- अ) मधील अ.क्र.१ येथील आणि खालील अ.क्र. ४ व ५ येथील संवर्गांच्या वेतनसंरचनेत कोणताही बदल सुचविलेला नाही. तसेच वरील भाग- अ) मधील अ.क्र.२ येथील संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेत बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्रस्तुत संवर्ग आणि गट-अ मधील इतर संवर्गांच्या वेतनसंरचनेत योग्य तो फरक आहे. या संवर्गास मंजूर केलेली सुधारित वेतनसंरचना ही राज्य सेवेतील विभाग प्रमुखांना मंजूर केलेल्या विविध वेतनसंरचनेपैकी उच्चतम वेतन संरचना आहे. तसेच मागणी केलेले ग्रेड वेतन रु.१०००० हे प्रशासकीय विभाग प्रमख असलेल्या सचिव संवर्गास मंजूर केले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गाच्या मागणीशी समिती सहमत नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे आणि त्यामध्ये त्रुटी नाही.

२) सह संचालक / अध्यक्ष, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

संघटनेचे अभिप्राय :- उप संचालक पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वरील भाग- अ) मधील अ.क्र.१ व २ येथील आणि खालील अ.क्र. ४ व ५ येथील पदांना केंद्र शासनाप्रमाणे ग्रेड वेतन वाढवून दिल्यास परिणामी याही पदांना संघटनेने मागणी केल्याप्रमाणे ग्रेड वेतन वाढविणे आवश्यक राहील.

सह संचालक / अध्यक्ष, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ ही पदे गट-अ मधील पदोन्नतीची पदे असल्याने संघटनेच्या मागणीनुसार रु. ८७०० ग्रेड वेतन मंजुरीची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

वरील भाग- अ) मधील अ.क्र.१ येथील आणि खालील अ.क्र. ४ व ५ येथील संवर्गांच्या वेतनसंरचनेत कोणताही बदल सुचविलेला नाही. तसेच वरील भाग- अ) मधील अ.क्र.२ येथील संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेत बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्रस्तुत संवर्ग आणि गट-अ मधील इतर संवर्गांच्या वेतनसंरचनेत योग्य तो फरक आहे. या संवर्गांना असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे आणि त्यामध्ये त्रुटी नाहीत.

३) उप संचालक / शिक्षणार्थी उप सल्लागार (वरिष्ठ)

संघटनेचे अभिप्राय :- गट-अ चे पदोन्नतीचे पद आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वरील भाग- अ) मधील अ.क्र.१ व २ येथील आणि खालील अ.क्र. ४ व ५ येथील पदांना केंद्र शासनाप्रमाणे ग्रेड वेतन वाढवून दिल्यास परिणामी याही पदांना संघटनेने मागणी केल्याप्रमाणे ग्रेड वेतन वाढविणे आवश्यक राहील.

उप संचालक / उप शिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ) ही पदे गट-अ मधील पदोन्नतीची पदे असल्याने संघटनेच्या मागणीनुसार रु. ७६०० ग्रेड वेतन मंजुरीची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

वरील भाग- अ) मधील अ.क्र.१ येथील आणि खालील अ.क्र. ४ व ५ येथील संवर्गांच्या वेतनसंरचनेत कोणताही बदल सुचविलेला नाही. तसेच वरील भाग- अ) मधील अ.क्र.२ येथील संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेत बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच प्रस्तुत संवर्ग हे गट -अ संवर्गाच्या पदोन्नतीचे संवर्ग असल्याने या संवर्गांना असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष रु.६६०० ऐवजी रु.६९०० इतके ग्रेड वेतन मंजूर केले आहे. या संवर्गांना योग्य वेतनसंरचना मंजूर केली असून त्यामध्ये त्रुटी नाहीत.

४) प्राचार्य, गट-अ/ जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी / शिक्षणार्थी उप सल्लागार / सहाय्यक संचालक / सचिव परीक्षा मंडळ / व्यवस्थापक, परिरक्षण पथक [व्यवस्थापक]

संघटनेचे अभिप्राय:- केंद्रीय वेतन आयोगाप्रमाणे शिक्षकीय पदे (केंद्रीय वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद - ३.८.२२)

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील माध्यमिक शिक्षकांना ज्या वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत त्याच वेतनश्रेण्या या संचालनालयातील शिक्षकीय पदांनादेखील मंजूर करण्याचे धोरण अवलंबिलेले असल्याने समान वेतन या धोरणानुसार शालेय शिक्षण विभागाप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे.

गट-अ (कनिष्ठ) पदावरील ग्रेड वेतन वाढविल्यास गट-अ पदाचेदेखील ग्रेड वेतन वाढविणे आवश्यक आहे. त्यानुसार ग्रेड वेतन रु.७६०० इतके वाढविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने या संवर्गांना केंद्र शासनाकडील संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गांच्या असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

शालेय शिक्षण विभागातील शिक्षकीय संवर्गांनादेखील केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. ही बाब तसेच केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्यासंदर्भात प्रकरण - २ परिच्छेद २.३.२ मधील विवेचन विचारात घेता या संवर्गांच्या मागणीशी समिती सहमत नाही. तसेच गट-अ (कनिष्ठ) संवर्गाच्या वेतनसंरचनेत कोणताही बदल सुचविलेला नसल्याने या संवर्गांच्या वेतनसंरचनेत बदल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

५) प्राचार्य / उप प्राचार्य, गट-अ (कनिष्ठ) / सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ) / मुख्याध्यापक / निरीक्षक / परीक्षा नियंत्रक / चर्मोद्योग विशेषज्ञ व अधीक्षक [चर्मतज्ञ-तथा-अधीक्षक]

संघटनेचे अभिप्राय :- केंद्रीय वेतन आयोगाप्रमाणे शिक्षकीय पदे ( केंद्रीय वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद - ३.८.२२).

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील माध्यमिक शिक्षकांना ज्या वेतनश्रेण्या मंजूर केलेल्या आहेत. त्याच वेतनश्रेण्या या संचालनालयातील शिक्षकीय पदांना देखील मंजूर करण्याचे धोरण अवलंबिलेले असल्याने समान वेतन या धोरणानुसार शालेय शिक्षण विभागाप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे.

गट-ब पदावरील ग्रेड वेतन वाढविल्यास गट-अ (क) पदाचेदेखील ग्रेड वेतन वाढविणे आवश्यक आहे. त्यानुसार रु.६६०० इतके ग्रेड वेतन वाढविण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने या संवर्गांना केंद्र शासनाकडील संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गांच्या असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

शालेय शिक्षण विभागातील शिक्षकीय संवर्गांनादेखील केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. ही बाब तसेच केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्यासंदर्भात प्रकरण - २ मधील परिच्छेद २.३.२ मधील विवेचन विचारात घेता या संवर्गांच्या मागणीशी समिती सहमत नाही. तसेच गट-ब संवर्गाच्या वेतनसंरचनेत कोणताही बदल सुचविलेला नसल्याने या संवर्गांच्या वेतनसंरचनेत बदल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

६) उप जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (अतां) / सहाय्यक संचालक (वरिष्ठ) (अतां) / उप सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई [उप सचिव, (अतां)]

संघटनेचे अभिप्राय :- गट-ब पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ही पदे खालील अ.क्र.७ येथे नमूद केलेल्या पदांच्या पदोन्नतीची पदे आहेत. त्या पदांना ग्रेड वेतन वाढवून दिल्यास याही पदांना संघटनेने मागणी केल्यानुसार रु. ५४०० ग्रेड वेतन देण्याची शिफारस आहे.

समितीची शिफारस :-

या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी व गट-अ दर्जा विचारात घेऊन राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशींनुसार योग्य वेतनसंरचना मंजूर केली आहे.

त्यामध्ये त्रुटी नाहीत. तसेच खालील अ.क्र.७ येथे नमूद केलेल्या संवर्गाच्या वेतनसंरचनेत कोणताही बदल सुचविलेला नसल्याने या संवर्गाच्या वेतनसंरचनेत बदल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

७) प्रबंधक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था / सहाय्यक संचालक (प्रशासन)(अतां), व्य. शि. व प्र. संचालनालय (खुद्द) व विभागीय कार्यालये [सहाय्यक संचालक, (अतां)] / सहाय्यक सचिव (अतां), महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, मुंबई

संघटनेचे अभिप्राय :- प्रशासकीय अधिकारी श्रेणी-२ (केंद्रीय वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद - ३.१.१४)

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-केंद्र शासनाकडील प्रशासकीय अधिकारी गट-ब संवर्गास केंद्र शासनाच्या सहाव्या वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद ३.१.१४ मध्ये नमूद केल्यानुसार संघटनेने रु.४८०० ग्रेड वेतनाची मागणी केली आहे.

केंद्र शासनाकडील प्रशासकीय अधिकारी गट-ब या पदांप्रमाणे संचालनालयातील सहाय्यक संचालक (प्रशासन) / प्रबंधक / सहाय्यक सचिव ही प्रशासकीय पदे आहेत आणि त्यांचा दर्जा, कर्तव्ये व जबाबदाऱ्या केंद्र शासनाकडील प्रशासकीय अधिकारी गट-ब पदाशी समान असल्याने या पदांना केंद्र शासनाकडील पदांना अनुज्ञेय ठरविलेले ग्रेड वेतन रु. ४८०० मंजूर करण्याची शिफारस आहे.

समितीची शिफारस :-

या संवर्गांना वेतन समानीकरण समितीने केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गाच्या तिसऱ्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्या विचारात घेऊन या संवर्गांना समकक्ष वेतनश्रेण्या मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार चौथ्या वेतन आयोगात व तदनंतर पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात या संवर्गास सुधारित वेतनश्रेण्या / वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

भाग-क

१) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तथा शिकाऊ उमेदवारी योजनेतील निदेशक (शिल्प निदेशक, गणित निदेशक, चित्रकला निदेशक, भाषा निदेशक, व्यवसाय निदेशक)

संघटनेचे अभिप्राय :- केंद्रीय कर्मचाऱ्यांना लागू असलेली वेतनश्रेणी महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र शासनाने डिसेंबर, १९७७ मध्ये घेतलेला आहे. त्या धोरणानुसार कार्यवाही होणे घटनात्मक आहे. महाराष्ट्र शासनाने शिक्षकीय पदधारकांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी लागू न केल्यामुळे घटनात्मक उल्लंघन ठरते, त्यामुळे महाराष्ट्रातील शिक्षकीय पदधारकांसह औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना लागू करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील माध्यमिक शिक्षकांना ज्या वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत त्याच वेतनश्रेण्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशक या शिक्षकीय पदांना देखील मंजूर करण्याचे धोरण अवलंबिले असल्याने समान वेतन या धोरणानुसार शालेय शिक्षण विभागाप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे.

तथापि संघटनेने केंद्र शासनाकडील वेतनसंरचनेप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांना ग्रेड वेतनाची मागणी केलेली आहे. या शिक्षकीय पदांना केंद्र शासनाच्या वेतनसंरचनेनुसार संघटनेने केलेल्या मागणीची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने या संवर्गांना केंद्र शासनाकडील संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तर या संवर्गाच्या कामाचे तांत्रिक स्वरुप व शैक्षणिक जबाबदारी विचारात घेऊन या संवर्गाच्या तिसऱ्या वेतन आयोगातील रु.३६५-७६० या वेतनश्रेणीशी समकक्ष असलेल्या रु.१४००-२३०० या वेतनश्रेणीपेक्षा तुलनेने उच्च रु.१४००-२६०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. तदनंतर या संवर्गांना वेळोवेळी त्रिस्तरीय वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत.

शालेय शिक्षण विभागातील शिक्षकीय संवर्गांना केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याचा प्रस्ताव त्या विभागाने समितीच्या विचारार्थ सादर केला होता. तथापि, या संवर्गांना केंद्र शासनाकडील संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. ही बाब तसेच केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्यासंदर्भात प्रकरण - २ मधील परिच्छेद २.३.२ मधील विवेचन विचारात घेता या संवर्गांच्या मागणीशी समिती सहमत नाही.

२) लघुलेखक निदेशक

संघटनेचे अभिप्राय :- लघुलेखक निदेशकांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९८८ नुसार रु.२०००-३२००, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ नुसार रु.६५००-१०५०० अशी वेतनश्रेणी होती. संबंधित पदधारकांना शिल्पनिदेशकांपेक्षा वरिष्ठ वेतन असणे गरजेचे आहे. संबंधित पद हे शिक्षकीय पद असल्याने त्यास त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करणे गरजेचे आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सदर पद पदोन्नतीचे पद असून कर्तव्ये व जबाबदारीनुसार पर्यवेक्षकीय पद आहे. त्याकरीता संघटनेने मागणी केल्यानुसार शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गास शिक्षकीय पद असल्याने त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी केली आहे. तथापि, वेतन समानीकरण समितीने हा संवर्ग शिक्षकीय संवर्ग ठरविलेला नाही. या संवर्गाच्या तिसऱ्या वेतन आयोगातील रु.६००-९५० या वेतनश्रेणीशी समकक्ष रु.२०००-३२०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस वेतन समानीकरण समितीने केली होती. त्यानुसार त्या संवर्गास चौथ्या आयोगात रु.२०००-३२०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. तद्नंतर चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात या संवर्गास सुधारित वेतनश्रेणी/वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

३) वसतिगृह अधीक्षक - नि - शारीरिक प्रशिक्षण निदेशक

संघटनेचे अभिप्राय :- महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीतील पृ.क्र. ३८२ वरील अ.क्र. ३३८ येथील माध्यमिक शाळेतील शारीरिक प्रशिक्षण निदेशकाप्रमाणे प्रथम समकक्ष ठरवून केंद्र शासनाकडील शिक्षकीय पदधारकांना असलेल्या वेतनसंरचनेप्रमाणे सुधारणा करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीतील पृ.क्र. ३८२ वरील अ.क्र. ३३८ येथील पदाशी समकक्षतेची तसेच केंद्रातील शिक्षकीय पदाप्रमाणे वेतनसंरचनेची मागणी केली आहे. सदर मागणी संयुक्तिक वाटत नाही.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गास माध्यमिक शाळेतील शारीरिक प्रशिक्षण निदेशकाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणीची मागणी केली आहे. वेतन समानीकरण समितीने या संवर्गास माध्यमिक शाळेतील शारीरिक प्रशिक्षण निदेशक संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तर या संवर्गाच्या जबाबदाऱ्या विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. या संवर्गाची तिसऱ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रु.३३५-६८० ही होती. या वेतनश्रेणीला चौथ्या आयोगात समकक्ष वेतनश्रेणी रु.१२००-२०४० ही असूनही या संवर्गास तुलनेने उच्च रु.१४००-२३०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली होती. तद्नंतर पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात या संवर्गास सुधारित वेतनश्रेणी/वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

भाग-ड

१) कार्यालयीन अधीक्षक / २) मुख्य लिपिक /प्रमुख लिपिक / लेखा परीक्षक / ३) वरिष्ठ लिपिक / टिप्पणी सहाय्यक / ४) कनिष्ठ लिपिक / ५) नाईक / लोहमुद्रक / रोनिओचालक / ६) शिपाई

संघटनेचे अभिप्राय :- व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात कार्यरत असलेल्या लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत वाढ करण्याचा प्रश्न बऱ्याच कालावधीपासून शासनस्तरावर रेंगाळत आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचा मुख्य उद्देश हा केंद्र शासन पुरस्कृत शिल्पकारागीर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन उद्योगधंद्यांना आवश्यक असणारे कुशल /अर्धकुशल मनुष्यबळ तयार करणे हा आहे व त्यानुषंगाने केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मानकांनुसार कर्मचाऱ्यांची पदे निर्माण केली जातात. सद्य:स्थितीत संचालनालयामध्ये कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, मुख्य लिपिक व कार्यालय अधीक्षक असा आकृतीबंध (स्टाफींग पॅटर्न ) आहे.

१) महाराष्ट्र शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार प्रसिध्द केलेली शासकीय अधिसूचना क्र. वेपुर-१२९८/सीआर-१३ / ९८ /सेवा-१०, दि.१०.१२.१९९८ चे अवलोकन केल्यास महसूल विभागातील लिपिक कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील लिपिक कर्मचाऱ्यांपेक्षा जास्त असल्याचे दिसून येईल.

२) राज्य वेतन सुधारणा समितीच्या अहवालाच्या भाग-१ मधील शिफारशींनुसार महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेपुर-१२९८/प्र.क्र.१५ /९८ /सेवा-१०, दि.३१.१०.१९९८ सोबतच्या जोडपत्र-अ मधील अ.क्र. १३ येथे महसूल व वन विभागाच्या लेखापाल - वेतनश्रेणी रु.१२००-२०४० व मुख्य लिपिक - वेतनश्रेणी रु.१४००-२६०० (चौथ्या आयोगाच्या शिफारशींनुसार असुधारित वेतनश्रेणी) या पदांचे पदनाम बदलून त्यांना दि.१.१.१९८६ पासून सुधारित वेतनश्रेण्या लागू केलेल्या आहेत. लेखापाल - वेतनश्रेणी रु.१४००-२३०० व मुख्य लिपिक - वेतनश्रेणी रु.१६००-२६६० (पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या अनुक्रमे रु. ४५००-७००० व रु. ५५००-९०००)

३) उपरोक्त दोन विभागांतील कर्मचाऱ्यांप्रमाणेच विक्रीकर विभागातील कर्मचारी व मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीदेखील खालीलप्रमाणे आहेत.

सहायक (टिप्पणी सहाय्यक, वरिष्ठ लिपिक) - वेतनश्रेणी रु.५५००-९०००

कक्ष अधिकारी (कार्यालय अधीक्षक) - वेतनश्रेणी रु.६५००-१०५००

४) जिल्हा परिषद सेवेतील गट-क मधील ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी या पदांच्या वेतनश्रेण्यादेखील शासन निर्णय क्र. डीएसआर - २००८ / प्र.क्र.८० / आस्था-५, दि.२३.९.२००८ अन्वये पुढीलप्रमाणे वाढविण्यात आल्या आहेत.

अ) ग्राम विकास अधिकारी - वेतनश्रेणी रु.४०००-६००० पुन:सुधारित वेतनश्रेणी -
रु.४५००-७००० + रु.२०० विशेष वेतन

ब) ग्रामसेवक - वेतनश्रेणी रु. ४०००-६००० व सात वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी -
रु.४५००-७०००

५) राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच भारत सरकारच्या कंपनी अफेअर मंत्रालयाच्या दि.२८.२.२००३ रोजीच्या ज्ञापनामध्ये (मेमोरँडम) लिपिक कर्मचाऱ्यांना दि.१.१.१९९६ पासून पुढीलप्रमाणे पुन:सुधारित वेतनश्रेण्या लागू केलेल्या आहेत.

लेखापाल / वरिष्ठ लिपिक रु.४५००-७०००

लेखा परिक्षक रु.५५००-९०००

कार्यालय अधीक्षक रु.६५००-१०५००

याच विभागातील शिल्पनिदेशकांच्या वेतनाचा विचार केला तरीही असे दिसते की, सन १९६६ पूर्वी निदेशकांचे वेतन रु.१३०-२७० होते. तर टिप्पणी सहाय्यक / वरिष्ठ लिपिकांची वेतनश्रेणी रु.१४५-२४५ अशी होती. तर दि.१.४.१९६६ रोजी निदेशकांचे वेतन रु.१३५-२९० व वरिष्ठ लिपिकांचे वेतन रु.१५०-३०० होते. तथापि, तद्नंतर आजपर्यंत त्यांच्या वेतनात वाढ होऊन आजमितीस त्यांचे वेतन रु.५५००-९००० झाले तर वरिष्ठ लिपिकांचे वेतन रु.४०००-६००० इतकेच राहिले याचाही विचार होणे आवश्यक आहे.

याप्रमाणे राज्य व केंद्र शासनाच्या निरनिराळ्या विभागांतील लिपिक कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचे स्वरुप एकच असूनही वेगवेगळ्या वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत.

वर नमूद केलेल्या विभागांतील लिपिक कर्मचाऱ्यांचा व या विभागातील कर्मचाऱ्यांच्या कामाचा अथवा कामाच्या स्वरुपाचा विचार केला तर कामाचे स्वरुप सारखेच आहे. परंतु या विभागातील लिपिक कर्मचाऱ्यांचा कामाचा विचार केला तर तो निश्चितच इतर विभागांतील लिपिक कर्मचाऱ्यांच्या कामापेक्षा जास्त असल्याने त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण पडत असतो.

मुळातच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण हा विभाग तांत्रिक विभाग असून त्यातील कामाचे स्वरुपही भिन्न आहे. परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार या विभागाकडे केंद्र शासन पुरस्कृत शिल्पकारागीर योजनेची अंमलबजावणी करणे हे मुख्य काम आहे व त्यानुषंगानेच लिपिक कर्मचाऱ्यांची पदे निर्माण केली आहेत. तथापि, शासनाने आढावा घेताना केंद्र शासनाची मानके विचारात न घेता नवीन मानके तयार करुन लिपिक कर्मचाऱ्यांच्या पदसंख्येत कपात केली आहे. त्यामुळे सदर कर्मचारी शिल्पकारागीर योजना राबविण्यासाठीदेखील कमी पडतात. असे असूनही या विभागाकडे सदर योजनेव्यतिरिक्त अन्य योजना सुरु आहेत. त्या अशा - १) एव्हीटीएस २) शिकाऊ उमेदवारी योजना ३) लोक सेवा केंद्र ४) उत्पादनाभिमुख प्रशिक्षण योजना ५) आय.एम.सी. ६) मागेल त्याला प्रशिक्षण ७) सेंटर ऑफ एक्सलन्स ८) इन्स्टीट्युट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम ९) अंशकालीन सायंवर्ग १०) आदिवासी योजनांतर्गत सार्वत्रिकरण योजना ११) पी.पी.पी. १२) एम. इ. एस. या व्यतिरिक्त समाजकल्याण विभागांतर्गत चालविली जात असलेली अनुसूचित जातींमधील विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था. वरील योजना राबवितांना नवीन पदे निर्माण केली नसल्याने कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या कामाव्यतिरिक्त उक्त योजनांची अतिरिक्त कामे करावी लागतात. त्यामुळे कर्मचारी कामाच्या प्रचंड भाराखाली दबला गेला आहे. तरीही केवळ लोकसेवक या नात्याने सदर योजनांची कामे करुन त्या मधून शासनास महसूल देखील मिळवून दिला जात असतो. मुळातच सदर विभाग हा तांत्रिक असल्याने लिपिक कर्मचाऱ्यांनादेखील तांत्रिक स्वरुपाची कामे करावी लागतात. उदा. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया, परिक्षा, अ, ब, क, ड दर्जानिहाय निरीक्षण अहवाल तयार करणे, तांत्रिक निरीक्षणाबाबत अहवाल तयार करणे, संस्थेच्या अथवा नवीन व्यवसायाच्या संलग्नतेचा (ॲफिलिएशनचा) अहवाल तयार करुन सादर करणे तसेच शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत एटीएस १ ते ५ तयार करणे इत्यादी.

या विभागांतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच शासकीय तंत्र माध्यमिक शाळा या मुख्य योजनांखाली विविध योजना राबविल्या जातात. या योजना राबविताना लिपिक संवर्ग हा प्रशासकीय यंत्रणेचा कणा आहे. शासनाच्या योजनांनुसार पदांच्या संख्येत वाढ झालेली नाही. तथापि, कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. व्यवसाय शिक्षण विभाग हा तांत्रिक स्वरुपाचा असल्याने प्रत्येक कर्मचाऱ्याला तांत्रिक / व्यावसायिक स्वरुपाचे ज्ञान असणे आवश्यक असते. तसेच प्रत्येक प्रकरण तपासताना तांत्रिक बाबींचा विचार करावा लागतो. कर्मचाऱ्यांना काम करताना स्वतः निर्णय घेऊन तांत्रिक, प्रशासकीय बाबींचा सर्वंकष विचार करुन टिप्पणी व मसुदा लेखन करुन प्रकरण सत्वर निकाली काढण्याविषयी कार्यवाही करणे आवश्यक असते. कर्मचाऱ्यांना विविध प्रकारची कामे करावी लागत असल्यामुळे त्यांना नियमांचीदेखील सखोल माहिती करुन घ्यावी लागते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, विक्रीकर विभाग, लोक आयुक्त कार्यालय तसेच मंत्रालयातील लिपिक संवर्गास मिळणाऱ्या वेतनश्रेण्या व या विभागातील लिपिकांच्या वेतनश्रेण्या यामध्ये जास्त तफावत आहे. कामाचा विचार केला तर त्या कर्मचाऱ्यांपेक्षाही व्यवसाय शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना जास्त वेळ देऊन व वेगळ्या पध्दतीची प्रशासकीय (तांत्रिक स्वरुपाची) कामे करावी लागतात.

वरील बाबींचा सर्वंकष विचार करता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागातील लिपिक संवर्गाच्या पदनामात बदल करुन त्यानुषंगाने त्यांच्या वेतनातदेखील वाढ होणे गरजेचे आहे.

शासनास विनंती करण्यात येते की, वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन व्यवसाय शिक्षण विभागातील लिपिक कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील असमानतेची त्रुटी दूर करुन त्यांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर करावी जेणेकरुन त्यांच्यावरील अन्याय दूर होईल. सुधारित वेतनश्रेणी लागू झाल्यास विभागातील अल्प लिपिक कर्मचारी संख्येचा विचार करता शासनावर त्याचा निश्चितच जास्त आर्थिक भार पडणार नाही.

तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी हे संचालनालयातील प्रशासकीय व तांत्रिक काम करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांना मदत करतात. गट-ड मधील पदांबाबत येथे असे नमूद करण्यात येते की, नागरी संरक्षण संचालनालयातील 'टपाल वाहक' या पदाचा सुधारित वेतनबँड रु.५२००-२०२०० असून ग्रेड वेतन रु.१८०० आहे. वास्तविक या संचालनालयामधील 'ड' गटातील कर्मचारी टपाल वाहकाचे काम करीत असून त्यांना तांत्रिक स्वरुपाच्या कामाचीही माहिती आहे. तसेच प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्था /शासकीय तांत्रिक माध्यमिक शाळांमध्ये ते सर्व प्रकारची कामे करीत असतात. 'ड' वर्गातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेमुळे पदोन्नतीच्या संधी अत्यल्प असल्याने त्यांच्या वेतनसंरचनेत सुधारणा होणे आवश्यक आहे.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** संघटनेच्या समर्थनाशी सहमत आहे. करिता, शिफारस करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u> :-**

१) कार्यालयीन अधीक्षक

२) मुख्य लिपिक / प्रमुख लिपिक / लेखा परीक्षक

३) वरिष्ठ लिपिक / टिप्पणी सहाय्यक

४) कनिष्ठ लिपिक

वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

५) नाईक / लोहमुद्रक / रोनिओचालक

६) शिपाई

वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण गट-ड मधील संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील गट-ड मधील संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

## ३.७ (ब) - उच्च व तंत्र शिक्षण विभाग (अकृषि विद्यापीठे)

**प्रस्तावाचा सारांश**

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| १ | सहाय्यक कुलसचिव / सहाय्यक कुलसचिव (लेखा) / (लेखापरीक्षा), मुंबई विद्यापीठ, मुंबई / पुणे विद्यापीठ, पुणे / डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर / शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर / स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड / श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई / संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती / उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव / सोलापूर विद्यापीठ, सोलापूर / कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक / यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | ८०००-१३५०० | ९३००-३४८०० | ५,४०० | १५६००-३९१०० | ६,६०० |

<u>संघटनेचे अभिप्राय :-</u> डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे मधील सहायक कुलसचिव (वरिष्ठ श्रेणी ) या पदास ( शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण २००९/

(३२६/०९) /विशि-१, दि.७ ऑक्टोबर, २००९ सोबतच्या अनुसूचीतील अ.क्र.३२ / शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.सवेआ २००९/(१४०/०९)/तांशि-२, दि.७ मे, २०१० सोबतच्या प्रपत्रातील अ.क्र.५ ) वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे.

वास्तविक सहायक कुलसचिव हे पद गट- अ श्रेणीतील व अधिव्याख्याता (Lecturer) ह्या पदास समकक्ष पद म्हणून शासनमान्य असल्याने ह्या पदास वेतनबॅण्ड रु. १५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्र. मआवि/२००९/ प्र.क्र.१२९/०९, शिक्षण-१, दि.५ मार्च, २०१० अन्वये सहाय्यक कुलसचिव ह्या पदास वेतनबॅण्ड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे.

'समान अर्हता, समान काम, समान वेतन' ह्या सुत्रानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठामधील सहाय्यक कुलसचिव (वरिष्ठ श्रेणी) या पदासाठी लागू असलेली वेतनसंरचना वेतनबॅण्ड रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन अन्य सर्व विद्यापीठांमधील पदांना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करण्यास विभागाची शिफारस आहे.

समितीची शिफारस :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठामध्ये सहाय्यक कुलसचिव (वरिष्ठ श्रेणी) आणि सहाय्यक कुलसचिव (कनिष्ठ श्रेणी) असे दोन संवर्ग आहेत. प्रस्तुत सहाय्यक कुलसचिव आणि सहाय्यक कुलसचिव (वरिष्ठ श्रेणी) हे दोन संवर्ग तुलनीय / समकक्ष नाहीत. त्यामुळे प्रस्तुत संवर्गांना वेतनबॅण्ड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय ठरत नाही.

तथापि, प्रस्तुत संवर्गांची असुधारित वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० होती. या वेतनश्रेणीसाठी अहवालातील प्रकरण-२ परिच्छेद २.२.८ मध्ये विवेचन केल्यानुसार इतर संवर्गांप्रमाणे वेतनबॅण्ड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेची शिफारस करण्यात येत आहे.

# ३.८ - गृह विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) पोलीस महासंचालक | | | | | |
| १ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ५२००-२०२०० | ३००० |
| २ | पोलीस हवालदार | ४०००-६००० (अधिक विशेष वेतन रू.५००) | ५२००-२०२०० (अधिक विशेष वेतन रू.५००) | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| ३ | पोलीस नाईक | ४०००-६००० (अधिक विशेष वेतन रू.२००) | ५२००-२०२०० (अधिक विशेष वेतन रू.२००) | २४०० | ५२००-२०२०० | २६०० |
| ४ | पोलीस शिपाई | ३२००-४९०० (अधिक विशेष वेतन रू.५००) | ५२००-२०२०० (अधिक विशेष वेतन रू.५००) | २००० | ५२००-२०२०० | २४०० |
| ५ | पोलीस महानिरीक्षकांचे उप सहाय्यक | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ६ | वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | ९३००-३४८०० | ५००० |
| ७ | वरिष्ठ कार्यालय अधीक्षक / प्रशासकीय अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| ८ | कार्यालय अधीक्षक (राजपत्रित) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| ९ | कार्यालय अधीक्षक (अराजपत्रित) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| १० | मुख्य लिपिक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ११ | वरिष्ठ श्रेणी लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | कनिष्ठ श्रेणी लिपिक | ३०५०-४५९० (अधिक रोख रक्कम हाताळण्यासाठी विशेष वेतन) | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २२०० |
| | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | | | | | |
| १३ | पोलीस निरीक्षक | ७४५०-११५०० (अधिक विशेष वेतन रु.४०० - दोन पदांसाठी, रु.३२० - आठ पदांसाठी, रु.३०० - दोनशे चौसष्ठ पदांसाठी, रु.२०० - एकवीस पदांसाठी, रु.१८०- एकशे एक्केचाळीस पदांसाठी, रु.१२० - एकतिस पदांसाठी, रु.८० - एकवीस पदांसाठी) | ९३००-३४८०० | ५००० | १५६००-३९१०० | ५००० |
| १४ | वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | ९३००-३४८०० | ५००० |
| १५ | प्रशासकीय अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| १६ | कार्यालय अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| १७ | मुख्य लिपिक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| १८ | वरिष्ठश्रेणी लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| १९ | कनिष्ठश्रेणी लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २२०० |
| | गुन्हे अन्वेषण विभाग | | | | | |
| २० | मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २१ | अपर मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २२ | शासकीय दस्तऐवज परीक्षक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५००० |
| २३ | सहाय्यक दस्तऐवज परीक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४३०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ब) नागरी संरक्षण संचालनालय | | | | | |
| १ | उपनियंत्रण अधिकारी | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ५२००-२०२०० | २८०० |
| २ | अग्निशामक / प्रमुख विमोचक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २००० | ५२००-२०२०० | २४०० |
| ३ | अग्निशामक / विमोचक | ३०५०-४५९० (अधिक विशेष वेतन रु.८० ) | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | १९०० + समुचित विशेष वेतन |
| | क) सरकारी अभियोग संचालनालय | | | | | |
| १ | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ५००० | १५६००-३९१०० | ५००० |
| | ड) परिवहन विभाग | | | | | |
| १ | अपर परिवहन आयुक्त | १४३००-१८३०० | ३७४००-६७००० | ८७०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| २ | परिवहन सह आयुक्त | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| ३ | परिवहन उप आयुक्त (उच्च श्रेणी) | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६९०० | ३७४००-६७००० | ७९०० |
| ४ | प्रादेशिक परिवहन अधिकारी | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ५ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४८०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ६ | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५७०० |
| ७ | मोटार वाहन निरीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४५०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| | इ) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क | | | | | |
| १ | अपर आयुक्त | १४३००-१८३०० | ३७४००-६७००० | ८७०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| २ | सह आयुक्त | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| ३ | उप.आयुक्त | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ४ | अधीक्षक | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ५ | उप अधीक्षक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५००० |
| ६ | निरीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ५००० |
| ७ | दुय्यम निरीक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ८ | पेट्टी अधिकारी (सहाय्यक दुय्यम निरीक्षक ) | ३०५०-४५९० (अधिक विशेष वेतन रु.१५० ) | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० (अधिक विशेष वेतन ५००) | २४०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | जवान (कॉन्स्टेबल) | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० (अधिक विशेष वेतन ५००) | २००० |
| १० | शिपाई - चालक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० (अधिक विशेष वेतन ५००) | २००० |
| | फ) कारागृह महानिरीक्षक, पुणे | | | | | |
| १ | उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | तुरुंग अधिकारी श्रेणी-१ | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ५००० |
| ३ | तुरुंग अधिकारी श्रेणी-२ | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० (अधिक विशेष वेतन रु.२५०/-) | ४३०० |
| ४ | कारागृह हवालदार | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० (अधिक विशेष वेतन रु.५००/-) | २४०० |
| ५ | कारागृह शिपाई | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० (अधिक विशेष वेतन रु.५००/-) | २००० |

अ) पोलीस महासंचालक

१) सहाय्यक पोलीस उप निरीक्षक

संघटनेचे अभिप्राय :- पोलीस सेवेतील कर्मचाऱ्यांची संघटना नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पद हे पोलीस हवालदार या पदाचे पदोन्नतीचे पद आहे. या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना तपासकामी नेमण्यात येते. केंद्र शासनाच्या पोलीस दलात या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे तपासकाम दिले जात नाही. महाराष्ट्र पोलीस दलातील या पदाला जास्त जबाबदारीचे काम असल्यामुळे, तसेच पोलीस हवालदार पदाचे पुढील पदोन्नतीचे पद असल्याने आणि सहाय्यक पोलीस उप निरीक्षकाचे विद्यमान मूळ वेतन आणि सहाव्या वेतन आयोगानुसार अपेक्षित मूळ वेतन यामधील फरक फारच अल्प असल्याने त्यांच्या कर्तव्याच्या दृष्टीने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत रु.३००० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

२) पोलीस हवालदार

संघटनेचे अभिप्राय :- पोलीस सेवेतील कर्मचाऱ्यांची संघटना नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पद हे पोलीस नाईक या पदाचे पदोन्नतीचे पद आहे. सध्या पोलीस नाईक आणि पोलीस हवालदार यांची वेतनसंरचना एकच असून त्यांच्या कर्तव्यानुसार विशेष वेतनाची तरतूद करण्यात आली आहे. या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना तपासकामी नेमण्यात येते. केंद्र शासनाच्या पोलीस दलात या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे तपासकाम दिले जात नाही. महाराष्ट्र पोलीस दलातील या पदाला जास्त जबाबदारीचे काम असल्याने आणि पोलीस हवालदारांचे विद्यमान मूळ वेतन आणि सहाव्या वेतन आयोगानुसार अपेक्षित मूळ वेतन यामधील फरक फारच अल्प असल्याने त्यांच्या कर्तव्याच्या दृष्टीने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत रु.२८०० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

३) पोलीस नाईक

संघटनेचे अभिप्राय :- पोलीस सेवेतील कर्मचाऱ्यांची संघटना नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पद हे फक्त महाराष्ट्र राज्य पोलीस दलातच असून पोलीस शिपाई पदाचे पदोन्नतीचे पद आहे. तसेच हे पद केंद्र शासनाच्या कोणत्याही संरक्षण दलात अस्तित्वात नाही. सबब पोलीस शिपायांचे ग्रेड वेतन वाढविले असल्याने या पदालाही त्या अनुषंगाने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत रु.२६०० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

४) पोलीस शिपाई

संघटनेचे अभिप्राय :- पोलीस सेवेतील कर्मचाऱ्यांची संघटना नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- महाराष्ट्र राज्यातील पोलीस शिपायाची वेतनसंरचना ही केंद्र शासनाच्या पोलीस शिपायांपेक्षा उच्चतम आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या अखत्यारीतील पोलीस शिपायांच्या वेतनसंरचनानुसार महाराष्ट्र राज्यातील पोलीसांना वेतनसंरचना द्यावयाची ठरविल्यास त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. पोलीस दलातील उच्च पदावरील म्हणजेच पोलीस अधीक्षक आणि त्यावरील पदांच्या विद्यमान वेतनश्रेणी आणि सहाव्या वेतन आयोगानुसार अपेक्षित वेतनसंरचना यामधील फरक फारच मोठा आहे. त्यामानाने पोलीस शिपायांचे विद्यमान मूळ वेतन आणि सहाव्या वेतन आयोगानुसार अपेक्षित मूळ वेतन यामधील फरक फारच अल्प आहे. त्यामुळे त्यांच्या विहित कालावधीपेक्षा (Duty hours) अधिक काळ कराव्या लागणाऱ्या कर्तव्याचा विचार करता त्यांच्या मनात कोणताही किंतू निर्माण होऊ नये म्हणून त्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत किमान रु.२४०० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u>

१) सहाय्यक पोलीस उप निरीक्षक

२) पोलीस हवालदार

३) पोलीस नाईक

४) पोलीस शिपाई

| पोलीस संवर्गांच्या वेतनश्रेण्या | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | पदनाम | तिसरा वेतन आयोग वेतनश्रेणी (रुपये) | चौथा वेतन आयोग वेतनश्रेणी (रुपये) | पाचवा वेतन आयोग वेतनश्रेणी (रुपये) | सहावा वेतन आयोग | |
| | | | | | वेतनबँड (रुपये) | ग्रेड वेतन (रुपये) |
| १ | पोलीस शिपाई | २२०-३७५ | १) ८२५-१२००<br>*२) ९५०-१४००+ विशिष्ट पदांना* विशेष वेतन *रु.१६ ते रु.५०*<br>*( पुन:सुधारित)* | १) ३०५०-४५९० + विशिष्ट पदांना विशेष वेतन रु.३५ ते रु.१००<br>*२) ३२००-४९००* + विशेष वेतन *रु.५००*<br>*( पुन:सुधारित)* | ५,२००-२०२०० | २,००० + विशेष वेतन रु. ५०० |
| २ | पोलीस नाईक | --- | १२००-१८०० | १) ४०००-६०००<br>*२) ४०००-६००० + वि.वे.रु.२००*<br>*( पुन:सुधारित)* | ५,२००-२०२०० | २,४०० + विशेष वेतन रु.२०० |
| ३ | पोलीस हवालदार | २६०-४९५ | १) ९७५-१६६०<br>*२) १३२०-२०४०*<br>*( पुन:सुधारित)* | १) ४०००-६००० +वि.वे.रु.२००<br>*२) ४०००-६०००* + विशेष वेतन *रु.५००*<br>*( पुन:सुधारित)* | ५,२००-२०२०० | २,४०० + विशेष वेतन रु.५०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक | २६०-४९५ | १) १३२०-२०४० २) *१४००-२३०० + विशिष्ट पदांना* विशेष वेतन *रु.३० ते रु.१२५ ( पुन:सुधारित)* | ४५००-७००० | ५,२००-२०२०० | २,८०० |

वेतन समानीकरण समितीने ( चौथा वेतन आयोग ) पोलीस नाईक वगळता वरील सर्व संवर्गांना केंद्र शासनाकडील अनुक्रमे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस शिपाई या संवर्गांप्रमाणे वेतनश्रेण्या मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गांना चौथ्या वेतन आयोगात वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. पोलीस नाईक हा संवर्ग राज्य शासनाकडे नव्हता. केंद्र शासनाकडे चौथ्या वेतन आयोगात पोलीस नाईक संवर्गास रु.९५०-१४०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. मात्र, तद्नंतर राज्य शासनाकडे हा संवर्ग रु. १२००-१८०० या तुलनेने उच्च वेतनश्रेणीत निर्माण करण्यात आला आहे.

चौथा वेतन आयोगानुसार वेतनश्रेण्या मंजूर केल्यानंतर सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार,पोलीस शिपाई या संवर्गांच्या वेतनश्रेण्या पुन:सुधारित केल्या होत्या. तसेच पाचव्या वेतन आयोगात शासन निर्णय, गृह विभाग क्र.पीएए-०३०५/प्र.क.११०/पोल-५अ, दि.१९ एप्रिल, २००७ अन्वये पोलीस शिपाई संवर्गास रु.३०५०-४५९० या वेतनश्रेणीऐवजी रु.३२००-४९०० अधिक विशेष वेतन रु. ५०० ही पुन:सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे तर पोलीस नाईक व पोलीस हवालदार संवर्गांना अनुक्रमे रु. २०० व रु. ५०० विशेष वेतन मंजूर केले आहे.

सहाव्या वेतन आयोगात राज्य शासनाकडील सर्वच संवर्गांची विशेष वेतने बंद केली आहेत. मात्र, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांच्या कर्तव्यांचे स्वरूप विचारात घेऊन त्यांची विशेष वेतने पुढे चालू ठेवण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ची शिफारस (अहवाल परिच्छेद- ३.२५.२ ) स्वीकारुन त्यांची विशेष वेतने पुढे चालू ठेवली आहेत.

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार व पोलीस शिपाई या संवर्गांच्या पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्या केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गांपेक्षा एक टप्पा उच्च होत्या व वेतनश्रेण्यांनुसार या संवर्गांना सहाव्या वेतन आयोगात समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. सहाव्या वेतन आयोगात केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गांना समकक्षतेपेक्षा एक टप्पा उच्च सुधारित वेतनसंरचना मंजूर केल्याने केंद्र आणि राज्य शासनाकडील संवर्गांची सुधारित वेतनसंरचना समान झाली आहे आणि राज्य शासनाकडील संवर्गांना विशेष वेतनेदेखील अनुज्ञेय आहेत.

थोडक्यात, वरील विवेचनावरून असे दिसून येते की, प्रस्तुत संवर्गांच्या वेतनश्रेण्यांमध्ये चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगांदरम्यान मध्यावधी सुधारणा केल्या आहेत.कोणत्याही संवर्गास केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. मात्र, प्रस्तुत संवर्गांच्या यापूर्वीच्या मध्यावधी वेतन सुधारणांमुळे त्यांची वेतनसंरचना केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गांच्या सुधारित वेतनसंरचना समान झाली असून त्यांना विशेष वेतनाचा लाभदेखील मिळत आहे. त्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

काही विशिष्ठ संवर्गांच्या बाबतीत समितीने त्या संवर्गांच्या ग्रेड वेतनाच्या २०% इतके विशेष वेतन मंजूर करण्याची शिफारस केली आहे. याच तत्त्वानुसार, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई संवर्गांची विशेष वेतने पुढे चालू ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे. पोलीस शिपाई संवर्गाचे विशेष वेतन रु.५०० हे त्या संवर्गाच्या रु.२००० ग्रेड वेतनाच्या २०% रक्कमेपेक्षा (रु.४००) अधिक आहे. त्यामुळे त्यात बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. पोलीस नाईक संवर्गास त्या संवर्गाच्या ग्रेड वेतनाच्या २०% विशेष वेतन मंजूर करण्यात यावे.

पोलीस हवालदार व पोलीस नाईक संवर्गास रु.४०००-६००० ही एकच असुधारित वेतनश्रेणी मंजूर केलेली असल्याने पोलीस हवालदार संवर्गास रु.५०० विशेष वेतन मंजूर केले होते. सहाव्या वेतन आयोगात या दोन्ही संवर्गास एकच वेतनसंरचना मंजूर केली आहे. पदोन्नतीच्या आणि निम्न पदाच्या वेतनसंरचनेमध्ये फरक ठेवण्यासाठी पदोन्नतीच्या पदास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ची शिफारस (अहवाल-परिच्छेद ३.७.२) शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार पोलीस हवालदार या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची कार्यवाही प्रशासकीय विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने करावी. या संवर्गाचे विशेष वेतन रु.५०० हे त्या संवर्गाच्या रु.२४०० ग्रेड वेतनाच्या २०% रक्कमेपेक्षा (रु.४८०) अधिक आहे. त्यामुळे त्यात बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

५) पोलीस महानिरीक्षकांचे उप सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय:- पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहाय्यक हे पद केंद्र शासनाच्या कोणत्याही पोलीस विभागात अस्तित्वात नाही. परंतु हे पद पोलीस महासंचालक कार्यालयात अस्तित्वात असून त्या पदांपैकी काही पदे सन १९६२ पासून निर्माण करण्यात आली आहेत. पोलीस महासंचालक कार्यालयातील तत्कालिन पोलीस महानिरीक्षक यांच्या कार्यालयातील प्रशासकीय कामकाज पाहण्यासाठी प्रस्तुत पदाची निर्मिती करण्यात आली होती. सदर पदाच्या कार्यप्रणालीचा आणि वेतनश्रेणीचा विचार करता या पदाची वेतनश्रेणी पोलीस दलातील अन्य समकक्ष कार्यकारी अधिकाऱ्यांपेक्षा चौथ्या वेतन आयोगापर्यंत वरिष्ठतम होती. परंतु पाचव्या वेतन आयोगात या पदाच्या वेतनश्रेणीचा कोणत्याही प्रकारे विचार न करता त्या वेतनश्रेणी गट-ब पदाच्या दर्जामध्ये बसविण्यात आल्या. वास्तविक पहाता ती पदे गट-अ मध्ये समाविष्ट करुन त्यानुसार त्यांच्या वेतनश्रेणी सुधारित करणे आवश्यक होते. कारण त्या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना कमीत कमी चार व जास्तीत जास्त दहा कार्यासनातील प्रकरणे हाताळावी लागतात. या अधिकाऱ्यांकडे त्यांच्या अधिपत्याखालील कार्यासनांच्या कामगिरीचे पर्यवेक्षण करणे, तेथील माहितीविषयक कामाचा आढावा सादर करणे, दिवाणी स्वरुपाची पोलीस विभागातील महत्वाची धोरणात्मक प्रकरणे हाताळणे, पोलीस दलाच्या पुनर्रचनेबाबत विचार विनिमय करुन वरिष्ठ अधिकाऱ्यांना सहाय्य करणे व याशिवाय काही गोपनीय स्वरुपाची कामे पार पाडणे अशा प्रकारची विविधांगी कामे त्या अधिकाऱ्यांना करावी लागतात. म्हणजेच मंत्रालयातील उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीनुसार पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहाय्यक यांना तशी कामे करावी लागतात. येथे असेही निदर्शनास आणण्यात येते की, हे अधिकारी ज्या कक्ष अधिकाऱ्यांवर पर्यवेक्षण करतात ते अधिकारीदेखील राजपत्रित ब वर्गातील आहेत. या प्रकरणी पोलीस महासंचालक यांनी पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहाय्यक पदाचा दर्जा गट-अ करण्याबाबत शासनाच्या गृह विभागासही प्रस्ताव सादर केला आहे. त्यामुळे या पदावरील अधिकाऱ्यांचा दर्जा व वेतनसंरचना प्रस्तावित वेतनसंरचनेनुसार उंचावणे आवश्यक आहे. म्हणून त्यांची वेतनसंरचना वाढीव दराने प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

६) वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- सदर पद हे केंद्र शासनाच्या कोणत्याही पोलीस विभागात अस्तित्वात नाही. परंतु पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांच्या आस्थापनेवर प्रशासकीय कामकाज पाहण्यासाठी हे पद निर्माण करण्यात आले आहे. सदर पदाच्या कार्यप्रणालीचा विचार करता या पदाची वेतनश्रेणी सुधारित करणे आवश्यक होते. कारण पोलीस दलातील कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांची सेवाविषयक सर्व कामे हाताळावी लागतात. तसेच पोलीस बळाच्या संख्येनुसार आहरण आणि संवितरण अधिकारी म्हणूनही कोट्यवधी रुपयांची प्रकरणे हाताळावी लागतात. त्याचबरोबर त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पर्यवेक्षण करुन मार्गदर्शन करणे आवश्यक असते. तसेच इतर कर्मचारी किंवा व्यक्तिंकडून येणाऱ्या तक्रारींचे निवारण व विभागप्रमुखांशी कार्यालयातील अडीअडचणी तसेच पोलीस दलाच्या पुनर्रचनेबाबत विचारविनिमय करावा लागतो. सबब त्यांना तशी कामे करावी लागतात. अशी कामे अन्य

कोणत्याही विभागात करावी लागत नाहीत. त्यामुळे या पदावरील अधिकाऱ्यांचा दर्जा व वेतनसंरचना प्रस्तावित वेतनसंरचनेनुसार उंचावणे आवश्यक आहे. म्हणून त्यांचे ग्रेड वेतन रु.५००० इतके करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

७) वरिष्ठ कार्यालय अधीक्षक / प्रशासकीय अधिकारी / ८) कार्यालय अधीक्षक (राजपत्रित)

संघटनेचे अभिप्राय:- या पदांवर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना पोलीस भरतीबाबतचे कामकाज हाताळावे लागते; ज्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासारखी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही. याव्यतिरिक्त पोलीस दलातील कायदा व सुव्यवस्थेबाबतची कामे / प्रकरणे हाताळावी लागतात. त्याचबरोबर त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीव्यतिरिक्त अन्य विविध कायद्यांचे ज्ञानही असणे आवश्यक असते. कारण त्यानुषंगानेही या अधिकाऱ्यांना कामे हाताळावी लागतात. पोलीस विभागातील पोलीस संख्याबळाचा विचार करता पोलीस प्रशिक्षण, शस्त्रे-दारुगोळा, गणवेश साहित्य, वायरलेस यंत्रणा, शासकीय इमारती, पोलीस निवासस्थाने यांची देखरेख व दुरुस्ती, पोलीस बॅण्ड, मोटार परिवहन विभागातील कामे, विभागीय चौकशा, न्यायालयीन प्रकरणे, पोलीस कल्याण तसेच आरोग्यविषयक कामे जबाबदारीने पार पाडावी लागतात. याव्यतिरिक्त या पदांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून संबोधित केल्यामुळे वेतन व त्यानुषंगिक कामकाजही हाताळावे लागते. आहरण व संवितरण अधिकारी म्हणून किमान ३००० ते १२००० कर्मचाऱ्यांचे वेतन, पुरवणी वेतन व भत्ते, आकस्मिक खर्चाची व लेखाविषयक तसेच सेवाविषयक कामकाजाचीही हाताळणी करावी लागते. अशी कामे अन्य कोणत्याही विभागात करावी लागत नाहीत. त्यामुळे त्यांच्या वेतनसंरचनेमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी सुधारित वेतनसंरचनेत वरिष्ठ कार्यालय अधीक्षक / प्रशासकीय अधिकारी या पदांना रु.४८०० आणि कार्यालय अधीक्षक (राजपत्रित) या पदाला रु.४६०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

९) कार्यालय अधीक्षक (अराजपत्रित)

संघटनेचे अभिप्राय:- या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना पोलीस भरतीबाबतचे कामकाज हाताळावे लागते; ज्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासारखी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही. याव्यतिरिक्त पोलीस दलातील कायदा व सुव्यवस्थेबाबतची कामे / प्रकरणे हाताळावी लागतात. त्याचबरोबर त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीव्यतिरिक्त अन्य विविध कायद्यांचे ज्ञानही असणे आवश्यक असते. कारण त्या अनुषंगानेही या अधिकाऱ्यांना कामे हाताळावी लागतात. पोलीस विभागातील पोलीस संख्याबळाचा विचार करता पोलीस प्रशिक्षण, शस्त्रे, दारुगोळा, गणवेश साहित्य, वायरलेस यंत्रणा, शासकीय इमारती, पोलीस निवासस्थाने यांची देखरेख व दुरुस्ती, पोलीस बॅण्ड, मोटार परिवहन विभागातील कामे, विभागीय चौकशा, न्यायालयीन प्रकरणे, पोलीस कल्याण तसेच आरोग्यविषयक कामे जबाबदारीने पार पाडावी लागतात. तसेच सेवाविषयक कामकाजाचीही हाताळणी करावी लागते. अशी कामे अन्य कोणत्याही विभागात करावी लागत नाहीत. त्यामुळे त्यांच्या वेतनसंरचनेमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी सुधारित वेतनसंरचनेत रु.४४०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

१०) मुख्य लिपिक

संघटनेचे अभिप्राय:- सदर पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पर्यवेक्षीय म्हणून काही प्रमाणात कामे करावी लागतात. त्यामध्ये पोलीस भरती कामकाज, त्याचबरोबर त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीव्यतिरिक्त अन्य विविध कायद्यांचे ज्ञानही असणे आवश्यक असते. कारण त्या अनुषंगानेही या कर्मचाऱ्यांना ती कामे हाताळावी लागतात. पोलीस विभागातील पोलीस संख्याबळाचा विचार करता पोलीस प्रशिक्षण, शस्त्रे, दारुगोळा, गणवेश साहित्य, वायरलेस यंत्रणा, शासकीय इमारती, पोलीस निवासस्थाने यांची देखरेख व दुरुस्ती, पोलीस बॅण्ड, मोटार परिवहन विभागातील कामे, विभागीय

चौकशा, न्यायालयीन प्रकरणे, पोलीस कल्याण तसेच आरोग्यविषयक कामे जबाबदारीने पार पाडावी लागतात. तसेच सेवाविषयक कामकाजाचीही हाताळणी करावी लागते. अशी कामे अन्य कोणत्याही विभागात करावी लागत नाहीत. त्यामुळे त्यांच्या वेतनसंरचनेमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांच्या सुधारित वेतनसंरचनेत रु.४३०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

११) वरिष्ठ श्रेणी लिपिक / १२) कनिष्ठ श्रेणी लिपिक

संघटनेचे अभिप्राय:- सदर पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पोलीस भरतीबाबतच्या कामकाजाचे त्याचबरोबर महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीव्यतिरिक्त अन्य विविध कायद्यांचे ज्ञानही असणे आवश्यक असते. कारण त्यानुषंगानेही या कर्मचाऱ्यांना कामे हाताळावी लागतात. पोलीस विभागातील पोलीस संख्याबळाचा विचार करता पोलीस प्रशिक्षण, शस्त्रे, दारुगोळा, गणवेश साहित्य, वायरलेस यंत्रणा, शासकीय इमारती, पोलीस निवासस्थाने यांची देखरेख व दुरुस्ती, पोलीस बॅण्ड, मोटार परिवहन विभागातील कामे, विभागीय चौकशा, न्यायालयीन प्रकरणे, पोलीस कल्याण तसेच आरोग्यविषयक कामे जबाबदारीने पार पाडावी लागतात. तसेच सेवाविषयक कामकाजाचीही हाताळणी करावी लागते. अशी कामे अन्य कोणत्याही विभागात करावी लागत नाहीत. त्यामुळे त्यांच्या वेतनसंरचनेमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी सुधारित वेतनसंरचनेत वरिष्ठ श्रेणी लिपिक या पदास रु.२८०० आणि कनिष्ठ श्रेणी लिपिक या पदास रु.२२०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस :-</u>

५) पोलीस महानिरीक्षकांचे उप सहाय्यक
६) वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी
७) वरिष्ठ कार्यालय अधीक्षक / प्रशासकीय अधिकारी
८) कार्यालय अधीक्षक (राजपत्रित)
९) कार्यालय अधीक्षक (अराजपत्रित)
१०) मुख्य लिपिक
११) वरिष्ठ श्रेणी लिपिक
१२) कनिष्ठ श्रेणी लिपिक

वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्गांप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

तथापि, गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रु.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रु.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार पोलीस महानिरीक्षकांचे उप सहाय्यक व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी या संवर्गांना रु.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी वित्त विभाग आणि गृह विभागाने तपासणी करून निर्णय घेणे योग्य होईल.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

१३) पोलीस निरीक्षक

संघटनेचे अभिप्राय :- पोलीस सेवेतील कर्मचाऱ्यांची संघटना नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शासन निर्णय क्रमांक पीएनएन-०२९७/सीआर ४७४/पोल-५ब, दि.२६.२.२००४ अन्वये पोलीस निरीक्षक पदाचा दर्जा वाढवून सदर पद राजपत्रित 'अ' वर्ग करण्यात आले आहे. राज्य वेतन सुधारणा समितीच्या दि.२०.१२.२००८ च्या अहवालामधील परिच्छेद

क्र. ३.६.२ मध्ये राज्य शासनाकडील तहसिलदार आणि पोलीस निरीक्षक हे दोनही संवर्ग गट 'अ' मध्ये श्रेणीवर्धीत करण्यात आले आहे. सदर दोनही पदांची पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रू.७४५०-११५०० अशी आहे व सदर पदांना वेतनबँड पीबी-२ व रु. ५००० ग्रेड वेतनाची समितीने शिफारस केलेली आहे. तथापि, सहाव्या वेतन आयोगात शासनाने सुधारित वेतनसंरचनेत तहसिलदार या पदास रु.१५६००-३९१०० तर पोलीस निरीक्षक पदास रु. ९३००-३४८०० हा वेतनबँड मंजूर केला आहे. गृह विभागातील पोलीस निरीक्षक हे पद कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून तसेच कर्तव्ये व जबाबदारी पाहता अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे सदर पदास देखील तहसिलदार पदास मंजूर केल्याप्रमाणे वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु. ५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :-

राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मध्ये तहसिलदार आणि पोलीस निरिक्षक या संवर्गांना वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० आणि रू.५००० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेची शिफारस केली आहे. हीच वेतनसंरचना विवक्षितपणे उचित शासन आदेशाद्वारे पूर्वी वर्ग-१ म्हणून घोषित केलेल्या (सध्याच्या गट-अ मधील) रू.७४५०-११५०० आणि रू.७५००-१२००० या विद्यमान वेतनश्रेणीतील पदांना लागू होईल अशीही शिफारस करण्यात आली आहे व सदर शिफारस शासनाने स्वीकारली आहे.

शासनाच्या विविध विभागांमध्ये रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीत सुमारे १०० पेक्षा अधिक संवर्ग आहेत. तथापि, या शिफारशीबाबत निर्णय घेताना मंत्रीमंडळाने केवळ तहसिलदार संवर्गास जाणीवपूर्वक वेतनबँड पीबी-२ ऐवजी वेतनबँड पीबी-३ (रू.१५६००-३९१००) मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. रू.७४५०-११५०० वेतनश्रेणीस समकक्ष वेतनबँड पीबी-२ ची शिफारस केलेली असल्याने तसेच या असुधारित वेतनश्रेणीतील अन्य कोणत्याही संवर्गास वेतनबँड पीबी-३ मंजूर केला नसल्याने पोलीस निरीक्षक संवर्गास वेतनबँड पीबी-३ मंजूर करणे योग्य ठरणार नाही.

१४) वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- सदर पद हे केंद्र शासनाच्या कोणत्याही पोलीस विभागात अस्तित्वात नाही. परंतु हे पद पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर प्रशासकीय कामकाज पाहण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे. सध्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांची फक्त १५ पदे पोलीस आयुक्तालयात मंजूर आहेत. सदर पदांच्या कार्यप्रणालीचा विचार करता या पदाची वेतनश्रेणी सुधारित करणे आवश्यक होते. कारण सदर पदास पोलीस दलातील कार्यकारी अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाविषयक सर्व बाबींची कामे हाताळावी लागतात. बृहन्मुंबई पोलीस दलात सध्या अधिकारी /अंमलदार /कर्मचारी असे एकूण सुमारे ४५,००० मनुष्यबळ कार्यरत असून त्या सर्वांच्या वेतनाची तसेच पोलीस खात्यातील कोट्यवधी रुपयांच्या वित्तीय बाबींची प्रकरणे हाताळावी लागतात. त्याचबरोबर त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पर्यवेक्षण करणे, महत्वाच्या प्रकरणांवर अभ्यासपूर्वक प्रस्ताव सादर करणे त्याचप्रमाणे हाताखालील कर्मचाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन कामकाजाचा सुरळीतपणे निपटारा करून घेणे इ. महत्वाची जबाबदारी असते. सदर पद हे विभागप्रमुख व कर्मचारी यांच्यातील महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे या पदावरील अधिकाऱ्यांचा दर्जा व वेतनसंरचना प्रस्तावित वेतनसंरचनेनुसार उंचावणे आवश्यक आहे. याकरीता या पदास सुधारित वेतनसंरचनेत रु.५००० ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

१५) प्रशासकीय अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- बृहन्मुंबई पोलीस आयुक्त यांच्या आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी हे पद वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्या खालोखाल असून त्यांना पोलीस भरती, पोलीस दलाशी निगडीत महत्वाचे प्रस्ताव, पोलीस प्रशिक्षण, शस्त्रे व दारुगोळा, पोलीस निवासस्थाने व शासकीय इमारती यांची देखभाल व दुरुस्ती, पोलीस आयुक्तालयाअंतर्गत घटक /प्रादेशिक कार्यालयातील सर्व प्रशासकीय व

वेतनविषयक सर्व कामे जबाबदारीने पार पाडावी लागतात. त्यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून वित्तविषयक सर्व जबाबदारीदेखील सोपविण्यात आली आहे. सदर अधिकाऱ्यांवर पर्यवेक्षणाव्यतिरिक्त मार्गदर्शनाची तसेच कार्यालयीन कामकाजात कार्यालय प्रमुखांना महत्वाचे निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कामकाजाची अभ्यासपूर्वक पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी असते. अशा प्रकारची कामे अन्य कोणत्याही विभागात करावी लागत नाही. त्याचप्रमाणे बृहन्मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या ४५००० पोलीस अधिकारी /अंमलदार /कर्मचाऱ्यांच्या संख्येनुरुप त्यांच्यावरील कामाचा ताण जास्त आहे व इतर विभागांच्या तुलनेत त्यांच्या कामाचे स्वरुपही वेगळे आहे. सध्या प्रशासकीय अधिकारी यांची फक्त २५ पदे पोलीस आयुक्तालयात मंजूर आहेत. याकरीता या पदास सुधारित वेतनसंरचनेत रु.४८०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

१६) कार्यालय अधीक्षक

संघटनेचे अभिप्राय:- कार्यालयीन कर्मचाऱ्यांवर पर्यवेक्षण, त्यांच्या कामकाजात मार्गदर्शन तसेच देखरेख याकरिता प्रशासकीय अधिकारी या पदाखालोखाल कार्यालय अधीक्षक हे पद पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर कार्यरत आहे.

पोलीस आयुक्तालयातील कक्षात तसेच घटक /प्रादेशिक कार्यालयस्तरावर सदर पदे आहेत. पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक घटक /प्रादेशिक कार्यालयांच्या अधिपत्याखाली पोलीस अधिकारी /अंमलदार यांची अंदाजे १० ते १२ हजार पदे कार्यरत आहेत. सदर पदांच्या रजा, शिक्षा, वेतन, वेतनवाढी, बदल्या इ. महत्वाची कामे हाताळावी लागतात. त्याचप्रमाणे मुख्यालय स्तरावर बदल्या. महत्त्वाची न्यायालयीन प्रकरणे, शिक्षा, शासकीय इमारती व पोलीस निवासस्थाने यांची देखरेख दुरुस्ती इ. कामकाज हाताळावे लागते. त्यामुळे साहजिकच कार्यालय अधीक्षक या पदावरदेखील कामाची जबाबदारी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांच्या वेतनसंरचनेतमध्ये सुधारणा होणे आवश्यक असून सुधारित वेतनसंरचनेत रु.४४०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

१७) मुख्य लिपिक

संघटनेचे अभिप्राय:- सदर पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यास पर्यवेक्षीय कामे करावी लागतात. त्यामध्ये पोलीस भरती कामकाज, महाराष्ट्र नागरी सेवा नियमावलीव्यतिरिक्त अन्य विविध कायद्यांचे ज्ञान असणे आवश्यक असते. कारण त्या अनुषंगाने पोलीस विभागातील महत्वाच्या विषयांवर त्यांना कामे जबाबदारीने हाताळावी लागतात. सदर कामकाज हाताळताना त्यांना हाताखालील कर्मचाऱ्यांना अचूक मार्गदर्शन करावे लागते. पोलीस आयुक्तालयाअंतर्गत त्यांना रोख रकमा, पोलीस कल्याण तसेच आरोग्यविषयक कामे, न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशा, शस्त्र व दारुगोळा इ. विषय स्वतंत्ररित्या हाताळावे लागतात. अशी कामे अन्य कोणत्याही विभागात करावी लागत नाही. त्यामुळे त्यांच्या सुधारित वेतनसंरचनेत रु.४३०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

१८) वरिष्ठ श्रेणी लिपिक

संघटनेचे अभिप्राय:- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अखत्यारित वरिष्ठश्रेणी लिपिक हे पद प्रमुख लिपिक पदाखालोखाल कार्यरत आहे. सदर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्तालयातील महत्वाचे विषय उदा. विभागीय चौकशी, न्यायालयीन प्रकरणे, महत्वाचे धोरणात्मक प्रस्ताव, माहितीचा अधिकार प्रकरणे, पोलीस प्रशिक्षण, पोलीस निवासस्थाने त्याचप्रमाणे पोलीस दलाचे वेतन व वेतनेतर सर्व कामकाज इ. कामे स्वतंत्रपणे हाताळावी लागतात. या कामकाजांच्या अनुषंगाने योग्य ती माहिती उपलब्ध करुन घेणे, त्याबाबतचे अभिलेख अद्यावत ठेवणे ही कामेदेखील विहित मुदतीत पार पाडावी लागतात. बृहन्मुंबई पोलीस दलातील कार्यरत ४५००० पोलीस कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे तसेच इतर प्रशासकीय कामकाज हाताळण्याकरिता ४०० वरिष्ठ लिपिक पोलीस आयुक्तालयात कार्यरत आहेत. त्यामुळे

साहजिकच प्रत्येक वरिष्ठ लिपिकांवर कामकाजाचा ताण जास्त प्रमाणात आहे. त्याकरीता त्यांना कोणतेही अतिरिक्त भत्ते अथवा विशेष वेतन दिले जात नाही. त्यामुळे त्यांच्या वेतनसंरचनेत सुधारणा होण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी त्यांच्या सुधारित वेतनसंरचनेत रु.२८०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

१९) कनिष्ठ श्रेणी लिपिक

संघटनेचे अभिप्राय:- बृहन्मुंबई पोलीस दलात कनिष्ठ लिपिकांकडे वेतन व प्रशासकीय अशी सर्व प्रकारची कामे वर्ग करण्यात येतात. सदर कामे त्यांना वेळप्रसंगी स्वतंत्रपणे हाताळावी लागतात. अभिलेख जतन करणे, ते वेळोवेळी अद्यावत करणे आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भातील सर्व प्रकारची प्रशासकीय कामे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडणे अशी जबाबदारीची कामे करावी लागतात. पोलीस दलाच्या तुलनेत त्यांची संख्या नगण्य असल्यामुळे सदर पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शासनाच्या समतुल्य विभागाच्या कामकाजाच्या तुलनेत कामाचा ताण जास्त आहे. त्यामुळे त्यांच्या वेतनसंरचनेत सुधारणा करणे आवश्यक असून रु.२२०० ग्रेड वेतन प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस :-</u>

१४) वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी

१५) प्रशासकीय अधिकारी

१६) कार्यालय अधीक्षक

१७)मुख्य लिपिक

१८) वरिष्ठश्रेणी लिपिक

१९) कनिष्ठश्रेणी लिपिक

वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

तथापि, गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रु.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रु.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी संवर्गास रु.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी वित्त विभाग आणि गृह विभागाने तपासणी करून निर्णय घेणे योग्य होईल.

गुन्हे अन्वेषण विभाग

२०) मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक

२१) अपर मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक

२२) शासकीय दस्तऐवज परीक्षक

२३) सहाय्यक दस्तऐवज परीक्षक

संघटनेचे अभिप्राय:-निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- तपास प्रक्रियेमध्ये अनेक गुंतागुंतीच्या गुन्ह्यांत हस्ताक्षर तज्ञांचा महत्वाचा सहभाग असतो. तसेच न्यायालयात तज्ञ म्हणून त्यांची साक्ष स्वीकारार्ह असते. त्यांचे काम हे कौशल्याचे, महत्वाचे व चिकाटीचे असते.

हस्ताक्षर विभागातील दस्तऐवज परीक्षकांची ( हस्ताक्षर तज्ञ) शैक्षणिक अर्हता महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ४ जून, १९८७ - निर्णय क्र. -एफपीबी /०८८४/१९३५४/पीओएल. दि. १४.५.१९८७ अन्वये रसायनशास्त्र मुख्य विषयासह शास्त्र शाखेची पदवी व भौतिकशास्त्र हा उप विषय, छायाचित्रणाचे ज्ञान, कमीतकमी ४ भाषांचे ज्ञान व विधी शाखेच्या पदवीधरांना प्राधान्य अशी विशेष प्रकारची आहे. दस्तऐवज परीक्षकांच्या वेतनश्रेणींच्या सुधारणेची मागणी ते वारंवार करत असतात. विशेषत: याच विभागांतर्गत असलेल्या अंगुलीमुद्रातज्ञांच्या संवर्गाप्रमाणे त्यांची वेतनश्रेणी असावी अशी मागणी पाचव्या वेतन आयोगाच्यावेळीही करण्यात आली होती. अंगुलीमुद्रा संवर्गाचा व्याप दस्तऐवज परीक्षक संवर्गापेक्षा खूप जास्त आहे. अंगुलीमुद्रा संवर्गाचे प्रभारी संचालक अंगुलीमुद्रा परीक्षक हे पोलीस अधीक्षक दर्जाचे आहेत. त्यांच्याशी दस्तऐवज परीक्षक संवर्गाची तुलना करता मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक व अतिरिक्त मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक पदास पोलीस उप अधीक्षक दर्जाची वेतनश्रेणी मंजूर करणे न्याय्य होईल असे वाटते. तसेच शासकीय दस्तऐवज परीक्षक पदास वरिष्ठ पोलीस निरीक्षक दर्जाची व सहाय्यक शासकीय दस्तऐवज परीक्षक पदास पोलीस उपनिरीक्षक दर्जाची वेतनश्रेणी मंजूर करणे न्याय्य वाटते.

अंगुलीमुद्रातज्ञ संवर्गातील समांतर वेतनश्रेणी दस्तऐवज परीक्षक संवर्गाला देण्याची शिफारस आहे.

समितीचे शिफारस :-

२०) मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक

२१) अपर मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक

२२) शासकीय दस्तऐवज परीक्षक

या संवर्गांना अंगुलीमुद्रा संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे त्या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

तथापि, गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रु.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक व अपर मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक या संवर्गांना रु.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी वित्त विभाग आणि गृह विभागाने तपासणी करून निर्णय घेणे योग्य होईल.

२३) सहाय्यक दस्तऐवज परीक्षक :-

समितीची शिफारस :-

शासन अधिसूचना, गृह विभाग क्र.एफपीबी-०८८४/१९३५४/पोल-४, दि.१४ मे, १९८७ अन्वये विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी रसायनशास्त्र मुख्य विषय आणि भौतिकशास्त्र या उप विषयासह पदवी ही अर्हता आहे.

नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विज्ञान शाखेची पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान अर्हता अत्यावश्यक असलेल्या तंत्रज्ञ अथवा अभियांत्रिकी संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांमध्ये वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. सदर वस्तुस्थिती आणि या संवर्गाची शैक्षणिक अर्हता विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

ब) नागरी संरक्षण संचालनालय

१) उप नियंत्रण अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- उप नियंत्रण अधिकारी (गट-क) व सहाय्यक उप नियंत्रक (गट-क) या दोन्ही पदांची तिसऱ्या वेतन आयोगापर्यंत रु.३६५-७६० अशी समान वेतनश्रेणी होती. तथापि, चौथ्या वेतन आयोगामध्ये सहाय्यक उप नियंत्रकांची वेतनश्रेणी रु.१४००-२६०० व उप नियंत्रण अधिकारी यांची

वेतनश्रेणी रु.१४००-२३०० असा फरक करण्यात आला. तद्नंतर पाचव्या वेतन आयोगामध्येही सहाय्यक उप नियंत्रक पदास रु.५०००-८००० व उप नियंत्रण अधिकारी पदास रु.४५००-७००० अशी वेतनश्रेणी देण्यात आली आहे. सहाव्या वेतन आयोगान्वये उप नियंत्रण अधिकारी (गट- क) यांना वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.२८०० तर सहाय्यक उप नियंत्रक (गट-क) यांना वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४२०० मंजूर झाल्याने तफावत निर्माण झाली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- तिसऱ्या वेतन आयोगापर्यंत या दोन्ही पदांच्या वेतनश्रेणी समान होत्या. तथापि चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींमध्ये बरीच तफावत वाढलेली आहे. प्रस्ताव मान्य व्हावा.

समितीची शिफारस :-

उप नियंत्रण अधिकारी संवर्गास सहायक उप नियंत्रक संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे, त्यामध्ये त्रुटी नाही.

२) अग्निशामक/प्रमुख विमोचक

संघटनेचे अभिप्राय:- नागरी संरक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली राज्य फिरते नागरी आणीबाणी सेनास्तंभ, मुंबई हे कार्यालय कार्यरत असून, अग्निशामक /प्रमुख विमोचक संवर्गात एकूण १५ पदे मंजूर आहेत.

सहाव्या वेतन आयोगानुसार राज्य फिरते नागरी आणीबाणी सेनास्तंभ, मुंबई कार्यालयासह, विधान भवन व भाभा अणुशक्ती केंद्र या तिन्ही विभागांच्या आस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या अग्निशामक / विमोचक या पदाचा वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.१९०० असे समान आहे. तथापि, विधान भवन व भाभा अणुशक्ती केंद्र या विभागातील प्रमुख अग्निशामक /विमोचक या पदास वेतनबँड रु.५२००-२०२०० व रु.२४०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. फिरत्या दलातील अग्नीशामक /प्रमुख विमोचक या पदासाठी मात्र रु.२००० ग्रेड वेतन विहित केले आहे. त्यामुळे विधानभवन व अणुशक्ती केंद्राप्रमाणे ग्रेड वेतनातील तफावत दूर करुन त्यांच्याप्रमाणेच अग्निशामक /प्रमुख विमोचक पदास रु.२४०० ग्रेड वेतन मिळण्याबाबत संचालकांनी प्रस्तावित केले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- राज्य फिरते आणीबाणी सेनास्तंभ, भाभा अणुशक्ती केंद्र व विधानमंडळातील अग्निशामक /विमोचक व अग्निशामक /प्रमुख विमोचक या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत. मात्र फिरत्या दलातील कर्मचारी संपूर्ण देशभर आपत्कालीन सेवेसाठी कार्यरत असतात. त्यानुसार ओरिसा चक्रीवादळ, गुजरात भूकंप व अंदमान निकोबार त्सुनामी या ठिकाणी शासन आदेशानुसार घटनास्थळी जाऊन विमोचनाचे कर्तव्य पार पाडलेले आहे. त्यामुळे इतर दोन्हींपेक्षा फिरत्या दलातील कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या अधिक असल्याचे दिसून येते. विधान मंडळ व भाभा अणुशक्ती केंद्र या कर्मचाऱ्यांच्या सेवा मर्यादित स्वरुपाच्या आहेत. या कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर होण्याच्या दृष्टीने पाचव्या वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीमधील त्रुटी दूर करण्यासाठीदेखील संचालनालयाकडून वेतनत्रुटी उच्चस्तर (काळे) समिती आणि वेतन असमानता समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता या दोन्ही समित्यांनी प्रस्ताव अमान्य केला आहे. या विरोधात उक्त कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात मूळ अर्ज क्र. ६००/२००८ दाखल केला आहे. प्रस्ताव मान्य व्हावा.

समितीची शिफारस :-

या संवर्गास भाभा अणुशक्ती केंद्र आणि विधानमंडळ सचिवालयातील अग्निशामक / विमोचक संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे. परंतु प्रस्तुत संवर्गास भाभा अणुशक्ती केंद्र अथवा विधानमंडळ सचिवालयातील संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास वेळोवेळी असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. सहाव्या आयोगातदेखील पाचव्या आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

तथापि, या संवर्गांच्या कर्तव्यांशी निगडीत जोखीम लक्षात घेता या संवर्गांना त्यांच्या ग्रेड वेतनाच्या २०% इतके विशेष वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

३) अग्निशामक / विमोचक

संघटनेचे अभिप्राय:- राज्य फिरते दल या कार्यालयातील अग्निशामक / विमोचक या पदास सन - १९७६, १९८६ व १९९६ च्या वेतन आयोगान्वये अनुक्रमे रु.२०, रु.४० व रु. ८० याप्रमाणे विशेष वेतन देण्यात आले असून सहाव्या वेतन आयोगात विशेष वेतन देण्यात आले नसल्याने ते मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- प्रस्ताव मान्य व्हावा.

<u>समितीची शिफारस :-</u>

या संवर्गांच्या कर्तव्यांशी निगडीत जोखीम लक्षात घेता या संवर्गांना त्यांच्या ग्रेड वेतनाच्या २०% इतके विशेष वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

क) सरकारी अभियोग संचालनालय

सहाय्यक सरकारी अभियोक्ता

संघटनेचे अभिप्राय:- सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचा संवर्ग पोलीस विभागात कार्यरत होता. चौथ्या वेतन आयोगापर्यंत सहाय्यक सरकारी अभियोक्ता हे पद उप विभागीय पोलीस अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त या पदाशी समकक्ष होते. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करताना उप विभागीय पोलीस अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त पदांना रु.८०००-२७५-१३५०० ही वेतनश्रेणी तर सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदास रु.७४५०-२२५-११५०० ही पोलीस निरीक्षक पदास देण्यात आलेली न्यूनतम वेतनश्रेणी देण्यात आली. सदर पदावर पाचव्या वेतन आयोगात झालेला अन्याय दूर न करता पुन्हा सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही अन्यायकारक वेतनसंरचना लागू केली आहे. हे पद गट-अ मधील असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नामनिर्देशनाने भरण्यात येते. सदर पदास वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर संवर्ग पूर्वी पोलीस महासंचालक यांच्या आस्थापनेवर पोलीस अभियोक्ता या नावाने कार्यरत होता. त्यावेळी पोलीस अभियोक्ता हे पद सहाय्यक पोलीस आयुक्त / पोलीस उप अधीक्षक या पदाशी समकक्ष होते. पोलीस विभागाच्या अखत्यारीत असताना या दोन्ही पदांची वेतनश्रेणी चौथ्या वेतन आयोगापर्यंत समान होती. तथापि, पाचव्या वेतन आयोगात सहाय्यक पोलीस आयुक्त / पोलीस उप अधीक्षक या पदास रु.८०००-२७५-१३५०० ही वेतनश्रेणी तर सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदास रु.७४५०-२२५-११५०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली. सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उप अधीक्षक या पदास पाचव्या वेतन आयोगात लागू करण्यात आलेली रु.८०००-२७५-१३५०० ही वेतनश्रेणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता, गट-अ या पदांसाठीही लागू करावी अशी महाराष्ट्र राज्य सरकारी अभियोक्ता संघटनेने शासनाकडे निवेदने सादर केली होती. त्यानुषंगाने सदर प्रस्ताव वित्त विभागाने नेमलेल्या वेतन असमानता समितीसमोर दि. १० ऑक्टोबर, २००५ रोजी ठेवण्यात आला होता. तथापि, वेतन असमानता समितीने सदर प्रस्ताव अमान्य केला होता.

सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतनाऐवजी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची महाराष्ट्र राज्य सरकारी अभियोक्ता संघटना यांची मागणी आहे. गृह विभागांतर्गत सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच महसूल विभागांतर्गत तहसिलदार या पदांप्रमाणेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता हे पद गट-अ मधील कार्यकारी पद आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता केवळ स्नातक परीक्षा आहे. तथापि, सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावरील उमेदवारास स्नातक आणि विधी स्नातक अशा

दोन स्नातक परीक्षा ही अर्हता असून त्याव्यतिरिक्त ५ वर्षांचा वकिली व्यवसायाचा अनुभव आवश्यक आहे. असे असतानाही या पदास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेची शिफारस करण्यात आली आहे.

सदर वेतनसंरचनेमुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता, गट-अ पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांवर निश्चितच अन्याय झाला असल्याचे विभागाचे मत आहे.

तसेच हकीम समितीच्या अहवालातील ३.६.३ मध्ये जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त थेट नियुक्तीच्या सहाय्यक कार्यकारी अभियंता या पदास पीबी-३: १५६००-३९१००ची शिफारस करताना व या पदास उच्च प्रारंभिक वेतनाची शिफारस नाकारताना असे नमूद केले आहे की, (अ) गट-अ मधील संवर्ग पदावर उच्च गुणवत्ता धारक उमेदवारांना आकर्षित करण्यासाठी सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाने गट-अ (थेट नियुक्ती) मधील वेतनश्रेणीस पीबी-३ या वेतनबँडची तर गट-ब मधील समान वेतनश्रेणीस पीबी-२ या वेतनबँडची शिफारस केली आहे. पीबी-३ या वेतनबँडमधील किमान वेतन रु.१५६०० तर पीबी-२ मधील किमान वेतन ९३०० इतके आहे. अशा प्रकारे, किमान वेतनामध्ये लक्षणीय वाढ करण्यात आली असल्याने गट-अ मधील थेट नियुक्तीसाठी उच्च प्रारंभिक वेतनाची आवश्यकता वाटत नाही. सदर शिफारस विचारात घेता, सहाय्यक सरकारी अभियोक्ता गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) या पदासाठी उच्च गुणवत्ता ही अर्हता तसेच हे थेट नियुक्तीचे गट- अ मधील पद असल्याने प्रकरण ३.६.३ मध्ये शिफारस केल्यानुसार उच्च वेतनसंरचना म्हणजेच वेतनबँड पीबी-३:रु.१५६००-३९१०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू करणे योग्य आहे.

विविध गुन्ह्यांचा तपास चांगल्या पध्दतीने होऊन न्यायालयामध्ये गुन्हा सिध्दतेचे (Conviction Rate) प्रमाण वाढून गुन्हेगारांना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी यासाठी फौजदारी प्रकरण न्यायालयात दाखल झाल्यावर अभियोग चालवून गुन्हेगारास शिक्षा होण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त चांगले अभियोक्ते शासन सेवेत घेणे आवश्यक आहे. मात्र, सहायक सरकारी अभियोक्ता या पदास दिले जाणारे वेतन हे तुलनेने अल्प असल्याने चांगले व नामांकित वकील शासनाच्या सेवेत घेण्यास उत्सुक नसतात. यास्तव सदर पदाच्या वेतनात वाढ करुन चांगल्या वकीलांना शासनाच्या सेवेत घेण्यास प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. जेणेकरुन, अभियोक्त्यांचा दर्जा सुधारुन गुन्हेगारांना शिक्षा होण्याच्या प्रमाणामध्ये वाढ होईल.

उपरोक्त नमुद सर्व बाबींचा विचार करता सहाय्यक सरकारी अभियोक्ता, गट-अ या पदास वेतनबँड पीबी-२: रु. ९३००-३४८०० ऐवजी वेतनबँड पीबी-३:रु.१५६००-३९१०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करावी.

**समितीची शिफारस :-**

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगात रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी आणि परिणामी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्यासंदर्भातील प्रकरण (रीट याचिका क्र.८४७४/२०१०) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ट असल्याने या संवर्गाच्या प्रस्तावाविषयी शिफारस करणे सयुक्तिक होणार नाही असे समितीचे मत आहे.

ड ) मोटार वाहन विभाग

१) अपर परिवहन आयुक्त / २) परिवहन सह आयुक्त / ३) परिवहन उप आयुक्त (उच्च श्रेणी) /
४) प्रादेशिक परिवहन अधिकारी / ५) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी / ६) सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी / ७) मोटार वाहन निरीक्षक

संघटनेचे अभिप्राय:- मोटारवाहन विभागातील सहाय्यक मोटारवाहन निरीक्षक ते अपर परिवहन आयुक्त या पदांवरील अधिकारी हे सेवाप्रवेश नियमांनुसार अभियांत्रिकी अर्हताधारक असल्याने व मोटारवाहन विभाग १००% तांत्रिक विभाग असल्याने, जलसंपदा विभागाने सन १९८४ मध्ये त्या विभागातील अभियांत्रिकी पदवी / पदविकाधारक अभियंत्यांना ज्याप्रमाणे श्रेणीवाढ व सुधारित उच्च वेतनश्रेणी मंजूर केली, तेच तत्व आधारभूत मानून परिवहन विभागातील उपरोक्त अभियांत्रिकी पदांना

जलसंपदा विभागातील अभियांत्रिकी पदांच्या समकक्ष पुढीलप्रमाणे वेतनश्रेणी दि.५.११.२००८ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय दि. १४.११.२००८ अन्वये मंजूर करण्यात आल्या होत्या.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी ( रुपये ) | सुधारित वेतनश्रेणी ( रुपये) |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक मोटारवाहन निरीक्षक | ५००० - ८००० | ५५००- ९००० |
| २ | सहाय्यक मोटारवाहन निरीक्षक ( वरिष्ठ श्रेणी) | -- | ६५०० - १०५०० |
| ३ | मोटारवाहन निरीक्षक | ५५०० - ९००० | ७४५० - ११५०० |
| ४ | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी | ६५०० - १०५०० | ८००० - १३५०० |
| ५ | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी | ७४५० - ११५०० | १००००- १५२०० |
| ६ | प्रादेशिक परिवहन अधिकारी | १००००- १५२०० | १२००० - १६५०० |
| ७ | परिवहन उप आयुक्त (उच्च श्रेणी) | १०६५० - १५८५० | १४३०० - १८३०० |
| ८ | सह परिवहन आयुक्त | १२००० - १६५०० | १५१०० - १८३०० |
| ९ | अपर परिवहन आयुक्त | १४३०० - १८३०० | १६४०० - २०००० |

त्याचप्रमाणे मोटारवाहन निरीक्षक पदास राजपत्रित गट - अ (कनिष्ठ स्तर) दर्जा देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता.

परंतु सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन पुनर्रचनेसाठी नेमण्यात आलेल्या मा. हकीम समितीने उपरोक्त शासन निर्णयांची दखल घेऊनही मोटारवाहन विभागातील अभियांत्रिकी अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासाठी वेतनबँड व ग्रेड वेतन मंजूर करताना समितीच्या अहवालातील परि. ३.११ मध्ये अन्य विभागांतील समान अधिकारीता व स्तर असलेल्या अधिकाऱ्यांसाठी शिफारस केलेल्या वेतनबँड व ग्रेड वेतनापेक्षा कमी दर्जाचे वेतनबँड व ग्रेड वेतनाची शिफारस केली आहे. त्याप्रमाणे सुधारित वेतन नियम अधिसूचित करताना मोटारवाहन विभागातील अधिकाऱ्यांना कमी प्रमाणात वेतनबँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे मोटारवाहन विभागातील अधिकाऱ्यांवर निश्चितच अन्याय झाला आहे.

मा. हकीम समितीने शिफारशी करताना पुढील मुद्दे विचारात घेतलेले नाहीत.

अ) मोटारवाहन विभागातील अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांत वाढ झाली आहे. विक्रीकर विभागातील मोटारवाहन संबंधातील व्यवसायकराची वसूली मोटारवाहन विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. सन २००८ - ०९ या वर्षात मोटारवाहन विभागाने पूर्वी विक्रीकर विभागाने केलेल्या वसूलीपेक्षा ९ पट जास्त ( रु. ५० कोटी) जास्त व्यवसाय कराची वसूली केली आहे.

ब) मा. हकीम समितीने अहवालाच्या परि. ३.११ मध्ये नोंदविलेले कारण संयुक्तिक नसून आमच्यावर अन्याय करणारे व आमच्या न्याय्य हक्कांवर गदा आणणारे आहे.

क) मा. हकीम समितीने परिवहन विभागातील अधिकाऱ्यांना सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करताना शासन निर्णय, गृह विभाग क्र. एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२/परि ४ (१), दि. १४.११.२००८ चा विचार केलेला दिसत नाही. सदर शासन निर्णयान्वये मोटारवाहन निरीक्षक या पदास गट -अ ( कनिष्ठ श्रेणी ) दर्जा देण्यात आला आहे. समितीने अहवालाच्या परि. ३.६.२ मध्ये विवक्षितपणे उचित शासन आदेशाद्वारे पूर्वी वर्ग - १ म्हणून घोषित केलेल्या (सध्याच्या गट - अ मधील ) रु. ७४५० - ११५०० या विद्यमान वेतनश्रेणीतील सर्व पदांना वेतनबँड पीबी - ३ व रु. ५००० या ग्रेड वेतनाची शिफारस केलेली आहे. असे असूनसुध्दा सदर शासन निर्णयाचा विचार न केल्यामुळे मोटारवाहन निरीक्षक पदास वेतनबँड पीबी - २ व रु. ४५०० या ग्रेड वेतनाची शिफारस केली आहे. हा विभागातील अधिकाऱ्यांवर अन्याय आहे.

ड) विभागातील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हे पद शासन निर्णय, दि. १४.११.२००८ नुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या पूर्वीपासून गट - अ दर्जाचे असून सदर पदास सुधारित वेतनश्रेणीपूर्वी रु. ७४५० - ११५०० ही वेतनश्रेणी होती. शासन निर्णय, दि. १४.११.२००८ नुसार सुधारित वेतनश्रेणीनंतर सदर पदास रु. १०००० - १५२०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली असतानासुध्दा समितीने सदर

पदास वेतन बँड पीबी - २ व रु. ४८०० या ग्रेड वेतनाची शिफारस केली आहे. सदर शिफारस ही असुधारित वेतनश्रेणीच्या ( रु. ७४५० - ११५००) समकक्ष नसून त्याहीपेक्षा कमी आहे.

इ) मा. हकीम समितीने शिफारशी करताना विभागातील निम्न पदांस [ सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक ( कनिष्ठ श्रेणी / वरिष्ठ श्रेणी)] वेतनसंरचना सुचविताना सर्वसाधारण तत्व विचारात घेऊन अहवालातील तक्ता क्र. ३.१ प्रमाणे समकक्ष वेतनसंरचनेची शिफारस केली आहे. पदोन्नतीनंतर प्राप्त होणाऱ्या वरिष्ठ पदांना खालच्या दर्जाच्या वेतनसंरचनेची शिफारस केली आहे. वास्तविक पदोन्नतीनंतर कर्तव्ये व जबाबदाऱ्यांत वाढ होत जाते.

ई) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हे जिल्हा पातळीवरील कार्यालयप्रमुखाचे पद आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याची सरासरी महसूल वसूली ५० कोटींपेक्षा जास्त आहे. सदर पद हे जिल्हा पातळीवरील जबाबदारीचे पद आहे. या पदाच्या समकक्ष जिल्हा स्तरावरील इतर पदांची वेतनसंरचना ही निश्चितच उच्च आहे. त्याचप्रमाणे तालुका पातळीवरील पोलीस निरीक्षक, तहसिलदार, गट विकास अधिकारी यांच्या वेतनसंरचनासुध्दा या पदापेक्षा जास्त आहेत.

उपरोक्त नमूद केलेल्या सर्व बाबींचा विचार करता शासन निर्णय दि. १४.११.२००८ प्रमाणे मंजूर केलेली वेतनश्रेणी इतर विभागांतील अधिकाऱ्यांशी विशेषत: जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांशी समकक्ष असल्याने सदर वेतनश्रेणी विचारात घेऊन प्रस्तावित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- विभागाने संघटनेच्या वरील अभिप्रायांशी सहमती दर्शवून पुढीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहेत:-

हकीम समितीने अन्य प्रशासकीय विभागांमधील समान अधिकारीता व स्तर असलेल्या अधिकाऱ्यांना शिफारस केलेल्या वेतनबँड व ग्रेड वेतनापेक्षा परिवहन विभागातील समकक्ष पदांना अत्यंत कमी दर्जाच्या वेतनबँड व ग्रेड वेतनांची शिफारस केली आहे. या शिफारशींनुसार सहावा वेतन आयोग लागू केल्यास मोठ्या प्रमाणावर अन्याय होईल.

परिवहन विभागातील अधिकारी आणि जलसंपदा विभागातील समकक्ष अधिकारीता व तांत्रिक अर्हता असलेल्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना शिफारस केलेल्या वेतनबँड व ग्रेड वेतनामध्ये फार मोठी तफावत आहे.

हकीम समितीच्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारशी आणि परिवहन विभागासाठीच्या परिच्छेद ३.११.१ मध्ये दर्शविलेले वेतनबँड व ग्रेड वेतनामध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती आढळून येते. यापूर्वी मंत्रीमंडळाने निर्णय घेऊन शासन निर्णय दि.१४.११.२००८ अन्वये परिवहन विभागातील विविध पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेणी आधारभूत मानून सहाव्या वेतन आयोगातील वेतनबँड व ग्रेड वेतन लागू करण्यात यावे.

<u>समितीची शिफारस :-</u>

१) अपर परिवहन आयुक्त
२) परिवहन सह आयुक्त
३) परिवहन उप आयुक्त (उच्च श्रेणी)
४) प्रादेशिक परिवहन अधिकारी
५) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
६) सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी
७) मोटार वाहन निरीक्षक

वर नमूद संवर्गांना शासन निर्णय, गृह विभाग क्र.एमव्हीडी १२०८/प्र.क्र.१७२/परि-४, (२) दि.१४ नोव्हेंबर, २००८ अन्वये मंजूर केलेल्या असुधारित वेतनश्रेण्या आधारभूत मानून सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच प्रस्तुत संवर्गांची तुलना जलसंपदा विभागातील संवर्गांशी केली आहे.

चौथ्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीपूर्वी राज्य शासनाकडील संवर्गाची केंद्र शासनाकडील संवर्गांशी समकक्षता निश्चित करण्यासाठी नेमलेल्या वेतन समानीकरण समितीने परिवहन विभागातील वरील संवर्गांना केंद्र शासनाकडील अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. जलसंपदा विभागातील अभियंता संवर्ग आणि परिवहन विभागातील वरील संवर्गांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या सर्वस्वी भिन्न स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे जलसंपदा विभागातील अभियंता संवर्गाशी तुलना सयुक्तिक ठरत नाही.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असली तरी दि.१४ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या पुन:सुधारित वेतनश्रेण्या इतर आनुषंगिक बाबी विचारात घेऊन परिवहन उप आयुक्त (उच्च श्रेणी), उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि मोटार वाहन निरीक्षक या संवर्गांना पुन:सुधारणापूर्व असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतनसंरचनेपेक्षा तुलनेने उच्च वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने (अहवाल परिच्छेद-३.११) केली होती. त्यानुसार या संवर्गांना सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

पाचव्या वेतन आयोगात मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या पुन:सुधारित केल्या असल्यास त्यांचे पुन:परिक्षण करण्याची बाब राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या कार्यकक्षेत होती. त्यानुसार त्या समितीने विविध विभागांमधील संवर्गांच्या पुन:सुधारित वेतनश्रेण्यांचे पुन:परिक्षण करून सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याबाबत शिफारशी केल्या होत्या. त्यामुळे दि.१४ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या असुधारित वेतनश्रेण्या आधारभूत मानून सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याच्या मागणीशी समिती सहमत नाही.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्ग शासन निर्णय, दि. १४ नोव्हेंबर, २००८ नुसार पुन:सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यापूर्वीपासून रु. ७४५० - ११५०० या वेतनश्रेणीतील व गट-अ दर्जाचा असल्याचे संघटनेच्या अभिप्रायांत नमूद केले आहे. गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रू.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गास रू.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी तपासणी करून गृह विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने निर्णय घेणे योग्य होईल.

इ) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क

संघटना व प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- राज्य उत्पादन शुल्क हा विभाग शासनास महसूल जमा करुन देणारा राज्यात तिसऱ्या क्रमांकाचा विभाग आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाद्वारे खालील अधिनियमांची अंमलबजावणी केली जाते.

अ) मुंबई दारुबंदी कायदा, १९४९

ब) दि नार्कोटिक्स ड्रग्ज ॲण्ड सायकोट्रोपि सब्सटन्स ॲक्ट, १९८५

क) मुंबई ओपीयम स्मोकिंग ॲक्ट, १९३६

ड) मुंबई औषधी नियंत्रण कायदा, १९५५

इ) औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९५५

च) स्पिरीटयुक्त पदार्थ (आंतरराज्य व्यापार, वाणिज्य व नियंत्रण) कायदा, १९५५

छ) मुंबई मोलॅसेस कंट्रोल अधिनियम, १९६६

ज) महाराष्ट्र ताडी अधिनियम, १९६८

वरील कायद्यांची अंमलबजावणी करीत असताना जीव धोक्यात घालून गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींबरोबर व समाजकंटकांशी वारंवार सामना करावा लागतो. अवैध दारु निर्मितीच्या ठिकाणांवर छापे घालून गुन्हे नोंदवून न्यायालयीन प्रक्रियेत पाठपूरावा करावा लागतो. वरील सर्व कायद्यांची अंमलबजावणी करताना विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना रात्रंदिवस, सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी सतर्क राहून कार्यवाही करावी लागते. दुर्गम भागांत जाऊन अवैद्य रित्या चालणाऱ्या व्यवसायांवर नियंत्रण राखण्याचे व कारवाई करण्याचे काम राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना करावे आगते.

१) अपर आयुक्त :- राज्य उत्पादन शुल्क विभागातील अपर आयुक्त हे पद शासन निर्णय क्र.इएसटी-२००२/ सीआर-१९६/इएक्ससी-४, दि.१ जानेवारी, २००३ अन्वये निर्माण करण्यात आले आहे. सदर पद हे २००३ मध्ये निर्माण झाल्याने त्या पदास पाचव्या वेतन आयोगानुसार रु.१४३००-१८३०० ही वेतनश्रेणी होती.

शासकीय समतुल्य पदांमधील सापेक्षता राखण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) पदापेक्षा उच्च वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे. तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, अपर आयुक्त व विशेष निबंधक (वित्त), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग आणि अपर आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग या पदांकरिता रु.८८०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. त्यामुळे सदर पदांपेक्षा कामाची व्याप्ती व स्वरुप जास्त असल्याचे विचारात घेता अपर आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क या पदाकरीता रु.८९०० हे ग्रेड वेतन देण्याबाबत मागणी आहे.

२) सह आयुक्त:- राज्य उत्पादन शुल्क विभागात सह आयुक्तांची २ पदे मंजूर आहेत. सदर पदावर उप आयुक्त या संवर्गातून पदोन्नतीने नियुक्ती केली जाते. हे पद आयुक्त पदाच्या एक टप्पा खालचे पद आहे. त्यामुळे सह आयुक्त या पदास पदोन्नतीच्या संधी कमी आहेत. सबब त्यांच्या कामाचा व्याप व जबाबदारी लक्षात घेता, त्यांना वेतनबँड रु.३७४००-६७००० अधिक रु. ८७०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करणे आवश्यक आहे.

३) उप आयुक्त:- राज्य उत्पादन शुल्क विभागात उप आयुक्तांची ६ क्षेत्रिय व २ आयुक्तालयात अशी एकूण ८ पदे मंजूर आहेत. उप आयुक्त हे राज्य उत्पादन शुल्क विभागात प्रादेशिक विभागप्रमुख असून त्यांना पदोन्नतीच्या संधी कमी आहेत. सबब केंद्र व राज्य शासनाकडील इतर समतुल्य पदांचा विचार करुन सदर पदाला रु.६,६०० ऐवजी रु.७६०० ग्रेड वेतन निश्चित करण्यात यावे.

४) अधीक्षक:- प्रत्येक जिल्ह्यात १ या प्रमाणे राज्य उत्पादन शुल्क विभागात ३५ पदे मंजूर आहेत. अधीक्षक हे जिल्ह्याचे प्रमुख असल्याने, त्या जिल्ह्याच्या महसूल वाढीसंदर्भात सर्वस्वी जबाबदारी त्यांच्यावर असते. त्याचप्रमाणे पोलीस विभागाप्रमाणे ते गुन्हेगारांविरुध्द कार्यवाही करीत असतात. त्यांना अपिलीय प्रकरणात उच्च न्यायालयात जाऊन नोशनल व महसुलाशी निगडीत प्रकरणे स्वत: हाताळून शासनाचा महसूल बुडणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. त्यामुळे जमा महसुलाची व्याप्ती, पदांची समतुल्यता व कामाची व्याप्ती व संवेदनशीलता विचारात घेवून अधीक्षक या पदास पोलीस उप अधीक्षक पदापेक्षा जास्त किंवा अपर पोलीस अधीक्षक पदास देण्यात येणारे रु.६६०० ग्रेड वेतन देण्याबाबते मागणी आहे.

५) उप अधीक्षक :- उप अधीक्षक पद हे सध्या वर्ग-२ (गट-ब) दर्जाचे आहे. सदर पदावर नामनिर्देशनाने व निरीक्षक या निम्न पदावरुन पदोन्नतीने नियुक्ती देण्याची तरतूद सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमांत आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षकांना गट-ब दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. त्यामुळे उप अधीक्षक हे पद वरिष्ठ असल्याने या पदास गट-अ (कनिष्ठश्रेणी) दर्जा देणे आवश्यक आहे.

उप अधीक्षक, गट-ब या संवर्गात एकूण ४८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २७ पदे अनुज्ञप्तीधारकांच्या खर्चाची पर्यवेक्षीय पदे आहेत. त्यामुळे या २७ पदांचा शासनावर भार पडत नाही. सदर पदास सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन अशी सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. उप अधीक्षक, गट-ब पदाची व्याप्ती पहाता, त्यास वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन मिळणे आवश्यक आहे.

उप अधीक्षक हे पद शासनाच्या इतर विभागातील तहसिलदार, उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह व करमणूक शुल्क अधिकारी या पदांशी समकक्ष आहे. चौथ्या वेतन आयोगात तहसीलदार पदाकरीता उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क या पदाप्रमाणे रु.२०००-३५०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती.

६) निरीक्षक :- निरीक्षक हे वर्ग-३ (गट-क) दर्जाचे पद आहे. निरीक्षक हे राज्य उत्पादन शुल्क विभागातील क्षेत्रिय स्तरावर काम करणारे अधिकारी आहेत. खऱ्या अर्थाने ते राज्य उत्पादन शुल्क विभागाचा कणा आहेत. निरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात दोन ते तीन तालुके असे तालुकानिहाय व शहरी भागात दोन ते चार पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र अंतर्भूत असते. निरीक्षकांना गुन्हा अन्वेषणाची, न्यायालयीन तसेच शासकीय महसूल जमा करणे इ. कामे पोलीस विभागाप्रमाणेच वेळेचे बंधन न ठेवता रात्रंदिवस करावी लागतात. निवडणूकीच्या कालावधीमध्येसुध्दा बंदोबस्ताच्या कामामध्ये सहकार्य करावे लागते.

विभागात निरीक्षकांची एकूण मंजूर पदे २५२ आहेत. त्यापैकी ५४ पदे पर्यवेक्षीय आहेत व त्यांचे वेतन अनुज्ञप्तीधारकांकडून वसूल केले जाते. त्यामुळे त्यांचा भार शासनावर पडत नाही.

निरीक्षकांच्या कामाचा व्याप पहाता त्यांना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केलेल्या रु.४३०० ग्रेड वेतनाऐवजी सुधारित रु.५००० वेतन ग्रेड वेतन मिळावे.

७) दुय्यम निरीक्षक :- राज्य उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षकांनासुध्दा निरीक्षकांप्रमाणेच कामे करावी लागतात. दुय्यम निरीक्षकांच्या कार्यक्षेत्रात एक ते दोन तालुके असे तालुकानिहाय व शहरी भागात एक ते तीन पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र अंतर्भूत असते. विभागात दुय्यम निरीक्षकांची एकूण ८३७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४०८ पदे शासन खर्चाची असून उर्वरित ४२९ पदे ही अनुज्ञप्तीधारकांच्या खर्चाची पर्यवेक्षीय पदे आहेत. त्यामुळे ४२९ पदांचा शासनावर भार पडत नाही.

विभागाने मागणी करुनही सहाव्या वेतन आयोगानेदेखील वेतनश्रेणीत वाढ केली नाही. राज्य उत्पादन शुल्क विभागात कामाची व्याप्ती असूनही पोलीस विभागातील समकक्ष अधिकाऱ्यांना मात्र उच्च वेतनसंरचना दिली आहे. सहाव्या वेतन आयोगात दुय्यम निरीक्षकांना वेतन बँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. त्याऐवजी वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन मिळावे अशी मागणी आहे.

८) सहाय्यक दुय्यम निरीक्षक (पेटी ऑफिसर) :- राज्य उत्पादन शुल्क विभागातील सहाय्यक दुय्यम निरीक्षक (लेखनिक) (पेटी ऑफिसर) हे क्षेत्रियस्तरावर काम करणारे कर्मचारी आहेत. ते निरीक्षक व दुय्यम निरीक्षकांना प्रत्यक्ष कामात लेखनिक म्हणून मदत करीत असतात.

विभागात सहाय्यक दुय्यम निरीक्षकांची एकूण २७९ पदे आहेत. त्यापैकी फक्त १५६ पदे शासन खर्चाची असून १२३ पदे अनुज्ञपतीधारकांच्या खर्चाची पर्यवेक्षीय पदे आहेत. त्यामुळे १२३ पदांचा शासनावर भार पडत नाही.

राज्य उत्पादन शुल्क विभागात सहाय्यक दुय्यम निरीक्षक हे पद जवान संवर्गातून पदोन्नतीने भरले जाते. परंतु पदोन्नतीनंतर वरची वेतनश्रेणी दिली जात नाही. जवान व सहाय्यक दुय्यम निरीक्षकांची वेतनश्रेणी एकसारखीच म्हणजे रु.३०५०-४५९० होती व सहाव्या वेतन आयोगातदेखील मागणी करुनही वेतनश्रेणीत वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर संवर्गाच्या वेतनसंरचनेत सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे.

पोलीस विभागातील पोलीस नाईक अथवा पोलीस हवालदार लेखनिक पदासारखीच राज्य उत्पादन शुल्क विभागातील सहाय्यक दुय्यम निरीक्षक (लेखनिक) यांची कामे असल्यामुळे तसेच सदरचे पद जवान संवर्गातून पदोन्नतीने भरण्यात येत असल्याने त्यांच्या वेतनसंरचनेतदेखील वाढ करण्याची मागणी आहे. त्यामुळे सहाय्यक दुय्यम निरीक्षकांना ग्रेड वेतन रु. २४०० व विशेष वेतन रु.५०० मिळावे असे प्रस्तावित आहे.

९) जवान (कॉन्स्टेबल) :- जवानांना गुन्हे उघडकीस आणणे, आरोपींना अटक केल्यानंतर न्यायालयात हजर करणे, अवैध धंद्यावर कारवाई करणे तसेच अनुज्ञप्तीच्या निरीक्षणाच्यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांना मदत करणे, मद्य व मद्यार्काची परराज्यातून वहातूक करताना पथरक्षण करणे अशी जोखमीची कामे करावी लागतात. ग्रामीण भागामध्ये एक / दोन तालुक्यासाठी एक जवान काम करीत असतो. त्यांना नियमित प्रवास करावा लागतो.

जवान संवर्गात एकूण १२३७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६४४ पदे शासन खर्चाची असून ५९३ पदे अनुज्ञप्तीधारकांच्या खर्चाची पर्यवेक्षीय पदे आहेत. त्यामुळे ५९३ पदांचा शासनावर भार पडत नाही.

सहाव्या वेतन आयोगात जवान संवर्गास वेतनबँड रु. ५२००-२०२०० अधिक रु. १९०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. परंतु पोलीस विभागातील पोलीस शिपायांप्रमाणेच त्यांची कामे असल्यामुळे त्यांना ग्रेड वेतन रु. १९०० ऐवजी रु. २००० व विशेष वेतन रु. ५०० मिळावे.

१०) जवान-नि-वाहनचालक :- वाहनचालकांना वाहन चालविणे तसेच जवानांप्रमाणे वर नमूद केलेली कामे करावी लागतात. या संवर्गात एकूण २४८ पदे मंजूर आहेत. वाहनचालकांना सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.१९०० ग्रेड मंजूर केले आहे. परंतु पोलीस विभागातील पोलीस शिपाई पदासारखीच त्यांची कामे असल्यामुळे त्यांना ग्रेड वेतन रु. १९०० ऐवजी रु.२००० मिळावे व विशेष वेतन रु.५०० मिळावे.

उपरोक्त नमूद सर्व वस्तुस्थिती लक्षात घेतल्यास दिसून येईल की,

अ) राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांना पोलीस विभागाप्रमाणे त्यांच्याइतकेच किंबहुना त्यांच्यापेक्षा जास्त गुन्हा अन्वेषणाचे काम करावे लागते.

ब) राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना प्रस्तावित वेतनबँड आणि ग्रेड वेतन लागू केल्यास शासनावर विशेष अतिरिक्त भार पडणार नाही. कारण १७२१ पैकी १२२६ पदे ही शासनावर खर्च नसलेली पदे आहेत.

क) अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढून त्याचा परिणाम महसूल वाढीवर होईल.

ड) शासनाच्या इतर विभागांतील समकक्ष पदांवरील अधिकारी / कर्मचारी यांच्याइतके वेतन दिल्यास, वेतनातील तफावत दूर होऊन अधिकाऱ्यांमध्ये चैतन्य येऊन कामात गतीमानता येईल.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) अपर आयुक्त

२) सह आयुक्त

३) उप आयुक्त

४) अधीक्षक

५) उप अधीक्षक

६) निरीक्षक

कोणत्याही संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना विचारात घेतले जाणारे सर्वसाधारण निकष म्हणजेच त्या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे स्वरूप, पदाचा दर्जा, पदाशी निगडीत

पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठीची किमान शैक्षणिक अर्हता, पदवी / पदविकेचे स्वरूप, पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सार्वजनिक / प्रशासकीय व्यवस्थेतील स्थान व सेवेचे महत्त्व आणि त्यानुषंगाने येणाऱ्या विशिष्ठ जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊनच उपरोक्त संवर्गांना वेळोवेळी वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन या संवर्गांना सहाव्या वेतन आयोगात समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामध्ये त्रुटी नाहीत.

७) दुय्यम निरीक्षक :-

या संवर्गास पोलीस विभागातील पोलीस उप निरीक्षक संवर्गाप्रमाणे सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. मात्र हा संवर्ग पोलीस उप निरीक्षक संवर्गाशी समकक्ष नाही तसेच पोलीस विभागाकडील कायदा व सुव्यवस्थेची व्यापक जबाबदारी पाहता पोलीस उप निरीक्षक संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय वाटत नाही.

तथापि, हा पोलीस उप निरिक्षकांप्रमाणे गणवेशधारी आणि शस्त्रधारी संवर्ग असून या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या आणि पोलीस उप निरीक्षक संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या व कार्यपद्धती यामध्ये काही अंशी साम्य दिसून येते. या संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांच्या परिप्रेक्ष्यात याच विभागातील इतर संवर्गांशी तुलना करता या संवर्गाची वेतनसंरचना न्यायोचित असावी या दृष्टीने या संवर्गास वेतनबँड पीबी-१: रु.५२००-२०२०० अधिक रु.३५०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

८) पेट्टी अधिकारी (सहाय्यक दुय्यम निरीक्षक):-

सदर पदास वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) पोलीस विभागातील पोलीस नाईक अथवा पोलीस हवालदार, लेखनिक या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे त्या संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

जवान संवर्गातून या संवर्गात पदोन्नती दिली जात असल्याने या संवर्गास पाचव्या वेतन आयोगात रु.१५०/- इतके विशेष वेतन मंजूर केले होते. पदोन्नतीचा संवर्ग व निम्न संवर्गास एकच वेतनसंरचना अनुज्ञेय झाल्यास पदोन्नतीच्या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद - ३.७.२ मधील शिफारस शासनाने स्विकारली आहे. त्यानुसार या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची कार्यवाही गृह विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने करावी.

९) जवान :-

या संवर्गास पोलीस विभागातील पोलीस शिपाई संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी केली आहे. तथापि, वेतन समानीकरण समितीने या संवर्गास पोलीस शिपाई संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे या संवर्गाची मागणी समर्थनीय नाही. या संवर्गात नियुक्तीसाठी विहित केलेली एस.एस.सी. ही शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन या संवर्गास पाचव्या वेतन आयोगास रु.३०५०-४५९० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. या संवर्गाची असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामध्ये त्रुटी नाही.

१०) शिपाई - चालक :-

या संवर्गास पोलीस विभागातील पोलीस शिपाई संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी केली आहे. तथापि, वेतन समानीकरण समितीने या संवर्गास पोलीस शिपाई संवर्गाशी

समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे या संवर्गाची मागणी समर्थनीय नाही. या संवर्गाची असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामध्ये त्रुटी नाही.

फ) कारागृह महानिरीक्षक, पुणे

१) उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह / २) तुरुंग अधिकारी श्रेणी-१ / ३) तुरुंग अधिकारी श्रेणी-२ / ४) कारागृह हवालदार / ५) कारागृह शिपाई

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शासन निर्णय, गृह विभाग क्र. जेएलडी-३५९७/४९/ प्र.क्र.२२९/भाग-२/पीआरएस-१, दि.१२.०९.२००३ अन्वये दि.४.६.२००३ पासून कारागृह विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना पोलीस दलातील अधिकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात आली आहे. त्यानंतर पोलीस दलातील काही संवर्गांच्या वेतनश्रेणीत शासन निर्णय, गृह विभाग क्र. पीएए-०३०५/प्र.क्र.१९०/पोल-५अ, दि.१९.०४.२००७ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुषंगाने पोलीस समकक्ष वेतनश्रेणीनुसार कारागृह विभागातील समकक्ष पदांच्या वेतनश्रेणीत सुधारणा होणे अपेक्षित होते, परंतु तसे झाले नाही. त्यामुळे सहावा वेतन आयोग लागू करताना पोलीस दलातील व कारागृह विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत तफावत निर्माण झाली आहे.

शासन निर्णय, गृह विभाग क्र.जेएलडी-३५९७/४९/प्र.क्र.२२९/भाग-२/पीआरएस-१, दि.१२.०९.२००३ अन्वये कारागृह विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदे पोलीस दलातील पदांशी समकक्ष असल्याचे शासनाने मान्य केले आहे.

कारागृह प्रशासनातील कामाचा ताण व प्रशासनिक जबाबदाऱ्या या पोलीस दलातील अधिकारी / कर्मचाऱ्यांप्रमाणेच आहेत. पोलीस विभागापेक्षा कारागृह विभागातील अधिकारी /कर्मचाऱ्यांना आरोपींच्या संपर्कात राहून काम करावे लागते. कारागृहात बंदी दाखल झाल्यापासून तो कारागृहातून मुक्त होईपर्यंत त्याचा सांभाळ करून त्याचे समाजात पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने त्याला प्रशिक्षित करावे लागते. त्यामुळे कारागृहातील अधिकारी / कर्मचारी हे त्यांची सुधारणा व पुनर्वसनासाठी सतत प्रयत्नशील असतात. बंद्यांसोबत राहूनही कारागृहाची शिस्त व सुरक्षा व्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अधिकारी / कर्मचारी सतर्क राहून कर्तव्ये पार पाडत असतात. कुप्रसिद्ध गुंड टोळ्यांतील बंदी, अतिरेकी बंदी, परदेशी बंदी व बॉम्बस्फोट प्रकरणातील बंदी अशा विविध प्रकारच्या बंद्यांसोबत काम करताना अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या जिवितास धोका होण्याची शक्यता असते. कारागृह अधिकारी / कर्मचाऱ्यांची कारागृहातील कर्तव्ये व जबाबदाऱ्या पोलीस दलातील समकक्ष पदांप्रमाणे समान दर्जाच्या आहेत.

तरी वरील सर्व बाबींचा विचार होऊन कारागृह विभागातील प्रस्तावित पदांना पोलीस दलातील सहाव्या वेतन आयोगानुसार समकक्ष वेतनसंरचना मंजूर करून वेतनातील तफावत दूर करण्यात यावी ही विनंती.

समितीची शिफारस :-

रीट याचिका क्र.२८५/१९९९ संदर्भातील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने कारागृह विभागातील विविध संवर्गांना शासन निर्णय, गृह विभाग क्र. जेएलडी-३५९७/४९/प्र.क्र.२२९/भाग-२/पीआरएस-१, दि.१२ सप्टेंबर, २००३ अन्वये दि.४ जून, २००३ पासून पोलीस विभागातील संवर्गांप्रमाणे वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. सदर मंजूरी पोलीस दलाप्रमाणे सेवाप्रवेश नियमांत सुधारणा करण्याच्या अटीच्या अधीन राहून दिली आहे. त्यानुसार उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह, तुरुंग अधिकारी श्रेणी-१, तुरुंग अधिकारी श्रेणी-२, कारागृह हवालदार व कारागृह शिपाई संवर्गांना पोलीस विभागातील अनुक्रमे पोलीस उप अधीक्षक वर्ग-२ (रु.७४५०-११५००), सहाय्यक पोलीस निरीक्षक (रु.६५००-१०५००), पोलीस उप निरीक्षक (रु.५५००-९०००), पोलीस हवालदार (रु. ४०००-६०००) व पोलीस शिपाई (रु.३०५०-४५९०) या संवर्गांप्रमाणे वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत.

१) उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागह

या संवर्गास पोलीस विभागातील पोलीस उप अधीक्षक वर्ग-२ या संवर्गाची वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरविली आहे. तथापि, पोलीस उप अधीक्षक वर्ग-२ हा संवर्ग पोलीस विभागामध्ये आढळून येत नाही. परंतु रु.७४५०-११५०० ही असुधारित वेतनश्रेणी पोलीस विभागातील पोलीस निरीक्षक संवर्गाची आहे ही वस्तुस्थिती विचारात घेता उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह या संवर्गास पोलीस निरीक्षक संवर्गाची वेतनश्रेणी मंजूर केली आहे असे दिसून येते.

पोलीस निरीक्षक संवर्गाची असुधारित वेतनश्रेणी रु.७४५०-११५०० ही होती. या वेतनश्रेणीस समकक्ष सुधारित वेतनसंरचना वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही आहे. तथापि, रु.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील गट-अ (वर्ग-१) मधील संवर्गांना राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारशीनुसार रु.४६०० ऐवजी रु.५००० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक संवर्गास वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. पोलीस निरीक्षक संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० मंजूर करण्याचा प्रस्तावदेखील समितीच्या विचारार्थ आहे. परंतु समिती त्या मागणीशी सहमत नसल्याने पोलीस निरीक्षक संवर्गाच्या वेतनसंरचनेत कोणताही बदल सुचविलेला नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता शासन निर्णय, गृह विभाग क्र. जेएलडी-३५९७/४९/प्र.क्र.२२९/भाग-२/पीआरएस-१, दि.१२ सप्टेंबर, २००३ मधील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून उप अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह या संवर्गास पोलीस निरीक्षक संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० अधिक रु.५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर कण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२) <u>तुरुंग अधिकारी श्रेणी-१</u>

या संवर्गास पोलीस विभागातील सहाय्यक पोलीस निरीक्षक संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरविली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक संवर्गास वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. तुरुंग अधिकारी श्रेणी-१ संवर्गास देखील हीच वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही. या संवर्गास रु.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी समर्थनीय नाही.

३) <u>तुरुंग अधिकारी श्रेणी -२</u>

या संवर्गास पोलीस विभागातील पोलीस उप निरीक्षक संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरविली आहे. पोलीस उप निरीक्षक संवर्गास वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. तुरुंग अधिकारी श्रेणी-२ संवर्गास देखील हीच वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही. या संवर्गास रु.२५० विशेष वेतन मंजूर करण्याची मागणी केली आहे. परंतु पोलीस उप निरीक्षक संवर्गास विशेष वेतन मंजूर केलेले नसल्यामुळे या संवर्गास विशेष वेतन मंजूर करण्याची मागणी समर्थनीय नाही.

४) <u>कारागृह हवालदार</u>

या संवर्गास पोलीस हवालदार संवर्गाची वेतनश्रेणी अनुज्ञेय केली आहे. पोलीस हवालदार संवर्गास वेतनबँड पीबी-१ : रु.५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन (अधिक विशेष वेतन रु.५००) ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. कारागृह हवालदार संवर्गासदेखील वेतनबँड पीबी-१ : रु.५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गास पोलीस

हवालदार संवर्गाप्रमाणे रु.५०० विशेष वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

पोलीस विभागातील पोलीस हवालदार व पोलीस नाईक या संवर्गांना एकच वेतनसंरचना मंजूर केली आहे. पोलीस हवालदार हा पदोन्नतीचा संवर्ग असल्याने राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील स्वीकृत शिफारशीनुसार पोलीस हवालदार संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली आहे. कारागृह हवालदार संवर्गाच्या बाबतीत अशी परिस्थिती नसल्याने या संवर्गास मात्र रु.२४०० ग्रेड वेतन अनुज्ञेय राहील.

५) कारागृह शिपाई

या संवर्गास पोलीस शिपाई संवर्गाची वेतनश्रेणी अनुज्ञेय केली आहे. पोलीस शिपाई संवर्गास वेतनबँड पीबी-१ : रु.५२००-२०२०० अधिक रु.२००० ग्रेड वेतन (अधिक विशेष वेतन रु.५००) ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. कारागृह शिपाई संवर्गास हीच वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

# ३.९ - उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालय | | | | | |
| १ | संचालक | १४३००-१८३०० | ३७४००-६७००० | ८,८०० | ३७४००-६७००० | ८,९०० |
| २ | सह संचालक | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७,९०० | ३७४००-६७००० | ८,५०० |
| ३ | वरिष्ठ उप संचालक | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७,६०० | ३७४००-६७००० | ७,६०० |
| ४ | उप संचालक | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० | ६,९०० |
| ५ | वरिष्ठ भूवैज्ञानिक | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० | ६,६०० |
| ६ | भूवैज्ञानिक | ७५००-१२००० | ९३००-३४८०० | ५,००० | ९३००-३४८०० | ५,४०० |
| ७ | कनिष्ठ भूवैज्ञानिक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ४,८०० |
| | ब) कामगार आयुक्त | | | | | |
| १ | अतिरिक्त कामगार आयुक्त | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७,६०० | ३७४००-६७००० | ८,७०० |
| २ | सहाय्यक कामगार आयुक्त | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४,६०० | १५६००-३९१०० | ५,४०० |
| | क) श्रमिक भरपाई आयुक्त | | | | | |
| १ | प्रबंधक व अपर प्रबंधक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| | ड) सुती, रेशमी वस्त्रनिर्माण, साखर व सहकार बँक उद्योगाकरीता वेतन मंडळ | | | | | |
| १ | सचिव | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| | इ) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | | | | | |
| १ | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७,६०० | ३७४००-६७००० | ८,९०० |
| २ | अतिरिक्त संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | १०६५०-१५८५० (अधिक विशेष वेतन रू.६००) | १५६००-३९१०० | ६,९०० | ३७४००-६७००० | ८,७०० |
| ३ | सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६,६०० | ३७४००-६७००० | ७,६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० | ६,६०० |
| ५ | सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | १५६००-३९१०० | ५,४०० |
| ६ | अधीक्षक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | ९३००-३४८०० | ४,३०० |

अ) भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालय

१) संचालक / २) सह संचालक / ३) वरिष्ठ उप संचालक / ४) उप संचालक / ५) वरिष्ठ भूवैज्ञानिक / ६) भूवैज्ञानिक / ७) कनिष्ठ भूवैज्ञानिक

संघटनेचे अभिप्राय :- भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयाच्या सुधारित आकृतिबंध निश्चितीच्यावेळी दि.१ मे, २००७ पासून काही संवर्गांना सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. तथापि, सहावा वेतन आयोग लागू करताना ही सुधारणा लक्षात न घेता वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संचालनालयाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करीत असताना, केंद्र शासनातील समतुल्य पदांना पाचव्या वेतन आयोगानुसार देण्यात आलेल्या वेतनश्रेण्यांचा व कामाचे स्वरुप लक्षात घेऊनच शासन निर्णय दि.२७ एप्रिल, २००७ अन्वये दि.१/५/२००७ पासून वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणी सहावा वेतन आयोग लागू करताना खनिकर्म सेवेतील संवर्गांना शासनाने पाचव्या वेतन आयोगानुसार केलेली मध्यावधी वेतन सुधारणा लक्षात घेऊन प्रस्तावित सुधारित वेतनसंरचना लागू करण्याची विभागाची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) संचालक

२) सह संचालक

३) वरिष्ठ उप संचालक

४) उप संचालक

५) वरिष्ठ भूवैज्ञानिक

६) भूवैज्ञानिक

७) कनिष्ठ भूवैज्ञानिक

वरील संवर्गांपैकी संचालक व शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.एमएनए-१००१/ प्र.क्र.८१/उद्योग-९, दि.७ एप्रिल, २००७ अन्वये नव्याने निर्माण केलेला वरिष्ठ उप संचालक हा संवर्ग वगळता उर्वरित संवर्गांना वेतन समानीकरण समितीच्या (चौथा वेतन आयोग) शिफारशींनुसार उचित वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. कनिष्ठ भूवैज्ञानिक संवर्गास शिफारस केलेल्या रू.१६४०-२९०० या वेतनश्रेणीऐवजी रू.२०००-३२०० ही तुलनेने उच्च वेतनश्रेणी मंजूर केली होती.

पाचव्या वेतन आयोगात भूवैज्ञानिक (तत्कालीन पदनाम सहाय्यक भूवैज्ञानिक) वगळता इतर संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. तथापि, भूवैज्ञानिक संवर्गास अनुज्ञेय समकक्ष वेतनश्रेणी रू.६५००-१०५०० ऐवजी राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ च्या शिफारशींनुसार रू.७५००-१२००० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. थोडक्यात, या संवर्गांना वेळोवेळी योग्य वेतनश्रेण्या मंजूर करण्यात केल्या आहेत.

तद्नंतर शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.एमएनए-१००१/प्र.क्र.८१/उद्योग-९, दि.२७ एप्रिल, २००७ अन्वये दि. १ मे, २००७ पासून संचालक, सह संचालक, उप संचालक, वरिष्ठ भूवैज्ञानिक आणि भूवैज्ञानिक या संवर्गांच्या वेतनश्रेण्या पुन:सुधारित केल्या होत्या.

वरील परिच्छेदात नमूद पुन:सुधारित वेतनश्रेण्या आणि इतर आनुषंगिक बाबींचा विचार करून राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने (अहवाल-परिच्छेद ३.१५) संचालक, सह संचालक, वरिष्ठ भूवैज्ञानिक आणि भूवैज्ञानिक (तत्कालीन पदनाम सहाय्यक भूवैज्ञानिक) या संवर्गासाठी पुन:सुधारित वेतनश्रेणीपूर्व वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेची शिफारस केली आहे. पुन:सुधारित वेतनश्रेण्या दि. १ मे, २००७ पासून मंजूर केलेल्या असल्या तरी राज्य वेतन सुधारणा समितीने दि. १ जानेवारी, २००६ पासून सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करताना त्या विचारात घेतल्या आहेत. त्यानुसार या संवर्गांना सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे, म्हणजेच पुन:सुधारित वेतनश्रेण्याचे लाभ पूर्वलक्षी प्रभावाने मिळाले आहेत. इतर संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन समकक्ष वेतनसंरचना मंजूर केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गाची उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही. या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

ब) कामगार आयुक्त

१) अतिरिक्त कामगार आयुक्त

संघटनेचे अभिप्राय :- अपर कामगार आयुक्त हे केंद्र शासनाच्या उपमुख्य श्रम आयुक्त (गट-अ) या पदाशी समकक्ष व समतुल्य पद आहे. सदर पदांच्या जबाबदाऱ्या व अधिकार समान आहेत. तथापि, केंद्र शासनाच्या उपमुख्य श्रम आयुक्त (गट-अ) या पदास सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात आलेली आहे.

पाचव्या वेतन आयोगानेसुध्दा दोन्ही पदांच्या वेतनश्रेणींमध्ये तफावत केलेली होती. सबब, मागणी केलेली वेतनसंरचना व ग्रेड वेतन उचित व समर्थनीय आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- राज्य शासनाचे अपर कामगार आयुक्त (गट-अ) व केंद्र शासनाचे उप मुख्य श्रम आयुक्त (गट-अ) ही पदे समकक्ष व समतुल्य असून त्यांच्या वेतन संरचनेत तफावत असल्याचे दिसून येते. सबब, संघटनेने केलेली मागणी समर्थनीय आहे.

२) सहाय्यक कामगार आयुक्त

संघटनेचे अभिप्राय :- सहाय्यक कामगार आयुक्त हे केंद्र शासनाच्या सहाय्यक श्रम आयुक्त (गट-अ) या पदाशी समकक्ष व समतुल्य पद आहे. सदर पदांच्या जबाबदाऱ्या व अधिकार समान आहेत. तथापि, केंद्र शासनाच्या सहाय्यक श्रम आयुक्त (गट-अ) यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड पीबी-२: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात आलेली आहे.

पाचव्या वेतन आयोगानेसुध्दा दोन्ही पदांच्या वेतनश्रेणींमध्ये तफावत केलेली होती. सबब, मागणी केलेली वेतन संरचना व ग्रेड वेतन उचित व समर्थनीय आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- राज्य शासनाचे सहाय्यक कामगार आयुक्त (गट-अ) व केंद्र शासनाचे सहाय्यक श्रम आयुक्त (गट-अ) ही पदे समकक्ष व समतुल्य असून त्यांच्या वेतनसंरचनेत तफावत असल्याचे दिसून येते. सबब, संघटनेने केलेली मागणी समर्थनीय आहे.

समितीची शिफारस :-

१) अतिरिक्त कामगार आयुक्त

२) सहाय्यक कामगार आयुक्त

या संवर्गाची केंद्र शासनाकडील उप मुख्य श्रम आयुक्त आणि सहाय्यक श्रम आयुक्त संवर्गाशी तुलना केली आहे. तथापि, या संवर्गास वेतन समानीकरण समितीने (चौथ्या वेतन आयोग) केंद्र शासनाकडील संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे या संवर्गाची केंद्र शासनाकडील संवर्गाशी तुलना होऊ शकत नाही.

या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये कोणतीही त्रुटी नाही.

तथापि, गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रू.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार सहाय्यक कामगार आयुक्त संवर्गास रू.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी वित्त विभाग आणि उद्योग, उर्जा व कामगार विभागाने तपासणी करून निर्णय घेणे योग्य होईल.

क) श्रमिक भरपाई आयुक्त

प्रबंधक व अपर प्रबंधक

आणि

ड) सचिव, सुती, रेशमी वस्त्रनिर्माण, साखर व सहकार बँक उद्योगाकरीता वेतन मंडळे

संघटनेचे अभिप्राय :- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सचिव, कामगार न्यायालये / सचिव, वेतन मंडळे, मुंबई व प्रबंधक व अपर प्रबंधक, श्रमिक भरपाई आयुक्त या राजपत्रित गट-ब मधील पदांची वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगानुसार रु.६५००-१०५०० अधिक रु.४०० विशेष वेतन अशी एकसमान होती. सदर पदांना सहाव्या वेतन आयोगाच्या श्रेणीमध्ये समान ग्रेड वेतन मिळणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

प्रबंधक व अपर प्रबंधक, श्रमिक भरपाई आयुक्त आणि

सचिव, सुती, रेशमी वस्त्रनिर्माण, साखर व सहकार बँक उद्योगाकरीता वेतन मंडळे

उप प्रबंधक, औद्योगिक न्यायालये या संवर्गातून सचिव, कामगार न्यायालये या संवर्गात पदोन्नती देण्यात येते. या दोन्ही संवर्गांना वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन ही एकच सुधारित वेतनसंरचना अनुज्ञेय ठरत असल्याने पदोन्नतीच्या सचिव, कामगार न्यायालये या संवर्गास राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील स्वीकृत शिफाशीनुसार रू.४६०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. आयसीई १०८९/६१८३/कामगार-६ दि.१२ फेब्रुवारी, १९९२ नुसार प्रबंधक, औद्योगिक न्यायालये, गट-अ संवर्गात पदोन्नतीसाठी प्रबंधक व अपर प्रबंधक, श्रमिक भरपाई आयुक्त, सचिव, कामगार न्यायालये, सचिव, वेतन मंडळे या संवर्गातील अधिकाऱ्यांची सामायिक ज्येष्ठतायादी ठेवण्यात येते. ज्याप्रमाणे उप प्रबंधक, औद्योगिक न्यायालये या संवर्गातून सचिव, कामगार न्यायालये या संवर्गात पदोन्नती देण्यात येते त्याचप्रमाणे प्रबंधक व अपर प्रबंधक, श्रमिक भरपाई आयुक्त आणि सचिव, वेतन मंडळे या संवर्गामध्ये पदोन्नती देण्यात येते किंवा कसे ही बाब समितीसमोर स्पष्ट होऊ शकली नाही.

प्रबंधक व अपर प्रबंधक, श्रमिक भरपाई आयुक्त आणि सचिव, वेतन मंडळे या संवर्गांना आणि या संवर्गात पदोन्नत होणाऱ्या निम्न संवर्गांना एकच वेतनसंरचना मंजूर झाली असेल तर वर नमूद स्वीकृत शिफारशीनुसार अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यासंदर्भात कार्यवाही करता येईल. प्रशासकीय विभागाने तपासणी करून वित्त विभागाच्या सहमतीने याबाबत कार्यवाही करावी.

इ) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

१) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

संघटनेचे अभिप्राय :- हे पद विभाग प्रमुखाचे आहे. त्या पदास पाचव्या वेतन आयोगात रु.१२०००-१६५०० ही वेतनश्रेणी मिळाली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी -३ : रु. १५६००-३९१०० अधिक रु. ७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. महाराष्ट्र शासनातील इतर

समतुल्य पदांस वेतनबँड पीबी-४ : रु. ३७४००-६७००० अधिक रु. ८७०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मिळाली आहे. तरी संचालक पदाच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करावी ही विनंती.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- हे पद विभाग प्रमुखाचे आहे. पेसो (Petrolium and Explosive Safety Organization) विभागातील मुख्य नियंत्रक, स्फोटके पदाचा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत सेवाप्रवेश होतो तर संचालनालयातील संचालकांचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सेवाप्रवेश होतो. संचालनालयातील संचालकांची शैक्षणिक अर्हता यांत्रिकी / विद्युत / रासायनिक अभियांत्रिकीतील पदवी व १५ वर्षांचा अनुभव, तर पेसो विभागातील मुख्य नियंत्रक, स्फोटके पदाची शैक्षणिक अर्हता रासायनिक अभियांत्रिकीतील पदवी किंवा रसायन शास्त्रातील पदव्युत्तर पदवी व १५ वर्षाचा अनुभव अशी आहे. संचालनालयातील संचालक हे सचिव (कामगार) यांच्या अधिपत्याखाली काम करत असून विभागाची ध्येय धोरणे ठरविणे, कारखाने अधिनियम, १९४८ व पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या तरतूदींची राज्यात अंमलबजावणी करणे, राज्य शासन, देशातील इतर संचालनालये व केंद्रीय श्रम विज्ञान विभागास तांत्रिक व प्रशासकीय मार्गदर्शन करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडतात. तर पेसो विभागातील मुख्य नियंत्रक, स्फोटके पद हे गृह सचिव, भारत सरकार यांच्या अधिपत्याखाली काम करत असून विभागाची ध्येय धोरणे ठरविणे, इंडियन एक्सप्लोझिव्ह ॲक्ट, १८८४ व पेट्रोलियम ॲक्ट, १९३४च्या तरतूदींची देशात अंमलबजावणी करणे, केंद्र शासनातील संबंधित मंत्रालयांशी समन्वय ठेवणे, विभागास तांत्रिक व प्रशासकीय मार्गदर्शन करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडतात. असे असतानाही संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांना पाचव्या वेतन आयोगात रु.१२०००-१६५०० ही वेतनश्रेणी मिळाली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. तर केंद्रातील समतुल्य अशा पेसो विभागातील पदास व महाराष्ट्र शासनाच्या इतर समतुल्य पदांस वेतनबँड पीबी-४: रू.३७४००-६७००० व रू.८९०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय या पदाच्या तसेच इतर संचालकांच्या वेतनसंरचनेमध्ये फारच तफावत आहे. तरी संचालक या पदाच्या वेतनसंरचनेतील त्रुटी दूर करणे संयुक्तिक होईल.

२) अतिरिक्त संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

संघटनेचे अभिप्राय :- हे पद अतिरिक्त विभाग प्रमुखाचे आहे. सन २००४ पर्यंत संचालनालयात सदर एकच पद होते. कामाची निकड लक्षात घेता शासनाने एकूण ३ पदे निर्माण केली आहेत. हे पद सहसंचालक संवर्गातून पदोन्नतीने मिळणारे पद आहे. या पदावर पोहचण्यास किमान २०-२२ वर्षे लागतात. पाचव्या वेतन आयोगात या पदास रु.१०६५०-१५८५० अधिक विशेष वेतन रु.६०० अशी वेतनश्रेणी देण्यात आली आहे. त्यानुसार सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६९०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतील समतुल्य पदांस सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात आली आहे. तरी ही त्रुटी नाहीशी करावी ही विनंती.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- हे पद अतिरिक्त विभाग प्रमुखाचे आहे. पेसो विभागातील सह मुख्य नियंत्रक, स्फोटके पदाचा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत सेवाप्रवेश होतो तर संचालनालयातील अपर / अतिरिक्त संचालकांचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सेवाप्रवेश होतो. सदर पदाची शैक्षणिक अर्हता यांत्रिकी / विद्युत / रासायनिक अभियांत्रिकीतील पदवी व १२ वर्षांचा अनुभव, तर पेसो विभागातील सह मुख्य नियंत्रक, स्फोटके पदाची शैक्षणिक अर्हता रासायनिक अभियांत्रिकीतील पदवी किंवा रसायन शास्त्रातील पदव्युत्तर पदवी व १२ वर्षांचा अनुभव अशी आहे. संचालनालयातील अपर / अतिरिक्त संचालक हे संचालक यांच्या अधिपत्याखाली काम करत असून सह संचालकांची सर्व कर्तव्ये तसेच संचालकांनी नेमून दिलेली कामे करणे व अतिरिक्त प्रशासकीय जबाबदाऱ्या इ . जबाबदाऱ्या पार पाडतात, तर पेसो विभागातील सह मुख्य नियंत्रक, स्फोटके पद हे मुख्य नियंत्रक स्फोटके यांच्या अधिपत्याखाली काम करत असून उप मुख्य नियंत्रक, स्फोटके यांची सर्व कर्तव्ये

तसेच मुख्य नियंत्रकांनी नेमून दिलेली कामे करणे व अतिरिक्त प्रशासकीय जबाबदाऱ्या इ. जबाबदाऱ्या पार पाडतात. असे असतानाही अपर / अतिरिक्त संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांना पाचव्या वेतन आयोगात रु.१०६५०-१५८५० व विशेष वेतन रु.६०० ही वेतनश्रेणी मिळाली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.६९०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. तर केंद्रातील समतुल्य अशा पेसो विभागातील पदास व महाराष्ट्र शासनाच्या इतर समतुल्य पदांस वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० व रु.८७०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. अपर / अतिरिक्त संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय या पदाच्या तसेच इतर अपर / अतिरिक्त संचालकांच्या वेतनसंरचनेमध्ये फारच तफावत आहे. तरी अपर / अतिरिक्त संचालक या पदाच्या वेतनसंरचनेतील त्रुटी दूर करणे संयुक्तिक होईल.

३) सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

संघटनेचे अभिप्राय:- हे पद प्रादेशिक प्रमुखाचे आहे. पाचव्या वेतन आयोगात या पदास रु.१०६५०-१५८५० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती. त्यावेळेस या पदावर अन्याय झाला होता. सहाव्या वेतन आयोगात या पदास वेतनबँड पीबी -३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतील समतुल्य पदांस सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी -३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात आली आहे. उप संचालक पदावरुन या पदावर पदोन्नती मिळण्यास किमान १८-२० वर्षे लागतात तरी या पदास वेतनबँड पीबी -३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी ही विनंती.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- हे पद प्रादेशिक प्रमुखाचे आहे. पेसो विभागातील उप मुख्य नियंत्रक, स्फोटके पदाचा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत सेवाप्रवेश होतो तर संचालनालयातील सह संचालकांचा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सेवाप्रवेश होतो. संचालनालयातील सह संचालकांची शैक्षणिक अर्हता यांत्रिकी / विद्युत / रासायनिक अभियांत्रिकीतील पदवी व १० वर्षांचा अनुभव, तर पेसो विभागातील उप मुख्य नियंत्रक, स्फोटके पदाची शैक्षणिक अर्हता रासायनिक अभियांत्रिकीतील पदवी किंवा रसायन शास्त्रातील पदव्युत्तर पदवी व १० वर्षांचा अनुभव अशी आहे. सह संचालक हे प्रभाग प्रमुखाचे पद असून अधिपत्याखालील अधिकारी / कर्मचारी यांना मार्गदर्शन करुन कारखाने अधिनियम, १९४८ व पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६च्या तरतूदींची अंमलबजावणी प्रभागात करणे, कारखान्याचे नकाशे मंजूर करणे, परवाना शिफारस करणे, खटला / तार्कीद प्रस्तावाची शिफारस करणे, अतिधोकादायक कारखान्यांना भेट देऊन सुरक्षेबाबत सूचना देणे व जिल्हा प्रशासनाबरोबर समन्वय ठेवणे, प्रभागाची प्रशासकीय जबाबदारी इ. जबाबदाऱ्या पार पाडतात, तर पेसो विभागातील उप मुख्य नियंत्रक, स्फोटके हे प्रभाग प्रमुखाचे पद असून अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करुन इंडियन एक्सप्लोझिव्ह ॲक्ट, १८८४ व पेट्रोलियम ॲक्ट, १९३४ च्या तरतूदींची अंमजबजावणी प्रभागात करणे, आस्थापनांचे नकाशे मंजूर करणे, आस्थापनांना भेट देऊन सुरक्षेबाबत सूचना देणे, प्रभागाची प्रशासकीय जबाबदारी इ. जबाबदाऱ्या पार पाडतात. असे असतानाही सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांना पाचव्या वेतन आयोगात रु.१०६५०-१५८५० ही वेतनश्रेणी मिळाली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. तर केंद्रातील समतुल्य अशा पेसो विभागातील पदास व महाराष्ट्र शासनाच्या इतर समतुल्य पदांस वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० व रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय या पदाच्या तसेच इतर सह संचालकांच्या वेतनसंरचनेमध्ये फारच तफावत आहे. तरी सह संचालक या पदाच्या वेतनसंरचनेतील त्रुटी दूर करणे संयुक्तिक होईल.

४) उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

संघटनेचे अभिप्राय :- हे कार्यालय प्रमुखाचे पद आहे. ही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २५ % सरळसेवा भरतीने भरली जातात. उरलेली ७५ % पदे सहाय्यक संचालक यांच्या

पदोन्नतीने भरण्यात येतात. पदोन्नती मिळण्यास साधारणत: १० ते १५ वर्षे लागतात. या संवर्गात एकूण ६४ पदे आहेत.

बरेचसे कारखाने जिल्ह्यात विखुरले असल्यामुळे त्यांना ३-४ जिल्ह्यांचा कार्यभार सांभाळावा लागतो. महाराष्ट्र अभियंता सेवा, जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याशी समतुल्य असे हे पद आहे.

उप संचालक पदास पाचव्या वेतन आयोगात रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती व सहाव्या वेतन आयोगात त्यांना वेतनबँड पीबी -३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे.

याच संचालनालयात उप संचालक (वैद्यकीय) हे पद असून त्या पदास पाचव्या वेतन आयोगात रु.१००००-१५२०० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी -३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. या पदाची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवा भरतीने केली जाते.

तरी उप संचालक पदासदेखील वेतनबँड पीबी -३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात येऊन त्रुटी दूर करावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** हे कार्यालय प्रमुखाचे पद आहे. पेसो विभागातील नियंत्रक पदाचा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत सेवाप्रवेश होतो तर संचालनालयातील उप संचालकांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २५% सरळसेवा भरतीने व ७५ % सहाय्यक संचालक यांच्या पदोन्नतीने भरण्यात येतात. उप संचालकांची शैक्षणिक अर्हता यांत्रिकी / विद्युत / रासायनिक अभियांत्रिकीतील पदवी व ७ वर्षांचा अनुभव, तर पेसो विभागातील नियंत्रक पदाची शैक्षणिक अर्हता रासायनिक अभियांत्रिकीतील पदवी किंवा रसायन शास्त्रातील पदव्युत्तर पदवी व ५ वर्षांचा अनुभव अशी आहे. उप संचालक हे ५० पेक्षा जास्त कामगार असणारे कारखाने तसेच अतिधोकादायक कारखाने यांचे निरीक्षण करुन कारखाने अधिनियम, १९४८ व पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या तरतूदींची अंमलबजावणी करणे, अपघात / तक्रारींची चौकशी करणे, न्यायालयात खटले भरणे व चालविणे (शासनाने त्यांना सहाय्यक अभियोक्ता म्हणून नोंदले आहे), जिल्हा / तालुका प्रशासनाशी समन्वय ठेवणे इ . जबाबदाऱ्या पार पाडतात, तर पेसो विभागातील नियंत्रक उप मुख्य नियंत्रक स्फोटके यांनी नेमून दिलेल्या अधिपत्याखालील आस्थापनांना भेट देऊन इंडियन एक्सप्लोझिव्ह ॲक्ट, १८८४ व पेट्रोलियम ॲक्ट, १९३४ च्या तरतूदींची अंमलबजावणी करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडतात. असे असतानाही उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांना पाचव्या वेतन आयोगात रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मिळाली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. तर केंद्रातील समतुल्य अशा पेसो विभागातील पदास व महाराष्ट्र शासनाच्या इतर समतुल्य पदांस वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. याच संचालनालयात उप संचालक (वैद्यकीय) हे पद असून त्या पदास पाचव्या वेतन आयोगात रु.१००००-१५२०० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात आली आहे. उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय या पदाच्या तसेच इतर उप संचालकांच्या वेतनसंरचनेमध्ये फारच तफावत आहे. तरी उप संचालक या पदाच्या वेतनसंरचनेतील त्रुटी दूर करणे संयुक्तिक होईल.

५) सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

**संघटनेचे अभिप्राय :-** हे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवा भरतीने भरले जाते. या पदाची किमान पात्रता अभियांत्रिकी पदवी ( यांत्रिक / विद्युत/रासायनिक) आहे. जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागात अभियंत्यांतून सहाय्यक कार्यकारी अभियंता / उप अभियंता हे पद सुध्दा सरळसेवा भरतीने भरले जाते. पाचव्या वेतन आयोगात सहाय्यक संचालकास रु.६५००-१०५०० ही

वेतनश्रेणी देण्यात आली होती व सहाय्यक कार्यकारी अभियंता / उप अभियंता या समतुल्य पदास पाचव्या वेतन आयोगात रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती. त्यावेळेसच सहाय्यक संचालक पदावर अन्याय झाला होता. आता सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. तरी सहाय्यक संचालक पदास सहाय्यक कार्यकारी अभियंता / उप अभियंता पदास देण्यात आलेली सहाव्या वेतन आयोगाची वेतनसंरचना - वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन देण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- हे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवा भरतीने भरले जाते. पेसो विभागातील उप नियंत्रक पदाचा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत सेवाप्रवेश होतो. सहाय्यक संचालकांची किमान शैक्षणिक अर्हता यांत्रिकी / विद्युत / रासायनिक अभियांत्रिकी पदवी ही आहे. सहाय्यक संचालक हे ५० पेक्षा कमी कामगार असणाऱ्या कारखान्यांचे निरीक्षण करुन कारखाने अधिनियम, १९४८ व पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या तरतूदींची अंमलबजावणी करणे, अपघात / तक्रारीची चौकशी करणे, न्यायालयात खटले भरणे व चालविणे (शासनाने त्यांना सहाय्यक अभियोक्ता म्हणून नोंदले आहे), तालुका प्रशासनाशी समन्वय ठेवणे इ. जबाबदाऱ्या पार पाडतात, तर पेसो विभागातील उप नियंत्रक हे उप नियंत्रक, स्फोटके यांनी नेमून दिलेल्या अधिपत्याखालील आस्थापनांना भेट देऊन इंडियन एक्सप्लोझिव्ह ॲक्ट, १८८४ व पेट्रोलियम ॲक्ट, १९३४ च्या तरतूदींची अंमलबजावणी करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडतात. असे असतानाही सहाय्यक संचालक पदास पाचव्या वेतन आयोगात रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी मिळाली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-२: रु.९३०० - ३४८०० व रु.४,४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. तर केंद्रातील समतुल्य अशा पेसो विभागातील पदास व महाराष्ट्र शासनाच्या इतर समतुल्य पदांस पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.५४०० ही ग्रेड वेतन वेतनसंरचना मिळाली आहे. तसेच जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंत्यातून सहाय्यक कार्यकारी अभियंता / उप अभियंता हे पद सुध्दा सरळसेवा भरतीने भरले जाते. त्यांना पाचव्या वेतन आयोगात रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.५४०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. सहाय्यक संचालक या पदाच्या तसेच इतर सहाय्यक संचालकांच्या वेतनसंरचनेमध्ये फारच तफावत आहे. तरी सहाय्यक संचालक या पदाच्या वेतनसंरचनेतील त्रुटी दूर करणे संयुक्तिक होईल.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

२) अतिरिक्त संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

३) सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

४) उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

५) सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

या संवर्गांची केंद्र शासनाकडील पेसो (**Petrolium and Explosive Safety Organization**) विभागातील अनुक्रमे मुख्य नियंत्रक, स्फोटके, सह मुख्य नियंत्रक, स्फोटके, उप मुख्य नियंत्रक, स्फोटके, नियंत्रक आणि उप नियंत्रक संवर्गांशी तसेच राज्य शासनाकडील इतर विभागांतील काही संवर्गांशी तुलना केली आहे. तथापि, या संवर्गास वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) केंद्र शासनाकडील तसेच राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे या संवर्गांची केंद्र शासनाकडील तसेच राज्य शासनाकडील अन्य संवर्गांशी तुलना होऊ शकत नाही.

या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

६) अधीक्षक , औद्योगिक सुरक्षा व आरोग्य

संघटनेचे अभिप्राय :- संचालनालयातील गट-क मधील अधीक्षक पदास पाचव्या वेतन आयोगात रु. ५०००-८००० ही वेतनश्रेणी दिलेली आहे. त्यानुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये या पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु. ४२०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. राज्य शासनाच्या इतर विभाग / कार्यालयांतील गट-क मधील अधीक्षक पदास पाचव्या वेतन आयोगात रु. ५५००-९००० ही वेतनश्रेणी दिलेली आहे. त्यानुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये या पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. राज्य शासनाच्या सेवेतील गट-क मधील अधीक्षक या पदाकरीता सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच असतानाही अशा समतुल्य पदास चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगामध्ये वेगवेगळी वेतनश्रेणी दिली आहे त्यामुळे कमी वेतनश्रेणी देण्यात आलेल्या विभागातील अधीक्षक पदावर अन्याय होत असल्याचे वाटत आहे. सबब, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करुन अधीक्षक या समतुल्य पदास पाचव्या वेतन आयोगात रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु. ९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे ही विनंती.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- राज्य शासनाच्या सेवेतील गट-क मधील अधीक्षक या पदाकरीता सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. परंतु अशा समतुल्य पदास वेतन आयोगाने वेगवेगळी वेतनश्रेणी दिल्यामुळे सर्व अधीक्षकांमध्ये सातत्याने अन्याय झाल्याची भावना आहे. अधीक्षक पदास पाचव्या वेतन आयोगात रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी मिळाली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० व रू.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. तर महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतील अधीक्षक या समतुल्य पदास पाचव्या वेतन आयोगात रू.५५००-९००० ही वेतनश्रेणी मिळाली होती व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० व रू.४३०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मिळाली आहे. अधीक्षक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय या पदाच्या व राज्य शासनाच्या सेवेतील इतर विभागांतील समतुल्य पदांच्या वेतनसंरचनेमध्ये फारच तफावत आहे. तरी अधीक्षक या पदाच्या वेतनसंरचनेतील त्रुटी दूर करणे संयुक्तिक होईल.

<u>समितीची शिफारस</u> :-

अधीक्षक / कार्यालय अधीक्षक हा राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. तिसऱ्या वेतन आयोगामध्ये ज्या विभागांतील अधीक्षक संवर्ग रू.५५०-९०० या वेतनश्रेणीत होते, त्या संवर्गांना वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) रू.१६४०-२९०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती.

प्रस्तुत अधीक्षक संवर्गास तिसऱ्या वेतन आयोगामध्ये रू.३९५-८०० ही वेतनश्रेणी होती. या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनश्रेणी रू.१४००-२६०० मंजूर करण्याची शिफारस वेतन समानीकरण समितीने केली होती. त्यानंतर या दोन्ही संवर्गांना पुढे पाचव्या वेतन आयोगात अनुक्रमे रू.५५००-९००० व रू.५०००-८००० या समकक्ष सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या आणि सहाव्या वेतन आयोगामध्येदेखील अनुक्रमे वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४३०० ग्रेड वेतन आणि वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. थोडक्यात, विचाराधीन अधीक्षक हा संवर्ग पूर्वीपासूनच निम्न वेतनश्रेणीत आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता या संवर्गाच्या सुधारित वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

## ३.१० - विधी व न्याय विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) विविध मंत्रालयीन विभागांतील विशिष्ट पदे - विधी व न्याय विभाग | | | | | |
| १ | प्रधान सचिव (विधी विधान) / सचिव (विधी विधान) | २२४००-२४५०० (अधिक विशेष वेतन रु.१५००/-) / १८४००-२२४०० (अधिक विशेष वेतन रु.१५००/-) | ३७४००-६७००० | १२,००० / १०,००० | ३७४००-६७००० | १४,००० / १२,००० |
| २ | प्रारुपकार-नि-सह सचिव | १४३००-१८३०० (अधिक विशेष वेतन रु.१२००/-) | ३७४००-६७००० | ८७०० | ३७४००-६७००० | १०००० |
| ३ | उप-प्रारुपकार-नि-उप सचिव | १२०००-१६५०० (अधिक विशेष वेतन रु.१०५०/-) | १५६००-३९१०० | ७६०० | १५६००-३९१०० | ८७०० |
| ४ | सहाय्यक प्रारुपकार-नि-अवर सचिव | १००००-१५२०० (अधिक विशेष वेतन रु.९००/-) | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ५ | कनिष्ठ प्रारुपकार | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| | ब) लघुवाद न्यायालय, मुंबई | | | | | |
| १ | प्रबंधक | ७४५०-११५०० | ९३००- ३४८०० | ४,६०० | १५६००-३९१०० | ६,६०० |
| २ | अपर प्रबंधक | ७४५०-११५०० | ९३००- ३४८०० | ४,६०० | १५६००-३९१०० | ६,६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण - मुंबई उच्च न्यायालय सेवा समिती व उप समित्या | | | | | |
| १ | आस्थापना अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००- ३४८०० | ४,६०० | १५६००-३९१०० | ५४००/ ६,५०० |

अ) विविध मंत्रालयीन विभागांतील विशिष्ट पदे - विधी व न्याय विभाग

प्रधान सचिव (विधी विधान) / सचिव (विधी विधान) / प्रारुपकार-नि-सह सचिव / उप-प्रारुपकार-नि- उप सचिव / सहाय्यक प्रारुपकार-नि-अवर सचिव / कनिष्ठ प्रारुपकार

संघटनेचे अभिप्राय :- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शासन निर्णय, विधी व न्याय विभाग, क्रमांक: ११८२८ (ए) / सी, दि. ३० मे, १९७४ अन्वये दि. १ जून, १९७४ पासून विधी विधान शाखेची (Legislation Branch) त्यामधील पदांना सुधारित वेतनश्रेणी देऊन पुनर्रचना करण्यात आली व त्यांना सुधारित उच्चतर विशेष वेतनश्रेणी (Higher Pay Scale) मंजूर करण्यात आली.

तिसऱ्या वेतन आयोगानंतर शासनाने या अधिकाऱ्यांना मंत्रालयीन विभागातील इतर अधिकाऱ्यांपेक्षा उच्चतर विशेष वेतनश्रेणी (Higher Pay Scale) चालू ठेवली.

चौथ्या वेतन आयोगानंतर शासनाने उच्चतर विशेष वेतनश्रेणी (Higher Pay Scale) ही संकल्पना चालू न ठेवता विधी विधान शाखेतील काही पदांना योग्य ती उच्चतर वेतनश्रेणीच उपलब्ध नसल्यामुळे 'सुधारित वेतनश्रेणी + विशेष वेतन ' ही संकल्पना वेतनात वाढ करण्यासाठी अंमलात आणली.

पाचव्या वेतन आयोगानंतर शासनाने उच्चतर विशेष वेतनश्रेणी (Higher Pay Scale) ही संकल्पना चालू ठेवण्यासाठी विधी विधान शाखेतील काही पदांना ' सुधारित वेतनश्रेणी + विशेष वेतन ' ही संकल्पना वेतनात वाढ करण्यासाठी विशेष वेतनाच्या रकमेत वाढ करुन अंमलात आणली.

सहाव्या वेतन आयोगानंतर शासनाने ' विशेष वेतन ' ही संकल्पना समाप्त केली. त्यामुळे या शाखेतील अधिकाऱ्यांच्या फक्त असुधारित वेतनश्रेणीचे सुधारित वेतनसंरचनेत रुपांतर झाले आहे व 'विशेष वेतन ' जे वेतनश्रेणीचा भाग (Salary component) होते त्याचा समावेश सुधारित वेतनसंरचनेत झाला नाही. वास्तविक, सुधारित वेतनसंरचना देत असताना अगोदर देण्यात येणाऱ्या संपूर्ण वेतनाचे म्हणजेच असुधारित वेतनश्रेणी आणि विशेष वेतन (उच्चतर विशेष वेतन) यांचे संरक्षण (Pay protection) होणे गरजेचे आहे. तसे न झाल्यामुळे, ' ब ' शाखेची (Legislation Branch) पुनर्रचना करतानाच अधिकाऱ्यांना उच्च वेतनश्रेणी देण्यामागचा मूळ उद्देश व हेतू समाप्त झाला आहे आणि वेतनसंरचनेत तांत्रिक त्रुटी निर्माण झाली आहे.

यापूर्वी शासनाने वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार जेव्हा - जेव्हा ' ब ' शाखेतील पदांना सुधारित वेतन लागू केले, तेव्हा - तेव्हा या पदांना मंत्रालयीन विभागातील पदनाम साधर्म्य असलेल्या पदांपेक्षा अधिक वेतन दिले जाईल याची जाणीवपूर्वक दक्षता घेतली गेली आहे. मात्र सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार लागू केलेल्या नवीन वेतनसंरचनेमुळे ' ब ' शाखेतील पदांना मंत्रालयीन अधिकारी पदांसारखेच वेतन लागू झाले आहे. ही मोठी तांत्रिक त्रुटी आहे.

या शाखेतील पदे ही विशिष्ट संवर्गातील पदे (Special Cadre मधील) आहेत व ती केंद्र शासनाकडील पदांपेक्षा वेगळी आहेत.

सेवाप्रवेश नियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे या शाखेतील पदांवर नियुक्तीसाठीची अर्हता मंत्रालयातील इतर समकक्ष पदांना लागणाऱ्या नियुक्तीसाठीच्या अर्हतेपेक्षा उच्च आहे.

या शाखेतील कामकाज हे विधेयक / अध्यादेश ( Legislation ) व गौण विधी विधान (Sub-ordinate Legislation ) यांचे मसुदे तयार करण्याचे असल्यामुळे ते तांत्रिक, भिन्न व अत्यंत किचकट स्वरुपाचे व जबाबदारीचे आहे.

या शाखेत एकूण २२ अधिकारी आहेत. वेतनसंरचनेत सुधारणा केल्यास विशेष आर्थिक भार येणार नाही.

मागणी केलेली वेतनसंरचना प्रस्तावित करताना असुधारित वेतनश्रेणीतील 'विशेष वेतन' व त्यात किरकोळ वाढ यांचा तसेच अधिकारीस्तराची संपूर्ण संरचना ( Hierarchy of Officers ) लक्षात घेऊन सुधारित वेतनसंरचनेत सुधारित ग्रेड वेतन देण्याबाबत प्रस्तावित केले आहे.

'ब' शाखेची ( विधी विधान शाखेची ) पुनर्रचना करण्यामागचा मूळ उद्देश व हेतू, कामकाजाचे तांत्रिक स्वरुप व अधिकारीस्तराची संपूर्ण संरचना ( Hierarchy of Officers ) लक्षात घेता वर नमूद केलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील तांत्रिक त्रुटीचे निवारण करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस:-

१) प्रधान सचिव (विधी विधान) / सचिव (विधी विधान)

या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांच्या प्रधान सचिव / सचिव संवर्गाप्रमाणेच सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. [प्रधान सचिव संवर्गाची वेतनसंरचना - वेतनबँड पीबी-४:रू.३७४००-६७००० अधिक रू.१२००० ग्रेड वेतन ही वेतनश्रेणी रू.६७०००-७९००० (एचएजी) अशी सुधारित झाली आहे.] त्यामुळे सचिव संवर्गास प्रधान सचिव संवर्गाच्या वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही तसेच प्रधान सचिव संवर्गास मागणी केलेले ग्रेड वेतन रू.१४००० देखील समर्थनीय नाही व ते शासनाकडे आस्तित्वात नाही.

या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांच्या प्रधान सचिव / सचिव संवर्गाप्रमाणेच सुधारित वेतनसंरचना मंजूर केली असल्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

विधी विधानविषयक कामकाज विचारात घेऊन उपरोक्त संवर्गांना पाचव्या वेतन आयोगात रू.१५०० विशेष वेतन मंजूर केल्याचे दिसून येते. विशेष वेतनाविषयी प्रकरण-२, परिच्छेद २.२.९ मधील समितीचा दृष्टीकोन विचारात घेता सचिव (विधी विधान) संवर्गास त्या संवर्गास अनुज्ञेय असलेल्या ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. प्रधान सचिव संवर्गाच्या वेतनसंरचनेत वर नमूद केल्याप्रमाणे ग्रेड वेतन नसल्यामुळे या संवर्गासदेखील सचिव (विधी विधान) संवर्गास अनुज्ञेय असलेल्या ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

२) प्रारुपकार-नि-सह सचिव

३) उप-प्रारुपकार-नि-उप सचिव

४) सहाय्यक प्रारुपकार-नि-अवर सचिव

प्रारुपकार-नि-सह सचिव, उप-प्रारुपकार-नि-उप सचिव आणि सहाय्यक प्रारुपकार-नि-अवर सचिव या संवर्गांना यापूर्वी उच्च वेतनश्रेण्यांऐवजी विशेष वेतन मंजूर केले होते. या संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

तथापि, या संवर्गांना यापूर्वी उच्च वेतनश्रेण्यांऐवजी विशेष वेतन मंजूर केले होते ही वस्तुस्थिती तसेच विधी विधानविषयक कामकाजाचे स्वरूप विचारात घेता या संवर्गांना त्यांच्या ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

५) कनिष्ठ प्रारुपकार

विधी विधान शाखेची पुनर्रचना करताना शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र.११८२८(ए)/सी, दि.३० मे, १९७४ अन्वये सदर संवर्गाची निर्मिती रू.६००-८३० या वेतनश्रेणीत केली होती. ही वेतनश्रेणी विचारात घेऊन वेळोवेळी या संवर्गास सुधारित वेतनश्रेण्या / वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

तसेच सहाय्यक प्रारुपकार-नि-अवर सचिव संवर्गाच्या वेतनसंरचनेत समितीने बदल सुचविला नसल्याने त्या वरिष्ठ संवर्गाची वेतनसंरचना कनिष्ठ प्रारुपकार या संवर्गास मंजूर करणे समर्थनीय नाही. त्यामुळे या संवर्गाच्या रु.६६०० ग्रेड वेतनाच्या मागणीशी समिती सहमत नाही.

या पूर्वी सदर संवर्गास विशेष वेतन मंजूर करण्यात आलेले नाही. तथापि, विधी विधानविषयक कामकाजाचे स्वरुप विचारात घेता वर नमूद क्र.१ ते ४ येथील संवर्गाप्रमाणेच या संवर्गाच्या ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

ब) लघुवाद न्यायालय, मुंबई

१) प्रबंधक

२) अपर प्रबंधक

संघटनेचे अभिप्राय :- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- प्रबंधक व अपर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई या संवर्गास वेतनबँड पीबी-३ मंजूर करण्याच्या प्रस्तावाबाबत असे नमूद करण्यात येते की, लघुवाद न्यायालयाच्या आस्थापनेवरील प्रबंधक व अपर प्रबंधक या पदांना दिलेली वेतनश्रेणी ही त्या पदांचे अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या विचारात घेता मा.सर्वोच्च न्यायालयाच्या समान काम समान वेतन या निर्णयतत्त्वाशी विसंगत वाटते. त्यामुळे सदर पदांना सुयोग्य वेतनसंरचना देण्याची विनंती आहे.

केंद्र शासनाच्या अखत्यारीतील केंद्रीय प्रशासनिक न्यायाधिकरण, रेल्वे दावा प्राधिकरण, आयकर अपील अधिकरण यांच्या आस्थापनेवरील अनुक्रमे उप प्रबंधक, सहाय्यक प्रबंधक व प्रबंधक त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, तसेच महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण यांच्या आस्थापनेवरील अनुक्रमे उप प्रबंधक व सहाय्यक प्रबंधक, प्रबंधक व उप प्रबंधक आणि प्रबंधक ही समतुल्य पदे, त्यांची सुधारणापूर्व वेतनश्रेणी आणि सुधारित वेतनसंरचना, सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या पाहता असे निदर्शनास येते की, केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील समतुल्य पदांशी तुलना करता लघुवाद न्यायालयातील प्रबंधक व अपर प्रबंधक या पदांना असणारे अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि त्या पदास मंजूर केलेली वेतनसंरचना यामध्ये तफावत आढळते. त्यांना मंजूर केलेली वेतनसंरचना ही तुलनेने अगदीच कमी आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार त्यांना पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्यांच्या प्रमाणात वेतनसंरचना देणे इष्ट व आवश्यक आहे.

या न्यायालयात इतर दिवाणी न्यायालयांपेक्षा जास्त प्रमाणात व अनेकविध कायद्यांतर्गत दावे चालविले जातात. या न्यायालयाच्या व्यापक कारभाराचा विचार करुन शासनाने या न्यायालयाच्या आस्थापनेवर प्रबंधकाचे १ पद व अपर प्रबंधकाची ४ पदे मंजूर करुन ती नियुक्तीने भरली आहेत. सदर पदांस असणारे व्यापक अधिकार आणि पार पाडाव्या लागणाऱ्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन शासनाने त्यास राजपत्रित अधिकारी वर्ग-१ चा दर्जा दिला आहे. लघुवाद इलाखा न्यायालय, शहर मुंबई (Presidency Small Causes Court Act, 1882) कायद्यांतर्गत प्रबंधक / अपर प्रबंधक यांना न्यायिक अधिकारदेखील प्राप्त झाले आहेत. प्रबंधक व अपर प्रबंधक यांना स्वतंत्र न्यायालय असून ते त्या न्यायालयांतर्गत Presidency Small Causes Court Act, 1882 प्रमाणे न्यायालयीन कामकाज चालवितात. तसेच लघुवाद न्यायालयास मा. आंतरराष्ट्रीय न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय तसेच त्यांच्या अधिपत्याखालील इतर न्यायालयांच्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी, आदेशिका इ.ची बजावणी करावी लागते. हे काम प्रबंधक व अपर प्रबंधक यांच्या अखत्यारीत चालते. प्रबंधक हा मुख्य प्रशासकीय अधिकारी असून प्रबंधक / अपर प्रबंधक यांस न्यायिक अधिकारांबरोबरच कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व प्रशासकीय अधिकारदेखील आहेत.

प्रबंधक व अपर प्रबंधक यांची नियुक्ती निवडश्रेणीने होते. सदर पदांसाठी उमेदवार हा विधी शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक असून त्याची या कार्यालयाच्या आस्थापनेवर १० वर्षे सलग सेवा पूर्ण असणे आवश्यक आहे. या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता. या पदांचे अधिकार आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या या बाबींचा विचार करता या पदांची वेतनसंरचना गट-ब आणि गट-क मधील कर्मचाऱ्यांच्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च असणे आवश्यक आहे.

राजपत्रित गट-अ मध्ये असलेल्या प्रबंधक व अपर प्रबंधक या पदांची वेतनसंरचना अराजपत्रित गट-क मधील पदांच्या वेतनसंरचनेबरोबर ठेवल्याने गट-अ मधील पदांचे अवमूल्यन होत आहे. गट-अ व गट-क मधील पदांच्या वेतनसंरचनेत समुचित फरक ठेवणे आवश्यक आहे. या कार्यालयातील अराजपत्रित गट-क मधील उप प्रबंधक, सहाय्यक प्रबंधक, लेखापाल, मुख्य न्यायाधीशांचे न्याय लिपिक ( असुधारित वेतनश्रेणी रु.५५००-१७५-९०००) व रोखपाल, न्याय लिपिक, मुख्य लिपिक व अधीक्षक, पत्रव्यवहार विभाग (असुधारित वेतनश्रेणी रु.५०००-१५०- ८०००) या पदांची वेतनश्रेणी प्रबंधक व अपर प्रबंधक गट-अ (असुधारित वेतनश्रेणी रु.७४५०- २२५-११५००) या पदांच्या वेतनश्रेणीत समाविष्ठ करुन वरील सर्व पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड पीबी-२ (रु.९३००-३४८००) हा एकच वेतनबँड मंजूर करण्यात आला आहे. केवळ ग्रेड वेतनामध्ये (रु.४२००-४६००) निव्वळ रु.१०० ते ४०० इतकाच फरक दिसून येतो. परिणामी गट-अ मधील अधिकारी व गट-क मधील कर्मचारी यांच्या वेतनामध्ये नगण्य फरक आढळून येतो. गट-अ मधील अधिकाऱ्यांचे सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा साकल्याने विचार करता तसेच प्रशासकीय अधिकारांची अंमलबजावणी करताना ही बाब अडचणीची ठरते. केंद्र व राज्य शासनाच्या इतर कार्यालयातील गट-अ व गट-क मधील पदांच्या वेतनसंरचनेमध्ये अशा प्रकारची तफावत / त्रुटी आढळून येत नाही.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि. १९ मार्च, १९९५ अन्वये तहसिलदार या पदास कनिष्ठ वर्ग-१ दर्जा व रु.२२००-३७०० ही वेतनश्रेणी देण्यात आली असून, त्या पदास पाचव्या वेतन आयोगानुसार रु.७४५०-२२५-११५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. लघुवाद न्यायालय, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील प्रबंधक व अपर प्रबंधक या राजपत्रित वर्ग-१ च्या पदांस चौथ्या वेतन आयोगानुसार रु.२३७५-७५-३२०० द.रो. १००-३५०० ही वेतनश्रेणी होती. पाचव्या वेतन आयोगात या पदांना रु.७४५०-२२५-११५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. तहसिलदार या पदास गट-अ दर्जा असल्यामुळे हकीम समितीच्या शिफारशीनुसार त्या पदास सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आस्थापनेवरील उप प्रबंधक व सहाय्यक प्रबंधक या पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड पीबी-३ म्हणजे रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण या कार्यालयाच्या आस्थापनेवरील उप प्रबंधक व सहाय्यक प्रबंधक या पदांचे सेवाप्रवेश नियम, अधिकार आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांपेक्षा लघुवाद न्यायालयाच्या आस्थापनेवरील प्रबंधक व अपर प्रबंधक या पदांच्या सेवाशर्ती, अधिकार आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चितपणे अधिक आहेत. त्यामुळे प्रबंधक व अपर प्रबंधक या पदांसाठी उच्च वेतनसंरचना देऊन या पदांचा दर्जा राखणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रबंधक व अपर प्रबंधक या पदांना वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**समितीची शिफारस:-**

१) प्रबंधक

२) अपर प्रबंधक

प्रस्तुत संवर्गांची केंद्रीय प्रशासनिक न्यायाधिकरण, रेल्वे दावा प्राधिकरण, आयकर अपील अधिकरण त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, तसेच महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण या आस्थापनांवरील संवर्गांशी तुलना केली आहे. तथापि, वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) प्रस्तुत संवर्गांना वर नमूद आस्थापनांवरील संवर्गांशी समतुल्य ठरविलेले नाही; तर या संवर्गांची तिसऱ्या वेतन आयोगातील रू.७५०-११५० ही वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष रू.२३७५-३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस केली होती. तद्नंतर पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात या वेतनश्रेणीशी समकक्ष अनुक्रमे रू.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी आणि वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे.

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण व महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणातील प्रबंधक संवर्गास तिसऱ्या वेतन आयोगात अनुक्रमे रू.६८०-१५०० व रू.६८०-१२५० या विचाराधीन संवर्गापेक्षा तुलनेने उच्च वेतनश्रेण्या होत्या. त्याआधारे या संवर्गांना तद्नंतर वेळावेळी समकक्ष सुधारित वेतनश्रेण्या / वेतनसंरचना विहित केल्या आहेत. तसेच, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणातील उप प्रबंधक संवर्गात तहसिलदार संवर्गातूनच नियुक्ती केली जात असल्याने त्या संवर्गास तहसिलदार संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर केली आहे.

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे कार्यक्षेत्र व परिणामी कर्तव्याची व्याप्ती व्यापक असल्याने या आस्थापनांवरील व लघुवाद न्यायालयांतील प्रबंधक आणि अपर प्रबंधक संवर्गाची तुलना उचित ठरत नाही. त्यामुळे या संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी समर्थनीय नाही.

सहाव्या वेतन आयोगात चार वेतनबँड विहित केल्यामुळे एका वेतनबँडमध्ये अनेक वेतनश्रेण्या एकवटल्या गेल्या आहेत. अशी परिस्थिती सर्वच प्रशासकीय विभागांमध्ये आहे. असे असले तरी, प्रत्येक असुधारित वेतनश्रेणीसाठी स्वतंत्र ग्रेड वेतन विहित केले आहे आणि संवर्गाचा दर्जा ग्रेड वेतनाशी निगडीत आहे. त्यामुळे राजपत्रित गट-अ मध्ये असलेल्या प्रबंधक व अपर प्रबंधक या पदांची वेतनसंरचना अराजपत्रित गट-क मधील पदांच्या वेतनसंरचनेप्रमाणे आहे असे म्हणणे सयुक्तिक नाही.

प्रस्तुत संवर्गांना रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

तथापि, गट-अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रू.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार प्रबंधक आणि अपर प्रबंधक या संवर्गांना रू.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी विधी व न्याय विभाग आणि वित्त विभागाने तपासणी करून निर्णय घेणे योग्य होईल.

तसेच पदोन्नतीचा संवर्ग व निम्न संवर्गास एकच सुधारित वेतनसंरचना अनुज्ञेय होत असल्यास पदोन्नतीच्या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती,२००८ च्या अहवालातील (परिच्छेद ३.७.२) शिफारस शासनाने स्वीकारली आहे. प्रबंधक आणि अपर प्रबंधक या दोन्ही संवर्गांना एकच सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे आणि या संवर्गांना वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार रु.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेय झाल्यास दोन्ही संवर्गांची वेतनसंरचना एकसारखीच होऊ शकेल. प्रबंधक हा अपर प्रबंधक संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रबंधक हा अपर प्रबंधक संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग असल्यास पदोन्नतीच्या संवर्गास अनुज्ञेय असलेले अतिरिक्त ग्रेड वेतन प्रबंधक संवर्गास अनुज्ञेय होऊ शकेल. याबाबतही विधी व न्याय विभाग आणि वित्त विभागाने तपासणी करून निर्णय घेणे योग्य होईल.

क) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण - मुंबई उच्च न्यायालय सेवा समिती व उप समित्या

आस्थापना अधिकारी -

या संवर्गाच्या वेतनत्रुटीसंबंधीचा स्वतंत्र अहवाल यापूर्वीच शासनास सादर केला आहे. (कृपया प्रकरण-४ पहावे.)

# ३.११ (अ) - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | | | | | |
| १ | दंतशल्यचिकित्सक | ८०००-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | अधीक्षक, शुश्रुषा सेवा | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | ३७४००-६७००० | ७६०० |
| ३ | प्राचार्य, शुश्रुषा संस्था | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ४ | प्राध्यापक, शुश्रुषा | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ५ | अधिसेविका (७५० व त्यापेक्षा जास्त बेड्स) | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ६ | अधिसेविका (५०० ते ७५० बेड्स) | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ७ | अधिसेविका | ६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रू.१६० मनोरूग्ण रूग्णालयातील फक्त ५ पदांसाठी ) | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ८ | सहाय्यक अधिसेविका | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ९ | परिसेविका पाठ्यनिदेशक / चिकित्सालयीन पाठ्यनिदेशक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १० | सार्वजनिक आरोग्य परिचारिका / | ५५००-९००० (जिल्हा सार्वजनिक आरोग्य परिचारिका म्हणून नियुक्ती दिल्यास दरमहा विशेष वेतन रू.३००) | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| | मानसोपचार परिचारिका / बालरोग परिचारिका | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४८०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | परिसेविका | ५५००-९००० (विशेष वेतन रु.१२० शस्त्रक्रीया-गृहातील ८४ पदांसाठी आणि ५५ रात्रपाळी पर्यवेक्षक पदांसाठी ) | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| १२ | अधिपरिचारिका | ५०००-८००० (अधिक विशेष वेतन रु.८० शस्त्रक्रीया-गृहातील २२७ पदांसाठी ) | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| १३ | व्यवसायोपचार तज्ञ | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १४ | भौतिकोपचार तज्ञ | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १५ | निवडश्रेणी औषध निर्माता | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| १६ | वरिष्ठ औषध निर्माता | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| १७ | क्ष-किरण/ सी.टी.स्कॅन तंत्रज्ञ / एमआरआय तंत्रज्ञ | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८०० (१२ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर)<br>३)९३००-३४८०० (२४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | ४४००<br>४६००<br>५४०० |
| १८ | मिश्रक / औषध निर्माता | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| १९ | दंत तंत्रज्ञ | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| २० | कलाकार सहाय्यक / कलाकार / छायाचित्रकार-नि-कलाकार / कलाकार -नि- छायाचित्रकार / छायाचित्रकार | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| २१ | दंत आरोग्यक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| २२ | फिटर / सुतार / नळ कारागीर / बाष्प पात्र परिचर / वीजतंत्री / यांत्रिक / यांत्रिक -नि-वीजतंत्री / वातानुकूलन यंत्रचालक / शिंपी / सांधाता / तारतंत्री / | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | लोहार / रंगारी / वस्त्र भांडारपाल | | | | |
| २३ | प्रशासकीय अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| २४ | कार्यालयीन अधीक्षक / लेखा अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| २५ | वरिष्ठ सहाय्यक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| २६ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| २७ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २८०० |
| | ब) आयुर्वेद संचालनालय | | | | |
| १ | संचालक | १६४००-२०९०० | ३७४००-६७००० | ८९०० | ३७४००-६७००० | १२००० |
| २ | उप संचालक, ( होमिओपॅथी ) | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ३ | उप संचालक, आयुर्वेद (नामाभिदानित) # | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ४ | निवासी वैद्यकीय अधिकारी | ८०००-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० | १५६००-३९१०० | ५५०० |
| ५ | अपघात वैद्यकीय अधिकारी | ८०००-१३५०० | ९३००-३४८०० | ५४०० | १५६००-३९१०० | ५५०० |
| ६ | औषधनिर्माता | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५५०० |
| ७ | विकृतीविज्ञानशास्त्रज्ञ व प्रयोगशाळा निदेशक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ८ | सहाय्यक पंचकर्म वैद्य | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ९ | पंचकर्म वैद्य | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १० | अपघात वैद्यकीय अधिकारी (अराजपत्रित) ** | ६५००-१०५०० ** | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ११ | सहाय्यक वैद्य ** | ६५००-१०५०० ** | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १२ | सहाय्यक औषधनिर्माता (आयुर्वेद) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १३ | सहाय्यक औषधनिर्माता (युनानी) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १४ | वैज्ञानिक सहाय्यक -नि-वैद्य [सहाय्यक वैज्ञानिक अधिकारी-नि-वैद्य**] | ६५००-१०५०० ** | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | वैज्ञानिक सहाय्यक -नि-हकीम [सहाय्यक वैज्ञानिक अधिकारी-नि-हकीम**] | ६५००-१०५०० ** | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १६ | आयुर्वेद विस्तार अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १७ | सहाय्यक महिला वैद्य [वैद्य (पुरुष / स्त्री)**] | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| | क) अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन | | | | | |
| १ | पर्यवेक्षक (अन्न) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | अन्न निरीक्षक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४४०० |

** पदनाम / असुधारित वेतनश्रेणी शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.एवायएस-१०८९/३६/आयु-१ दि. ६ मे, २००० आणि शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.आयुसे-२००४/प्र.क्र.११४/०४/आयु-१ दि. १७ ऑक्टोबर, २००७ नुसार मंजूर आकृतीबंधाप्रमाणे.

# शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.आयुसे-१०९८/प्र.क्र.२०५/९८/आयु-१ दि. ८ ऑक्टोबर, २००१ नुसार पदनाम व वेतनश्रेणी.

अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय:-

१) दंतशल्यचिकित्सक

संघटनेचे अभिप्राय:- या संवर्गाच्या सुधारित वेतनसंरचनेत त्रुटी असल्याचे आढळून येते. या संवर्गावर झालेला अन्याय दूर करून सदर पदास सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.१५६००-३९१०० मंजूर करण्यात यावा, ही विनंती.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- संघटनेच्या मागणीशी सहमत. सदर पदास सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.१५६००-३९१०० (ग्रेड वेतन रु.५४००) ही वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेऐवजी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी केली आहे. या संवर्गाची असुधारित वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० ही होती. अहवालाच्या प्रकरण -२ मधील परिच्छेद २.२.८ मधील विवेचन विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२) अधीक्षक, शुश्रुषा सेवा / ३) प्राचार्य, शुश्रुषा संस्था / ४) प्राध्यापक, शुश्रुषा / ५)अधिसेविका (७५० व त्यापेक्षा जास्त बेड्स) / ६) अधिसेविका (५०० ते ७५० बेड्स) / ७) अधिसेविका / ८)सहाय्यक अधिसेविका / ९) परिसेविका पाठ्यनिदेशक / चिकित्सालयीन पाठ्यनिदेशक / १०)सार्वजनिक आरोग्य परिचारिका / मानसोपचार परिचारिका / बालरोग परिचारिका / ११)परिसेविका / १२) अधिपरिचारिका

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनाच्या सेवेत असलेल्या परिचारिकांना देण्यात आलेले वेतन व भत्ते लागू करावेत. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार परिचारिकांना देण्यात आलेले वाढीव वेतन व ग्रेड वेतन राज्य शासनाच्या परिचारिकांनाही मिळावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय: सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यासाठी राज्य वेतन सुधारणा समिती सन २००८ मध्ये नेमण्यात आली होती. सदर समितीने त्यांच्या अहवालात पृ.क्र.५४ व

५५ वर सहाव्या वेतन आयोगाच्या उच्च वेतनसंरचनेत केलेली शिफारस व त्यानुसार केंद्र शासनाने घेतलेला निर्णय याची समितीस जाणीव आहे असे नमूद केले आहे. परंतु समतुल्यतेचे कारण दाखवून परिचारिकांना केंद्रातील परिचारिकांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात आले नाहीत.

वैद्यकीय संवर्गात येणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांपेक्षा परिचारिका संवर्गाच्या कामाचे स्वरुप वेगळे आहे. अल्पसंख्येने असलेल्या परिचारिकांना तीनही पाळ्यांमध्ये रोगजंतूंच्या वातावरणात काम करावे लागते. अशा परिस्थितीत त्या रुग्णांची शुश्रुषा करुन आपली जबाबदारी सांभाळतात.

चिकित्सालयीन निर्देशिका / पाठयनिर्देशिका या दोन्ही पदांची वेतनश्रेणी एकसमान आहे, त्यामुळे केंद्रीय वेतनबँड व ग्रेडवेतनाप्रमाणे सुधारणा द्यावी.

केंद्र शासनाच्या सेवेतील परिचारिकांना वेतनाशी संबंधित असलेले भत्ते उदा. धुलाई भत्ता, गणवेश भत्ता, जोखीम भत्ता, शैक्षणिक वेतनवाढी आणि विशिष्ट विभागात कार्यरत असणाऱ्या परिचारीकांना देण्यात येणारे विशेष वेतन राज्याच्या सेवेतील परिचारिकांनाही मिळावे.

अधीक्षिका, शुश्रुषा सेवा यांचे नियंत्रण संपूर्ण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील परिचारिका संवर्गावर असते. सदर पद हे परिचारिका संवर्गातील ज्येष्ठतम पद आहे. या पदास जबाबदारी जास्त असूनही सहाव्या वेतन आयोगामध्ये प्राचार्य व अधीक्षिका, शुश्रुषा या पदासाठी एकच वेतनसंरचना देण्यात आली आहे. राज्याच्या नर्सिंग कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन व ग्रेड वेतन निश्चित करण्यात यावे. अधिसेविका गट -क ते अधिसेविका गट-ब, श्रेणी-१, २ व ३ साठी एकच वेतनश्रेणी दिली आहे. या सर्व पदांची जबाबदारी भिन्न आहे हे विचारात घेऊन त्यांच्या वेतनामध्ये देखील सुधारणा होणे आवश्यक आहे, असे विभागाचे मत आहे.

आरोग्य सेवेमध्ये डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी व अध्यापकीय वर्गातील अधिकारी या सर्वांच्या वेतनामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. परिचारिका ह्या आरोग्य सेवेचा अविभाज्य घटक असून त्यांच्या वेतनामध्ये देखील समाधानकारक सुधारणा होणे आवश्यक आहे, असे विभागाचे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

२) अधीक्षक, शुश्रुषा सेवा

३) प्राचार्य, शुश्रुषा संस्था

४) प्राध्यापक, शुश्रुषा

५) अधिसेविका (७५० व त्यापेक्षा जास्त बेड्स)

६) अधिसेविका (५०० ते ७५० बेड्स)

७) अधिसेविका

८) सहाय्यक अधिसेविका

९) परिसेविका पाठ्यनिदेशक / चिकित्सालयीन पाठ्यनिदेशक

१०) सार्वजनिक आरोग्य परिचारिका / मानसोपचार परिचारिका / बालरोग परिचारिका

११) परिसेविका

१२) अधिपरिचारिका

वरील अ.क्र.२) अधीक्षक, शुश्रुषा सेवा आणि ३) प्राचार्य, शुश्रुषा संस्था या संवर्गांना राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने शिफारस केलेली असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

उर्वरित संवर्गांना राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने (अहवाल परिच्छेद ३.१२) असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्षतेपेक्षा उच्च ग्रेड वेतनाची शिफारस केली होती. परंतु त्यामुळे असुधारित वेतनश्रेणीमध्ये गट-ब आणि गट-क मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे अथवा त्यांच्यापेक्षा निम्न वेतनश्रेणीमध्ये असणाऱ्या वरील काही संवर्गांना वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तुलनेने उच्च अथवा वैद्यकीय अधिकाऱ्यांइतके ग्रेड वेतन अनुज्ञेय झाले असते. वैद्यकीय अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे स्वरूप पाहता असे होणे इष्ट ठरले नसते. तसेच या पदोन्नती साखळीतील

संवर्गाच्या वेतनसंरचनेतील आपापसामधील सापेक्षतेवर परिणाम झाला असता. त्यामुळे शासनाने समितीची शिफारस स्वीकृत न करता या संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

प्रस्तुत संवर्गांची मागणी वैद्यकीय अधिकारी गट-अ / गट-ब संवर्गाच्या वेतनसंरचनेपेक्षा अधिक तर काही संवर्गांच्या बाबतीत वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाच्या वेतनसंरचनेप्रमाणे आहे. वरील परिच्छेदात नमूद केलेली पार्श्वभूमी विचारात घेता या संवर्गांच्या वेतनसंरचनेत बदल करणे योग्य होणार नाही.

तसेच अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता केंद्र शासनाकडील संवर्गांप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे समिती या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी सहमत नाही.

१३) व्यवसायोपचार तज्ञ / १४) भौतिकोपचार तज्ञ

संघटनेचे अभिप्राय:- सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाद्वारे व्यवसायोपचार तज्ञ या पदाकरीता रु.५५००-९००० ऐवजी रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी गृहीत धरुन वेतननिश्चिती केली आहे. मात्र महाराष्ट्र राज्याच्या सहाव्या वेतन आयोगात त्याची दखल घेतली गेली नाही.

त्याचप्रमाणे मा. खासदार, अमरसिंग यांच्या अध्यक्षतेखालील Department Related Parliamentary Standing Committe on Health and Family Welfare यांनी त्यांच्या Thirty-First Report on Para - Medical and Physiotherapy Central Council Bill, 2007 वरील आपल्या ऑक्टोबर, २००८ च्या अहवालात शैक्षणिक पात्रता लक्षात घेवून या पदांना उच्च वेतनबँड व ग्रेड वेतन देण्याबाबत शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद क्र.३.२.२ प्रमाणे वेगवेगळे ग्रेड वेतन सुचविण्यात आले आहेत व ते शासनाने स्वीकृत केले आहेत. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग यांच्या दि.१७.११.२००८च्या पत्राद्वारे शैक्षणिक पात्रता व कर्तव्ये लक्षात घेऊन रु.१५६००-३९१०० हा वेतनबँड व रु.५४०० हे ग्रेड वेतन या पदांना देण्याची शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई यांच्या दि.६.११.२००८च्या पत्राद्वारे रु.१५६००-३९१०० हा वेतनबँड व रु.५४०० हे ग्रेड वेतन या पदांना देण्याची शिफारस केली आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे केंद्रामध्ये या पदांना पदविका (Diploma) आधारभूत धरुन वेतनबँड व ग्रेड वेतन दिले आहे. तर राज्यातील या पदांकरिता व्यावसायिक पदवी (Professional Degree) अशी सेवा पात्रता आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासनाकडील व्यवसायोपचार तज्ञ व भौतिकोपचार तज्ञ या पदांची शैक्षणिक पात्रता कमीत कमी पदविका अशी आहे. तर राज्यातील या पदांची शैक्षणिक पात्रता कमीत कमी पदवी अशी आहे. राज्यातील व्यवसायोपचार तज्ञ व भौतिकोपचार तज्ञ पदवीधारक असूनही त्यांना पदविकाधारकांची वेतनसंरचना देण्यात आली आहे. केंद्राकडील पदवीधारकांना राजपत्रित गट-ब असा दर्जा देऊन वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन अशी वेतनसंरचना देण्यात आली आहे. वास्तव केंद्राकडील पदविकाधारकांची रु.९३००-३४८०० अशी वेतनसंरचना न देता केंद्राकडील पदवीधारकांची वेतनसंरचना राज्यातील पदवीधारक व्यवसायोपचार तज्ञ व भौतिकोपचार तज्ञ यांना लागू करण्याची विनंती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गास केंद्र शासनाकडील संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तथापि, पाचव्या वेतन आयोगात राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ च्या शिफारशीनुसार (अहवाल भाग-२, परिच्छेद ४.१६) या संवर्गांना रु.४५००-७००० या समकक्ष

वेतनश्रेणीऐवजी रू.५५००-९००० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली होती. या वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात केली आहे.

अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता केंद्र शासनाकडील संवर्गांप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे समिती या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी सहमत नाही.

१५) निवडश्रेणी औषधनिर्माता / १६) वरिष्ठ औषधनिर्माता / १८) मिश्रक / औषधनिर्माता

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या औषधनिर्मात्यांना वरीष्ठ औषधनिर्माता हे पद पदोन्नतीसाठी उपलब्ध आहे. प्रस्तावित केल्याप्रमाणे वेतनसंरचना सुधारित झाल्यास औषधनिर्मात्यांना एकसमान वेतनसंरचनेत आणून झालेली त्रुटी दूर करता येईल अशी शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

केंद्र शासनाकडील संवर्गास नियुक्तीच्या वेळेस वेतनबँड रू.५२००-२०२०० अधिक रू.२८०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. तसेच रू.५५००-९००० आणि रू.५०००-८००० या वेतनश्रेणीतील औषधनिर्माता श्रेणी-१ व २ संवर्गांचे विलीनीकरण करून रू.९३००-३४८०० अधिक रू.४२०० ही अकार्यात्मक वेतनसंरचना (२ वर्षांच्या सेवेनंतर) मंजूर केली आहे.

राज्य शासनाकडील पदसंरचना केंद्र शासनापेक्षा भिन्न आहे. वरिष्ठ औषधनिर्माता हे पद औषधनिर्माता संवर्गाच्या पदोन्नतीचे पद आहे तर निवडश्रेणी औषधनिर्माता हे पद वरिष्ठ औषधनिर्माता संवर्गाच्या पदोन्नतीचे पद आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊनच पाचव्या वेतन आयोगात निवडश्रेणी औषधनिर्माता आणि वरिष्ठ औषधनिर्माता या दोन्ही संवर्गांना (असुधारित वेतनश्रेणी रू.१४००-२६००) समकक्ष एकच रू.५०००-८००० वेतनश्रेणी मंजूर न करता अनुक्रमे रू.५५००-९००० व रू.५०००-८००० ह्या वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. त्यामुळे या दोन्ही संवर्गांना प्रस्तावित केल्याप्रमाणे एकच वेतनसंरचना मंजूर करता येणार नाही.

प्रस्तावित केलेली वेतनसंरचना समर्थनीय नाही. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

१७) क्ष-किरण / सी.टी.स्कॅन तंत्रज्ञ / एमआरआय तंत्रज्ञ

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- ग्रेड वेतन रु.४४०० देण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गाचे तांत्रिक स्वरूप लक्षात घेऊन रू.१४००-२३०० वेतनश्रेणीची शिफारस केली होती. पाचव्या वेतन आयोगात या संवर्गाची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन रू.४५००-७००० या समकक्ष सुधारित वेतनश्रेणीऐवजी रू.५०००-८००० ही उच्च सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली होती. आता प्रस्तावित उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही.

पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१९) दंत तंत्रज्ञ

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- ग्रेड वेतन रु.४२०० देण्यास हरकत नसावी.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गाचे तांत्रिक स्वरूप लक्षात घेऊन रू.१४००-२३०० वेतनश्रेणीची शिफारस केली होती व त्यानुसार सदर वेतनश्रेणी मंजूर केली होती.

या संवर्गाला पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२०) कलाकार सहाय्यक / कलाकार / छायाचित्रकार-नि-कलाकार / कलाकार-नि-छायाचित्रकार / छायाचित्रकार

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमधील कलाकार - छायाचित्रकार पदास चौथ्या वेतन आयोगानुसार रू.१४००-२३००, पाचव्या वेतन आयोगानुसार रू.४५००-७००० ही वेतनश्रेणी आणि सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रू.५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रू.२८०० ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. तिसऱ्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी निश्चितीत दिली गेलेली वेतनश्रेणी चौथ्या वेतन आयोगात सामावून घेताना चूक झाली असून त्यानंतर ती दुरुस्त न केल्याने नंतरच्या प्रत्येक वेतन आयोगाच्या वेळी अन्याय झाल्याचे कलाकार - छायाचित्रकार राज्यस्तरीय संघटनेने निवेदन दिले आहे व केंद्र शासनाप्रमाणे वेतनबँड रू.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रू.४२०० ही वेतनसंरचना मंजूर करण्याची विनंती केली आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि प्रशासकीय विभाग सदर मागणीशी सहमत असून तशी शिफारस करत आहे.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) छायाचित्रकार संवर्गास माहिती व जनसंपर्क महासंचालकांकडील छायाचित्रकार संवर्गाशी समकक्ष ठरविले आहे. जनसंपर्क महासंचालकांकडील छायाचित्रकार संवर्गास वेतन समानीकरण समितीने त्यांच्या अहवालातील परिच्छेद ३.१४ नुसार रू.१४००-२३०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. तसेच कलाकार सहाय्यक / कलाकार / छायाचित्रकार-नि-कलाकार / कलाकार-नि-छायाचित्रकार या संवर्गांनाही परिच्छेद ३.१४ नुसार रू.१४००-२३०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. अशीच शिफारस इतर विभागांतील छायाचित्रकार संवर्गाच्याबाबतीतदेखील केली होती. त्यानुसार सर्वत्र छायाचित्रकार नि तत्सम संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रू.१४००-२३०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

२१) दंतआरोग्यक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पदाला केंद्र शासनाने दि.१७.११.२००५च्या आदेशान्वये रू.५०००-८००० अशी वेतनश्रेणी दि.४.१०.२००५ पासून मंजूर केली आहे. तसेच सहाव्या वेतन आयोगात रू.९३००-३४८०० हा वेतनबँड दिला आहे. सदर पदावर नियुक्तीकरीता राज्य व केंद्र शासनाचे शैक्षणिक अर्हतेचे निकष दि.२०.८.२००८ पर्यंत सारखेच होते. त्यामुळे सदर पदाची वेतनसंरचना केंद्राप्रमाणे सुधारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गास केंद्र शासनाकडील दंतआरोग्यक (डेंटल हायजिनिस्ट) संवर्गाची समकक्षता दिलेली नाही. तथापि, संवर्गाच्या कामकाजाचे स्वरूप लक्षात घेऊन तिसऱ्या वेतन आयोगातील रू.२९०-५४० वेतनश्रेणीशी समकक्ष

रू.९७५-१६६० ऐवजी रू.१२००-१८०० या तुलनेने उच्च वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गास सदर वेतनश्रेणी मंजूर केली होती.

या संवर्गाची शैक्षणिक अर्हता मॅट्रीक अधिक डेंटल हायजिनिस्ट कोर्स (१०+२) अशी आहे. राज्य शासनाकडे नियुक्तीसाठी ही शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या इतर संवर्गांनाही या संवर्गाप्रमाणेच वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगामध्ये असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२२) फिटर / सुतार / नळ कारागीर / बाष्पपात्र परिचर / वीजतंत्री / यांत्रिक / यांत्रिक-नि-वीजतंत्री / वातानुकूलित यंत्रचालक / शिंपी / सांधाता / तारतंत्री / लोहार / रंगारी / वस्त्र भांडारपाल

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- तांत्रिक स्वरूपाचे काम असल्यामुळे ग्रेड वेतन रु.२४०० देण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गाच्या कामकाजाचे तांत्रिक स्वरुप लक्षात घेऊनच वेतन समानीकरण समितीने चौथ्या वेतन आयोगात या संवर्गास रू.९५०-१४०० वेतनश्रेणीची शिफारस केली होती. तद्नंतर पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगामध्ये या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२३) प्रशासकीय अधिकारी / २४) कार्यालयीन अधीक्षक / लेखा अधीक्षक / २५) वरिष्ठ सहाय्यक / २६)वरिष्ठ लिपिक / २७)कनिष्ठ लिपिक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- प्रस्तावित केल्याप्रमाणे पदनामांमध्ये बदल करुन, त्यांना प्रस्तावित वेतनसंरचना देण्याविषयी सकारात्मक तसेच उचित कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

२४) प्रशासकीय अधिकारी

२५) कार्यालयीन अधीक्षक / लेखा अधीक्षक

२६) वरिष्ठ सहाय्यक

२७) वरिष्ठ लिपिक

२८) कनिष्ठ लिपिक

वर नमूद संवर्गांना अनुक्रमे विशेष प्रशासकीय अधिकारी (वरिष्ठ स्तर), प्रशासकीय अधिकारी (कनिष्ठ स्तर), सहाय्यक प्रशासकीय अधिकारी (वर्ग-२), वरिष्ठ प्रशासकीय सहाय्यक आणि कनिष्ठ प्रशासकीय सहाय्यक ही पदनामे देऊन उच्च वेतनसंरचनेची मागणी केली आहे. पदनामामध्ये बदल करण्याची बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच सहाव्या वेतन आयोगामध्ये पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

ब) आयुर्वेद संचालनालय

१) संचालक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- संचालक, आयुर्वेद हे पद या संचालनालयाचे सर्वोच्च पद असून विभागप्रमुखाचे पद आहे. सदर पद भरताना शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील अधिष्ठाता पदावरील कार्यरत अध्यापकांचा सेवाज्येष्ठतेनुसार विचार करण्यात येतो. अधिष्ठाता पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने वेतन बँड रु.३७४००-६७००० व रु.१०००० ग्रेड वेतन अधिक रु.३००० विशेष वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. सुधारित वेतनसंरचनेत संचालक, आयुर्वेद पदासाठी अधिष्ठाता पदाच्या ग्रेड वेतनापेक्षा (रु.१०,०००) कमी म्हणजेच रु.८९०० इतके ग्रेड वेतन मंजूर केले आहे. संचालक, आयुर्वेद हे पद अधिष्ठाता पदधारकांसाठी पदोन्नतीचे पद असून सदर पदावरील पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदारीमध्ये निश्चितच वाढ होते. त्यामुळे संचालक, आयुर्वेद पदाची वेतनसंरचना अधिष्ठाता पदाच्या वेतन संरचनेपेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. त्यामुळे संचालक, आयुर्वेद पदासाठी सुधारित वेतनसंरचनेत रु. ८९०० ऐवजी रु.१२००० ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक आहे.

## समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) त्यांच्या अहवालातील परिच्छेद ३.२९ मध्ये विभागप्रमुखांच्या वेतनश्रेणीविषयक विवेचनात असे नमूद केले आहे की, संचालकांची वेतनश्रेणी शासनाच्या सचिवांच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त असू नये. तसेच संचालक, सह संचालक आणि उप संचालक इ. प्रशासकीय पदे ही शिक्षकीय संवर्गांची नियंत्रक पदे असली तरी या पदांच्या वेतनश्रेणी निश्चितीमध्ये शिक्षकीय पदांच्या वेतनश्रेणींचा प्रभाव असू नये. प्रशासकीय पदांच्या वेतनश्रेण्या गुणवत्तेनुसारच विहित कराव्यात.

आम्हीदेखील वरील अभिप्रायांशी सहमत आहोत. तसेच या संवर्गास मंजूर केलेली वेतनसंरचना राज्य सेवेतील विभागप्रमुखांना मंजूर केलेल्या विविध वेतनसंरचनेपैकी उच्चतम वेतनसंरचना आहे. मागणी केलेले ग्रेड वेतन रु.१२००० हे प्रशासकीय विभागप्रमुख असलेल्या सचिव संवर्गाच्या ग्रेड वेतनापेक्षाही अधिक आहे. त्यामुळे संचालक, आयुर्वेद या संवर्गास मागणी केल्यानुसार वेतनसंरचना मंजूर करणे समर्थनीय नाही.

या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन सुधारित समकक्ष वेतनसंरचना विहित केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२) उप संचालक, (होमिओपॅथी) / ३) उप संचालक, आयुर्वेद (नामाभिदानित)

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- उपसंचालक, होमिओपॅथी या पदास शासन निर्णय क्र.आयुसे-१०९८/प्र.क्र.२०५/९८/आयु-१, दि.८.१०.२००१ अन्वये रु.१०६५०-१५८५० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. तसेच या संचालनालयाच्या आस्थापनेवर उप संचालक, आयुर्वेद हे पद कार्यरत नसून सहायक संचालक, आयुर्वेद पदावर १२ वर्षे सेवा करणाऱ्या सहायक संचालकांचे नामाभिदान उपसंचालक, आयुर्वेद असे करण्यात आले आहे. उक्त शासन निर्णय दि.८.१०.२००१ अन्वये सदर पदासदेखील रु.१०६५०-१५८५० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सदर वेतनश्रेणीस वेतन बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.६६०० ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य सेवा संचालनालयातील उपसंचालक या पदास रु.१२०००-१६५०० ही असुधारित वेतनश्रेणी असून सदर वेतनश्रेणीस वेतन बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.७६०० ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. करीता या संचालनालयातील उप संचालक, होमिओपॅथी व नामाभिधानित उपसंचालक, आयुर्वेद या पदासदेखील सार्वजनिक आरोग्य सेवा संचालनालयातील उप संचालक या समकक्ष पदाप्रमाणेच वेतन बँड रु.१५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.७६०० मंजूर करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने वरील संवर्गांना सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उप संचालक संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गांना असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन सुधारित समकक्ष वेतनसंरचना विहित केली आहे.

या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

४) निवासी वैद्यकीय अधिकारी / ५) अपघात वैद्यकीय अधिकारी / ६) औषधनिर्माता

संघटनेचे अभिप्राय:- वित्त विभागाच्या दिनांक २७.३.२००९ च्या पाचव्या वेतन आयोगातील उच्च स्तर वेतनत्रुटी समितीच्या शिफारसीनुसार ग्रामविकास विभागाअंतर्गत विविध पदांवरील समान संवर्गातील आयुर्वेद पदवीधारक (१२००) डॉक्टरांना दि.१.१.९६ पासून रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. परंतु अनावधानाने वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत समान संवर्गातील शैक्षणिक अर्हताधारक ४८ पदांना वेतनश्रेणी देण्याचे राहून गेले आहे. एकाच संवर्गातील समकक्ष शैक्षणिक अर्हताधारक असल्यामुळे या सर्व ४८ पदांना वित्त विभागाच्या दि.२७.२.२००६ चा शासन निर्णय लागू करुन त्या आधारे सहाव्या वेतन आयोगात अनुज्ञेय वेतनसंरचना वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करुन भारतीय चिकित्सा पध्दतीच्या डॉक्टरांना न्याय द्यावा. संचालक, आयुर्वेद यांनी दि.२८.४.२००६ च्या अर्धशासकीय पत्रान्वये त्यांच्या विभागातील BAMS डॉक्टरांना केंद्र शासनाने मंजूर केलेली वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० दि.१.१.१९९६ पासून मंजूर करण्याबाबत शिफारस केली असून भारत सरकार राजपत्र दि.३०.९.१९९७ मधील प. क्र. ८५ वरील अनुच्छेद ५२.३३ चा परिच्छेद खालीलप्रमाणे नमुद केला आहे :-

" Starting pay scale for all posts requiring medical practice in ISM & H & Digree in ISM & H as minimum qualification scale Rs.8000-275-13500" या निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाने ग्रामविकास विभागांतर्गत १२०० BAMS डॉक्टरांना रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी मंजूर केली आहे. त्या आधारे भारतीय चिकित्सा पध्दतीच्या डॉक्टरांना (४८) पद रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी दि.१.१.१९९६ पासून काल्पनिकरित्या लागू करुन सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करावे. वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत ४८ पदधारकांना रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी लागू न केल्यामुळे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील निर्णयात माननीय न्यायालयाने वरील पदावर अन्याय झाला असून शासनाने या प्रकरणी त्वरित निर्णय घ्यावा असा आदेश दिला होता. त्याअनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, पत्र क्र.आयुसे-२००७/प्र.क्र. १०/०७/आयु, दि.१३.३.२००७ नुसार सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी सदर पदाबाबत निर्णय घेण्यात येईल असे लेखी कळविले होते. हकीम समितीने वैद्यकीय अधिकारी, ग्रामविकास विभागाच्या वेतनश्रेणीबाबत निर्णय घेताना त्यांची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० ऐवजी रु.६५००-१०५०० अशी पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेतला आहे. दि.१.१.१९९६ पासून २००६ पर्यंत जी काल्पनिक वेतनश्रेणी आहे त्याबाबतचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणे दि.१.१.२००६ रोजी असलेल्या वेतनश्रेणीवर सहाव्या वेतन आयोगाची वेतनसंरचना निश्चित होणार आहे. त्यामुळे ४८ पदांवर अन्याय व नुकसान होणार आहे. ४८ पदांवर झालेला अन्याय दूर करण्याकरीता वैद्यकीय शिक्षण विभागाच्या डॉक्टरांना वित्त विभागाच्या दि.२७.२.२००६ च्या शासन निर्णयाप्रमाणे दि.१.१.१९९६ पासून काल्पनिकरित्या रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय करुन त्यावर आधारित महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ मध्ये नियमाप्रमाणे वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना तात्काळ मंजूर करुन भारतीय चिकित्सा पध्दतीच्या ISM & H डॉक्टरांना न्याय द्यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- औषधनिर्माता पदावर बी. ए. एम. एस. पदवीधारक कार्यरत असतात व हे पदोन्नतीचे पद असून सहायक औषधनिर्माता (आयुर्वेद) यांना औषधनिर्माता पदावर पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे. पंचकर्म वैद्य व विकृतीविज्ञानशास्त्रज्ञ व प्रयोगशाळा निदेशक या पदावरील

कर्मचाऱ्यांना निवासी वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे. तसेच अपघात वैद्यकीय अधिकारी (अराजपत्रित) पदावरील कर्मचाऱ्यांना अपघात वैद्यकीय अधिकारी (राजपत्रित) पदावर पदोन्नतीची संधी उपलब्ध आहे. करीता सदर पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना खालच्या पदापेक्षा कमी नसणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

४) निवासी वैद्यकीय अधिकारी

५) अपघात वैद्यकीय अधिकारी

या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेऐवजी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५५०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी केली आहे. या संवर्गाची असुधारित वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० ही होती. अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.२.८ मधील विवेचन विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

६) औषधनिर्माता

सहाय्यक औषधनिर्माता (आयुर्वेद) संवर्गातून औषधनिर्माता पदावर पदोन्नती देण्यात येते असे प्रशासकीय विभागाने नमूद केले आहे. सहाय्यक औषधनिर्माता (आयुर्वेद) संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याचे प्रस्तावित केले असल्याने पदोन्नतीच्या औषधनिर्माता संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५५०० ग्रेड वेतन मंजूर करण्याचे प्रस्तावित केले आहे. सहाय्यक औषधनिर्माता (आयुर्वेद) संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. त्यामुळे औषधनिर्माता संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५५०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेची शिफारस करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच पुढील अ.क्र. ७ ते १७ येथील संवर्गांच्या संदर्भातील शिफारशींमध्ये नमूद केल्याप्रमाणे या संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करता येणार नाही.

सहाय्यक औषधनिर्माता (आयुर्वेद) संवर्गास समितीने वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली आहे. या संवर्गासदेखील वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. या शिफारशीमुळे औषधनिर्माता आणि सहाय्यक औषधनिर्माता (आयुर्वेद) या दोन्ही संवर्गांना वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही एकच सुधारित वेतनसंरचना अनुज्ञेय होत आहे. औषधनिर्माता हे पदोन्नतीचे पद आहे. अशा प्रकरणी पदोन्नतीच्या पदास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यासंदर्भात राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार औषधनिर्माता संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करता येऊ शकेल. प्रशासकीय विभागाने तपासणी करून वित्त विभागाच्या सहमतीने याबाबतची कार्यवाही करावी.

७) विकृतीविज्ञानशास्त्रज्ञ व प्रयोगशाळा निदेशक / ८) सहाय्यक पंचकर्म वैद्य / ९) पंचकर्म वैद्य / १०) अपघात वैद्यकीय अधिकारी (अराजपत्रित) / ११) सहाय्यक वैद्य / १२) सहाय्यक औषध निर्माता (आयुर्वेद) / १३) सहाय्यक औषध निर्माता (युनानी) / १४) सहाय्यक वैज्ञानिक अधिकारी-नि-वैद्य / १५) सहाय्यक वैज्ञानिक अधिकारी-नि-हकीम / १६) आयुर्वेद विस्तार अधिकारी / १७) वैद्य (पुरुष / स्त्री )

संघटनेचे अभिप्राय:- वरील अ.क्र.४ ते ६ येथील अभिप्रायांप्रमाणे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- आयुर्वेद संचालनालयातील भारतीय चिकित्सा पध्दतीच्या ४० पदांना पाचव्या वेतन आयोगात मंजूर केलेल्या रु.६५००-१०५०० ऐवजी रु.८०००-१३५०० ही

वेतनश्रेणी दि.१.१.२००६ पासून काल्पनिकरित्या लागू करुन या सर्व पदांना म. ना. से. (सुधारित वेतन) नियम, २००९ नुसार रु.८०००-१५००० या गट-अ च्या वेतनश्रेणीला अनुलक्षून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याबाबत विनंती केलेली आहे.

केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या दि.३.१.१९९१ रोजीच्या पत्रान्वये वेगवेगळया चिकित्सा पध्दतीच्या पदवी अर्हताधारक डॉक्टरांच्या वेतनात तफावत असू नये ही बाब केंद्र सरकाने स्वीकारली असल्याचे नमुद केले आहे.

केंद्र शासनाने केंद्रीय नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९७ मध्ये भारतीय चिकित्सा पध्दतीच्या पदवीधारक अर्हताधारकांना किमान वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० लागू केली आहे. तसेच ग्रामीण वैद्यकीय अधिकारी, सहायक वैद्यकीय अधिकारी या रु.२०००-३२०० वेतनश्रेणीतील पदांनाही रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी लागू केली आहे. तसेच सहाव्या वेतन आयोगात केंद्र सरकारने रु.८०००-१३५०० वेतनश्रेणीतील पदधारकांना वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे.

भारतीय चिकित्सा पध्दतीच्या आयुर्वेद/युनानी व होमिओपॅथिक अर्हताधारकांना रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी दिलेली आहे. तसेच सहाव्या वेतन आयोगात रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणीतील पदधारकांना वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. केंद्र शासनाने ॲलोपॅथिक, आयुर्वेद व होमिओपॅथिक अर्हताधारकांच्या वेतनात तफावत असू नये ही बाब तत्वत: मान्य केलेली आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या भारतीय चिकित्सा पध्दतीच्या अर्हताधारकांच्या वेतनातील तफावत दूर करणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने संघटनेची मागणी योग्य आहे.

तसेच नमूद केलेल्या संचालनालयातील ४० पदांना दि.१.१.१९९६ पासून रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. त्यांना दि.१.१.१९९६ पासून रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी काल्पनिकरित्या लागू करुन दि.१.१.२००६ पासून वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

७) विकृतीविज्ञानशास्त्रज्ञ व प्रयोगशाळा निदेशक
८) सहाय्यक पंचकर्म वैद्य
९) पंचकर्म वैद्य
१०) अपघात वैद्यकीय अधिकारी (अराजपत्रित)
११) सहाय्यक वैद्य
१२) सहाय्यक औषध निर्माता (आयुर्वेद)
१३) सहाय्यक औषध निर्माता (युनानी)
१४) वैज्ञानिक सहाय्यक-नि-वैद्य
१५) वैज्ञानिक सहाय्यक -नि-हकीम
१६) आयुर्वेद विस्तार अधिकारी
१७) सहाय्यक महिला वैद्य

वेतन समानीकरण समितीच्या अहवालातील परिच्छेद ३.३२ नुसार वर नमूद विविध संवर्गांना तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाकडील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब (तत्कालीन **Maharashtra Medical & Health Services Class-III**) व इतर संवर्गांना चौथ्या वेतन आयोगात वेतनश्रेण्या विहित केल्या होत्या. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाकडील वैद्यकीय अधिकारी संवर्गास त्या विभागाच्या शासन निर्णय क्र. एएसओ-१०९०/४७/प्र.क्र.६७/९०/सेवा-६ दि. २८ मार्च, १९९४ अन्वये देण्यात आलेले सुधारित वेतनश्रेणीचे लाभ आयुर्वेद संचालनालयातील समकक्ष

संवर्गांना शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एवायएस-१०८९/३६/आयु-१ दि.६ मे. २००० अन्वये मंजूर केले आहेत. थोडक्यात, या दोन्ही विभागातील बहुतांश संवर्ग समकक्ष असल्याचे दिसून येते.

केंद्रीय पाचव्या वेतन आयोगाने **Indian System of Medicine and Homoeopathy (ISM&H)** अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी केलेली रू.८०००-१३५०० या वेतनश्रेणीची शिफारस आणि त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकारी संवर्गास मंजूर केलेली वेतनश्रेणी याआधारे वर नमूद संवर्गांसाठी वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेची मागणी केली आहे.

जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकारी संवर्गास मंजूर केलेली रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी रद्द करून, त्या संवर्गास रू.६५००-१०५०० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाकडील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब संवर्गाची हीच मागणी होती व समितीने मागणीप्रमाणे शिफारस केलेली नाही. [त्याबाबतचे सविस्तर विवेचन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब (वैद्यकीय अधिकारी) संवर्गासंबंधीच्या शिफारशींमध्ये (भाग-३.१३. अ.क्र.२) केले आहे.]

वरील पार्श्वभूमीवर विचाराधीन संवर्गांना वेतनबँड पीबी-३:रु.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी समर्थनीय नाही. त्यामुळे समिती या मागणीशी सहमत नाही.

तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब संवर्गास समितीने वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रू.४६०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार या संवर्गांनादेखील हीच वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

क) अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन

१) पर्यवेक्षक (अन्न) / २) अन्न निरीक्षक

संघटनेचे अभिप्राय:- दि.२३.१.२००४ रोजी शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन अन्न निरीक्षक व पर्यवेक्षक (अन्न) यांच्या कामाचे स्वरुप व निरीक्षक व औषध निरीक्षक या दोन्ही संवर्गामध्ये समानता आणण्याच्या दृष्टीने अन्न निरीक्षकांना गट-क मधून गट-ब मध्ये तर पर्यवेक्षक (अन्न) यांना सहायक आयुक्त (अन्न) या संवर्गात उन्नत करुन त्यांना गट अ दर्जा दिला होता व त्याबाबत अधिसूचनाही काढल्या होत्या. तसेच जानेवारी, २००६ ते मे, २००६ पर्यंत सुधारित वेतनश्रेणीचा लाभ घेतला होता. उच्चस्तरीय सचिव समितीने सन २००४ मध्ये प्रशासनातील पदांचा आढावा घेतलेला असून अन्न निरीक्षक व पर्यवेक्षक (अन्न) या अन्न व औषध प्रशासनातील पदांना देण्यात आलेल्या श्रेणीवाढीला मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णय रद्द केल्यामुळे अन्न विभागावर अन्याय केला आहे.

केंद्र शासनाने अन्न सुरक्षा कायदा, २००६ लागू केला असून त्यामध्ये डेसीग्नेटेड ऑफीसर हा एस.डी.ओ.दर्जाचा असावा अशी तरतूद केली आहे व डेसीग्नेटेड ऑफीसर या पदाची सांविधनिक कर्तव्ये सध्याचे परवाना अधिकारी पर्यवेक्षक (अन्न) हे बजावत आहेत. सदर कायद्यातील पदे निर्माण करण्याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनास कळविले आहे.

अन्न सुरक्षा कायदा, २००६ - अन्न निरीक्षक व पर्यवेक्षक (अन्न) यांचे कामाचे स्वरुप व अन्न सुरक्षा कायद्यातील तरतुदीनुसार अन्न निरीक्षक यांना गट ब दर्जा व वेतनबँड पीबी-२: रु. ९३०० - ३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन आणि पर्यवेक्षक (अन्न) यांना सहायक आयुक्त (अन्न) गट अ दर्जा व वेतनबँड पीबी-३: रु.१५६०० - ३९१०० अधिक रु. ५४०० ग्रेड वेतन देण्यात यावे. त्यामुळे अन्न सुरक्षा कायदा, २००६ नुसार अन्न विभागाची स्वतंत्र रचना होईल व जनआरोग्याच्यादृष्टीने अन्न सुरक्षा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- अन्न व औषधी द्रव्ये प्रशासनाच्या आस्थापनेवरील अन्न निरीक्षकांना पदोन्नतीचे पद पर्यवेक्षक (अन्न) हे आहे तर औषध निरीक्षकांना सहाय्यक आयुक्त (औषध) हे पदोन्नतीचे पद आहे. दि.१.१.२००४ पर्यंत अन्न निरीक्षक हे पद गट क संवर्गात तर पर्यवेक्षक(अन्न) गट ब या संवर्गात होते. अन्न निरीक्षक व औषध निरीक्षक या दोन्ही संवर्गामध्ये समानता आणण्याच्या दृष्टीने दि.२३.१.२००४ पासून अन्न निरीक्षकांना गट-क मधून गट-ब मध्ये तर पर्यवेक्षक (अन्न) यांना सहायक आयुक्त (अन्न) या संवर्गात उन्नत करुन त्यांना गट-अ चा दर्जा देऊन या दोनही संवर्गातील दीर्घ काळापासून चालु असलेली असमानता दूर करण्यात आली होती. तथापि, सदर प्रकरण हे एकाच विभागातील एकाच प्रकारचे काम करणाऱ्या अन्न निरिक्षक व औषध निरिक्षक या दोन्ही संवर्गात दीर्घकाळापासून चालू असलेल्या असमानतेबाबतचे आहे. ही बाब लक्षात न घेता अन्न निरिक्षक या स्वतंत्र संवर्गाच्या श्रेणीवर्धनास वेतन असमानता समितीच्या समोर न आणल्याच्या कारणास्तव देण्यात आलेली वेतनश्रेणी रद्द करण्यात आली.

सन २००४ मध्ये प्रशासनातील पदांचा आढावा उच्चस्तरीय सचिव समितीने घेतलेला असून अन्न निरीक्षक व पर्यवेक्षक (अन्न) या अन्न व औषध प्रशासनातील पदांना देण्यात आलेल्या श्रेणीवाढीला मान्यता देण्यात आलेली होती. सदर शासन निर्णय रद्द केला आहे.

केंद्र शासनाने अन्न सुरक्षा कायदा, २००६ लागू केला असून त्यामध्ये डेसीग्नेटेड ऑफीसर हा एस.डी.ओ. दर्जाचा असावा अशी तरतूद केलेली आहे व डेसीग्नेटेड ऑफीसर या पदाची कर्तव्ये सध्याचे पर्यवेक्षक (अन्न) हे बजावत आहेत. सदर कायद्यातील पदे निर्माण करण्याबाबत केंद्र शासनाने राज्य शासनास कळविले आहे. त्यामुळे अन्न निरीक्षक व पर्यवेक्षक (अन्न) यांना दर्जा व वेतनश्रेणी देणे क्रमप्राप्त आहे. अन्न निरीक्षक व पर्यवेक्षक (अन्न) यांच्या कामाचे स्वरुप व अन्न सुरक्षा कायद्यातील तरतुदीनुसार अन्न निरीक्षक यांना गट ब दर्जा व वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन आणि पर्यवेक्षक (अन्न) यांना सहायक आयुक्त (अन्न) गट अ दर्जा व वेतन बँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन देण्यात यावे असे या विभागाचे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

मंत्रीमंडळाने दि.२३ जानेवारी, २००४ रोजीच्या निर्णयान्वये वरील संवर्गांना उच्च वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. मात्र त्याबाबत मंत्रीमंडळाने फेरविचार केला व त्यासंबंधीचे आदेश रद्द करुन, प्रशासकीय विभागांनी वेतन असमानता समितीपुढे प्रस्ताव सादर करावेत असा निर्णय घेतला होता. त्याविषयीचे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपुर १२०४/प्र.क्र.९/सेवा-९ दि.११ ऑगस्ट, २००४ अन्वये निर्गमित केले होते. तथापि, याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवली होती. यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या रीट याचिका क्र.२५८५/२००६ आणि २५९७/२००६ संदर्भातील आदेशांनुसार स्थापन केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीच्या शिफारशींवर निर्णय घेऊन शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपुर १२०७/प्र.क्र.२२/सेवा-९ दि. २६ जुलै, २००७ अन्वये या संवर्गांचे श्रेणीवाढ / वेतनश्रेणीवाढीचे प्रस्ताव अंतिमतः अमान्य केले आहेत. त्यामुळे त्या वेतनश्रेणी विचारात घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अन्न सुरक्षा कायदा, २००६ च्या अनुषंगाने पदनिर्मिती व पदांचा दर्जा विहित करणे या बाबी समितीच्या कार्यकक्षेत येत नाहीत, त्यामुळे यासंदर्भात समिती शिफारस करु शकत नाही.

या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

# ३.११ (ब) - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
## ( महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक )

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र.<br>(१) | पदनाम<br>(२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये)<br>(३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये)<br>(४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये)<br>(५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | | | | | |
| १ | कक्ष अधिकारी (जनसंपर्क) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| २ | दूरध्वनीचालक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |
| ३ | वीजतंत्री | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |

१) कक्ष अधिकारी (जनसंपर्क) / २) दूरध्वनीचालक / ३) वीजतंत्री

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पदांच्या पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणींमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. पारंपारिक अकृषि विद्यापीठांमधील समान सेवाशर्ती व नियम लागू असलेल्या समपदांना समान वेतनश्रेणी लागू करण्याचा आग्रह धरण्यात आला होता. दरम्यानच्या काळात सहाव्या वेतन आयोगाची स्थापना झाल्यामुळे पाचव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटींसंदर्भात विचार करता येणार नाही असे परिपत्रक वित्त विभागाने दि.५.३.२००७ रोजी जारी केल्यामुळे वित्त विभागाने या विभागाचा प्रस्ताव नाकारुन वेतनत्रुटींसंदर्भात सहाव्या वेतन आयोगाच्यावेळी विचार करावा असे सुचविले होते. त्यानुसार आरोग्य विज्ञान विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार सुधारित वेतनसंरचना लागू करण्याचा प्रस्ताव सादर करताना आता मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना लागू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, त्यास मान्यता मिळाली नाही.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील सेवाशर्ती व सेवानियम आणि पारंपारिक अकृषि विद्यापीठांमधील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती व सेवानियम एकसारखेच आहेत. किंबहुना पारंपारिक अकृषि विद्यापीठांसाठी लागू असलेल्या प्रमाणसंहिता-१९८४ मधील तरतूदींनुसारच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची सेवाभरती व सेवाशर्तींचे नियंत्रण करण्यात येत आहे. त्यामुळे समान सेवाभरती नियम व समान सेवाशर्ती असलेल्या पदांसाठी, मग ते पारंपारिक अकृषि विद्यापीठातील असोत अथवा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील असोत समान वेतनसंरचना लागू करणे अत्यावश्यक आहे.

यास्तव, सदर प्रस्ताव आता वेतनत्रुटी समितीसमोर विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) कक्ष अधिकारी (जनसंपर्क)

शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. मआवि १०९९/प्र.क्र.१७/९९/ शिक्षण-१ दि. १७ फेब्रुवारी, २००५ अन्वये या संवर्गाची रु.६५००-१०५०० या असुधारित वेतनश्रेणीमध्ये निर्मिती केली आहे. प्रशासकीय विभागाच्या वरील अभिप्रायांतील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेता विभागाने या संवर्गाची निर्मिती रु.६५००-१०५०० या असुधारित

वेतनश्रेणीमध्ये का केली याबाबत विभागाने कोणतेही भाष्य केलेले नाही. असे असले तरी या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि शैक्षणिक अर्हता इ. बाबी विचारात घेता या संवर्गास मंजूर ग्रेड वेतन रु.४४०० पेक्षा अधिक असावे असे समितीस वाटते. करिता या संवर्गास वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२) दूरध्वनीचालक

दूरध्वनीचालक हा राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागात कार्यरत आहे. काही विभागांत या संवर्गास रु.२००० तर काही विभागांत रु.१९०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. दूरध्वनीचालक संवर्गास इतर प्रशासकीय विभागांतील दूरध्वनीचालक संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

३) वीजतंत्री

शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. मआवि १०९९/प्र.क्र.१७/९९ /शिक्षण-१ दि. १७ फेब्रुवारी, २००५ अन्वये या संवर्गाची रु.३०५०-४५९० या असुधारित वेतनश्रेणीमध्ये निर्मिती केली आहे. या संवर्गाच्या पदभरतीची जाहिरात पाहता विद्यापीठामध्ये तारतंत्री (Wireman) संवर्गात नेमणूक केल्याचे दिसते. वीजतंत्री (Electrician) आणि तारतंत्री (Wireman) हे भिन्न संवर्ग आहेत. अशा परिस्थितीत वीजतंत्री संवर्गाच्या वेतनसंरचनेबाबत भाष्य करणे समितीस उचित वाटत नाही. या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

## ३.१२ - नियोजन विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) (३) | सुधारित वेतन संरचना (रूपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रूपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अर्थ व सांख्यिकी संचालनालय | | | | | |
| १ | संचालक | १६४००-२०००० | ३७४००-६७००० | ८,९०० | ३७४००-६७००० | १०,००० |
| २ | अपर संचालक | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७,६०० | ३७४००-६७००० | ८,७०० |
| ३ | सह संचालक | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० | ७,६०० |
| ४ | उप संचालक | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० | ६,६०० |
| ५ | गट-ब (राजपत्रित) संवर्ग (सांख्यिकी अधिकारी / संशोधन अधिकारी ) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | १५६००-३९१०० | ५,४०० |
| ६ | संशोधन सहाय्यक, गट-ब (अराजपत्रित ) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४,३०० | १५६००-३९१०० | ४,४०० |
| ७ | सांख्यिकी सहाय्यक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २,८०० | ९३००-३४८०० | ४,२०० |
| ८ | अन्वेषक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २,००० | ५२००-२०२०० | २,८०० |

अर्थ व सांख्यिकी संचालनालय

१) संचालक

संघटनेचे अभिप्राय :- राष्ट्रीय सांख्यिकी आयोग व नॅशनल स्ट्रॅटेजिक स्टॅटिस्टिकल प्लॅनमध्ये संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदाची वेतनश्रेणी कमीत कमी केंद्र शासनातील सांख्यिकी सल्लागार (उप महासंचालक) या पदाच्या समतुल्य असावी अशी शिफारस केली आहे. यास्तव संचालकांना त्याप्रमाणे वेतनसंरचना देण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्र शासनाच्या केंद्रीय सांख्यिकी संघटना व राष्ट्रीय नमुना पाहणी संघटना या कार्यालयात महासंचालक हे सर्वोच्च पद आहे. राज्य शासनात सांख्यिकी संघटनेतील संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे सर्वोच्च पद आहे. केंद्र शासन व राज्य शासनाकडील या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्याच आहेत. तसेच राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाने संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदास उप महासंचालक तथा सांख्यिकी सल्लागार समकक्ष दर्जा देण्याची शिफारस केली आहे. यास्तव संघटनेने केलेली मागणी विचारात घेणे उचित राहील.

समितीची शिफारस :-

प्रशासकीय विभाग / संघटनेने या संवर्गाची केंद्र शासनाच्या केंद्रीय सांख्यिकी संघटना व राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेतील पदांशी तुलना केली आहे. या संवर्गास केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविण्यात आलेले नाही. संचालक हे विभागप्रमुखाचे पद असल्याचे विचारात घेऊन वेळोवेळी या पदास सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत. चौथ्या वेतन आयोगात या संवर्गास रू.४५००-५७०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. पाचव्या वेतन आयोगात राज्य सुधारणा समिती, १९९७ च्या शिफारशीनुसार (अहवाल भाग-२, परिच्छेद ४.३७) या संवर्गास रू.१४३००-१८३०० या समकक्ष वेतनश्रेणीहून उच्च रू.१६४००-२०००० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-४: रू.३७४००-६७००० अधिक रू.८९०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात विहित केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

तसेच मागणी केलेले ग्रेड वेतन रू.१०००० हे प्रशासकीय विभागप्रमुख असलेल्या सचिव संवर्गास विहित केले आहे. त्यामुळे या संवर्गास मागणी केल्यानुसार वेतनसंरचना मंजूर करणे समर्थनीय नाही.

२) अपर संचालक

संघटनेचे अभिप्राय :- अपर संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदाची कामे केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील संचालक या पदासारखीच किंबहुना त्यापेक्षा इतर कामेही अपर संचालक यांच्याकडे सोपविण्यात येत असल्यामुळे त्यांना कमीत कमी केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील संचालक या पदाची वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्रीय सांख्यिकी संघटनेमध्ये विविध शाखा असून या शाखांचे कार्यालय प्रमुख म्हणून या शाखेमधील कामे व जबाबदाऱ्या अपर महासंचालक यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत. मात्र हे अपर महासंचालक केवळ त्याच शाखेसंबंधीतच काम पाहतात. उदा. केंद्र शासनामध्ये राष्ट्रीय नमुना पाहणी या शाखेकरीता अपर महासंचालक हे पद असून ते त्याच शाखेपुरते काम पाहतात.

महाराष्ट्र राज्यातील अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील अपर संचालक यांच्याकडे तीच कामे व जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या आहेत. मात्र महाराष्ट्र शासनातील अपर संचालक हे राष्ट्रीय नमुना पाहणी व्यतिरिक्त इतरही संगणकीय शाखेतील कामकाज बघतात. यास्तव संघटनेने केलेली मागणी विचारात घेणे उचित राहील.

३) सह संचालक

संघटनेचे अभिप्राय :- सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय व केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील सह संचालक या पदांच्या कामांमध्ये सारखेपणा असल्याने सदर पदास केंद्र शासनातील सह संचालकांच्या वेतनसंरचनेप्रमाणे वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील सह संचालकाची कामे व राज्य संचालनालयातील सह संचालकाची कामे यामध्ये कोणताही फरक नाही. तसेच संचालनालयातील काही शाखा प्रमुख हे सह संचालक आहेत. मात्र केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील लहान शाखांसाठी संचालक या वरिष्ठ दर्जाचा अधिकारी कार्यरत असतो. थोडक्यात, केंद्रातील व राज्यातील सह संचालक हे एकाच प्रकारची कामे करतात. तसेच या दोन्ही पदांसाठी शैक्षणिक पात्रता व अर्हता सारखीच आहे. यास्तव संघटनेने केलेली मागणी विचारात घेणे उचित राहील.

४) उप संचालक

संघटनेचे अभिप्राय :- उप संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदाची कामे व जबाबदाऱ्या या केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील उप संचालक या पदाप्रमाणे असल्यामुळे उप संचालक, अर्थ

व सांख्यिकी संचालनालय या पदास केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील उप संचालक पदाची वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्र शासनाच्या केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील निरनिराळया शाखांमधील उप विभागाच्या प्रमुख पदी उप संचालक असून त्याच प्रकारच्या जबाबदाऱ्या राज्य संचालनालयातील उप संचालक पार पाडतात, किंबहुना हे उप संचालक जिल्हास्तरावर जिल्हा नियोजनाची कामे, आर्थिक अंदाजपत्रक, आमदार / खासदार निधीचे वितरण व इतर पर्यवेक्षकीय कामे पार पाडतात. यास्तव केंद्रातील तत्सम पदाची वेतनसंरचना असावी अशी संघटनेने केलेली मागणी उचित आहे.

५) गट-ब (राजपत्रित ) संवर्ग (सांख्यिकी अधिकारी / संशोधन अधिकारी )

संघटनेचे अभिप्राय :- सांख्यिकी अधिकारी / संशोधन अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदांची कामे व जबाबदाऱ्या केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील सहाय्यक संचालक या पदाप्रमाणे असल्यामुळे त्यांना सहाय्यक संचालक या पदाची वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्रीय संघटनेमधून घेतल्या जाणाऱ्या पाहण्या राज्यस्तरावरील संचालनालयामार्फत केल्या जातात. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने पाहणीचे क्षेत्र कामाकरीता राज्या-राज्यांनी जे विभाग पाडलेले आहेत त्या विभागाचे प्रमुख म्हणून सहाय्यक संचालक नेमले असून, ही कामे मात्र राज्य संचालनालयातील सांख्यिकी अधिकाऱ्यांकडून करुन घेतात. सांख्यिकी अधिकारी या कामाव्यतिरिक्त प्रशासकीय प्रभारी म्हणून काम पहात असल्यामुळे त्यांना केंद्र शासनातील सहाय्यक संचालकाप्रमाणे वेतनसंरचना द्यावी अशी शिफारस संघटनेने केली आहे. यास्तव संघटनेने केलेली मागणी विचारात घेणे उचित राहील.

६) संशोधन सहाय्यक, गट-ब

संघटनेचे अभिप्राय :- संशोधन सहाय्यक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदाची कामे व जबाबदाऱ्या केंद्रीय सांख्यिकी संघटनेतीत अधीक्षक व वरिष्ठ अन्वेषक यांच्यासारख्या असल्यामुळे त्यांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्र शासनातील दुय्यम सांख्यिकी सेवेतील अन्वेषक श्रेणी-२ अंतर्गत असणाऱ्या राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेतील अधीक्षक व वरिष्ठ अन्वेषक या पदांच्या कामाचे स्वरुप पाहता हे पद राज्य शासनातील संशोधन सहायकाच्या समतुल्य आहे. यास्तव संघटनेने केलेली मागणी विचारात घेणे उचित राहील.

<u>समितीची शिफारस</u> :-

२) अपर संचालक

३) सह संचालक

४) उप संचालक

५) गट-ब (राजपत्रित ) संवर्ग (सांख्यिकी अधिकारी / संशोधन अधिकारी )

६) संशोधन सहाय्यक, गट-ब

प्रशासकीय विभाग / संघटनेने या संवर्गांची केंद्र शासनाकडील केंद्रीय सांख्यिकी संघटना / राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेतील पदांशी तुलना केली आहे व त्यानुसार सुधारित वेतनसंरचनेची मागणी केली आहे. मात्र हे संवर्ग आणि केंद्र शासनाच्या वर नमूद संस्थांमधील संवर्गांमध्ये समकक्षता प्रस्थापित केलेली नाही. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

७) सांख्यिकी सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय :- सांख्यिकी सहाय्यक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदाची कामे व जबाबदाऱ्या केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील सहायक अधीक्षक यांच्यासारख्या असल्यामुळे त्यांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेतील पाहणीचे क्षेत्र कामाचे निरीक्षण हे सहाय्यक अधीक्षकामार्फत करण्यात येते. राज्य संचालनालयात हे काम सांख्यिकी सहाय्यकामार्फत करण्यात येते. यास्तव सांख्यिकी सहाय्यकाला राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेतील सहाय्यक अधीक्षक या पदाप्रमाणे दर्जा देण्यात यावा. यास्तव संघटनेने केलेली मागणी विचारात घेणे उचित राहील.

समितीची शिफारस :-

सांख्यिकी सहाय्यक संवर्गास चौथ्या वेतन आयोगामध्ये रू.१२००-२०४० वेतनश्रेणी मंजूर केली होती. या संवर्गाची किमान शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन पाचव्या वेतन आयोगात राज्य सुधारणा समिती, १९९७ ने या संवर्गासाठी रू.४०००-६००० या समकक्ष वेतनश्रेणीहून उच्च रू.४५००-७००० ह्या वेतनश्रेणीची शिफारस (अहवाल भाग-२, प्रकरण ६) केली होती. त्यानुसार या संवर्गास रू.४५००-७००० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-१:रू.५२००-२०२०० अधिक रू.२८०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात विहित केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

८) अन्वेषक

संघटनेचे अभिप्राय :- अन्वेषक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय या पदाची कामे व जबाबदाऱ्या केंद्रीय सांख्यिकी संघटनेतील अन्वेषक यांच्यासारख्या असल्यामुळे त्यांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- केंद्र शासनाकडील सांख्यिकी अन्वेषक व राज्य शासनाकडील अन्वेषक हे एकाच प्रकारचे काम करतात. ही कामे खेडोपाडी तसेच दुर्गम भागात जाऊन विहित वेळेत करणे आवश्यक असते. मात्र केंद्र शासनाकडे या पदाकरीता पदवी ही शैक्षणिक पात्रता असून राज्य शासनाकडे या पदाकरीता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी आहे. यास्तव ज्या अन्वेषकांची सेवा ५ वर्षे झाली असेल व ज्यांची शैक्षणिक पात्रता पदवी असेल त्या अन्वेषकांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

समितीची शिफारस :-

प्रशासकीय विभाग / संघटनेने या संवर्गाची केंद्र शासनाकडील अन्वेषक पदाशी तुलना केली आहे. मात्र, या संवर्गास केंद्र शासनाकडील अन्वेषक संवर्गाशी समकक्ष ठरविण्यात आलेले नाही. या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-१:रू.५२००-२०२०० अधिक रू.२००० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. संवर्गाची शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता योग्य सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे विहित केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही.

# ३.१३ - सार्वजनिक आरोग्य विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) आरोग्य सेवा संचालनालय | | | | | |
| १ | महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ ( वैद्यकीय अधिकारी ) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ५४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब ( वैद्यकीय अधिकारी ) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ३ | अधिसेविका | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ४ | सहाय्यक अधिसेविका | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ५ | अधिसेविका वर्ग-२ श्रेणी-१ | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ६ | अधिसेविका वर्ग-२ श्रेणी-३ | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ७ | चिकित्सालयीन निदेशक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ४८०० |
| ८ | परिचारीका पाठ्यनिर्देशिका | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| ९ | परिसेविका | ५५००-९००० (अधिक विशेष वेतन रु.८० मनोरुग्ण रुग्णालयातील रुग्णांची देखभाल करणाऱ्या २५ पदांसाठी ) | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| १० | अधिपरिचारीका | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| ११ | नेत्रचिकित्सा अधिकारी | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| १२ | औषधनिर्माता | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| १३ | सहाय्यक संचालक (वाहतूक) | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सेवा व्यवस्थापक (वाहतूक) / भांडार अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १५ | आरोग्य साधनसामुग्री आणि देखभाल अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १६ | सेवा अभियंता (वाहतूक) / तांत्रिक पर्यवेक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| १७ | मुख्य कारागीर / तंत्रज्ञ | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| १८ | कार्यदेशक / वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| १९ | कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २८०० |
| २० | कुशल कारागीर | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २८०० |
| २१ | अर्धकुशल कारागीर | २७५०-४४०० | ५२००-२०२०० | १८०० | ५२००-२०२०० | २५०० |
| २२ | अकुशल कारागीर | २५५०-३२०० | ४४४०-७४४० | १३०० | ५२००-२०२०० | २४०० |
| | ब) राज्य कामगार विमा योजना आयुक्तालय | | | | | |
| १ | औषधनिर्माता | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |

अ) आरोग्य सेवा संचालनालय

१) (अ) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ ( वैद्यकीय अधिकारी ) *(या संवर्गात नामनिर्देशनाने / पदोन्नतीने नियुक्त वैद्यकीय अधिकारी )*

समितीची शिफारस :- यासंबंधी स्वतंत्र अहवाल सादर केला आहे, तो अहवालाच्या प्रकरण-४ मध्ये पहावा.

(ब) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ ( वैद्यकीय अधिकारी ) *(शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेपुर-१२०१/प्र.क्र.४/सेवा-९ दि.२७ फेब्रुवारी, २००६ अन्वये जिल्हा परिषद आस्थापनेवरील जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य) संवर्गास रू.६५००-१०५०० ऐवजी रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर केल्यानंतर महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मध्ये थेट समावेशन झालेले वैद्यकीय अधिकारी )*

संघटनेचे अभिप्राय :- जिल्हा परिषद अंतर्गत बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना राजपत्रित दर्जा दिल्यामुळे ही पदे लोकसेवा आयोगाच्या कक्षेत गेली असून त्यांच्या सेवा सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरित झालेल्या आहेत. जिल्हा परिषदेमधील बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना दि.१ जानेवारी, १९९६ पासून रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचा गट-अ मध्ये समावेश असल्याने त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रावर पदस्थापना देण्यात आली आहे. भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या दि. ३ जानेवारी, १९९१ च्या पत्रान्वये सर्व राज्यांचे आरोग्य सचिव आणि सर्व भारतीय चिकित्सा पध्दतींचे संचालक यांना ११ वेगवेगळया चिकित्सा पध्दतीच्या डॉक्टरांच्या वेतनात तफावत असू नये असे निर्देशित केले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- दि. २८ मे, २००१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा (गट-ब) या संवर्गातील रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना राजपत्रित दर्जा देण्यात आला आहे. याच शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेकडील जिल्हा तांत्रिक सेवा, आरोग्य संवर्गातील रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना राजपत्रित अधिकाऱ्यांचा दर्जा देण्यात आला व सदर राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सेवा राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे वर्ग करण्याचा व सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर पाचव्या वेतन आयोगामध्ये जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत त्रुटी आढळून आल्यामुळे वेतनत्रुटी समिती तसेच वेतन असमानता समिती यांच्या शिफारशीनुसार शासनाने वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपूर-१२०१/प्र.क्र.४/सेवा-९, दि. २७ फेब्रुवारी, २००६ अन्वये जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रु.८०००-१३५०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली व सदर वेतनश्रेणी नंतर ग्राम विकास व जलसंधारण विभागाने शासन निर्णय क्रमांक डीएसआर-२००६/प्र.क्र.५७१/आस्था-५, दि. ९ ऑगस्ट, २००६ अन्वये लागू केली. परंतु राज्य शासनाकडील वर नमूद केलेल्या गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा प्रस्ताव वेतनत्रुटी समिती व वेतन असमानता समितीसमोर सादर न झाल्यामुळे सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीत जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे सुधारणा होऊ शकली नाही.

२. या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ जुलै, २००२ रोजीच्या शासन निर्णयाकडे लक्ष वेधण्यात येत आहे. सदर शासन निर्णयामध्ये सामान्य प्रशासन विभागाने पदांचे वर्गीकरण गट-अ, ब, क व ड यामध्ये केले आहे. त्यामुळे पूर्वीचे वर्गीकरण वर्ग १, २, ३ व ४ हे आता अस्तित्वात राहिलेले नाहीत. सदर शासन निर्णयानुसार रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणीत जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी गट-अ मध्ये येतात.

३. सहाव्या वेतन आयोगामध्ये केंद्र शासनाने त्यांच्याकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. हीच वेतनसंरचना मूळ जिल्हा परिषदेकडे कार्यरत असणाऱ्या व सध्या सार्वजनिक आरोग्य विभागात वर्ग झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना मंजूर करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटना (मॅग्मो-आयुर्वेद), महाराष्ट्र राज्य यांनी केली आहे व अशाच प्रकारची मागणी महाराष्ट्र राज्य वैद्यकीय अधिकारी संघटना, गट-ब यांनी राज्य शासनाकडील गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी केली आहे.

४. पाचव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी विचारात घेवून राज्य शासनाने जिल्हा परिषदेकडील बीएएमएस व एमबीबीएस (वेतनश्रेणी रु.६५००-१०५००) वैद्यकीय अधिकाऱ्यांना लागू केलेली वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० राज्य शासनाकडील गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना लागू करावी अशी महाराष्ट्र राज्य वैद्यकीय अधिकारी संघटना, गट-ब यांची मागणी होती व त्यासाठी सदर संघटनेने मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. परंतु शासन याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन योग्य तो निर्णय घेईल असे तोंडी आश्वासन मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांनी सदर संघटनेला दिले होते म्हणून संघटनेने मा.सर्वोच्च न्यायालयाकडे प्रलंबित असलेले अपील परत घेतले आहे.

५. शासनाने हकीम समितीच्या शिफारशीनुसार वर नमूद केलेल्या जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पाचव्या वेतन आयोगातील रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी रद्द करुन पूर्वीची रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी कायम केली असून त्यानुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये त्यांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. तसेच राज्य शासनाकडील गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांनासुध्दा वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

६. जिल्हा परिषदेकडील बीएएमएस वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषदेकडील ॲलोपॅथिक दवाखाने व वन विभागातील दवाखान्यांमध्ये कार्यरत आहेत. राज्य शासनाकडील गट-ब मधील वैद्यकीय अधिकारी पोलीस रुग्णालये, आय.टी.आय.प्रशिक्षण केंद्र रुग्णालये,

कारागृह रुग्णालये, १०० खाटांची रुग्णालये, राज्य राखीव पोलीस रुग्णालये, मुलांची सुधारगृहे, मनोरुग्णालये इ. ठिकाणी कार्यरत आहेत.

७. जिल्हा परिषदेकडील बीएएमएस व राज्य शासनाकडील गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना केंद्र शासनाकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करावी.

८. हकीम समितीने सादर केलेल्या अहवालातील परि.२.२.९ मध्ये सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यापूर्वी केंद्रीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी, सहाव्या वेतन आयोगाने सुचविलेली सुधारित वेतनसंरचना व केंद्र शासनाने मान्य केलेल्या वेतनसंरचनेबाबतचा तपशील दिला आहे. सदर तपशीलातील अनुक्रमांक १७ येथे गट-अ मधील रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांना वेतनबॅन्ड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

९. पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीत काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनबॅन्ड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन मंजूर केल्यामुळे तसेच जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० असतानासुध्दा त्यांची वेतनश्रेणी मूळ स्वरुपात रु.६५००-१०५०० अशी करुन सहाव्या वेतन आयोगामध्ये त्यांना वेतनबॅन्ड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन मंजूर केल्यामुळे त्यांच्यावर निश्चितच अन्याय झाला आहे असे या विभागास वाटते. वैद्यकीय अधिकाऱ्यांना केंद्र शासनाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे वेतनबॅन्ड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर न केल्यास बरेच वैद्यकीय अधिकारी शासकीय सेवा सोडून खाजगी सेवेकडे वळतील व त्याचा परिणाम ग्रामीण व आदिवासी भागातील वैद्यकीय सेवेवर निश्चितपणे होईल. प्राप्त परिस्थितीत सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांची मागणी रास्त असल्यामुळे त्यांना केंद्र शासनाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे वेतनबॅन्ड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी अशी समितीस विनंती करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.संघट-१०९३/प्र.क्र.९६/सेवा-६ दि.२८ मे, २००१ अन्वये जिल्हा परिषदेकडील जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य) संवर्गातील रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील वैद्यकीय अधिकाऱ्यांना राजपत्रित दर्जा देण्यात येऊन, त्यांच्या सेवा राज्यस्तरावरून हाताळण्याचा व या संवर्गातील नियुक्त्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्याचा तसेच या संवर्गातील पदधारकांचे राज्यसेवेमध्ये समावेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर वैद्यकीय अधिकारी शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपूर-१२०१/प्र.क्र.४/सेवा-९, दि. २७ फेब्रुवारी २००६ निर्गमित होण्यापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाकडे (राज्य सेवेत) वर्ग झाले असल्यास त्यांना या शासन निर्णयानुसार रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी लागू होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कारण ही वेतनश्रेणी जिल्हा परिषद आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी मंजूर केली होती. याच कारणास्तव राज्य सेवेतील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयात दाद मागितली होती. (पहा- परिशिष्ठ-१)

वरील परिस्थितीत दि.२७ फेब्रुवारी, २००६ शासन आदेशांनुसार जिल्हा परिषद आस्थापनेवरील जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य) संवर्गास रु.६५००-१०५०० ऐवजी रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली व या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतनश्रेणीच्या आधारे थेट महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या पदोन्नतीच्या राज्यसेवेमध्ये समावेशन करून त्यांच्या सेवा सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत केल्या आहेत असे समितीच्या निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गात राज्य शासनाच्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब संवर्गातून तसेच जिल्हा परिषदेकडील जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य) संवर्गातून पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येते.

जिल्हा परिषदेकडील जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य) संवर्गास मंजूर केलेले रू.८०००-१३५०० वेतनश्रेणीचे लाभ राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशीनुसार शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र. डिएसआर २००९/प्र.क्र.६१/आस्था-०५ दि. २० मे, २००९ अन्वये काढून घेण्यात आले आणि या संवर्गास दि. १ जानेवारी, २००६ पासून रू.६५००-१०५०० या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड रू.९३००-३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. दि. २७ फेब्रुवारी, २००६ ते दि.१९ मे, २००९ या कालावधीत वर नमूद केल्याप्रमाणे थेट समावेशन केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनसंरचनेबाबत प्रश्न उपस्थित होतो.

या वैद्यकीय अधिकाऱ्यांना कोणती वेतनसंरचना अनुज्ञेय राहील ही बाब त्यांच्या थेट समावेशनाच्या विधीग्राह्यतेशी निगडीत आहे. हा मुद्दा वेतनत्रुटी निवारण समितीच्या कार्यकक्षेत नाही.

तथापि, या अधिकाऱ्यांचे थेट समावेशन विधीग्राह्य ठरत असेल आणि परिणामी त्यांना मूळ संवर्गात प्रत्यार्पित करावयाचे नसेल तर ; शासकीय अधिकारी / कर्मचारी ज्या संवर्गात / पदावर नियुक्त होतो त्या संवर्गाची / पदाची वेतनश्रेणी त्यास अनुज्ञेय ठरते या सर्वसाधारण तत्वानुसार ते कार्यरत असलेल्या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गाची वेतनसंरचना (वेतनबँड रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन) त्यांना अनुज्ञेय ठरेल. जर थेट समावेशन विधीग्राह्य ठरत नसेल आणि त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ संवर्गात प्रत्यार्पित करावयाचे असेल तर त्यांना मूळ संवर्गाची म्हणजे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब संवर्गास पुढील अ.क्र.२ मध्ये शिफारस केलेली वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना अनुज्ञेय ठरेल.

या अधिकाऱ्यांचे थेट समावेशन विधीग्राह्य आहे किंवा कसे ही बाब संबंधित सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ग्रामविकास व जलसंधारण विभागांनी सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करुन तपासून घ्यावी.

जिल्हा परिषदेकडील ज्या अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मध्ये समावेशन झालेले नाही अथवा ज्यांचे समावेशन विधीग्राह्य ठरणार नसल्यामुळे जे मूळ संवर्गात प्रत्यावर्तित होतील त्यांना मूळ संवर्गाची म्हणजे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब संवर्गास पुढील अ.क्र.२ मध्ये शिफारस केलेली वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना अनुज्ञेय ठरेल. (रू.६५००-१०५०० या असुधारित वेतनश्रेणीतील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रू.८०००-१३५०० या वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना - वेतनबँड रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन मंजूरीच्या मागणीसंदर्भात पुढील अ.क्र.२ मधील शिफारशीमध्ये विवेचन केले आहे.)

२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब ( वैद्यकीय अधिकारी )

संघटनेचे अभिप्राय :- वरील अ.क्र.१ (ब) मधील अभिप्रायांप्रमाणे

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वरील अ.क्र.१ (ब) मधील अभिप्रायांप्रमाणे

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) वैद्यकीय संवर्गाच्या वेतनश्रेणींसंबंधी त्यांच्या अहवालातील परिच्छेद ३.८ आणि परिच्छेद ३.३२ मध्ये विवेचन केले आहे. परिच्छेद ३.८ नुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (तत्कालीन **Maharashtra Medical & Health Services Class-II** ) संवर्गातील रू.६००-११५० या वेतनश्रेणीतील (तिसरा वेतन आयोग) एम.बी.बी.एस. व इतर पदवीधारकांना अनुक्रमे रू.२२००-४००० आणि रू.२०००-३५०० या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती व त्यानुसार या वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. तद्नंतर शासन

अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपुर-१२९०/सुधारणा-७८/सेवा-१० दि.२९ जानेवारी, १९९० अन्वये एम.बी.बी.एस. व इतर पदवीधारक असा फरक न ठेवता या संवर्गास एकच रू.२२००-४००० ही वेतनश्रेणी दि.१ जानेवारी, १९८६ पासून मंजूर केली होती. या संवर्गास पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात अनुक्रमे रू.८०००-१३५०० आणि वेतनबँड रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही सुधारित समकक्ष वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. (प्रकरण-४ पहावे.)

वेतन समानीकरण समितीने परिच्छेद ३.३२ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब (तत्कालीन **Maharashtra Medical & Health Services Class-III** ) संवर्गातील रू.३९५-८०० (**Allopathy qualification or qualification mentioned in Part-A of Schedule to M.M.P. Act, 1961**) या वेतनश्रेणीसाठी रू.२०००-३५०० आणि रू.३६५-७६० (इतरांसाठी) या वेतनश्रेणीसाठी रू.१६४०-२९०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. जिल्हा परिषदेकडेही अशीच शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी असलेले वैद्यकीय संवर्ग असल्याने त्यांनाही सार्वजनिक आरोग्य विभागाकडील या वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. म्हणजेच वेतन समानीकरण समितीने जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय संवर्गास सार्वजनिक आरोग्य विभागाकडील गट-ब संवर्गाशी समकक्ष ठरविले आहे.

समकक्षतेबाबतची वरील वस्तुस्थिती विचारात घेता राज्य सेवेतील गट-ब संवर्गास जी वेतनश्रेणी लागू असेल ती वेतनश्रेणी जिल्हा परिषदेकडील समकक्ष संवर्गास लागू होईल. ही बाब जिल्हा परिषदेकडील संवर्गास रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करताना शासनस्तरावर विचारात घेणे उचित ठरले असते. अर्थात सदर वेतनश्रेणी नंतर रद्द करण्यात आल्याने हे दोन्ही संवर्ग आता एकाच वेतनसंरचनेत आहेत.

वेतनबँड रू.९३००-३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेतील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब संवर्गास (आणि परिणामी जिल्हा परिषदेकडील समकक्ष संवर्गास) वेतनबँड रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी आहे. वेगवेगळ्या भारतीय चिकित्सा पद्धतीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनात तफावत असू नये आणि जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना यापूर्वीच रू.८०००-१३५०० ही असुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती हे मुद्दे प्रामुख्याने समर्थनार्थ नमूद केले आहेत.

वेतनत्रुटी उच्चस्तर समितीच्या (अहवाल भाग-१, पृष्ठ क्र.५३१-५३३) शिफारशीनुसार शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वेपुर-१२०१/प्र.क्र.४/सेवा-९ दि.२७ फेब्रुवारी, २००६ अन्वये जिल्हा परिषद आस्थापनेवरील जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य) संवर्गास रू.६५००-१०५०० ऐवजी रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. वेतनत्रुटी उच्चस्तर समितीने सदर वेतनश्रेणी पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद ५२.३३ मधील शिफारशींच्या आधारे मंजूर करण्याची शिफारस केली होती. उक्त परिच्छेद ५२.३३ मधील शिफारस पुढीलप्रमाणे आहे:-

**We may recommend that all posts requiring medical practice in Indian system of Medicine and Homoeopathy (ISM&H) and digree in ISM&H as minimum qualification be placed in the entry scale of Rs.2200-4000 and all the posts except those in Delhi Admn. be merged in the Central Indigenous and Homoeo Medical Service.**

या शिफारशीसंदर्भातील पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद ५२.३२ मधील पुढील पार्श्वभूमीदेखील विचारात घेणे आवश्यक आहे :-

**The Tikku Committee recommended a separate organised service for ISM&H. The Consultancy Study has suggested integration of ISM&H doctors in the Central Health Service (CHS) with equal opportunity for high level posts. The Administrative Ministry has underlined the need for building organised career management at par with General Duty Medical Officers (GDOs) of the CHS. To carry through the objectives of a separate Department of ISM&H, we recommend that an organised service, called the Central Indigenous and Homoeo Medical Service, may be constituted to include the 182 practioners, and other physicians**

**of these systems in the Ministry of Labour, Deptt. of Coal, Armed Forces Ayurved Dispensaries and Farmacopoeia Labs of Indian Medicine and Homoeopathy, carrrying medical qualifications.**

वरील शिफारशीचे अवलोकन करता असे दिसून येते की, ISM&H अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र संघटित सेवा निर्माण करण्याची शिफारस करून तद्नंतर या वैद्यकीय अधिकाऱ्यांना रू.२२००-४००० (पाचवा वेतन आयोग रू.८०००-१३५००) ही वेतनश्रेणी मंजूर करून त्या सेवेत समाविष्ट करण्याचीही शिफारस केली आहे. केंद्र शासनाकडील विविध विभागांतील ISM&H अर्हताधारक वैद्यकीय संवर्गाचे सुसुत्रीकरण करण्याचा उद्देश वरील शिफारशीमधून दिसून येतो. तसेच केंद्र शासनाने ISM&H अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवा प्रवेशानंतरच्या तिसऱ्या टप्प्यापर्यंत (3rd ACP) **General Duty Medical Officers (GDOs)** संवर्गाशी समकक्षता दिली आहे. अशाच प्रकारे **Medical Demonstrators, Rural Medical Officer, Field Instructor** आणि **Assistant Medical Officer** इ. संवर्गाच्या बाबतीतही शिफारस केली होती (परिच्छेद ६९.२२). थोडक्यात, श्रेणीवाढीसह संवर्गाचे सुसूत्रीकरण करण्याबाबत शिफारशी केल्या होत्या.

एकंदरीतच केंद्र शासनाकडील वरील वस्तुस्थितीचा संदर्भ जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रू.६५००-१०५०० ऐवजी रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करताना विचारात घेण्याचे राहून गेल्याचे दिसून येते. कारण अशी परिस्थिती जिल्हा परिषद आणि राज्य संवर्गाच्या बाबतीत नाही. राज्यात जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य), महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब आणि महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या स्वतंत्र आणि परस्परपूरक सेवा कार्यरत आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ हा संवर्ग उर्वरित दोन संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे.

कोणत्याही संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना त्या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे स्वरूप, पदाचा दर्जा, पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठीची किमान शैक्षणिक अर्हता, पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सार्वजनिक / प्रशासकीय व्यवस्थेतील स्थान आणि त्यानुषंगाने येणाऱ्या विशिष्ठ जबाबदाऱ्या इत्यादी सर्वसाधारण निकष विचारात घेण्यात येतात.

विचाराधीन प्रकरणी केवळ शैक्षणिक अर्हता हा एकमेव निकष विचारात घेऊन वेतनबँड रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केल्यास पदोन्नीचा संवर्ग व निम्न संवर्ग (**Feeder Cadre**) एकाच स्तरावर येतील. संवर्गाच्या आपापसातील सापेक्षतेस बाधा येईल. ही परिस्थिती टाळण्यासाठी पदोन्नतीच्या संवर्गाची आणि परिणामी पदोन्नती साखळीतील सर्वच संवर्गाची श्रेणीवाढ करण्याशिवाय पर्याय राहणार नाही आणि ते व्यवहार्य नाही तसेच समर्थनीयदेखील नाही. त्याचप्रमाणे त्यामुळे सर्वच संवर्गाच्या बाबतीत पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या आणि वेतनमान यांचा परस्परसंबंध उरणार नाही.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ हा संवर्ग जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य) आणि महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-ब या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ या संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच अधिकारीता उर्वरित दोन संवर्गापेक्षा उच्च आहेत. गट-ब संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या त्यांच्या वेतनश्रेणीनुरूप आहेत. अशा परिस्थितीत गट-ब संवर्गास गट-अ संवर्गाशी समरूप वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर करणे उचित ठरत नाही. तसेच वेतनश्रेणीच्या आधारे गट-अ मध्ये समावेशनाचा पर्याय स्वीकारल्यास गट-ब हा संवर्गच सेवेत अस्तित्वात राहणार नाही. त्यामुळे गट-क संवर्गातून थेट गट-अ मध्ये पदोन्नती द्यावी लागेल. परंतु गट-क मधील (असुधारित वेतनश्रेणी रू.५५००-९०००, सुधारित वेतनसंरचना वेतनबँड रू.९३००-३४८०० अधिक रू.४३०० ग्रेड वेतन) नियुक्तीसाठीची शैक्षणिक अर्हता पाहता, गट-क मधील वैद्यकीय अधिकारी गट-अ मध्ये नियुक्तीस पात्र ठरणार नाहीत. या सर्व बाबी पद संरचना आणि प्रशासकीय दृष्टीकोनातूनही इष्ट ठरणार नाहीत.

थोडक्यात, केंद्र शासनाकडील वैद्यकीय संवर्गांना उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याची पार्श्वभूमी व तेथील संवर्ग व्यवस्थापनाबाबतची विशिष्ठ परिस्थिती राज्य शासन / जिल्हा परिषद वैद्यकीय संवर्गांच्या बाबतीत लागू ठरत नाही. तसेच या संवर्गांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, पदोन्नती साखळी आणि परिणामस्वरूप निर्माण होणाऱ्या प्रशासकीय गुंतागुंत विचारात घेता केवळ शैक्षणिक अर्हता हा एकमेव निकष विचारात घेऊन वेतनबँड रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करणे उचित ठरणार नाही.

तसेच अनेक संवर्गांनी सहाव्या वेतन आयोगात केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी केली आहे. परंतु अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.३ मधील विवेचनाच्या अनुषंगाने राज्य शासनाकडील अन्य कोणत्याही संवर्गास केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असली तरी वैद्यकीय अधिकारी संवर्गात नियुक्तीसाठी आवश्यक असलेली वैद्यकीय पदवी ही अर्हता, या पदवीचा कालावधी आणि मानवी जिवित व आरोग्याशी निगडीत असलेली वैद्यकीय सेवा या बाबी विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेऐवजी वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३) अधिसेविका / ४) सहायक अधिसेविका / ५) अधिसेविका वर्ग-२ श्रेणी-१ / ६) अधिसेविका वर्ग-२ श्रेणी-३ / ७) चिकित्सालयीन निदेशक / ८) परिचारीका पाठ्यनिर्देशिका / ९) परिसेविका / १०)अधिपरिचारीका

संघटनेचे अभिप्राय :- वेतन आयोगाच्या अहवालात परिच्छेद क्र. ३.८.३ इ व ३.८.१५ मध्ये परिचारीकांच्या व्यतिरिक्त इतर निमवैद्यकीय वर्गांबाबत विघटन न करता तसेच समतुल्यतेचा विचार न करता परिचारीकांबाबत सहाव्या वेतन आयोगाने सावधानतेने जाणीवपूर्वक प्रयत्न केले व परिचारीकांच्या कामाचे स्वरुप पाहून त्याची दखल घेतली. त्यानुसार केंद्र शासनाने परिचारिका संवर्गातील पदांना सुधारणापूर्व वरिष्ठ वेतनश्रेणी दिली आहे. त्यावर वेतनश्रेणी व ग्रेड वेतनही दिले आहे. परंतु राज्य शासनाने केंद्रासमान सुधारित वेतनश्रेणी देऊन त्यावर वेतन बँड व ग्रेड वेतन दिलेले नाही. ही मोठी वेतन त्रुटी आहे.

रुग्णसेवेच्या मानाने अल्पसंख्येत असलेल्या परिचारीका असंख्य रोगजंतूंच्या वातावरणात शिफ्ट ड्युटी म्हणजेच तीनही पाळ्यांमध्ये काम करुन दु:खी रुग्णांना औषधोपचार करुन रुग्णसेवा देत असतात व त्यांच्या चिंतीत व असहाय नातेवाईकांना दिलासा देण्याचेही काम करतात. अशा ह्या परिचारिकांच्या कामाची हकीम समितीने फक्त जाणीव असल्याचे आपल्या अहवालात नमूद केले आहे. परंतु दखल घेतलेली नाही. म्हणजेच परिचारीकांच्या कामाचे मूल्यमापन केलेच नाही.

इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या शैक्षणिक अभ्यासक्रमानुसार महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल परिचारीकांना १२ वी नंतर ३ १/२ वर्षांचे प्रशिक्षण देते. प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम, शिक्षण काळ व कामाची पध्दत सर्व काही एकसारखेच आहे. परंतु रुग्णसंख्येच्या मानाने केंद्रातील परिचारीकांपेक्षा महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील परिचारीकांची संख्या निम्मी आहे. तरीही परिचारीका २४ तास रुग्णसेवा व औषधोपचार वेळेवर देण्याचा कसोशीने प्रयत्न करीत असतात. असे असूनही त्यांच्या वेतन व भत्त्यांमध्ये महिन्याला ८ ते ९ हजार रुपयांची तफावत आहे. ती विचारात घेऊन चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सहाव्या वेतन आयोगातही केंद्राप्रमाणे वेतनबँड व ग्रेड वेतन देण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- अधिपरिचारीका संवर्गातून परिसेविका पदावर व तद्नंतर बी.एस.सी (नर्सिंग) ही अर्हता धारण केल्यास पाठ्यनिर्देशिका तसेच चिकित्सालय निर्देशिका या पदांवर पदोन्नती देण्यात येते. अधिपरिचारीका व परिसेविका यांनी बालरोगतज्ज्ञ, मनोरुग्णतज्ज्ञ व सार्वजनिक परिचारीका हे प्रशिक्षण पूर्ण केल्यास सहाय्यक अधिसेविका पदावर पदोन्नती देण्यात येते. सहाय्यक अधिसेविका व पाठ्यनिर्देशिका यांना अधिसेविका पदावर पदोन्नती देण्यात येते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अधिसेविका पद भरण्यात येते. अधिसेविका गट-क पदांमधून अधिसेविका गट-ब (श्रेणी-३)

व अधिसेविका गट-ब (श्रेणी-१) या पदांवर पदोन्नती देण्यात येते. पदोन्नतीमुळे या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ होते. त्यामुळे या पदांच्या वेतनश्रेण्या व ग्रेड वेतनामध्ये वाढ होणे आवश्यक आहे.

परिचारीका संवर्गातील सर्व कर्मचारी ग्रामीण व आदिवासी भागातील उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा व जिल्हा रुग्णालये इ. आरोग्य संस्थांमध्ये रुग्णांच्या सहवासात काम करतात व तेथील गरजूंना वैद्यकीय सेवा पुरवितात. तसेच रुग्णांच्या नातेवाईकांना दिलासा देण्याचे काम करतात. त्यांना तीन पाळयांमध्ये व रोगजंतूंच्या वातावरणात काम करावे लागते. त्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. त्यांच्या कामाचे विशेष स्वरुप विचारात घेता केंद्र शासनाप्रमाणे वरील सर्व पदांच्या वेतनबँड व ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे असे विभागाचे मत आहे.

समितीची शिफारस :-

३) अधिसेविका

४) सहाय्यक अधिसेविका

५) अधिसेविका वर्ग-२ श्रेणी-१

६) अधिसेविका वर्ग-२ श्रेणी-३

७) चिकित्सालयीन निदेशक

८) परिचारीका पाठ्यनिर्देशिका

९) परिसेविका

१०) अधिपरिचारीका

या संवर्गांना राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने (अहवाल परिच्छेद ३.१२) असुधारित वेतनश्रेणींशी समकक्षतेपेक्षा उच्च ग्रेड वेतनाची शिफारस केली होती. परंतु त्यामुळे असुधारित वेतनश्रेणीमध्ये गट-ब आणि गट-क मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे अथवा त्यांच्यापेक्षा निम्न वेतनश्रेणीमध्ये असणाऱ्या वरील काही संवर्गांना वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तुलनेने उच्च अथवा वैद्यकीय अधिकाऱ्यांइतके ग्रेड वेतन अनुज्ञेय झाले असते. वैद्यकीय अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे स्वरूप पाहता असे होणे इष्ट ठरले नसते. तसेच या पदोन्नती साखळीतील संवर्गाच्या वेतनसंरचनेतील आपापसामधील सापेक्षतेवर परिणाम झाला असता. त्यामुळे शासनाने समितीची शिफारस स्वीकृत न करता या संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

प्रस्तुत संवर्गांची मागणी वैद्यकीय अधिकारी गट-अ / गट-ब संवर्गाच्या वेतनसंरचनेप्रमाणे आहे. वरील परिच्छेदात नमूद केलेली पार्श्वभूमी विचारात घेता या संवर्गांच्या वेतनसंरचनेत बदल करणे योग्य होणार नाही.

तसेच अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गांप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे समिती या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी सहमत नाही.

११) नेत्रचिकित्सा अधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- तिसऱ्या वेतन आयोगामध्ये नेत्रचिकित्सा अधिकारी या पदास समकक्ष असलेल्या कनिष्ठ अभियंता, क्ष-किरण तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ इत्यादी पदांना रु.३६५-७६० अशी वेतनश्रेणी होती. नेत्रचिकित्सा अधिकारी यांना चौथ्या वेतन आयोगामध्ये रु.१४००-२३०० व पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.४५००-७००० अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सहाव्या वेतन आयोगामध्ये या पदास रु.५२००-२०२०० हा वेतन बँड अधिक रु. २८०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे.

नेत्रचिकित्सा अधिकारी या पदास समकक्ष असलेल्या कनिष्ठ अभियंता पदास चौथ्या वेतन आयोगामध्ये रु.१६४०-२९०० व पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.५५००-९००० अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. तसेच क्ष-किरण तंत्रज्ञ व प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदांना चौथ्या वेतन आयोगामध्ये रु.१४००-२३०० व पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.५०००-८००० अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सहाव्या वेतन आयोगामध्ये या दोन्ही पदांना रु. ९३००-३४८०० हा वेतन बँड अधिक रु.४२०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे.

नेत्रचिकित्सा अधिकारी पदावर कर्तव्ये बजावत असताना त्यात जोखीम हा घटक अंतर्भूत असतो. कनिष्ठ अभियंत्यांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांच्या तुलनेत नेत्रचिकित्सा अधिकारी या पदाच्या जबाबदाऱ्या जास्त जोखमीच्या आहेत.

नेत्रचिकित्सा अधिकारी पदासाठी १२ वी नंतर २ वर्षांचा डिप्लोमा आवश्यक आहे. तर पदविकाधारक अभियंत्यांसाठी १० वी नंतर ३ वर्षांचा डिप्लोमा आवश्यक आहे. त्यामुळे नेत्रचिकित्सा अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता कनिष्ठ अभियंत्यांपेक्षा उच्च दर्जाची आहे.

नेत्रचिकित्सा अधिकारी या पदास समकक्ष असलेल्या कनिष्ठ अभियंता, क्ष-किरण तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेला रु.९३००-३४८०० हा वेतनबँड अधिक रु.४२०० ग्रेड वेतन विचारात घेता नेत्रचिकित्सा अधिकारी पदावर अन्याय होत आहे. त्यामुळे समकक्ष पदांस दिलेली वेतनसंरचना नेत्रचिकित्सा अधिकारी पदास मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेच्या वरील अभिप्रायांशी विभागाने सहमती दर्शवून पुढीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहेत.

नेत्रचिकित्सा अधिकारी या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या शासनाने निश्चित केलेल्या असून नेत्रचिकित्सा अधिकारी कर्तव्य बजावत असताना त्यांचा अमूल्य मानवी जीवनाशी संबंध येतो. नेत्रचिकित्सा अधिकारी हे नेत्रशस्त्रक्रियेव्यतिरिक्त शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांची पुनर्तपासणी करणे उदा. चष्म्याचे नंबर काढणे, शालेय आरोग्य तपासणी, नेत्रतपासणी शिबीर आयोजित करणे इ. कामे करतात. या कामामध्ये चूक झाल्यास मानवी जीवनाचे कधीही भरुन न येणारे नुकसान होऊ शकते. नेत्रचिकित्सा अधिकारी यांना सांसर्गिक तसेच असांसर्गिक आजार असलेल्या रुग्णांसोबत काम करावे लागते. त्यामुळे त्यांची कर्तव्ये बजावत असताना त्यात जोखीम हा घटक अंतर्भूत असतो. कनिष्ठ अभियंत्यांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांच्या तुलनेत नेत्रचिकित्सा अधिकारी या पदाच्या जबाबदाऱ्या जास्त जोखमीच्या आहेत. तसेच नेत्रचिकित्सा अधिकारी यांच्या अनुपस्थितीत त्यांचे काम इतर कोणीही करु शकत नाही. याउलट कनिष्ठ अभियंत्यांचे काम त्यांच्या अनुपस्थितीत सुरु राहू शकते.

नेत्रचिकित्सा अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच सेवाप्रवेश नियम, त्यांच्या दैनंदिन कामाची जोखीम लक्षात घेता त्यांना पदविकाधारक अभियंता यांच्याप्रमाणेच वेतनसंरचना लागू करण्यात यावी असे विभागाचे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) नेत्रचिकित्सा अधिकारी संवर्गाला राज्य शासनाकडील कनिष्ठ अभियंता या संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गाला असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

या संवर्गाला पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१२) औषधनिर्माता (आरोग्य सेवा संचालनालय व राज्य कामगार विमा योजना)

संघटनेचे अभिप्राय :- तिसऱ्या वेतन आयोगामध्ये या पदास समकक्ष असलेल्या कनिष्ठ अभियंता या पदास रु.२९०-५४० अशी वेतनश्रेणी होती. तसेच चौथ्या वेतन आयोगामध्ये रु.१४००-२३०० व पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.५५००-९००० अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. मात्र

औषधनिर्माता पदास चौथ्या वेतन आयोगामध्ये रु.१३५०-२२०० व पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.४५००-७००० अशी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. ती कनिष्ठ अभियंत्यांच्या तुलनेत कनिष्ठ वेतनश्रेणी आहे. कनिष्ठ अभियंत्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांच्या तुलनेत औषधनिर्माता या पदाच्या जबाबदाऱ्या जास्त जोखमीच्या आहेत. औषध निर्माता १२ वी नंतर २ वर्षांचा डिप्लोमा कोर्स व ५०० तासांचे प्रॅक्टिकल ट्रेनिंग पूर्ण केल्यानंतर फार्मसी कौन्सिलकडे नोंदणी होण्यास व शासकीय सेवेसाठी पात्र ठरतात. पदविकाधारक अभियंते मात्र १० वी नंतर ३ वर्षांचा डिप्लोमा झाल्यानंतर शासकीय सेवेसाठी पात्र ठरतात. त्यामुळे औषधनिर्मात्यांची शैक्षणिक अर्हता कनिष्ठ अभियंत्यांपेक्षा उच्च आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या औषधनिर्माता पदावरील कर्मचाऱ्यांना रु.९३००-३४८०० हा वेतनबँड लागू करण्यात आला आहे. त्यामुळे वेतनसंरचनेतील असमानता दूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेच्या वरील अभिप्रायांशी विभागाने सहमती दर्शवून खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद केले आहेत.

औषधनिर्माता या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या शासनाने निश्चित केलेल्या असून औषधनिर्मात्यांचा कर्तव्य बजावत असताना अमूल्य मानवी जीवनाशी संबंध येतो. औषधनिर्मात्यांच्या कामामध्ये चूक झाल्यास मानवी जीवनाचे कधीही भरुन न येणारे नुकसान होऊ शकते. तसेच औषधनिर्मात्यांना २४ तास इमर्जन्सी सेवा द्यावी लागते.

औषधनिर्मात्यांना सांसर्गिक व असांसर्गिक आजार असलेल्या रुग्णांसोबत काम करावे लागते. त्यामुळे त्यांची कर्तव्ये बजावत असताना त्यात जोखीम हा घटक अंतर्भूत असतो. कनिष्ठ अभियंत्यांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांच्या तुलनेत औषधनिर्माता या पदाच्या जबाबदाऱ्या जास्त जोखमीच्या आहेत. औषधनिर्मात्यांना आजचे काम उद्यावर ढकलता येत नाही. तसेच औषधनिर्मात्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे काम इतर कोणासही करण्यास कायद्याने परवानगी नाही. याउलट कनिष्ठ अभियंत्यांचे काम त्यांच्या अनुपस्थितीत सुरु राहू शकते.

राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत कार्यरत असलेल्या औषधनिर्माता पदावरील कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगामध्ये रु.९३००-३४८०० हा वेतनबँड लागू करण्यात आला आहे. तर सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या औषधनिर्माता पदास वेतनबँड रु.५२००-२०२०० लागू करण्यात आला आहे. थोडक्यात, एकाच राज्य शासनसेवेत असलेल्या व एकसारखी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच एकसारखी कर्तव्ये व जबाबदारी असणाऱ्या शासनाच्या दोन विभागातील औषधनिर्मात्यांना वेगवेगळी वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. ही असमानता दूर करणे अगत्याचे आहे.

औषधनिर्मात्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच सेवाप्रवेश नियम, त्यांच्या दैनंदिन कामाची जोखीम लक्षात घेता त्यांना पदविकाधारक अभियंता यांच्याप्रमाणेच वेतनसंरचना लागू करण्यात यावी असे विभागाचे मत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गाला राज्य शासनाकडील कनिष्ठ अभियंता संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील वरिष्ठ औषधनिर्माता व निवडश्रेणी औषधनिर्माता हे संवर्ग पूर्वीपासूनच वरील दोन्ही संवर्गापेक्षा उच्च वेतनश्रेणीमध्ये आहेत. त्यामुळे प्रस्तुत संवर्गाची त्या संवर्गांशी तुलना होऊ शकत नाही.

या संवर्गाला पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१३) सहाय्यक संचालक (वाहतूक) / १४) सेवा व्यवस्थापक (वाहतूक) / भांडार अधिकारी / १५) आरोग्य साधन सामुग्री देखभाल अधिकारी / १६) सेवा अभियंता (वाहतूक) / पर्यवेक्षक / १७) प्रमुख

कारागीर / तंत्रज्ञ / १८) कार्यदेशक / वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक / १९) कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री / २०) कुशल कारागीर / २१) अर्ध कुशल कारागीर / २२) अकुशल कारागीर

**संघटनेचे अभिप्राय :-** पाचव्या वेतन आयोगामध्ये केंद्र शासनाने तांत्रिक पदांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन विविध पदांना वेतनश्रेण्या लागू केल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाच्या इतर विभागांतील तांत्रिक पदांना किमान शैक्षणिक अर्हतेनुसार वेतनश्रेण्या लागू करण्यात आल्या आहेत. तथापि, राज्य शासनाच्या आरोग्य विभागातील परिवहन सेवेतील तांत्रिक पदांचे सेवाप्रवेश नियम पाचवा वेतन आयोग राज्य शासनाने लागू करतेवेळी मंजूर नसल्यामुळे, या पदांना किमान शैक्षणिक अर्हतेनुसार वेतनश्रेणी मंजूर करण्यांत आलेली नाही. सहाव्या वेतन आयोगानुसार पाचव्या वेतन आयोगात लागू करण्यात आलेल्या वेतनश्रेणीवर आधारित वेतनसंरचना परिवहन सेवेतील सर्व तांत्रिक पदांना मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे आरोग्य विभागातील परिवहन सेवेतील तांत्रिक पदे व इतर विभागांतील तांत्रिक पदे यांच्या वेतनसंरचनेमध्ये तफावत येते. त्यामुळे या पदांवर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या इतर विभागांतील तांत्रिक पदांना लागू केलेली वेतनसंरचना आरोग्य विभागातील परिवहन सेवेतील तांत्रिक पदांनाही लागू करण्यात यावी.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** पाचव्या वेतन आयोगाच्या राज्य वेतन सुधारणा समितीच्या अहवालातील प्रकरण ४ मधील परिच्छेद ४.१२ नुसार थेट भरतीसाठी माध्यमिक शालांत परीक्षा अधिक २ वर्षांची पदविका / प्रमाणपत्र (आयटीआय) ही किमान शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या पदांसाठी राज्य शासनाने रु.४०००-६००० ( एस-७) ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. राज्य शासनातील तंत्र शिक्षण विभागातील कातारी ( टर्नर) / सांधाता (वेल्डर) / जोडारी (फिटर) या पदांसाठीही परिवहन सेवेतील अकुशल कारागीर या पदाप्रमाणेच माध्यमिक शालांत परीक्षा अधिक २ वर्षांची पदविका / प्रमाणपत्र (आयटीआय) अधिक १ वर्षाचे एनसीटीव्हीटी प्रमाणपत्र ही शैक्षणिक पात्रता आवश्यक असून त्यांना पाचव्या वेतन आयोगात रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. मात्र आरोग्य विभागातील परिवहन सेवेतील अकुशल कारागीर या पदासाठी पाचव्या वेतन आयोगानुसार रु.२५५०-३२०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करतेवेळी परिवहन सेवेतील पदांचे सेवाप्रवेश नियम मंजूर नसल्याने अकुशल कारागीर पदास रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही. सहाव्या वेतन आयोगानुसार या पदास रु.४४४०-७४४० हा वेतनबँड व रु.१३०० ग्रेड वेतन लागू करण्यात आले आहे. वास्तविक सहाव्या वेतन आयोगात अकुशल कारागीर पदासाठी लागू असलेली शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन रु.५२००-२०२०० हा वेतनबँड व रु.२४०० ग्रेड वेतन लागू करणे आवश्यक होते. अकुशल कारागीर हे पद परिवहन सेवेतील सर्वात कनिष्ठ पद असून या पदास अनुक्रमे अर्धकुशल कारागीर, कुशल कारागीर, वीजतंत्री / कनिष्ठ तांत्रिक सहायक ही पदोन्नतीची पदे आहेत.

पाचव्या वेतन आयोगाच्या राज्य वेतन सुधारणा समितीच्या अहवालातील प्रकरण ४ मधील परिच्छेद ४.११ नुसार थेट भरतीसाठी विज्ञान शाखेतील पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान शैक्षणिक अर्हता आवश्यक असलेल्या तंत्रज्ञ वा अभियांत्रिकी संवर्गातील पदांसाठी राज्य शासनाने रु.५०००-८००० ( एस-९) ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. दि. २७.०३.२००२ रोजी मंजूर करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार कार्यदेशक / वरिष्ठ तांत्रिक सहायक पदाच्या थेट भरतीसाठी अभियांत्रिकी पदविका ही किमान शैक्षणिक अर्हता आहे. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करतेवेळी हे सेवाप्रवेश नियम मंजूर नसल्याने या पदास रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही. पाचव्या वेतन आयोगानुसार कार्यदेशक / वरिष्ठ तांत्रिक सहायक या पदासाठी रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्याआधारे सहाव्या वेतन आयोगानुसार या पदास रु.५२००-२०२०० हा वेतनबँड व रु. २४०० ग्रेड वेतन लागू करण्यात आले आहे. वास्तविक सहाव्या वेतन आयोगात कार्यदेशक / वरिष्ठ तांत्रिक सहायक पदासाठी लागू असलेली शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन रु. ९३००-३४८०० हा वेतनबँड व रु. ४२०० ग्रेड वेतन लागू करणे आवश्यक होते. कार्यदेशक /

वरिष्ठ तांत्रिक सहायक या पदांस परिवहन सेवेत अभियांत्रिकी संवर्गातील अनुक्रमे प्रमुख कारागीर / तंत्रज्ञ, सेवा अभियंता / पर्यवेक्षक, सेवा व्यवस्थापक / भांडार अधिकारी / आरोग्य साधन सामुग्री व दुरुस्ती अधिकारी व सहाय्यक संचालक ही पदोन्नतीची पदे आहेत.

सहाय्यक संचालक (परिवहन) हे गट-अ मधील तांत्रिक पद असून या पदास पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी तर सहाव्या वेतन आयोगामध्ये रु.१५६००-३९१०० वेतन बँड व रु.५४०० ग्रेड वेतन लागू करण्यात आले आहे. आरोग्य विभागातील इतर सहाय्यक संचालकांना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.१००००-१५२०० ही वेतनश्रेणी तर सहाव्या वेतन आयोगामध्ये रु.१५६००-३९१०० वेतनबँड व रु.६६०० ग्रेड वेतन लागू करण्यात आले आहे. एकाच विभागातील समकक्ष पदांना समान वेतनबँड व ग्रेड वेतन लागू करणे आवश्यक आहे. त्यामुळे सहाय्यक संचालक (परिवहन) पदासाठी रु.६६०० ग्रेड वेतन लागू करण्यात यावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१३) सहाय्यक संचालक (वाहतूक)

सार्वजनिक आरोग्य विभागातील इतर सहाय्यक संचालकांप्रमाणे या संवर्गास रु.६६०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी आहे. आरोग्य सेवेतील सहाय्यक संचालक हे वैद्यकीय पदवीधारक असतात. त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या आरोग्य सेवेशी निगडीत असून प्रस्तुत संवर्गापेक्षा भिन्न आहेत. वैद्यकीय सेवेतील सहाय्यक संचालक व प्रस्तुत संवर्ग समकक्ष नाहीत. या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१४) सेवा व्यवस्थापक (वाहतूक) / भांडार अधिकारी

१५) आरोग्य साधन सामुग्री देखभाल अधिकारी

सेवा व्यवस्थापक (वाहतूक) / भांडार अधिकारी आणि आरोग्य साधन सामुग्री देखभाल अधिकारी हा सेवा अभियंता (वाहतूक) / तांत्रिक पर्यवेक्षक या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग असल्याचे प्रशासकीय विभागाने नमूद केले आहे. सेवा अभियंता (वाहतूक) या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस केली आहे. सदर शिफारस स्वीकारल्यास पदोन्नतीच्या व निम्न संवर्गाची वेतनसंरचना समान होईल. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास पदोन्नतीच्या पदास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यासंदर्भात राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार पदोन्नतीच्या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याबाबत तपासणी करून प्रशासकीय विभागास वित्त विभागाच्या सहमतीने कार्यवाही करता येईल.

१६) सेवा अभियंता (वाहतूक) / तांत्रिक पर्यवेक्षक

सेवा अभियंता (वाहतूक) / तांत्रिक पर्यवेक्षक हा मुख्य कारागीर / तंत्रज्ञ या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग असल्याचे प्रशासकीय विभागाने नमूद केले आहे. वास्तव या दोन्ही संवर्गाच्या वेतनसंरचनेत फरक ठेवणे आवश्यक वाटते. करिता, सेवा अभियंता (वाहतूक) / तांत्रिक पर्यवेक्षक या पदोन्नतीच्या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१७) मुख्य कारागीर / तंत्रज्ञ

मुख्य कारागीर / तंत्रज्ञ हा कार्यदेशक / वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक या संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. त्यामुळे या दोन्ही संवर्गाच्या वेतनसंरचनेत फरक ठेवणे आवश्यक असल्याने मुख्य कारागीर / तंत्रज्ञ या पदोन्नतीच्या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१८) कार्यदेशक / वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक

शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.आरटीआर १०९६/प्र.क्र.१२५/ सेवा-१, दि.२७ मार्च, २००२ अन्वये विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार कार्यदेशक / वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक या संवर्गामध्ये नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि यांत्रिकी, ऑटोमोबाईल किंवा उत्पादन अभियांत्रिकी पदविका अथवा तत्सम अर्हता ही शैक्षणिक अर्हता विहित केली आहे.

नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विज्ञान शाखेची पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान अर्हता अत्यावश्यक असलेल्या तंत्रज्ञ अथवा अभियांत्रिकी संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांमध्ये वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. सदर वस्तुस्थिती आणि वर नमूद केलेली शैक्षणिक अर्हता विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९) कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री

२०) कुशल कारागीर

२१) अर्ध कुशल कारागीर

२२) अकुशल कारागीर

शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.आरटीआर १०९६/प्र.क्र.१२५/ सेवा-१, दि.२७ मार्च, २००२ अन्वये विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र ही शैक्षणिक अर्हता विहित केली आहे. ही किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या वीजतंत्री व तत्सम तांत्रिक संवर्गांना वेतनबँड पीबी-१: रु. ५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. याच तत्त्वानुसार कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री या संवर्गांना वेतनबँड पीबी-१: रु. ५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील आदेशांद्वारे विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमांनुसार कुशल कारागीर व अकुशल कारागीर या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठीदेखील माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र ही शैक्षणिक अर्हता विहित केली आहे. अर्ध कुशल कारागीर संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्ती केली जात नाही असे सेवाप्रवेश नियमांनुसार दिसून येते. मात्र या संवर्गात अकुशल कारागीर संवर्गातून पदोन्नती दिली जाते म्हणजेच या संवर्गाची शैक्षणिक अर्हतादेखील उर्वरित दोन संवर्गांप्रमाणेच आहे.

शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन कातारी ( टर्नर) / सांधाता (वेल्डर) / जोडारी (फिटर) या संवर्गाप्रमाणे अकुशल कारागीर संवर्गास रु.२४०० ग्रेड वेतन तर पुढील पदोन्नतीच्या अर्ध कुशल कारागीर व कुशल कारागीर संवर्गांना अनुक्रमे रु.२५०० व रु.२८०० ग्रेड वेतनाची मागणी आहे.

कोणत्याही संवर्गाची वेतनसंरचना केवळ शैक्षणिक अर्हता या एकमेव निकषाच्या आधारे विहित केली जात नाही. तसेच कोणत्याही संवर्गाची शैक्षणिक अर्हता ही त्या संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांनुरूप विहित केली जाते. विचाराधीन संवर्गांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता या संवर्गाची शैक्षणिक अर्हता ही किमान आवश्यक अर्हतेपेक्षा उच्च स्तराची विहित केली आहे असे समितीचे मत आहे. वर नमूद शैक्षणिक अर्हता ही किमान अर्हता आवश्यक असलेले आणि रु.२४०० ग्रेड वेतन (असुधारित वेतनश्रेणी रु.४०००-६०००) मंजूर केलेल्या संवर्गांच्या (उदा. कातारी/सांधाता/ जोडारी /वीजतंत्री इ.) कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चितच जास्त आहेत. त्यामुळे केवळ शैक्षणिक अर्हतेच्या आधारे उच्च ग्रेड वेतनाची मागणी समर्थनीय ठरत नाही.

या संवर्गांना त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांनुरूप सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. वरील विवेचन विचारात घेता अर्ध कुशल कारागीर आणि अकुशल कारागीर संवर्गांच्या वेतनसंरचनेमध्ये बदल करणे उचित होणार नाही.

तथापि, वरील सेवाप्रवेश नियमांनुसार अर्ध कुशल कारागीर संवर्गातून कुशल कारागीर / कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री या संवर्गात पदोन्नती देण्यात येते. पदांच्या उपलब्धतेनुसार काही कर्मचारी कुशल कारागीर संवर्गात तर काही कर्मचारी कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री संवर्गात पदोन्नत होऊ शकतात. अशा परिस्थितीत सेवाज्येष्ठ कर्मचारी कुशल कारागीर संवर्गात आणि सेवाकनिष्ठ कर्मचारी कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री संवर्गात पदोन्नत झाल्यास सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने ते अन्यायकारक ठरेल. सदर वस्तुस्थिती विचारात घेता कुशल कारागीर संवर्गास कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / वीजतंत्री संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-१: रु. ५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## ३.१४ - सार्वजनिक बांधकाम विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द) - विविध मंत्रालयीन विभागांतील विशिष्ट पदे - सार्वजनिक बांधकाम विभाग | | | | | |
| १ | सचिव (रस्ते) / (बांधकामे) | १८४००-२२४०० | ३७४००-६७००० | १०००० | ३७४००-६७००० | १२००० |
| | ब) सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व मंडले ) | | | | | |
| १ | मुख्य अभियंता | १६४००-२०९०० | ३७४००-६७००० | ८९०० | ३७४००-६७००० | १०००० |
| २ | अधीक्षक अभियंता | १)१२०००-१६५०० (अधिक एका पदासाठी विशेष वेतन रु. ७००/-)<br>२)१४३००-१८३०० (निवडश्रेणी- २०% पदांसाठी) | १५६००-३९१००<br>३७४००-६७००० (निवडश्रेणी- २०% पदांसाठी) | ७६००<br>८७०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| ३ | कार्यकारी अभियंता | १०६५०-१५८५० (अधिक दोन पदांसाठी विशेष वेतन रु.६००/-) | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ४ | सहायक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| ५ | प्रमुख आरेखक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| ६ | आरेखक | १)४५००-७०००<br>२)५५००-९००० ( ४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | ५२००-२०२००<br>९३००-३४८०० ( ४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | २८००<br>४३०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८०० ( ४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | ४२००<br>४३०० |
| ७ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| ८ | दूरध्वनीचालक | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २००० | ५२००-२०२०० | २८०० |
| ९ | यांत्रिकी | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | विशेष अधीक्षक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| ११ | अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| १२ | प्रथम लिपिक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| १३ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| १४ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |
| १५ | भांडार अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | १५६००-३९१०० | ५८०० |
| १६ | भांडारपाल | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४७०० |
| १७ | सहाय्यक भांडारपाल | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २५०० |
| | क) संचालक, उपवने व उद्याने | | | | | |
| १ | संचालक, उपवने व उद्याने (गट- अ) | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| २ | अतिरिक्त संचालक, उपवने व उद्याने (गट-अ) | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ५००० | १५६००-३९१०० | ६००० |
| ३ | सहाय्यक संचालक, उपवने व उद्याने (गट- ब) | ६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु.४००/-) | ९३००-३४८०० | ४६०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| | ड) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन | | | | | |
| १ | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ | १६४००-२०९०० | ३७४००-६७००० | ८९०० | ३७४००-६७००० | १२००० |
| २ | उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ | १)१२०००-१६५००<br>२)१४३००-१८३०० (निवडश्रेणी- २०% पदांसाठी) | १५६००-३९१००<br>३७४००-६७००० (निवडश्रेणी- २०% पदांसाठी) | ७६००<br>८७०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| ३ | वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| ४ | वास्तुशास्त्रज्ञ | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ५ | कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| ६ | वास्तुशास्त्रीय आरेखक | १)४५००-७०००<br>२)५०००-८००० ( ४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | ५२००-२०२००<br>९३००-३४८०० (४ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर) | ३५००<br>४३०० | ९३००-३४८०० | ४२०० |

अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द) - विविध मंत्रालयीन विभागांतील विशिष्ट पदे - सार्वजनिक बांधकाम विभाग

१) सचिव (रस्ते) / (बांधकामे)

संघटनेचे अभिप्रायः-

सचिव हे पद महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेतील सर्वोच्च पद आहे. केंद्र शासनाकडील चेअरमन, केंद्रीय जल आयोग हे पद नियुक्तीने भरण्याची तरतूद आहे. सदर नियुक्तीसाठी रु.२२४००-२४५०० या वेतनश्रेणीमध्ये दोन वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. ही वेतनश्रेणी केंद्रातील एडीजी मेंबर या केंद्र शासनाकडील सचिवांच्या निम्नस्तर पदाची आहे. राज्यातील सचिव पदांना रु.१८४००-२२४०० अशी खूप कमी वेतनश्रेणी असल्यामुळे नियुक्तीसाठी ते पात्र होत नाहीत. राज्यातील अभियंत्यांनी देशस्तरावर काम करून राज्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी व राज्याचे प्रकल्प प्रस्ताव गतिमान करण्यासाठी केंद्र शासनाच्या एडीजी मेंबर या पदासमकक्ष वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे.

राज्याच्या सचिव पदांना रु.१८४००-२२४०० ही वेतनश्रेणी सेवेच्या उत्तरार्धात साधारणत: २ ते ३ वर्षांसाठी मिळते. त्यामुळे ते रु.२२४००-२४५०० या वेतनश्रेणीमध्ये दोन वर्षांपेक्षा जास्त काळ सेवारत राहू शकत नाहीत. या स्थितीमुळे केंद्राच्या वेतनश्रेणीची मागणी महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा महासंघाने केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्रायः-

संघटनेच्या मागणीशी विभाग सहमत आहे. सचिवांच्या कामाची व्याप्ती, जबाबदाऱ्या, विविध स्तरावरील निर्णय, अंमलबजावणी व सनियंत्रण इ. बाबी पाहता, अभियांत्रिकी विभागाच्या सचिव पदासाठी वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० आणि रु.१०००० ऐवजी रु.१२००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग संवर्गास केंद्र शासनाकडील अभियांत्रिकी सेवेतील संवर्गाशी समकक्षता प्रदान केलेली नाही. त्यामुळे केंद्र शासनाकडील अभियांत्रिकी सेवेतील संवर्गाप्रमाणे उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय ठरत नाही.

जलसंपदा विभागाच्या सचिवांप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिव संवर्गात राज्याच्या अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्यांमधून नियुक्ती केली जाते. सचिव, जलसंपदा विभाग आणि सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग हे संवर्ग समकक्ष आहेत. सचिव, जलसंपदा विभाग या संवर्गाप्रमाणेच सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग या संवर्गास सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु.१०००० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. इतर प्रशासकीय विभागातील सचिव (भारतीय प्रशासन सेवा) संवर्गासदेखील हीच सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग संवर्गाच्या सुधारित वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

ब) सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व मंडळे )

१) मुख्य अभियंता

संघटनेचे अभिप्रायः-

केंद्र शासनाकडे तसेच अनेक राज्यांत मुख्य अभियंत्यांना रु.१०००० ग्रेड वेतन दिले आहे. राज्यात ते रु.८९०० इतके आहे.

वास्तविक राज्यातील व केंद्र शासनाकडील अभियंत्यांची शैक्षणिक पात्रता, भरतीची पद्धती व पदोन्नतीची पात्रता एकच आहे. याउलट राज्यातील अभियंत्यांना पदोन्नती विलंबाने मिळते. शिवाय त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तुलनात्मकदृष्ट्या अवाढव्य आहेत. राज्यातील अभियंत्यांच्या सर्वेक्षण,

संकल्पन, नियोजन, बांधकाम, व्यवस्थापन इ.कामांचे स्वरुप विशाल आहे. केंद्र शासनाकडील अभियंत्यांकडे प्रामुख्याने प्रकल्प छाननीची कामे असतात. त्यामुळे किमान केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना मिळण्याबाबत विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

राज्यातील मुख्य अभियंता पदाला रु.१६४००-२०९०० ही वेतनश्रेणी देण्यात आली असल्याने रु.८९०० ग्रेड वेतन देय ठरते. परंतु केंद्र शासनाकडील समकक्षता विचारात घेता, मुख्य अभियंत्यांसाठी निश्चित केलेल्या वेतनबँडनुसार राज्यातील मुख्य अभियंत्यांना रु.३७४००-६७००० या वेतनबँडमध्ये रु.८९०० ऐवजी केंद्र शासनाप्रमाणे रु.१०००० ग्रेड वेतन देण्यात यावे. राज्य शासनाकडील मुख्य अभियंत्यांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये व कामाची व्याप्ती केंद्र शासनाकडील मुख्य अभियंत्यापेक्षा फार जास्त आहेत.

२) अधीक्षक अभियंता

संघटनेचे अभिप्राय:-

पाचव्या वेतन आयोगानुसार केंद्र व राज्य शासनाने २० टक्के अधीक्षक अभियंता पदांना रु.१४३००-१८३०० ही निवडश्रेणी दिली होती. केंद्र शासनाने दि.६.६.२००० रोजी सुधारणा करुन सर्व पदांना रु.१४३००-१८३०० ही वेतनश्रेणी दिली आहे. सहाव्या वेतन आयोगाने त्यानुसार सर्व अधीक्षक अभियंत्यांना वेतनबँड पीबी-४ आणि रु.८७०० ग्रेड वेतन दिले आहे. त्यानुसार वेतनसंरचना मिळण्याबाबत मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

राज्यातील अधीक्षक अभियंत्यांना पाचव्या वेतन आयोगात रु.१२०००-१६५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सहाव्या वेतन आयोगात त्या समकक्ष वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. केंद्र शासनाने दि.६.६.२००० च्या अधिसूचनेनुसार अधीक्षक अभियंत्यांच्या सर्व पदांना पाचव्या वेतन आयोगात रु.१४३००-१८३०० ही सुधारित वेतनश्रेणी मंजूर केली आहे. त्यामुळे सहाव्या वेतन आयोगात त्या समकक्ष वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. राज्यातील अधीक्षक अभियंता संवर्गातील सर्व पदांना केंद्र शासनाकडील अधीक्षक अभियंता पदाप्रमाणे वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

अधीक्षक अभियंत्यांच्या मंत्रालयात सार्वजनिक बांधकाम विभागात पदसिद्ध उपसचिव व अधीक्षक अभियंता या पदावर नेमणूका होतात. त्यामुळे अधीक्षक अभियंता व मंत्रालयातील उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना वेतनबँड पीबी-४:रु.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

३) कार्यकारी अभियंता

संघटनेचे अभिप्राय:-

केंद्र शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी सुधारुन नंतर दि.६.६.२००० च्या अधिसूचनेनुसार वरिष्ठ कार्यकारी पदांच्या ३० टक्के कार्यकारी अभियंता पदांना ५ वर्षांच्या सेवेनंतर रु.१२०००-१६५०० ही निवडश्रेणी दिली आहे. सहाव्या वेतन आयोगाने त्यानुसार रु.७६०० ग्रेड वेतन दिले आहे. त्यानुसार वेतनसंरचना मिळण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

राज्यातील कार्यकारी अभियंत्यांना पाचव्या वेतन आयोगात रु.१०६५०-१५८५० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सहाव्या वेतन आयोगात त्या समकक्ष वेतनबँड पीबी-३:रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. केंद्र शासनाने त्यांच्या दि.६.६.२००० रोजीच्या अधिसूचनेन्वये वरिष्ठ कार्यकारी पदांच्या ३० टक्के कार्यकारी अभियंता पदांना पाच वर्षांच्या

सेवेनंतर रू.१२०००-१६५०० ही निवडश्रेणी मंजूर केली आहे. त्यामुळे सहाव्या वेतन आयोगात त्यानुसार रू.१५६००-३९१०० हा वेतनबँड व रू.७६०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. त्याप्रमाणे राज्यातील कार्यकारी अभियंत्यांनादेखील वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.७६०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी. कार्यकारी अभियंत्यांच्या मंत्रालयातील सार्वजनिक बांधकाम विभागात अवर सचिव या पदावर नेमणूका होतात. त्यामुळे कार्यकारी अभियंता / अवर सचिव पदास वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.७६०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

समितीची शिफारस :-

१) मुख्य अभियंता

२) अधीक्षक अभियंता

३) कार्यकारी अभियंता

मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता या संवर्गांना केंद्र शासनाकडील मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे. अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता केंद्र शासनाकडील संवर्गांप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे समिती या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी सहमत नाही.

४) सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता

संघटनेचे अभिप्राय:-

केंद्र शासनाकडे सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता हे राजपत्रित पद नाही. तेथे कनिष्ठ अभियंता - पदवीधर/अपदवीधर असे वर्ग-३ चे (अराजपत्रित गट-क) पद आहे. त्यास सहाव्या आयोगाने रू.४६०० ग्रेड वेतन दिले आहे. त्यांची वेतनश्रेणी रू.६५००-१०५०० होती, ती सुधारून सहाव्या वेतन आयोगाने रू.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी दिली आहे. राज्यातील पद राजपत्रित 'ब' गटातील असून नियुक्ति लोकसेवा आयोगामार्फत संयुक्त परिक्षेद्वारे होते. तथापि, त्यांना रू.६५००-१०५०० ही निम्नस्तर वेतनश्रेणी दिली आहे.

वास्तविक राज्यातील अभियंत्यांना पदोन्नती फार विलंबाने मिळते. शिवाय, त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या तुलनात्मकदृष्ट्या अवाढव्य आहेत. सदर संवर्ग क्षेत्रिय स्वरूपाचे प्रकल्पाचे काम करणारा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडील पदांपेक्षा उच्च पदांना रू.४६०० ग्रेड वेतनाऐवजी रू.४८०० ग्रेड वेतन मिळण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

या पदाची किमान शैक्षणिक पात्रता अभियांत्रिकी पदवी अशी आहे. या संवर्गाचे कामाचे स्वरूप, भरतीची पद्धती व जबाबदाऱ्या विचारात घेऊन केंद्र शासनाने कनिष्ठ अभियंता - पदवीधर या पदाला रू.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी दिली आहे व त्यानुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनबँड रू.९३००-३४८०० आणि रू.४६०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. राज्यात पदवीधरांमधून लोकसेवा आयोगामार्फत गट-ब मधील पद भरण्यात येते. तेव्हा वेतनबँड पीबी-२ मधील रू.४८०० ग्रेड वेतन देण्याबाबत विभागाची शिफारस आहे.

समितीची शिफारस :-

सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता हा कनिष्ठ अभियंता संवर्गाचा पदोन्नतीचा संवर्ग असल्याने वेतन समानीकरण समितीने चौथ्या वेतन आयोगात कनिष्ठ अभियंता संवर्गाची वेतनश्रेणी व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता या संवर्गाची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन शिफारस केलेली रू.१६४०-२९०० वेतनश्रेणी या संवर्गास मंजूर केली होती. तद्नंतर या वेतनश्रेणीमध्ये रू.२०००-३५०० अशी पुन:सुधारणा करून या संवर्गास राजपत्रित दर्जा देण्यात आला

आहे. म्हणजेच या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात श्रेणीवाढीचा लाभ मिळालेला आहे. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन या संवर्गास सहाव्या वेतन आयोगात योग्य सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

तसेच प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी समिती सहमत नाही.

५) प्रमुख आरेखक

संघटनेचे अभिप्राय:-

राज्य शासनाने / वेतनत्रुटी उच्चस्तर समितीने प्रमुख आरेखक / मुख्य आरेखक या पदास केंद्र शासनाकडील चीफ ड्राफ्टस्मन (मुख्य आरेखक) या पदाशी समकक्ष ठरवून रु.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी दिलेली नाही व हीच त्रुटी सहाव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी समितीने दूर करून त्याप्रमाणे फक्त ग्रेड वेतन रु.४६०० मंजूर करावे अशी मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

संघटनेच्या मागणीशी सहमत असून त्यांच्या मागणीचा विचार व्हावा.

६) आरेखक

संघटनेचे अभिप्राय:-

सहाव्या वेतन आयोगात या पदास वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.२८०० आणि चार वर्षांनंतर वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४३०० अशी वेतनसंरचना दर्शविली आहे ती चुकीची आहे. यामुळे सरळसेवा भरतीने येणाऱ्या आरेखकास सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.२८०० हे मिळेल व चार वर्षानंतर त्यास रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४३०० हे चुकीने मिळेल.

याऐवजी रु.५०००-८००० व ग्रेड पे रु.४२०० व चार वर्षांनंतर रु.५५००-९००० व ग्रेड वेतन रु.४३०० याप्रमाणे वेतनबँड रु.९३००-३४८०० मिळणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

संघटनेच्या मागणीशी सहमत असून त्यांच्या मागणीचा विचार व्हावा.

समितीची शिफारस :-

५) प्रमुख आरेखक

६) आरेखक

या संवर्गांना केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे.

अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे समिती प्रमुख आरेखक संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी सहमत नाही.

आरेखक संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष द्विस्तरीय वेतनसंरचना मंजूर केली आहे. जलसंपदा विभागातदेखील आरेखक संवर्गास अशीच समान द्विस्तरीय वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

७) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय:-

१) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे पद कनिष्ठ अभियंता पदाच्या खालोखाल तांत्रिक स्वरुपाचे पद आहे.

२) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे तांत्रिक स्वरूपाचे पद असूनही या पदास तिसऱ्या वेतन आयोगापासून ते पाचव्या वेतन आयोगापर्यंत लिपिक संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.

३) केंद्रीय रेल्वे विभागामध्ये प. वे. मेस्त्री / प.वे. सुपरवायझर ही पदे रेल्वे विभागामधील पी.डब्ल्यू.आय. (इंजिनियर) यांचे तांत्रिक सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. या प.वे.मेस्त्री या पदास रेल्वे विभागाने प.वे.सुपरवायझर हे पदनाम दिले व या पदास पाचव्या वेतन आयोगात रू.४५००-७००० ही वेतनश्रेणी दिली. पुन्हा प.वे.सुपरवायझर या पदास जे.ई.ग्रेड-२ हे पदनाम देऊन या पदास पाचव्या वेतन आयोगात रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी दिलेली आहे.

४) महाराष्ट्र शासनातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाच्या क्षेत्रिय कामाची तुलना रेल्वे विभागातील प.वे.मेस्त्री / प.वे.सुपरवायझर / जे.ई.ग्रेड-२ या पदांच्या कामाशी करून तसेच कर्तव्ये व जबाबदारी समतुल्य असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

५) नवीन आकृतीबंधानुसार कनिष्ठ अभियंत्याच्या एका पदास एक स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे पद असल्यामुळे जेवढा क्षेत्रिय कामाचा कार्यभार कनिष्ठ अभियंत्यांकडे असतो तेवढाच (तोच) क्षेत्रिय कार्यभार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांकडे असतो.

६) (अ) सार्वजनिक बांधकाम विभागातील कामे उदा. नवीन रस्ते, पूल, इमारती यांची उभारणी करणे व जुने रस्ते, पूल, इमारती यांची देखभाल व दुरूस्ती करणे.

(ब) जलसंपदा विभागातील कामे उदा. नवीन धरणे बांधणे, पूल व इमारती बांधणे तसेच जुन्या धरणांची, कॅनॉलची, पूल व इमारतींची देखभाल व दुरुस्ती करणे, पाण्याचे नियोजन करणे, पूराचे नियंत्रण करणे.

(क) ग्रामविकास व जलसंधारण (जिल्हा परिषद) विभागामध्ये वरीलप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभागातील कामाप्रमाणे कामे करावी लागतात.

वरील तिन्ही विभागांत कनिष्ठ अभियंता यांचे सहाय्यक म्हणून स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे सुध्दा वरील सर्व तांत्रिक स्वरुपाची कामे करीत असतात.

७) कनिष्ठ अभियंता पदाच्या खालोखाल स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे पद असल्याने कनिष्ठ अभियंता पदास पाचव्या आयोगाने दिलेल्या रू.५५००-९००० या वेतनश्रेणीच्या खालोखाल असलेली रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी द्यावयास पाहिजे होती. परंतु त्याऐवजी लिपिक संवर्गीय रू.४०००-६००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. परंतु स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाच्या समकक्ष पदास केंद्रीय रेल्वे विभागातील प.वे.सुपरवायझर / जे.ई.ग्रेड-२ यांना पाचव्या वेतन आयोगात रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे क्षेत्रिय स्तरावरील पद असून या पदाला केंद्रीय रेल्वे विभागातील प.वे.सुपरवायझर / जे.ई.ग्रेड-२ या पदाप्रमाणे सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना द्यावी अशी मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

क्षेत्रिय स्तरावर कनिष्ठ अभियंता पदाच्या खालोखाल हे महत्वाचे व जबाबदारीचे पद आहे. त्यामुळे या पदास वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्याबाबत विचार व्हावा.

समितीची शिफारस :-

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गाची रेल्वे विभागातील संवर्गाशी तुलना करून वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४२०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी केली आहे. हा संवर्ग केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी तुलनीय नाही. जलसंपदा विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गाप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम विभागातील विविध संवर्गांचे सुसूत्रीकरण करून स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हा संवर्ग निर्माण केला आहे. (जलसंपदा विभागातील या संवर्गाच्या पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीच्या संदर्भातील न्यायालयीन

प्रकरणाच्या अनुषंगाने समितीकडे प्रस्ताव सोपविला होता. त्याबाबत समितीने दि.१९ जून, २०१० रोजी स्वतंत्र अहवाल शासनास सादर केला आहे. त्यामध्ये यासंदर्भात विस्तृत विवेचन केले आहे. सदर अहवालाची प्रत परिशिष्ठ-१ मध्ये पहावी.)

या संवर्गाला पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

८) दूरध्वनीचालक

संघटनेचे अभिप्राय :-

दूरध्वनी सेवा ही इतर सेवेपेक्षा अतिशय महत्वपूर्ण असून अत्यावश्यक सेवेत गणली जाते. आमदार निवास येथे मा.मंत्रिमहोदय, मा.आमदार, मा.खासदार व त्यांचे अभ्यागत तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तिंचे वास्तव्य असल्याने त्यांना देण्यात येणारे महत्वपूर्ण संदेश अतितात्काळ देण्याचे काम दूरध्वनी चालकास करावे लागत असल्याने सदर सेवा तीन सत्रांमध्ये केली जाते. त्यामुळे वाढीव ग्रेड वेतन देण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

गृह विभागातील व जलसंपदा विभागातील समकक्ष असलेली टेलिफोन ऑपरेटर व वायरलेस ऑपरेटर ही पदे अत्यावश्यक सेवेत गणली जातात. सदर पदांना रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू केली असल्याने टेलिफोन ऑपरेटर्सना त्यांच्या समकक्ष वेतनसंरचना मंजूर करण्याबाबत संघटनेच्या मागणीचा विचार व्हावा.

<u>समितीची शिफारस</u> :-

दूरध्वनीचालक हा राज्य शासनाकडील सर्वसाधारण संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागात कार्यरत आहे. काही विभागांत या संवर्गास रू.२००० तर काही विभागांत रु.१९०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. दूरध्वनीचालक संवर्ग गृह विभागातील बिनतारी यंत्रचालक संवर्गाशी समकक्ष नाही. तसेच जलसंपदा विभागात या संवर्गास रू.२४०० ग्रेड वेतन मंजूर केलेले नाही. दूरध्वनीचालक संवर्गास इतर प्रशासकीय विभागांतील दूरध्वनीचालक संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

९) यांत्रिकी

संघटनेचे अभिप्राय:-

महाराष्ट्र शासनाच्या वन विभाग, कृषि विभाग, महानगरपालिका व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागातील यांत्रिकी पद व सार्वजनिक बांधकाम विभागातील यांत्रिकी पद समकक्ष असल्यामुळे त्या विभागात दिलेली वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.२४०० ही वेतनसंरचना देण्यात यावी अशी मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

इतर विभागांतील यांत्रिकी पदासाठी रु.५२००-२०२०० हा वेतनबँड व रु.२४०० ग्रेड वेतन दिले आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातील यांत्रिकी पदासाठी सुधारित वेतनसंरचना देण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने चौथ्या वेतन आयोगात कार्यशाळेशी (Workshop) संबंधित संवर्गांचे कौशल्याधारीत वेगवेगळे वर्गीकरण केले होते. प्रस्तुत यांत्रिकी संवर्गास तिसऱ्या वेतन आयोगात रू.२५०-४३५ ही वेतनश्रेणी होती. सदर वेतनश्रेणीतील संवर्ग कुशल श्रेणीमध्ये वर्गीकृत करून त्यास रू.९५०-१४०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गास वेतनश्रेणी मंजूर करून त्यानंतर पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात समकक्ष सुधारित वेतनश्रेणी /

वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गास योग्य वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१०) विशेष अधीक्षक

संघटनेचे अभिप्राय:-

विशेष अधीक्षक संवर्गातील अधिकारी हे प्रशासकीय अधिकारी गट-ब या दर्जाचे आहेत. त्यांना पाच ते सहा जिल्ह्यांतील कार्यालयांचा प्रशासकीय कार्यभार सांभाळावा लागतो. या पदावरील अधिकाऱ्यास इतक्या मोठ्या प्रशासकीय कामाची माहिती संकलित करून शासनास सादर करावी लागते. या पदावरील अधिकाऱ्यास गट-अ दर्जा देणे आवश्यक आहे. मात्र गट-अ चा दर्जा नाही तरी कमीत कमी कामाच्या अनुषंगाने सुधारित वेतनबँड व ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. इतर विभागांच्या लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेत सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिकवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक आहेत. त्यामुळे उच्च वेतनसंरचना देणे आवश्यक आहे. याबाबत १) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघाने वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५००० आणि २) सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५४०० देण्याची मागणी केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन होता. परंतु सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचे निश्चित झाल्याने सदर प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला नाही. सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू झाल्यानंतर त्यामध्ये त्रुटी असल्याबाबत संघटनांचे प्रस्ताव आल्यास विचार करावा असे ठरले. त्यानुसार संबंधित संघटनांनी या विभागाकडे त्रुटींचे प्रस्ताव सादर केले आहेत. इतर विभागांतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेत सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिकवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक प्रमाणात असल्यामुळे त्यांची उच्च वेतनसंरचनेची मागणी योग्य आहे. या पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.५४०० ही वेतनसंरचना मिळावी.

११) अधीक्षक

संघटनेचे अभिप्राय:-

अधीक्षक संवर्गातील कर्मचारी हे दोन किंवा अधिक जिल्हे व पाच ते सात विभागीय कार्यालयांच्या प्रशासकीय कामाचे नियंत्रण करतात. तसेच त्यांच्यामार्फत विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने शासनास प्रशासकीय माहिती पुरविली जाते. अधीक्षकाच्या कामाचे स्वरुप लक्षात घेता या पदास प्रशासकीय अधिकारी गट-ब दर्जा देणे आवश्यक आहे. मात्र तो दर्जा नसल्याने कमीत कमी कामाच्या अनुषंगाने सुधारित वेतनबँड व ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. इतर विभागांच्या लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेत सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिकवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक आहेत. त्यामुळे उच्च वेतनसंरचना देणे आवश्यक आहे. याबाबत १) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघाने वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५००० आणि २) सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४४०० देण्याची मागणी केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन होता. परंतु सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचे निश्चित झाल्याने सदर प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला नाही. सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू झाल्यानंतर त्यामध्ये त्रुटी असल्याबाबत संघटनांचे प्रस्ताव आल्यास विचार करावा असे ठरले. त्यानुसार संबंधित

संघटनांनी या विभागाकडे त्रुटींचे प्रस्ताव सादर केले आहेत. इतर विभागांतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यापेक्षा तुलनेने या विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक प्रमाणात असल्यामुळे त्यांची उच्च वेतनसंरचनेची मागणी योग्य आहे. या पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४४०० ही वेतनसंरचना मिळावी.

१२) प्रथम लिपिक

संघटनेचे अभिप्राय:-

प्रथम लिपिक संवर्गातील कर्मचारी हा एका विभागाचा प्रशासकीय प्रमुख आहे. एका विभागांतर्गत पाच उप विभागांच्या प्रशासकीय कामाचे नियंत्रण प्रथम लिपिकामार्फत करण्यात येते. पाच उप विभागांतील सर्व प्रशासकीय कामाची माहिती एकत्रित करून शासनाला आवश्यक ती माहिती पुरविण्याचे काम ते करीत असतात म्हणून ते प्रशासनाचे राजपत्रित अधिकारी ठरतात. मात्र शासनाने या पदास तसा दर्जा दिलेला नाही. म्हणून या पदावरील कर्मचाऱ्यास दर्जा नाही तरी कामाचा व्याप लक्षात घेऊन सुधारित ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. इतर विभागांच्या लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेत सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिकवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक आहेत. त्यामुळे उच्च वेतनसंरचना देणे आवश्यक आहे. याबाबत १) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघाने वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४७०० आणि २) सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४३०० देण्याची मागणी केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन होता. परंतु सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचे निश्चित झाल्याने सदर प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला नाही. सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू झाल्यानंतर त्यामध्ये त्रुटी असल्याबाबत संघटनांचे प्रस्ताव आल्यास विचार करावा असे ठरले. त्यानुसार संबंधित संघटनांनी या विभागाकडे त्रुटींचे प्रस्ताव सादर केले आहेत. इतर विभागांतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यापेक्षा तुलनेने या विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक प्रमाणात असल्यामुळे त्यांची उच्च वेतनसंरचनेची मागणी योग्य आहे. या पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४३०० ही वेतनसंरचना मिळावी.

१३) वरिष्ठ लिपिक

संघटनेचे अभिप्राय:-

वरिष्ठ लिपिक या संवर्गातील कर्मचारी एका उप विभागाचे प्रशासकीय प्रमुख म्हणून कामाची पाहणी, जबाबदारी आणि कार्यालयीन आर्थिक व्यवहार तसेच पेन्शन, कॅशबुक, अकाऊंटवरील नोंदी करणे, एकत्रित ठेवणे तसेच विभागामध्ये अकाऊंट / बजेट, पेन्शन प्रकरण, ऑडिट, कोर्ट प्रकरण इ. महत्वाची प्रशासकीय कामे सांभाळीत असल्यामुळे त्यास सुधारित वेतनबँड व ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. इतर विभागांच्या लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेत सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिकवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक आहेत. त्यामुळे वाढीव वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे. याबाबत १) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघाने वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४३०० आणि २) सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.२८०० देण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन होता. परंतु सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचे निश्चित झाल्याने सदर प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला नाही. सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू झाल्यानंतर त्यामध्ये त्रुटी असल्याबाबत संघटनांचे प्रस्ताव आल्यास विचार करावा असे ठरले. त्यानुसार संबंधित संघटनांनी या विभागाकडे त्रुटींचे प्रस्ताव सादर केले आहेत. इतर विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यापेक्षा तुलनेने या विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक प्रमाणात असल्यामुळे त्यांची उच्च वेतनसंरचनेची मागणी योग्य आहे. या पदास वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.२८०० ही वेतनसंरचना मिळावी.

१४) कनिष्ठ लिपिक

संघटनेचे अभिप्राय:-

कनिष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचारी प्रशासनाचे तांत्रिक / अतांत्रिक बजेट / अकाऊंट / पेन्शन इ. महत्वाची जबाबदारीची काम करीत असल्याने ते प्रशासकीय सहाय्यक दर्जाचे काम करतात म्हणून त्यांना सुधारित ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. इतर विभागांच्या लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या तुलनेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लिपिकवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक आहेत. त्यामुळे उच्च वेतनसंरचना देणे आवश्यक आहे. याबाबत १) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघाने वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.२८०० आणि २) सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.२४०० देण्याची मागणी केली आहे

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांतील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन होता. परंतु सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचे निश्चित झाल्याने सदर प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला नाही. सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू झाल्यानंतर त्यामध्ये त्रुटी असल्याबाबत संघटनांचे प्रस्ताव आल्यास विचार करावा असे ठरले. त्यानुसार संबंधित संघटनांनी या विभागाकडे त्रुटींचे प्रस्ताव सादर केले आहेत. इतर विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यापेक्षा तुलनेने या विभागातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिक प्रमाणात असल्यामुळे त्यांची उच्च वेतनसंरचनेची मागणी योग्य आहे. या पदास वेतनबँड रु.५२००-२०२०० व ग्रेड वेतन रु.२४०० ही वेतनसंरचना मिळावी.

<u>समितीची शिफारस :-</u>

१०) विशेष अधीक्षक

११) अधीक्षक

१२) प्रथम लिपिक

१३) वरिष्ठ लिपिक

१४) कनिष्ठ लिपिक

लिपिकवर्गीय संवर्गांच्या वेतनसंरचनेसंबंधी अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद २.२.५ मध्ये विवेचन केले आहे. वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय / लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

१५) भांडार अधीक्षक

संघटनेचे अभिप्राय:-

१. केंद्र शासनाकडील अधीक्षकाप्रमाणे महाराष्ट्र शासनामध्ये संपूर्ण विभागात एकूण १० पदे आहेत.

२. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडील पदाचे सेवाभरती नियम सारखे आहेत.

३. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडील पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्या आहेत.

४. भांडार अधीक्षक पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि कामाची व्याप्ती लक्षात घेऊन मागणीप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

या पदास राज्य शासनाने पाचव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केलेल्या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगात वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे उच्च वेतनसंरचना देण्याच्या मागणीचा विचार करण्याची सद्य:स्थितीत आवश्यकता वाटत नाही. परंतु भांडार अधीक्षक हे पद लिपिकवर्गीय संवर्गातील अधीक्षक या पदाशी समकक्ष असून भविष्यात लिपिकवर्गीय संवर्गातील पदांच्या वेतनसंरचनेमध्ये सुधारणा झाल्यास भांडार अधीक्षक या पदासदेखील त्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचना देण्याचा विचार करण्यात यावा.

१६) भांडारपाल

संघटनेचे अभिप्राय:-

१. केंद्र शासनाकडील भांडारपाल पदास पाचव्या वेतन आयोगात रू.६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी दिली आहे.

२. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडील पदाचे सेवाभरती नियम सारखे आहेत.

३. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडील पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्या आहेत.

४. लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांप्रमाणे या पदास पदोन्नतीच्या संधी नाहीत.

५. कनिष्ठ अभियंता पदासदेखील पदोन्नतीच्या कमी संधी उपलब्ध असल्यामुळे या संवर्गाला ५ वर्षांच्या सरळसेवेनंतर गट-ब दर्जा देऊन शासनाने वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर केली आहे. त्याचप्रमाणे भांडारपाल पदाला अशी वरिष्ठ वेतनश्रेणी मान्य करण्यात यावी.

६. भांडारपाल हा संवर्ग पाटबंधारे विभाग, शासन पत्रक क्र.पीएएस-१०६९/३००००३-ई(२)-२, दि.८/८/१९७१ अन्वये लिपिकवर्गीय संवर्गात मोडत नाही.

७. सार्वजनिक बांधकाम विभाग व गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र.इएसटी-१०७८/२६५६-डीएसके-१७, दि.१२/४/१९७८ अनुसार भांडारपाल हे पद विभागाचे शाखाप्रमुख म्हणून मान्य केले आहे.

८. कनिष्ठ अभियंता यांना जशी व्यावसायिक परीक्षा द्यावी लागते त्याचप्रमाणे भांडारपाल पदाला शासनाने विहित केलेली भांडारपाल व्यावसायिक परीक्षा तसेच विभागातील सेवापरीक्षा अशा दोन परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

९. अभियंत्याप्रमाणे भांडारपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना शासनाच्या हानी किंवा नुकसानीमध्ये १०० टक्के जबाबदार धरण्यात येते.

१०. भांडारपाल पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि कामाची व्याप्ती लक्षात घेऊन मागणीप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- या पदास राज्य शासनाने पाचव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केलेल्या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगात वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे उच्च वेतनसंरचना देण्याच्या मागणीचा विचार करण्याची सद्य:स्थितीत आवश्यकता वाटत नाही. परंतु भांडारपाल हे पद लिपिकवर्गीय संवर्गातील प्रथम लिपिक या पदाशी समकक्ष असून भविष्यात लिपिकवर्गीय संवर्गातील पदांच्या वेतनसंरचनेमध्ये सुधारणा झाल्यास भांडारपाल पदासदेखील त्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचना देण्याचा विचार करण्यात यावा.

१७) सहाय्यक भांडारपाल

संघटनेचे अभिप्राय:-

१. केंद्र शासनाकडील सहाय्यक भांडारपाल पदास पाचव्या वेतन आयोगात रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

२. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडील पदाचे सेवाभरती नियम सारखे आहेत.

३. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडील पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या सारख्या आहेत.

४. लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांप्रमाणे या पदास पदोन्नतीच्या संधी नाहीत.

५. भांडारपाल हा संवर्ग पाटबंधारे विभाग, शासन पत्रक क्र.पीएएस-१०६९/३००००३-ई(२)-२, दि.८/८/१९७१ अन्वये लिपिकवर्गीय संवर्गात मोडत नाही.

६. सहाय्यक भांडारपाल पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि कामाची व्याप्ती लक्षात घेऊन लक्षात घेऊन मागणीप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- या पदास राज्य शासनाने पाचव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केलेल्या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगात वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे उच्च वेतनसंरचना देण्याच्या मागणीचा विचार करण्याची सद्यःस्थितीत आवश्यकता वाटत नाही. परंतु सहाय्यक भांडारपाल हे पद लिपिकवर्गीय संवर्गातील कनिष्ठ लिपिक पदाशी समकक्ष असून भविष्यात लिपिकवर्गीय संवर्गातील पदांच्या वेतनसंरचनेमध्ये सुधारणा झाल्यास सहाय्यक भांडारपाल पदासदेखील त्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचना देण्याचा विचार करण्यात यावा.

<u>समितीची शिफारस</u> :-

१५) भांडार अधीक्षक

१६) भांडारपाल

१७) सहाय्यक भांडारपाल

वेतन समानीकरण समितीने चौथ्या वेतन आयोगात वरील संवर्ग हे लिपिकवर्गीय संवर्गांशी तुलनीय असल्याचे नमूद केले आहे आणि असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेण्या मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गांना वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या.

तद्नंतर भांडारपाल संवर्गास पाचव्या वेतन आयोगात समकक्षतेपेक्षा उच्च वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

क) संचालक, उपवने व उद्याने

१) संचालक, उपवने व उद्याने

संघटनेचे अभिप्राय:-

चौथ्या वेतन आयोगामध्ये महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने संचालक या पदास संघटनेचे विभागप्रमुख असल्यामुळे रु.३०००-४५०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतची शिफारस त्यांच्या अहवालात केली होती. परंतु शासनाने समितीची शिफारस मान्य न करता रु.२२००-४००० अशी निम्न वेतनश्रेणी दिली. त्यामुळे पाचव्या वेतन आयोगातही रु.८०००-१३५०० अशी निम्न वेतनश्रेणी देण्यात आली. त्यामुळे संचालक या पदावर चौथ्या तसेच पाचव्या वेतन आयोगातही वेतनश्रेणी देताना निश्चितपणे अन्याय झालेला आहे. सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.१५६००-३९१०० आणि ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर करण्यात आले आहे.

संचालक, उपवने व उद्याने यांना कार्यकारी अभियंता यांच्या समकक्ष वेतनश्रेणी रु.१०६५०-१५८५० या वेतनश्रेणीवर आधारित सहाव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनसंरचना वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.६६०० देण्याची विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत उपवने व उद्याने ही स्वतंत्र संघटना आहे. सार्वजनिक उपवने व उद्याने, महत्वाच्या शासकीय निवासी व निवासेतर इमारतींच्या सभोवतालची उद्याने, शासकीय रुग्णालये व शैक्षणिक संस्था यांना लागून असलेली उद्याने, शासकीय रोपवाटिका इत्यादींचा विकास करण्याचे व देखभाल करण्याचे काम या संघटनेकडे सोपविण्यात आले आहे. संचालक, उपवने व उद्याने हे या संघटनेचे प्रमुख पद शासन निर्णय, क्र.टीजीडी-३५५९/८६९५/आय, दि.२९ सप्टेंबर, १९६० अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता या पदाच्या समतुल्य समजण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीनुसार कार्यकारी अभियंत्यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार व संचालक, उपवने व उद्याने यांना दिलेले अधिकार सारखे आहेत. तसेच संचालक, उपवने व उद्याने हे राज्यस्तरीय संघटना प्रमुखाचे पद आहे. महाराष्ट्र राज्यातील उपवने व उद्याने संघटनेचे प्रमुख म्हणून उद्यानविषयक बाबींसंबंधी इतर शासकीय विभागांकडून तसेच स्थानिक स्वराज्य संस्था त्यांच्याकडून सल्ला व मत घेतात. चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी वित्त विभागाने नियुक्त केलेल्या समितीने सदरचे पद हे संघटना प्रमुखाचे पद असल्यामुळे त्या पदास रू.३०००-४५०० ही वेतनश्रेणी देण्याची शिफारस केली होती. परंतु शासनाने ती शिफारस मान्य केली नाही व त्यांना रू.२२००-४००० अशी निम्न वेतनश्रेणी दिली. पाचव्या वेतन आयोगामध्ये त्याच समकक्ष रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उद्यान विभागातील अधिकाऱ्यांना रू.१०६५०-१५८५० ही त्यांच्यापेक्षा उच्च वेतनश्रेणी दिली आहे. वर नमूद केल्यानुसार सदरचे पद हे कार्यकारी अभियंता या पदाशी समतुल्य असल्याने त्यांना त्यावेळी रू.१०६५०-१५८५० ही वेतनश्रेणी द्यावयास हवी होती. ही कारणमिमांसा लक्षात घेऊन त्यांना सहाव्या वेतन आयोगात कार्यकारी अभियंत्यांच्या समकक्ष वेतनबँड रू.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रू.६६०० ही वेतनसंरचना मंजूर करावी अशी विनंती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

संचालक, उद्याने व उपवने हे राज्यस्तरीय विभागप्रमुखाचे पद असल्याने कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची व्याप्ती विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-३: रू.१५६०० - ३९१०० अधिक रू.६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२) अतिरिक्त संचालक, उपवने व उद्याने

संघटनेचे अभिप्राय:-

तिसऱ्या वेतन आयोगात या पदाची वेतनश्रेणी रू.६८०-१२५० ही होती. चौथ्या वेतन आयोगात वेतन समानीकरण समितीने या पदास रू.२२००-४००० ही वेतनश्रेणी देण्याबाबत शिफारस केली होती. परंतु शासनाने ती मान्य न करता रू.२२००-३७०० ही वेतनश्रेणी दिली. त्यामुळे पाचव्या वेतन आयोगात रू.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली. सदर पद सार्वजनिक बांधकाम विभागातील उप अभियंता पदापेक्षा वरच्या श्रेणीचे होते. परंतु चौथ्या वेतन आयोगात उप अभियंता यांची वेतनश्रेणी वाढविण्यात आली. मात्र या पदाची वेतनश्रेणी वाढविण्यात न आल्याने वेतनश्रेणी देताना या पदावर चौथ्या व पाचव्या वेतन आयोगात निश्चित अन्याय झाला आहे. सहाव्या वेतन आयोगातही अतिरिक्त संचालक या पदास वेतनबँड रू.९३००-३४८०० आणि ग्रेड वेतन रू.५००० मंजूर करण्यात आले आहे. तरी अतिरिक्त संचालक या पदास उप अभियंता पदापेक्षा वरची व कार्यकारी अभियंता पदापेक्षा कमी म्हणजे रू.१००००-१५२०० या वेतनश्रेणीवर आधारित वेतनबँड रू.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रू.६००० ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात देण्याची विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

अतिरिक्त संचालक व सहाय्यक संचालक या पदांना देखील संचालकांच्या खालोखाल निम्न वेतनश्रेणी दिली गेलेली नाही. त्या पदांच्या वेतनश्रेणीतदेखील सुधारणा होणे आवश्यक आहे. अतिरिक्त संचालक या पदासाठी उप अभियंता या पदापेक्षा अधिक आणि कार्यकारी अभियंता

यांच्यापेक्षा कमी म्हणजे वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.६००० अशी वेतनसंरचना देण्याची विनंती आहे.

३) सहाय्यक संचालक, उपवने व उद्याने

संघटनेचे अभिप्राय:-

सहाय्यक संचालक हे पद तिसऱ्या वेतन आयोगापर्यंत उप अभियंता पदाच्या समकक्ष होते. परंतु चौथ्या वेतन आयोगात उप अभियंता पदाची वेतनश्रेणी रु.२०००-३५०० वरुन रु.२२००-४००० करण्यात आली. परंतु सहाय्यक संचालक या पदाची वेतनश्रेणी रु.२०००-३५०० एवढीच ठेवण्यात आली. पाचव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी रु.६५००-२००-१०५०० अधिक रु.४०० विशेष वेतन देण्यात आले. तसेच सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.९३००-३४८०० आणि ग्रेड वेतन रु.४६०० मंजूर करण्यात आले. त्यामुळे सहाय्यक संचालक या पदास उप अभियंता यांना देण्यात आलेल्या रु.८०००-२७५-१३५०० या वेतनश्रेणीवर आधारित वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४०० ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात देण्याची विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:-

सहाय्यक संचालक (राजपत्रित गट-ब) या पदासाठी वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४०० ही वेतनसंरचना देण्यात यावी अशी विनंती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

२) अतिरिक्त संचालक, उपवने व उद्याने

३) सहाय्यक संचालक, उपवने व उद्याने

**वेतन समानीकरण समितीने चौथ्या वेतन आयोगात वरील संवर्ग हे अभियंता संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाहीत. असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन या संवर्गांना चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगात सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.**

**या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.**

ड) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र शासन

१) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ

संघटनेचे अभिप्राय:- कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर ही आर्किटेक्ट्स् ॲक्ट, १९७२ नुसार स्थापित स्वायत्त संस्था असून सर्व शासकीय वास्तुशास्त्रज्ञांना या संस्थेचा नोंदणीकृत सभासद असणे बंधनकारक आहे. तसेच या कार्यालयाच्या सेवाभरती शर्तीनुसार सर्व वास्तुशास्त्रीय पदांकरीता उमेदवार हा कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर, नवी दिल्ली या संस्थेचा नोंदणीकृत सभासद असणे बंधनकारक आहे. कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक रूपरेषेचे तंतोतंत पालन करणे हे वास्तुशास्त्रज्ञांचे कर्तव्य आहे. त्यानुसार शासकीय वास्तुशास्त्रज्ञांना कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरच्या मार्गदर्शिकेनुसार वेतनश्रेणी मिळणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- मुख्य वास्तुशास्त्रज्ञ हे पद स्थापत्य शाखेतील मुख्य अभियंता या पदाशी समकक्ष असून सहाव्या वेतन आयोगात मुख्य अभियंता पदास जी वेतनसंरचना दिली आहे तीच वेतनसंरचना या पदास दिली आहे. त्यामुळे शासकीय वास्तुशास्त्रज्ञ संघटनेने मागणी केल्याप्रमाणे उच्च वेतनसंरचना देण्याचा विचार करणे योग्य वाटत नाही. तथापि, मुख्य अभियंता पदाच्या वेतनसंरचनेत सुधारणा झाली तर मुख्य वास्तुशास्त्रज्ञ पदासदेखील त्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचना देण्याचा विचार करण्यात यावा.

<u>समितीची शिफारस</u> :-

**मुख्य वास्तुशास्त्रज्ञ संवर्गास कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरच्या मार्गदर्शिकेनुसार वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे. अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे**

विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे समिती या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी सहमत नाही.

२) उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ

संघटनेचे अभिप्रायः- मुख्य वास्तुशास्त्रज्ञ पदासंबंधीच्या अभिप्रायांप्रमाणे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्रायः- उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ हे पद स्थापत्य शाखेतील अधीक्षक अभियंता या पदाशी समकक्ष असून सहाव्या वेतन आयोगात अधीक्षक अभियंता पदास जी वेतनसंरचना दिली आहे तीच वेतनसंरचना या पदास दिली आहे. त्यामुळे शासकीय वास्तुशास्त्रज्ञ संघटनेने मागणी केल्याप्रमाणे उच्च वेतनसंरचना देण्याचा विचार करणे योग्य वाटत नाही. तथापि, अधीक्षक अभियंता पदाच्या वेतनसंरचनेत सुधारणा झाली तर उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ पदासदेखील त्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचना देण्याचा विचार करण्यात यावा.

३) वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ

संघटनेचे अभिप्रायः- मुख्य वास्तुशास्त्रज्ञ पदासंबंधीच्या अभिप्रायांप्रमाणे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्रायः- वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ हे पद स्थापत्य शाखेतील कार्यकारी अभियंता या पदाशी समकक्ष असून सहाव्या वेतन आयोगात कार्यकारी अभियंता पदास जी वेतनसंरचना दिली आहे तीच वेतनसंरचना या पदास दिली आहे. त्यामुळे शासकीय वास्तुशास्त्रज्ञ संघटनेने मागणी केल्याप्रमाणे उच्च वेतनसंरचना देण्याचा विचार करणे योग्य वाटत नाही. तथापि, कार्यकारी अभियंता पदाच्या वेतनसंरचनेत सुधारणा झाली तर वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ पदासदेखील त्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचना देण्याचा विचार करण्यात यावा.

४) वास्तुशास्त्रज्ञ

संघटनेचे अभिप्रायः- मुख्य वास्तुशास्त्रज्ञ पदासंबंधीच्या अभिप्रायांप्रमाणे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्रायः- वास्तुशास्त्रज्ञ हे पद स्थापत्य शाखेतील उप अभियंता या पदाशी समकक्ष असून सहाव्या वेतन आयोगात उप अभियंता पदास जी वेतनसंरचना दिली आहे तीच वेतनसंरचना या पदास दिली आहे. त्यामुळे शासकीय वास्तुशास्त्रज्ञ संघटनेने मागणी केल्याप्रमाणे उच्च वेतनसंरचना देण्याचा विचार करणे योग्य वाटत नाही. तथापि, उप अभियंता पदाच्या वेतनसंरचनेत सुधारणा झाली तर वास्तुशास्त्रज्ञ पदासदेखील त्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचना देण्याचा विचार करण्यात यावा.

५) कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ

संघटनेचे अभिप्रायः- मुख्य वास्तुशास्त्रज्ञ पदासंबंधीच्या अभिप्रायांप्रमाणे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्रायः- कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ हे पद स्थापत्य शाखेतील सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ / शाखा अभियंता या पदाशी समकक्ष असून सहाव्या वेतन आयोगात या दोन्ही पदांस जी वेतनसंरचना दिली आहे तीच वेतनसंरचना या पदास दिली आहे. त्यामुळे शासकीय वास्तुशास्त्रज्ञ संघटनेने मागणी केल्याप्रमाणे उच्च वेतनसंरचना देण्याचा विचार करणे योग्य वाटत नाही. तथापि, सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ / शाखा अभियंता पदांच्या वेतनसंरचनेत सुधारणा झाली तर कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ पदासदेखील त्याप्रमाणे सुधारित वेतनसंरचना देण्याचा विचार करण्यात यावा.

<u>समितीची शिफारस</u> :-

२) उप मुख्य वास्तुशास्त्रज्ञ

३) वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ

४) वास्तुशास्त्रज्ञ

५) कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ

वेतन समानीकरण समितीने वरील संवर्गांना केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. वरील संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर करण्यात आली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

६) वास्तुशास्त्रीय आरेखक

संघटनेचे अभिप्राय:- मुख्य वास्तुशास्त्रज्ञ पदासंबंधीच्या अभिप्रायांप्रमाणे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पदास दिलेली सुधारित वेतनसंरचना योग्य वाटते.

समितीची शिफारस :-

शासन अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. आरटीआर १३७५/२१०७५-कार्या.१९ (१९६) दि.६ डिसेंबर, १९७६ अन्वये या संवर्गात पदोन्नती आणि नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी " **Intermediate Examination in Architecture of the Government of Maharashtra or an examination recognised by Government as equivalent thereto**" ही शैक्षणिक अर्हता विहित केली होती. सदर अर्हता विचारात घेता या संवर्गास मंजूर केलेली वेतनसंरचना योग्य आहे.

तथापि, शासन अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. आरटीआर १००५/प्र.क्र.२२६/आस्था-२ दि. १७ नोव्हेंबर, २००६ अन्वये या संवर्गात नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची वास्तुशास्त्रातील पदवी ही अर्हता विहित केली आहे.

नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी विज्ञान शाखेची पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान अर्हता अत्यावश्यक असलेल्या तंत्रज्ञ अथवा अभियांत्रिकी संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांमध्ये वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. सदर वस्तुस्थिती आणि वर नमूद केलेली शैक्षणिक अर्हता विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना अनुज्ञेय ठरते. तथापि, या संवर्गास चार वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने या संवर्गात नियुक्त झालेल्या/होणाऱ्या वास्तुशास्त्रातील पदवीधारकांस वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना दि. १७ नोव्हेंबर, २००६ पासून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

## ३.१५ - महसूल व वन विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रूपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रूपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) महसूल विभाग | | | | | |
| १ | अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) | १४३००-१८३०० | ३७४००-६७००० | ८७०० | ३७४००-६७००० (पदोन्नतीने असल्यास दोन वेतनवाढी) | ८९०० |
| २ | अतिरिक्त जिल्हाधिकारी | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६०० | ३७४००-६७००० (पदोन्नतीने असल्यास दोन वेतनवाढी) | ८७०० |
| ३ | उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० (पदोन्नतीने असल्यास दोन वेतनवाढी) | ७६०० |
| ४ | उप जिल्हाधिकारी | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १) १५६००-३९१०० (गट-अ प्रवेशश्रेणी) २) (पदोन्नतीने असल्यास दोन वेतनवाढी) | ६६०० |
| ५ | तहसिलदार | ७४५०-११५०० | १५६००-३९१०० | ५००० | १) १५६००-३९१०० (गट अ प्रवेशश्रेणी) २) (पदोन्नतीने असल्यास दोन वेतनवाढी) | ५४०० |
| ६ | नायब तहसिलदार | ५५००- ९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| ७ | मंडल अधिकारी | ५०००-८००० | ५२००-२०२०० | ३५०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| ८ | अव्वल कारकून | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ५२००-२०२०० | ३५०० |
| | ब) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख | | | | | |
| १ | उप संचालक, भूमि अभिलेख | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १)१५६००-३९१०० २)३७४००-६७००० (२०% पदे (निवडश्रेणी) | ७६०० ८७०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | अधीक्षक, भूमि अभिलेख | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १)१५६००-३९१००<br>२) १५६००-३९१०० (२०% पदे (निवडश्रेणी) | ५४००<br>६६०० |
| ३ | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५००० |
| ४ | मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार / वरिष्ठ लिपिक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ५ | परिरक्षण भूमापक / निमतानदार / दुर्बीण भूमापक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | ३५०० |
| ६ | १)भू-करमापक | ३०५०-४५९० (अधिक ७ पदांसाठी विशेष वेतन रु.१००/-) | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |
| | २) कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | ५२००-२०२०० | २४०० |
| | क) मुख्य वनसंरक्षक | | | | | |
| १ | विभागीय वन अधिकारी | १००००-१५२०० | १५६००-३९१०० | ६६०० | १) १५६००-३९१००<br>२) १५६००-३९१०० (निवडश्रेणी) | ७६००<br>८७०० |
| २ | सहाय्यक वनसंरक्षक | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ५००० | १) १५६००-३९१००<br>२) १५६००-३९१०० (निवडश्रेणी) | ५४००<br>६६०० |
| ३ | वनक्षेत्रपाल | ६५००-१०५०० (अधिक ५४ पदांसाठी विशेष वेतन रु.८० ते रु.२००/-) | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ५००० |
| ४ | वनपाल | ४०००-६००० (अधिक २७ पदांसाठी विशेष वेतन रु.८०/-) | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |
| ५ | वनरक्षक | १)२६१०-४००० (अधिक विशेष वेतन रु.६०/-)<br>२)२७५०-४४०० | ४४४०-७४४०<br>५२००-२०२०० | १,६००<br>१,८०० | ५२००-२०२००<br>५२००-२०२०० | २०००<br>२००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | मुख्य लेखापाल | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ७ | लेखापाल | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |

अ) महसूल विभाग

१) अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी)

संघटनेचे अभिप्राय :- वेतनबँड व ग्रेड वेतन कमी मंजूर केले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- डिसेंबर-१९९४ मध्ये मंत्रिमंडळाने या संवर्गासाठी रु.४५००-५७०० ही वेतनश्रेणी मान्य केली होती. मात्र अंतिमत: रु.४१००-५३०० म्हणजे रु.१४३००-१८३०० (पाचवा वेतन आयोग) ही वेतनश्रेणी देण्याचा शासनाने निर्णय घेतला. वास्तविक रु.३७००-५००० ह्या असुधारित वेतनश्रेणीतून पदोन्नती मिळणाऱ्या इतर समकक्ष बहुतेक पदांना रु.४५००-५७००, रु.५१००-६३०० किंवा रु.५४००- ६५०० ही पाचवा वेतन आयोगपूर्व वेतनश्रेणी दिली गेली. अपर जिल्हाधिकारी पदासाठी द्यावयाच्या वेतनश्रेणीबाबतचे स्पष्टीकरण विचारात घेता निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी पदास रु.४५००-५७०० / रु.१६४००-२०००० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष असणारी सहाव्या वेतन आयोगाने सुचविलेली वेतन संरचना देणे उचित ठरेल. आता वेतनबँड पीबी-४:रु.३७४००-६७००० अधिक रु. ८९०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी. या सेवेचे महत्त्व विचारात घेता संघटनेने मागणी केल्यानुसार पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

अतिरिक्त जिल्हाधिकारी या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रू.३२००-५००० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. म्हणजेच अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गात रू.३७००-५००० नव्हे तर रू.३२००-५००० या वेतनश्रेणीतील पदावरून पदोन्नती मिळत होती. निम्न संवर्गाची वेतनश्रेणी पाहता पदोन्नतीच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गास रू.४५००-५७०० ऐवजी रू.४१००-५३०० ही अनुरूप वेतनश्रेणी मंजूर केली होती. असे असले तरी अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गास रू.४५००-५७०० या वेतनश्रेणीशी समकक्ष रू.१४३००-१८३०० ही वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली होती. म्हणजेच या संवर्गास पाचव्या वेतन आयोगात श्रेणीवाढीचा लाभ मिळालेला आहे. या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-४: रू.३७४००-६७००० अधिक रू.८७०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये कोणतीही त्रुटी नाही.

तसेच या संवर्गास मंजूर केलेली वेतनसंरचना भारतीय प्रशासन सेवेतील जिल्हाधिकारी (कनिष्ठ प्रशासकीय श्रेणी) या वरिष्ठ संवर्गाच्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च आहे. त्यामुळे या संवर्गाची मागणी समर्थनीय नाही.

पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी देण्याच्या मागणीसंदर्भात असे नमूद करण्यात येते की, पदोन्नतीनंतर करावयाच्या वेतननिश्चितीसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ अन्वये स्थायी तरतुदी केलेल्या आहेत. त्यामुळे ही मागणी अप्रस्तुत ठरते. तसेच सदर बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

२) अतिरिक्त जिल्हाधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- वेतनबँड व ग्रेड वेतन कमी मंजूर केले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी संवर्गातून अपर जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात येते. वास्तविक चौथ्या वेतन आयोगाने ज्या वेगवेगळ्या वेतनश्रेण्या सुचविल्या होत्या त्यामध्ये रु.३२००-५००० अशी वेतनश्रेणी सुचविलेली नव्हती. तसेच शासनाच्या अन्य कोणत्याही

विभागामध्ये अशी वेतनश्रेणी नाही. पदोन्नतीच्या वेतनश्रेणीतील किमान वेतन हे ज्या संवर्गातून पदोन्नती दिली जाते त्या संवर्गाच्या किमान वेतनाएवढे असू नये असे सर्वसाधारण तत्व आहे. मात्र अपर जिल्हाधिकारी संवर्गासाठी हे तत्व अंगीकारलेले दिसत नाही. त्यामुळे या संवर्गावर अन्याय झाला आहे. अपर जिल्हाधिकारी संवर्गास रु.१२००-७५-२००० ही सुधारणापूर्व वेतनश्रेणी होती. या पदाला जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या समकक्ष अधिकार व स्वतंत्र विषय नेमून दिले आहेत. तसेच राज्य शासनातील जबाबदारीच्या पदांवर या संवर्गातील अधिकारी नियुक्त केले जातात हे विचारात घेता तसेच या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता सदर पदास सध्या देण्यात आलेल्या वेतनश्रेणीमधील फक्त किमान वेतनात वाढ करुन सुधारणापूर्व वेतनश्रेणी रु.१२०००-३७५-१६५०० ऐवजी रु.१४३००-४००-१८३०० ही समकक्ष वेतनश्रेणी समजून सुधारित वेतनबँड पीबी-४: रू.३७४००-६७००० अधिक रु.८७०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना (पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी) देण्यात यावी.

**<u>समितीची शिफारस</u> :-**

अतिरिक्त जिल्हाधिकारी या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रू.३२००-५००० ही वेतनश्रेणी मंजूर केली असली तरी पाचव्या वेतन आयोगात रू.३७००-५००० या वेतनश्रेणीशी समकक्ष रू.१२०००-१६५०० ही वेतनश्रेणी मंजूर केली आहे. म्हणजेच या संवर्गास पाचव्या वेतन आयोगात श्रेणीवाढीचा लाभ मिळालेला आहे. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.७६०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये या संवर्गास मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये कोणतीही त्रुटी नाही.

तसेच या संवर्गास भारतीय प्रशासन सेवेतील जिल्हाधिकारी (कनिष्ठ प्रशासकीय श्रेणी) या वरिष्ठ संवर्गाच्या वेतनसंरचनेप्रमाणे वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाची मागणी समर्थनीय नाही.

पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी देण्याच्या मागणीसंदर्भात असे नमूद करण्यात येते की, पदोन्नतीनंतर करावयाच्या वेतननिश्चितीसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ अन्वये स्थायी तरतुदी केलेल्या आहेत. त्यामुळे ही मागणी अप्रस्तुत ठरते. तसेच सदर बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

३) उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी)

संघटनेचे अभिप्राय :- ग्रेड वेतन कमी मंजूर केले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सन-१९७४ मध्ये या संवर्गाच्या निर्मितीच्या वेळी उप सचिव पदास देय असलेली रु.११००-१७०० ही वेतनश्रेणी या संवर्गास दिली होती. तद्नंतर चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर मात्र दोन्ही पदांच्या वेतनश्रेणीमध्ये तफावत झाली असून उप सचिव पदास रु.३७००-५००० (रु.१२०००-३७५-१६५००) तर निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी पदास रु.३२००-४६२५ (रु.१०६५०-३२५-१५८५०) ही वेतनश्रेणी दिली आहे. वास्तविक सदर संवर्ग निर्माण करतेवेळी सदर श्रेणी मिळण्यास लागणारा कालावधी विचारात घेऊन शासनाने जाणीवपूर्वक उप सचिव पदाची वेतनश्रेणी देऊन या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या उप सचिव पदावर नेमणूकादेखील केल्या होत्या व ही कार्यवाही सन-१९९२ पर्यंत चालू होती. मात्र तद्नंतर अपर जिल्हाधिकारी संवर्ग नव्याने निर्माण करण्यात आला असून पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार या संवर्गास रु.१२०००-३७५-१६५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली. त्यानुसार निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी संवर्गास वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.७६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना (व पदोन्नतीने नियुक्ती असल्यास अतिरिक्त २ वेतनवाढी) देण्यात यावी. उप जिल्हाधिकारी पदावर ४ वर्ष सेवा पूर्ण झाल्यानंतर ही श्रेणी पदोन्नतीने अकार्यात्मकपणे आपोआप लागू करण्यात यावी. मान्य झाल्यास त्यानुसार नियुक्ती नियमात बदल करण्यात येतील.

समितीची शिफारस :-

या संवर्गाची उप सचिव संवर्गाशी तुलना केली आहे. तथापि, या संवर्गास वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) उप सचिव संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे या संवर्गाची उप सचिव संवर्गाशी तुलना होऊ शकत नाही. तसेच उप सचिव संवर्गास वेतन समानीकरण समितीने केंद्र शासनाच्या सचिवालयातील उप सचिव संवर्गाशी समकक्ष ठरवून त्या संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूरीची शिफारस केली होती. त्यानुसार उप सचिव संवर्गास रु.३७००-५००० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती.

संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना विचारात घेतले जाणारे सर्वसाधारण निकष म्हणजेच त्या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे स्वरूप, पदाचा दर्जा, पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठीची किमान शैक्षणिक अर्हता, पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सार्वजनिक / प्रशासकीय व्यवस्थेतील स्थान व सेवेचे महत्त्व आणि त्यानुषंगाने येणाऱ्या विशिष्ठ जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊनच या संवर्गाला वेळोवेळी वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३७१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये कोणतीही त्रुटी नाही.

तसेच भारतीय प्रशासन सेवेतील जिल्हाधिकारी (कनिष्ठ प्रशासकीय श्रेणी) या वरिष्ठ संवर्गाच्या वेतनसंरचनेप्रमाणे वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही.

पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी देण्याच्या मागणीसंदर्भात असे नमूद करण्यात येते की, पदोन्नतीनंतर करावयाच्या वेतननिश्चितीसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ अन्वये स्थायी तरतुदी केलेल्या आहेत. त्यामुळे ही मागणी अप्रस्तुत ठरते. तसेच ही बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

४) उप जिल्हाधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- ग्रेड वेतन कमी मंजूर केले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- उप जिल्हाधिकाऱ्यांना वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात आली असून या संवर्गात सरळसेवेने व तहसिलदार संवर्गातून पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येते. तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नती दिल्यानंतर मिळालेल्या वेतनश्रेणीतील किमान वेतनात काही बदल होत नाही. भारतीय प्रशासन सेवेची *फिडर सेवा* म्हणून हा संवर्ग जिल्हा प्रशासनातील अत्यंत महत्त्वाचा कार्यकारी संवर्ग मानला जातो. या संवर्गाशी समकक्ष असणाऱ्या अवर सचिव, कार्यकारी अभियंता, उप वनसंरक्षक, उप संचालक (फलोत्पादन), निवासी वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक संचालक (नगररचना) इत्यादी पदांना वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. उप जिल्हाधिकारी पदाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या, दंडाधिकारीय कामे आणि इतर पर्यवेक्षीय व समन्वयाची कामे व स्वरुप विचारात घेता या संवर्गावर वेतनश्रेणीच्याबाबतीत अन्याय झाल्याचे दिसून येते. तरी, सरळसेवाप्रविष्ट व पदोन्नतीने नियुक्त्या मिळणाऱ्या उप जिल्हाधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे वेतनश्रेणी प्रस्तावित करण्यात येत आहे. उप जिल्हाधिकारी संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार अवर सचिव संवर्गातील अधिकारी या पदावर नियुक्त केले जातात तर अवर सचिव संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांनुसार त्या पदावर महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही विभागातील अन्य कोणत्याही सेवेतील गट-अ मधील योग्य अधिकाऱ्याच्या बदलीद्वारे नियुक्ती करता येईल अशी तरतूद आहे. म्हणजेच उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची नियुक्ती अवर सचिव पदावर होऊ शकते.

प्रस्ताव - १. सरळ सेवने नियुक्तीच्या वेळी सुधारित वेतनसंरचना - वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन व पदोन्नतीने नियुक्ती असल्यास दोन वेतनवाढी.

२. या संवर्गात ४ वर्ष सेवा पूर्ण झाल्यानंतर अकार्यात्मक सुधारित वेतनसंरचना - वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रु.७६०० ग्रेड वेतन व पदोन्नतीच्या दोन वेतनवाढी देण्यात याव्यात.

समितीची शिफारस :-

तहसिलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती मिळाल्यानंतर वेतनबँडमधील किमान वेतनात बदल होत नसल्याचे प्रशासकीय विभागाने नमूद केले आहे. अनेक संवर्गांच्याबाबतीतदेखील अशीच परिस्थिती आहे. सुधारित वेतनसंरचनेत अनेक वेतनश्रेण्यांसाठी एकच वेतनबँड विहित केला असला तरी प्रत्येक असुधारित वेतनश्रेणीच्या अनुषंगाने स्वतंत्र ग्रेड वेतन विहित केले असून पदाचा दर्जा ग्रेड वेतनाशी निगडीत आहे.

या संवर्गाची अवर सचिव, कार्यकारी अभियंता, उप वनसंरक्षक, उप संचालक (फलोत्पादन), निवासी वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक संचालक (नगररचना) इत्यादी संवर्गांशी तुलना केली आहे. तथापि, वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) उप जिल्हाधिकारी संवर्गास उपरोक्त संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे या संवर्गाची त्या संवर्गांशी तुलना होऊ शकत नाही.

कोणत्याही संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना विचारात घेतले जाणारे सर्वसाधारण निकष म्हणजेच त्या संवर्गाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, कामाचे स्वरूप, पदाचा दर्जा, पदाशी निगडीत पर्यवेक्षकीय व कार्यकारी जबाबदाऱ्या, सेवाप्रवेश नियम, सेवाप्रवेशासाठीची किमान शैक्षणिक अर्हता, पदोन्नती साखळी तसेच त्या संवर्गाचे सार्वजनिक / प्रशासकीय व्यवस्थेतील स्थान व सेवेचे महत्त्व आणि त्यानुषंगाने येणाऱ्या विशिष्ठ जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊनच या संवर्गाला वेळोवेळी वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत. त्यामुळे या संवर्गावर अन्याय झाला असे म्हणता येणार नाही.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये कोणतीही त्रुटी नाही.

उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे उप जिल्हाधिकारी पदावर ४ वर्ष सेवा पूर्ण झाल्यानंतर अकार्यात्मक वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी समर्थनीय नाही.

पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी देण्याच्या मागणीसंदर्भात असे नमूद करण्यात येते की, पदोन्नतीनंतर करावयाच्या वेतननिश्चितीसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ अन्वये स्थायी तरतुदी केलेल्या आहेत. त्यामुळे ही मागणी अप्रस्तुत ठरते. तसेच ही बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

५) तहसिलदार

संघटनेचे अभिप्राय :- ग्रेड वेतन कमी मंजूर केले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- तालुका स्तरावरील महत्त्वाचे व अत्यंत जबाबदारीचे काम करावे लागणारे कार्यकारी पद आहे. तहसिलदार हे शासनाचे प्रतिनिधी म्हणून काम करतात. तसेच या पदास दंडाधिकारीय काम देखील करावे लागते. या पदास दि.१.४.१९९५ पासून गट-अ दर्जा दिला आहे. तालुका स्तरावरील सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्याचे व पर्यवेक्षीय काम तहसिलदार यांना करावे लागते. म्हणून हे पद वरिष्ठ वेतनश्रेणीचे असणे आवश्यक आहे. या पदाची कामे संख्यात्मक स्वरुपात मांडणे शक्य होत नाही कारण हे विविध स्वरुपाचे व परिस्थितीनुरुप बदलत असते. त्यामुळे या पदाची तुलना इतर तालुकास्तरीय अधिकाऱ्यांशी करणे सयुक्तिक ठरणार नाही हे लक्षात घेता तालुकास्तरावर काम करणाऱ्या उप अभियंता व गटविकास अधिकारी यांच्या वेतनापेक्षा तहसिलदार यांचे वेतन कमी असणे उचित नाही. त्यासाठी वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन या मंजूर वेतनसंरचनेमध्ये बदल करुन रु.५४०० ग्रेड वेतन देण्याची संघटनेची मागणी समर्थनीय वाटते. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतनसंरचना प्रस्तावित करणेत येत आहे :-

१. वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० आणि रू.५४०० ग्रेड वेतन
(गट-अ प्रवेशश्रेणी-नामनिर्देशनाने)
२. पदोन्नतीने असल्यास २ वेतनवाढी

समितीची शिफारस :-

रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील गट-अ मधील संवर्गांना सुधारित वेतनसंरचनेत वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मध्ये केली आहे. परिच्छेद ३.६.२ मधील शिफारशीनुसार रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील विविध प्रशासकीय विभागांतर्गत सर्वच संवर्गांना वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. मात्र, केवळ तहसिलदार या संवर्गास वेतनबँड पीबी-२ ऐवजी पीबी-३:रू.१५६००-३९१०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याचा विनिर्दिष्ट निर्णय मंत्रीमंडळाने घेतला आहे. म्हणजेच तहसिलदार संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीस अनुज्ञेय असलेल्या वेतनबँडहून उच्च वेतनबँड मंजूर केला आहे.

रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना सुधारित वेतनसंरचनेत रू.४६०० ग्रेड वेतन अनुज्ञेय आहे. तथापि, गट-अ मधील संवर्गांना रू.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे, ही बाब तसेच रू.५४०० ग्रेड वेतन हे तहसिलदार संवर्गाच्या पदोन्नतीच्या उप जिल्हाधिकारी संवर्गास आणि रू.८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीतील गट-अ मधील संवर्गास अनुज्ञेय असल्याने तहसिलदार संवर्गाची रू.५४०० ग्रेड वेतनाची मागणी सयुक्तिक ठरत नाही.

वर नमूद केल्याप्रमाणे या संवर्गास राज्य वेतन सुधारणा समितीने शिफारस केल्यापेक्षा उच्च वेतनबँड मंजूर केला आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये कोणतीही त्रुटी नाही.

पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी देण्याच्या मागणीसंदर्भात असे नमूद करण्यात येते की, पदोन्नतीनंतर करावयाच्या वेतननिश्चितीसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ अन्वये स्थायी तरतुदी केलेल्या आहेत. त्यामुळे ही मागणी अप्रस्तुत ठरते. तसेच ही बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

६) नायब तहसिलदार

संघटनेचे अभिप्राय :- महसूल विभागातील नायब तहसिलदार या पदास दि.१३.१०.१९९८ पासून गट-ब (राजपत्रित अधिकारी) दर्जा देण्यात आला असून गट-ब अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी लागू केली नाही. सध्या या पदास गट-क पदाप्रमाणेच रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी देण्यात येते मात्र इतर विभागांतील गट-ब मधील अधिकाऱ्यांना रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी देण्यात येते. नायब तहसिलदार या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या पहाता इतर विभागांतील गट-ब अधिकाऱ्यांप्रमाणेच रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने दि.१३.१०.१९९८ पासून लागू करावी. तसेच सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करत असताना वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० अधिक रु. ४६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- महसूल विभागातील नायब तहसिलदार या पदास दि.१३.१०.१९९८ पासून गट- ब (राजपत्रित अधिकारी) दर्जा देण्यात आला आहे. तथापि, या पदास गट-क पदाचीच रू.५५००- ००० ही वेतनश्रेणी देण्यात येत आहे. इतर विभागांतील गट-ब मधील अधिकाऱ्यांना सन १९९६ पासून रू.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. नायब तहसिलदार या पदास सन-१९९८ पासून राजपत्रित अधिकारी दर्जा दिलेला असला तरी, त्यांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात आला होता. तरी त्यांना सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० आणि रू.४६०० ग्रेड वेतन देण्यात यावे.

या पदाशी समकक्ष असलेली तालुकास्तरावरील वनपरिक्षेत्र अधिकारी, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक अभियंता आणि अन्न व औषध निरीक्षक या सर्व अधिकाऱ्यांना वेतनबँड पीबी-२:

रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४४०० ही सुधारित वेतनसंरचना दिली आहे. तसेच पशुधन विकास अधिकारी या पदास रु.५४०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे.

या संवर्गास सोपविण्यात आलेली कामे तसेच महसूल विभागातील तहसिलदार यांना सहाय्यक ठरतील अशी सर्व कार्यकारी, दंडाधिकारी व पर्यवेक्षण तसेच समन्वय अशी अत्यंत जबाबदारीची कामे करावी लागतात.

या वर्ग-२ म्हणजे श्रेणी-ब या संवर्गाची भरती नामनिर्देशनाने व पात्र महसुली अव्वल कारकून व मंडल अधिकारी संवर्गातून पदोन्नती देऊन केली जाते.

हा संवर्ग श्रेणी-ब असूनही त्यास वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेत ठेवण्यात आले आहे. नायब तहसिलदार यांचे वेतन कमी असणे उचित नाही. या संवर्गास ग्रेड वेतन रु.४४०० द्यावे ही संघटनेची मागणी समर्थनीय वाटते. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारित वेतनसंरचना प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. वेतनबँड रु.९३००- ३४८०० अधिक रु. ४४०० ग्रेड वेतन (गट-ब- नामनिर्देशनाने )

२. पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी

समितीची शिफारस :-

नायब तहसिलदार संवर्गास पाचव्या वेतन आयोगामध्ये रू.५५००-९००० ही वेतनश्रेणी असूनही प्रशासकीय कामकाज पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून राजपत्रित गट-ब दर्जा देण्यात आला आहे. अशा प्रकारे राजपत्रित गट-ब दर्जा असलेले इतर संवर्गदेखील रू.५५००-९००० या असुधारित वेतनश्रेणीत अन्य विभागांत आहेत. राजपत्रित गट-ब दर्जा असलेल्या सर्वच संवर्गांना रू.६५००-१०५०० ही असुधारित वेतनश्रेणी मंजूर केलेली नाही.

रू.६५००-१०५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांनाच वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन अनुज्ञेय आहे. इतर संवर्गांप्रमाणेच रू.५५००-९००० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.४३०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये या संवर्गास मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

पदोन्नतीने नियुक्ती असल्यास २ वेतनवाढी देण्याच्या मागणीसंदर्भात असे नमूद करण्यात येते की, पदोन्नतीनंतर करावयाच्या वेतननिश्चितीसंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ अन्वये स्थायी तरतुदी केलेल्या आहेत. त्यामुळे ही मागणी अप्रस्तुत ठरते. तसेच ही बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

७) मंडल अधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- राज्यातील महसूल क्षेत्रिय यंत्रणेतील गट-क या प्रवर्गातील मंडल अधिकारी संवर्गास दि. १ जानेवारी, १९९६ पासून पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार रु. ४५०० - ७००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली होती. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. वेतन - १०/२००५/प्र.क्र. ११०/ई-७, दि. ४ फेब्रुवारी, २००६ अन्वये दि. १ एप्रिल, २००४ पासून मंडल अधिकारी संवर्गास कृषि पर्यवेक्षकाप्रमाणे रु.५०००-८००० अशी सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. मंडल अधिकाऱ्यांची कर्तव्ये महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका ( खंड चार ) मधील प्रकरण तीन अन्वये विहित करण्यात आली आहेत. शासनाने मंडल अधिकारी संवर्गाचे क्षेत्रिय स्तरावर समकक्ष पद कृषि पर्यवेक्षक आहे हे ठरवूनच वेतनश्रेणीत बदल केला होता. वेतन सुधारणा समितीने त्यांच्या अहवालात मंडल अधिकाऱ्यास समकक्ष पद कुठले येते याचा उल्लेख केलेला नाही. वेतन सुधारणा समितीच्या अहवालातील परिच्छेद ३.१४ संपूर्णपणे संदिग्ध स्वरुपाचा आहे. या संदर्भात पुढील बाबी विचारात घेण्यात याव्यात :-

१. राज्यात १५६३७ तलाठी असून त्यासाठी १५४० मंडल अधिकारी कार्यरत आहेत. तलाठ्यांना पदोन्नतीच्या अत्यल्प संधी उपलब्ध असून पदोन्नतीसाठी ९:१ हे प्रमाण आहे.

२. मंडल अधिकारी हा ग्रामीण पातळीवर काम करणारा संवर्ग असून तो कृषि पर्यवेक्षक (मृद संधारण) ( प्रशिक्षण व भेट योजना) या पदाशी समकक्ष आहे.

३. कृषि पर्यवेक्षक हे तीन ते चार कृषि सहाय्यकांवर नियंत्रण ठेवतात तर मंडल अधिकारी आठ ते बारा तलाठी सज्जांवर नियंत्रण ठेवतात व त्यांच्या मंडळात २५-३० गावे येतात. कृषि पर्यवेक्षकाचे काम हंगामी व मर्यादित स्वरुपाचे असते तर मंडल अधिकारी यांना सतत व्यापक स्वरुपाचे काम करावे लागते.

वरील तांत्रिक स्वरुपाची कामे मंडल अधिकाऱ्यांना करावी लागतात. त्यामुळे हे पद तांत्रिक स्वरुपाचे आहे. वरील बाबींव्यतिरिक्त मंडल अधिकारी यांची ३३ कर्तव्ये असून त्यांना अन्य ३४ प्रकारची कामे करावी लागतात. या सर्व बाबींचा विचार करुनच शासनाने मंडल अधिकारी संवर्गास दि. १.१.२००६ पूर्वी रु. ५००० - ८००० ही वेतनश्रेणी लागू केली होती. त्यामुळे सदर वेतनश्रेणीस शासनाने वेतनबँड पीबी-२ रु.९३०० - ३४८०० अधिक रु. ४२०० ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक आहे.

राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालाचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट होते की, दि.१.१.१९९६ नंतर शासनाने ज्या ज्या संवर्गांच्या वेतनश्रेणीत बदल केले त्यातील काही संवर्गाच्या वेतनाबद्दल समितीने ज्या शिफारशी केल्या त्या पाहता फक्त मंडल अधिकारी संवर्गाचेच वेतनबँडसह ग्रेड वेतन बदलले आहे. अन्य संवर्गांच्या बाबतीत समितीने केंद्र शासनाप्रमाणेच वेतनबँड दिला व ग्रेड वेतनामध्ये केवळ १०० ते २०० रुपयांचा बदल केला. परंतु मंडल अधिकारी संवर्गाच्या बाबतीत ग्रेड वेतन ७०० रुपयांनी कमी करुन कर्मचाऱ्यांचे फार मोठे नुकसान केले आहे. तसेच वेतनबँड बदलल्याने शेवटच्या टप्प्यावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे, परिणामी सेवानिवृत्तिच्या वेळेस त्याचा परिणाम निवृत्तिवेतनावर होईल. त्यामुळे मंडल अधिकारी संवर्गास वेतनबँड पीबी-२ अधिक रु. ४२०० ग्रेड वेतन देणे जरुरीचे आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. वेतन-१०/२००५/प्र.क्र.११०/ई-७, दि.४ फेब्रुवारी, २००६ अन्वये मंडल अधिकारी संवर्गास पूर्वीच्या रु.४५००-७००० वेतनश्रेणीऐवजी कृषि पर्यवेक्षकाप्रमाणे रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी दि. १ एप्रिल, २००४ पासून मंजूर करण्यात आली आहे. कृषि पर्यवेक्षकांना सहाव्या वेतन आयोगाने वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४२०० निश्चित केले आहे. त्यानुसार मंडल अधिकारी संवर्गालादेखील वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४२०० ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

मंडल अधिकारी संवर्गास दि. १ एप्रिल, २००४ पासून रु.४५००-७००० वेतनश्रेणीऐवजी कृषि पर्यवेक्षकाप्रमाणे रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असली तरी वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गास कृषि पर्यवेक्षक संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. तर, या संवर्गाच्या जबाबदाऱ्या विचारात घेऊन समकक्ष वेतनश्रेणीपेक्षा (रू.१२००-२०४०) उच्च रू.१४००-२३०० ही वेतनश्रेणी चौथ्या वेतन आयोगात मंजूर केली होती. म्हणजेच या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात श्रेणीवाढीचा लाभ मिळालेला आहे.

पाचव्या वेतन आयोगात मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या पुनःसुधारित केल्या असल्यास त्यांचे पुनःपरिक्षण करण्याची बाब राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या कार्यकक्षेत होती. त्यानुसार त्या समितीने विविध विभागांमधील संवर्गांच्या पुनःसुधारित वेतनश्रेण्यांचे पुनःपरिक्षण करून सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याबाबत शिफारशी केल्या होत्या. मंडल अधिकारी संवर्गास दि. १ एप्रिल, २००४ पासून मंजूर केलेली रू.५०००-८००० ही पुनःसुधारित वेतनश्रेणी, इतर पदांबरोबर असलेली वेतनश्रेणीची समकक्षता व सर्व संबंधित बाबी विचारात घेऊनच या संवर्गास राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने (अहवाल-परिच्छेद ३.१४) या संवर्गास वेतनबँड पीबी-१: रु.५२००-२०२०० अधिक रु.३५०० ग्रेड वेतन या सुधारित वेतनसंरचनेची शिफारस केली होती.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गास योग्य वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामध्ये त्रुटी नाही.

८) अव्वल कारकून

संघटनेचे अभिप्राय :- सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दि. २२.४.२००९ च्या आदेशान्वये अव्वल कारकून संवर्गास दि.१.१.२००६ पासून वेतनबँड रु.५२०० - २०२०० अधिक रु. २८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे व मंडल अधिकारी संवर्गास वेतनबँड रु.५२०० - २०२०० अधिक ग्रेड वेतन रु. ३५०० निश्चित केले असून यामध्ये रु.७०० इतक्या रकमेची तफावत दिसून येते.

अव्वल कारकून व मंडल अधिकारी या दोन्ही संवर्गांसाठी पदोन्नतीचे पद नायब तहसिलदार आहे. सर्वसाधारणपणे अव्वल कारकून संवर्गामार्फत कार्यालयीन कामकाज हाताळण्यात येते व मंडल अधिकारी संवर्गामार्फत क्षेत्रिय कामकाज करण्यात येते. या दोन्ही संवर्गांसाठी पदोन्नतीचे पद एकच म्हणजेच नायब तहसिलदार असल्यामुळे या दोन्ही संवर्गातील कर्मचाऱ्यांना कामाचा अनुभव मिळावा या दृष्टीकोनातून त्यांची आपापसात बदली करण्यात येत असते हे विचारात घेता या दोन्ही संवर्गांच्या ग्रेड वेतनात असलेली तफावत दूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- महसूल विभागाच्या आस्थापनेवर अव्वल कारकून व मंडल अधिकारी या दोन्ही पदांसाठी पदोन्नतीचे पद नायब तहसिलदार असल्याने या दोन्ही पदांची वेतनश्रेणी समान ठेवण्याच्या दृष्टीने ग्रेड वेतनामधील रु.७०० इतक्या रकमेची तफावत दूर करुन अव्वल कारकून संवर्गास मंडल अधिकारी संवर्गाप्रमाणे वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रु.३५०० ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. एसआरव्ही १४९४/प्र.क्र.८६३/(१)/ई-७ दि.२७ नोव्हेंबर, १९९६ अन्वये विहित केलेल्या अव्वल कारकून संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांत मंडल अधिकारी संवर्गातून बदलीने अव्वल कारकून संवर्गात नियुक्ती करण्याची तरतूद आहे. तसेच शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. एसआरव्ही १४९४/प्र.क्र.८६३/(दोन)/ई-७ दि.२७ नोव्हेंबर, १९९६ अन्वये विहित केलेल्या मंडल अधिकारी संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांत अव्वल कारकून संवर्गातून बदलीने मंडल अधिकारी संवर्गात नियुक्ती करण्याची तरतूद आहे. म्हणजेच हे संवर्ग आपापसात बदलीपात्र आहेत. सदर वस्तुस्थिती विचारात घेता अव्वल कारकून संवर्गास मंडल अधिकारी संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-१: रू.५२००-२०२०० अधिक रू.३५०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

ब) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख

१) उप संचालक, भूमि अभिलेख

संघटनेचे अभिप्राय :- उप संचालक, भूमि अभिलेख हे पद विभागीय स्तरावरील मुख्यालयाच्या ठिकाणी आहे. सदर पदाच्या अधिनस्त एकूण ४-५ जिल्हे येतात. सदर अधिकारी हे द्वितीय अपीलीय प्राधिकारी तसेच गट-क मधील कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारीही आहेत. तसेच दि.१.१०.१९९४ रोजीच्या तालुका पुनर्रचनेच्या वेळेस जिल्हाधिकारी यांना पदसिध्द उप संचालक, भूमि अभिलेख म्हणून घोषित केले आहे. या सर्व बाबींचा विचार करता त्यांना सद्य:स्थितीत लागू असलेली निवडश्रेणी उप जिल्हाधिकाऱ्यांची वेतनश्रेणी ही अत्यंत अयोग्य आणि पदाचे अवमुल्यन करणारी आहे. सबब उप संचालक, भूमि अभिलेख या पदास अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी. सदर संवर्गात फक्त १० पदे असल्याने शासनावर खर्चाचा अजिबात भार पडणार नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- उप संचालक, भूमि अभिलेख हे पद विभागीय स्तरावर मुख्यालयाच्या कार्यालयात आहे. या पदाच्या अधिनस्त ४-८ जिल्हे येतात. हे द्वितीय अपिलीय प्राधिकारी असून गट-क च्या कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी आहेत. अपर जिल्हाधिकारी हे एका जिल्ह्याचे कामकाज पाहत असून ते जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त आहेत. तथापि, उप संचालक, भूमि अभिलेख हे ४-८

जिल्ह्यांचे भूमि अभिलेख विभागाचे पर्यवेक्षकीय कामकाज पाहत असून, ते त्या जिल्ह्यांच्या विभागाचे प्रादेशिक विभागप्रमुख म्हणून स्वतंत्रपणे कार्यरत आहेत. तसेच दि.१.१०.१९९४ रोजीच्या तालुका पुनर्रचनेच्या वेळी जिल्हाधिकारी यांना पदसिध्द उप संचालक, भूमि अभिलेख म्हणून घोषित केले आहे. तथापि, त्यांना अपर जिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सहाव्या वेतन आयोगामध्ये ही त्रूटी दूर होणे आवश्यक आहे.

या संवर्गामध्ये केवळ १० पदे मंजूर असून, त्यापुढे पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने या संवर्गातील २०% पदे म्हणजे किमान २ पदे उप संचालक, भूमि अभिलेख (निवडश्रेणी) अशी घोषित करुन अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गाप्रमाणे त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रु.३७४००-६७००० आणि रु.८७०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

२) अधीक्षक, भूमि अभिलेख

संघटनेचे अभिप्राय :- अधीक्षक, भूमि अभिलेख हे जिल्हास्तरीय नियंत्रक अधिकारी असून ते तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांचे अपीलीय प्राधिकारीही आहेत. तसेच त्यांच्या अधिनस्त संपूर्ण जिल्ह्याच्या भूमापनाचे काम असून जमीनविषयक कामात ते जिल्हाधिकारी यांचे तांत्रिक सल्लागारही आहेत. सबब, या पदास ३ तालुक्यांचे कार्यक्षेत्र असणाऱ्या उप विभागीय अधिकारी पदाची वेतनसंरचना लागू करणे ही मुळातच चुकीची बाब आहे. सबब सदर पदास अपर जिल्हाधिकारी पदाची वेतनसंरचना लागू होणे उचित आहे. सदर संवर्गात साधारणपणे फक्त ४२ पदे असल्याने शासनावर खर्चाचा जास्त भार पडणार नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- अधीक्षक, भूमि अभिलेख हे जिल्हास्तरीय नियंत्रक अधिकारी असून ते तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांचे अपिलीय प्राधिकारीही आहेत. तसेच त्यांच्या अधिनस्त संपूर्ण जिल्ह्याच्या भूमापनाचे काम असून जमीनविषयक कामात ते जिल्हाधिकारी यांचे तांत्रिक सल्लागारही आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २(३१) नुसार महसूल अधिकारी या व्याख्येत उप जिल्हाधिकारी, तहसिलदार व भूमापन अधिकारी यांचा समावेश होतो. महसूल विभागांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त उप जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालय यांच्या पातळीवर महसूल विभागाचे काम पार पाडताना भूमि अभिलेखाशी मुलभूत बाबींमध्ये भूमि अभिलेख विभागाकडून महत्वाची भूमिका पार पाडली जाते. त्यामुळे अधीक्षक, भूमि अभिलेख या पदासाठी महसूल यंत्रणेतील उप जिल्हाधिकारी संवर्गाची वेतनबँड रु. १५६००-३९१०० आणि रु. ५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

भूमि अभिलेख विभागामध्ये गट-ब मधील ४३२ पदे मंजूर असून त्यातून अधीक्षक, भूमि अभिलेख संवर्गामध्ये पदोन्नतीकरीता केवळ ४२ पदे उपलब्ध आहेत. यावरुन या संवर्गातही पदोन्नतीची संधी अल्प असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे या ४२ मंजूर पदांपैकी २०% पदे म्हणजे ८ पदे अधीक्षक, भूमि अभिलेख (निवडश्रेणी) अशी घोषित करुन उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गाप्रमाणे त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रु.१५६००-३९१०० आणि रु.६६०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात यावी.

३) तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख

संघटनेचे अभिप्राय :- भूमि अभिलेख विभागाच्या दि.१.१०.१९९४ रोजीच्या तालुका पुनर्रचनेनंतर जमीनविषयक सर्व प्रकारची कामे आणि अन्य अधिक जबाबदाऱ्या एकाच अधिकाऱ्यावर / कार्यालयावर सोपविण्यात आल्या असून एका संपूर्ण तालुक्याचे जमीनविषयक सर्व बाबींचे महत्वपूर्ण काम त्यास पार पाडावे लागते. त्यामुळे कामकाजात आणि जबाबदारीत निश्चितपणे वाढ झाली आहे. तसेच तिसऱ्या व चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार तहसिलदार हे तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख या पदाशी समकक्ष पद होते व त्यास गट-ब संवर्गातील वेतनश्रेणी लागू होती. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम २(३१) नुसार महसूल अधिकारी या व्याख्येत उपजिल्हाधिकारी, तहसिलदार व भूमापन अधिकारी यांचा समावेश होतो. या तरतूदीनुसार महसूल विभागांतर्गत भूमि अभिलेख कार्यालय व

जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त तहसिलदार व उपजिल्हाधिकारी कार्यालय यांची कार्यपध्दती व अधिकार समान पातळीवर विभागलेले आहेत. महसूल विभाग ज्या पायावर उभे राहून काम करते तो पाया निर्माण व मजबूत करण्याचे काम भूमि अभिलेख विभाग पार पाडत आला आहे. तसेच येऊ घातलेल्या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडण्यासाठी चांगल्या दर्जाचे अधिकारी / कर्मचारी या विभागाकडे आकर्षित होण्यासाठी आणि कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा हुरुप वाढविण्यासाठी योग्य वेतनश्रेणी मिळणे अत्यंत गरजेचे आहे. सबब, तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख या पदास तहसिलदार पदाच्या समकक्ष वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- भूमि अभिलेख विभागातील तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख हे पद तालुकास्तरावर व नागरी क्षेत्रामध्ये नगरभूमापन अधिकारी म्हणून कार्यरत आहे. तालुकास्तरावर महसूल यंत्रणेतील तहसिलदारांप्रमाणे हे पद कार्यरत असते. दि.१.१०.१९९४ रोजीच्या तालुका पुनर्रचनेनंतर संपूर्ण तालुक्याचे जमीनविषयक सर्व बाबींचे महत्वपूर्ण काम तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांना पार पाडावे लागते. या पदास सन-१९६६ च्या बडकस आयोगानुसार रु.३००-२०-५००-२५-५२५, दि.१.४.१९७६च्या भोळे आयोगानुसार रु.६००-३०-७५०-द.रो.-४०-११५०, सन-१९८६ च्या आयोगानुसार रु.२०००-६०-२३०० द.रो. ७५-३२००- १००-३५०० व सन-१९९६ च्या आयोगानुसार रु.६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. तथापि, महसूल विभागातील तहसिलदार या तत्सम पदास दि.१.१.१९६६ च्या बडकस आयोगानुसार रु. ३००- २०-४६० द.रो. २०-५००-२५-६५० दरो. ३०-८३० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती. मात्र सन-१९७६ च्या भोळे आयोगानुसार तहसिलदार पदास रु.६००-३०-७५०-द.रो. ४०-११५०, सन १९८६ मध्ये रु.२२००-७५-२८०० द.रो. १००-३७०० व सन १९९६ मध्ये रु.७४५०-२२५-११५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. म्हणजेच तालुका स्तरावर तालुका कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख या पदाच्या वेतनश्रेणीत तफावत असल्याचे स्पष्ट होते. सदर पदास तहसिलदार पदाप्रमाणे वेतनबँड रु.१५६००-३९१०० आणि रु. ५००० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर होणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) उप संचालक, भूमि अभिलेख

२) अधीक्षक, भूमि अभिलेख

३) तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख

वरील संवर्गांची तुलना अनुक्रमे अतिरिक्त जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी आणि तहसिलदार संवर्गाशी केली आहे. परंतु विचाराधीन संवर्गांना वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) अतिरिक्त जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी आणि तहसिलदार संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही.

उप संचालक, भूमि अभिलेख या संवर्गास वेतन समानीकरण समितीने चौथ्या वेतन आयोगात शिफारस केलेल्या रु.३०००-४५०० या समकक्ष वेतनश्रेणीऐवजी रु.३२००-४६२५ ही वेतनश्रेणी मंजूर केली होती.

विचाराधीन संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी समकक्ष सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. सबब, या संवर्गांच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

उप संचालक, भूमि अभिलेख आणि अधीक्षक, भूमि अभिलेख या संवर्गातील २०% पदांना निवडश्रेणी मंजूर करण्याची बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

४) मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार / वरिष्ठ लिपिक

संघटनेचे अभिप्राय :- तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख हे तालुकास्तरावरील महत्वाचे कार्यालय असून तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख या पदानंतर सर्व प्रकारच्या तांत्रिक तसेच प्रशासकीय कामात शिरस्तेदार / वरिष्ठ लिपिक हे पद अत्यंत महत्वाचे आहे. सदर पदाला नायब तहसिलदार समकक्ष वेतनश्रेणी देणेच योग्य आहे. सबब, मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार / वरिष्ठ लिपिक या पदांस नायब तहसिलदार समकक्ष वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- भूमि अभिलेख विभागातील सहायक तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख हे तालुकास्तरावर कार्यालयप्रमुखाच्या नंतरचे पद होते. आता सदर पद मुख्यालय सहायक / शिरस्तेदार या संवर्गात विलीन करण्यात आले आहे. म्हणजेच आता कार्यालय प्रमुखानंतरचे हे महत्वाचे पद आहे. महसूल यंत्रणेमध्ये तहसिलदार या कार्यालय प्रमुखानंतर नायब तहसिलदार हे पद कार्यरत आहे. मुख्यालय सहायक / वरिष्ठ लिपिक / शिरस्तेदार या पदास सन-१९६६ च्या बडकस आयोगानुसार रु.१५०-८-१९०-१०-२२० द.रो. १०-२७०, दि.१.४.१९७६ च्या भोळे आयोगानुसार रु.३३५-१५-५००-२०-५८०-२०-६८० व सन-१९९६ च्या आयोगानुसार रु.५०००-१५०-८००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. तथापि, महसूल विभागातील नायब तहसिलदार या तत्सम पदास दि.१.१.१९६६ च्या बडकस आयोगानुसार रु.२२०-१०-२८०-१५-३१० द.रो.-४०० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती. मात्र, सन-७६ च्या भोळे आयोगानुसार नायब तहसिलदार पदास रु.५००-२०-७००-२५-९००, सन १९८६ मध्ये रु.१६४०-६०-२६००-द.रो.७५-२९०० व सन-१९९६ मध्ये रु.५५००- १७५-९००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. म्हणजेच वरिष्ठ लिपिक / शिरस्तेदार / मुख्यालय सहायक या पदांच्या वेतनश्रेणीत अन्याय झाल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर पदांस नायब तहसिलदार पदाप्रमाणे वेतनबँड रु.९३००- ३४८०० आणि रु.४३०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर होणे आवश्यक आहे.

५) परिरक्षण भूमापक / निमतानदार / दूर्बिण भूमापक

संघटनेचे अभिप्राय :- भू-करमापक या पदाच्या पदोन्नतीनंतर परिरक्षण भूमापक हे पद आहे. तसेच त्यांचा संबंध शहरातील बहुमुल्य मिळकतींशी, जमिनींच्या मालकी हक्काचे फेरफार घेणे आणि अन्य अर्धन्यायिक स्वरुपाच्या कामांशी असतो. सबब परिरक्षण भूमापकांना वेतनबँड पी.बी.-२: रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४२०० ही वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी. भू-करमापकांची साधारणपणे फक्त १३९२ पदे असल्याने शासनावर खर्चाचा भार पडणार नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- भूमि अभिलेख विभागातील परिरक्षण भूमापक / निमतानदार / दूर्बिण भूमापक इत्यादी पदांस सन-१९६६ च्या बडकस आयोगानुसार रु.१३०-५-१५०-८-१७४द.रो.०८-१९०-१०-२४०, दि.१.४.१९७६ च्या भोळे आयोगानुसार रु.३३५-१५-५००-२०-५८०-२०-६८० व सन-१९९६ च्या आयोगानुसार रु.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. तथापि, महसूल विभागातील मंडल अधिकारी या तत्सम पदास दि.१.१.१९६६ च्या बडकस आयोगानुसार रु.११५-४-१३५-५-१६० द.रो. ०५-१८५-६-२१५ ही वेतनश्रेणी देण्यात आली होती. मात्र, सन-१९७६ च्या भोळे आयोगात परिरक्षण भूमापक / निमतानदार / दूर्बिण भूमापक या पदांना अनुक्रमे सन-१९८६ मध्ये रु.१२००-३०-१४४० द.रो.३०- १८०० व सन-१९९६ मध्ये रु.४०००- १००-६००० व तद्नंतर रु. ५०००-१५०- ८००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. म्हणजेच परिरक्षण भूमापक / निमतानदार / दूर्बिण भूमापक या पदांच्या वेतनश्रेणीत तफावत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे या पदांना मंडल अधिकारी पदाची वेतनबँड रु.५२००-२०२०० आणि रु.३५०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर होणे आवश्यक आहे.

६) भू-करमापक / कनिष्ठ लिपिक

संघटनेचे अभिप्राय :- भूमि अभिलेख विभागाकडून जे पारंपारीक तसेच अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक यंत्र सामुग्रीद्वारे मोजणीचे काम केले जाते ते वास्तविक पाहता पूर्णपणे तांत्रिक स्वरुपाचे आहे. मात्र, भूमि अभिलेख विभागात लिपिक / टंकलेखक / भू-करमापक अशी एकाच मापपट्टीत

रु.३०५०-४५९० या वेतनश्रेणीत नेमणूक केली जाते व तांत्रिक तसेच अतांत्रिक काम एकाच दर्जाच्या कर्मचाऱ्याला करावे लागते. वास्तविक पाहता भू-करमापक हा उन्हातान्हात जागेवर जाऊन प्रत्यक्ष मोजणी करुन संबंधितांस त्यांच्या जागेच्या हद्दी दाखवितो आणि जमीनधारकांच्या जमिनीच्या हद्दीबाबतचे वाद जागेवरच त्वरीत सोडवितो. म्हणजेच तो तांत्रिक तसेच अर्धन्यायिक प्रकारची कामगिरी पार पाडतो. म्हणजेच त्याची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या या लिपिक पदापेक्षा निश्चितच जास्त आहेत. यास्तव त्यास लिपिक पदापेक्षा एक वरची वेतनश्रेणी देणे योग्य होईल. सबब भू-करमापकांना वेतनबँड पी.बी-१: रु.५२००- २०२०० अधिक ग्रेड वेतन रु.२८०० ही वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- भूमि अभिलेख विभागातील भू-करमापक या पदास सन-१९६६ च्या बडकस आयोगानुसार रु.११५-४-१३५-५-१६० द.रो.५-१८५-६-२१५, दि.१.४.१९७६ च्या भोळे आयोगानुसार रु.२६०-१०-३९०-१५-४२०-१५-४९५ व सन-१९९६ च्या आयोगानुसार रु.३०५०-७५-३९५०-८०-४५९० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. तथापि, महसूल खात्यातील तलाठी या तत्सम पदास दि.१.१.१९६६ च्या बडकस आयोगानुसार रु.९५-३-१२५द.रो.३-१४६-४-१५० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती. मात्र, सन-१९७६ च्या भोळे आयोगात तलाठी पदास रु.२६०-१०-३९० १५-४२०-१५-४९५, सन-१९८६ मध्ये रु.९७५-२५-११५०द.रो.३०-१५४० व सन-१९९६ मध्ये रु.३२००-८५-४९०० व तद्नंतर दि.८.५.२००० च्या आदेशांन्वये रु.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. म्हणजेच भू-करमापक या पदाच्या वेतनश्रेणीत तफावत असल्याचे स्पष्ट होते. शिवाय तलाठी संवर्गाच्या सेवाभरती नियमांनुसार त्या पदाची व भू-करमापक पदाची शैक्षणिक अर्हता समान आहे. जबाबदारीचा विचार केला तर, भू-करमापकांना अतिशय जबाबदारीने मोजणीची तांत्रिक कामे पार पाडावी लागतात. भूमि अभिलेख विभागातील भू-करमापक व वन विभागातील भू-करमापक यांची शैक्षणिक अर्हता समान नसली तरी, वन विभागातील जमीन मोजणी / हद्दीबाबतची कामे देखील भूमि अभिलेख विभागातील भू-करमापकांकडून केली जातात. त्यामुळे सदर पदास तलाठी पदाची वेतनबँड रु.५२००-२०२०० आणि रु.२४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर होणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

४) मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार / वरिष्ठ लिपिक

५) परिरक्षण भूमापक / निमतानदार / दुर्बीण भूमापक

६) भू-करमापक / कनिष्ठ लिपिक

वरील संवर्गाची तुलना अनुक्रमे नायब तहसिलदार, मंडल अधिकारी आणि तलाठी संवर्गाशी केली आहे. परंतु वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) विचाराधीन संवर्गांना नायब तहसिलदार, मंडल अधिकारी आणि तलाठी संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही.

विचाराधीन संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी समकक्ष सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. सबब, या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

क) मुख्य वनसंरक्षक

१) विभागीय वन अधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- विभागीय वन अधिकारी हे पद वरिष्ठ पद असून सहाय्यक वनसंरक्षक संवर्गातून पदोन्नतीने भरले जाते. मुंबई वन संहिता भाग-१ नुसार विभागीय वन अधिकारी हे वन विभागातील प्रशासन व कामाच्या कार्यान्वयनासाठी जबाबदार असतात. नियमाप्रमाणे वृक्षतोड, नैसर्गिक पुनरुत्पत्ती व वनांचे संरक्षण आणि कार्य आयोजनाच्या निर्देशनानुसार इतर कामे नियमाप्रमाणे करणे त्यांच्याकडून अभिप्रेत असते. ते वनोपजाची विक्री, त्याबाबतीतील कंत्राट, विविध विभागांना वनोपजाच्या पुरवठयासह महसूल जमा करणे व खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या कामांवर देखरेख करतात. विभागीय वन अधिकाऱ्यास ते सामाजिक वनीकरण विभागात उप संचालक असताना मुंबई वित्तिय नियम, १९५९ च्या अंतर्गत प्रादेशिक कार्यालय प्रमुख म्हणून महसूल व वन विभागाने दि. २०.१२.१९९९ रोजी घोषित केले आहे व तीच प्रक्रिया आजही चालू आहे. शिवाय विभागीय वन अधिकारी यांची नेमणूक वन विकास महामंडळांतर्गत प्रदेश विभागप्रमुख म्हणून केली जाते. देशातील इतर राज्यांतील विभागीय वन अधिकारी

(DFO) हे स्टेट कॅडर डेप्युटी कॉन्झर्वेटर ऑफ फोरेस्ट यांच्या समकक्ष गणले जाते व त्या अनुषंगाने महाराष्ट्रात सुध्दा ही पध्दत कायमच्या दृष्टीकोनातून अंमलात असली तरी, वेतनाच्या दृष्टीकोनातून न्यायिक नाही. बॉम्बे फॉरेस्ट मॅन्युअल प्रमाणे विभागीय वन अधिकारी हे जिल्हास्तरीय पद आहे. वन विभागाच्या संरचनेत वनक्षेत्रांचे व वनांचे क्षेत्र व त्याची व्याप्ती हा निकष असतो. त्यामुळे ज्या ठिकाणी जास्त वने आहेत अशा ठिकाणी एकापेक्षा जास्त प्रदेश विभागप्रमुख नेमले जातात. उदा. चंद्रपूर, गडचिरोली. मात्र इतर ठिकाणी जिल्हा पातळीवर एकच विभागीय वन अधिकारी (Dy.Conservator of Forest) विभागप्रमुख असतात.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** महाराष्ट्र वनसेवा गट-अ हा भारतीय वनसेवेकरीता सेवाप्रवेश संवर्ग आहे. पाचव्या वेतन आयोगापासून भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांना भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची समकक्षता प्रदान करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर राज्य शासन सेवेतील सेवाप्रवेश संवर्गातील अधिकाऱ्यांना सदर समकक्षतेनुसार समान वेतनश्रेणी देणे न्यायोचित आहे. राष्ट्रीय वन आयोगाच्या अहवालामध्येसुध्दा नमूद करण्यात आले आहे की, बहुतांशी राज्यांनी राज्य वनसेवेच्या अधिकाऱ्यांना इतर प्रशासकीय व पोलीस विभागाप्रमाणे वेतनश्रेणी न दिल्याने सहाय्यक वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी या संवर्गात कुंठितता निर्माण झाली आहे.

सदर मुद्यांचा विचार करता विभागीय वन अधिकारी पदास पोलीस विभागातील पोलीस अधीक्षक पदाशी समकक्ष वेतनबँड रु.१५६००-३९१०० आणि रु.६६०० / ७६०० ग्रेड वेतन व निवडश्रेणी वेतनबँड रु.३७४००-६७००० आणि रु.८७०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी.

२) सहाय्यक वनसंरक्षक

**संघटनेचे अभिप्राय :-** महाराष्ट्र राज्यातील वन सेवेतील सहाय्यक वनसंरक्षक यांच्याबाबतीत बॉम्बे फॉरेस्ट मॅन्युअल मध्ये असे नमूद आहे की, सहाय्यक वनसंरक्षक हे विभागीय वन अधिकारी यांना त्यांच्या कामी सहाय्य करतील, शिवाय कोट्यवधी वनसंपत्तीची हाताखालील कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने संरक्षण करण्याची जबाबदारी सुध्दा आहे. या व्यतिरिक्त सहाय्यक वनसंरक्षक यांची कामे तांत्रिक स्वरुपाची तर आहेतच, त्यासोबतच भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ६१-अ प्रमाणे वन गुन्ह्यांसंबंधी प्राधिकृत अधिकारी म्हणून न्यायिक प्रक्रियेचा भाग हाताळतात. तसेच कलम ७२ प्रमाणे वन गुन्ह्यांची तडजोड करण्याची कारवाई करुन दंड ठोठावण्याचे आणि कलम ६१-अ प्रमाणे कारवाई करुन कलम ६१-सी प्रमाणे वाहने शासन जमा करण्याचे अधिकार सुध्दा आहेत. तसेच शासन नुकसानीची वसूली करण्याची स्वतंत्र अधिकारीता असून सहाय्यक वनसंरक्षक हे स्वतंत्र उपविभागीय वन अधिकरी म्हणून देखील कामे करतात.

उपरोक्त विवेचनावरुन हे सिध्द होते की, सहाय्यक वनसंरक्षक / उप विभागीय वन अधिकारी हे महाराष्ट्र वन सेवेमध्ये दर्जा - १ चे कनिष्ठ वनाधिकारी जरी असले तरी त्यांची कामे महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी आणि पोलीस सेवेतील उप अधीक्षक यांच्यापेक्षा अनेक स्वरुपात जास्तीची आहेत.

सहाय्यक वनसंरक्षक यांचे वेतन निश्चित करण्याबाबत त्यांची उपरोक्त जबाबदारी व कामे, सहवनविषयक कामे उच्च कोटीच्या तांत्रिक स्वरुपाची असल्याने समितीस विनंती करण्यात येते की, सहाय्यक वनसंरक्षक यांचे वेतन महसूल विभागातील उप जिल्हाधिकारी आणि पोलीस विभागातील पोलीस उप अधीक्षक यांच्या वेतनाप्रमाणे निश्चित व्हावे व त्याअनुषंगाने त्यांना वेतन मिळावे. त्या संवर्गांच्या वेतनबँड पीबी-३ मध्ये हे पद समाविष्ट करावे.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** महाराष्ट्र वनसेवा गट-अ हा भारतीय वनसेवेकरीता सेवाप्रवेश संवर्ग आहे. पाचव्या वेतन आयोगापासून वनसेवेतील अधिकाऱ्यांना भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची समकक्षता प्रदान करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर राज्य शासन सेवेतील सेवाप्रवेश संवर्गातील अधिकाऱ्यांना सदर समकक्षतेनुसार समान वेतनश्रेणी देणे न्यायोचित आहे.

सदर मुद्यांचा विचार करता सहाय्यक वनसंरक्षक या संवर्गाला पोलीस विभागातील पोलीस उप अधीक्षक पदाची समकक्षता देवून वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी.

३) वनक्षेत्रपाल

संघटनेचे अभिप्राय :- महाराष्ट्र राज्यातील वनक्षेत्रपाल हे वन सेवेतील तालुकास्तरावरील गट-ब मधील राजपत्रित पद असून सदर पदास स्वतंत्र अधिकारीता आहे. वन विभागातील वनक्षेत्रपाल या पदासारखेच गृह विभागातील पोलीस निरीक्षक हे तालुकास्तरावरील अधिकारी आहेत. पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार भारतीय वन सेवेतील पदे तसेच भारतीय पोलीस सेवेतील पदांमध्ये वेतन आयोगाने राज्य, प्रादेशिक तसेच जिल्हास्तरावर समानता प्रदान केली आहे. त्याच धर्तीवर तालुकास्तरावरील वन विभागातील वनक्षेत्रपाल पदास पोलीस निरीक्षक पदाच्या समकक्ष दर्जा प्रदान करणे गरजेचे आहे. सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचनेत वनक्षेत्रपाल व पोलीस निरीक्षक या पदांना वेतनबँड पीबी-२ : रु. ९३००-३४८०० मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक पदास मंजूर करण्यात आलेले ग्रेड वेतन रु. ५००० वनक्षेत्रपाल पदासही लागू करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वन विभागातील वनक्षेत्रपाल व गृह विभागातील पोलीस निरीक्षक या तालुकास्तरावरील दोन्ही पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समतुल्य आहेत. गृह विभागातील पोलीस निरीक्षक व वन विभागातील वनक्षेत्रपाल यांना सुधारित वेतनसंरचनेत समान वेतनबँड मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक पदास मंजूर करण्यात आलेले ग्रेड वेतन रु.५००० हे वनक्षेत्रपाल पदासही मंजूर करण्यात यावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) विभागीय वन अधिकारी

२) सहाय्यक वनसंरक्षक

३) वनक्षेत्रपाल

भारतीय वन सेवेतील संवर्गांना ज्याप्रमाणे भारतीय पोलीस सेवेतील संवर्गांशी समकक्षता प्रदान केली आहे, त्या धर्तीवर राज्य वन सेवेतील वरील संवर्गांना राज्य पोलीस सेवेतील अनुक्रमे पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक आणि पोलीस निरीक्षक संवर्गांप्रमाणे सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे. वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गांना पोलीस सेवेतील संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे पोलीस सेवेतील संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करणे समर्थनीय ठरत नाही. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. सबब, या संवर्गांच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

तसेच विभागीय वन अधिकारी या संवर्गातील पदांना निवडश्रेणी मंजूर करण्याची बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

४) वनपाल

संघटनेचे अभिप्राय :- संचालक, पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सह सचिव, केंद्रीय सहावा वेतन आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना दि.२५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय वन विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या सुधारणेसंदर्भातील शिफारशी संपूर्ण देशात समान असाव्यात असे कळविले आहे. अनेक समित्यांनी केलेल्या शिफारशी व वन विभागाने मान्य केल्याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक व नायब तहसिलदार पदांच्या नवीन वेतनसंरचनेतील वेतनबँड पीबी-२:रु.९३०० -३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४२०० दि. १.१.२००६ पासून मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वनपालांना नवीन वेतनसंरचनेत वेतनबँड पीबी-१:रु.५२००-२०२०० मंजूर करण्यात आला असला तरी, असुधारित वेतनश्रेणीतील वेतनावर वेतननिश्चिती होणार असल्याने महाराष्ट्र राज्यातील वनपालांच्या व केंद्रशासित प्रदेशातील वनपालांच्या वेतनात लक्षणीय तफावत असणार आहे. केंद्रशासित प्रदेशातील वनपाल व महाराष्ट्र राज्यातील वनपाल समकक्ष आहेत. त्यामुळे केंद्रशासित प्रदेशातील वनपाल पदाच्या असुधारित वेतनश्रेणीतील वेतनानुसार

महाराष्ट्र राज्यातील वनपाल पदाच्या वेतनात सुधारणा करुन तद्नंतर नवीन वेतनसंरचनेतील वेतनबँड रू.५२००-२०२०० आणि रू.२८०० ग्रेड वेतन वनपाल पदास मंजूर करण्यात यावे.

५) वनरक्षक

संघटनेचे अभिप्राय :- संचालक, पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सहसचिव, केंद्रीय सहावा वेतन आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना दि.२५.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्रिय वन विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेसंदर्भातील शिफारशी संपूर्ण देशात समान असाव्यात असे कळविले आहे. त्यानुषंगाने अनेक समित्यांनी केलेल्या शिफारशी व वन विभागाने मान्य केल्याप्रमाणे तलाठी, पोलीस हवालदार पदांचे नवीन वेतनसंरचनेतील वेतनबँड पीबी-१:रु.५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रु.२४०० दि.१.१.२००६ पासून मंजूर करण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वनरक्षक पदासाठी नवीन वेतनसंरचनेत वेतनबँड पीबी-१: रू.५२००-२०२०० मंजूर करण्यात आला असला तरी, असुधारित वेतनश्रेणीतील वेतनावर वेतननिश्चिती होणार असल्याने महाराष्ट्र राज्यातील वनरक्षकांच्या व केंद्रशासित प्रदेशातील वनरक्षकांच्या वेतनात लक्षणीय तफावत असणार आहे. केंद्रशासित प्रदेशातील वनरक्षक व वनपाल आणि महाराष्ट्र राज्यातील वनरक्षक व वनपाल ही समकक्ष पदे आहेत. त्यामुळे केंद्रशासित प्रदेशातील वनरक्षक पदाच्या असुधारित वेतनश्रेणीतील वेतनानुसार महाराष्ट्र राज्यातील वनरक्षक पदाच्या वेतनात सुधारणा करुन तद्नंतर नवीन वेतनसंरचनेतील वेतनबँड रू.५२००-२०२०० आणि रू.२००० ग्रेड वेतन वनरक्षक पदास मंजूर करण्यात यावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

४) वनपाल

५) वनरक्षक

केंद्रशासित प्रदेशातील संवर्गांच्या असुधारित वेतनश्रेणीतील वेतनानुसार वरील संवर्गांच्या वेतनात सुधारणा करुन त्यानुसार सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी केली आहे. पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्यांमध्ये सुधारणा करण्याची बाब समितीच्या कार्यकक्षेत नाही.

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गांना केंद्रशासित प्रदेशातील वन सेवेतील संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. त्यामुळे त्या संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करणे समर्थनीय ठरत नाही. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गांच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

६) मुख्य लेखापाल :-

संघटनेचे अभिप्राय :- वन विभागातील मुख्य लेखापाल पदास इतर विभागांतील मुख्य लेखापाल पदास विहित केलेली सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतील इतर समकक्ष पदांवरील कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या वन विभागातील मुख्य लेखापाल पदाच्या कर्तव्यांशी समतुल्य आहेत. मुख्य लेखापाल या पदासाठी इतर समकक्ष विभागांमध्ये असलेली रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत मागणी करूनही त्या पदास ही वेतनश्रेणी मंजूर न करता रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. वन विभागातील मुख्य लेखापाल पदास सुधारित वेतनसंरचना मंजूर करताना सापत्न वागणूक दिली आहे. वन विभागातील मुख्य लेखापाल संवर्गावर झालेला सदर अन्याय दूर करून वेतनबँड रू.९३००-३४८०० आणि रु. ४३०० ग्रेड वेतन मंजूर करावे.

७) लेखापाल

संघटनेचे अभिप्राय :- वन विभागातील लेखापाल पदास इतर विभागांतील लेखापाल पदास विहित केलेली सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतील इतर समकक्ष पदांवरील कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या वन विभागातील लेखापाल पदाच्या कर्तव्यांशी समतुल्य आहेत. लेखापाल या पदास इतर समकक्ष विभागांमध्ये असलेली रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत मागणी करूनही ही वेतनश्रेणी मंजूर न करता त्या पदास रू.४५००-७००० ही वेतनश्रेणी

मंजूर करण्यात आली आहे. वन विभागातील लेखापाल पदास सुधारित वेतनसंरचना मंजूर करताना सापत्न वागणूक दिली आहे. वन विभागातील लेखापाल संवर्गावर झालेला सदर अन्याय दूर करून वेतनबँड रु.९३००-३४८०० आणि रु. ४२०० ग्रेड वेतन मंजूर करावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

६) मुख्य लेखापाल

७) लेखापाल

लेखा संवर्ग हा मूलतः वित्त विभागाच्या लेखा व कोषागारे संचालनालयाअंतर्गत कार्यरत आहे. असे असले तरी लेखा संवर्गातील पदे विविध प्रशासकीय विभागांमध्येदेखील आहेत. वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) वित्त विभागाव्यतिरिक्त इतर विभागांतील जी पदे महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संवर्गाशी समकक्ष ठरविली आहेत, त्या पदांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी / वेतनसंरचना अनुज्ञेय आहे. किंबहुना बहुतांश विभागांमध्ये लेखा सेवेतील पदांवर महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते.

वन विभागामध्ये प्रमुख लेखापाल (असुधारित वेतनश्रेणी रु.५५००-९०००), मुख्य लेखापाल (असुधारित वेतनश्रेणी रु.५०००-८०००), उप लेखापाल (असुधारित वेतनश्रेणी रु.५०००-८०००) आणि लेखापाल (असुधारित वेतनश्रेणी रु.४५००-७०००) हे संवर्ग आहेत.

मुख्य लेखापाल वगळता इतर तीन संवर्ग चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी विभागाच्या आस्थापनेवर होते. त्यातील प्रमुख लेखापाल व उप लेखापाल या संवर्गांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संवर्गाप्रमाणे अनुक्रमे रु.१६४०-२९०० व रु.१४००-२६०० या वेतनश्रेण्यांची शिफारस वेतन समानीकरण समितीने केली होती आणि त्यानुसार या संवर्गांना त्या वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. या वेतनश्रेण्या विचारात घेऊन पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेण्या / वेतनसंरचना मंजूर केली आहे.

वेतन समानीकरण समितीने लेखापाल संवर्गास महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणीची शिफारस न करता असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष रु.१२००-२०४० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती व ती मंजूर केली होती. तद्नंतर राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ ने सदर संवर्गाची कर्तव्ये विचारात घेऊन या संवर्गास रु.१४००-२३०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस (अहवाल-भाग-१, प्रस्ताव क्र.३०) केली होती व त्यानुसार या संवर्गास रु.१४००-२३०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. या संवर्गातील नियुक्तीसाठी महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गासाठी अनिवार्य असलेली परीक्षा उत्तीर्ण होण्याची आवश्यकता नसल्यामुळे या संवर्गास महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणीची शिफारस केली नव्हती.

थोडक्यात, वन विभागातील लेखापाल संवर्ग महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गाशी समकक्ष नाही. या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गाप्रमाणे नाहीत. तसेच या संवर्गाचा पदोन्नतीचा मुख्य लेखापाल हा संवर्गदेखील महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गाशी समकक्ष नाही.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गांची उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही. वरील संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गांच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत.

## ३.१६ - ग्रामविकास व जलसंधारण विभाग

**प्रस्तावाचा सारांश**

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रूपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रूपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बँड | ग्रेड वेतन | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| १ | गट विकास अधिकारी (निम्नश्रेणी), गट-ब | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | १५६००-३९१०० | ५,००० |
| २ | विस्तार अधिकारी ( पंचायत व समाजकल्याण ) | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | ९३००-३४८०० | ४,४०० |
| ३ | ग्रामविकास अधिकारी | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २,८०० | ९३००-३४८०० | ४,२०० |
| ४ | ग्रामसेवक | १) ४०००-६०००<br>२) ४५००-७००० (७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | ५२००-२०२००<br>५२००-२०२०० (७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | २,४००<br>२८०० | ५२००-२०२०० | २,८०० |
| ५ | विस्तार अधिकारी (शिक्षण), श्रेणी-२ | ६०००-१०००० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| ६ | विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ | ५५००-९००० (अधिक विशेष वेतन रू.३००) | ९३००-३४८०० | ४,३०० | ९३००-३४८०० | ४,५०० |
| ७ | मुख्याध्यापक / केंद्रप्रमुख | १) ५५००- ९००० (अधिक विशेष वेतन रू.२५०)<br>२)६५००- १०५०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)७५००-१२००० (२० % पदांसाठी निवडश्रेणी) | १) ९३००- ३४८००<br>२)९३००- ३४८०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००- ३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४,४००<br>४,५००<br>४,९०० | १)९३००- ३४८००<br>२)९३००- ३४८०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००- ३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४,६००<br>४,८००<br>५,४०० |
| ८ | प्राथमिक शिक्षक ( पदवीधर ) | १) ५५००- ९०००<br>२)६५००- १०५०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)७५००-१२००० (२० % पदांसाठी निवडश्रेणी) | १) ९३००- ३४८००<br>२) ९३००- ३४८०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३) ९३००- ३४८०० (२० % पदांसाठी निवडश्रेणी) | ४,३००<br>४,४००<br>४,८०० | १)९३००- ३४८००<br>२)९३००- ३४८०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००- ३४८०० (२० % पदांसाठी निवडश्रेणी) | ४,६००<br>४,८००<br>५,४०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | प्राथमिक शिक्षक | १) ४५००- ७०००<br>२)५०००- ८०००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३) ५५००- ९०००<br>(२० % पदांसाठी निवडश्रेणी) | १) ५२००- २०२००<br>२)९३००- ३४८००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००- ३४८००<br>(२० % पदांसाठी निवडश्रेणी) | २,८००<br>४,२००<br><br>४,३०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००- ३४८००<br>(२० % पदांसाठी निवडश्रेणी) | ४,२००<br>४,६००<br><br>४,८०० |
| १० | सहाय्यक लेखाधिकारी | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४,३०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| ११ | उप लेखापाल | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| १२ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २,४०० | ५२००-२०२०० | २,८०० |
| १३ | मुख्य आरेखक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ४,८०० |
| १४ | आरेखक | १) ४५००- ७०००<br>२) ५५००- ९०००<br>(४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | १) ५२००- २०२००<br>२) ९३००- ३४८००<br>(४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | २,८००<br>४,३०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| १५ | कनिष्ठ आरेखक | १) ४०००-६०००<br>२) ५०००- ८०००<br>(५ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | १) ५२००- २०२००<br>२)९३००-३४८००<br>(५ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | २,४००<br>४,२०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| १६ | अनुरेखक | १) ३२०० - ४९००<br>२) ४०००- ६०००<br>(७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | १) ५२००- २०२००<br>२) ५२००- २०२००<br>(७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) | २,०००<br>२,४०० | ५२००- २०२०० | २,४०० |
| १७ | आरोग्य पर्यवेक्षक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | ९३००-३४८०० | ४,३०० |
| १८ | औषधनिर्माता (फार्मासिस्ट) | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २,८०० | ९३००-३४८०० | ४,२०० |
| १९ | महिला आरोग्य अभ्यागता (LHV) | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २,८०० | ९३००-३४८०० | ४,२०० |
| २० | कुष्ठरोग तंत्रज्ञ | ४०००-६०००<br>(अधिक विशेष वेतन रु.२००) | ५२००-२०२०० | २,४०० | ५२००-२०२०० | २,८०० |
| २१ | आरोग्य सहाय्यक | ४०००-६०००<br>(अधिक विशेष वेतन रु.२००) | ५२००-२०२०० | २,५०० | ५२००-२०२०० | २,८०० |
| २२ | कक्ष अधिकारी | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४,३०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| २३ | अधीक्षक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | ९३००-३४८०० | ४,३०० |
| २४ | वरिष्ठ सहाय्यक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २,४०० | ५२००-२०२०० | २,८०० |
| २५ | कनिष्ठ सहाय्यक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १,९०० | ५२००-२०२०० | २,४०० |

१) गट विकास अधिकारी (निम्नश्रेणी), गट-ब

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ग्रामविकास व जलसंधारण विभागात गटविकास अधिकारी (निम्नश्रेणी), गट-ब हे पद तहसिलदार या तालुकास्तरावरील पदाशी समकक्ष पद आहे. महाराष्ट्र विकास

सेवेची निर्मिती सन १९७३ मध्ये झाली आहे. सन १९७३ पूर्वी तहसिलदार व गटविकास अधिकारी ही दोन्ही पदे महसुली सेवेतील अधिकाऱ्यांमधून भरली जात असत. महाराष्ट्र विकास सेवेची निर्मिती झाल्यानंतर तिसऱ्या आणि चौथ्या वेतन आयोगात गट विकास अधिकारी (निम्न श्रेणी) व तहसिलदार या दोन्ही पदांची वेतनश्रेणी समकक्ष होती. मात्र पाचव्या वेतन आयोगानंतर त्यामध्ये तफावत पडली आहे.

तालुका स्तरावरील गटविकास अधिकारी (निम्न श्रेणी) यांच्या समकक्ष उप अभियंता, वैद्यकीय अधिकारी, पशुधन विकास अधिकारी व शिक्षण अधिकारी (गट-ब) ही पदे असून, या पदांना वेतनबँड पीबी:२ अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. मात्र गट विकास अधिकारी (निम्न श्रेणी) या पदास रू.४४०० इतके ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे.

गट विकास अधिकारी (निम्न श्रेणी), गट-ब या पदास व त्यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली जिल्हा परिषद सेवेत कार्यरत असलेल्या शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता, श्रेणी-२, विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (आरोग्य) व कृषि अधिकारी या पदांना वेतनबँड पीबी:२ अधिक रू.४४०० ग्रेड वेतन ही समान वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

गट विकास अधिकारी (निम्न श्रेणी), गट-ब या पदावर जिल्हा सेवेतील कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदांमधून पदोन्नतीने नियुक्ती दिली जाते. कृषि अधिकारी आणि विस्तार अधिकारी (शिक्षण) या दोन्ही पदांची वेतनसंरचना पदोन्नतीच्या पदाएवढीच आहे. या दोन्ही पदांवरून पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वेतनसंरचनेत बदल होत नाही.

वरील कारणांस्तव गट विकास अधिकारी (निम्न श्रेणी), गट-ब या पदाच्या वेतनसंरचनेत बदल होणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गाला राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गाला असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

या संवर्गाला पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही. तथापि, पदोन्नतीच्या व निम्न पदास एकच वेतनसंरचना मंजूर झाली आहे असा मुद्दा प्रशासकीय विभागाने उपस्थित केला आहे. अशा प्रकरणी पदोन्नतीच्या पदास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यासंदर्भात राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार गट विकास अधिकारी संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याबाबत तपासणी करून प्रशासकीय विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने कार्यवाही करावी.

२) विस्तार अधिकारी ( पंचायत व समाजकल्याण )

संघटनेचे अभिप्राय :- महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.एपीटी-१०९०/सीआर ८१५-१३ मंत्रालय, मुंबई दि.९ जुलै, १९९१ च्या आदेशान्वये जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (कार्यकारी आणि ग्रामविस्तार) श्रेणी-२ मधील विस्तार अधिकारी (वर्ग-३) विस्तार अधिकारी (समाजकल्याण) या दोन संवर्गाचे एकत्रिकरण करून त्या दोन पदांचे नामविधान विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) असे करण्यात आले. पूर्वी दोन्ही पदे स्वतंत्र होती. कामाचे स्वरूप वेगळे होते. दोन्ही संवर्गाचे एकत्रिकरण करून दोन्ही पदांची जबाबदारी व कामे विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) या संवर्गाकडून या आदेशांच्या दिनांकापासून करण्यात येत आहेत.

पंचायत समितीस्तरावर जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (कार्यकारी व ग्रामविस्तार) श्रेणी-२ मधील विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) आणि जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (शिक्षण) श्रेणी-२ ही पदे समकक्ष आहेत.

विस्तार अधिकारी (वर्ग-३) श्रेणी-२ यांना पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.५०००-८००० अशी वेतनश्रेणी दिलेली असताना व त्यांच्या कामात कोणतीही वाढ झालेली नसताना दि.१८ सप्टेंबर, २००७ रोजीच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या सुधारित शासन निर्णयानुसार पाचव्या वेतन आयोगात सुधारित वेतनश्रेणी रु.६०००-१७५-१०००० व सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४४०० अशी वरची वेतनश्रेणी दिली आहे.

पंचायत समिती स्तरावर समकक्ष विस्तार अधिकारी यांचे कामात कोणतीही वाढ झालेली नसताना सहाव्या वेतन आयोगामध्ये त्यांना खालील वेतनश्रेणी दिली आहे.

१) विस्तार अधिकारी (पशुसंवर्धन) - वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४३००
२) विस्तार अधिकारी (आरोग्य ) - वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४३००
३) सहा. बालविकास प्रकल्प अधिकारी - वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४३००
४) कनिष्ठ अभियंता - वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४३००

विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) या संवर्गावर पंचायत व समाजकल्याण अशा दोन विभागांची व दोन पदांची कामाची जबाबदारी सोपवूनदेखील सन्मानजनक वेतनश्रेणी दिलेली नाही. म्हणून विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) या संवर्गास दोन विभागांची व दोन पदांची जबाबदारी दिल्याने सहाव्या वेतन आयोगामध्ये ग्रेड वेतन रु. ४४०० देण्यात यावे व वेतनश्रेणीचे बाबतीत संवर्गावर झालेला अन्याय दूर करुन न्याय देण्याची विनंती आहे.

**प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-** विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) यांच्या कामाचे स्वरुप पाहता इतर समकक्ष विस्तार अधिकाऱ्यांपेक्षा कामाचा बोजा जास्त आहे. त्यानुसार संघटनेने मागणी केलेले ग्रेड वेतन रु.४४०० त्यांना देणे न्यायोचित आहे. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. एपीटी-१०९०/सीआर ८१५-१३ मंत्रालय, मुंबई दि. ९ जुलै, १९९१ च्या आदेशान्वये जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) (कार्यकारी आणि ग्रामविस्तार) श्रेणी-२ मधील विस्तार अधिकारी पंचायत आणि जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) विस्तार अधिकारी (समाजकल्याण) या दोन संवर्गाचे एकत्रिकरण करुन त्या पदांचे नामाभिधान विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) असे करण्यात आले. पूर्वी दोन्ही पदे स्वतंत्र होती. कामाचे स्वरुप वेगळे होते.

तसेच सेवाप्रवेश नियमानुसार ग्रामसेवक व ग्राम विस्तार अधिकारी यांच्या पदोन्नतीचे पद आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

**<u>समितीची शिफारस</u> :-**

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) विस्तार अधिकारी (समाजकल्याण) या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष रु.१४००-२३०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती तर विस्तार अधिकारी (पंचायत) या संवर्गाच्या जबाबदाऱ्या विचारात घेऊन रु.१४००-२३०० या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गांना वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या होत्या. या संवर्गास जिल्हा परिषदेकडील अन्य विस्तार अधिकारी संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही.

पाचव्या वेतन आयोगात या संवर्गास रु.१४००-२३०० या वेतनश्रेणीशी समकक्ष रु.४५००-७००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. परंतु ग्रामविकास अधिकारी संवर्गातून विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) व विस्तार अधिकारी (कृषि) या दोन संवर्गात पदोन्नती देण्यात येत असल्याने आणि विस्तार अधिकारी (कृषि) या संवर्गाची वेतनश्रेणी रु.५०००-८००० ही असल्याने पदोन्नत सेवाज्येष्ठ व कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत तफावत निर्माण होऊ नये म्हणून विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) संवर्गाच्या वेतनश्रेणीत पाचव्या वेतन आयोगात रु.४५००-७००० ऐवजी रु.५०००-८००० अशी सुधारणा केली आहे.

विस्तार अधिकारी (पंचायत) आणि विस्तार अधिकारी (समाजकल्याण) या दोन संवर्गाचे एकत्रिकरण करून विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) संवर्ग निर्माण करण्याचा प्रशासकीय निर्णय घेण्यात आला आहे. कोणत्याही नवीन संवर्गाची वेतनश्रेणी विहित करताना त्या

संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच कार्यभाराची व्याप्ती या बाबी विचारात घेतल्या जातात. त्यानुसार या संवर्गास तत्कालीन रू.१४००-२३०० ही वेतनश्रेणी विहित करताना या बाबींचा निश्चितपणे विचार झालेला असेल. तसेच वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे निम्न ग्रामविकास अधिकारी संवर्गातून पदोन्नत सेवाज्येष्ठ व कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत तफावत निर्माण होऊ नये म्हणून विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) संवर्गाच्या पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत रू.४५००-७००० ऐवजी रू.५०००-८००० अशी सुधारणा केली आहे. म्हणजेच विस्तार अधिकारी (पंचायत व समाजकल्याण) या संवर्गाशी प्रत्यक्ष निगडीत नसलेल्या कारणामुळे या संवर्गास उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला आहे. या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे, त्यामध्ये त्रुटी नाही.

३) ग्रामविकास अधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- ग्राम विकास अधिकारी या संवर्गाची निर्मिती दि.१ एप्रिल, १९७४ रोजी झाली आहे. सदर पद तांत्रिक दर्जाचे असून सदर पदाला चौथ्या वेतन आयोगापर्यंत स्वतंत्र वेतनश्रेणी होती. ग्राम विकास अधिकारी हे पद पदोन्नतीचे पद असल्याने सदर पदाला सहाव्या वेतन आयोगामध्ये ग्रेड वेतन रू.४२०० देण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ग्राम विकास अधिकारी हे सुद्धा ग्रामसेवकाप्रमाणेच विविध योजनांची कामे करीत असतात. परंतु ग्राम विकास अधिकारी हे पद ग्रामसेवकामधून पदोन्नतीने भरण्यात येत असल्याने व त्यांची नियुक्ती ३००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीत करण्यात येत असल्याने सहाव्या वेतन आयोगात त्यांना ग्रेड वेतन रू.२८०० ऐवजी वेतनबँड रू.९३००-३४८०० अधिक रू.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्याबाबत प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर मांडण्यास हरकत नसावी.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गाच्या जबाबदाऱ्या विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. या संवर्गाची तिसऱ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रू.३३५-६८० ही होती. या वेतनश्रेणीस चौथ्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेणी रू.१२००-२०४० ही असूनही, या संवर्गास समितीने शिफारस केलेली समकक्षतेपेक्षा तुलनेने उच्च रू.१३२०-२०४० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. या वेतनश्रेणीशी समकक्ष रू.४०००-६००० अधिक रू.२०० विशेष वेतन ही वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगात मंजूर केली होती. तद्नंतर मध्यावधी सुधारणेद्वारा शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.डिएसआर-२००८/प्र.क्र.८०/आस्था-५ दि.२३ सप्टेंबर, २००८ अन्वये पूर्वलक्षी प्रभावाने दि.१ जानेवारी, १९९६ पासून ग्रामसेवक संवर्गास ७ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर रू.४५००-७००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. त्यामुळे ग्रामसेवक संवर्गाची वेतनश्रेणी ग्रामविकास अधिकारी या पदोन्नतीच्या संवर्गापेक्षा उच्च झाल्याने ग्रामविकास अधिकारी संवर्गास रू.४५००-७००० अधिक रू.२०० विशेष वेतन ही वेतनश्रेणी याच आदेशांद्वारे मंजूर केली होती.

वरील वस्तुस्थिती पाहता या संवर्गास चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगात श्रेणीवाढीचा लाभ मिळालेला आहे.

ग्रामविकास अधिकारी या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.४२०० ग्रेड वेतन मंजूर करण्याच्या मागणीसंदर्भात नमूद करण्यात येते की, या वेतनसंरचनेशी समकक्ष पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रू.५०००-८००० ही आहे. राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ च्या शिफारशीनुसार (अहवाल भाग-२, परिच्छेद-४.११) थेट नियुक्तीसाठी विज्ञान शाखेतील पदवी किंवा अभियांत्रिकी पदविका ही किमान शैक्षणिक अर्हता अत्यावश्यक असणाऱ्या तंत्रज्ञ अथवा अभियांत्रिकी संवर्गांना रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात येते. तसेच पर्यवेक्षकीय जबाबदाऱ्या असणाऱ्या संवर्गांना सर्वसाधारणपणे ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्याचे विविध विभागांमध्ये आढळून येते.

ग्रामविकास अधिकारी हा ग्रामसेवक संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग असला तरी ग्रामसेवक संवर्गाचा पर्यवेक्षकीय संवर्ग नाही आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे स्वरूप ग्रामसेवकांप्रमाणेच आहे. तसेच वर नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा निकषही या संवर्गास लागू होत नाही. त्यामुळे रू.४२०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी अप्रस्तुत ठरते.

वर नमूद केल्याप्रमाणे पाचव्या वेतन आयोगामध्ये ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक या संवर्गांच्या वेतनश्रेण्या एकवटल्यामुळे सहाव्या वेतन आयोगाच्या समकक्ष सुधारित वेतनसंरचनेमध्येही अशीच परिस्थिती निर्माण होणे नैसर्गिक आहे. पदोन्नतीच्या आणि निम्न पदाच्या वेतनसंरचनेमध्ये फरक ठेवण्यासाठी पदोन्नतीच्या पदास समुचित अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार ग्रामविकास अधिकारी या संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची कार्यवाही प्रशासकीय विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने करावी.

४) ग्रामसेवक

संघटनेचे अभिप्राय :- सहाव्या वेतन आयोगामध्ये ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी यांचे वेतन सारखेच आहे. त्यामुळे ग्रामसेवक या पदास सहाव्या वेतन आयोगात देण्यात आलेले ग्रेड वेतन रू.२४०० च्या ऐवजी रू. २८०० ग्रेड वेतन देण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- ग्रामसेवकांना त्यांच्या ग्रामपंचायतीच्या सचिव पदाची जबाबदारी सांभाळून राज्य शासनाने सोपेविलेली खालील कामे करावी लागतात.

१) यशवंत ग्राम समृध्दी योजना २) महाराष्ट्र ग्रामीण योजना ३) संपूर्ण ग्रामीण योजना ४) भारत निर्माण योजना ५) इंदिरा आवास योजना ६) राजीव गांधी योजना ७) संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम ८) हरियाली योजना ९) महात्मा जलभूमी योजना १०) जलस्वराज्य योजना ११) जन्म-मृत्यु नोंदणी १२) विवाह नोंदणी १३) शाळेचे बांधकाम १४) कृषि व पशुसंवर्धन विभागाच्या योजना १५) पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना

वर नमूद केलेल्या विविध योजनांची कामे त्यांना करावी लागत असल्यामुळे सहाव्या वेतन आयोगात त्यांना देण्यात आलेल्या ग्रेड वेतन रू.२४०० च्या ऐवजी रू.२८०० ग्रेड वेतन देण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर मांडण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

वेतन समानीकरण समितीने ग्रामसेवक संवर्गाची एस.एस.सी उत्तीर्ण अधिक व्यावसायिक अभ्यासक्रम ही शैक्षणिक अर्हता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ. बाबी विचारात घेऊन या संवर्गास सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. ग्रामसेवक संवर्गाची तिसऱ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रू.२९०-५४० ही होती. या वेतनश्रेणीस चौथ्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेणी रू.९७५-१६६० ही असूनही, या संवर्गास समितीने शिफारस केलेली समकक्षतेपेक्षा उच्च रू.१२००-१८०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. या वेतनश्रेणीशी समकक्ष रू.४०००-६००० ही वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगात मंजूर केली होती. तद्नंतर मध्यावधी सुधारणेद्वारा शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.डिएसआर-२००८/प्र.क्र.८०/आस्था-५ दि.२३ सप्टेंबर, २००८ अन्वये पूर्वलक्षी प्रभावाने दि.१ जानेवारी, १९९६ पासून या संवर्गास ७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर रू.४५००-७००० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील द्विस्तर वेतनश्रेणीशी समकक्ष १) वेतनबँड रू.५२००-२०२०० अधिक रू.२४०० ग्रेड वेतन २) वेतनबँड रू. ५२००-२०२०० अधिक रू.२८०० ग्रेड वेतन (७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर) या वेतनसंरचनेऐवजी सरसकट एकच वेतनबँड रू. ५२००-२०२०० अधिक रू.२८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी वरील परिच्छेदातील पार्श्वभूमीवर समर्थनीय नाही.

५) विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२

संघटनेचे अभिप्राय :- जिल्हा परिषदेतील शिक्षण विस्तार अधिकारी, सहाय्यक शिक्षण उप निरीक्षक व तत्सम पदे ही मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांचे संनियंत्रण करतात व पदोन्नतीची पदे आहेत. म्हणून सहाव्या वेतन आयोगात श्रेणी-२ पदावर पदोन्नत होणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकारी व तत्सम पदांना वेतनबँड रु.९३००-३४८०० मध्ये रु.४४०० ऐवजी रु.४६०० ग्रेड वेतन मंजूर करुन पदोन्नतीच्या पदास न्याय द्यावा.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- विस्तार अधिकारी श्रेणी-२ या पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येते. म्हणून श्रेणी-३ या संवर्गाच्या वेतनश्रेणीत वाढ केल्यास त्यांच्यापेक्षा वरिष्ठ श्रेणी पदोन्नतीच्या पदास मिळणे आवश्यक आहे. म्हणून संघटनेच्या मागणीचा विचार करण्यात यावा.

६) विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३

संघटनेचे अभिप्राय :- पाचव्या वेतन आयोगात विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ या पदास वेतनश्रेणी रु.५५००-९००० अधिक रु.३०० विशेष वेतन देऊन न्याय द्यायचा प्रयत्न केला आहे. जिल्हा परिषदेतील शिक्षण विस्तार अधिकारी, सहाय्यक शिक्षण उप निरीक्षक व तत्सम पदे ही मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांचे संनियंत्रण करतात व पदोन्नतीची पदे आहेत. केंद्रप्रमुखांपेक्षा वरिष्ठ पद असल्याने सहाव्या वेतन आयोगात या पदांना वेतनबँड रु.९३००-३४८०० मध्ये रु.४३०० ऐवजी रु.४५०० ग्रेड वेतन मंजूर करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सेवाप्रवेश नियमांनुसार शिक्षकीय संवर्गातून विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ या पदावर पदोन्नती दिली जाते. म्हणून शिक्षकीय संवर्गातील केंद्रप्रमुख / मुख्याध्यापक यांच्यापेक्षा वरिष्ठ वेतनसंरचना देण्याची मागणी केली आहे. प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात यावा.

<u>समितीची शिफारस</u> :-

५) विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२

६) विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३

विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ हा संवर्ग राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील विस्तार अधिकारी या संवर्गाशी समकक्ष आहे. या संवर्गास शालेय शिक्षण विभागाकडील महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-क (प्रशासन शाखा) मधील शिक्षण विस्तार अधिकारी संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ संवर्गास रु.४५०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी केली आहे. तथापि, या संवर्गाच्या पदोन्नतीच्या विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ या संवर्गास रु.४४०० ग्रेड वेतन मंजूर असून त्यात सुधारणा सुचविण्यात आलेली नाही. त्यामुळे विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ संवर्गास पदोन्नतीच्या पदाच्या ग्रेड वेतनापेक्षा जास्त ग्रेड वेतन मंजूर करणे उचित होणार नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

तथापि, विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ (वेतनबँड पीबी-२: रु. ९३०० - ३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन) हा संवर्ग मुख्याध्यापक संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग आहे. मुख्याध्यापक संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु. ९३०० - ३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन (मूळ वेतनसंरचना) मंजूर केले आहे ही वस्तुस्थिती असली तरी शिक्षकीय संवर्गाच्या वेतनश्रेण्या / वेतनसंरचना ह्या शैक्षणिक जबाबदाऱ्या, शिक्षणाचा दर्जा / गुणवत्ता इ. बाबी विचारात घेऊन विहित केल्या जातात. विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ हा प्रशासकीय संवर्ग आहे. प्रशासकीय पदे ही शिक्षकीय संवर्गाची नियंत्रक पदे असली तरी या पदांच्या वेतनश्रेणी निश्चितीमध्ये शिक्षकीय पदांच्या वेतनश्रेणीचा प्रभाव असू नये, प्रशासकीय पदांच्या वेतनश्रेण्या गुणवत्तेनुसारच विहित कराव्यात असे मत वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) त्यांच्या अहवालातील परिच्छेद ३.२९ मध्ये व्यक्त केले आहे.

आम्हीदेखील या अभिप्रायांशी सहमत आहोत. कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेता या संवर्गास मंजूर केलेली वेतनसंरचना योग्य आहे.

या संवर्गाच्या ग्रेड वेतनामध्ये वाढ केल्यास त्याचा परिणाम विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ या संवर्गाच्या ग्रेड वेतनावर होतो आणि हा संवर्ग राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षण विस्तार अधिकारी या संवर्गाशी समकक्ष असल्यामुळे त्याचा परिणाम महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-क (प्रशासन शाखा) मधील शिक्षण विस्तार अधिकारी संवर्गासह इतर १३ तत्सम संवर्गाच्या ग्रेड वेतनावर होतो. अशा परिस्थितीत विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ संवर्गाच्या ग्रेड वेतनात बदल करणे योग्य ठरत नाही.

मुख्याध्यापक संवर्गातून विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ संवर्गात पदोन्नत झाल्यानंतर अनुज्ञेय वेतनसंरचनेचा प्रश्न उपस्थित होऊ शकतो याची समितीस जाणीव आहे. अशा प्रकरणी पदोन्नत कर्मचाऱ्याचे मुख्याध्यापक संवर्गातील ग्रेड वेतन संरक्षित करण्यात अडचण उद्‌भवू नये.

७) मुख्याध्यापक / केंद्रप्रमुख

संघटनेचे अभिप्राय :- १) महाराष्ट्र राज्यात ४८६० केंद्रप्रमुख कार्यरत आहेत. त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची व्याप्ती मोठी आहे. केंद्रप्रमुख मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षक यांना एकच वेतनश्रेणी देऊन त्यांच्यावर अन्याय केलेला आहे. हे गेले ३० ते ३५ वर्षे शासनाने कधीच लक्षात घेतलेले नाही.

२) १० ते १८ शाळांचे सनियंत्रण, पर्यवेक्षण व मार्गदर्शन

३) केंद्रातील मुख्य पदवीधर शिक्षक व उपशिक्षक यांची संख्या ४० ते १०० पर्यंत असते.

४) केंद्रातील विद्यार्थी संख्या ७०० ते ४००० पर्यंत असते. वर्गांची संख्या ४० ते ८० पर्यंत असते.

५) विविध माहितीचे संकलन, गुणवत्ता वाढ, प्रशासकीय - शैक्षणिक मूल्यमापन, पुनर्मुल्यांकन, शाळाभेटी, शाळा तपासणी, शालेय रेकॉर्ड तपासणी, शिक्षक प्रशिक्षण, केंद्र संमेलन, १०० पटनोंदणी, उपस्थिती १०० व गळती, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड व त्यांना विविध लाभ मिळवून देणे इ. विविध कामे केंद्रप्रमुख करतात.

६) केंद्रप्रमुखाची शैक्षणिक अर्हता बी.ए.बी.एड / एम.ए.बी.एड. अशी निर्धारित केली आहे.

माध्यमिक शाळेतील उपमुख्याध्यापकांना २० पेक्षा जास्त वर्ग असल्यास पाचव्या वेतन आयोगात वरिष्ठ वेतनश्रेणी (रू.८,०००-१३,०००) व सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३ (रू.१५६०० - ३९१००) अधिक रू.५४०० ग्रेड वेतन दिलेले आहे. मात्र केंद्र प्रमुखांना वेतनबँड पीबी-२ (रू. ९३०० - ३४८००) अधिक रू.४५०० / ४९०० ग्रेड वेतन देऊन शिक्षणाचे पायाभूत व ज्यादा काम करणाऱ्या केंद्र प्रमुखांवर अन्याय केला आहे. केंद्र प्रमुखांना सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रू.९३००-३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. त्याऐवजी रू.४६०० ग्रेड वेतन देण्यात यावे. तसेच सदर पदावर वरिष्ठ वेतनश्रेणी घेणाऱ्या केंद्र प्रमुखास रू.४५०० ग्रेड वेतन देण्यात आलेले आहे. त्याऐवजी रू.४८०० ग्रेड वेतन देण्यात यावे. निवडश्रेणीमध्ये काम करणाऱ्या मुख्याध्यापक / केंद्रप्रमुख यांना सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रू.९३००-३४८०० अधिक रू.४९०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात आली आहे. त्याऐवजी सदर पदासाठी वेतनबँड रू.९३००-३४८०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक यांना लागू केलेल्या वेतनश्रेण्या जिल्हा परिषदेतील शिक्षकांनाही लागू करण्यात येतात. राज्यातील सर्व शिक्षक संघटना केंद्र शासनाप्रमाणेच वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी करीत आहेत. त्यासाठी आंदोलनही चालू आहे. त्यानुसार शिक्षकांची वेतन सुधारणा करण्याची मागणी विचारात घेण्यात यावी.

८) प्राथमिक शिक्षक ( पदवीधर )

संघटनेचे अभिप्राय :- १) महाराष्ट्र राज्यात ४८६० केंद्रप्रमुख कार्यरत आहेत. त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांची व्याप्ती मोठी आहे. केंद्रप्रमुख मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षक यांना एकच वेतनश्रेणी देऊन त्यांच्यावर अन्याय केलेला आहे, हे गेले ३० ते ३५ वर्षे शासनाने कधीच लक्षात घेतलेले नाही.

२) १० ते १८ शाळांचे सनियंत्रण, पर्यवेक्षण व मार्गदर्शन.

३) केंद्रातील मुख्य पदवीधर शिक्षक व उपशिक्षक यांची संख्या ४० ते १०० पर्यंत असते.

४) केंद्रातील विद्यार्थी संख्या ७०० ते ४००० पर्यंत असते. वर्गाची संख्या ४० ते ८० पर्यंत असते.

५) विविध माहितीचे संकलन, गुणवत्ता वाढ, प्रशासकीय - शैक्षणिक मूल्यमापन, पुनर्मुल्यांकन, शाळाभेटी, शाळा तपासणी, शालेय रेकॉर्ड तपासणी, शिक्षक प्रशिक्षण, केंद्र संमेलन, १०० पटनोंदणी, उपस्थिती १०० व गळती, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड व त्यांना विविध लाभ मिळवून देणे इ. विविध कामे केंद्रप्रमुख करतो.

६) केंद्रप्रमुखाची शैक्षणिक अर्हता बी.ए.बी.एड/ एम.ए.बी.एड. अशी निर्धारीत केली आहे. मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षक यांना वेतनबँड पीबी-२ (रु. ९३००-३४८००) अधिक रु.४६०० ग्रेड वेतन व पदोन्नतीची वेतनवाढ देण्यात यावी. १२ वर्षांनंतर वेतनबँड पीबी-२ (रु. ९३००-३४८००) अधिक रु.४८००ग्रेड वेतन व एक वेतनवाढ देण्यात यावी. २४ वर्षांनंतर वेतनबँड पीबी-२ (रु. ९३००-३४८००) अधिक रु.५४०० ग्रेड वेतन व एक वेतनवाढ देण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक यांना लागू केलेल्या वेतनश्रेण्या जिल्हा परिषदेतील शिक्षकांनाही लागू करण्यात येतात. राज्यातील सर्व शिक्षक संघटना केंद्र शासनाप्रमाणेच वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी करीत आहेत. त्यासाठी आंदोलनही चालू आहे. त्यानुसार शिक्षकांची वेतन सुधारणा करण्याची मागणी विचारात घेण्यात यावी.

९) प्राथमिक शिक्षक

संघटनेचे अभिप्राय :- केंद्र शासनाच्या अखत्यारीत काम करीत असलेल्या शिक्षकीय पदांची संख्या व राज्यातील शिक्षकीय पदांची संख्या यांची तुलना करुन उच्चशिक्षित शिक्षकीय पदांना केंद्राप्रमाणे सहावा वेतन आयोग मंजूर केल्यास आर्थिक भार ज्यादा पडेल. तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांमार्फतच शिक्षकांवर पर्यवेक्षण करणाऱ्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांकडून शिक्षकांचे वेतन प्रशासकीय अधिकाऱ्यांपेक्षाही कमी असावे असे सूचित केलेले आहे. वेतन आयोगाने अशा पध्दतीने चुकीचे समर्थन करुन शिक्षकांना सहावा वेतन आयोग जसाच्या तसा लागू केलेला नाही व यामुळे भारताचे भावी नागरिक घडविणाऱ्या शिक्षकांवर जाणीवपूर्वक अन्याय केलेला आहे. मुळातच प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी घटनेने राज्य शासनाकडे सोपविलेली असल्याने शिक्षकांची संख्या केंद्रापेक्षा जास्त असणार आहे. ही बाबही राज्य वेतन सुधारणा समितीने लक्षात घेतलेली नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक यांना लागू केलेल्या वेतनश्रेण्या जिल्हा परिषदेतील शिक्षकांनाही लागू करण्यात येतात. राज्यातील सर्व शिक्षक संघटना केंद्र शासनाप्रमाणेच वेतनसंरचना लागू करण्याची मागणी करीत आहेत. त्यासाठी आंदोलनही चालू आहे. त्यानुसार शिक्षकांची वेतन सुधारणा करण्याची मागणी विचारात घेण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

७) मुख्याध्यापक / केंद्रप्रमुख

८) प्राथमिक शिक्षक ( पदवीधर )

९) प्राथमिक शिक्षक

जिल्हा परिषदेकडील शिक्षकीय संवर्ग हे शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकीय संवर्गाशी समकक्ष आहेत. या संवर्गांना शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकीय संवर्गाप्रमाणे वेतनश्रेण्या मंजूर

करण्यात येतात. सहाव्या वेतन आयोगातदेखील वरील संवर्गांना राज्य शासनाकडील समकक्ष संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर केली आहे.

राज्य शासनाकडील शिक्षकीय पदांना केंद्र शासनाकडील समकक्ष संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील शिक्षकीय संवर्गांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना मंजूरीची शिफारस करणे सयुक्तिक होणार नाही.

१०) सहाय्यक लेखाधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- जिल्हा परिषद व पंचायत समितीचे एकंदरीत अंदाजपत्रक तयार करणे, सर्व योजनांचा अचूक हिशेब ठेवणे, जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व विभागांसाठी साठा खरेदीसाठी नियमांतर्गत योग्य पध्दती अवलंबून अनावश्यक साठा खरेदी होणार नाही यावर नियंत्रण ठेवणे, अंतर्गत लेखा परीक्षण, बाह्य लेखा परिक्षण, निवृत्तिवेतन प्रकरणे, वेतननिश्चिती इ. बाबी हाताळणे तसेच स्थानिक निधी लेखा परीक्षण, महालेखाकार लेखा परीक्षण, विभागांतर्गत लेखा परीक्षण व पंचायत राज समिती अंतर्गत लेखा आक्षेपांचे अनुपालन तयार करणे इ. कामे सहाय्यक लेखाधिकारी पार पाडतात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने केंद्र शासनाकडील समकक्ष पदाची सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचना लागू करण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीने विचारात घ्यावा.

११) उप लेखापाल

संघटनेचे अभिप्राय :- अर्थसंकल्प, विनियोजन, तरतुदी परत करणे, करार निविदा व दरपत्रकाची तपासणी , वेतन देयके, प्रवास देयके, आकस्मिक खर्चाची देयके, बांधकामाची देयके, अनुदानाची देयके इ.ची सखोल तपासणी करणे इ. कामे कनिष्ठ लेखाधिकारी पार पाडतात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने केंद्र शासनाकडील समकक्ष पदाची सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचना लागू करण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीने विचारात घ्यावा.

१२) वरिष्ठ सहाय्यक (लेखा)

संघटनेचे अभिप्राय :- कालबाहय अग्रिमाचे शोधन अनुदान, नोंदवहीत व त्यासंबंधात पत्रव्यवहार, कर्जाच्या नोंदवह्या व त्यासंबंधीचे पत्रव्यवहार, बिलाची नोंदवही, बिलाच्या नोंदवहीचा गोषवारा, आकस्मिक खर्चाची बिले, आकस्मिक खर्चाची नोंदवही, स्कंध पुस्तक, जंगम मालमत्तेचे पुस्तक, खरेदीच्या नस्त्या व पत्रव्यवहार हाताळणे इ. कामे वरिष्ठ सहाय्यक (लेखा) पार पाडतात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने केंद्र शासनाकडील समकक्ष पदाची सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचना लागू करण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीने विचारात घ्यावा.

समितीची शिफारस :-

१०) सहाय्यक लेखाधिकारी

११) उप लेखापाल

१२) वरिष्ठ सहाय्यक (लेखा)

या संवर्गांना वेतन समानीकरण समितीने राज्य अथवा केंद्र शासनाकडील कोणत्याही संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गांची उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही. वरील संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केली आहे. या संवर्गांच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

१३) मुख्य आरेखक

संघटनेचे अभिप्राय :- हे पद केंद्र शासनाकडील आरेखक (चीफ ड्राफ्टस्मन) या पदास समकक्ष आहे व आरेखक श्रेणी-१ चे पदोन्नीचे पद आहे. तसेच या पदाची वेतनश्रेणी रु.६५००-१०५०० व निवडश्रेणी ग्रेड रु.७४५०-११५०० ही आहे. तेव्हा सहाव्या वेतन आयोगात (रु.७५००-१२०००) वेतनबँड पीबी-२ मध्ये रु.४८०० ग्रेड वेतन देण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने केंद्राच्या समकक्ष पदाची सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचना लागू करण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीने विचारात घ्यावा.

१४) आरेखक

संघटनेचे अभिप्राय :- हे पद केंद्र शासनाकडील आरेखक-१ या पदास समकक्ष आहे. म्हणून त्या पदास रु.५५००-९००० या वेतनश्रेणीत घेऊन सहाव्या वेतन आयोगात (रु.७५००-१२०००) वेतनबँड पीबी-२ मध्ये रु.४६०० ग्रेड वेतन देण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने केंद्राच्या समकक्ष पदाची सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचना लागू करण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीने विचारात घ्यावा.

१५) कनिष्ठ आरेखक

संघटनेचे अभिप्राय :- हे पद केंद्र शासनाकडील आरेखक-२ या पदास समकक्ष आहे. म्हणून त्या पदास रु.५०००-८००० या वेतनश्रेणीत घेऊन सहाव्या वेतन आयोगात (रु.७४५०-११५००) वेतनबँड पीबी-२ मध्ये रु.४६०० ग्रेड वेतन देण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने केंद्राच्या समकक्ष पदाची सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचना लागू करण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीने विचारात घ्यावा.

१६) अनुरेखक

संघटनेचे अभिप्राय :- हे पद केंद्र शासनाकडील आरेखक-३ या पदास समकक्ष आहे. म्हणून त्या पदास रु.४०००-६००० या वेतनश्रेणीत घेऊन सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-१ (रु.५२००-२०२००) मध्ये रु.२४०० ग्रेड वेतन देण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने केंद्राच्या समकक्ष पदाची सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचना लागू करण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीने विचारात घ्यावा.

<u>समितीची शिफारस</u> :-

१३) मुख्य आरेखक

१४) आरेखक

१५) कनिष्ठ आरेखक

१६) अनुरेखक

या संवर्गांना वेतन समानीकरण समितीने राज्य शासनाच्या जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागातील आरेखक संवर्गाप्रमाणेच वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गांना चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगात सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत.

वरील संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष वेतनसंरचना मंजूर केली आहे. जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागातदेखील आरेखक संवर्गास अशीच समान द्विस्तरीय वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

राज्य शासनाकडील प्रमुख / मुख्य आरेखक संवर्गास केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील मुख्य आरेखक संवर्गास केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना मंजूरीची शिफारस करणे सयुक्तिक होणार नाही.

१७) आरोग्य पर्यवेक्षक

संघटनेचे अभिप्राय :- आरोग्य पर्यवेक्षक (विस्तार अधिकारी, आरोग्य) या पदाच्या वेतनश्रेणीबाबत चौथ्या वेतन आयोगाने कसल्याही प्रकारची शिफारस न केल्यामुळे निर्माण झालेला प्रश्न सोडवावा म्हणून आरोग्य संचालनालयाने एका परिपत्रकाद्वारे या पदाला चौथ्या वेतन आयोगात रु.१४००-२६०० ही निकृष्ट वेतनश्रेणी देऊन या पदावर अन्याय केला आहे. वैद्यकीय अर्हता धारकासाठी रु.२०००-३२०० आणि इतरांसाठी रु.१६४०-२९०० अशी वेतनश्रेणी आहे. पाचव्या वेतन आयोगातदेखील वैद्यकीय अर्हताधारकास रु.८०००-१३५०० व इतरांसाठी रु.५५००-९००० वेतनश्रेणी मंजूर केलेली आहे. आरोग्य पर्यवेक्षक (विस्तार) व विस्तार अधिकारी (आरोग्य) ही समकक्ष व सारख्या जबाबदाऱ्या धारण करणारी पदे असल्यामुळे तसेच विस्तार अधिकारी (आरोग्य) या पदाचे रुपांतरण करुन आरोग्य पर्यवेक्षक (विस्तार) असे नामाभिधान करण्यात आलेले आहे. तरी पाचव्या वेतन आयोगात रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी मान्य करुन सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन मंजूर करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- आरोग्य पर्यवेक्षकाची जबाबदारी जास्त असल्यामुळे व ग्रामीण भागातील आरोग्यासंदर्भात महत्वाचा दुवा असल्यामुळे सध्या लागू केलेल्या वेतनबँडमध्ये ग्रेड वेतन रु.४२०० ऐवजी रु.४३०० करण्याची मागणी वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

पूर्वीपासून या संवर्गाला शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांस अनुरुप अशा वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत. तसेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. राज्य शासनाकडील आरोग्य पर्यवेक्षक संवर्गासदेखील या संवर्गाप्रमाणेच वेतनसंरचना मंजूर केली आहे.

सदर संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१८) औषधनिर्माता (फार्मासिस्ट)

संघटनेचे अभिप्राय :- ग्राम विकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेत कार्यरत असणाऱ्या औषधनिर्मात्याचे पद हे एकाकी पद असून या पदास पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत. तथापि, राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात औषधनिर्माता पदानंतर वरिष्ठ औषधनिर्माता व निवडश्रेणी औषधनिर्माता ह्या पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या पदोन्नतीच्या पदांस पाचव्या वेतन आयोगानुसार अनुक्रमे रु.५०००-८००० व रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. यामुळे सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत कार्यरत असलेल्या औषधनिर्माता पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० तर सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या औषधनिर्माता पदास वेतनबँड रु.५२००-२०२०० लागू करण्यात आला आहे. म्हणजेच, एकाच राज्य शासनसेवेत एकाच ठिकाणी कार्यरत तसेच समान शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या व समान जबाबदारी व कर्तव्ये असणाऱ्या विविध विभागातील औषधनिर्मात्यांना वेगवेगळी वेतनसंरचना लागू करण्यात आली आहे. ही असमानता दूर करणे अगत्याचे आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- सध्या राज्य सेवेतील व जिल्हा परिषदांतील औषधनिर्माता पदास एकच वेतनश्रेणी लागू केलेली आहे. तथापि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये या विभागातील औषधनिर्माता या पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना दिलेली आहे. सदरहू वेतनसंरचना जिल्हा परिषद व सार्वजनिक आरोग्य विभागातील औषधनिर्माता पदास देण्याचा प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यास हरकत नसावी.

समितीची शिफारस :-

उपरोक्त संवर्गाला वेतन समानीकरण समितीने राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील औषधनिर्माता (पूर्वीचे पदनाम मिश्रक) संवर्गाशी समकक्ष ठरविले असल्याने वेळोवेळी या संवर्गास सार्वजनिक आरोग्य विभागातील संवर्गाप्रमाणेच सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. सहाव्या वेतन आयोगातदेखील दोन्ही संवर्गांची वेतनसंरचना समान आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागातील वरिष्ठ औषधनिर्माता व निवडश्रेणी औषधनिर्माता हे संवर्ग पूर्वीपासूनच वरील दोन्ही संवर्गापेक्षा उच्च वेतनश्रेणीमध्ये आहेत. त्यामुळे या संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही.

या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

१९) महिला आरोग्य अभ्यागता (LHV)

संघटनेचे अभिप्राय :- बहुउद्देशिय आरोग्य सेवा कर्मचारी योजनेत ग्रामविकास व जलसंधारण विभागांतर्गत आरोग्य सेवक (महिला) व आरोग्य सहाय्यक (महिला) हे दोन नवीन संवर्ग निर्माण करण्यात आलेले आहे. सध्या बहुउद्देशिय आरोग्य सेवा कर्मचारी योजनेत परिचारिका प्रसाविका व महिला आरोग्य अभ्यागता हे दोन संवर्ग कार्यरत आहेत. मात्र हे दोन्ही संवर्ग बहुउद्देशिय आरोग्य सेवा कर्मचारी योजनेतील आरोग्य सहाय्यक (महिला) या नवीन संवर्गासाठी विहित केलेल्या जॉबचार्टप्रमाणे काम करतात. त्यामुळे समान काम समान दाम या तत्वानुसार महिला आरोग्य अभ्यागता यांनासुध्दा परिचारिका प्रसाविकांप्रमाणेच सुधारित वेतन संरचनेत वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन मंजूर करणे उचित व न्यायाचे राहील.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- महिला आरोग्य अभ्यागता (LHV) यांच्या कामाचे स्वरुप महिला प्रसाविका (ANM) यांच्याप्रमाणेच आहे. म्हणून सदर पदास महिला परिचारिका प्रसाविका या पदाची वेतनसंरचना लागू करण्याची मागणी आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यात यावा असे वाटते.

समितीची शिफारस :-

महिला आरोग्य अभ्यागता आणि परिचारिका प्रसाविका या संवर्गांची नियुक्तीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता भिन्न आहे. राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील महिला आरोग्य अभ्यागता या संवर्गासदेखील वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रू.२८०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२०) कुष्ठरोग तंत्रज्ञ

संघटनेचे अभिप्राय :- महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात कुष्ठरोग निर्मूलन योजनेत कुष्ठरोग तंत्रज्ञ व जिल्हा अवैद्यकीय पर्यवेक्षक असे २ संवर्ग कार्यरत आहेत. कुष्ठरोगी शोधून काढण्यापासून ते तो बरा होऊन त्याचे पुनर्वसन होईपर्यंतचे कार्य कुष्ठरोग विभागातील कुष्ठरोग तंत्रज्ञ व जिल्हा अवैद्यकीय पर्यवेक्षक पार पाडीत असतात. कुष्ठरोग तंत्रज्ञ हे पद आरोग्य सेवकांमधून पदोन्नतीने भरण्यात येते. १५ ते २० वर्षे आरोग्य सेवक म्हणून काम केल्यानंतर ज्येष्ठतेप्रमाणे काही आरोग्य सेवक कुष्ठरोग तंत्रज्ञ होतात तर काही आरोग्य सेवकांमधून आरोग्य सहाय्यक होतात. आरोग्य सेवकातून कुष्ठरोग तंत्रज्ञाची पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांना कुष्ठरोग तंत्रज्ञाच्या प्रशिक्षणासाठी पाठविले जाते व नंतर ते कुष्ठरोग तंत्रज्ञ म्हणून कार्यरत होतात. कुष्ठरोग तंत्रज्ञांना शारीरिक / मानसिक व सामाजिकदृष्टया हताश झालेल्या रुग्णांमध्ये काम करावे लागते. कुष्ठरोग तंत्रज्ञाचे काम जोखमीचे आहे. जखमा असलेल्या रुग्णांमध्ये काम करावे लागते. तसेच कुटुंबकल्याण व बहुविध आरोग्य सेवा यांचेही काम करावे लागते. म्हणून कुष्ठरोग तंत्रज्ञांना वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन देण्याची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- आरोग्य सेवक म्हणून काम केल्यानंतर कुष्ठरोग तंत्रज्ञ या पदावर पदोन्नती दिली जाते. पाचव्या वेतन आयोगात कुष्ठरोग तंत्रज्ञांना रु.४०००- ६००० अधिक विशेष वेतन रु.२०० अशी वेतनश्रेणी लागू केली होती. सहाव्या वेतन आयोगात कुष्ठरोग तंत्रज्ञ यांना वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन व आरोग्य सहाय्यकांना वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२५०० ग्रेड वेतन ही वेतनश्रेणी विहित करण्यात आलेली आहे. आरोग्य सेवकांमधून आरोग्य सहाय्यक / कुष्ठरोग तंत्रज्ञ असे पदोन्नतीचे पद असताना आरोग्य सहाय्यकांना रु.२५०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. मात्र कुष्ठरोग तंत्रज्ञ यांना रु.२४०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. कुष्ठरोग तंत्रज्ञ यांच्या कामाचे स्वरुप पाहता सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव वेतन त्रुटी समितीसमोर सादर करण्यास हरकत नसावी.

२१) आरोग्य सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय :- आरोग्य सहाय्यक (पुरुष) या पदास रु.४०००-६००० वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे आरोग्य सहाय्यक (पुरुष) यांच्या हाताखाली काम करणाऱ्या आरोग्य सेवकास व आरोग्य सहाय्यकास एकच वेतनश्रेणी रु.४०००-६००० दिल्याने आरोग्य सहाय्यक (पुरुष) यांच्या वेतनश्रेणीत त्रुटी निर्माण झाली. यासंदर्भात पाचव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी उच्चस्तर समिती व वेतन असमानता समितीने शिफारस केल्यानुसार आरोग्य सहाय्यक (पुरुष) पदास दरमहा रु.२०० विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. उपरोक्त समानता लक्षात घेता आरोग्य सहाय्यक (पुरुष) यांना पाचव्या वेतन आयोगातील त्रुटी काढून सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्याची विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- आरोग्य कर्मचाऱ्यांतून आरोग्य सहाय्यक (पुरुष) या पदावर पदोन्नती दिली जाते. पाचव्या वेतन आयोगात आरोग्य कर्मचाऱ्यांना रु.४०००- ६००० व आरोग्य सहाय्यक (पुरुष) यांना रु.४०००-६००० + विशेष वेतन रु.२०० अशी वेतनश्रेणी लागू केली होती. सहाव्या वेतन आयोगात आरोग्य कर्मचाऱ्यांना वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन व आरोग्य सहाय्यकांना वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२५०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना विहित करण्यात आलेली आहे. निम्न पदात व पदोन्नतीच्या पदात फक्त रु.१०० इतका फरक ठेवण्यात आला आहे. आरोग्य सहाय्यकांचे कामाचे स्वरुप पहाता सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर सादर करण्यास हरकत नसावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

२०) कुष्ठरोग तंत्रज्ञ

२१) आरोग्य सहाय्यक

उपरोक्त दोन्ही संवर्ग राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील अनुक्रमे कुष्ठरोग तंत्रज्ञ आणि आरोग्य सहाय्यक या संवर्गांशी समकक्ष आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागातील या दोन्ही संवर्गांना अनुक्रमे रु.२४०० आणि रु.२५०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. त्यामुळे रु.२८०० ग्रेड वेतनाची मागणी समर्थनीय नाही.

आरोग्य सेवक संवर्गातून आरोग्य सहाय्यक या संवर्गात पदोन्नती देण्यात येत असल्याने पदोन्नतीचा संवर्ग आणि निम्न संवर्ग यामध्ये फरक ठेवण्याच्या दृष्टीने राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील स्वीकृत शिफारशीनुसार आरोग्य सहाय्यक संवर्गास रु.२४०० ऐवजी रु.२५०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. आरोग्य सेवक संवर्गातून कुष्ठरोग तंत्रज्ञ यां संवर्गात पदोन्नती देण्यात येत असल्याचे प्रशासकीय विभागाने नमूद केले आहे. वरील स्वीकृत शिफारशीच्या अनुषंगाने कुष्ठरोग तंत्रज्ञ या संवर्गास रु.२५०० ग्रेड वेतन मंजूर करण्याबाबत प्रशासकीय विभागाने तपासणी करून वित्त विभागाच्या सहमतीने कार्यवाही करावी.

२२) कक्ष अधिकारी

संघटनेचे अभिप्राय :- तालुका पातळीवरील गट विकास अधिकारी व जिल्हा पातळीवरील विभागप्रमुखानंतर हे पद प्रशासकीयदृष्टया महत्वाचे मानले जाते व कार्यालयात हे पद सेकंड इन कमांड मानले जाते. कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामावर देखरेख करणे व सर्व प्रकारची कामे योग्यप्रकारे व नियमाने होतात किंवा कसे हे या पदावरील कर्मचाऱ्याला पहावे लागते. त्यामुळे हे पद जबाबदारीचे आहे. शासनाच्या उप समितीनेदेखील या पदाची वेतनश्रेणी वाढविण्याबाबत दि.१८.८.१९९८ रोजी शासनास शिफारस केली आहे. मा. उच्च न्यायालयाने देखील दि.२९.२.२००४ च्या निकालाने वेतनश्रेणीत वाढ करण्याबाबत शासनास सूचना केली आहे. कक्ष अधिकारी हे पद अधीक्षक पदाचे बढतीचे व जबाबदारीचे असल्याने या पदासाठी ग्रेड वेतन रु.४३०० ऐवजी रु.४६०० द्यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- जिल्हा परिषदेतील कक्ष अधिकारी हे महत्वाचे प्रशासकीय कामकाज हाताळणारे पद असल्यामुळे आता लागू केलेले ग्रेड वेतन रु.४३०० ऐवजी रु.४६०० लागू करण्याची मागणी केलेली आहे. सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीच्या विचारार्थ मांडण्यास हरकत नसावी.

२३) कार्यालयीन अधीक्षक

संघटनेचे अभिप्राय :- हे पद कनिष्ठांच्या कामावर देखरेख करणारे आहे. त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांकडून चांगले काम करुन घेणे, कार्यालयाचे प्रशासन योग्य व सुरळीत चालवणे ह्या बाबी यात येतात. त्यामुळे या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी जास्त आहे. इतर शासकीय विभागांतील अधीक्षक पदांची पाचव्या वेतन आयोगातील रु.१६४०-२९०० ही वेतनश्रेणी या पदास द्यावी अशी शिफारस शासनाच्या उप समितीने दि.१८.८.१९९८ अन्वये शासनास केलेली आहे. त्या आधारे मा. औरंगाबाद उच्च न्यायालयाने दि.२९.२.२००० निर्णय घेऊन उप समितीने शिफारस केलेली वेतनश्रेणी द्यावी असा निर्णय दिलेला आहे. वरीलप्रमाणे उच्च शैक्षणिक पात्रता किंवा जबाबदारीचे देखरेख करणारे व शासनाच्या उप समितीने व उच्च न्यायालयाने शिफारस केलेली असल्याने या पदासाठी सहाव्या वेतन आयोगातील वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन देण्याबाबत संघटनेची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- निरंक .

२४) वरिष्ठ सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय :- महसूल खात्यातील अव्वल कारकून व वरिष्ठ सहाय्यक ही पदे कामाच्या स्वरुपाने सारखी आहेत. त्यांची वेतनश्रेणी सन १९८६ च्या वेतन आयोगापर्यंत सारखीच होती. परंतु, आता अव्वल कारकुन पदाच्या वेतनश्रेणीत वाढ झाली असून ती पाचव्या वेतन आयोगात रु.४५००-१२५-७००० अशी आहे. पाचव्या वेतन आयोगातील हीच वेतनश्रेणी वरिष्ठ सहाय्यकास मिळावी अशी संघटनेची मागणी होती व संघटनेची ही मागणी वेतनश्रेणीचा सखोल विचार करण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीने स्वीकारली असून अव्वल कारकून पदाची वेतनश्रेणी वरिष्ठ सहाय्यकाला देण्यासाठी शासनास दि.१८.८.१९९८ रोजी शिफारस केली आहे व ह्या समितीच्या अहवालाप्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबत मा. औरंगाबाद उच्च न्यायालयाने दि.२९.२.२००० रोजी निर्णय दिलेला आहे. परंतु महाराष्ट्र शासनाने तो मान्य केला नाही. म्हणून आता समितीस अशी विनंती आहे की, उच्च शैक्षणिक पात्रता, कामाचे स्वरुप, बढतीचा अभाव व समितीने तसेच उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा विचार करुन वरिष्ठ सहाय्यकास सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु. ५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन अशी वेतनसंरचना देण्याबाबत संघटनेची मागणी व विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- संघटनेने जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहाय्यकांना अव्वल कारकुनांशी समकक्ष वेतनश्रेणी देण्याची मागणी केली आहे. त्यामुळे सध्या लागू असलेले ग्रेड वेतन रु.२४०० ऐवजी रु.२८०० करण्याचा प्रस्ताव वेतन त्रुटी समितीसमोर सादर करण्यात यावा.

२५) कनिष्ठ सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय :- जिल्हा परिषद ही स्वायत्त संस्था असून तेथे तीन स्तर पध्दत (थ्री टायर्स सिस्टीम) आहे. पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी अशी पध्दत असल्याने पदाधिकारी व अधिकारी

यांच्या समन्वयाने काम करावे लागते. तसेच जिल्हा परिषदांमध्ये विविध योजना उदा. कृषि, पशुसंवर्धन, बांधकाम, आरोग्य, शिक्षण व समाजकल्याण इ. राबविल्या जात असल्याने व कनिष्ठ सहाय्यक यांना सर्व विभागात काम करावे लागत असल्याने त्यांना या सर्व योजनांचा अभ्यास करावा लागतो. अशी पध्दत इतर विभागांत नसल्याने त्यांना फक्त त्यांच्या संबंधातील उदा. सार्वजनिक बांधकाम विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास फक्त त्याच विभागाचा अभ्यास आवश्यक असतो. वाढलेली शैक्षणिक पात्रता, कमी झालेला बढतीचा वाव, कामामधील विविधता, गाव पातळीपर्यंत असलेले कार्यक्षेत्र या सर्व मुद्यांचा विचार करता कनिष्ठ सहाय्यक यांची वेतनसंरचना वेतनबँड रू.५२००-२०२०० अधिक रू.२४०० ग्रेड वेतन (पे बँड मधील पे रू.७४०० + ग्रेड पे रू.२४०० = रू.९८००) अशी असावी अशी संघटनेची मागणी आहे. महसूल खात्यातील तलाठी पदाची शैक्षणिक अर्हता फक्त एस.एस.सी. असतांना पाचव्या वेतन आयोगात त्यांना रू.४०००-१००-६००० वेतनश्रेणी म्हणजे सहाव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनसंरचना वेतनबँड रू.५२००-२०२०० अधिक रू.२४०० ग्रेड वेतन अशी आहे. तसेच कनिष्ठ सहाय्यकांची शैक्षणिक अर्हता तलाठी या पदापेक्षा जास्त असल्याने वेतनातील त्रुटी दूर करुन कनिष्ठ सहाय्यकांस वेतनबँड रू.५२००-२०२०० अधिक रू.२४०० ग्रेड वेतन अशी वेतनसंरचना देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- कनिष्ठ सहाय्यक हे पद राज्य सेवेतील लिपिक संवर्गाशी समकक्ष आहे. राज्य शासनाकडील लिपिकांची वेतनसंरचना जिल्हा परिषदांना लागू केलेली आहे. त्यामुळे असमानता नाही. तथापि संघटनेच्या म्हणण्यानुसार जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यकांचे कामाचे स्वरुप भिन्न असल्यामुळे ग्रेड पे रू.१९०० ऐवजी रू.२४०० करण्याची मागणी केलेली आहे. सदर प्रस्तावाबाबत वेतनत्रुटी निवारण समितीने निर्णय घेणे उचित होईल.

<u>समितीची शिफारस</u> :-

२२) कक्ष अधिकारी

२३) अधीक्षक

२४) वरिष्ठ सहाय्यक

२५) कनिष्ठ सहाय्यक

वेतन समानीकरण समितीने या संवर्गांना राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

# ३.१७ - शालेय शिक्षण विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ. क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतन संरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) शिक्षण संचालनालय | | | | | |
| १ | उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यामधील शिक्षक (प्रशिक्षित पदव्युत्तर पदवीधर) | १)७२२५-११०५०<br>२)८०००-१३५००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३)९१२५-१४०७५<br>(२०% पदांसाठी निवडश्रेणी) | १)९३००-३४८००<br>२)१५६००-३९१००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३)१५६००-३९१००<br>(२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४६००<br>५४००<br><br>५७०० | १)९३००-३४८००<br>२)१५६००-३९१००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३)१५६००-३९१००<br>(२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४८००<br>५४००<br><br>६६०० |
| २ | माध्यमिक शाळा शिक्षक (प्रशिक्षित पदवीधर) | १)५५००-९०००<br>२)६५००-१०५००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३)७५००-१२५००<br>(२०% पदांसाठी निवडश्रेणी) | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००-३४८००<br>(२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४३००<br>४४००<br><br>४८०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br><br>३)९३००-३४८०० | ४६००<br>४८००<br><br>५४०० |
| ३ | प्राथमिक शिक्षक (प्रशिक्षित प्राथमिक शिक्षक) | १)४५००-७०००<br>२)५०००-८०००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३)५५००-९०००<br>(२०% पदांसाठी निवडश्रेणी) | १)५२००-२०२००<br>२) ९३००-३४८००<br>(वरिष्ठ श्रेणी)<br>३) ९३००-३४८००<br>(२०% पदांसाठी निवडश्रेणी) | २८००<br>४२००<br><br>४३०० | १)९३००-३४८००<br>२) ९३००-३४८००<br><br>३) ९३००-३४८०० | ४२००<br>४६००<br><br>४८०० |
| ४ | ग्रंथपाल (पदवीधर व ग्रंथशास्त्रातील पदवी अथवा पदविका व दि.२७ डिसेंबर, १९७९ पूर्वीची नियुक्ती) | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |
| ५ | ग्रंथपाल (अशासकीय माध्यमिक शाळा) ( मॅट्रीक व ग्रंथालयाचे | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ९३००-३४८०० | ४२०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रशिक्षण प्रमाणपत्र) | | | | | |
| ६ | प्रयोगशाळा सहाय्यक (माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा ) | ३२००-४९०० | ५२००-२०२०० | २००० | ५२००-२०२००० | २४०० |
| | अध्यापक विद्यालयांतील शिक्षक | | | | | |
| ७ | अध्यापक विद्यालयांतील प्राचार्य | १)७५००-१२०००<br>२)९१२५-१४०७५ (वरिष्ठ श्रेणी) | ९३००-३४८००<br>१५६००-३९१०० | ४८००<br>५७०० | १५६००-३९१०० | ५७०० |
| | मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी रीट याचिका क्र.६५९८/२०११ संदर्भात दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने वेतनत्रुटी निवारण समितीने विचारार्थ घेतलेले मुख्याध्यापक संवर्गाचे प्रस्ताव | | | | | |
| १ | उच्च माध्यमिकचे वर्ग संलग्नित असलेल्या माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक | १)७५००-१२००० अधिक विशेष वेतन रू.२००<br>२)९१२५-१४०७५ (वरिष्ठ श्रेणी) अधिक विशेष वेतन रू.२०० | १)९३००-३४८००<br>२)१५६००-३९१०० (वरिष्ठ श्रेणी) | ४९००<br>५८०० | १)१५६००-३९१००<br>१)१५६००-३९१०० (वरिष्ठ श्रेणी) | ५४००<br>७६०० |
| २ | मुख्याध्यापक, स्वतंत्र उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये ( दुसऱ्या वर्गातील पदव्युत्तर पदवीधर अधिक बी.एड. ) | १)७२२५-११०५०<br>२)८०००-१३५००<br>३)९१२५-१४०७५ | १)९३००-३४८००<br>२)१५६००-३९१००<br>३)१५६००-३९१०० | ४७००<br>५५००<br>५८०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ३ | मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा | १)७५००-१२०००<br>२)९१२५-१४०७५ (वरिष्ठ श्रेणी) | १)९३००-३४८००<br>२)१५६००-३९१०० (वरिष्ठ श्रेणी) | ४८००<br>५७०० | १)१५६००-३९१००<br>२)१५६००-३९१०० | ५४००<br>६६०० |
| ४ | मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा (प्रशिक्षित पदवीधर- बी.ए. /बी.कॉम./ बी.एससी. अधिक बी.एड./ बी.टी./डी.एड.) | १)५५००-९००० अधिक विशेष वेतन रू.२००<br>२)६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)७५००-१२००० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००-३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४४००<br>४५००<br>४९०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br>३)९३००-३४८०० | ४६००<br>४८००<br>५४०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | केंद्रप्रमुख (बी.ए. /बी.कॉम./ बी.एससी. अधिक बी.एड./ बी.टी./डी.एड.) | १)५५००-९००० अधिक विशेष वेतन रु.२००<br>२)६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)७५००-१२००० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००-३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४४००<br>४५००<br>४९०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br>३)९३००-३४८०० | ४६००<br>४८००<br>५४०० |
| ६ | मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा (२०० व अधिक विद्यार्थी पट किंवा १ ते ७ पर्यंतचे वर्ग) | १)५५००-९०००<br>२)६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)७५००-१२००० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००-३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४३००<br>४४००<br>४८०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br>३)९३००-३४८०० | ४६००<br>४८००<br>५४०० |
| ७ | मुख्याध्यापक (प्रशिक्षित मॅट्रीक्युलेट किंवा पश्चिम महाराष्ट्रातील तालुका मास्तर) | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| | ब ) महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् | | | | | |
| १ | राज्य चिटणीस | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | सहाय्यक राज्य चिटणीस | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ३ | जिल्हा संघटक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ५२००-२०२०० | २८०० |
| ४ | सहाय्यक संघटन आयुक्त | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ५२००-२०२०० | २८०० |
| ५ | जिल्हा स्काऊट / गाईड संघटक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |

अ) शिक्षण संचालनालय

१) उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यामधील शिक्षक (प्रशिक्षित पदव्युत्तर पदवीधर)

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनाप्रमाणे ग्रेड वेतन द्यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासनाप्रमाणे ग्रेड वेतन द्यावे.

२) माध्यमिक शाळा शिक्षक (प्रशिक्षित पदवीधर)

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनाप्रमाणे ग्रेड वेतन द्यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- केंद्र शासनाप्रमाणे ग्रेड वेतन द्यावे.

३) प्राथमिक शिक्षक (प्रशिक्षित प्राथमिक शिक्षक)

संघटनेचे अभिप्राय:- "राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी सुधारण्याकरीता राज्य शासनाकडून स्वतंत्र वेतन आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेव्हा जेव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी वेतन आयोग नियुक्त करील तेव्हा तेव्हा त्या वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे वेतनविषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतननिश्चितीचे सूत्रदेखील

केंद्र शासनाप्रमाणे असेल," असा धोरणात्मक निर्णय डिसेंबर, १९७७ मध्ये राज्य शासनाने घेतला होता. आजपावेतो या धोरणात्मक निर्णयामध्ये शासनाच्या स्तरावर बदल झालेला नाही. उक्त निर्णय विचारात घेऊन शासनाने पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी जशाच्या तशा मान्य करुन दि.१३ मे, १९९९ रोजी शिक्षण विभागाने शासन निर्णय निर्गमित केला होता. त्याप्रमाणे केंद्र शासनाच्या वेतनसंरचनेप्रमाणे सहाव्या वेतन आयोगात राज्यासाठी तंतोतंत वेतनसंरचना लागू कराव्यात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- प्राथमिक शिक्षकांना राज्य शासनाने पीबी-१ वेतनबँड मंजूर केला आहे व केंद्र शासनाने पीबी-२ वेतनबँड मंजूर केला आहे. त्यामध्ये राज्य शासनाने सर्वच शिक्षकांच्या वेतनबँडमध्ये कपात केली आहे. ती केंद्र शासनाच्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांमधील शिक्षक (प्रशिक्षित पदव्युत्तर पदवीधर)

२) माध्यमिक शाळा शिक्षक (प्रशिक्षित पदवीधर)

३) प्राथमिक शिक्षक (प्रशिक्षित प्राथमिक शिक्षक)

चौथ्या वेतन आयोगात राज्यातील अर्हताधारक प्रशिक्षित शिक्षकीय संवर्गांना तिसऱ्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतनश्रेण्यांपेक्षा उच्च आणि द्विस्तरीय / त्रिस्तरीय वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. तदनंतर पाचव्या वेतन आयोगातदेखील चौथ्या वेतन आयोगातील वेतनश्रेण्यांशी समकक्ष वेतनश्रेण्यांपेक्षा उच्च आणि द्विस्तरीय / त्रिस्तरीय वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या.

आतापर्यंत शिक्षकीय संवर्गांना पुढीलप्रमाणे वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत.

| शिक्षक संवर्गाच्या वेतनश्रेण्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | तिसरा वेतन आयोग | चौथा वेतन आयोग | | पाचवा वेतन आयोग | | सहावा वेतन आयोग | |
| | मंजूर वेतनश्रेणी | समकक्ष वेतनश्रेणी | मंजूर वेतनश्रेणी | समकक्ष वेतनश्रेणी | मंजूर वेतनश्रेणी | समकक्ष वेतनसंरचना | मंजूर वेतनसंरचना |
| शिक्षकेतर संवर्ग | २९०-५४० | ९५०-१५०० | ९५०-१५०० | ३०५०-४५९० | ३०५०-४५९० | पीबी-१ + रु.१९०० ग्रेड वेतन | पीबी-१ + रु.१९०० ग्रेड वेतन |
| प्रशिक्षित शिक्षक (एसएससी डी एड) | २९०-५४० | ९५०-१५०० | <u>१२००-२०४०</u> (मूळ वेतनश्रेणी) | ४०००-६००० (मूळ वेतनश्रेणी) | <u>४५००-७०००</u> (मूळ वेतनश्रेणी | पीबी-१ + रु.२८०० ग्रेड वेतन | पीबी-१ + रु.२८०० ग्रेड वेतन |
| | | | १४००-२६०० (वरिष्ठ श्रेणी) | ५०००-८००० (वरिष्ठ श्रेणी) | ५०००-८००० (वरिष्ठ श्रेणी) | पीबी-२ + रु.४२०० ग्रेड वेतन | पीबी-२ + रु.४२०० ग्रेड वेतन |
| | | | १६४०-२९०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ५५००-९००० (२०% पदांसाठी निवडश्रेणी ) | ५५००-९००० (२०% पदांसाठी निवडश्रेणी | पीबी-२ + रु.४३०० ग्रेड वेतन (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | पीबी-२ + रु.४३०० ग्रेड वेतन (२०% पदांसाठी निवडश्रेणी) |
| शिक्षकेतर संवर्ग | ३६५-७६० | १४००-२३०० | १४००-२३०० | ४५००-७००० | ४५००-७००० | पीबी-१ + रु.२८०० ग्रेड वेतन | पीबी-१ + रु.२८०० ग्रेड वेतन |
| पदवीधर प्रशिक्षित शिक्षक | ३६५-७६० | १४००-२३०० | <u>१४००-२६००</u> (मूळ वेतनश्रेणी) | ५०००-८००० (मूळ वेतनश्रेणी) | <u>५५००-९०००</u> (मूळ वेतनश्रेणी) | पीबी-२ + रु.४३०० ग्रेड वेतन | पीबी-२ + रु.४३०० ग्रेड वेतन |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १६४०-२९०० (वरिष्ठ श्रेणी) | ५५००-९००० (वरिष्ठ श्रेणी) | ६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी) | पीबी-२ + रु.४४०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) | पीबी-२ + रु.४४०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) |
| | | | २०००-३५०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ६५००-१०५०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ७५००-१२००० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | पीबी-२ + रु. ४८०० ग्रेड वेतन (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | पीबी-२ + रु. ४८०० ग्रेड वेतन (२०% पदांसाठी निवडश्रेणी) |
| शिक्षकेतर संवर्ग | ५००-९०० | १६४०-२९०० | १६४०-२९०० | ५५००-९००० | ५५००-९००० | पीबी-२ + रु.४३०० ग्रेड वेतन | पीबी-२ + रु.४३०० ग्रेड वेतन |
| पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक | ५००-९०० | १६४०-२९०० | २०००-३५०० (मूळ वेतनश्रेणी) | ६५००-१०५०० (मूळ वेतनश्रेणी) | ७२२५-११०५० (मूळ वेतनश्रेणी) | पीबी-२ + रु. ४६०० ग्रेड वेतन (रु.७४५०-११५०० वेतनश्रेणीशी समकक्ष ग्रेड वेतन) | पीबी-२ + रु. ४६०० ग्रेड वेतन |
| | | | २५००-४००० (वरिष्ठ श्रेणी) | ७५००-१२००० (वरिष्ठ श्रेणी) | ८०००-१३५०० (वरिष्ठ श्रेणी) | पीबी-३ + रु.५४०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) | पीबी-३ + रु.५४०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) |
| | | | | | ९१२५-१४०७५(२०% पदांसाठी निवडश्रेणी ) (केंद्र शासनाकडे ही वेतनश्रेणी नाही) | पीबी-३ + रु. ५७०० ग्रेड वेतन (२०% पदांसाठी निवडश्रेणी) (केंद्र शासनाकडे ही वेतनसंरचना नाही) | पीबी-३ + रु. ५७०० ग्रेड वेतन (२०% पदांसाठी निवडश्रेणी) |

वरील तक्त्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, चौथ्या वेतन आयोगापासून शिक्षकीय संवर्गांना समकक्षतेपेक्षा उच्च वेतनश्रेण्या मंजूर केल्यामुळे सर्वसाधारण प्रशासकीय / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तुलनेत शिक्षकीय संवर्गांच्या वेतनश्रेण्या आकर्षक झाल्या आहेत.

पाचव्या वेतन आयोगात शिक्षकीय संवर्गांना मंजूर केलेल्या समकक्षतेपेक्षा उच्च वेतनश्रेण्या विचारात घेऊनच सहाव्या वेतन आयोगात समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

प्रसंगतः शिक्षकीय संवर्गांच्या वेतनश्रेण्यांच्यासंदर्भात पुढील बाबींचाही विचार करणे आवश्यक वाटते.

(अ) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक संवर्गांना पाचव्या वेतन आयोगात मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक एचएससी १३०० / (२८०३ /

२०००) उमाशि-१, दि. ३ जून, २००० अन्वये पुनःसुधारणा केली आहे. राज्य शासनाकडे अस्तित्वात नसलेल्या रु. ७२२५-११०५० आणि रु. ९१२५-१४०७५ या नवीन वेतनश्रेण्या शिक्षकीय संवर्गांना मंजूर केल्या आहेत. त्यामुळे सहाव्या वेतन आयोगात रु.७२२५-११०५० या वेतनश्रेणीस रु.७४५०-११५०० या तुलनेने उच्च वेतनश्रेणीशी समकक्ष रु. ४६०० ग्रेड वेतन मंजूर करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

(ब) प्रशासकीय पदे ही शिक्षकीय संवर्गांची नियंत्रक पदे असली तरी या पदांच्या वेतनश्रेणी निश्चितीमध्ये शिक्षकीय पदांच्या वेतनश्रेणीचा प्रभाव असू नये आणि प्रशासकीय पदांच्या वेतनश्रेण्या गुणवत्तेनुसारच विहित कराव्यात असे मत वेतन समानीकरण समितीने ( परिच्छेद ३.२९) नोंदविले आहे. परंतु प्रशासकीय संवर्गांच्या वेतनश्रेण्यांवर शिक्षकीय संवर्गांच्या वेतनश्रेण्यांचा प्रभाव थोड्याफार प्रमाणात पडतोच ही वस्तुस्थिती वर नमूद दि. ३ जून, २००० रोजीचे शासन आदेश व शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक शिसंमा-१००० / ( १०३ / २००० ) प्रशा-५ , दि. ५ नोव्हेंबर, २००८ अन्वये महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-क आणि गट-ब मधील प्रशासकीय संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांवरुन दिसून येते. अशाप्रकारे प्रशासकीय संवर्गांना राज्य शासनाकडे अस्तित्वात नसलेली रु.६०००-१०००० ही नवीन वेतनश्रेणी मंजूर केल्यामुळे सहाव्या वेतन आयोगात रु.६०००-१०००० या वेतनश्रेणीस रु.६५००-१०५०० या तुलनेने उच्च वेतनश्रेणीशी समकक्ष रु. ४४०० ग्रेड वेतन मंजूर करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

थोडक्यात, शिक्षकीय संवर्गांना उच्च वेतनश्रेण्या मंजूर केल्या म्हणजे प्रशासकीय संवर्गांनादेखील उच्च वेतनश्रेण्या मंजूर करण्याचा प्रश्न उपस्थित होतो व ही एक शृंखला प्रक्रिया ठरते. तसेच त्यामुळे शिक्षण विभागातील प्रशासकीय संवर्गांच्या वेतनश्रेण्या व इतर विभागांमधील प्रशासकीय संवर्गांच्या वेतनश्रेण्यांमध्ये मोठी तफावत निर्माण होते.

(क) राज्य शासनाकडील बहुतांश संवर्गांची केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करावी अशी मागणी आहे. तथापि अहवालाच्या प्रकरण-२ मधील परिच्छेद २.३.२ मधील विवेचन विचारात घेता केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेण्यांचा आग्रह धरु नये असे समितीचे मत आहे. त्यामुळे केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेण्या मंजूर करण्याच्या मागणीशी समिती सहमत नाही.

४) ग्रंथपाल (पदवीधर व ग्रंथशास्त्रातील पदवी अथवा पदविका व २७ डिसेंबर, १९७९ पूर्वीची नियुक्ती) ५) ग्रंथपाल (अशासकीय माध्यमिक शाळांतील मॅट्रीक व ग्रंथालयाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र)

संघटनेचे अभिप्राय:- राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित शाळेतील ग्रंथपाल हे एकाकी पद आहे. शाळांमध्ये पटसंख्येवर आधारित अर्धवेळ व पूर्णवेळ ग्रंथपाल कार्यरत आहेत. अर्धवेळ ग्रंथपालांना सद्य:स्थितीत मंजूर असलेल्या मूळ वेतनाच्या ५० टक्के इतके मूळ वेतन व त्यावर राज्य शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या महागाई भत्त्याचा अर्धा भाग देण्यात येतो. त्यांना अन्य कोणत्याही सोयी सवलती अनुज्ञेय नाहीत. पूर्णवेळ ग्रंथपाल हे या शाळेतील एकाकी पद असून, त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय नाही. त्याचप्रमाणे पदोन्नतीची कोणतीही संधी नाही. या संवर्गावर चौथ्या वेतन आयोगापासून अन्याय झालेला आहे. त्याबाबत समितीने विचार करावा अशी विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- विभागाची यास सहमती आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

४) ग्रंथपाल (पदवीधर व ग्रंथशास्त्रातील पदवी अथवा पदविका व २७ डिसेंबर, १९७९ पूर्वीची नियुक्ती )

५) ग्रंथपाल (अशासकीय माध्यमिक शाळा) (मॅट्रीक व ग्रंथालयाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र)

वेतन समानीकरण समितीने चौथ्या वेतन आयोगात पदवी अधिक ग्रंथशास्त्रातील पदवी अथवा पदविकाधारक ग्रंथपाल संवर्गास रु.१४००-२३०० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रु.१४००-२३००, पाचव्या वेतन आयोगात समकक्ष

वेतनश्रेणी रु.४५००-७००० आणि सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन ही समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

तसेच मॅट्रीक व ग्रंथालयाचे प्रशिक्षण प्रमाणपत्रधारक ग्रंथपाल संवर्गास वेतन समानीकरण समितीने विशेष बाब म्हणून रु.९७५-१६६० या वेतनश्रेणी ऐवजी रु.१२००-२०४० या वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रु.१२००-२०४०, पाचव्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेणी रु.४०००-६००० आणि सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन ही समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी आढळून येत नाहीत.

६) प्रयोगशाळा सहाय्यक (माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा )

संघटनेचे अभिप्राय:- पाचव्या वेतन आयोगामध्ये केंद्राप्रमाणे रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी देण्याऐवजी शासनाने रु.३२००-४९०० ही वेतनश्रेणी दिली. त्या विरोधात मा. उच्च न्यायालयाने दि.६.९.२००१ रोजी रीट याचिका क्र.२५३३/२००१ संदर्भातील निर्णयात प्रयोगशाळा सहाय्यकांना दि.१.१.१९९६पासून रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने द्यावी असे आदेश दिले आहेत. केंद्रातील प्रयोगशाळा सहाय्यकांना सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड रु.५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना दिली आहे. समान शैक्षणिक पात्रता व कामाचे स्वरुप पाहता राज्य शासनाने ही वेतनसंरचना द्यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- प्रयोगशाळा सहाय्यक हे एकाकी पद आहे. त्यांना पदोन्नतीची संधी नाही. तेव्हा ग्रेड वेतन रु.२४०० देण्याबाबत सहानुभूतिपूर्वक विचार व्हावा अशी शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गात नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक अर्हता भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व सामान्य विज्ञान विषयांसह मॅट्रीक्युलेशन किंवा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी आहे. वेतन समानीकरण समितीने या संवर्गाच्या कामकाजाचे स्वरुप लक्षात घेऊन या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात समकक्ष रु.९५०-१५०० या वेतनश्रेणीऐवजी रु.९७५-१६६० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात रु.९७५-१६६०, पाचव्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेणी रु.३२००-४९०० आणि सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-१: रु.५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रु.२००० ही समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

७) अध्यापक विद्यालयांतील प्राचार्य

संघटनेचे अभिप्राय:- वित्त विभाग, अधिसूचना, दि.२४ जुलै, २००९ नुसार शासकीय अध्यापक विद्यालयांतील पदव्युत्तर पदवीधर शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आली आहे. त्यानुसार २० टक्के निवडश्रेणी पदांसाठी वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५७०० ग्रेड वेतन अनुज्ञेय करण्यात आले आहे.

या अध्यापक महाविद्यालयांतील निवडश्रेणी प्राध्यापक व प्राचार्य यांच्या वेतनसंरचनेत कुठलाच फरक राहिलेला नाही. प्राचार्य हे या संस्थेचे प्रशासन अधिकारी असून त्यांना शैक्षणिक कामाव्यतिरिक्त विद्यालयातील सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबींच्याबाबतीत पर्यवेक्षणाचे जबाबदारीचे काम करावे लागते. त्यामुळे वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५७०० ग्रेड वेतन ही वरिष्ठ वेतनसंरचना सर्व प्राचार्यांना लागू करावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- संघटनेची मागणी रास्त असून अध्यापक महाविद्यालयांतील प्राचार्य हे प्रशासकीय अधिकारी म्हणून पर्यवेक्षणाचे जबाबदारीचे पद भूषवित असल्याने, सर्व प्राचार्यांना वेतनबँड रु.१५६००-३९१०० अधिक रु.५७०० ग्रेड वेतन देण्याची विभागाची शिफारस आहे.

समितीची शिफारस :-

राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.९.४ मधील शिफारशीनुसार शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र. वेपुर १२०९/सुधारणा-२/प्र.क्र.११५/सेवा-९ दि. २४ जुलै, २००९ अन्वये अध्यापक विद्यालयांतील अर्हताधारक शिक्षकांना उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांप्रमाणे त्रिस्तरीय [वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू. ४६०० ग्रेड वेतन, वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू. ५४०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) , वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू. ५७०० ग्रेड वेतन (निवड श्रेणी - २०% पदांसाठी)] वेतनसंरचना मंजूर केली आहे. तर प्राचार्य संवर्गास वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू. ४८०० ग्रेड वेतन आणि वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रु. ५७०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) ही द्विस्तरीय वेतनसंरचना मंजूर केली आहे. प्राचार्य संवर्गास प्रशासकीय कामकाजही पहावे लागत असल्याने त्या संवर्गास स्वतंत्र उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक संवर्गाप्रमाणे रू.९१२५-१४०७५ या असुधारित वरिष्ठ वेतनश्रेणीस रू.५८०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. म्हणजेच प्राचार्य संवर्गास वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू. ४८०० ग्रेड वेतन आणि वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू. ५८०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) ही द्विस्तरीय वेतनसंरचना अनुज्ञेय राहील.

समितीची शिफारस :-

१) उच्च माध्यमिकचे वर्ग संलग्नित असलेल्या माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक

२) मुख्याध्यापक, स्वतंत्र उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये ( दुसऱ्या वर्गातील पदव्युत्तर पदवीधर अधिक बी.एड. )

३) मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा

४) मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा (प्रशिक्षित पदवीधर- बी.ए. /बी.कॉम./ बी.एससी. अधिक बी.एड./ बी.टी./डी.एड.)

५) केंद्रप्रमुख (बी.ए. /बी.कॉम./ बी.एससी. अधिक बी.एड./ बी.टी./डी.एड.)

६) मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा (२०० व अधिक विद्यार्थी पट किंवा १ ते ७ पर्यंतचे वर्ग)

७)मुख्याध्यापक (प्रशिक्षित मॅट्रीक्युलेट किंवा पश्चिम महाराष्ट्रातील तालुका मास्तर)

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी रीट याचिका क्र.६५९८/२०११ संदर्भात दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मुख्याध्यापक संवर्गाचे प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीच्या विचारार्थ घेतले आहेत. हे प्रस्ताव समितीच्या कामकाजाच्या अंतिम टप्प्यात विचारात घेण्यात आल्याने कालमर्यादेमुळे संघटनेच्या अभिप्रायांसह प्रशासकीय विभागामार्फत प्रस्ताव मागविणे शक्य झाले नाही. संघटना तसेच प्रशासकीय विभागाच्या प्रतिनिधींची मते बैठकीत जाणून घेतली आहेत.

केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करावी अशी मागणी साधारणत: संघटनांच्या प्रतिनिधींनी केली होती. तसेच उच्च माध्यमिकचे वर्ग संलग्नित असलेल्या माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक या संवर्गास वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू. ५४०० ग्रेड वेतन आणि वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू. ७६०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) अशी द्विस्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी प्रत्यक्ष बैठकीत प्रतिनिधींनी केली होती.

सर्वसाधारणपणे उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील शिक्षक, माध्यमिक शाळेतील शिक्षक व प्राथमिक शाळेतील शिक्षक या संवर्गांनीदेखील केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करावी अशी मागणी केली आहे. तथापि, समिती या मागणीशी सहमत नसल्याने या संवर्गांनी मागणी केल्याप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. याबाबत विस्तृत विवेचन संबंधित संवर्गाच्या शिफारशीमध्ये केले आहे.

प्रस्तुत संवर्गांनादेखील चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगात समकक्ष वेतनश्रेण्यांपेक्षा तुलनेने उच्च वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक संवर्गांना पाचव्या वेतन आयोगात मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक एचएससी १३०० / (२८०३ / २०००) उमाशि-१, दि. ३ जून, २००० अन्वये पुन:सुधारणा केली आहे. परिणामी शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक शिसंमा-१००० / ( १०३ / २००० ) प्रशा-५ , दि. ५ नोव्हेंबर, २००८ अन्वये महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-क आणि गट-ब मधील प्रशासकीय संवर्गांना पुन:सुधारित वेतनश्रेण्या मंजूर करणे क्रमप्राप्त ठरले. साधारणत: इतर शिक्षकीय संवर्गांप्रमाणेच मुख्याध्यापक संवर्गाच्याबाबतीत परिस्थिती आहे.

राज्य शासनाकडील बहुतांश संवर्गांची आणि इतर शिक्षक संवर्गांचीदेखील केंद्र शासनाकडील संवर्गांप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे. परंतु समिती या मागणीशी सहमत नसल्याने या संवर्गांनी मागणी केल्याप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस समितीने केलेली नाही. त्यामुळे केवळ मुख्याध्यापक संवर्गाच्याबाबतीत वेगळा दृष्टीकोन स्वीकारणे समितीस उचित वाटत नाही. त्यामुळे या संवर्गाच्या मागणीशी समिती सहमत नाही.

ब ) महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस्

१) राज्य चिटणीस

संघटनेचे अभिप्राय:- राज्य चिटणीस हे पद ५०० पेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या मुख्याध्यापकांच्या पदाच्या समकक्ष आहे. या व्यतिरिक्त स्काऊट गाईड मधील व्यावसायिक पात्रता एल.टी.ए.एल.टी. त्यांनी पूर्ण केलेली आहे. मुख्याध्यापकांपेक्षा राज्यस्तरीय प्रशासनाची संपूर्ण जबाबदारी या पदाची आहे. मुख्याध्यापक या पदाची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० आहे. त्यामुळे राज्य चिटणीस या पदास रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य चिटणीस या पदास मंजूर करण्यात आलेली वेतनसंरचना योग्य आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

प्रस्तुत संवर्गाची तुलना मुख्याध्यापक संवर्गाशी केली आहे. परंतु हा संवर्ग मुख्याध्यापक संवर्गाशी समकक्ष ठरविण्यात आलेला नाही. त्यामुळे या संवर्गास मुख्याध्यापक संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेची शिफारस करणे उचित होणार नाही.

या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२) सहाय्यक राज्य चिटणीस

संघटनेचे अभिप्राय:- सहाय्यक राज्य चिटणीस हे पद राज्य चिटणीस या पदाशी संलग्न आहे. राज्य चिटणीस हे दीर्घकालीन रजेवर गेल्यावर त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार सहाय्यक राज्य चिटणीस यांच्याकडे सोपविला जातो. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईड या संस्थेच्या आस्थापनेवर मंजूर असलेल्या राज्य संघटन आयुक्त या दुय्यम दर्जाच्या पदास पाचव्या वेतन आयोगानुसार रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे व सहाव्या वेतन आयोगाच्या संरचनेत वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४३०० मंजूर करण्यात आलेले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सहाय्यक राज्य चिटणीस या पदास मंजूर करण्यात आलेली वेतनसंरचना योग्य आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

३) जिल्हा संघटक

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार जिल्हा संघटक या पदास मंजूर करण्यात आलेली वेतनसंरचना योग्य आहे.

४) सहाय्यक संघटन आयुक्त

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सहाय्यक संघटन आयुक्त या पदास मंजूर करण्यात आलेली वेतनसंरचना योग्य आहे.

५) जिल्हा स्काऊट संघटक

संघटनेचे अभिप्राय:- जिल्हा संघटक व सहाय्यक संघटन आयुक्त यांच्याप्रमाणे जिल्हा स्काऊट संघटक ही सर्व पदे समकक्ष असून जिल्हा स्काऊट संघटक हे प्रशिक्षित पदवीधर शिक्षकाच्या पदाच्या समकक्ष आहेत. जिल्हा स्काऊट संघटक या पदावरील कर्मचाऱ्यास संपूर्ण जिल्ह्याचा दौरा करुन प्राथमिक व माध्यमिक शाळांना भेटी देणे, शिक्षकांना मार्गदर्शन करणे, संपूर्ण जिल्हास्तरीय संघटन कार्य करणे आणि राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तसेच त्यांना राष्ट्रीय संस्थेने ठरवून दिलेले उद्दीष्ट पूर्ण करावे लागते.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईडस्, मुंबई संस्थेने जिल्हा स्काऊट संघटक पदाच्या कर्तव्ये जबाबदाऱ्यांबाबत केलेले समर्थन पाहाता या पदास सुधारित वेतनसंरचनेत रु. २८०० ग्रेड वेतन मंजूर करण्याविषयी प्रस्तावित करण्यात येत आहे. जिल्हा स्काऊट संघटक या संवर्गात ३९ मंजूर पदे आहेत.

<u>समितीची शिफारस</u> :-

३) जिल्हा संघटक

४) सहाय्यक संघटन आयुक्त

५) जिल्हा स्काऊट / गाईड संघटक

जिल्हा संघटक, सहाय्यक संघटन आयुक्त व जिल्हा स्काऊट संघटक हे सर्व संवर्ग समकक्ष आहेत तसेच जिल्हा स्काऊट संघटक या संवर्गात ३९ मंजूर पदे आहेत असे प्रशासकीय विभागाच्या अभिप्रायांत नमूद केले आहे. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एससीजी-२००६/(१६३/०६)/माशि-७ दि. २८ जून, २००७ अन्वये मंजूर आकृतीबंधानुसार जिल्हा संघटक (३ पदे), सहाय्यक संघटन आयुक्त (१६ पदे), जिल्हा स्काऊट संघटक (१० पदे), जिल्हा गाईड संघटक (२ पदे) व जिल्हा स्काऊट / गाईड संघटक (८ पदे) अशी पदांची विभागणी आहे. हाच आकृतीबंध शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. भास्कागा-१११/ प्र.क्र.८२/क्रीयुसे-३ दि. २० सप्टेंबर, २०११ अन्वये कायम ठेवण्यात आला आहे.

वरीलपैकी जिल्हा संघटक / सहाय्यक संघटन आयुक्त या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी रू.४५००-७००० विचारात घेऊन वेतनबँड पीबी-१: रू.५२००-२०२०० अधिक रू.२८०० ग्रेड वेतन ही समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेत त्रुटी नाहीत. तथापि, वरील परिच्छेदातील वस्तुस्थिती विचारात घेता उर्वरित समकक्ष जिल्हा स्काऊट संघटक (१० पदे), जिल्हा गाईड संघटक (२ पदे) व जिल्हा स्काऊट / गाईड संघटक (८ पदे) या संवर्गांना वरीलप्रमाणेच वेतनबँड पीबी-१: रू.५२००-२०२०० अधिक रू.२८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

# ३.१८ - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | समाजकल्याण संचालनालय | | | | | |
| १ | सहाय्यक संचालक / विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी | ७४५०-११५०० | ९३००-३४८०० | ५००० | १५६००-३९१०० | ५४०० |
| २ | समाजकल्याण निरीक्षक | ४५००-७००० | ५२००-२०२०० | २८०० | ९३००-३४८०० | ४२०० |

१) सहाय्यक संचालक / विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी / समाजकल्याण अधिकारी, गट अ, जिल्हा परिषद

संघटनेचे अभिप्राय :- १९८१ साली समाज कल्याण विभागामधून आदिवासी विकास विभागाची निर्मिती करण्यात आली. पाचव्या वेतन आयोगामध्ये आदिवासी विकास विभागातील गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांना रू.८०००-२७५-१३५०० तर समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांना रू.७४५०-२२५-११५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. सहाव्या वेतन आयोगानुसारही असांच अन्यायकारक फरक करण्यात आला आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वरील अभिप्रायांशी सहमत आहे.

समितीची शिफारस :-

या संवर्गाची तिसऱ्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रू.६८०-१२५० ही होती. इतर प्रशासकीय विभागांतील संवर्गांप्रमाणेच या संवर्गास वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या मंजूर केल्या आहेत. रू.६८०-१२५० या वेतनश्रेणीतील गट-अ मधील संवर्गांना पाचव्या वेतन आयोगात रू.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी तर सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन ही समकक्ष वेतनसंरचना अनुज्ञेय आहे. तसेच तिसऱ्या वेतन आयोगातील रू.६८०-१५०० या वेतनश्रेणीस पाचव्या वेतन आयोगात रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी तर सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन ही समकक्ष वेतनसंरचना अनुज्ञेय आहे.

सन १९८१ पूर्वी आदिवासी विकास विभागात (पूर्वीचा समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा आणि पर्यटन विभाग) रू.६८०-१२५० या वेतनश्रेणीत असलेल्या कोणत्याही संवर्गास पाचव्या वेतन आयोगात रू.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर केल्याचे दिसून येत नाही. आदिवासी विकास विभागामध्ये पाचव्या वेतन आयोगात रू.८०००-१३५०० या वेतनश्रेणीमध्ये असणारे संवर्ग नंतरच्या काळात निर्माण केलेले दिसतात.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी व गट-अ दर्जा विचारात घेऊन वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रू.५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर केली आहे. या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२) समाजकल्याण निरीक्षक

संघटनेचे अभिप्राय :- समाजकल्याण निरीक्षक या पदाशी समतुल्य इतर विभागातील पदांना पाचव्या वेतन आयोगामध्ये रू.५०००-८००० तर समाजकल्याण निरीक्षकांना रू.४५००-७००० ही वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. वरिष्ठ लिपिक संवर्गातून समाजकल्याण निरीक्षक व प्रमुख लिपिक पदावर पदोन्नती देण्यात येते. पाचव्या आयोगाप्रमाणे प्रमुख लिपिकाची वेतनश्रेणी रू.५०००-८००० आहे. सहाव्या वेतन आयोगानुसारही असाच अन्यायकारक फरक करण्यात आला आहे. यामध्ये समानता असणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- वरील अभिप्रायांशी सहमत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

प्रमुख लिपिक संवर्गातून बदलीने समाजकल्याण निरीक्षक संवर्गात नियुक्ती देण्याची सेवाप्रवेश नियमात तरतूद आहे. तसेच वरिष्ठ लिपिक संवर्गातून समाजकल्याण निरीक्षक व प्रमुख लिपिक पदावर पदोन्नती देण्यात येते. समाजकल्याण निरीक्षक व प्रमुख लिपिक या संवर्गाच्या वेतनसंरचना अनुक्रमे वेतनबँड पीबी-१: रू. ५२००-२०२०० अधिक रू. २८०० ग्रेड वेतन आणि वेतनबँड पीबी-२: रू. ९३००-३४८०० अधिक रू.४२०० ग्रेड वेतन अशा आहेत. वरिष्ठ लिपिक संवर्गातून समाजकल्याण निरीक्षक व प्रमुख लिपिक या संवर्गात पदोन्नती देण्यात येत असल्याने पदांच्या उपलब्धतेनुसार काही कर्मचारी समाजकल्याण निरीक्षक संवर्गात तर काही प्रमुख लिपिक संवर्गात पदोन्नत होणे साहजिकच आहे. अशा परिस्थितीत सेवाज्येष्ठ कर्मचारी समाजकल्याण निरीक्षक संवर्गात आणि सेवाकनिष्ठ कर्मचारी प्रमुख लिपिक संवर्गात पदोन्नत झाल्यास सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने ते अन्यायकारक ठरेल.

सदर वस्तुस्थिती विचारात घेता समाजकल्याण निरीक्षक संवर्गास प्रमुख लिपिक संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-२: रू. ९३००-३४८०० अधिक रू.४२०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. (प्रमुख लिपिक संवर्गाचे सेवाप्रवेश नियम समितीच्या अवलोकनार्थ उपलब्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे सेवाप्रवेश नियमांची खातरजमा करूनच यासंबंधी निर्णय घ्यावा.)

## ३.१९ - आदिवासी विकास विभाग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतन संरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | आयुक्त, आदिवासी विकास | | | | | |
| १ | माध्यमिक मुख्याध्यापक | ७५००-१२००० | ९३००-३४८०० | ४८०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८०० | ४८००<br>५६०० |
| २ | कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १)९३००-३४८००<br>२)१५६००-३९१००<br>३)१५६००-३९१०० | ४६००<br>५४००<br>५७०० |
| ३ | प्राथमिक मुख्याध्यापक | १)५५००-९०००<br>२)६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)७५००-१२५०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८०० (वरिष्ठ श्रेणी)<br>३)९३००-३४८०० (२०% पदांसाठी निवडश्रेणी) | ४३००<br>४४००<br>४८०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br>३)९३००-३४८०० | ४३००<br>४४००<br>४९०० |
| ४ | केंद्र प्रमुख | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४३०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br>३)९३००-३४८०० | ४४००<br>४५००<br>४९०० |
| ५ | क्रीडा शिक्षक (आदर्श आश्रम शाळा) | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | १)९३००-३४८००<br>२)९३००-३४८००<br>३)९३००-३४८०० | ४४००<br>४५००<br>४९०० |

१) माध्यमिक मुख्याध्यापक

संघटनेचे अभिप्राय :- सदर पदासाठी वरिष्ठ वेतनश्रेणी दर्शविण्यात आलेली नाही. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि. ३ जून, २००० नुसार त्या विभागाकडील माध्यमिक मुख्याध्यापकांच्या वेतनश्रेणीतील वरिष्ठ वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० याऐवजी रु.९१२५-१४०७५ ही असुधारित वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर केली असून त्यानुसार वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबत मागणी केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि. ३ जून, २००० नुसार विभागातील माध्यमिक मुख्याध्यापकांना वरिष्ठ वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० या ऐवजी रु.९१२५-१४०७५ ही असुधारित वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याबाबत विभागास प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आल्यानंतर सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित द्विस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गास शालेय शिक्षण विभागातील मुख्याध्यापक संवर्गाशी समकक्ष ठरविले आहे. या संवर्गास चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगात

शालेय शिक्षण विभागातील मुख्याध्यापक संवर्गाप्रमाणे अनुक्रमे रू.२०००-३५००, रू.२२००-४००० (वरिष्ठ श्रेणी) आणि रू.७५००-१२०००, रू.८०००-१३५०० (वरिष्ठ श्रेणी ) या वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. तथापि, शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.एचएससी १३००/(२८०३/२०००)/उमाशि-१, दि. ३ जून, २००० अन्वये शालेय शिक्षण विभागातील मुख्याध्यापक संवर्गास रू.८०००-१३५०० ऐवजी मंजूर केलेल्या रू.९१२५-१४०७५ या वेतनश्रेणीचा लाभ या संवर्गास दिला गेला नाही. तसेच सहाव्या वेतन आयोगात रू.८०००-१३५०० या वेतनश्रेणीशी समकक्ष वरिष्ठ वेतनसंरचनादेखील मंजूर केली नाही.

या संवर्गास शालेय शिक्षण विभागातील समकक्ष मुख्याध्यापक संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्याची वेतन समानीकरण समितीची शिफारस व त्यानुसार शासनाने स्वीकारलेले धोरण विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन व वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रु.५७०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी) ही द्विस्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक

<u>संघटनेचे अभिप्राय :-</u> शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: एचएससी-१३००/(२८०३)/ उमाशि-१ दि. ३ जून, २००० नुसार सदर पदांना पाचव्या वेतन आयोगानुसार रू.७२२५-११०५०, रू.८०००-२७५-१३५०० व रु.९१२५-१४०७५ ही असुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून सहाव्या वेतन आयोगानुसार सदर पदांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना दर्शविलेली असल्याने शालेय शिक्षण विभागातील पदांनुसार सदर पदांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात यावी.

<u>प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-</u> शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक: शाआशा २००८/प्र.क्र.२३९/का.१, दि.४ ऑगस्ट, २००८ नुसार विभागातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना रु.७२२५-२२५-११०५०, रु.८०००-२७५-१३५०० आणि रु.९१२५-२७५-१४०७५ अशी सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी दि.१ मार्च, २००० पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे सदर पदांच्या वेतनसंरचनेत सुधारणा करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

सदर संवर्ग चौथ्या वेतन आयोगात आढळून येत नाही. पाचव्या वेतन आयोगात शालेय शिक्षण विभागातील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक संवर्गास (द्वितीय श्रेणीतील पदव्युत्तर पदवी आणि बी.एड.- पूर्ण अर्हताधारक) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.एचएससी १३००/(२८०३/२०००)/उमाशि-१, दि. ३ जून, २००० अन्वये मंजूर केलेली रु.७२२५-११०५०, रु.८०००-१३५०० (वरिष्ठ श्रेणी), रु.९१२५-१४०७५ (निवड श्रेणी) ही त्रिस्तरीय वेतनश्रेणी या संवर्गास शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.शाआशा-२००३/प्र.क्र.८८/का.१३, दि.३ ऑक्टोबर, २००६ आणि शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.शाआशा-२००८/प्र.क.२३९/का.१, दि.४ ऑगस्ट, २००८ (आदिवासी विकास विभाग, शुध्दीपत्रक क्र.शाआशा-२००३/प्र.क.८८/का.१३, दि.७ नोव्हेंबर, २००६) अन्वये मंजूर केली होती. तसेच आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील अनुदानित शिक्षण संस्थांमधील उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांतील पूर्णवेळ शिक्षकांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.सवेआ-२००९/प्र.क्र.१२०/का.११, दि.२९ ऑक्टोबर, २००९ अन्वये वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन, वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन (वरिष्ठश्रेणी), वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५७०० ग्रेड वेतन (निवडश्रेणी) ही त्रिस्तरीय वेतनसंरचना मंजूर केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गास शालेय शिक्षण विभागाप्रमाणे वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४६०० ग्रेड वेतन, वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४००

ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी), वेतनबँड पीबी-३ : रु.१५६००-३९१०० अधिक रु.५७०० ग्रेड वेतन (निवड श्रेणी-२०% पदांसाठी) ही त्रिस्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३) प्राथमिक मुख्याध्यापक

संघटनेचे अभिप्राय :- शालेय शिक्षण विभागाकडील प्राथमिक मुख्याध्यापक पदास सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन, वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन व वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४९०० ग्रेड वेतन अशी त्रिस्तरीय वेतनसंरचना दर्शविण्यात आली आहे. परंतु विभागातील प्राथमिक मुख्याध्यापक पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन व वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना दर्शविण्यात आली असून त्या पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान असल्याने तसेच विभागाच्या आश्रमशाळा या निवासी आश्रमशाळा असल्यामुळे वेतनश्रेणीत सुधारणा होण्याबाबत मागणी केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- पाचव्या वेतन आयोगानुसार शासन अधिसूचना, दि.१० डिसेंबर, १९९८ अन्वये प्राथमिक मुख्याध्यापकांची सुधारित वेतनश्रेणी रु.५५००-९०००, रु.६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी) व रु.७५००-१२००० (निवड श्रेणी) ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ मधील पृ.क्र.३७५ वर शालेय शिक्षण विभागाकडील प्राथमिक मुख्याध्यापकांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन, वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन व वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४९०० ग्रेड वेतन अशी वेतनसंरचना दर्शविण्यात आलेली आहे. आदिवासी विकास विभागातील प्राथमिक मुख्याध्यापकांनादेखील वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन, वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन व वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना दर्शविण्यात आलेली आहे. करिता संघटनेची मागणी मान्य करता येत नाही. सुधारणा करताना निवडश्रेणीस रु.४९०० ग्रेड वेतन दर्शविण्यात आलेले नाही.

समितीची शिफारस :-

या संवर्गास शालेय शिक्षण विभागातील प्राथमिक मुख्याध्यापक संवर्गाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामध्ये त्रुटी नाही. मागणी केलेले ग्रेड वेतन रु.४९०० (निवड श्रेणी) हे केंद्र प्रमुख संवर्गास अनुज्ञेय असल्याने या संवर्गाची मागणी समर्थनीय नाही.

४) केंद्र प्रमुख

संघटनेचे अभिप्राय :- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दि.४ मार्च, १९९९ अन्वये केंद्र प्रमुखांना सुधारित वेतनश्रेणी रु.५५००-९०००, रु.६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी), रु.७५००-१२००० (निवड श्रेणी) ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. परंतु सहाव्या वेतन आयोगानुसार सदर पदाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करताना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४९०० ग्रेड वेतन ही निवडश्रेणी दर्शविण्यात आलेली नाही. यास्तव सदर पदांच्या वेतनसंरचनेत सुधारणा होण्याबाबत मागणी केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, ४ मार्च, १९९९ अन्वये केंद्र प्रमुखांना सुधारित वेतनश्रेणी रु.५५००-९०००, रु.६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी), रु.७५००-१२००० (निवड श्रेणी) ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. त्यानुसार सहाव्या वेतन आयोगात केंद्र प्रमुखांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन, वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४५०० ग्रेड वेतन व वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४९०० ग्रेड वेतन अशी वेतनसंरचना मंजूर करणे आवश्यक आहे. परंतु सहाव्या वेतन आयोगानुसार केंद्र प्रमुख पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन हीच वेतनसंरचना दर्शविण्यात आली आहे. ती चुकीची दिसून येत आहे. त्रिस्तरीय वेतनसंरचना दर्शविण्यात आलेली नाही. तरी संघटनेची मागणी रास्त असून त्यानुसार सदर पदाच्या वेतनसंरचनेत सुधारणा होण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

चौथ्या वेतन आयोगात हा संवर्ग आढळून येत नाही. पाचव्या वेतन आयोगात या संवर्गास शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१११९/प्र.क्र.१/९९/का.१९, दि.४ मार्च, १९९९ अन्वये शालेय शिक्षण विभागातील केंद्र प्रमुख (प्रशिक्षित पदवीधर) संवर्गाप्रमाणे रु.५५००-९००० (विशेष वेतन रु.२५०), रु.६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी), रु.७५००-१२००० (निवड श्रेणी) ही त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर केली आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन, वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४५०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी), वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४९०० ग्रेड वेतन (निवड श्रेणी - २०% पदांसाठी) ही त्रिस्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५) क्रीडा शिक्षक (आदर्श आश्रम शाळा)

संघटनेचे अभिप्राय :- शासन अधिसूचना, वित्त विभाग, दि. १९ ऑगस्ट, २००३ नुसार विभागाकडील क्रीडा शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.५५००-९०००, रु.६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी) व रु.७५००-१२००० (निवड श्रेणी) अशी सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. परंतु सहाव्या वेतन आयोगानुसार सदर पदासाठी वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन अशी वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. पाचव्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या वेतनश्रेणीनुसार सुधारित वेतन आयोगात क्रीडा शिक्षकांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन, वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन व वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४९०० ग्रेड.वेतन अशी वेतनसंरचना मंजूर होण्याबाबत मागणी केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- शासन अधिसूचना, वित्त विभाग, दि. १९ ऑगस्ट, २००३ नुसार विभागाकडील क्रीडा शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगनुसार रु.५५००-९०००, रु.६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी) व रु.७५००-१२००० (निवड श्रेणी) अशी सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. परंतु सहाव्या वेतन आयोगानुसार सदर पदासाठी वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन अशी वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. ती चुकीची दिसून येत आहे. कृपया पडताळणी करावी. पाचव्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या वेतनश्रेणीनुसार सुधारित वेतन आयोगात क्रीडा शिक्षकांना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन, वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४५०० ग्रेड वेतन व वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक रु.४९०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देय ठरते, असे मत आहे. त्यानुसार सदर पदाच्या वेतनसंरचनेत सुधारणा होण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगात शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपूर-१२०३ /सुधारणा-१०९/२००३/सेवा-९, दि.१९ ऑगस्ट, २००३ अन्वये शालेय शिक्षण विभागातील शारिरीक प्रशिक्षण निदेशक संवर्गाप्रमाणे रु.५५००-९०००, ६५००-१०५०० (वरिष्ठ श्रेणी), रु.७५००-१२००० (निवड श्रेणी) (प्रशिक्षित पदवीधर व तत्सम निदेशकांसाठी) आणि रु.४५००-७०००, रु.५०००-८००० (वरिष्ठ श्रेणी), रु.५५००-९००० (निवड श्रेणी) (प्रशिक्षित मॅट्रिक निदेशकांसाठी) या त्रिस्तरीय वेतनश्रेण्या मंजूर केल्या होत्या. या वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना वेतनबँड पीबी-२:. रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन, वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४४०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी), वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४८०० ग्रेड वेतन (निवड श्रेणी २०% पदांसाठी) (प्रशिक्षित पदवीधर व तत्सम निदेशकांसाठी) आणि वेतनबँड पीबी-१: रु.५२००-२०२०० अधिक रु.२८०० ग्रेड वेतन, वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन (वरिष्ठ श्रेणी), वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४३०० ग्रेड वेतन (निवड श्रेणी

२०% पदांसाठी) (प्रशिक्षित मॅट्रिक निदेशकांसाठी) याप्रमाणे त्रिस्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

प्रसंगत: असेही नमूद करण्यात येते की, शालेय शिक्षण विभागाप्रमाणे वर नमूद संवर्गांच्या शैक्षणिक अर्हता संबंधित आदेशांमध्ये नमूद करणे उचित राहील. तसेच पदनामे शालेय शिक्षण विभागाप्रमाणे करण्याबाबत तपासणी करणे योग्य होईल असे समितीचे मत आहे.

# ३.२० - जलसंपदा विभाग

## प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रूपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रूपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द) - विविध मंत्रालयीन विभागांतील विशिष्ट पदे - जलसंपदा विभाग | | | | | |
| १ | सचिव | १८४००-२२४०० | ३७४००-६७००० | १०,००० | ३७४००-६७००० | १२,००० |
| २ | कार्यकारी अभियंता व पदसिध्द अवर सचिव | १०६५०-१५८५० (अधिक विशेष वेतन रु. ४५०) | १५६००-३९१०० | ६,६०० | १) १५६००-३९१०० २) १५६००-३९१०० (निवडश्रेणी - ५ वर्षानंतर) (अधिक विशेष वेतन रु.१२००) | ६,६०० ७६०० |
| ३ | उप अभियंता | ८०००-१३५०० (अधिक विशेष वेतन रु.३२०) | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० (अधिक विशेष वेतन रु.७००) | ५,४०० |
| | ब) पाटबंधारे विभाग (मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व सर्व प्रादेशिक मंडले यांसहित) | | | | | |
| १ | मुख्य अभियंता | १६४००-२०९०० | ३७४००-६७००० | ८९०० | ३७४००-६७००० | १०००० |
| २ | अधीक्षक अभियंता | १) १२००० -१६५०० (अधिक ४ पदांसाठी विशेष वेतन रु.७००) २)१४३००-१८३०० (निवडश्रेणी - २०% पदांसाठी) | १५६००-३९१०० ३७४००-६७००० (निवडश्रेणी - २०% पदांसाठी) | ७,६०० ८७०० | ३७४००-६७००० (संशोधन व संकल्पनेच्या कामांशी संबंधित ५ पदांसाठी विशेष वेतन रु.१८००) | ८,७०० |
| ३ | अधीक्षक अभियंता व प्रशासक (लाक्षेवि) | १२००० -१६५०० (अधिक विशेष वेतन रु.७००) | १५६००-३९१०० | ७,६०० | ३७४००-६७००० (अधिक विशेष वेतन रु.१८००) | ८,७०० |
| ४ | प्राचार्य व संचालक | १२००० -१६५०० ( अधिक विशेष वेतन रु.७००) | १५६००-३९१०० | ७,६०० | १५६००-३९१०० (अधिक विशेष वेतन रु.१८००) | ७,६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | कार्यकारी अभियंता | १०६५०-१५८५० (अधिक २३ पदांसाठी विशेष वेतन रु.६००) | १५६००-३९१०० | ६,६०० | १)१५६००-३९१०० २)३७४००-६७००० (निवडश्रेणी - ५ वर्षांनंतर) (संशोधन व संकल्पनेच्या कामांशी संबंधित २६ पदांसाठी विशेष वेतन रु.१५००) | ६६०० ७६०० |
| ६ | कार्यकारी अभियंता व प्राचार्य | १००००-१५२०० (अधिक विशेष वेतन रु. ६००) | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० (अधिक विशेष वेतन रु.१५००) | ६,६०० |
| ७ | सहाय्यक प्राध्यापक | १००००-१५२०० (अधिक विशेष वेतन रु. ६००) | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० (अधिक विशेष वेतन रु.१५००) | ६,६०० |
| ८ | उप संचालक (व्यावसायिक परीक्षा/ प्रशासन) | १००००-१५२०० ( अधिक विशेष वेतन रु. ६००) | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० (अधिक विशेष वेतन रु.१५००) | ६,६०० |
| ९ | प्रपाठक | १००००-१५२०० ( अधिक विशेष वेतन रु. ६००) | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० (अधिक विशेष वेतन रु.१५००) | ६,६०० |
| १० | सहाय्यक कार्यकारी अभियंता | ८०००-१३५०० (उच्च प्रारंभिक वेतन रु.८५५०) (अधिक १०३ पदांसाठी विशेष वेतन रु.३२०) | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० | ६,००० |
| ११ | उप अभियंता | ८०००-१३५०० (उच्च प्रारंभिक वेतन रु.८५५०) (अधिक १०३ पदांसाठी विशेष वेतन रु.३२०) | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० (संशोधन व संकल्पनेच्या कामांशी संबंधित ११६ पदांसाठी विशेष वेतन रु.७००) | ५,४०० |
| १२ | वरिष्ठ भूवैज्ञानिक | ८०००-१३५०० (अधिक एका पदासाठी विशेष वेतन रु.४००) | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० (अधिक विशेष वेतन रु.१०००) | ५,४०० |
| १३ | उप संचालक (कृषि) | ८०००-१३५०० ( अधिक विशेष वेतन रु.४००) | १५६००-३९१०० | ५,४०० | १५६००-३९१०० ( अधिक विशेष वेतन रु.१०००) | ५,४०० |
| १४ | सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ४,६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | पात्यनिर्देशक | ६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु.३००) | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० (अधिक विशेष वेतन रु.७५०) | ४,४०० |
| १६ | सहाय्यक संचालक | ६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु.३००) | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० (अधिक विशेष वेतन रु.७५०) | ४,४०० |
| १७ | वैज्ञानिक अधिकारी | ६५००-१०५०० (अधिक विशेष वेतन रु.३००) | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० (अधिक विशेष वेतन रु.७५०) | ४,४०० |
| १८ | सहाय्यक भूवैज्ञानिक | ६५००-१०५०० (अधिक एका पदासाठी विशेष वेतन रु. ३२०) | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० (अधिक विशेष वेतन रु.७५०) | ४,४०० |
| १९ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २,४०० | १)५२००-२०२००<br>२)९३००-३४८०० (५ वर्षांच्या सेवेनंतर) | २४००<br>४,२०० |
| २० | विशेष अधीक्षक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | १५६००-३९१०० | ५,००० |
| २१ | अधीक्षक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४,३०० | ९३००-३४८०० | ४,४०० |
| २२ | प्रथम लिपिक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | ९३००-३४८०० | ४,३०० |
| २३ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २,४०० | ५२००-२०२०० | २,८०० |
| २४ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १,९०० | ५२००-२०२०० | २,००० |
| | क) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी व संशोधन संस्था, नाशिक | | | | | |
| १ | अधीक्षक अभियंता व सह संचालक | १) १२००० -१६५०० (अधिक विशेष वेतन रु.७००)<br>२)१४३००-१८३०० (निवडश्रेणी - २०% पदांसाठी) | १५६००-३९१००<br>३७४००-६७००० (निवडश्रेणी - २०% पदांसाठी) | ७,६००<br>८७०० | ३७४००-६७००० (संशोधन व संकल्पनेच्या कामांशी संबंधित ५ पदांसाठी विशेष वेतन रु.१८००) | ८,७०० |
| २ | कार्यकारी अभियंता / वरिष्ठ भूभौतिक तज्ञ | १००००-१५२०० ( अधिक एका पदासाठी विशेष वेतन रु.६००) | १५६००-३९१०० | ६,६०० | १५६००-३९१०० (अधिक विशेष वेतन रु.१५००) | ६,६०० |
| ३ | वैज्ञानिक अधिकारी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४,४०० | ९३००-३४८०० | ४,८०० |
| ४ | वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४,३०० | ९३००-३४८०० | ४,६०० |
| ५ | कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४,२०० | ९३००-३४८०० | ४,४०० |

अ) मंत्रालयीन विभाग (खुद्द) - विविध मंत्रालयीन विभागांतील विशिष्ट पदे - जलसंपदा विभाग

१) सचिव

संघटनेचे अभिप्राय :-

सचिव हे पद महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेतील सर्वोच्च पद आहे. केंद्र शासनाकडील चेअरमन, केंद्रीय जल आयोग हे पद नियुक्तीने भरण्याची तरतूद आहे. सदर नियुक्तीसाठी रु.२२४००-२४५०० या वेतनश्रेणीमध्ये दोन वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. ही वेतनश्रेणी केंद्रातील एडीजी मेंबर या पदाची आहे. राज्यातील सचिव पदांना रु.१८४००-२२४०० अशी खूप कमी वेतनश्रेणी असल्यामुळे नियुक्तीसाठी ते पात्र होत नाहीत. राज्यातील अभियंत्यांनी देश स्तरावर काम करुन राज्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी व राज्याचे प्रकल्प गतिमान करण्यासाठी केंद्र शासनाच्या एडीजी मेंबर या पदासमकक्ष वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे.

ओघाने असेही नमूद करण्यात येते की, राज्यातील सचिव पदांना रु.१८४००-२२४०० ही वेतनश्रेणी सेवेच्या उत्तरार्धात साधारणत: २ ते ३ वर्षांसाठी मिळते. त्यामुळे ते रु.२२४००-२४५०० या वेतनश्रेणीमध्ये जाऊन २ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवारत राहू शकत नाहीत. या स्थितीमुळे केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणीची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्याकडील अभियांत्रिकी सेवेतील समकक्ष पदांना वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु.१२००० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात यावी असा प्रस्ताव विभागाने योग्य त्या समर्थनासह वेतन सुधारणा समितीसमोर यापूर्वीच सादर केला होता. मात्र सदर वेतनसंरचना या पदाला मंजूर करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर त्रुटीचे निवारण करणे आवश्यक आहे.

केंद्रामध्ये डायरेक्टर जनरल तथा सचिव अथवा मेंबर व सचिव असे पद असून त्यांची वेतनश्रेणी रु.२६०००/- नियत ही आहे. राज्यातील सचिवांना त्यांच्या कामाची व्याप्ती, जबाबदारी, विविध स्तरावरील निर्णय, अर्थसंकल्पाची अंमलबजावणी इत्यादी बाबी पहाता ही वेतनश्रेणी देणे न्यायप्रद ठरते. तथापि, राज्याच्या मुख्य सचिवांना ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. सबब, या पदास केंद्र शासनापेक्षा एक टप्प्याने खालची वेतनश्रेणी देण्याच्या प्रघाताप्रमाणे रु.२२४००-२६००० अशी वेतन श्रेणी देय ठरते. ही वेतनश्रेणी केंद्र शासनाच्या ॲडीशनल डायरेक्टर जनरलची पदाची आहे. ती राज्यातील अभियांत्रिकी सेवा विभागाच्या सचिवांना देणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी सचिवांच्या सेवेचा हा अंतिम टप्पा आहे. केंद्र शासनाकडे या पदाच्या पुढे आणखी किमान दोन पदांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडील अध्यक्ष, केंद्रीय जल आयोग, हे पद पदोन्नतीने त्याचबरोबर प्रतिनियुक्तीनेही भरण्याची तरतूद आहे. हे पद प्रतिनियुक्तीने भरताना रु.२२४००-२४५०० या वेतनश्रेणीत ज्यांची दोन वर्षांची सेवा झालेली आहे अशा केंद्र शासन, राज्य शासन व केंद्रशासित प्रदेशातील अधिकाऱ्यांचा विचार केला जातो. परंतु महाराष्ट्र राज्याच्या सचिवांची वेतनश्रेणी रु.१८४००-२२४०० अशी असल्यामुळे निव्वळ वेतनश्रेणीच्या समकक्षतेमुळे अध्यक्ष पदाकरीता या राज्यातील सचिव व समकक्ष पदावरील अधिकाऱ्यांचा प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जात नाही. त्यामुळे राज्यातील वरिष्ठ अभियंत्यांना या पदावर अर्ज करताना समस्या निर्माण होते. राज्यातील अभियंत्यानी देशस्तरावर काम करुन राज्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी त्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर वेतनश्रेणी देणे आवश्यक आहे. त्यानुसार या वेतनश्रेणीला केंद्र शासनामध्ये वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु.१२००० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. सदर वेतनसंरचना महाराष्ट्रातील जलसंपदा विभागाच्या सचिवांना देण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

सचिव, जलसंपदा विभाग या संवर्गात राज्याच्या अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्यांमधून नियुक्ती केली जाते. सचिव हे अभियांत्रिकी सेवेतील अधिकारी असले तरी वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) सचिव, जलसंपदा विभाग आणि इतर प्रशासकीय विभागांचे सचिव

(भारतीय प्रशासन सेवा) या संवर्गांना रु.५९००-६७०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार सचिव, जलसंपदा विभाग या संवर्गास ही वेतनश्रेणी मंजूर केली होती.

सचिव, जलसंपदा विभाग संवर्गास केंद्र शासनाकडील अभियांत्रिकी सेवेतील संवर्गाशी समकक्षता प्रदान केलेली नाही हे वरील वस्तुस्थितीवरून दिसून येते. त्यामुळे केंद्र शासनाकडील अभियांत्रिकी सेवेतील संवर्गाप्रमाणे उच्च वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय ठरत नाही.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगात रू.१८४००-२२४०० ही समकक्ष सुधारित वेतनश्रेणी आणि सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-४: रू.३७४००-६७००० अधिक रू.१०००० ग्रेड वेतन ही समकक्ष सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे. इतर प्रशासकीय विभागातील सचिव (भारतीय प्रशासन सेवा) संवर्गासदेखील हीच सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता सचिव, जलसंपदा विभाग संवर्गाच्या सुधारित वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२) कार्यकारी अभियंता व पदसिध्द अवर सचिव

संघटनेचे अभिप्राय :- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ३८ वरील जलसंपदा विभागाअंतर्गत अनुक्रमांक ६ येथील पद कार्यकारी अभियंता संवर्गातील असून त्यांच्याकडे मंत्रालय स्तरावर सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. ही बाब विचारात घेता संघटनेने रु.२००० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदाला रु.१२०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

३) उप अभियंता

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्याच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ३९ वरील जलसंपदा विभागाअंतर्गत अनुक्रमांक १० येथील पद उप अभियंता संवर्गातील असून त्यांच्याकडे मंत्रालय स्तरावर सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे ही बाब विचारात घेता संघटनेने रु.१५०० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदाला रु.७०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

२) कार्यकारी अभियंता व पदसिध्द अवर सचिव

३) उप अभियंता

क्षेत्रिय स्तरावरील संशोधन आणि संकल्पनाच्या कामाशी सबंधित पदधारकांना विशेष वेतन मंजूर करण्याची शिफारस आम्ही पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे. उपरोक्त नमूद कार्यकारी अभियंता व पदसिध्द अवर सचिव आणि उप अभियंता ही पदे जलसंपदा विभागात मंत्रालय स्तरावर कार्यरत असल्याने त्यांचा संशोधन आणि संकल्पनाच्या कामाशी थेट संबंध येत नसला तरी क्षेत्रिय स्तरावरील संशोधन आणि संकल्पनाच्या कामाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार अंतिम निर्णय शासनस्तरावर घेतले जातात. त्या निर्णयप्रक्रियेत उपरोक्त पदधारकांचा सहभाग येतोच. त्यामुळे या पदधारकांनाही त्या कामांच्या अनुषंगाने त्या क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान असणे अपेक्षित आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता उपरोक्त संवर्गांना त्या संवर्गास अनुज्ञेय असलेल्या ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे. मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

ब) पाटबंधारे विभाग (मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना व सर्व प्रादेशिक मंडले यांसहित)

१) मुख्य अभियंता

संघटनेचे अभिप्राय :-

केंद्र शासनामध्ये तसेच अनेक राज्यांत मुख्य अभियंत्यांना रु.१०००० ग्रेड वेतन मंजूर केले आहे, तर राज्यात रु.८९०० असे कमी ग्रेड वेतन मंजूर केले आहे. वास्तविक राज्यातील व केंद्र शासनाकडील अभियंत्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्तीची पद्धती व पदोन्नतीची पात्रता समान आहे. राज्यातील अभियंत्याना पदोन्नती विलंबाने मिळते; शिवाय त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तुलनात्मकदृष्टया अवाढव्य आहेत. राज्यातील अभियंत्यांच्या सर्वेक्षण, संकल्पन, नियोजन, बांधकाम, व्यवस्थापन इत्यादी कामांचे स्वरुप विशाल आहे. केंद्र शासनाकडील अभियंत्याकडे प्रकल्प छाननीचे काम प्रामुख्याने असते. त्यामुळे किमान केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी मिळणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

केंद्र शासनाने त्यांच्याकडील मुख्य अभियंता या पदास पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.१८४००-२२४०० अशी वेतनश्रेणी दिली होती. त्यानुसार सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु. १०००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना विहित केली आहे. मात्र राज्यातील मुख्य अभियंता पदास रु.१६४००-२०९०० असे वेतनमान देण्यात येत आहे. त्यानुसार त्यांना रु. ८९०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. परंतु केंद्र शासनाकडील समकक्षता विचारात घेता मुख्य अभियंता पदास वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु. १०००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना देण्यात यावी.

मुख्य अभियंता हे प्रादेशिक विभाग प्रमुख दर्जाचे पद असून अभियांत्रिकी संवर्गातील अतिशय महत्वाचे आणि जबाबदारीचे पद आहे. इतर विभागांतील पदांपेक्षा यासंवर्गाचे महत्व कोणत्याही परिस्थितीत कमी नाही याचा विचार करता केंद्र शासनाने मुख्य अभियंता पदाला जी वेतनसंरचना दिली आहे तीच वेतनसंरचना राज्यातील पदाला देणे न्यायपूर्ण होईल. त्यादृष्टीने मुख्य अभियंत्यांची वेतनसंरचना केंद्र शासनानुसार सुधारण्याची गरज आहे. शासनसेवेत अभियंत्यांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेशी साजेशी वेतनश्रेणी दिल्यास अभियांत्रिकी शाखेतील उच्चतम गुणवत्ताधारक उमेदवार शासन सेवेत येण्यास उद्युक्त होतील व याचा फायदा विकासाची कामे जलद गतीने राबविण्यासाठी होईल.

मुख्य अभियंत्यांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी लागू न केल्याने, ज्यावेळी केंद्र शासनाकडे प्रतिनियुक्तीने समकक्ष श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका करावयाच्या असतात त्यावेळी राज्य शासनाच्या सेवेतील अभियंत्यांना केंद्र शासनाच्या सेवेत किंवा केंद्र शासनाच्या अखत्यारीतील विविध आस्थापनांमध्ये केवळ कमी वेतनश्रेणीमुळे प्रतिनियुक्तीवर जाण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे राज्य शासनातील काही अधिकारी केंद्र शासनाच्या सेवेत वेतन समकक्षतेअभावी न गेल्याने राज्य शासनाच्या विविध विकासात्मक योजनांबाबत जे हित जपणे शक्य असते त्यापासून राज्य शासन वंचित राहते.

मुख्य अभियंता पदाची वेतनश्रेणी केंद्र शासनाच्या मुख्य अभियंता पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा कमी असल्याने केंद्रीय जल आयोग, केंद्र जल संसाधन मंत्रालय, सी. बी. आय. पी. या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील संस्थांमध्ये / विभागांमध्ये राज्याच्या अभियंत्यांना शिरकाव करणे कठीण होते. सबब, केंद्र शासनाप्रमाणे वेतनसंरचना लागू केल्यास राज्याच्या हिताची दखल घेणे आपोआपच शक्य होईल.

२) अधीक्षक अभियंता

संघटनेचे अभिप्राय :-

पाचव्या वेतन आयोगानुसार केंद्र व राज्य शासनाने २० टक्के अधीक्षक अभियंता पदांना रु.१४३००-१८३०० ही निवडश्रेणी दिली होती. केंद्र शासनाने त्यामध्ये सुधारणा करून दि.६ जून, २००० रोजी सर्व पदांना रु.१४३००-१८३०० ही वेतनश्रेणी दिली आहे. त्यानुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये सर्व

अधीक्षक अभियंत्यांना वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० अधिक रु. ८७०० ग्रेड वेतन दिले आहे. त्याप्रमाणे राज्य शासनाच्या सेवेतील अधीक्षक अभियंत्यांना तीच वेतनसंरचना देण्याची मागणी आहे.

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

पाचव्या वेतन आयोगामध्ये केंद्र व राज्य शासनाने २० टक्के अधीक्षक अभियंता पदांना रु.१४३००-१८३०० ही निवडश्रेणी दिली होती. तद्नंतर केंद्र शासनाने दि.६ जून, २००० च्या अधिसूचनेनुसार त्यांच्याकडील या संपूर्ण संवर्गाला रु.१४३००-१८३०० ही वेतनश्रेणी दिली आहे. सदर सुधारित वेतनश्रेणी राज्याकडील अधीक्षक अभियंता या संवर्गासाठी देखील लागू करणे आवश्यक होते. परंतु ही सुधारणा न झाल्यामुळे अधीक्षक अभियंता संवर्गासाठी आता रु.१२०००-१६५०० या विद्यमान वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगात राज्यात पीबी-३ या वेतनबँडमध्ये रु. ७६०० इतके ग्रेड वेतन मंजूर झाला आहे. मात्र केंद्र शासनाकडील अधीक्षक अभियंता या समकक्ष पदास रु.१४३००-१८३०० या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-४ मध्ये ग्रेड वेतन रु.८७०० सध्या मंजूर झाले आहे.

पाचव्या वेतन आयोगाने अधीक्षक अभियंता या पदाच्या बाबतीत त्या पदाचे स्वरुप, जबाबदाऱ्या व त्या पदाची इतर विभागांतील पदांबरोबरची समकक्षता विचारात घेऊन त्याबाबत विशेष भाष्य केले आहे. तसेच या भाष्याच्या शेवटी सर्व अभियांत्रिकी सेवेतील सर्व अधीक्षक अभियंत्यांना लागू होईल असे म्हटले आहे. याचा विचार करता राज्यातील अधीक्षक अभियंत्यांना केंद्राप्रमाणेच समकक्षता जी चौथ्या वेतन आयोगामध्ये होतीच ती पुन:श्च बहाल करणे न्यायोचित ठरेल.

केंद्र शासनाचे सहाव्या वेतन आयोगाचे प्रसिध्दी निवेदन आहे. त्यामध्ये पोलीस सेवेतील व नागरी सेवेतील उप महानिरीक्षक, वनसंरक्षक, अधीक्षक अभियंता, संचालक आणि अतिरिक्त आयुक्त (आयकर) व (केंद्रीय उत्पादन शुल्क) या सर्व पदांना वेतनबँड पीबी-४ मध्ये रु.८७०० हे ग्रेड वेतन मिळाले आहे. त्याप्रमाणे राज्यातील अधीक्षक अभियंत्यांनाही ही वेतनसंरचना देण्यात यावी.

राज्याकडील अधीक्षक अभियंत्यांना विभागप्रमुख म्हणून तांत्रिक व प्रशासकीय अधिकारी या दुहेरी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तसेच अधीक्षक अभियंत्यांवर बांधकाम, सिंचन व्यवस्थापन इत्यादी कामकाजावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यादृष्टीने अधीक्षक अभियंता हा शासन व क्षेत्रिय स्तरावरील कामकाज यातील एक महत्वाचा दुवा आहे. या बाबी विचारात घेता वर विवेचन केल्याप्रमाणे विशेषत: अधीक्षक अभियंता या पदावर सहाव्या वेतन आयोगामध्ये अन्याय झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे राज्य शासनाच्या सेवेतील अधीक्षक अभियंत्यांना केंद्र शासनाने त्यांच्याकडील पदास मंजूर केल्याप्रमाणे पीबी-४ हा वेतनबँड व ग्रेड वेतन रु. ८७०० मंजूर करावे अशी शिफारस करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक ३ येथील अधीक्षक अभियंता संवर्गातील चार पदांना त्यांच्याकडे संशोधन व संकल्पने या संदर्भात सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तसेच या विशेष वेतनपात्र चार पदांमध्ये आणखी एका पदाची वाढ करणे आवश्यक आहे. या पदाला दि.१.२.१९९० पासून विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. परंतु याबाबतची नोंद पाचव्या वेतन आयोगाच्यावेळी घेण्यात आलेली नाही. त्याची यावेळी दुरुस्ती होणे आवश्यक आहे, ही बाब विचारात घेता संघटनेने रु.२५०० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या एकूण ५ पदांना रु.१८०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

३) अधीक्षक अभियंता व प्रशासक (लाभक्षेत्र विकास)

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक ५ येथील अधीक्षक अभियंता व प्रशासक (लाक्षेवि) या पदांवरील अधिकाऱ्यांकडे संशोधन व संकल्पने यासंदर्भात सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२५०० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदांना रु.१८०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

४) प्राचार्य व संचालक

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक ४ येथील प्राचार्य व संचालक यांच्याकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२५०० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदांना रु.१८०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

५) कार्यकारी अभियंता

संघटनेचे अभिप्राय :-

केंद्र शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी सुधारुन नंतर दि.६ जून, २००० च्या अधिसूचनेनुसार वरिष्ठ कार्यकारी पदांच्या ३० टक्के कार्यकारी अभियंता पदांना ५ वर्षांच्या सेवेनंतर रुपये १२०००-१६५०० निवडश्रेणी दिली आहे. सहाव्या आयोगाने त्यानुसार ग्रेड वेतन रु.७६०० दिले आहे. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंत्यांना रु.७६०० इतके ग्रेड वेतन मिळणे आवश्यक आहे.

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

केंद्र शासनाच्या जलसंपदा मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार कार्यकारी अभियंता व त्यावरील एकूण पदांच्या ३० टक्के पदांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे ५ वर्षांच्या सेवेनंतर रु.१२०००-१६५०० ही वेतनश्रेणी दिली आहे. पुढे सहाव्या वेतन आयोगामध्ये केंद्र शासनाकडील कार्यकारी अभियंत्यांना वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.६६०० ग्रेड वेतन आणि पाच वर्षांनंतर रु.७६०० ग्रेड वेतनामध्ये समाविष्ट केले आहे. महाराष्ट्रातील कार्यकारी अभियंता पदास ही वेतनसंरचना मिळावी अशीही संघटनेची मागणी आहे. कारण केंद्र शासनाकडे ९० टक्के कार्यकारी अभियंत्यांना चौथ्या वर्षी हे पद मिळते तर महाराष्ट्रातील १० टक्के अभियंत्यांना हा लाभ होतो. या व्यतिरिक्त इतर ९० टक्के अभियंत्यांपैकी ५० टक्के अभियंत्यांना १४ व्या वर्षी तर उर्वरित अभियंत्यांना ३३ व्या वर्षी ही वेतनसंरचना मिळेल. या

स्थितीचा संदर्भ विचारात घेऊन केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी, कामाचा भार, जबाबदाऱ्या, पदोन्नतीतील अवरोधता व प्रशासकीय समकक्षता या बाबी विचारात घेऊन कार्यकारी अभियंता या संवर्गाला केंद्र शासनाप्रमाणे रु.१५६००-३९१०० या वेतनबँड मध्ये ५ वर्षांनंतर रु.७६०० ग्रेड वेतन द्यावे, अशी शिफारस करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक ६ येथील कार्यकारी अभियंत्यांच्या २३ पदांना त्यांच्याकडे संशोधन व संकल्पने यासंदर्भात सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तसेच या विशेष वेतनपात्र २३ पदांमध्ये आणखी ३ पदांची वाढ करणे आवश्यक आहे. या पदाला दि.१ फेब्रुवारी, १९९० पासून विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. परंतु याबाबतची नोंद पाचव्या वेतन आयोगाच्यावेळी घेण्यात आलेली नाही. त्याची यावेळी दुरुस्ती होणे आवश्यक आहे, ही बाब विचारात घेता संघटनेने रु.२५०० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या एकूण २६ पदांना रु.१५०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

६) कार्यकारी अभियंता व प्राचार्य

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक १२ येथील कार्यकारी अभियंता व प्राचार्य या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२००० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु.१५०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) मुख्य अभियंता
२) अधीक्षक अभियंता
३) अधीक्षक अभियंता व प्रशासक (लाभक्षेत्र विकास)
४) प्राचार्य व संचालक
५) कार्यकारी अभियंता
६) कार्यकारी अभियंता व प्राचार्य

या संवर्गांना केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे. अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे समिती या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी सहमत नाही.

विशेष वेतनासंबंधी समितीची भूमिका अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद २.२.९ मध्ये स्पष्ट केली आहे. त्यानुसार अभियांत्रिकी सेवेतील संवर्गाचा समितीने विचार केला आहे. जलसंपदा विभागातील संशोधन आणि संकल्पनाच्या कामाशी निगडीत क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान असणे अपेक्षित / आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. त्या अनुषंगाने अभियांत्रिकी क्षेत्रात होणारे बदल, आधुनिक तंत्रज्ञान, नवीन संकल्पना / प्रयोग आणि एकूणच या क्षेत्राशी निगडीत घडामोडी इत्यादीसंदर्भात जागरूक राहून त्यांचा कामकाजात अवलंब

करणे अपेक्षित आहे. यासाठी अभ्यासूवृत्तीने (Academic Interest) स्वत:चे ज्ञान अद्ययावत ठेवण्याची निकड असते. यास्तव या अभ्यासूवृत्तीच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून वर नमूद संवर्गातील ज्या विनिर्दिष्ट पदांना यापूर्वी विशेष वेतन मंजूर केले होते, त्या पदांना त्यांच्या वेतनसंरचनेतील ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

तसेच विशेष वेतन अनुज्ञेय करावयाच्या पदसंख्येत प्रशासकीय विभागाने वाढ सुचविली आहे. ही प्रशासकीय बाब असल्याने त्यासंबंधी वित्त विभागाने उचित निर्णय घ्यावा.

७) सहाय्यक प्राध्यापक

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक ९ येथील सहाय्यक प्राध्यापक या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२००० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदांना रु.१५०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

८) उप संचालक (व्यवसायिक परीक्षा / प्रशासन)

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक १० येथील उपसंचालक (व्यवसायिक परीक्षा /प्रशासन) या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२००० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदांना रु.१५०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

९) प्रपाठक

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक ११ येथील प्रपाठक या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या

अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२००० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु.१५०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

समितीची शिफारस :-

७) सहाय्यक प्राध्यापक

८) उप संचालक (व्यवसायिक परीक्षा / प्रशासन)

९) प्रपाठक

विशेष वेतनासंबंधी समितीची भूमिका वरील शिफारशींमध्ये स्पष्ट केली आहे. त्यानुसार या संवर्गातील ज्या विनिर्दिष्ट पदांना यापूर्वी विशेष वेतन मंजूर केले होते, त्या पदांना त्यांच्या वेतनसंरचनेतील ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

१०) सहाय्यक कार्यकारी अभियंता

संघटनेचे अभिप्राय :- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

सहाय्यक कार्यकारी अभियंता हे गट-अ मधील पद आहे. या पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहाय्यक अभियंता श्रेणी-१ व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ या पदासाठी घेतल्या जाणाऱ्या संयुक्त स्पर्धात्मक परिक्षेमधून उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड केली जाते. सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-१ ही दोन्ही पदे गट-अ मधील असली तरी सहाय्यक कार्यकारी अभियंता यांना चार वर्षांनंतर कार्यकारी अभियंता पदावर नियुक्ती दिली जाते. या पदावर उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड केली जाते. यास्तव त्यांना यापूर्वीच्या सर्व वेतन आयोगांमध्ये दोन वेतनवाढी देऊन उच्च प्रारंभिक वेतन देय केलेले आहे. परंतु त्यांना सहाव्या वेतन आयोगामध्ये उच्च प्रारंभिक वेतन देण्यात आलेले नाही. या पदाचा विशिष्ट दर्जा लक्षात घेता या पदास उच्च प्रारंभिक वेतन मंजूर करणे आवश्यक आहे. त्यामुळे या पदास रु.५४०० ऐवजी रु.६००० इतके ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक आहे.

समितीची शिफारस :-

सहाय्यक कार्यकारी अभियंता संवर्गास केंद्र शासनाकडील सहाय्यक कार्यकारी अभियंता संवर्गाप्रमाणे वेतनश्रेणीची मागणी आहे. या संदर्भात प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता केंद्र शासनाकडील संवर्गाप्रमाणे वेतनसंरचनेचा आग्रह धरणे योग्य होणार नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे समिती या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी सहमत नाही.

११) उप अभियंता

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे यासारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृ. क्र. ४२५ वरील अनुक्रमांक १८ येथील उप अभियंत्यांच्या १०३ पदांना त्यांच्याकडे संशोधन व संकल्पने यासंदर्भात सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. तसेच या विशेष वेतनपात्र १०३ पदांमध्ये आणखी १३ पदांची वाढ करणे आवश्यक आहे. या पदाला

दि.१फेब्रुवारी, १९९० पासून विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. परंतु, याबाबतची नोंद पाचव्या वेतन आयोगाच्यावेळी घेण्यात आलेली नाही. त्याची यावेळी दुरुस्ती होणे आवश्यक आहे, ही बाब विचारात घेता संघटनेने रु.१५०० अशी मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या एकूण ११६ पदांना रु.७०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

समितीची शिफारस :-

विशेष वेतनासंबंधी समितीच्या वरील शिफारशींमध्ये विवेचन केले आहे. त्यानुसार या संवर्गातील ज्या विनिर्दिष्ट पदांना यापूर्वी विशेष वेतन मंजूर केले होते, त्या पदांना त्यांच्या वेतनसंरचनेतील ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

तसेच विशेष वेतन अनुज्ञेय करावयाच्या पदसंख्येत प्रशासकीय विभागाने वाढ सुचविली आहे. ही प्रशासकीय बाब असल्याने त्यासंबंधी वित्त विभागाने उचित निर्णय घ्यावा.

१२) वरिष्ठ भूवैज्ञानिक

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक १४ येथील वरिष्ठ भूवैज्ञानिक या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२००० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु.१५०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

१३) उप संचालक (कृषि)

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२४ वरील अनुक्रमांक १५ येथील उप संचालक (कृषि ) या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.१८०० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु.१००० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

समितीची शिफारस :-

१२) वरिष्ठ भूवैज्ञानिक

१३) उप संचालक (कृषि)

विशेष वेतनासंबंधी समितीच्या वरील शिफारशींमध्ये विवेचन केले आहे. त्यानुसार या संवर्गातील ज्या विनिर्दिष्ट पदांना यापूर्वी विशेष वेतन मंजूर केले होते, त्या पदांना त्यांच्या

वेतनसंरचनेतील ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय करण्यात येऊ नयेत.

१४) सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता

संघटनेचे अभिप्राय :-

केंद्र शासनाकडे सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता हे राजपत्रित पद नाही. तेथे कनिष्ठ अभियंता पदवीधर /अपदवीधर असे वर्ग-३ चे (अराजपत्रित गट-क) पद आहे. त्यास सहाव्या आयोगाने परिच्छेद ३.४.७ अन्वये ग्रेड वेतन रु.४६०० दिले आहे. त्याची वेतनश्रेणी रु.६५००-१०५०० होती, ती सुधारुन सहाव्या वेतन आयोगाने रु.७४५०-११५०० दिली आहे. राज्यातील पद राजपत्रित ब गटातील असून, नियुक्ती लोकसेवा आयोगामार्फत संयुक्त परिक्षेद्वारे होते. तथापि, त्यांना रु.६५००-१०५०० हीच निम्नस्तर वेतनश्रेणी ठेवली आहे.

वास्तविक राज्यातील अभियंत्यांना पदोन्नती फार विलंबाने मिळते. शिवाय त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तुलनात्मक दृष्ट्या अवाढव्य आहेत. सदर संवर्ग क्षेत्रिय स्वरुपाचे प्रकल्पाचे काम करणारा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडील पदांपेक्षा उच्च पदांना रु.४६०० ग्रेड वेतनाऐवजी रु.२०० जास्त असे रु.४८०० ग्रेड वेतन प्रमाणबध्दतेने देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता हे राज्याकडील राजपत्रित पद आहे. असे राजपत्रित पद केंद्र शासनाकडे नाही. तेथे कनिष्ठ अभियंता पदवीधर / अपदवीधर असे वर्ग-३ चे (अराजपत्रित गट क) पद आहे. त्यास सहाव्या आयोगाने परिच्छेद ३.४.७ अन्वये रु.४६०० ग्रेड वेतन दिले आहे. त्याची वेतनश्रेणी रु.६५००-१०५०० होती, ती सुधारुन सहाव्या वेतन आयोगाने रु.७४५०-११५०० दिली आहे. राज्यातील पद राजपत्रित ब गटातील आहे. सहाय्यक अभियंता श्रेणी-२ पदावरील सेवा भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत संयुक्त परिक्षेद्वारे होते. असे असूनही या पदास रु.६५००-१०५०० ही निम्नस्तर वेतनश्रेणी ठेवली आहे.

वास्तविक राज्यातील अभियंत्यांना पदोन्नती फार विलंबाने मिळते. शिवाय त्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या तुलनात्मक दृष्ट्या अवाढव्य आहेत. सदर संवर्ग क्षेत्रिय स्वरुपाचे प्रकल्पाचे काम करणारा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडील पदांपेक्षा उच्च पदांना रु.४६०० ग्रेड वेतनाऐवजी रु.२०० जास्त असे रु.४८०० ग्रेड वेतन प्रमाणबध्दतेने द्यावे असे विभागाने प्रस्तावित केले होते. परंतु, त्याप्रमाणे ते मंजूर झालेले नाही. मात्र केंद्र शासनाकडील पदाची राज्याकडील पदाशी समकक्षता विचारात घेता या पदांना केंद्र शासनाप्रमाणे रु.४६०० इतके ग्रेड वेतन मंजूर करणे आवश्यक आहे.

<u>समितीची शिफारस :-</u>

सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता हा कनिष्ठ अभियंता संवर्गाच्या पदोन्नतीचा संवर्ग असल्याने वेतन समानीकरण समितीने चौथ्या वेतन आयोगात कनिष्ठ अभियंता संवर्गाची वेतनश्रेणी व सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता या संवर्गाची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन शिफारस केलेली रु.१६४०-२९०० वेतनश्रेणी या संवर्गास मंजूर केली होती. तद्नंतर वेतनश्रेणीमध्ये रु.२०००-३५०० अशी पुन:सुधारणा करून या संवर्गास राजपत्रित दर्जा देण्यात आला आहे. म्हणजेच या संवर्गास चौथ्या वेतन आयोगात श्रेणीवाढीचा लाभ मिळालेला आहे. पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन या संवर्गास सहाव्या वेतन आयोगात योग्य सुधारित वेतनसंरचना मंजूर केली आहे.

तसेच प्रकरण-२ मधील परिच्छेद क्र.२.३.२ मध्ये विस्तृतपणे विवेचन केलेल्या मुद्यांचा विचार करता या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेपेक्षा उच्च वेतनसंरचनेच्या मागणीशी समिती सहमत नाही.

१५) पाठ्यनिर्देशक

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२५ वरील अनुक्रमांक २६ येथील पाठ्यनिर्देशक या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु. १३०० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु.७५० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

१६) सहाय्यक संचालक

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२५ वरील अनुक्रमांक २९ येथील सहाय्यक संचालक या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.१३०० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु. ७५० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

१७) वैज्ञानिक अधिकारी

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२५ वरील अनुक्रमांक ३० येथील वैज्ञानिक अधिकारी या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या वैज्ञानिक स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.१३०० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु.७५० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

१८) सहाय्यक भूवैज्ञानिक

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४२५ वरील अनुक्रमांक ३७ येथील सहाय्यक भूवैज्ञानिक या पदावरील अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या वैज्ञानिक स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु. १५०० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु. ७५० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

समितीची शिफारस :-

१५) पाठ्यनिर्देशक

१६) सहाय्यक संचालक

१७) वैज्ञानिक अधिकारी

१८) सहाय्यक भूवैज्ञानिक

विशेष वेतनासंबंधी अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद २.२.९ मध्ये विवेचन केले आहे. त्यानुसार या संवर्गातील ज्या विनिर्दिष्ट पदांना यापूर्वी विशेष वेतन मंजूर केले होते, त्या पदांना त्यांच्या वेतनसंरचनेतील ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

१९) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय :-

कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता यांना सहाय्य करण्यासाठी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची सन १९८९ मध्ये निर्मिती करण्यात आली. या पदाची पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी रु.४०००-६००० अशी आहे. या पदाची १९८९ मध्ये निर्मिती झाली त्यावेळी सहाय्यक आरेखकांना रु.४५००-७००० व ५ वर्षांच्या सेवेनंतर रु.५०००-८००० अशी वेतनश्रेणी होती. तांत्रिक सहाय्यकांना अर्हता परीक्षा, उप अवेक्षक, सर्वेअर किंवा आरेखक ही परीक्षा मेरी औद्योगिक संस्थेमधून उत्तीर्ण असणे आवश्यक होते. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये २ वर्षे मुदतीचा आरेखक स्थापत्य अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा असे नमूद केलेले आहे. म्हणजेच सहाय्यक आरेखक व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ही पदे समान अर्हता धारण करीत आहेत. सहाय्यक आरेखकांची अर्हता परीक्षा - औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची आरेखक ही परीक्षा पास असणे आवश्यक आहे. म्हणजेच दोन्ही पदांना अर्हता परीक्षा समान असताना वेतनश्रेणीत फार मोठी तफावत आहे.

आरेखक व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या अभ्यासल्या असता स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांच्या जबाबदाऱ्या महत्वाच्या आहेत. सर्वेक्षण कक्ष, संकल्पचित्र तयार करणे, चालू असलेल्या कामावर देखरेख ठेवून कामातील कमतरता व दोष वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे आणि कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता यांना क्षेत्रिय कामात व कार्यालयीन कामात सर्व क्षेत्रांत मदत करणे अशी सहाय्यक आरेखकांपेक्षाही वरिष्ठ दर्जाची कामे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना करावी लागतात. असे असूनही समान पात्रता असणाऱ्या सहाय्यक आरेखकांपेक्षा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कमी दर्जाची वेतनश्रेणी घेत आहेत. त्यामुळे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना सहाय्यक आरेखकांना देण्यात येणारी रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी द्यावी आणि केंद्र शासनाच्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार पीबी-१ (एस-९) श्रेणीप्रमाणे दि.१.१.२००६ रोजी मूळ वेतन (ग्रेड वेतनासह) रु.१६२९० देय करण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

दि.३१.१.१९८९ रोजीच्या शासन आदेशांनुसार एकूण १२ संवर्गांचे सुसूत्रीकरण करुन स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हा संवर्ग निर्माण करण्यात आला आहे. सदर पदाचे सेवाप्रवेश नियम

दि.२६.२.२००२ रोजी अधिसूचित करण्यात आले आहेत. तसेच सहायक आरेखक या पदाचे सेवाप्रवेश नियम दि.६ जानेवारी, १९५९ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केले आहेत.

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाला रु.४०००-६००० ही विद्यमान वेतनश्रेणी आहे. तर सहाय्यक आरेखक पदासदेखील रु.४०००-६००० हीच वेतनश्रेणी असून ५ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. परंतु संघटनेने सहाय्यक आरेखकांना ५ वर्षांनंतर मिळणारी रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांना द्यावी अशी मागणी केली आहे. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व सहाय्यक आरेखक ही दोन्ही पदे वेगवेगळया संवर्गातील आहेत. या पदांच्या कामाचे स्वरुपही भिन्न आहे. मात्र या दोन्ही पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचे अवलोकन केल्यास स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाच्या कामाची व्याप्ती जास्त असल्याचे दिसून येते. सदर पद हे विविध प्रकल्पांवर पायाभूत काम करणाऱ्या कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता पदावरील अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे. क्षेत्रिय स्तरावर पायाभूत स्वरुपाचे काम ही या पदाची एक विशेष जबाबदारी आहे. या बाबी विचारात घेतल्यास स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाला सहाय्यक आरेखक पदाची वेतनसंरचना मंजूर करणे उचित होईल असे वाटते. मात्र संघटनेच्या मागणीनुसार सहाय्यक आरेखकांना ५ वर्षांनंतर मिळणाऱ्या रु.५०००-८००० या वेतनश्रेणीला सहाव्या वेतन आयोगामध्ये अनुज्ञेय वेतनबँड पीबी-२ व ग्रेड वेतन रु.४२०० सरसकटपणे मंजूर करणे योग्य ठरणार नाही. परंतु सहाय्यक आरेखक पदाशी समकक्ष अशी सहाव्या वेतन आयोगातील वेतनसंरचना म्हणजे वेतनबँड पीबी-१: रु.५२००-२०२०० अधिक रु.२४०० ग्रेड वेतन आणि ५ वर्षांच्या सेवेनंतर वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाला देण्यात यावी.

<u>समितीची शिफारस</u> :-

स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गाची सहाय्यक आरेखक संवर्गाशी तुलना करून ५ वर्षांच्या सेवेनंतर वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची मागणी केली आहे. वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) सहाय्यक आरेखक या पदाला केंद्र शासनाकडील आरेखक संवर्गातील पदाशी समकक्ष ठरविले आहे. या समकक्षतेनुसार चौथ्या व पाचव्या वेतन आयोगामध्ये सहाय्यक आरेखक या पदास केंद्र शासनाकडील पदाप्रमाणे द्विस्तरीय वेतनश्रेणी मंजूर केली आहे. मात्र, विभागातील विविध संवर्गांचे सुसूत्रीकरण करुन स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हा संवर्ग निर्माण करण्यात आला आहे. हा संवर्ग सहाय्यक आरेखक संवर्गाशी तुलनीय नाही. (या संवर्गाच्या पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीच्या संदर्भातील न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने समितीकडे प्रस्ताव सोपविला होता. त्याबाबत समितीने दि.१९ जून, २०१० रोजी स्वतंत्र अहवाल शासनास सादर केला आहे. त्यामध्ये यासंदर्भात विस्तृत विवेचन केले आहे. सदर अहवालाची प्रत परिशिष्ठ-१ मध्ये पहावी.)

या संवर्गाला पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

२०) विशेष अधीक्षक

संघटनेचे अभिप्राय :-

विशेष अधीक्षक संवर्गातील अधिकारी हे प्रशासकीय अधिकारी वर्ग-२ या दर्जाचे आहेत. त्यांना पाच ते सहा जिल्ह्यांतील प्रशासकीय कामाचा कार्यभार सांभाळावा लागतो. या पदावरील अधिकाऱ्यास इतक्या मोठया अवाढव्य प्रशासकीय कामाची माहिती संकलित करुन शासनास सादर करावी लागते. या पदावरील अधिकाऱ्यास वर्ग-१ दर्जा देणे आवश्यक आहे. मात्र वर्ग-१ दर्जा नाही तरी कमीतकमी कामाच्या अनुषंगाने सुधारित ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन पाचव्या वेतन आयोगामध्ये या पदाला रु.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर करण्याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये प्रस्ताव विचारार्थ होता. तथापि, सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे त्यावर विचार होऊ शकला नाही. त्यामुळे आता सदर पदाला पाचव्या वेतन आयोगामध्ये प्रस्तावित केलेल्या रु.७४५०-११५०० या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये देय होणारी वेतनसंरचना मंजूर करावी अशी शिफारस आहे.

२१) अधीक्षक

संघटनेचे अभिप्राय :-

अधीक्षक संवर्गातील कर्मचारी हे दोन किंवा अधिक जिल्हे व पाच ते सात विभागीय कार्यालयांच्या प्रशासकीय कामाचे नियंत्रण करतात. तसेच त्यांच्यामार्फत विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने शासनास प्रशासकीय माहिती पुरविली जाते. अधीक्षकाच्या कामाचे स्वरुप लक्षात घेता या पदास प्रशासकीय अधिकारी वर्ग-२ दर्जा देणे आवश्यक आहे. मात्र तो दर्जा नसल्याने कमीतकमी या पदास कामाच्या अनुषंगाने सुधारित वेतनबँड व ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन पाचव्या वेतन आयोगामध्ये या पदाला रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर करण्याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये प्रस्ताव विचारार्थ होता. तथापि, सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे त्यावर विचार होऊ शकला नाही. त्यामुळे आता सदर पदाला पाचव्या वेतन आयोगामध्ये प्रस्तावित केलेल्या रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये देय होणारी वेतनसंरचना मंजूर करावी अशी शिफारस आहे.

२२) प्रथम लिपिक

संघटनेचे अभिप्राय :-

प्रथम लिपिक संवर्गातील कर्मचारी एका विभागाचे प्रशासकीय प्रमुख आहेत. एका विभागांतर्गत पाच उप विभागांच्या प्रशासकीय कामाचे नियंत्रण प्रथम लिपिकामार्फत करण्यात येते. ते पाच उप विभागांतील सर्व प्रशासकीय कामाची माहिती एकत्रित करुन शासनाला आवश्यक ती माहिती पुरविण्याचे काम करीत असतात. म्हणून ते प्रशासनाचा राजपत्रित अधिकारी ठरतात. मात्र शासनाने या पदास तसा दर्जा दिला नाही. म्हणून या पदावरील कर्मचाऱ्यास दर्जा नाही तरी कामाचा व्याप लक्षात घेऊन सुधारित ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन पाचव्या वेतन आयोगामध्ये या पदाला रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी देण्याबाबताचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये प्रस्ताव विचारार्थ होता. तथापि, सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे त्यावर विचार होऊ शकला नाही. त्यामुळे आता सदर पदाला पाचव्या वेतन आयोगामध्ये प्रस्तावित केलेल्या रु.५५००-९००० या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये देय होणारी वेतनसंरचना मंजूर करावी अशी शिफारस आहे.

२३) वरिष्ठ लिपिक

संघटनेचे अभिप्राय :-

वरिष्ठ लिपिक या संवर्गातील कर्मचारी एका उप विभागाचे प्रशासकीय प्रमुख म्हणून कामाची पाहणी, जबाबदारी आणि कार्यालयीन आर्थिक व्यवहार तसेच पेन्शन, कॅशबुक, अकाऊंटवरील नोंदी करणे, एकत्रित ठेवणे तसेच विभागामध्ये अकाऊंट / बजेट, पेन्शन प्रकरण ऑडीट, कोर्ट प्रकरण इ. महत्वाची प्रशासकीय कामे सांभाळीत असल्यामुळे या पदास सुधारित वेतनबँड व ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन पाचव्या वेतन आयोगामध्ये या पदाला रु.४५००-७००० ही वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये प्रस्ताव विचारार्थ होता. तथापि, सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे त्यावर विचार होऊ शकला नाही. त्यामुळे आता सदरहू पदाला पाचव्या वेतन आयोगामध्ये प्रस्तावित केलेल्या रु.४५००-७००० या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये देय होणारी वेतनसंरचना मंजूर करावी अशी शिफारस आहे.

२४) कनिष्ठ लिपिक

संघटनेचे अभिप्राय :-

कनिष्ठ लिपिक या संवर्गातील कर्मचारी प्रशासनाचे तांत्रिक / अतांत्रिक बजेट / अकाऊंट / पेन्शन इ. महत्वाचे जबाबदारीचे काम करीत असल्याने ते प्रशासकीय सहाय्यक दर्जाचे काम करतात. म्हणून त्यांना सुधारित ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन पाचव्या वेतन आयोगामध्ये या पदाला रु.३२००-४९०० ही वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये प्रस्ताव विचारार्थ होता. तथापि, सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे त्यावर विचार होऊ शकला नाही. त्यामुळे आता सदर पदाला पाचव्या वेतन आयोगामध्ये प्रस्तावित केलेल्या रु.३२००-४९०० या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये देय होणारी वेतन संरचना मंजूर करावी अशी शिफारस आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

२०) विशेष अधीक्षक

२१) अधीक्षक

२२) प्रथम लिपिक

२३) वरिष्ठ लिपिक

२४) कनिष्ठ लिपिक

लिपिकवर्गीय संवर्गाच्या वेतनसंरचनेसंबंधी अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद २.२.५ मध्ये विवेचन केले आहे. वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण लिपिकवर्गीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहेत. या संवर्गांना इतर प्रशासकीय विभागांतील लिपिकवर्गीय संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

क) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी व संशोधन संस्था, नाशिक

१) अधीक्षक अभियंता व सह संचालक

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४३६ वरील अनुक्रमांक २ येथील अधीक्षक अभियंता व सहसंचालक हे पद महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेमधील असून या पदांवरील अधिकाऱ्यांकडे संस्थेमधील सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक

जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२५०० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु. १८०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

२) कार्यकारी अभियंता / वरिष्ठ भूभौतिकतज्ज्ञ

संघटनेचे अभिप्राय :-

राज्य शासनाकडील अभियंत्यांच्या कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता यापूर्वी राज्य शासनाने जलसंपदा विभागात संशोधन व संकल्पने तयार करणे या सारखी कामे करणाऱ्या सहकारी संस्थांमधील सर्वस्तरीय अभियंत्यांना यापूर्वी दिलेल्या विशेष वेतनाचे लाभ यापुढेही सुधारित करुन ते सुधारित वेतनसंरचनेत देय करावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ सोबतच्या अनुसूचीच्या पृष्ठ क्रमांक ४३६ वरील अनुक्रमांक ४ येथील कार्यकारी अभियंता/वरिष्ठ भूभौतिकतज्ज्ञ हे पद महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेमधील असून या पदांवरील अधिकाऱ्यांकडे संस्थेमधील सोपविलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या अधिक जबाबदारीच्या कामामुळे या पदास विशेष वेतन मंजूर करण्यात आले आहे. संघटनेने रु.२००० ची मागणी केली असली तरी सुधारित वेतनसंरचनेत या पदास रु.१५०० इतके विशेष वेतन देण्यात यावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

१) अधीक्षक अभियंता व सह संचालक

२) कार्यकारी अभियंता / वरिष्ठ भूभौतिकतज्ज्ञ

वेतनसंरचना आणि विशेष वेतनासंदर्भात वरील (ब) अंतर्गत अ.क्र. १ ते ६ या संवर्गांच्या शिफारशींप्रमाणेच या संवर्गाच्या बाबतीत शिफारस आहे. त्यानुसार या संवर्गातील ज्या विनिर्दिष्ट पदांना या पूर्वी विशेष वेतन मंजूर केले होते, त्या पदांना त्यांच्या वेतनसंरचनेतील ग्रेड वेतनाच्या २०% इतकी रक्कम विशेष वेतन म्हणून मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मात्र सदर विशेष वेतन हे मूळ वेतनाचा भाग नसल्याने त्यावर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

३) वैज्ञानिक अधिकारी

संघटनेचे अभिप्राय :-

मेरी या संशोधन संस्थेत वैज्ञानिक व अभियंते एकत्र काम करतात. कार्यकारी अभियंता या संस्थेत संशोधन अधिकारी गट-अ म्हणून संबोधले जातात. तर उपविभागीय अभियंता सहाय्यक संशोधन अधिकारी म्हणून संबोधले जातात. संशोधन अधिकारी व वैज्ञानिक संशोधन अधिकारी या गट-अ मधील पदांना सहाव्या वेतन आयोगानुसार सारखीच वेतनसंरचना आहे. त्याचवेळी सहाय्यक संशोधन अधिकारी आणि उपविभागीय अभियंता यांना वेतनबँड रू.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रू.५४०० देण्यात आले आहे. सहायक संशोधन अधिकारी किंवा उपविभागीय अभियंता यांना संशोधन अधिकारी हे पदोन्नतीचे पद आहे. यावरुन असे लक्षात येते की, वैज्ञानिक अधिकारी गट-ब हे वैज्ञानिक संशोधन अधिकारी गट- अ या पदावर पदोन्नत झाल्यास त्यांना रू.९३००-३४८०० ऐवजी रू.१५६००-३९१०० हा वेतनबँड अधिक रू.६६०० ग्रेड वेतन अशी वरील पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना मिळणार आहे. या ठिकाणी दोन पदोन्नतीच्या पदांच्या वेतनसंरतनेमध्ये फार मोठी तफावत आढळते. ही मोठी तफावत वैज्ञानिक अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनबँड रू.१५६००-३९१०० अधिक रू.५४०० ग्रेड वेतन देऊन कमी करता येईल व वैज्ञानिकांवरील अन्याय दूर होईल.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेमध्ये वैज्ञानिक संवर्गातील हे पद आहे. या संस्थेमध्ये स्टाफींग पॅटर्न पुढीलप्रमाणे आहे.

१) संशोधन सहाय्यक - सरळसेवा भरतीने

२) कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक - संशोधन सहाय्यकांमधून पदोन्नतीने ५० टक्के व सरळ सेवा

भरती.

३) वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक - कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यकामधून पदोन्नतीने ५० टक्के किंवा सरळ सेवाभरतीने

४) वैज्ञानिक अधिकारी - वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यकांमधून पदोन्नती.

५) वैज्ञानिक संशोधन अधिकारी - वैज्ञानिक अधिकाऱ्यांमधून पदोन्नती.

उपरोक्त साखळीतील संशोधन सहाय्यक व कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या पदांना वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन ही एकच सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. वस्तुत: कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या पदावर संशोधन सहाय्यक पदावरुन पदोन्नती दिली जाते. त्यामुळे कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक हे संशोधन सहाय्यक या पदाचे पदोन्नतीचे पद आहे. शासन निर्णय क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२०/सेवा-९, दि.२७ फेब्रुवारी, २००९ मधील अ.क्र.९ प्रमाणे राज्य वेतन सुधारणा समितीच्या अहवालातील परिच्छेद ३.७.१ व ३.७.२ संदर्भातील शिफारशी शासनाने स्विकृत केल्याचे म्हटले आहे. त्यानुसार या प्रकरणी कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या पदाला संशोधन सहायक या पदाला मिळणाऱ्या ग्रेड वेतनापेक्षा २०० रुपये जास्त म्हणजे रु.४४०० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक हे कनिष्ठ वैज्ञानिक सहायकाचे पदोन्नतीचे पद आहे. त्यामुळे त्या पदालाही कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक पदाला मिळणाऱ्या ग्रेड वेतनापेक्षा २०० रुपये जास्त म्हणजेच रु.४६०० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वैज्ञानिक अधिकारी हे वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक पदाचे पदोन्नतीचे पद आहे. त्यामुळे या पदालाही वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक पदापेक्षा रुपये २०० जास्त म्हणजे रु.४८०० ग्रेड वेतन देणे आवश्यक आहे. तरी या प्रमाणे दुरुस्ती करुन वैज्ञानिक संवर्गातील या पदाची त्रुटी दूर करावी व या पदाला रु.४८०० ग्रेड वेतन मंजूर करावे.

४) वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक

५) कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक

संघटनेचे अभिप्राय :-

संशोधन सहाय्यक या पदावर ३ वर्षे कार्यकाल पूर्ण केल्यानंतर कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या पदावर पदोन्नती मिळते. त्याचवेळी वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक हे कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या पदाचे पदोन्नतीचे पद असल्याने त्यासाठी कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक पदावरील ५ वर्षांचा कार्यकाल पूर्ण असणे आवश्यक आहे. संशोधन सहाय्यकास पहिली पदोन्नती मिळूनही त्याच्या ग्रेड वेतनामध्ये कुठलाही बदल होत नाही. ग्रेड वेतनामध्ये बदल होण्यासाठी त्यास दुसऱ्या पदोन्नतीची वाट पहावी लागते. त्यामुळे वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक पदास रु.४३०० ऐवजी रु.४४००, कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक पदास रु.४३०० व संशोधन सहाय्यक पदास रु.४२०० ग्रेड वेतन देण्यात यावे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

वैज्ञानिक अधिकारी पदासंबंधीच्या अभिप्रायांत नमूद केल्याप्रमाणे या पदाला रु.४६०० ग्रेड वेतन देय ठरते त्यानुसार ते मंजूर व्हावे.

वैज्ञानिक अधिकारी पदासंबंधीच्या अभिप्रायांत नमूद केल्याप्रमाणे या पदाला रु.४४०० ग्रेड वेतन देय ठरते. त्यानुसार ते मंजूर व्हावे.

<u>समितीची शिफारस</u> :-

३) वैज्ञानिक अधिकारी

४) वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक

५) कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक

मेरी या संशोधन संस्थेत संशोधन सहाय्यक, कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक, वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक आणि वैज्ञानिक अधिकारी अशी पदोन्नती साखळी आहे. यापैकी संशोधन सहाय्यक व कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक या संवर्गास रु.४२०० ग्रेड वेतन मंजूर केले आहे. त्यामुळे पदोन्नतीच्या व निम्न पदास एकच ग्रेड वेतन मंजूर झाले आहे. अशा प्रकरणी पदोन्नतीच्या पदास अतिरिक्त ग्रेड वेतन

मंजूर करण्यासंदर्भात राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.७.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. त्यानुसार कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक संवर्गास अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करता येईल. मात्र त्यामुळे पदोन्नतीच्या संपूर्ण साखळीवर परिणाम होणार असल्याने वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक आणि वैज्ञानिक अधिकारी संवर्गांनाही स्वीकृत शिफारशींनुसार अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करावे लागेल. प्रशासकीय विभागाने ही कार्यवाही वित्त विभागाच्या सहमतीने करावी.

# ३.२१ - पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

## प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रूपये) (३) | सुधारित वेतनसंरचना (रूपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रूपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| | संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा | | | | | |
| १ | संचालक | १५१००-१८३०० | ३७४००-६७००० | ८७०० | ३७४००-६७००० | १०००० |
| २ | अतिरिक्त संचालक | १४३००-१८३०० | ३७४००-६७००० | ८७०० | ३७४००-६७००० | ८९०० |
| ३ | सह संचालक | १२०००-१६५०० | १५६००-३९१०० | ७६०० | ३७४००-६७००० | ८७०० |
| ४ | उप संचालक | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ५ | मुख्य भूभौतिकतज्ञ | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ६ | मुख्य खोदन अभियंता | १०६५०-१५८५० | १५६००-३९१०० | ६६०० | १५६००-३९१०० | ७६०० |
| ७ | वरिष्ठ भूवैज्ञानिक | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ८ | वरिष्ठ खोदन अभियंता | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ९ | वरिष्ठ भूभौतिकतज्ञ | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| १० | वरिष्ठ रसायनी | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| ११ | सहाय्यक भूवैज्ञानिक | ७५००-१२००० | ९३००-३४८०० | ४९०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १२ | सहाय्यक भूभौतिकतज्ञ (गट-ब) | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४५०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १३ | सहाय्यक रसायनी | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४५०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १४ | कनिष्ठ भूवैज्ञानिक | ६५००-१०५०० | ९३००-३४८०० | ४५०० | ९३००-३४८०० | ४८०० |
| १५ | शाखा अभियंता | ६५००- १०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| १६ | सहाय्यक अभियंता (स्थापत्य) | ६५००- १०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |
| १७ | कनिष्ठ भूभौतिकतज्ञ | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४६०० |
| १८ | कनिष्ठ रसायनी | ५५००-९००० | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ४६०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९ | तांत्रिक अधिकारी | ५०००-८००० | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४४०० |
| २० | सर्वेक्षक | ४०००-६००० | ५२००-२०२०० | २४०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| २१ | प्रशासन अधिकारी | ८०००-१३५०० | १५६००-३९१०० | ५४०० | १५६००-३९१०० | ६६०० |
| २२ | नियोजन अधिकारी | ६५००- १०५०० | ९३००-३४८०० | ४४०० | १५६००-३९१०० | ५४०० |

संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा

१) संचालक

संघटनेचे अभिप्राय:- विभागप्रमुख म्हणून काम पाहणे, शासनाने दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करणे व यंत्रणेच्या कामकाजाचा आराखडा तयार करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- संचालक हे पद संवर्ग पद आहे. सदर पदावर वेळोवेळी भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी घेण्यात येतात. तसेच संचालक पद हे राज्यस्तरीय असून अतिरिक्त संचालक पदामधून पदोन्नती देऊन हे पद भरण्यात येते. संचालक या पदाची व्याप्ती राज्य व केंद्र स्तरावर आहे. केंद्र स्तरावर संचालक G.W.Assessment, B.I.S., Rainfed Area Authority, Drinking Water Committees इ. समित्यांवर सदस्य आहेत. तसेच राज्य स्तरावर विविध समित्यांवर सदस्य आहे. त्यात प्रामुख्याने जलसंधारण, पाणी पुरवठा, पुनर्वसन इत्यादींचा समावेश आहे.

पाचव्या वेतन आयोगामध्ये संचालक या पदास अतिरिक्त संचालक पदापेक्षा उच्च वेतनश्रेणी देणे अभिप्रेत आहे. त्यानुसार सदर पदास रु.१८४००-२२४०० ह्या वेतनश्रेणीची शिफारस करण्यात येत आहे.

सहावा वेतन आयोग सद्य:स्थिती - सहाव्या वेतन आयोगात सदर पदावर अन्याय झालेला आहे. पाचव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीनुसार संचालक या पदास वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० व रु.१०,००० ग्रेड वेतनाची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

वेतनबँड पीबी-४: रू.३७४००-६७००० अधिक रू.१०००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना सचिव संवर्गास मंजूर केली आहे. संचालक पद सचिव पदाशी समकक्ष नाही. त्यामुळे वरील वेतनसंरचनेची मागणी समर्थनीय नाही.

२) अतिरिक्त संचालक

संघटनेचे अभिप्राय:- संचालकांना सहाय्यक म्हणून काम करणे, तसेच राज्यस्तरावरील कामाचे सनियंत्रण व व्यवस्थापन करणे आणि संचालकांना तांत्रिक बाबींवर सल्ला देणे इ. जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- अतिरिक्त संचालक हे राज्यातील एकमेव पद आहे. हे तांत्रिक स्वरुपाचे पद आहे व सहसंचालक या पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

पाचवा वेतन आयोग स्थिती - पाचव्या वेतन आयोगामधील सह संचालक या पदाचा अन्याय दूर झाल्यानंतर अतिरिक्त संचालक या पदास सह संचालक या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा वरची वेतनश्रेणी मिळणे आवश्यक आहे. सदर पदास रु.१६४००-२०००० या वेतनश्रेणीची शिफारस करण्यात येत आहे.

सहावा वेतन आयोग स्थिती - पाचव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणीनुसार अतिरिक्त संचालक या पदास वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० व रु.८९०० ग्रेड वेतनाची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती व त्यानुसार या संवर्गास वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. तद्नंतर पाचव्या आणि सहाव्या आयोगातदेखील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

३) सह संचालक

संघटनेचे अभिप्राय:- विभागीय कार्यालयाने केलेल्या कार्याची तपासणी करणे व सनियंत्रण आणि जागतिक बँक प्रकल्प प्रमुख म्हणून काम करणे, तसेच शासनाने व संचालकांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.एमएनए-१००/प्र.क्र.८१/उद्योग-९, दि.२७एप्रिल, २००७ अन्वये भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयाच्या अधिपत्याखालील भूवैज्ञानिकांना दिलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सह संचालक हे पद तांत्रिक स्वरुपाचे व राज्यस्तरीय आहे. तसेच उप संचालक या पदाच्या पदोन्नतीचे पद आहे. महाराष्ट्र शासनाकडील भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामध्ये या पदाचे समकक्ष पद आहे.

पाचवा वेतन आयोग स्थिती - पाचव्या वेतन आयोगामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सह संचालक या पदाची वेतनश्रेणी रु.१२०००-१६५०० अशी होती. तथापि, भू-विज्ञान आणि खनिकर्म संचालनालयामध्ये सह संचालक यांची वेतनश्रेणी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. एमएनए-१००/प्र.क्र.८१/ उद्योग-९, दि.२७ एप्रिल, २००७ नुसार रु.१४३००-१८३०० इतकी होती. पाचव्या वेतन आयोगामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सह संचालक पदावर अन्याय झाला आहे. भू-विज्ञान आणि खनिकर्म संचालनालयामधील सह संचालक या पदाची वेतनश्रेणी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सह संचालक यांना देणे आवश्यक आहे. शिफारस - वेतनश्रेणी रु.१४३००-१८३००

सहावा वेतन आयोग स्थिती - सहाव्या वेतन आयोगामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सह संचालक पदावर अन्याय झालेला आहे. पाचव्या वेतन आयोगातील अन्याय दूर झाल्यानंतर मिळणाऱ्या वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगामधील आनुषंगिक वेतनसंरचना या पदास देण्यात यावी. त्यानुसार सदर पदास वेतनबँड पीबी-४: रु.३७४००-६७००० व रु.८७०० ग्रेड वेतनाची शिफारस करण्यात येत आहे.

४) उप संचालक

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनामध्ये समतुल्य पद नाही. विभागीय कार्यालय व त्यांच्या अंतर्गत जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिकांनी केलेल्या कार्याची तपासणी आणि शासनाने व संचालकांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील उप संचालक हे पद तांत्रिक स्वरुपाचे व विभागीय असून, त्याच्या अधिपत्याखाली महसूल विभागामधील विभागात येणाऱ्या जिल्ह्यांचा समावेश आहे. सदर पद विभागीय आयुक्त यांना तांत्रिक सल्ला देणारे पद आहे. तसेच सदर पद हे वरिष्ठ भूवैज्ञानिक पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

वरिष्ठ भूवैज्ञानिक या पदास सुधारित मागणीनुसार वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.६६०० मान्य झाल्यानंतर, या वेतनसंरचनेच्या वरील वेतनसंरचना देणे आवश्यक राहील. त्यानुसार सदर पदास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.७६०० ग्रेड वेतनाची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

३) सह संचालक

४) उप संचालक

चौथ्या वेतन आयोगात या संवर्गांना आणि भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सह संचालक व उप संचालक संवर्गांना समान तत्वानुसार वेतनश्रेण्या विहित केल्या होत्या. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रस्तुत सह संचालक संवर्गास भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सह संचालक संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू. ७९०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

उप संचालक संवर्गास भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील उप संचालक संवर्गाप्रमाणेच वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू. ६६०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. या संवर्गाच्या मंजूर वेतनसंरचनेत त्रुटी नाही.

५) मुख्य भूभौतिकतज्ञ

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील मुख्य भूभौतिकतज्ञ हे पद तांत्रिक स्वरुपाचे आहे. सदर पद भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील उप संचालक या पदाचे समकक्ष व समतुल्य पद आहे. तसेच वरिष्ठ भूभौतिकतज्ञ पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

मुख्य भूभौतिकतज्ञ व उप संचालक या दोन्ही पदांच्या शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत. उप संचालक पदास ग्रेड वेतन ७६०० मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार मुख्य भूभौतिकतज्ञ या पदासही वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.७६०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर पदास ग्रेड वेतन ७६०० देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गाला केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

६) मुख्य खोदन अभियंता

संघटनेचे अभिप्राय:- विभागीय पद असल्याने कर्तव्ये व जबाबदाऱ्या या तुलनात्मकदृष्टया विस्तृत आहेत. कामे मुख्यत्वे क्षेत्रिय स्वरुपाची आहेत.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील मुख्य खोदन अभियंता पदास जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागात अधीक्षक अभियंता हे समकक्ष पद आहे. पाचव्या वेतन आयोगात जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागात रु.१२०००-१६५०० वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. तर भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमध्ये पाचव्या वेतन आयोगात सदर पदास रु.१०६५०-१५८५० ही वेतनश्रेणी देण्यात आलेली होती. सदर पदास पाचव्या वेतन आयोगात रु.१२०००-१६५०० वेतनश्रेणी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

सहाव्या वेतन आयोगामध्ये जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागात वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.७६०० देण्यात आले आहे. मात्र भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमध्ये वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.६६०० देण्यात आले आहे.

शिफारस - मुख्य खोदन अभियंता, या पदास वेतनबँड पीबी-३:रू.१५६००-३९१०० व रू.७६०० ग्रेड वेतन देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

या संवर्गास केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

७) वरिष्ठ भूवैज्ञानिक

संघटनेचे अभिप्राय:- वरिष्ठ भूवैज्ञानिक पद हे जिल्हा प्रमुख आहे. कनिष्ठ भूवैज्ञानिक व सहाय्यक भूवैज्ञानिकांच्या कामाची तपासणी व जिल्हाधिकारी यांचे पाणीविषयक तांत्रिक सल्लागार व कार्यकारी अधिकारी म्हणून काम करणे.

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.एमएनए-१००/प्र.क्र.८१/उद्योग-९, दि.२७ एप्रिल, २००७ अन्वये भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयाच्या अधिपत्याखालील भूवैज्ञानिकांना दिलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पदाचे समकक्ष पद महाराष्ट्र शासनाकडील भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयात अस्तित्वात आहे. तसेच केंद्र शासनाकडील सी. जी. डब्ल्यु. बी. व जी. एस. आय. या विभागांमध्ये देखील अस्तित्वात आहे. वरील पदांची तांत्रिक कामे सर्वसाधारणपणे सारखीच आहेत.

जिल्हा स्तरावर वरिष्ठ भूवैज्ञानिक हे पद कार्यालय प्रमुख आहे. पिण्याच्या पाण्याच्या जिल्हास्तरीय विविध समित्या, जलसंधारणाच्या विविध समित्या, पाणी टंचाई समित्या, पुनर्वसन, वाळू उत्खनन, आपत्कालीन व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापनाच्या समित्यांवर वरिष्ठ भूवैज्ञानिक हे सदस्य आहेत. तसेच शिवकालीन पाणी साठवण योजनेचे ते सदस्य सचिव आहेत. महाराष्ट्र भूजल कायदा, १९९३ नुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांना तांत्रिक मार्गदर्शन करणारे पद आहे.

जिल्ह्यात कार्यक्रम राबविण्यात वरिष्ठ भूवैज्ञानिक पद कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पाणी पुरवठा विभाग व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांच्या समतुल्य आहे.

पाचव्या वेतन आयोगातील स्थिती - पाचव्या वेतन आयोगामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० करण्यात आली होती. भू-विज्ञान आणि खनिकर्म संचालनालयामधील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांची वेतनश्रेणी शासन निर्णय क्र.एमएनए/१००/प्र.क्र.९१/उद्योग-९, दि.२७ एप्रिल, २००७ अन्वये रु.१००००-१५२०० करण्यात आली होती. दोन्ही खात्यातील वरिष्ठ भूवैज्ञानिक या पदाची शैक्षणिक अर्हता व सेवाप्रवेश नियम सारखेच असून भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वरिष्ठ भूवैज्ञानिक हा जिल्हा प्रमुख असून देखील त्यांच्यावर अन्याय झाला आहे. भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयामधील वरिष्ठ भूवैज्ञानिक या पदाची वेतनश्रेणी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांना देणे आवश्यक आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वरिष्ठ भूवैज्ञानिक या पदाचे समतुल्य पद केंद्र शासनाकडील सी.जी.डब्ल्यू.बी. व जी. एस. आय. या विभागांमध्ये आहे. सदर पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यादेखील सारख्याच आहेत. तथापि, सेवाप्रवेश नियम, यु. पी. एस. सी. मार्फत करण्यात येत आहे. त्यांची पाचव्या वेतन आयोगामधील वेतन श्रेणी रु.१००००-१५२०० इतकी होती.

पाणी पुरवठा विभागातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेमधील कार्यकारी अभियंता या समतुल्य पदाची वेतनश्रेणी देखील रु.१००००-१५२०० अशीच होती.

वरिष्ठ भूवैज्ञानिक हे पद जिल्हा स्तरावर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद यांच्या बरोबरीचे पद असल्यामुळे पाचव्या वेतन आयोगात वरिष्ठ भूवैज्ञानिक या पदास कार्यकारी अभियंता या पदाची वेतनश्रेणी देण्याची आवश्यकता आहे. तसेच शासन निर्णय

दि.२७.४.२००७ नुसार भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांना दिलेली रु. १००००-१५२०० ही वेतनश्रेणी देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

सहाव्या वेतन आयोगातील स्थिती - सहाव्या वेतन आयोगात भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांना शासनाने वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.५,७०० ग्रेड वेतन दिले आहे. तसेच कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद यांना देखील वेतनबँड पीबी-३:रू.१५६००-३९१०० व रू.६६०० ग्रेड वेतन दिले आहे. तसेच केंद्र शासनाकडील सी. जी. डब्ल्यु. बी. व जी. एस. आय. मधील वरिष्ठ भूवैज्ञानिक यांनादेखील वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.६६०० ग्रेड वेतन दिले आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वरिष्ठ भूवैज्ञानिक हे पद वरील विभागांतील पदास समकक्ष व समतुल्य असल्यामुळे सदर पदास वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.६६०० ग्रेड वेतनाची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

चौथ्या वेतन आयोगात या संवर्गास आणि भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील वरिष्ठ भूवैज्ञानिक संवर्गास समान तत्वानुसार वेतनश्रेण्या विहित केल्या होत्या. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रस्तुत वरिष्ठ भूवैज्ञानिक संवर्गास भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील वरिष्ठ भूवैज्ञानिक संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक रू. ५७०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

८) वरिष्ठ खोदन अभियंता

संघटनेचे अभिप्राय:- विभागीय पद असल्याने कर्तव्ये व जबाबदाऱ्या या तुलनात्मकदृष्टया विस्तृत आहेत. कामे मुख्यत्वे क्षेत्रिय स्वरुपाची आहेत.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वरिष्ठ खोदन अभियंतांच्या समकक्ष पद (कार्यकारी अभियंता) महाराष्ट्र राज्यातील जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागांत आहे. वरील दोन्ही विभागांतील पदांची वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.१०६५०-१५८५० तर भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमध्ये रु.८०००-१३५०० अशी होती. या पदावर पाचव्या वेतन आयोगात अन्याय झाला आहे. सदर पदास रू.१०६५०-१५८५० या वेतनश्रेणीची शिफारस आहे. सहाव्या वेतन आयोगात जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागात सदर पदास वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.६६०० ग्रेड वेतन देण्यात आले आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील सदर पदास वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.५,७०० ग्रेड वेतन देण्यात आलेले आहे. शिफारस- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वरिष्ठ खोदन अभियंता या पदास वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.६६०० ग्रेड वेतन देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

९) वरिष्ठ भूभौतिकतज्ञ

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वरिष्ठ भूभौतिकतज्ञ हे पद तांत्रिक स्वरुपाचे आहे. सदर पद भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वरिष्ठ भूवैज्ञानिक या पदाचे समकक्ष व समतुल्य पद आहे. तसेच सहाय्यक भूभौतिकतज्ञ पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

वरिष्ठ भूभौतिकतज्ञ व वरिष्ठ भूवैज्ञानिक ही दोन्ही पदे शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांनुसार समान आहेत. वरिष्ठ भूवैज्ञानिक पदास ग्रेड वेतन रू.६६०० मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार वरिष्ठ भूभौतिकतज्ञ या पदासही वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० व रू.६६०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर पदास ग्रेड वेतन रू.६६०० देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१०) वरिष्ठ रसायनी

संघटनेचे अभिप्रायः- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्रायः- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील वरिष्ठ रसायनी हे पद रसायनी (तांत्रिक) स्वरुपाचे आहे. सदर पद भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील वरिष्ठ भूवैज्ञानिक या पदाचे समकक्ष पद आहे. तसेच सहाय्यक रसायनी पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

वरिष्ठ रसायनी व वरिष्ठ भूवैज्ञानिक ही दोन्ही पदे शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांनुसार समान आहेत. वरिष्ठ भूवैज्ञानिक पदास ग्रेड वेतन रु.६६०० मंजूर करण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुसार वरिष्ठ रसायनी या पदासही ग्रेड वेतन रु.६६०० मंजूर करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर पदास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.६६०० ग्रेड वेतन देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

८) वरिष्ठ खोदन अभियंता

९) वरिष्ठ भूभौतिकतज्ञ

१०) वरिष्ठ रसायनी

वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या संवर्गांना केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. वरील संवर्गांना असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

११) सहाय्यक भूवैज्ञानिक

संघटनेचे अभिप्रायः- शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.एमएनए १००/प्र.क्र.८१/उद्योग-९, दि.२७ एप्रिल, २००७ अन्वये भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयाच्या अधिपत्याखालील भूवैज्ञानिकांना दिलेली सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्रायः- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सहायक भूवैज्ञानिकांच्या समकक्ष पद महाराष्ट्र राज्यातील भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयामध्ये अस्तित्वात आहे.

वरील दोन्ही विभागातील दोन्ही पदांची वेतनश्रेणी पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.७५००-१२००० अशी होती.

भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयामधील सहाय्यक भूवैज्ञानिक यांची वेतनश्रेणी शासन निर्णय क्र.एमएनए-१००/प्र.क्र.८१/उद्योग-९, दि.२७ एप्रिल, २००७ नुसार सुधारित करुन ती रु.८०००-१३५०० अशी करण्यात आली. परंतु भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सहायक भूवैज्ञानिक पदाची वेतनश्रेणी शासनाने सुधारित केली नाही. त्यामुळे या पदावर अन्याय झालेला आहे.

सहाव्या वेतन आयोगाची सद्य:स्थिती - सदर पदास सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनबँड रु.९३००-३४८०० व रु.४९०० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना आहे. तथापि, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालयातील सहाय्यक भूवैज्ञानिक यांची वेतनसंरचना वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.५००० ही आहे.

महाराष्ट्र शासनाने पाचव्या वेतन आयोगातील भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सहाय्यक भूवैज्ञानिक पदाच्या सुधारित वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगामध्ये वेतनश्रेणी निश्चित करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सहायक भूवैज्ञानिक या पदास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

चौथ्या वेतन आयोगात या संवर्गास आणि भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सहाय्यक भूवैज्ञानिक संवर्गास समान तत्वानुसार वेतनश्रेण्या विहित केल्या होत्या. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रस्तुत सहाय्यक भूवैज्ञानिक संवर्गास भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालयातील सहाय्यक भूवैज्ञानिक संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-२: वेतनबँड रु.९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.५००० ग्रेड वेतन ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१२) सहाय्यक भूभौतिकतज्ञ (गट-ब)

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सहाय्यक भूभौतिकतज्ञ पदासाठी किमान शैक्षणिक अर्हता ही पदविका एम.एस.सी (Geophysics) आहे व ते कनिष्ठ भूभौतिकतज्ञ पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

सहाय्यक भूभौतिकतज्ञ व सहाय्यक भूवैज्ञानिक ही दोन्ही पदे शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांनुसार समान आहेत. सहाय्यक भूवैज्ञानिक पदास ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर करण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुसार सहाय्यक भूभौतिकतज्ञ या पदासही वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर पदास ग्रेड वेतन ५४०० देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१३) सहाय्यक रसायनी

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सहाय्यक रसायनी हे पद रसायनी (तांत्रिक) स्वरुपाचे आहे. सदर पद भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील सहाय्यक भूवैज्ञानिक या पदाचे समकक्ष पद आहे. तसेच कनिष्ठ रसायनी पदाचे पदोन्नतीचे पद आहे.

सहाय्यक रसायनी व सहाय्यक भूवैज्ञानिक ही दोन्ही पदे शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांनुसार समान आहेत. सहाय्यक भूवैज्ञानिक पदास ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर करण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुसार सहाय्यक रसायनी या पदासही ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदर पदास वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व रु.५४०० ग्रेड वेतन देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१४) कनिष्ठ भूवैज्ञानिक

संघटनेचे अभिप्राय:- केंद्र शासनामध्ये भूवैज्ञानिक पद अस्तित्वात आहे. तथापि, सदर पद हे गट-अ मधील असल्यामुळे समतुल्य पद नाही. त्यामुळे तुलना करता येत नाही.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- कनिष्ठ भूवैज्ञानिक पदासाठी किमान शैक्षणिक अर्हता ही पदविका एम.एस.सी.(जिओ.) असून सदर पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येते. केंद्र शासनाच्या राजपत्रातील भाग-बी मधील सेक्शन क्र.१ मधील चौथ्या कलमानुसार ज्या पदांची किमान शैक्षणिक अर्हता पदविका आहे अशा पदांना वेतनबँड पीबी२: रु. ९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४६०० ही वेतनसंरचना असणे आवश्यक आहे. सदर पदास वेतनबँड रु.९३००-३४८०० व रु.४६०० ग्रेड वेतन देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१५) शाखा अभियंता

संघटनेचे अभिप्राय:- शाखा अभियंता पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या या तुलनात्मकदृष्टया विस्तृत आहेत. कामे मुख्यत्वे क्षेत्रिय स्वरुपाची आहेत.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सहाव्या वेतन आयोगामध्ये केंद्र शासनाने वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४६०० दिले आहे. तथापि, त्यासाठी अर्हता (Minimum Qualification) पदवी आहे. राज्यातील जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागात समकक्ष पदांना

वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४४०० तसेच, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील पदांना सुध्दा वेतनबँड रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४४०० देण्यात आले आहे. करीता संघटनेचे समर्थन योग्य वाटत नाही.

१६) सहाय्यक अभियंता (स्थापत्य)

संघटनेचे अभिप्राय:- चौथ्या वेतन आयोगापर्यंत सहायक अभियंता संवर्गासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा / सार्वजनिक बांधकाम विभाग / जलसंपदा विभाग / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / जिल्हा परिषद इ. राज्य शासनातील समकक्ष पदांचे वेतनमान रु.२०००-३५०० होते. त्यानंतर शासन निर्णय, जलसंपदा विभाग दि.१४ डिसेंबर, १९९५ अन्वये राज्य शासनाच्या इतर विभागांमध्ये या पदाचे वेतनमान रु.२२००-४००० झाले. परंतु भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील पदासाठी ही सुधारणा झाली नाही. पाचव्या वेतन आयोगात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेसह इतर विभागातील सहायक अभियंता या पदाच्या समकक्ष पदांना रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी दिली गेली. परंतु, यंत्रणेतील सहायक अभियंता (स्थापत्य) पदास भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमध्ये रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी दिली.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील अभियंता संवर्गातील उप अभियंता (यांत्रिकी) या समकक्ष पदास मागणी असलेले वेतनमान आधीच लागू करण्यात आले आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील सहाय्यक अभियंता (स्थापत्य) हे एकाकी पद असून, या पदास पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही.

सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदास वेतनबँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४०० दिल्यास एका पदामुळे शासनावर वाढणारा आर्थिक भार हा नगण्य असेल. कारण राज्य शासनाच्या इतर विभागांतील समकक्ष पदांना हे वेतनमान आधीच देण्यात आले आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पदावर पाचव्या वेतन आयोगामध्ये अन्याय झाला आहे.

चौथ्या वेतन आयोगातील स्थिती - चौथ्या वेतन आयोगामध्ये सदर पदाची वेतनश्रेणी रु.२०००-३५०० होती. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील याच पदाचे समकक्ष पद उप अभियंता (यांत्रिकी) होते. त्या पदाची वेतनश्रेणीदेखील रु.२०००-३५०० होती. सदर पदाचे राज्यातील इतर विभागांतील समकक्ष पद महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग व जलसंपदा विभागांमध्ये होते. त्या पदांची वेतनश्रेणी देखील रु.२०००-३५०० होती.

पाचव्या वेतन आयोगातील स्थिती - सदर पदास पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीमध्ये ठेवण्यात आले. तथापि, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सदर पदास समकक्ष उप अभियंता (यांत्रिक) या पदाला मात्र रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली. या ठिकाणी या पदावर अन्याय झाला आहे.

तसेच इतर विभागातील (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग आणि जलसंपदा विभाग) समकक्ष पदांनादेखील रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

सहाव्या वेतन आयोगाची स्थिती - सहाव्या वेतन आयोगामध्ये सदर पदास वेतनबँड पीबी-२:रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४४०० मंजूर करण्यात आले आहे. तथापि, सदर पदाचे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील समकक्ष पद उप अभियंता (यांत्रिकी) पदास वेतनबँड पीबी-३:रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५,४०० मंजूर करण्यात आले आहे. तसेच इतर विभागांतील समकक्ष पदांना वरील वेतनसंरचना मंजूर केली आहे.

शिफारस - सदर पद भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमध्ये एकाकी पद असल्याने त्यास पदोन्नतीची संधी नाही. सदर पदावर पाचव्या वेतन आयोगामध्ये झालेला अन्याय दूर करुन सदर पदास भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील उप अभियंता (यांत्रिकी) या समकक्ष पदाची वेतनबँड पीबी-३: रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४०० ही वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१७) कनिष्ठ भूभौतिकतज्ञ

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- कनिष्ठ भूभौतिकतज्ञ पदासाठी किमान शैक्षणिक अर्हता ही पदविका एम.एस.सी. (Geophysics) आहे.

कनिष्ठ भूभौतिकतज्ञ हे पद सद्य:स्थितीत गट-क मध्ये आहे. तथापि, कनिष्ठ भूवैज्ञानिक व कनिष्ठ भूभौतिकतज्ञ ही दोन्ही पदे शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांनुसार समान आहेत. कनिष्ठ भूभौतिकतज्ञ पदास ग्रेड वेतन रु.४६०० मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार कनिष्ठ भूवैज्ञानिक या पदासही ग्रेड वेतन रु.४६०० मंजूर करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

कनिष्ठ भूभौतिकतज्ञ हे पद गट-ब मध्ये समाविष्ट करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. त्यानुसार सदर पदास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४६०० मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१८) कनिष्ठ रसायनी

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील कनिष्ठ रसायनी हे पद रसायनी (तांत्रिक) स्वरुपाचे आहे. सदर पद भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील कनिष्ठ भूवैज्ञानिक या पदाचे समतुल्य व समकक्ष पद आहे.

कनिष्ठ रसायनी व कनिष्ठ भूवैज्ञानिक ही दोन्ही पदे शैक्षणिक अर्हता आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांनुसार समान आहेत. कनिष्ठ भूवैज्ञानिक पदास ग्रेड वेतन रु.४६०० मंजूर करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार कनिष्ठ रसायनी या पदासही ग्रेड वेतन रु.४६०० मंजूर करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

कनिष्ठ रसायनी हे पद गट-ब मध्ये समाविष्ट करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे. त्यानुसार सदर पदास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४,६०० मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९) तांत्रिक अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- अन्न व नागरी पुरवठा मंत्रालय व कृषि विभागामध्ये तांत्रिक अधिकारी या पदास मागणी केलेली वेतनसंरचना असल्यामुळे, त्या वेतनसंरचनेची मागणी केली आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- सदर पदावर भोळे आयोगामध्ये अन्याय झालेला आहे. महाराष्ट्र शासनाकडील कृषि विभागात या पदाचे समतुल्य पद आहे. तसेच केंद्र शासनाकडील अन्न व नागरी पुरवठा मंत्रालय येथे देखील समतुल्य पद आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेकडील तांत्रिक अधिकारी यांची शैक्षणिक अर्हता व कामाचे स्वरुप केंद्र शासनाकडील अन्न व नागरी पुरवठा मंत्रालय व महाराष्ट्र शासनाकडील कृषि विभागाचे तांत्रिक अधिकारी या पदाप्रमाणे आहे. भोळे आयोगामध्ये सदर पदावर झालेला अन्याय दूर करणे आवश्यक आहे. भोळे आयोगामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील तांत्रिक अधिकारी या पदास रु.५५०-९०० ही वेतनश्रेणी देण्याची शिफारस करण्यात येत आहे व त्या अनुषंगाने चौथ्या व पाचव्या वेतन आयोगामध्येदेखील वेतनश्रेणीत बदल करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील तांत्रिक अधिकारी या पदाची वेतनश्रेणी चौथ्या वेतन आयोगामध्ये रु.१६४०-२९०० व पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.६५००-१०५०० करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे बदल मंजूर झाल्यावर सहाव्या वेतन आयोगात सदर पदास वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु.४,४०० मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

१२) सहाय्यक भूभौतिकतज्ञ (गट-ब)

१३) सहाय्यक रसायनी

१४) कनिष्ठ भूवैज्ञानिक

१५) शाखा अभियंता

१६) सहाय्यक अभियंता (स्थापत्य)

१७) कनिष्ठ भूभौतिकतज्ञ

१८) कनिष्ठ रसायनी

१९) तांत्रिक अधिकारी

वेतन समानीकरण समितीने या संवर्गांना केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गांशी समकक्ष ठरविलेले नाही. वरील संवर्गांना असुधारित वेतनश्रेण्या विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

शाखा अभियंता, सहाय्यक अभियंता (स्थापत्य) आणि तांत्रिक अधिकारी या संवर्गांना पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. तर उर्वरित सहाय्यक भूभौतिक तज्ञ (गट-ब), सहाय्यक रसायनी, कनिष्ठ भूवैज्ञानिक, कनिष्ठ भूभौतिकतज्ञ आणि कनिष्ठ रसायनी या संवर्गांना सुधारित वेतनसंरचनेमध्ये पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेण्यांशी समकक्षतेपेक्षा उच्च ग्रेड वेतन मंजूर केले आहे. या संवर्गांना मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

२०) सर्वेक्षक

संघटनेचे अभिप्राय:- या यंत्रणेत सर्वेक्षक या पदास पदोन्नतीची संधी नसल्याने संघटनेची मागणी आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेत सर्वेक्षक हे पद एकाकी असून, त्यास पदोन्नतीचे पद नाही. पूर्वी या पदाला पदोन्नतीमध्ये वरिष्ठ सर्वेक्षक असे पद होते. तथापि, सदर पद आढाव्यामध्ये संपुष्टात आले आहे.

केंद्र शासनाच्या भूमिजल मंडळ या विभागात सर्वेक्षकाचे समकक्ष पद असून त्याची कामे व शैक्षणिक अर्हता सारखीच आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाकडील वन खात्यात देखील सर्वेक्षकाचे समकक्ष पद आहे.

सुधारित वेतन संरचनेमध्ये वरील तीन्ही पदे एकाच वेतनसंरचनेमध्ये मोडतात. परंतू, वन विभाग, महाराष्ट्र राज्य व केंद्रीय भूमि मंडळातील पदांना पदोन्नतीची पदे असल्यामुळे त्यांच्यावरील अन्याय दूर झालेला आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील सर्वेक्षक यांना पदोन्नतीची साखळी नसल्यामुळे, केंद्रीय भूमिजल विभागाप्रमाणे आस्तित्वात असलेल्या ६० पदांमध्ये खालीलप्रमाणे पदोन्नतीची पदे व त्यांच्या वेतनश्रेणीची शिफारस करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पद | स्तर | संख्या | वेतन संरचना |
|---|---|---|---|---|
| १ | सर्वेक्षक | जिल्हास्तर | ५३ | पीबी-१: रू.५२००-२०२०० अधिक रू.२४०० ग्रेड वेतन |
| २ | वरिष्ठ सर्वेक्षक | विभागीय स्तर | ६ | पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.४३०० ग्रेड वेतन |
| ३ | मुख्य सर्वेक्षक | राज्यस्तर (संचालनालय) | १ | पीबी-२:रू.९३००-३४८०० अधिक रू.४४०० ग्रेड वेतन |

समितीची शिफारस :-

वेतन समानीकरण समितीने या संवर्गाची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन चौथ्या वेतन आयोगामध्ये या संवर्गास समकक्षतेपेक्षा उच्च वेतनश्रेणी मंजूर केली होती. त्यानंतर पाचव्या आणि

सहाव्या वेतन आयोगामध्ये या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

२१) प्रशासन अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील प्रशासन अधिकाऱ्याच्या समकक्ष पद महाराष्ट्र राज्यातील वन विभाग, महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी व संशोधन संस्था, नाशिक व शिक्षण संचालनालयामध्ये आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील पदाची व वरील विभागांमधील प्रशासन अधिकारी पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि शैक्षणिक अर्हता समान आहेत.

<u>पाचव्या वेतन आयोगामध्ये खालीलप्रमाणे वेतनश्रेणी दिली होती.</u>

१) मुख्य वनरक्षक - रु.१००००-१५२००

२) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी व संशोधन संस्था, नाशिक - रु.१००००-१५२००

३) शिक्षण संचालनालय - रु.१०६५०- १५८५०

पाचव्या वेतन आयोगात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील प्रशासन अधिकारी पदावर अन्याय झाला आहे.

सहाव्या वेतन आयोगामध्ये वर नमूद केलेल्या विभागांमध्ये प्रशासन अधिकारी या पदास वेतनबँड रु.१५६००-३९१०० व रु.६६०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. तथापि, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील प्रशासन अधिकारी यांना सदर ग्रेड वेतन दिले नाही.

शिफारस - भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील प्रशासन अधिकारी हे पद वरील विभागांतील प्रशासन अधिकारी पदाशी समकक्ष असल्यामुळे सदर पदास वेतनबँड पीबी-३:रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.६६०० मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

<u>समितीची शिफारस</u> :-

सर्वसाधारण प्रशासकीय संवर्गाच्या वेतनसंरचनेसंबंधी अहवालातील प्रकरण-२ मधील परिच्छेद २.२.५ मध्ये विवेचन केले आहे. वर नमूद संवर्ग राज्य शासनाकडील सर्वसाधारण प्रशासकीय संवर्ग असून बहुतांश प्रशासकीय विभागांमध्ये कार्यरत आहे. या संवर्गाला इतर प्रशासकीय विभागांतील संवर्गाप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाला मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाहीत.

२२) नियोजन अधिकारी

संघटनेचे अभिप्राय:- जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन अधिकारी हे गट-अ चे पद असून त्याची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० अशी आहे. तसेच यंत्रणेतील नियोजन अधिकारी हे पद राज्यस्तरीय आहे. नियोजन अधिकारी या पदास पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. सदर पदास मागणी केल्याप्रमाणे वेतनश्रेणी मिळावी.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय:- नियोजन अधिकारी या पदाचे समतुल्य पद कृषि विभाग व सहकार विभागातील सांख्यिकी हे पद आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात देखील नियोजन अधिकारी हे पद आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील व सदर विभागातील नियोजन अधिकारी या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या समान आहेत. करिता, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील नियोजन अधिकारी यांना गट-अ चा दर्जा देऊन, वेतनबँड पीबी-३:रु.१५६००-३०१०० व ग्रेड वेतन रु.५,४०० या वेतनसंरचनेची शिफारस करण्यात येत आहे.

समितीची शिफारस :-

या संवर्गास केंद्र अथवा राज्य शासनाकडील कोणत्याही संवर्गाशी समकक्ष ठरविलेले नाही. या संवर्गास असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेळोवेळी सुधारित वेतनश्रेण्या विहित केल्या आहेत.

या संवर्गास पाचव्या वेतन आयोगातील असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनसंरचना सहाव्या वेतन आयोगामध्ये मंजूर केली आहे. या संवर्गास मंजूर केलेल्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

# ३.२२ - वाहनचालक संवर्ग

प्रस्तावाचा सारांश

| अ.क्र. (१) | पदनाम (२) | विद्यमान वेतनश्रेणी (रुपये) (३) | सुधारित वेतन संरचना (रुपये) (४) | | मागणी केलेली सुधारित वेतनसंरचना (रुपये) (५) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनबँड | ग्रेड वेतन | वेतनबँड | ग्रेड वेतन |
| १ | वाहनचालक | ३०५०-४५९० | ५२००-२०२०० | १९०० | १)५२००-२०२०० ( साधारण श्रेणी - *३०% पदांसाठी* ) | १९०० |
| | | | | | २)५२००-२०२०० (श्रेणी-२ - *३०% पदांसाठी - साधारण श्रेणीत ९ वर्षांच्या नियमित सेवेनंतर*) | २४०० |
| | | | | | ३)५२००-२०२०० (श्रेणी-१ - *३५% पदांसाठी - श्रेणी-२ मध्ये ६ वर्षांच्या नियमित सेवेनंतर* किंवा साधारण श्रेणी आणि श्रेणी-२ मधील १५ वर्षांची एकत्रित सेवा ) | २८०० |
| | | | | | ४)९३००-३४८०० (विशेष श्रेणी -*५% पदांसाठी - श्रेणी-१ मध्ये ३ वर्षांच्या नियमित सेवेनंतर ज्येष्ठता - नि - शारीरिक पात्रतेनुसार पदोन्नतीनंतरची श्रेणी*) | ४२०० |

**संघटनेचे अभिप्राय :-** केंद्र शासनाकडील वाहनचालक संवर्गाला चौथ्या वेतन आयोगानुसार रु.९५०-१५०० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती व वाहनचालकांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने ९ वर्षांच्या नियमित सेवेनंतर रु.१२००-२०४० ही वेतनश्रेणी देण्यात आली होती.

परंतु राज्य शासनाकडील वाहनचालकांना चौथ्या वेतन आयोगात रु.९५०-१५०० ही एकच वेतनश्रेणी देण्यात आली होती. केंद्र शासनाप्रमाणे कालबध्द वेतनश्रेणी देण्यात आली नाही. त्याकरीता संघटनेला वारंवार शासनाकडे दाद मागावी लागली. तेव्हा कुठे शासनाने सन १९९४ पासून राज्य शासनाकडील वाहनचालकांना कालबध्द पदोन्नती योजना लागू करुन केंद्र शासनाकडील वाहनचालकांप्रमाणे रु.१२००-२०४० ही वेतनश्रेणी मान्य करण्यात आली होती.

२.	पाचव्या वेतन आयोगानुसार केंद्र शासनाकडील वाहनचालकांना रु.९५०-१५०० या वेतनश्रेणीस रु.३०५०-४५९० तर कालबध्द पदोन्नतीच्या रु.१२००-२०४० या वेतनश्रेणीस रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी देण्यात येऊन पुढील ६ वर्षांनंतर रु.४५००-७००० ही वेतनश्रेणी देण्यात आली.

राज्य शासनाने पाचवा वेतन आयोग मान्य करुन वाहनचालक संवर्गाला केंद्र शासनाकडील वाहनचालक संवर्गाप्रमाणे रु.३०५०-४५९० ही वेतनश्रेणी मंजूर केली व कालबध्द पदोन्नती अंतर्गत १२ वर्षांनंतर रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. परंतु केंद्र शासनाकडील वाहनचालकांप्रमाणे तिसरी कालबध्द वेतनश्रेणी रु.४५००-७००० या वेतनश्रेणीपासून राज्य शासनाकडील वाहनचालकांना वंचित रहावे लागले.

३.	सन १९९९ साली केंद्र शासनाने कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली व ज्या काही केंद्रीय कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला त्यांच्या वेतनश्रेण्या संशोधित करण्यात आल्या. त्यानुसार केंद्रीय वाहनचालकांची रु.३०५०-४५९० ही वेतनश्रेणी संशोधित करुन रु.३२००-४९०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली व निवडश्रेणी रु.५०००-८००० मंजूर करण्यात आली. याप्रमाणे केंद्रीय वाहनचालकांना सुरुवातीची वेतनश्रेणी रु.३२००-४९००, नऊ वर्षांनंतर रु.४०००-६००० नंतरच्या ६ वर्षांनंतर रु.४५००-७००० व निवडश्रेणी (सहा वर्षांनंतर) रु.५०००-८००० या वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या होत्या.

राज्य शासनानेही कालबध्द पदोन्नतीच्या ऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि. १ ऑगस्ट, २००१ पासून आपल्या कर्मचारी वर्गाकरीता लागू केली. या योजनेअंतर्गत ४४ संवर्गांच्या वेतनश्रेणीमध्ये संशोधन करण्यात आले व त्यानुसार त्या वाढविण्यात आल्या तर काहींच्या आश्वासित योजनेच्या टप्प्यावर वाढविण्यात आल्या. अपवाद फक्त वाहनचालक संवर्ग राहिला. वाहनचालक संवर्गाला कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत मिळणारी रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी गोठवून रु.३२००-४९०० ही वेतनश्रेणी देण्यात आली. त्यानुसार दि.३१ जुलै २००१ पर्यंत कालबध्द पदोन्नती योजनेचा लाभ मिळणारा वाहनचालक रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी मिळण्यास पात्र ठरतो. दि.१ ऑगस्ट, २००१ पासून आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेले वाहनचालक रु.३२००-४९०० ही वेतनश्रेणी घेत आहेत. या अन्यायाबाबत दाद मागण्यासाठी संघटना ६ वर्षांपासून शासनाशी चर्चा करीत आहे. मा. मुख्यमंत्री, मा. वित्त मंत्री वा प्रधान सचिव (वित्त) यांनी वाहनचालकांवर अन्याय झाल्याचे मान्य केले. परंतु सहावा वेतन येऊ घातला असल्याने या अन्यायाची पूर्तता सहाव्या वेतन आयोगात करण्यात येईल असे आश्वासन मा. वित्त मंत्री महोदय व मा. प्रधान सचिव (वित्त) यांनी संघटनेला दिले आहे.

४.	सहाव्या वेतन आयोगानुसार केंद्र शासनाकडील वाहनचालकांना रु.३२००-४९०० या वेतनश्रेणीसाठी वेतनबँड पीबी-१ अधिक रु.२००० ग्रेड वेतन, रु. ४०००-६००० साठी वेतनबँड पीबी-१ अधिक रु.२४०० ग्रेड वेतन, रु.४५००-७००० साठी वेतनबँड पीबी-१ अधिक रु.२८०० ग्रेड वेतन आणि निवडश्रेणी रु.५०००-८००० या वेतनश्रेणीकरीता वेतनबँड पीबी-२: रु.९३००-३४८०० अधिक रु.४२०० ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. तसेच कालबध्द पदोन्नती किंवा आश्वासित प्रगती योजना यांचा कोणताही संबंध न लावता दि.१.१.२००६ रोजी असलेल्या वेतनश्रेण्या विचारात घेऊन आयोगाने सुचविल्याप्रमाणे ग्रेड वेतन देऊन कोणताही बदल न करता वेतननिश्चिती करण्यात आली आहे.

परंतु राज्य शासनाने सहावा वेतन आयोग लागू करतांना वाहनचालक संवर्गाची वेतननिश्चिती करताना कालबध्द पदोन्नती अंतर्गत दि.१.१.२००६ रोजी रु.४०००-६००० या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या वाहनचालकांचे वेतननिश्चितीचे सूत्र बदलून रु.४०००-६००० या वेतनश्रेणीस अनुज्ञेय असलेले ग्रेड वेतन रु.२४०० गोठवून चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाचा संदर्भ नोंदवून रु.२१०० ग्रेड वेतन करण्यात आले व आश्वासित प्रगती योजनेनुसार रु.३२००-४९०० या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या वाहनचालकांना वरील सुत्रानुसार रु.१९०० + २०० = २१०० ग्रेड वेतन देण्यात आले (या दोन वेतनश्रेण्याच्या वेतननिश्चितीची विसंगती लक्षात घ्यावी).

५. सहावा केंद्रीय वेतन आयोग राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना लागू करण्यासंबंधी विविध संवर्गाच्या वेतनश्रेण्यांच्या व वेतनत्रुटींचा अभ्यास करण्यासाठी मा. हकीम साहेब यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती गठीत केली होती. यामध्ये मा. प्रधान सचिव, वित्त व मा. प्रधान सचिव हे सदस्य होते. समितीने संघटनेला सुनावणीची संधी दिली. त्यानुसार संघटनेने वरीलप्रमाणे वाहनचालक संवर्गावर झालेला अन्याय समितीपुढे मांडला. यावर समितीने निश्चित दखल घेण्यात येईल असे मत नोंदवले. परंतु सहावा वेतन आयोग लागू झाल्यावर वाहनचालक संवर्गावर झालेला अन्याय दूर न करता पुन्हा या संवर्गावर वरील मुद्दा क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अन्याय केला आहे.

६. केंद्र शासन व राज्य शासनाचे वेगवेगळे वेतन आयोग स्थापन न करता केंद्र शासनाच्या वेतन आयोगानुसारच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू करावा हा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार तो लागू करतांना केंद्र शासनाकडील पदे व राज्य शासनाकडील पदे यामध्ये विसंगती असल्याने राज्य शासनाने सन १९८६ मध्ये मा. न्यायमुर्ती नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. त्यांनी संवर्गनिहाय अभ्यास करुन केंद्र शासनाकडील व राज्य शासनाकडील जे संवर्ग समान आहेत ते उद्‌धृत करुन त्यांच्या वेतनश्रेण्या केंद्र शासनाप्रमाणेच असाव्या असे सुचविले. (मा. न्यायमुर्ती नाईक समिती अहवाल पृ. क्र. १७) त्याप्रमाणे चौथ्या वेतन आयोगापासून वाहनचालक संवर्गाची वेतनश्रेणी केंद्र शासनाकडील वाहनचालक संवर्गाप्रमाणे मान्य करण्यात आली आहे. म्हणूनच सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य शासनातील वाहनचालकांना जशाच्या तशा लागू व्हाव्यात व मा. हकीम समितीने शिफारस केल्याप्रमाणे एकाकी पदांना १२ वर्षे व २४ वर्षांची दुसरी कालबद्ध पदोन्नती मान्य व्हावी ही संघटनेची रास्त अपेक्षा आहे.

वर नमूद केलेल्या परिच्छेद १ ते ६ मध्ये नमूद त्रुटींबाबत सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा. तसेच वाहनचालक संवर्गाची कोणतीही अतिरिक्त वाढीची मागणी नसल्याने व मिळत असलेल्या वेतनश्रेणीत शासनाकडून झालेल्या चुका दुरुस्त करुन वाहनचालक संवर्गावर झालेला अन्याय दूर करावा अशी शासकीय वाहनचालक संघटनेची विनंती आहे.

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :-

वाहनचालक संवर्ग हा सर्वसाधारण संवर्ग असून सर्वच प्रशासकीय विभागांच्या आस्थापनेवर कार्यरत आहे. त्यामुळे विशिष्ठ प्रशासकीय विभागाचे अभिप्राय नाहीत.

## समितीची शिफारस :-

तिसऱ्या वेतन आयोगात जड वाहनचालक (Heavy Vehicle Driver) आणि हलके वाहनचालक (Light Vehicle Driver) या संवर्गांना अनुक्रमे रू.२९०-५४० व रू.२५०-४३५ / रू.२६०-४९५ अशा वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या होत्या. उपरोक्त संघटनांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या संवर्गाच्या वेतनश्रेण्यांमध्ये फरक असू नये अशी मागणी केली होती. वेतन समानीकरण समितीने (चौथा वेतन आयोग) या वेतनश्रेण्यांना एकसमान रू.९५०-१५०० या सुधारित वेतनश्रेणीची शिफारस केली होती. त्यानुसार वाहनचालक संवर्गास रू. ९५०-१५०० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. तद्नंतर पाचव्या वेतन आयोगात रू.३०५०-४५९० ही समकक्ष वेतनश्रेणी तर सहाव्या वेतन आयोगात वेतनबँड पीबी-१: रू.५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रू.१९०० ही समकक्ष वेतनसंरचना मंजूर केली आहे.

वाहनचालक संवर्गाची केंद्र शासनाप्रमाणे निवडश्रेणीसह चार स्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याची मागणी आहे.

केंद्र शासनाकडे सन १९९३ पासून स्टाफ कार वाहनचालकांना कालबद्ध पदोन्नती योजनेअंतर्गत (Promotion Scheme for Staff Car Drivers) त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर केली आहे. त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करून सध्या त्यांच्याकडील वाहनचालक संवर्गास प्रस्तुत वाहनचालकांनी मागणी केल्याप्रमाणे चार स्तरीय वेतनसंरचना लागू आहे. तसेच या योजनेबरोबरच

त्यांच्याकडील सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनादेखील वाहनचालक संवर्गास लागू आहे.

वाहनचालक संवर्गाच्या वेतनसंरचनेतील त्रुटी आणि केंद्र शासनाप्रमाणे वरील योजना लागू करणे या दोन भिन्न बाबी आहेत.

वाहनचालक संवर्गास वेळोवेळी मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या पाहता असे दिसून येते की, चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगात या संवर्गास असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष सुधारित वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर केली आहे. त्यामुळे या संवर्गाच्या वेतनसंरचनेमध्ये त्रुटी नाही.

केंद्र शासनाकडील स्टाफ कार वाहनचालकांप्रमाणे कालबद्ध पदोन्नती योजनेअंतर्गत **(Promotion Scheme for Staff Car Drivers)** वेतनसंरचना मंजूर करण्यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, ही बाब वाहनचालक संवर्गाच्या मूळ वेतनसंरचनेशी निगडीत नाही. तर ती विशिष्ठ स्वरूपाची योजना आहे. अशा योजनेचा लाभ राज्य शासनाकडील संवर्गास द्यावा किंवा कसे हा धोरणात्मक स्वरूपाचा मुद्दा आहे.

सध्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना आणि तत्पूर्वीच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व कालबद्ध पदोन्नती योजनादेखील केंद्र शासनाकडील योजनांपेक्षा भिन्न आहेत. राज्य शासकीय आस्थापनांचा एकंदरीत विचार करूनच या योजना विहित केल्या आहेत. त्यामुळे वाहनचालक संवर्गाच्या बाबतीत केंद्र शासनाची योजना स्वीकारावी किंवा कसे याबाबत समितीने भाष्य करणे सयुक्तिक ठरणार नाही, किंबहुना ही बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

संघटनेने उपस्थित केलेला दुसरा मुद्दा हा कालबध्द पदोन्नती योजना ( शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही १०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि. ८ जून, १९९५) / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ( शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/ सेवा-३, दि. २० जुलै, २००१ ) / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ( शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन ११०९/प्र.क्र.४४/ सेवा-३, दि. १ एप्रिल, २०१० व शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन ११०९/प्र.क्र.४१/ सेवा-३, दि. ५ जुलै, २०१०) या योजनांशी निगडीत आहे.

चौथ्या वेतन आयोगात वाहनचालक संवर्गाची वेतनश्रेणी रू.९५०-१५०० ही होती. कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत या संवर्गास रू.१२००-१८०० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय होती. पाचव्या वेतन आयोगानुसार वाहनचालक संवर्गास रू.९५०-१५०० या वेतनश्रेणीशी समकक्ष रू.३०५०-४५९० ही वेतनश्रेणी मंजूर केली होती. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन २०००/प्र.क्र.१०/ सेवा-३, दि. ३ ऑगस्ट, २००१ सोबतच्या परिशिष्ट-२ नुसार पाचव्या वेतन आयोगात वाहनचालक संवर्गास दि. १ जानेवारी, १९९६ पासून कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत रू.४०००-६००० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय होती. तर दि. १ जानेवारी, २००६ पूर्वी या योजनेचा लाभ घेतलेल्या वाहनचालकांना या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ नुसार रू.१२००-१८०० या वेतनश्रेणीशी समकक्ष रू.४०००-६००० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय होती. थोडक्यात, दि. १ जानेवारी, १९९६ पूर्वी अथवा तद्नंतर वाहनचालक संवर्गास कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत रू.४०००-६००० ही वेतनश्रेणी दि.३१ जुलै, २००१ पर्यंत मंजूर केली जात होती.

शासन निर्णय दि. २० जुलै, २००१ नुसार दि. १ ऑगस्ट, २००१ पासून सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अंमलात आली. या योजनेमध्ये एकाकी (Isolated) संवर्गांना तसेच पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसलेल्या संवर्गांना त्या संवर्गांच्या वेतनश्रेणीच्या लगतची वरची वेतनश्रेणी अनुज्ञेय करण्यात आली. रू.३०५०-४५९० या वेतनश्रेणीच्या लगतची वरची वेतनश्रेणी रू.३२००-४९०० ही असल्याने वाहनचालक संवर्गास ही वेतनश्रेणी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय झाली. अशा प्रकारे दि. ३१ जुलै, २००१ पर्यंत व दि. १ ऑगस्ट, २००१ पासून वेगवेगळ्या वेतनश्रेण्या अनुज्ञेय झाल्या. ही परिस्थिती केवळ वाहनचालक संवर्गाच्या बाबतीतच उद्भवली नाही तर रू.३०५०-४५९०

या वेतनश्रेणीतील सर्वच एकाकी / पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसलेल्या संवर्गाबाबतदेखील उद्‌भवली होती.

इतकेच नव्हे तर रू.२६१०-४००० आणि रू.२६५०-४००० या वेतनश्रेण्यांतील एकाकी / पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्याबाबतीत अशीच परिस्थिती उद्‌भवली होती. या वेतनश्रेण्यांमधील कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत दि. ३१ जुलै, २००१ पर्यंत रू.३०५०-४५९० व दि. १ ऑगस्ट, २००१ पासून अनुक्रमे रू.२६५०-४००० आणि रू.२७५०-४४०० अशा वेगवेगळ्या वेतनश्रेण्या अनुज्ञेय झाल्या होत्या.

राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशींनुसार शासनाने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे. या योजनेनुसार एकाकी / पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची संकल्पना शासनाने स्वीकारली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे एकाच वेतनश्रेणीतील / संवर्गातील कर्मचाऱ्यांना दोन वेगवेगळ्या योजनांतर्गत वेगवेगळ्या वेतनश्रेण्या अनुज्ञेय होऊन निर्माण झालेली विसंगती अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याच्या संकल्पनेमुळे संपुष्टात आली आहे. त्यामुळे कालबध्द पदोन्नती योजना, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ मिळाला असल्यास अथवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ मिळाल्यास एकाकी / पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसलेल्या संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांना समान ग्रेड वेतन अनुज्ञेय ठरते. त्यामुळे सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत स्वीकारलेली अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्याची कार्यवाही संकल्पना योग्य वाटते.

थोडक्यात, वाहन चालक संवर्गास मंजूर केलेल्या वेतनबँड पीबी-१: रू.५२००-२०२०० अधिक रू.१९०० ग्रेड वेतन या वेतनसंरचनेत त्रुटी नाही. तसेच केंद्र शासनाकडील वाहनचालक संवर्गासाठी लागू असलेली योजना (Promotion Scheme for Staff Car Drivers) ही मूळ वेतनश्रेणीशी संबंधित नसून विशिष्ठ कालावधीनंतर वरिष्ठ वेतनसंरचना मंजूर करण्याशी संबंधित आहे. ही योजना स्वीकारावी किंवा कसे ही धोरणात्मक बाब असल्याने याबाबत समितीने भाष्य करणे सयुक्तिक ठरणार नाही, किंबहुना ही बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

# प्रकरण - ४

## सुधारित वेतनसंरचनेतील (सहावा वेतन आयोग) त्रुटींच्या प्रस्तावांसंबंधी समितीने सादर केलेले स्वतंत्र अहवाल

---

### ४.१) प्रशासकीय विभाग :- विधी व न्याय विभाग

संवर्गाचे नाव :- आस्थापना अधिकारी, उच्च न्यायालय विधी सेवा समिती, मुंबई आणि उच्च न्यायालय विधी सेवा उप समिती, औरंगाबाद व नागपूर

१) <u>प्रस्तावना</u> :-

श्री. नंदकिशोर डोये, आस्थापना अधिकारी, उच्च न्यायालय विधी सेवा उप समिती, नागपूर यांनी आस्थापना अधिकारी पदास दि.१.१०.२००२ पासून वेतनबँड पीबी-३: रु.१५६०० - ३९१०० अधिक रु.५४०० ग्रेड वेतन मंजूर करावे अथवा रु.१००००-१५२०० या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-३ मंजूर करावा यासाठी मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे रीट याचिका क्र. ३५७६/२०१० [आणि दिवाणी अर्ज (Civil Application) क्र.१११९/२०११] दाखल केली होती. सदर याचिकेत प्रतिवादी क्र. १ - सामान्य प्रशासन विभाग तर प्रतिवादी क्र. ४ - वित्त विभाग हे होते.

२. सदर याचिकेवर दि. २८ एप्रिल, २०११ रोजी निर्णय होऊन, याचिकाकर्त्यांचे दि.११.६.२००९ रोजीचे निवेदन प्रतिवादी क्र.१ यांच्या विचाराधीन असल्याने याचिकाकर्त्यांची याचिका मागे घेण्याची विनंती मा. उच्च न्यायालयाने मान्य केली आहे. तसेच याचिकाकर्त्यांच्या निवेदनावर अद्याप निर्णय झालेला नसल्यास, या संदर्भातील विहित कार्यपध्दती अवलंबून लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यापासून ६ आठवड्यांच्या आत निर्णय घेण्यात यावा असे आदेश प्रतिवादी क्र. १ यांना दिले आहेत.

३. सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशींनुसार मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील संभाव्य त्रुटी दूर करण्यासाठी वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपुर १२०९/प्र.क्र.३८/सेवा-९ दि.२१ मे, २००९ अन्वये प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली वेतनत्रुटी निवारण समिती नियुक्त करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ४ नुसार वेतनत्रुटीसंबंधीचे प्रस्ताव आवश्यक ती छाननी व खातरजमा करून संबंधित प्रशासकीय विभागामार्फत वित्त विभागाकडे सादर करावयाचे होते. श्री. डोये यांचे दि.११.६.२००९ रोजीचे निवेदन म्हणजेच त्यांच्या आस्थापना अधिकारी या संवर्गाच्या वेतनत्रुटी निवारणाबाबत सचिव, उच्च न्यायालय विधी सेवा उप समिती, नागपूर यांनी अध्यक्ष, वेतनत्रुटी निवारण समिती तथा प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांना थेट अग्रेषित केलेले दि.११.६.२००९ रोजीचे पत्र वित्त विभागाच्या पत्र क्र. वेपुर १२०९/प्र.क्र.११२/सेवा-९, दि.७ जुलै, २००९ अन्वये पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आले होते. तसेच सदर पत्राची प्रत सदस्य सचिव, महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण यांच्या दि.३१ जुलै, २००९ रोजीच्या पत्रान्वये विधी व न्याय विभागास अग्रेषित केली आहे. सदर पत्रात पुढील मागण्या अंतर्भूत आहेत :-

अ) आस्थापना अधिकारी संवर्गास तहसिलदार संवर्गाप्रमाणे वेतनबँड पीबी-३: रु.१५६०० - ३९१०० मंजूर करण्यात यावा.

ब) आस्थापना अधिकारी संवर्गास रु.७४५०-११५०० या ऐवजी रु.१००००-१५२०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात यावी.

क) केंद्र शासनाच्या धर्तीवर वेतनबँड पीबी-३ अधिक ग्रेड वेतन रु.५४०० मंजूर करण्यात यावे किंवा रु.१००००-१५२०० या वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-३ अधिक ग्रेड वेतन रु.६६०० मंजूर करण्यात यावे.

४.        विधी व न्याय विभागाने आस्थापना अधिकारी संवर्गास वेतनबँड पीबी-३: रु.१५६०० - ३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.५४००/६५०० मंजूर करण्याची शिफारस करुन प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीच्या विचारार्थ सादर केला आहे.

५.        मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त परिच्छेद २ मध्ये नमूद दि. २८ एप्रिल, २०११ रोजीचे आदेश पारीत केले त्यावेळी आस्थापना अधिकारी पदाच्या वेतनत्रुटी निवारणाविषयीचा प्रस्ताव समितीच्या विचाराधीन असल्याने आणि समितीचा अहवाल सादर होण्यास काही कालावधी लागणार असल्याने, दि. २८ एप्रिल, २०११ रोजीच्या आदेशांन्वये मा. उच्च न्यायालयाने दिलेली ६ आठवड्यांची मुदत शिथिल करुन आस्थापना अधिकारी या संवर्गाच्या वेतनत्रुटी निवारणाच्या प्रस्तावासंबंधीचा अहवाल समितीच्या विचाराधीन इतर संवर्गांच्या एकत्रित अहवालासोबतच सादर करण्यास परवानगी देण्याची विनंती मा. उच्च न्यायालयास दिवाणी अर्ज (Civil Application) क्र.१७२३/२०११ द्वारे करण्यात आली होती. त्यावर दि.१३ जुलै, २०११ रोजी निर्णय होऊन श्री.डोये यांच्या निवेदनावर निर्णय घेण्यास आदेशांच्या दिनांकापासून ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतीत वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल सादर होऊ शकला नाही. त्यामुळे आस्थापना अधिकारी या पदासंबंधीचा अहवाल एकत्रित अहवालासोबत सादर करण्यास परवानगी देण्याबाबत तसेच त्यासाठी मुदतवाढ देण्यासाठी मा. उच्च न्यायालयात दिवाणी अर्ज (Civil Application) क्र. २९२४/२०११ दाखल करण्यात आला होता. त्यावर दि.२८ नोव्हेंबर, २०११ रोजी निर्णय होऊन प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेण्यास शेवटची संधी म्हणून मा. उच्च न्यायालयाने आदेशांच्या दिनांकापासून दोन महिन्यांची मुदत दिली आहे.

६.        मा. उच्च न्यायालयाच्या दि.२८ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या आदेशांचे अनुपालन करण्यासाठी आस्थापना अधिकारी संवर्गाच्या वेतनत्रुटी निवारणाच्या प्रस्तावाबाबत वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल दि. २८ जानेवारी, २०१२ पूर्वी शासनास सादर होणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वतंत्रपणे अहवाल सादर करणे क्रमप्राप्त आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन स्वतंत्रपणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

७.        आस्थापना अधिकारी संवर्गाच्या वेतनत्रुटी निवारणाच्या प्रस्तावासंदर्भात समितीची बैठक दि.२३ नोव्हेंबर, २०१० रोजी पार पडलेली आहे. बैठकीस सॉलिसिटर -नि- सह सचिव, विधी व न्याय विभाग व संवर्गाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

२) अ) विधी व न्याय विभागाचा प्रस्ताव :-

| संवर्गाचे नाव | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतनसंरचना | प्रस्तावित सुधारित वेतनसंरचना |
|---|---|---|---|
| आस्थापना अधिकारी | रु. ७४५० - ११५०० | वेतनबँड पीबी-२: रु.९३०० - ३४८०० अधिक ग्रेड वेतन रु. ४६०० | वेतनबँड पीबी-३: रु.१५६०० - ३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.६५०० किंवा वेतनबँड पीबी-३: रु.१५६०० - ३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.५४०० |

ब) प्रशासकीय विभागाचे / संघटनेचे अभिप्राय:-

संघटनेचे अभिप्राय :- निरंक

प्रशासकीय विभागाचे अभिप्राय :- आस्थापना अधिकारी या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन सदर पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना उपरोक्त नमूद केलेली सुधारित वेतनसंरचना लागू करण्याबाबत विचार करण्यास हरकत नसावी.

३) समितीची शिफारस :- आस्थापना अधिकारी या संवर्गाच्या वेतनत्रुटी निवारणाबाबत विधी व न्याय विभागाने सादर केलेल्या वरील प्रस्तावावर समितीने विचार केला. तसेच प्रस्तावासोबतच्या सचिव, उच्च

न्यायालय विधी सेवा उप समिती, नागपूर यांच्या दि.११ जून, २००९ रोजीच्या पत्रातील मुद्देदेखील समितीने विचारात घेतले आहेत.

१) दि.११ जून, २००९ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या पाहता आस्थापना अधिकारी हे पद त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ / पर्यवेक्षकीय जबाबदारीचे पद असल्याचे दिसून येते. सर्वसाधारणत: अशा पदधारकास त्याच्या संवर्गाशी निगडीत कर्तव्यांबरोबरच कार्यालय प्रमुख म्हणून आस्थापनाविषयक, आहरण व संवितरणविषयक आणि आनुषंगिक सर्वसाधारण प्रशासकीय कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. किंबहुना कार्यालय प्रमुखाचे पद तुलनेने निम्न वेतनसंरचनेतील असले तरीदेखील त्या पदधारकांस वरील कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

२) कोणतीही नवीन आस्थापना निर्माण करताना किंवा एखाद्या आस्थापनेवर नवीन संवर्ग निर्माण करताना साधारणत: नवनिर्मित संवर्गाशी निगडीत संभाव्य कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा सारासार विचार करून पदांची वेतनश्रेणी / वेतनसंरचना विहित करण्यात येते. आस्थापना अधिकारी पदनिर्मितीच्या वेळी अशा प्रकारे विचारांती तत्कालीन रू.७४५०-११५०० ही वेतनश्रेणी विहित करण्यात आली आहे असे दिसून येते.

३) रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना सुधारित वेतन संरचनेत वेतनबँड पीबी-२: रू.९३००-३४८०० मंजूर करण्याची शिफारस राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मध्ये करण्यात आली आहे. केवळ तहसिलदार या संवर्गास वेतनबँड पीबी-३ मंजूर करण्याचा विनिर्दिष्ट निर्णय मंत्रीमंडळाने घेतला आहे. मात्र परिच्छेद ३.६.२ मधील शिफारशीनुसार रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील विविध प्रशासकीय विभागांतर्गत सर्वच संवर्गांना वेतनबँड पीबी-२ मंजूर करण्यात आला आहे. यास्तव तहसिलदार संवर्गाशी तुलना करणे सयुक्तिक वाटत नाही.

गट - अ (पूर्वीचे वर्ग-१) मधील रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेणीतील संवर्गांना रू.५००० ग्रेड वेतन मंजूर करण्याची राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या अहवालातील परिच्छेद ३.६.२ मधील शिफारस शासनाने स्वीकारली आहे. तथापि, आस्थापना अधिकारी संवर्गाचे सेवाप्रवेश नियम अंतिम झालेले नसल्यामुळे सदर संवर्ग गट - अ मध्ये समाविष्ट आहे किंवा कसे याबाबत समिती भाष्य करू शकत नाही. त्यामुळे रू.५००० ग्रेड वेतन अनुज्ञेयतेविषयी विधी व न्याय विभागाने वित्त विभागाशी विचारविनिमय करून स्वतंत्रपणे तपासणी करणे योग्य होईल.

४) आस्थापना अधिकारी संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही अद्याप प्राथमिक स्तरावर आहे. सेवाप्रवेश नियम अंतिम झालेले नसल्याने आस्थापना अधिकारी या संवर्गाचा निम्न संवर्ग (Feeder Cadre), पदोन्नतीचा संवर्ग (Promotional Cadre) आणि त्यांच्या वेतनसंरचना याबाबत निश्चित कल्पना येऊ शकत नाही. त्यामुळे या संवर्गाची पदोन्नती साखळी व त्यामधील पदांची आपापसातील सापेक्षता या बाबी तपासणे शक्य होत नाही. तसेच सेवाप्रवेशाच्या पद्धती, शैक्षणिक अर्हता या मूल्यमापनविषयक बाबीही स्पष्ट नाहीत.

आस्थापना अधिकारी या पदास कर्तव्ये व जबाबदाऱ्यांशी सुसंगत वेतनश्रेणी / वेतनसंरचना मंजूर करण्यात आलेली आहे ही बाब तसेच वरील विवेचन लक्षात घेता आस्थापना अधिकारी पदास प्रस्तावित उच्च वेतनसंरचना वेतनबँड पीबी-३: रू.१५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन रु.५४००/६५०० मंजूर करण्याचा प्रस्ताव स्वीकारार्ह वाटत नाही. सबब, प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- २४ जानेवारी, २०१२

सही/-
(श्रीकांत देशपांडे)
सचिव (लेखा व कोषागारे),
वित्त विभाग तथा सदस्य,
वेतनत्रुटी निवारण समिती

सही/-
(के. पी. बक्षी)
प्रधान सचिव(सेवा),
सामान्य प्रशासन विभाग तथा अध्यक्ष,
वेतनत्रुटी निवारण समिती

४.२) प्रशासकीय विभाग :- सार्वजनिक आरोग्य विभाग.

संवर्गाचे नांव :- वैद्यकीय अधिकारी, गट-अ

( विद्यमान वेतनश्रेणी : रु.८०००-१३५००

सुधारित वेतन संरचना : रु.९३००-३४८०० (पीबी-२) + रु.५४०० ग्रेड वेतन)

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गास सहाव्या वेतन आयोगात मंजूर केलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटीसंदर्भात वेतनत्रुटी समितीची प्राथम्याने बैठक घेऊन त्याबाबतचा अहवाल प्राथम्यक्रमाने सादर करण्याच्या दिलेल्या निदेशानुसार सदर अहवाल सादर करण्यात येत आहे.

वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गास रु.१५६००-३९१०० (पीबी-३) + रु.५४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतन संरचना मंजूर करावी अशी संबंधित संघटनेने मागणी केलेली असून प्रशासकीय विभागानेदेखील सदर मागणीशी सहमती दर्शविली आहे.

वैद्यकीय अधिकारी, गट-अ हा संवर्ग पूर्वी वर्ग-२ (गट-ब) मधील संवर्ग असल्याने सहाव्या वेतन आयोगामध्ये या संवर्गास रु.९३००-३४८०० (पीबी-२) + रु.५४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतन संरचना मंजूर करण्यात आली आहे. यासंदर्भात समितीचे असे मत आहे की, पाचव्या वेतन आयोगात जी वेतनश्रेणी स्विकारली आहे, (जोडपत्र-१) अशा संवर्गाच्या बाबतीत परत नव्याने विचार करुन त्यांच्या पाचव्या वेतन आयोगपूर्व वेतनश्रेणीच्या आधारे समकक्षता ठरविणे योग्य वाटत नाही. त्यामुळे, वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाची पाचव्या वेतन आयोगाची रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी विचारात घेवून अन्य विविध विभागांतील संवर्ग पदांप्रमाणेच या संवर्गास रु.१५६००-३९१०० (पीबी-३) + रु.५४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची समिती शिफारस करीत आहे.

दिनांक : १ ऑगस्ट, २००९

स्थळ : मुंबई

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), | प्रधान सचिव ( सेवा ), |
| वित्त विभाग | सामान्य प्रशासन विभाग |
| सदस्य | अध्यक्ष |

जोडपत्र-१

(वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गाच्या वेतनत्रुटीसंबंधी वेतनत्रुटी निवारण समितीने दिनांक १ ऑगस्ट,२००९ रोजी सादर केलेल्या अहवाला सोबतचे जोडपत्र)

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८

## (ओ) सार्वजनिक आरोग्य विभाग/(O) PUBLIC HEALTH DEPARTMENT

| अ. क्र. Sr. No. (1) | पदनाम Designation (2) | विद्यमान वेतनश्रेणी व असल्यास, विशेष वेतन Existing scale of pay and Special pay, if any (3) | सुधारित वेतनश्रेणी व असल्यास, विशेष वेतन Revised scale of pay and Special pay, if any (4) | शेरा Remarks (5) |
|---|---|---|---|---|
| | | Rs. | Rs. | |
| | **आरोग्य सेवा संचालनालय—चालू/Directorate of Health Services—contd.** | | | |
| 49 | चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ/Clinical Psychologist ... | 2200—4000 | 8000—13500 | |
| 50 | दंत शल्यचिकित्सक/Dental Surgeon ... | 2200—4000 | 8000—13500 | |
| 51 | कनिष्ठ अधिव्याख्याता/Junior Lecturer ... | 2200—4000 | 8000—13500 | |
| 52 | अधिव्याख्याता व्यवसायोपचार/Lecturer Vocational ... | 2200—4000 | 8000—13500 | |
| 53 | महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-ब/Maharashtra Medical and Health Services Group-B. | 2200—4000 | 8000—13500 | |
| | वैद्यकीय आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र/वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण कुटुंब नियोजन कल्याण केंद्र/मुख्य वैद्यकीय अधिकारी/रक्त संक्रमण अधिकारी/सहाय्यक निवासी वैद्यकीय अधिकारी/सहाय्यक अधीक्षक/निवासी भिषक/निवासी बालरोग तज्ञ/निवासी स्त्री रोग व प्रसुति शास्त्र तज्ञ/निवासी शल्य चिकित्सक/सर्जिकल रजिस्ट्रार/रजा राखीव वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय अधिकारी, कुष्ठरोग नियंत्रण पथक/वैद्यकीय अधिकारी, शासकीय दवाखाना/वैद्यकीय अधिकारी, कुटीर रुग्णालय/सहाय्यक शल्य-चिकित्सक, फिरते रुग्णालय पथक/सहाय्यक शल्यचिकित्सक, फिरते शल्यचिकित्सा पथक/हत्ती रोग अधिकारी/संशोधन अधिकारी/प्रादेशिक सहाय्यक कुष्ठरोग अधिकारी/जिल्हा क्षयरोग अधिकारी/महिला सहाय्यक शल्य चिकित्सक/बधिरीकरण शास्त्रज्ञ/सहाय्यक अणुजीव शास्त्रज्ञ/कनिष्ट किटक शास्त्रज्ञ/निदेशक/कुष्ठरोग प्रशिक्षण केंद्र/महिला वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय अधिकारी, संशोधन-नि-प्रशिक्षण केंद्र/संशोधन अधिकारी राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण केंद्र/सहाय्यक प्रादेशिक हिवताप अधिकारी सहाय्यक आरोग्य अधिकारी/कनिष्ठ अधिव्याख्याता, सार्वजनिक आरोग्य संस्था/वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालये/वैद्यकीय अधिकारी, शासकीय दवाखाना/निवासी वैद्यकीय अधिकारी/वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, कुटीर रुग्णालय/ वैद्यकीय अधिकारी, तुरुंग दवाखाने/वैद्यकीय अधिकारी, एस. आर. पी. एफ. गट/वैद्यकीय अधिकारी, पोलीस रुग्णालय/वैद्यकीय अधिकारी नागरी कुटुंब नियोजन केंद्र/वैद्यकीय अधिकारी, प्रसवोत्तर कार्यक्रम/वैद्यकीय अधिकारी, फिरते रुग्णालय पथक/वैद्यकीय अधिकारी, आरोग्य शिक्षण व प्रचार/वैद्यकीय अधिकारी, शालेय आरोग्य चिकित्सालय वैद्यकीय अधिकारी, आरोग्य पथक/अपघात वैद्यकीय अधिकारी/सहाय्यक, फिरते निर्जंतुकरण पथक/वैद्यकीय अधिकारी, कुष्ठ रोग प्रशिक्षण केंद्र/वैद्यकीय अधिकारी, फिरते नेत्रोपचार पथक/वैद्यकीय अधिव्याख्याता-नि-निदेशक/वैद्यकीय अधिकारी व्हायटल स्टॅटीस्टीकस्/वैद्यकीय अधिकारी, कॉलरा प्रतिरोध पथक/चिकित्सालयीन सहाय्यक, मनोरुग्ण रुग्णालय/Medical Officer, Primary Health Centre/Medical Officer, Rural | *Plus* Special pay of<br>(i) Rs. 200 for 1538 posts in Public Health Centres.<br>(ii) Rs. 60 for Dy. Supdt. Mental Hospital, Nagpur<br>(iii) Rs. 100, for Dy. Supdt. Mental Hospital Pune<br>(iv) Rs. 50 for Clinical Assistant and Woman Assistant Surgeon, Mental Hospital, Pune. | **Plus* Special pay of<br>(i) Rs. 400 for 1538 posts in Public Health Centres.<br>(ii) Rs. 120 for Dy. Suptd. Mental Hospital, Nagpur.<br>(iii) Rs. 200 for Dy. Supdt. Mental Hospital, Pune.<br>(iv) Rs. 100 for Clinical Assistant and Woman Assistant Surgeon, Mental Hospital, Pune. | |

| अ. क्र. Sr. No. (1) | पदनाम Designation (2) | विद्यमान वेतनश्रेणी व अनुल्पास, विशेष वेतन Existing scale of pay and Special pay, if any (3) | सुधारित वेतनश्रेणी व अनुल्पास, विशेष वेतन Revised scale of pay and Special pay, if any (4) | शेरा Remarks (5) |
|---|---|---|---|---|
| | | Rs. | Rs. | |
| | **आरोग्य सेवा संचालनालय-चालू/Directorate of Health Services—Contd.** | | | |
| | Family Planning Welfare Centre/Chief Medical Officer/Blood Transfusion Officer/Assistant Superintendent/Resident Physician/Resident Paediatrician/Resident Obstrician and Gynaecologist/Resident Surgeon/Surgical Registrar/ Medical Officer Leave Reserve/Medical Officer Leprosy Control Unit/Medical Officer Civil Dispensary/Medical Officer Cottage Hospital/ Deputy Superintendent, Mental Hospital/ Assistant Surgeon, Mobile Hospital Unit/ Assistant Surgeon, Mobile Surigcal Unit/Filaria Officer/Research Officer/Regional Assistant Leprosy Officer/District T.B. Officer/Women Assistant Surgeon/Anaesthetist Bacterologist Junior Entomologist/Demonstrator, Leprosy Training Centre/Lady Medical Officer/Medical Officer, Research-*cum*-Training Centre/Research Officer, National Filaria Control Unit/Assistant Regional Malaria Officer/Assistant Health Officer/ Junior Lecturer, Public Health Institute/Medical Officer, Rural Hospitals/Medical Officer Government Dispensary/Resident Medical Officer/Senior Medical Officer, Cottage Hospital/Medical Officer, Jail Dispensaries/Medical Officer, S.R.P.F. Groups/ Medical Officer, Police Hospital/Medical Officer, Urban Family Planning Centres/Medical Officer under Post Partum Programme/Medical Officer, Mobile Hospital Unit/Medical Officer, Health Education and Propaganda/Medical Officer/School Health Clinic/Medical Officer, Health Unit Casualty Medical Officer/Assistant, Mobile Sterilisation Unit/Medical Officer, Leprosy Training Centre/Medical Officer, Mobile Opthalmic Unit/ Medical Lecturer-*cum*-Demonstrator/Medical Officer, Vital Statistics/Medical Officer, Cholera Combat Unit/Clinical Assistant, Mental Hospital. | | | |
| 54 | महिला अधीक्षिका, सार्वजनिक आरोग्य शुश्रुषा शाखा, नागपूर/Lady Superintendent, Public Health Nursing School, Nagpur. | 2375—3500 | 7450—11500 | |

## - ऋणनिर्देश -

वेतनत्रुटी निवारण समितीचे कामकाज करण्याची बहुमूल्य संधी शासनाने आम्हास दिली याबद्दल आम्ही शासनाचे आभारी आहोत.

आम्ही येथे विशेषत्त्वाने नमूद करु इच्छितो की, शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी, कृषि विद्यापीठे व अकृषि विद्यापीठांमधील कर्मचारी व शिक्षक संघटना तसेच महासंघाच्या प्रतिनिधींनी समितीच्या बैठकीस उपस्थित राहून प्रत्यक्ष चर्चेच्या वेळी त्यांच्या विभागांशी / संवर्गांशी संबंधित माहिती विषद करुन समितीस सहकार्य केले. त्यामुळे हा अहवाल सादर करण्यास समितीस बहुमूल्य मदत झाली. कर्मचारी संघटनांनी आम्हाला जे सहकार्य केले त्याबाबत आम्ही त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

श्री. सुधीर श्रीवास्तव, प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी काही काळ समितीचे सदस्य म्हणून कामकाज पाहिले आहे. या कामी त्यांचेही आम्हास मौलिक सहकार्य लाभले. समिती त्यांच्या सहकार्याबद्दल त्यांची विशेष आभारी आहे.

सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, संबंधित विभाग प्रमुख, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे सह सचिव, उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी तसेच कर्मचारीवृंदानी केलेल्या सहकार्याचा उल्लेख समिती येथे आवर्जून करु इच्छिते. त्यांच्या सहकार्याशिवाय हा अहवाल शासनास सादर करणे समितीस शक्य झाले नसते.

श्री. शि. म. म्हात्रे, सह सचिव, श्री. य. द. देशकर, अवर सचिव आणि श्री. किरण शिंदे, कक्ष अधिकारी, वित्त विभाग यांनी समितीचा अहवाल सादर होईपर्यंत घेतलेले परिश्रम उल्लेखनीय आहेत. समितीच्या संपूर्ण कामकाजादरम्यान त्यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य गौरवास्पद आहे. तसेच वित्त विभागाच्या सेवा-९ कार्यासनातील कार्यासन अधिकारी श्रीमती अ. आ. कारखानीस व कर्मचारीवृंदाने केलेल्या सहाय्याचाही उल्लेख समिती या ठिकाणी करु इच्छिते.

(श्रीकांत देशपांडे)
सचिव (लेखा व कोषागारे ),
वित्त विभाग तथा सदस्य,
वेतनत्रुटी निवारण समिती

(के. पी. बक्षी)
प्रधान सचिव(सेवा),
सामान्य प्रशासन विभाग तथा अध्यक्ष,
वेतनत्रुटी निवारण समिती

# परिशिष्ट -१

## पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीशी संबंधित समितीने सादर केलेले स्वतंत्र अहवाल

---

१) प्रशासकीय विभागाचे नाव :- वित्त विभाग

संवर्गाचे नाव :- सहाय्यक लेखाधिकारी / सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ संघटनेने (द्वारा- श्री.अजित कुलकर्णी, अध्यक्ष आणि श्री.प्रकाश वानखेडे, सरचिटणीस) सहाय्यक लेखाधिकारी / सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी संवर्गास दि.१.१.१९८६ पासून रू.१६४०-२९०० ऐवजी केंद्र शासनाकडील (Indian Audit and Accounts Department) सहाय्यक लेखाधिकारी पदाप्रमाणे रू.२०००-३२०० (८०% पदांसाठी) व रू.१६४०-२९०० (२०% पदांसाठी) आणि दि.१.१.१९९६ पासून रू.५५००-९००० ऐवजी रू.७४५०-११५०० (८०% पदांसाठी) व रू.६५००-१०५०० (२०% पदांसाठी) अशा वेतनश्रेण्या मंजूर करण्यासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.१८/२००८ दाखल केला होता. याशिवाय संबंधितांच्या वेतनसुधारणेविषयीची मागणी अमान्य केल्याबाबतचे दि.१६ मे, २००७ रोजीचे पत्र रद्द करण्याची तसेच केंद्र शासनाकडील पदांशी समकक्ष असलेल्या पदांना केंद्र शासनाकडील पदांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्याच्या राज्य शासनाच्या डिसेंबर १९७७ मधील निर्णयाच्या परिप्रेक्ष्यात महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाकडील पदांच्या समकक्ष श्रेणी उन्नतीचे फायदे देण्याचीही मागणी वरील मूळ अर्जात करण्यात आली आहे.

सदर मूळ अर्जावर मा.न्यायाधिकरणाने दि.२२ एप्रिल, २०१० रोजी अंतीम निर्णय दिला असून, वेतनत्रुटी निवारण समितीने प्रस्तुत अर्जदार संघटनेस बाजू मांडण्याची संधी देऊन त्यांच्या दि.२४.१०.२००३ रोजीच्या प्रलंबित निवेदनाचा विचार करुन दि.३१ मे, २०१० पूर्वी निर्णय घ्यावा असे आदेश दिले आहेत.

मा. न्यायाधिकरणाच्या उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने तपासणी करुन शिफारस करण्यासाठी हे प्रकरण शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील संभाव्य त्रुटी दूर करण्यासाठी नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीकडे सोपविले आहे. तसेच, यासंदर्भात स्वतंत्रपणे अहवाल सादर करण्याची विनंती समितीस करण्यात आली आहे.

या प्रकरणी दि.३ सप्टेंबर, २०१० रोजी वेतनत्रुटी निवारण समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ संघटनेचे मूळ अर्जदार श्री.अजित कुलकर्णी आणि श्री.प्रकाश वानखेडे तसेच इतर प्रतिनिधी आणि संचालक, लेखा व कोषागारे हे उपस्थित होते.

१) <u>प्रस्तावाची आनुषंगिक पार्श्वभूमी :</u>

(अ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ संघटनेच्या दि.२४.१०.२००३ रोजीच्या निवेदनामध्ये प्रामुख्याने पुढील मुद्दे मांडण्यात आले आहेत :-

(१) तिसऱ्या वेतन आयोगाच्या (भोळे आयोग) शिफारशींवर निर्णय घेताना राज्य शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी सुधारण्याकरीता स्वतंत्र वेतन

आयोग नियुक्त न करता केंद्र शासन जेंव्हा-जेंव्हा केंद्रीय कर्मचाऱ्यांकरीता वेतन आयोग नियुक्त करेल त्या वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे वेतनश्रेणीविषयक निर्णय राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तुलनीय प्रवर्गांना लागू करण्यात येतील. वेतननिश्चितीचे सूत्रदेखील केंद्र शासनाप्रमाणे असेल.

(२) वरील (१) येथील धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी राज्य शासनाकडील पदांची केंद्र शासनाकडील पदांशी समकक्षता निश्चित करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या वेतन समानीकरण समितीच्या अहवालातील परिच्छेद ३.२७ मधील लेखा व कोषागारे संचालनालयातील पदांसंबंधीची पुढील शिफारस :-

3.27 Directorate of Accounts and Treasuries:- We felt that except for the top levels, it should be possible to locate Central posts comparable to those in the Directorate of Accounts and Treasuries in the set up of Accountant General (Audit or Accounts). We found that except at the level in the Directorate of Accounts and Treasuries with the present pay scale of Rs.600-1150, there is complete identity between the scale equivalents of the existing scales in the Directorate of Accounts and Treasuries vide para 2.11, and the revised scales in the Accountant General's organisation. The scale equivalant of Rs.600-1150 would be Rs.2000-3500. In the Accountant General's organisation, however, this stands split into two levels viz. Rs.2000-3200 and Rs.2375-3500. We examined whether the Accountant General's pattern of two scales could be introduced in the Directorate of Accounts and Treasuries. So long as direct recruitment continues in the Directorate of Accounts and Treasuries at the present level of Rs.600-1150, it would not be feasible to consider the break up of the scale. Accordingly we have recommended the scale equivalent viz. 2000-3500 for the Directorate of Accounts and Treasuries posts at present in the scale of Rs.600-1150.

(३) सहाय्यक लेखाधिकारी / सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी आणि महालेखापाल कार्यालयातील कक्ष अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी व सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी पदांच्या वेतनश्रेणी:-

| दिनांक | सहाय्यक लेखाधिकारी / सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी (वेतनश्रेणी रु.) | महालेखापाल कार्यालयातील कक्ष अधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी व सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी (वेतनश्रेणी रु.) | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १/७/१९६२ | २५०-५०० | --- | |
| १/४/१९६६ | २६०-५२० | २१०-५३० | |
| १/४/१९७६ | ५००-९०० | ५००-९०० | |
| १/१/१९८४ | बदल नाही | १) ६४०-१०४० (८०% पदांना)<br>२) ५००-९०० (२०% पदांना) | |
| १/१/१९८६ | १६४०-२९०० | १) २०००-३२०० (८०% पदांना)<br>२) १६४०-२९००(२०% पदांना) | |
| १/१/१९९६ | ५५००-९००० | १) ६५००-१०५०० (८०% पदांना)<br>२) ५५००-९०००(२०% पदांना) | केंद्र शासन कार्यालयीन ज्ञापन दि.२८/२/२००३ अन्वये रु.६५००-१०५०० ऐवजी रु.७४५०-११५०० पूर्वलक्षी प्रभावाने मंजूर. |

(ब) राज्य शासनाने वेतन सुधारणा / वेतनत्रुटी निवारणासंदर्भात वेळोवेळी नेमलेल्या समित्यांच्या सहाय्यक लेखाधिकारी संवर्गासंबंधीच्या शिफारशींचा सारांश :-

(१) वेतनत्रुटी निवारण समिती (चौथा वेतन आयोग) -

संचालक, लेखा व कोषागारे आणि महालेखापाल कार्यालयातील पदसंरचना (Staff Structure) व कामकाज नेहमीच समान राहिले आहे. महालेखापाल कार्यालयातील कक्ष अधिकारी हे पद दोन स्तरांवर असल्याने साहजिकच संघटनेने त्याच्याबाबतीतही समान तत्व अवलंबण्याची मागणी केली आहे. तथापि, यामुळे ८०% पदे निवडश्रेणीमध्ये श्रेणीउन्नत करावी लागतील. ही मागणी समितीच्या कार्यकक्षेबाहेरील आहे.

(२) राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ -

पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतन सुधारणेसंदर्भात नियुक्त केलेल्या या समितीकडे चौथ्या वेतन आयोगातील वेतनत्रुटींसंदर्भात नेमलेल्या अन्याय निवारण समितीचेही कामकाज सोपविले होते. समितीने अहवालातील भाग-१ मध्ये अशी शिफारस केली आहे की, लेखा व कोषागारे संचालनालयातील वर्ग-३ मधील अराजपत्रित पदांना त्यांच्या असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन वेतन समानीकरण समितीने सुधारित वेतनश्रेणीबाबत शिफारस केली होती. इतरत्र तथाकथित समकक्ष पदांना या समितीच्या अहवालाच्या परिच्छेदांमध्ये चर्चिल्याप्रमाणे वेगवेगळ्या कारणांसाठी वरच्या सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या असल्यामुळे, इतर विभागांतील भिन्न सेवाप्रवेश नियम व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या असलेल्या पदांशी केलेली तुलना या ठिकाणी अप्रस्तुत वाटते. पदांच्या श्रेणीवाढीबाबतचा प्रश्न या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.

(३) वेतनत्रुटी उच्चस्तर समिती (पाचवा वेतन आयोग) -

१९८६ साली नियुक्त केलेल्या वेतन समानीकरण समितीने लेखा व कोषागारे संचालनालयातील पदांना केंद्र शासनाच्या महालेखापालांच्या कार्यालयातील पदांची समकक्षता दिली नव्हती. त्यानंतर नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी समितीने देखील यास दुजोरा दर्शवून लेखा व कोषागारे संचालनालयातील पदांना देण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेणी या त्यांच्या असुधारित वेतनश्रेणी विचारात घेऊन देण्यात आलेल्या आहेत व केंद्र शासनाप्रमाणे वर्ग-३ मधील ८०% पदांना वरची वेतनश्रेणी द्यावयाची बाब या समितीच्या कार्यकक्षेत येत नाही असा अभिप्राय नोंदविला होता. राज्य वेतन सुधारणा समितीने देखील आपल्या अहवालाच्या भाग-१ मध्ये लेखा व कोषागारे संचालनालयातील पदांना केंद्र शासनाच्या महालेखापाल यांच्या कार्यालयातील पदांची समकक्षता देण्याची मागणी मान्य केलेली दिसत नाही. या परिस्थितीत, लेखा व कोषागारे संचालनालयातील अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना महालेखापालांच्या कार्यालयातील पदांशी समकक्ष मानून वरच्या वेतनश्रेण्या देण्याची मागणी मान्य करता येत नाही.

(क) महालेखापालांच्या कार्यालयातील पदांच्या वेतनश्रेणी :-

| अ. क्र. | पदनाम | ३ रा वेतन आयोग (वेतनश्रेणी रु.) | ४था वेतन आयोग (वेतनश्रेणी रु.) | ५वा वेतन आयोग (वेतनश्रेणी रु.) |
|---|---|---|---|---|
| | लेखापरीक्षा विभाग (Audit Side) | | | |
| १ | वरिष्ठ लेखा परीक्षा अधिकारी | | २२००-४००० (८०%) | ८०००-१३५०० |
| २ | लेखा परीक्षा अधिकारी | ८४०-१२०० + रु.१०० विशेष अंतरिम भत्ता * | २३७५-३५०० (२०%) | ७५००-१२००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी | ६५०-१०४०* | २०००-३२०० (८०%) | ६५००-१०५०० पुन:सुधारित** ७४५०-११५०० |
| ४ | कक्ष अधिकारी (लेखा परीक्षा) | ५००-९००* | १६४०-२९०० (२०%) | ५५००-९००० पुन:सुधारित** ६५००-१०५०० |
| ५ | वरिष्ठ लेखा परिक्षक | ४२५-८००* | १४००-२६०० (८०%) | ५०००-८००० पुन:सुधारित** ५५००-९००० |
| ६ | कनिष्ठ लेखा परिक्षक | ३३०-५६०* | १२००-२०४० (२०%) | ४०००-६००० पुन:सुधारित** ४५००-७००० |
| | लेखा विभाग **(Accounts Side)** | | | |
| १ | वरिष्ठ लेखा अधिकारी | | चौथ्या वेतन आयोगापासून लेखा परीक्षा विभागातील समकक्ष पदांप्रमाणे लेखा विभागातील पदांना समान वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. मात्र ८०% व २०% हे प्रमाण कायम ठेवण्यात आले. | |
| २ | लेखा अधिकारी | ८४०-१२००* | | |
| ३ | निवडश्रेणी कक्ष अधिकारी (लेखा) | ७७५-१०००* | | |
| ४ | कक्ष अधिकारी (लेखा) | ५००-९००* | | |
| ५ | वरिष्ठ लेखापाल | ४२५-८००* | | |
| ६ | लेखापाल | ३३०-५६०* | | |

* दि.१मार्च, १९८४ पासून या वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत.

** केंद्र शासनाच्या दि.२८ फेब्रुवारी, २००३ च्या ज्ञापनान्वये दि.१ जानेवारी, १९९६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने या वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या आहेत.

२. सहाय्यक लेखाधिकारी / सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी संवर्गास दि.१.१.१९८६ पासून रू.१६४०-२९०० ऐवजी केंद्र शासनाकडील (Indian Audit and Accounts Department) सहाय्यक लेखाधिकारी पदाप्रमाणे रू.२०००-३२०० (८०% पदांसाठी) व रू.१६४०-२९०० (२०% पदांसाठी) आणि दि.१.१.१९९६ पासून रू.५५००-९००० ऐवजी रू.७४५०-११५०० (८०% पदांसाठी) व रू.६५००-१०५०० (२०% पदांसाठी) अशा वेतनश्रेण्या मंजूर करण्याची संघटनेची मागणी आहे.

(अ) वरील परिच्छेद १(अ)(१) मध्ये नमूद धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासनाकडील पदांची केंद्र शासनाकडील पदांशी समकक्षता निश्चित करण्यासाठी वेतन समानीकरण समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीने राज्य शासनाच्या विविध विभागांमधील पदांची केंद्र शासनाकडील पदांशी समकक्षता निश्चित केली आहे.

मात्र, केंद्र शासनाकडील महालेखापाल (लेखापरीक्षा किंवा लेखा) कार्यालयात लेखा व कोषागारे संचालनालयातील वरिष्ठ पदांव्यतिरिक्त इतर पदांशी तुलनीय पदे असण्याची शक्यता वेतन समानीकरण समितीने आपल्या अहवालातील परिच्छेद ३.२७ मध्ये व्यक्त केली आहे. वेतन समानीकरण समितीच्या नियुक्तीचे प्रयोजन विचारात घेता, वास्तविकत: समितीने समकक्षतेसंदर्भात निर्णय घेणे अपेक्षित होते. परंतु, समितीने तसे केलेले नाही व त्याबाबतची कारणमिमांसादेखील केलेली नाही.

(ब) वरील परिच्छेद (१)(क) येथे नमूद केल्याप्रमाणे महालेखापालांच्या कार्यालयाची दि.१ मार्च, १९८४ पासून पुनर्रचना करण्यात येऊन लेखापरीक्षा आणि लेखा व आस्थापना असे दोन स्वतंत्र विभाग (संवर्ग)

निर्माण करण्यात आले. या पुनर्रचनेनंतर सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी हा संवर्ग केंद्र शासनाकडे अस्तित्वात आल्याचे दिसून येते. रू.५००-९०० या वेतनश्रेणीतील कक्ष अधिकारी संवर्गातील २०% पदे मूळ वेतनश्रेणीत ठेऊन ८०% पदांना रू.६५०-१०४० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (Comptroller and Auditor General) कार्यालयाचे पत्र क्र.९३५-एनर/९७-८७ दि.१७ ऑगस्ट, १९८७ चे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, रू.६५०-१०४० ही वेतनश्रेणी सुरूवातीस अकार्यात्मक वेतनश्रेणी होती. तद्नंतर दि.१ एप्रिल, १९८७ पासून या वेतनश्रेणीमध्ये पदे श्रेणीवर्धीत करून त्या पदांवर कार्यात्मक पदोन्नती देण्यात येऊ लागली.

वरील पदोन्नतीची पद्धत सहावा वेतन आयोग लागू होईपर्यंत (दि.१/१/२००६) चालू होती.

(क) चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगात लेखापरीक्षा आणि लेखा विभागातील समकक्ष पदांना समान वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली असली तरी ८०% (उच्च वेतनश्रेणी) व २०% (निम्न वेतनश्रेणी) हे प्रमाण पुढे चालू ठेवण्यात आले होते. " कामकाजाची निकड आणि इतर आनुषंगिक घटक विचारात घेऊन विद्यमान संवर्ग संरचनेमध्ये ८०% पदे उच्च वेतनश्रेणीमध्ये ठेवण्याचे शासनाने मान्य केले असल्याने, त्यामध्ये कोणताही बदल करण्याची शिफारस आम्ही करीत नाही ", असे अभिप्राय पाचव्या वेतन आयोगाने आपल्या अहवालात परिच्छेद १०२.१९ मध्ये नमूद केले आहेत.

(ड) केंद्र शासनाच्या दि.२८ फेब्रुवारी, २००३ रोजीच्या ज्ञापनान्वये महालेखापालांच्या कार्यालयातील विविध पदांच्या वेतनश्रेण्या पुन:सुधारित करण्यात आल्या आहेत. सहाव्या वेतन आयोगाच्या अहवालातील परिच्छेद ७.५६ मध्ये याबाबत नमूद केलेली पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे:-

पाचव्या वेतन आयोगात रेल्वे सेवेतील काही लिपिकवर्गीय पदांच्या वेतनश्रेणी उन्नत केल्यामुळे त्यांची रेल्वे लेखा संवर्गातील तुलनेने उच्च वेतनश्रेणीतील पदांशी असलेली प्रस्थापित सापेक्षता भंग पावली. त्यामुळे दि.१.१.१९९६ पासून लेखा संवर्गातील पदांना उच्च वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या. केंद्र शासनाच्या वेगवेगळ्या विभागांमधील लेखा संवर्गातील पारंपारिक सापेक्षता कायम ठेवण्यासाठी रेल्वे लेखा संवर्गातील पदांप्रमाणेच इतर लेखा संवर्गातील पदांना उच्च वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या.

(इ) केंद्र शासनाकडे सहाव्या वेतन आयोगामध्ये रू.५०००-८०००, रू.५५००-९००० आणि रू.६५००-१०५०० या वेतनश्रेणी एकाच सुधारित वेतनसंरचनेत विलीन केल्यामुळे, वरिष्ठ लेखापरीक्षक / लेखापाल आणि त्या पदाच्या पदोन्नतीच्या कक्ष अधिकारी या पदास एकच सुधारित वेतनसंरचना अनुज्ञेय ठरत असल्यामुळे कक्ष अधिकारी हे पद श्रेणीउन्नत करणे क्रमप्राप्त ठरले. परिणामी कक्ष अधिकारी आणि सहाय्यक लेखा अधिकारी / सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी या पदांना अनुक्रमे रू.६५००-१०५०० आणि रू.७४५०-११५०० या असुधारित वेतनश्रेण्यांऐवजी रू.७५००-१२००० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-२: ९३००-३४८०० + रू.४८०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. थोडक्यात, दि.१मार्च, १९८४ च्या पुनर्रचनेनंतर कक्ष अधिकारी (रू.५००-९००) संवर्गातील ८०% पदे श्रेणीउन्नत करून निर्माण केलेला सहाय्यक लेखा परिक्षा अधिकारी (रू.६५०-१०४०) संवर्ग आणि कक्ष अधिकारी हे संवर्ग सहाव्या वेतन आयोगामध्ये एकाच सुधारित वेतनसंरचनेत आले आहेत.

३. <u>समितीची शिफारस</u> :-

वरील परिच्छेद २(ब) ते (इ) मध्ये नमूद केलेल्या पार्श्वभूमीवर संघटनेच्या मागणीचा विचार करावा लागेल. दि.१ मार्च, १९८४ पासून महालेखापालांच्या कार्यालयातील पदांना देण्यात आलेल्या वरिष्ठ वेतनश्रेण्या

ही केवळ वेतन सुधारणा नव्हती तर आस्थापनेची पुनर्रचना (Restructuring) करण्यात आली होती. चौथ्या वेतन आयोगानेदेखील ही पुनर्रचना (Restructuring) असल्याचे अहवालात परिच्छेद १०.५१८ मध्ये नमूद केले आहे. असे करण्यामागे विशिष्ठ हेतू किंबहुना त्या कार्यालयाची तत्कालीन परिस्थितीतील विशिष्ठ गरज कारणीभूत होती. वरील परिच्छेद २(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे महालेखापालांच्या कार्यालयात दि.१ एप्रिल, १९८७ पासून पदे श्रेणीवर्धीत करुन त्या पदांवर कार्यात्मक पदोन्नती देण्यात येऊ लागली.

केंद्र शासनाकडील सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी पदाशी समकक्षतेचा विचार करता राज्य शासनाकडेदेखील हे पद दोन स्तरावर (सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी आणि कक्ष अधिकारी) असणे अपेक्षित ठरते. परंतु केवळ समकक्षता प्रस्थापित करण्यासाठी पदसंरचनेत बदल करणे कितपत सयुक्तिक ठरते हा मुद्दादेखील विचारात घेणे आवश्यक आहे. कारण वर नमूद केल्याप्रमाणे पदसंरचनेत बदल करण्यासाठी विशिष्ठ प्रशासकीय हेतू / गरज अभिप्रेत आहे. राज्य शासनाकडे तशी परिस्थिती होती /आहे असे म्हणता येणार नाही.

पाचव्या वेतन आयोगात केंद्र शासनाच्या रेल्वे सेवेतील लिपीकवर्गीय व लेखा संवर्गातील पारंपारिक सापेक्षता कायम ठेवण्यासाठी रेल्वे लेखा संवर्गातील पदांना आणि परिणामी वेगवेगळ्या विभागांमधील लेखा संवर्गातील पदांना उच्च वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या होत्या. परिच्छेद २(ड) मध्ये विशद केल्याप्रमाणे सहाव्या वेतन आयोगामध्येही केंद्र शासनाकडील विशिष्ठ परिस्थितीमुळे कक्ष अधिकारी आणि सहाय्यक लेखा / लेखा परीक्षा अधिकारी या पदांच्या श्रेणी उन्नत कराव्या लागल्या आहेत.

केंद्रीय लेखा / लेखापरीक्षा संवर्गातील पदांच्या वेतनश्रेण्यांचे अवलोकन करता दिसून येते की, केंद्र शासनाकडील तत्कालीन परिस्थिती / गरज, विभागांतर्गत आणि वेगवेगळ्या विभागांमधील पदांमध्ये प्रस्थापिंत असलेली पारंपारिक सापेक्षता इ. विविध बाबी विचारात घेऊन या संवर्गाच्या वेतनश्रेण्यांमध्ये / पदसंरचनेमध्ये वेळोवेळी समयोचित बदल / सुधारणा करण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाकडील महालेखापाल (लेखापरीक्षा किंवा लेखा) कार्यालयात लेखा व कोषागारे संचालनालयातील वरिष्ठ पदांव्यतिरिक्त इतर पदांशी तुलनीय पदे असण्याची शक्यता वेतन समानीकरण समितीने आपल्या अहवालातील परिच्छेद ३.२७ मध्ये व्यक्त केली असली तरी, दि.१ एप्रिल, १९८७ पासून सहाव्या वेतन आयोगापर्यंतच्या वरील परिच्छेद २(ब) ते (ड) मध्ये नमूद घटनाक्रम व त्यामागील पार्श्वभूमी विचारात घेता, राज्य शासनाकडील सहाय्यक लेखा अधिकारी पद केंद्र शासनाकडील सहाय्यक लेखापरीक्षा / सहाय्यक लेखा अधिकारी पदाशी समकक्ष ठरत नाही. त्यामुळे या संवर्गास केंद्र शासनाप्रमाणे चौथ्या व पाचव्या वेतन आयोगात अनुक्रमे दि.१.१.१९८६ पासून रु.१६४०-२९०० ऐवजी रु.२०००-३२०० (८०% पदांसाठी) व रु.१६४०-२९०० (२०% पदांसाठी) आणि दि.१.१.१९९६ पासून रु.५५००-९००० ऐवजी रु.७४५०-११५०० (८०% पदांसाठी) व रु.६५००-१०५०० (२०% पदांसाठी) अशा वेतनश्रेण्या मंजूर करता येणार नाहीत.

ठिकाण :- मुंबई

दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०११

सही/-
(श्रीकांत देशपांडे)
सचिव (लेखा व कोषागारे),
वित्त विभाग तथा सदस्य,
वेतनत्रुटी निवारण समिती

सही/-
(के. पी. बक्षी)
प्रधान सचिव(सेवा),
सामान्य प्रशासन विभाग तथा अध्यक्ष,
वेतनत्रुटी निवारण समिती

२) प्रशासकीय विभागाचे नाव :- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
(नियंत्रक, वैधमापनशास्त्र)
संवर्गाचे नाव :- निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) (वेतनश्रेणी रू.५०००-८०००)
निरीक्षक (निवड श्रेणी) (वेतनश्रेणी रू.५५००-९०००)

प्रस्तावना:-

नियंत्रक, वैधमापनशास्त्र यांनी शिफारस केलेली वेतनश्रेणी मंजूर करुन राजपत्रित दर्जा (गट-ब) देण्यासंदर्भात निरीक्षक, वैधमापनशास्त्र संघटनेने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.६०४/२००९ दाखल केला होता. निरीक्षक, वैधमापनशास्त्र या संवर्गास उच्च वेतनश्रेणी व राजपत्रित दर्जा देण्याविषयी विभागप्रमुखांनी (नियंत्रक, वैधमापनशास्त्र) शिफारस केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याचे आदेश मा. न्यायाधिकरणाने दि.२२ जून, २००९ रोजी दिले आहेत. त्याअनुषंगाने विभागप्रमुखांनी दि.२३/०९/२००८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाची तपासणी करुन शिफारस करण्यासाठी हे प्रकरण शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील संभाव्य त्रुटी दूर करण्यासाठी नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीकडे सोपविले होते. तसेच, यासंदर्भात प्राधान्याने स्वतंत्रपणे अहवाल सादर करण्यावी विनंती समितीस करण्यात आली होती.

या प्रकरणी दिनांक ७ मे, २०१० रोजी वेतनत्रुटी निवारण समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस नियंत्रक, वैधमापनशास्त्र आणि मूळ अर्जदार संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

समितीची शिफारस :-

विभागप्रमुखांनी (नियंत्रक, वैधमापनशास्त्र) दि.२३/०९/२००८ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावात निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) व निरीक्षक (निवड श्रेणी) या संवर्गांबरोबरच सहाय्यक नियंत्रक आणि उप नियंत्रक या संवर्गांचाही समावेश असला तरी मा. न्यायाधिकरणाचे आदेशांनुसार केवळ निरीक्षक संवर्गाचाच समितीने विचार केला आहे.

२. या संदर्भात पुढील बाबी निदर्शनास येतात :-

२.१ वर नमूद दिनांक दि.२३/०९/२००८ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पदोन्नतीसाठी लागणारा दीर्घ कालावधी आणि पदोन्नतींच्या संधींची अल्प उपलब्धता विचारात घेऊन कर्मचारी वर्गाचे मनोबल उंचावण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी संवर्गांची श्रेणीवाढ करण्याचे विभागप्रमुखांनी प्रस्तावित केले आहे.

२.२ विचाराधीन निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) व निरीक्षक (निवड श्रेणी) या संवर्गांना चौथ्या वेतन आयोगामध्ये अनुक्रमे रू.१४००-२३०० व रू.१६४०-२९०० ह्या वेतनश्रेणी मंजूर करण्यात आल्या होत्या. रू.१४००-२३०० या वेतनश्रेणीशी समकक्ष पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रू.४५००-७००० ही आहे. तथापि, राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७च्या अहवालातील (भाग-२) परिच्छेद ४.११ मधील शिफारशीनुसार निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) संवर्गातील नियुक्तीसाठी असलेली विज्ञान शाखेतील पदवी ही शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन, या संवर्गास समकक्ष वेतनश्रेणीपेक्षा तुलनेने उच्च रू.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. तसेच निरीक्षक (निवड श्रेणी) या संवर्गांची रू.१६४०-२९०० ही वेतनश्रेणी विचारात

घेऊन शासनाकडील या वेतनश्रेणींतील इतर संवर्गांप्रमाणेच पाचव्या वेतन आयोगामध्ये रु.५५००-९००० ही समकक्ष वेतनश्रेणी मंजूर केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता या संवर्गांच्या वेतनश्रेणींमध्ये कोणतीही त्रुटी नाही.

२.३ विचाराधीन प्रस्तावामध्ये निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गाची तुलना सार्वजनिक आरोग्य विभागातील अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन या यंत्रणेतील अन्न निरीक्षक या संवर्गाशी केली असून, त्या संवर्गास रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी व गट ब - राजपत्रित दर्जा देण्यात आल्याचे नमूद केले आहे. सदर विधान वस्तुस्थितीवर आधारित नाही, कारण अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन तसेच अन्न निरीक्षक हे पद सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत नसून ते वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत आहे. अन्न निरीक्षक या संवर्गासदेखील पाचव्या वेतन आयोगामध्ये निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गाप्रमाणेच राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७च्या अहवालातील (भाग-२) परिच्छेद ४.११ मधील शिफारशीनुसार रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे.

२.४ पदोन्नतीसाठी लागणारा दीर्घ कालावधी आणि पदोन्नतींच्या संधींची अल्प उपलब्धता हे मुद्दे श्रेणीवाढीच्या प्रस्तावाच्या समर्थनार्थ प्रामुख्याने मांडण्यात आले आहेत.

या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, पदोन्नतीबाबत अशी परिस्थिती कमी - अधिक प्रमाणात राज्य शासनाच्या बहुतांश विभागांमध्ये आढळून येते. पदोन्नतीमध्ये आलेली कुंठितता विचारात घेऊन कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ / प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत पात्र कर्मचाऱ्यांना संपूर्ण सेवेत दोन वेळेस पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचनेचा लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

३. वरील परिच्छेद क्र.२ मधील विवेचन विचारात घेता निरीक्षक (कनिष्ठ श्रेणी) व निरीक्षक (निवड श्रेणी) संवर्गास अनुक्रमे रु.६५००-१०५०० व रु.७४५०-११५०० या उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याचा प्रस्ताव स्वीकारार्ह नाही, असे समितीचे मत आहे.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- १९ जून, २०१०

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (सुधीर श्रीवास्तव) | (के. पी. बक्षी) |
| प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा सदस्य, वेतनत्रुटी निवारण समिती | प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग तथा अध्यक्ष, वेतनत्रुटी निवारण समिती |

३) प्रशासकीय विभागाचे नाव :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग

संवर्गाचे नाव :- ग्रंथपाल, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (असुधारित वेतनश्रेणी रू.४५००-७००० / सुधारित वेतनसंरचना वेतनबँड पीबी १:रू.५२००-२०२०० अधिक रू.२८०० ग्रेड वेतन)

प्रस्तावना:-

श्रीमती सु. अ. शिरभाते आणि इतर ग्रंथपालांनी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ग्रंथपाल संवर्गास पाचव्या वेतन आयोगात शासकीय तंत्रनिकेतने, मुद्रण तंत्रशास्त्र संस्था (Institute of Printing Technology) व चर्म तंत्रशास्त्र संस्थेतील (Institute of Leather Technology) ग्रंथपाल संवर्गाप्रमाणे दि.१.१.१९९६ पासून त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यासंदर्भात दि.२३ एप्रिल, २००७ रोजी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.२०९/२००७ दाखल केला होता. त्यावर मा.न्यायाधिकरणाने प्रतिवादी क्र.३- प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी न्यायालयाच्या अवलोकनार्थ सादर केलेल्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नस्तीमधील (नस्तीक्र.टीएसए १००४/(३३०३)/व्यशि-४) दि.३.११.२००४ रोजीच्या टिप्पणीसंदर्भात व या प्रकरणी आदेशांच्या दिनांकापासून १ महिन्यात अंतीम निर्णय घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी असे आदेश दि.१ एप्रिल, २०१० रोजी दिले आहेत. तसेच मूळ अर्ज क्र.२०९/२००७ दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापित करण्याबाबत अर्जदारांनी दि.३० जून, २०१० रोजी संकीर्ण अर्ज क्र.२७०/२०१० दाखल केला होता. या संदर्भात मा.न्यायाधिकरणाने दि.३०.७.२०१० रोजी असे आदेश दिले आहेत की, अर्जदारांनी दि.१.१.१९९६ पासून त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्याची मागणी वेळेत केलेली नसल्याने १० वर्षांचा विलंब क्षमापित करता येणार नाही. मात्र, मूळ अर्ज दाखल केल्याच्या (दि.२३.४.२००७) दिनांकापूर्वी १ वर्षापासून (एप्रिल, २००६ पासून) त्रिस्तरीय वेतनश्रेणीची व थकबाकीची मूळ अर्जातील मागणी मुदतीत आहे. म्हणजेच प्रस्तुत प्रकरणी दि.१ एप्रिल, २००६ पासून विचार होणे आवश्यक आहे.

(२) मा. न्यायाधिकरणास सादर केलेल्या नस्ती क्र.टीएसए १००४/(३३०३)/व्यशि-४ मधील दि.३.११.२००४ रोजीची टिप्पणी पुढीलप्रमाणे आहे:-

" व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ग्रंथपालांच्या सुधारित वेतनश्रेणीबाबतचा प्रस्ताव वेतन असमानता समितीसमोर ठेवण्यास हरकत नसावी, असे प्रस्तावित करण्यात येत आहे ".

वर नमूद नस्तीचे अवलोकन करता, वरील टिप्पणी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ग्रंथपालांना शासकीय तंत्रनिकेतनातील ग्रंथपालांप्रमाणे त्रिस्तरीय [रू.७४५०-११५००, रू.१००००-१५२०० (वरिष्ठश्रेणी), १२०००-१६५०० (निवडश्रेणी)] वेतनश्रेणी देण्याशी निगडीत आहे.

(३) न्यायाधिकरणाच्या उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने तपासणी करुन शिफारस करण्यासाठी हे प्रकरण शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील संभाव्य त्रुटी दूर करण्यासाठी नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीकडे सोपविले आहे. तसेच, यासंदर्भात प्राधान्याने स्वतंत्रपणे अहवाल सादर करण्याची विनंती समितीस करण्यात आली आहे.

या प्रकरणी दि.२५ ऑक्टोबर, २०१० रोजी वेतनत्रुटी निवारण समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मूळ अर्जदारांचे आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था ग्रंथपाल संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. मूळ अर्जदार क्र.१ - श्रीमती सु. अ. शिरभाते या बैठकीस अनुपस्थित होत्या .

<u>समितीची शिफारस</u> :-

२. वर नमूद केलेल्या मा. न्यायाधिकरणाच्या आदेशांच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.३.११.२००४ रोजीच्या टिप्पणीनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ग्रंथपालांना दि.१एप्रिल, २००६ पासून शासकीय तंत्रनिकेतनातील ग्रंथपालांप्रमाणे त्रिस्तरीय वेतनसंरचना [वेतनबँड पीबी३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.६००० ग्रेड वेतन / पीबी३: रू.१५६००-३९१०० अधिक रू.७००० ग्रेड वेतन (वरिष्ठश्रेणी) / पीबी४: रू.३७४००-६७००० अधिक रू.९००० ग्रेड वेतन (निवडश्रेणी)] देण्याच्या प्रस्तावाबाबत समितीने विचार केला. यासंदर्भात पुढील बाबी निदर्शनास आल्या आहेत :-

अ) शासकीय तंत्र निकेतनातील ग्रंथपालांना राज्य वेतन सुधारणा समिती, १९९७ च्या (अहवाल भाग-१) शिफारशींनुसार अभियांत्रिकी महाविद्यालयांतील ग्रंथपाल पदाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर शिफारस करताना त्या समितीने तंत्रशिक्षण संचालनालय या एकाच संचालनालयांतर्गत कार्यरत असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनांमधील ग्रंथपाल पदाचे समान सेवाप्रवेश नियम आणि कर्तव्ये व जबाबदाऱ्यांबरोबरच सामायिक ज्येष्ठतासूची ही बाब देखील विचारात घेतली आहे. तसेच या दोन्ही संस्थांतील ग्रंथपाल हे पद शिक्षकीय पद असल्याचा मुद्दाही विचारात घेतला आहे.

सन १९८४ पूर्वी शासकीय तंत्र निकेतने व औद्योगिक प्रशिक्षण संस्था तंत्र शिक्षण संचालनालय ह्या एकाच संचालनालयांतर्गत कार्यरत होत्या आणि दोन्ही संस्थांमधील ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी समान होती. सन १९८४ मध्ये तंत्र शिक्षण संचालनालयाचे विभाजन होऊन औद्योगिक प्रशिक्षण संस्था नवनिर्मित व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली आल्या आहेत. शासनाने हा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील आणि तंत्र निकेतनातील ग्रंथपालांचे सेवा प्रवेश नियम समान असल्याचे उपरोल्लेखित नस्तीतील टिप्पणीमध्ये नमूद असले तरी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय निर्माण झाल्यापासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ग्रंथपालांची स्वतंत्र ज्येष्ठतासूची ठेवण्यात येत आहे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ग्रंथपाल हे पद शिक्षकीय पद ठरविण्यात आलेले नाही.

ब) शासकीय तंत्र निकेतनातील ग्रंथपाल पदांची त्रिस्तरीय वेतनश्रेणी ही अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने (A.I.C.T.E.) शिफारस केलेली शिक्षकीय पदाची वेतनश्रेणी असून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षकीय पदांनाही अद्याप ही त्रिस्तरीय वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरविण्यात आलेली नाही. सदर वेतनश्रेणी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ग्रंथपाल पदास मंजूर केल्यास तेथील शिक्षकीय पदांपेक्षाही ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी उच्च होईल.

क) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने सहाव्या वेतन आयोगात अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्र निकेतनांतील ग्रंथपाल पदास त्रिस्तरीय वेतनसंरचनेची शिफारस केली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ग्रंथपाल पदाबाबत अशी कोणतीही विशिष्ठ शिफारस परिषदेने केलेली नाही.

ड) दि.३० जून, २००६ च्या पदांच्या आढाव्यानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील ग्रंथपाल पदांना पूर्णवेळ काम नसल्याने सदर पदाचे वसतिगृह अधीक्षक तथा शारीरिक शिक्षण निदेशक तथा ग्रंथपाल असे नामाभिदान करण्यात आले असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. ही वस्तुस्थिती तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपेक्षा शासकीय तंत्र निकेतने ह्या उच्च दर्जाच्या शिक्षण संस्था आहेत ही बाब

विचारात घेता या दोन्ही संस्थामधील ग्रंथपालांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या एकसमान असल्याचे समजता येणार नाही.

३. वरील परिच्छेद क्र.२ मधील विवेचन विचारात घेता औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील ग्रंथपाल संवर्गास तंत्र निकेतनांतील ग्रंथपाल संवर्गाप्रमाणे त्रिस्तरीय वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस करता येणार नाही.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- २४ जानेवारी, २०११

सही/-
(सुधीर श्रीवास्तव)
प्रधान सचिव,
नियोजन विभाग तथा सदस्य,
वेतनत्रुटी निवारण समिती

सही/-
(के. पी. बक्षी)
प्रधान सचिव(सेवा),
सामान्य प्रशासन विभाग तथा अध्यक्ष,
वेतनत्रुटी निवारण समिती

४) प्रशासकीय विभागाचे नाव :- सार्वजनिक आरोग्य विभाग

संवर्गाचे नाव :- वैद्यकीय अधिकारी, गट ब (वेतनश्रेणी रु.६५००-१०५००)

प्रस्तावना:-

श्री. आर.जी. तोडमल आणि इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वैद्यकीय अधिकारी, गट ब या संवर्गास ५व्या वेतन आयोगानुसार रु.६५००-१०५०० ऐवजी रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) क्र.६०५९/२००८ दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या निवेदनावर शासनाने विचार करून निर्णय घेण्याचे आदेश दि.१ ऑक्टोबर, २००९ रोजी दिले आहेत. त्यानुषंगाने याचिकाकर्त्यांच्या निवेदनावर विचार करून निर्णय घेण्याची बाब शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील संभाव्य त्रुटी दुर करण्यासाठी नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीकडे सोपविली होती व न्यायालयीन प्रकरण असल्यामुळे यासंदर्भात तात्काळ स्वतंत्रपणे अहवाल सादर करण्याची विनंती समितीस करण्यात आली होती.

याचिकाकर्त्यांच्या निवेदनावर विचारविनिमय करण्यासाठी दिनांक १३ एप्रिल, २०१० व दिनांक २० एप्रिल, २०१० रोजी वेतनत्रुटी निवारण समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर बैठकांना सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी आणि याचिकाकर्ते श्री. तोडमल तसेच महाराष्ट्र राज्य वैद्यकीय अधिकारी (गट ब) (राज्यस्तरीय) या संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

समितीची शिफारस :-

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आल्यानंतर त्यामधील संभाव्य त्रुटींचे निराकरण करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या वेतनत्रुटी उच्चस्तर समितीची शिफारस विचारात घेऊन, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.४/सेवा-९, दिनांक २७ फेब्रुवारी, २००६ अन्वये जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रु.६५००-१०५०० ऐवजी रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. सदर वेतनश्रेणी राज्य शासनाकडील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, (गट ब) संवर्गातील रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीतील वैद्यकीय अधिकाऱ्यांनाही मंजूर करावी अशी विनंती महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी (गट ब) कृती समितीने दिनांक ५ एप्रिल, २००६ च्या निवेदनाअन्वये शासनास केली होती.

२. वर नमूद दिनांक ५ एप्रिल, २००६ च्या निवेदनाचे अवलोकन केले असता, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, (गट ब) संवर्गातील वैद्यकीय अधिकारी पदाची जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकारी पदाशी तुलना केल्याचे प्रामुख्याने दिसून येते व या तुलनेच्या आधारेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, (गट ब) मधील वैद्यकीय अधिकारी पदास जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकारी पदाप्रमाणे रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची विनंती निवेदनाद्वारे केलेली आहे.

३. वरील परिच्छेद १ मध्ये नमूद जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकारी पदांच्या वेतनश्रेणीसंदर्भात पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास येते :-

दिनांक २७ फेब्रुवारी, २००६ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रु.६५००-१०५०० ऐवजी रु. ८०००-१३५०० ही पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली होती. त्यानंतर सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतन सुधारणेबाबत शिफारशी करण्याकरिता श्री.पी.एम.ए.हकीम, केंद्र शासनाचे सेवानिवृत्त सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ ने जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना मंजूर केलेल्या रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणीत सुधारणा करुन त्यांचे वेतन रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीत पुनर्निश्चित करुन त्यानंतर सदर वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-२(रु.९३००-३४८००) + रु.४४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याची शिफारस आपल्या अहवालातील परिच्छेद ३.१३.३ मध्ये केली होती. सदर शिफारस शासनाने शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर -१२०९/प्र.क्र.२०/सेवा-९, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ अन्वये स्विकारली आहे. त्यानुसार शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक डिएसआर-२००९/प्र.क्र.६१/आस्था-०५, दिनांक २० मे, २००९ अन्वये जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पाचव्या वेतन आयोगाची रु.६५००-१०५०० हीच वेतनश्रेणी ग्राह्य धरुन त्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी, २००६ पासून वेतनबँड पीबी-२ + रु.४४०० ग्रेड वेतन ही सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे.

थोडक्यात, जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन निर्णय, दि.२७ फेब्रुवारी, २००६ अन्वये मंजूर करण्यात आलेले रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणीचे लाभ दि.१ जानेवारी, २००६ पासून पुढे चालू ठेवण्यात आलेले नाहीत.

४. राज्य शासनाकडील वैद्यकीय अधिकारी, गट ब या संवर्गातील अधिकाऱ्यांची मागणी जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांप्रमाणे रु. ८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर करावी, अशी आहे. जिल्हा परिषदांकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना मंजूर करण्यात आलेले रु.८०००-१३५०० या वेतनश्रेणीचे लाभ दि.१ जानेवारी, २००६ पासून पुढे चालू ठेवण्यात आलेले नसल्यामुळे, प्रस्तुत अधिकाऱ्यांची मागणी समयोचित ठरत नाही व त्यामुळे त्यांची मागणी मान्य करता येण्यासारखी नाही असे समितीचे मत आहे.

प्रसंगत: नमूद करण्यात येते की, राज्य शासनाकडील वैद्यकीय अधिकारी, गट ब या संवर्गातील तसेच जिल्हा परिषदेकडील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रु. ८०००-१३५०० या असुधारित वेतनश्रेणीशी समकक्ष वेतनबँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + रु.५४०० ग्रेड वेतन ही सहाव्या वेतन आयोगाची सुधारित वेतन संरचना मंजूर करण्यासंदर्भातील प्रस्ताव वेतनत्रुटी निवारण समितीच्या विचारार्थ सादर करण्यात आलेले आहेत. त्यासंदर्भातील शिफारशी समितीच्या एकत्रित अहवालात करण्यात येतील.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- २२ एप्रिल, २०१०

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (सुधीर श्रीवास्तव) | (के. पी. बक्षी) |
| प्रधान सचिव(वित्तीय सुधारणा), | प्रधान सचिव (सेवा), |
| वित्त विभाग तथा सदस्य, | सामान्य प्रशासन विभाग तथा अध्यक्ष, |
| वेतनत्रुटी निवारण समिती | वेतनत्रुटी निवारण समिती |

५) प्रशासकीय विभागाचे नाव :- जलसंपदा विभाग

संवर्गाचे नाव :- स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (वेतनश्रेणी रु.४०००-६०००)

प्रस्तावना:-

श्री. एस. बी. गायकैवारी आणि इतर यांनी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गास पाचव्या वेतन आयोगात सहाय्यक आरेखक या संवर्गाप्रमाणे पाच वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर रु.५०००-८००० ही वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.८२४/२००८ दाखल केला होता. त्यावर मा.न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार, मूळ अर्जाच्या अनुषंगाने तपासणी करुन शिफारस करण्यासाठी हे प्रकरण शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील संभाव्य त्रुटी दुर करण्यासाठी नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीकडे सोपविले होते. तसेच, यासंदर्भात प्राधान्याने स्वतंत्रपणे अहवाल सादर करण्याची विनंती समितीस करण्यात आली होती.

या प्रकरणी दिनांक १३ एप्रिल, २०१० रोजी वेतनत्रुटी निवारण समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस जलसंपदा विभागाचे सचिव, इतर अधिकारी आणि मूळ अर्जदार श्री. एस. बी. गायकैवारी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

समितीची शिफारस :-

श्री. एस. बी. गायकैवारी आणि इतर यांच्या प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता निदर्शनास येते की, राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आल्यानंतर, त्यामधील संभाव्य त्रुटींचे निराकरण करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या वेतनत्रुटी उच्चस्तर समितीची शिफारस विचारात घेऊन, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:वेपुर-१२०१/प्र.क्र.४/भाग-२/(१)/सेवा-९, दिनांक २४ जानेवारी, २००७ अन्वये विविध विभागांकडील सहाय्यक आरेखक या पदाकरिता पाच वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर रु.४५००-७००० ऐवजी रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. सदर वेतनश्रेणी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गास लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वर नमूद अर्जामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाची सहाय्यक आरेखक पदाशी तुलना केली असून या तुलनेच्या आधारे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गास सहाय्यक आरेखक पदाप्रमाणे पाच वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर रु.५०००-८००० ही वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

२. सहाय्यक आरेखक व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदांच्यासंदर्भात पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास येते :-

२.१ चौथ्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेविषयी शिफारशी करण्यासाठी नेमलेल्या वेतन समानीकरण समितीने सहाय्यक आरेखक या पदाला केंद्र शासनाकडील आरेखक संवर्गातील पदांशी समकक्ष ठरविले आहे. या समकक्षतेनुसार चौथ्या व पाचव्या वेतन आयोगामध्ये सहाय्यक आरेखक या पदास केंद्र शासनाकडील पदाप्रमाणे द्विस्तरीय वेतनश्रेणी

मंजूर करण्यात आली आहे. मात्र, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हा संवर्ग जलसंपदा विभागातील वेगवेगळ्या तांत्रिक संवर्गांचे सुसूत्रीकरण करुन दिनांक ३१ जानेवारी, १९८९ पासून निर्माण करण्यात आला आहे.

२.२ सेवाप्रवेश नियमांतील तरतुदीनुसार, सहाय्यक आरेखक या पदावरील नियुक्तीसाठी "Recognised course of Civil Draftsman" ही किमान अर्हता विहित करण्यात आली आहे तर, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील नियुक्तीसाठी संबंधित सेवाप्रवेश नियमांसोबतच्या अनुसूचीत नमूद केलेल्या सातपैकी कोणतीही एक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

वर नमूद केलेल्या अनुसूचीतील सात अर्हतांपैकी अनुक्रमांक (v)येथील अर्हता ही सहाय्यक आरेखक पदाच्या अर्हतेशी समकक्ष असल्याचे दिसते. मात्र, अनुक्रमांक (iv) येथील अर्हता वगळता उर्वरित अर्हता ह्या सहाय्यक आरेखक या पदाच्या अर्हतेशी समकक्ष आहेत, असे आढळून येत नाही. थोडक्यात, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गात नियुक्त होणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांची अर्हता ही सहाय्यक आरेखक या पदाच्या अर्हतेप्रमाणे नाही.

२.३ या दोन्ही संवर्गांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांचा विचार करता असे दिसून येते की, या पदांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांचे स्वरुप भिन्न असून त्या तुलनीय नाहीत. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या प्रामुख्याने पर्यवेक्षीय स्वरुपाच्या आहेत तर, सहाय्यक आरेखक या पदाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या ह्या तुलनेने अधिक अभियांत्रिकी कौशल्याधारित आहेत.

३. वरील परिच्छेद क्र.२ मधील विवेचन विचारात घेता स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गास पाच वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी मंजूर करण्याची विनंती मान्य करता येण्यासारखी नाही.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- १९ जून, २०१०

सही/-
(सुधीर श्रीवास्तव)
प्रधान सचिव(वित्तीय सुधारणा),
वित्त विभाग तथा सदस्य,
वेतनत्रुटी निवारण समिती

सही/-
(के. पी. बक्षी)
प्रधान सचिव(सेवा),
सामान्य प्रशासन विभाग तथा अध्यक्ष,
वेतनत्रुटी निवारण समिती

# जोडपत्र - अ

## समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले प्रशासकीय विभागप्रमुख / विभागप्रमुख आणि अधिकारी / कर्मचारी संघटना

### १) समितीच्या बैठकीस उपस्थित असलेले प्रशासकीय विभागप्रमुख / विभागप्रमुख

| अ.क्र. | प्रशासकीय विभागप्रमुख / विभागप्रमुख |
|---|---|
| १ | प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग |
| २ | महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद |
| ३ | आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय |
| ४ | संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय |
| ५ | सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग |
| ६ | संचालक, सैनिक कल्याण विभाग |
| ७ | संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद |
| ८ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय |
| ९ | प्रधान सचिव, गृह विभाग |
| १० | प्रधान सचिव (उत्पादन शुल्क), गृह विभाग |
| ११ | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क |
| १२ | परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य |
| १३ | अपर पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| १४ | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य |
| १५ | संचालक, भू-विज्ञान व खनिकर्म संचालनालय |
| १६ | सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग |
| १७ | संचालक, आयुर्वेद संचालनालय |
| १८ | संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय |
| १९ | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग |
| २० | सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग |
| २१ | सचिव (लाभक्षेत्र), जलसंपदा विभाग |
| २२ | अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग |
| २३ | अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग |
| २४ | प्रधान मुख्य वन संरक्षक |
| २५ | अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक |
| २६ | ज़माबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, पुणे |
| २७ | सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग |
| २८ | अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग |
| २९ | महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय |

२) समितीच्या बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी / कर्मचारी संघटना

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचारी संघटना |
|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य कृषि सेवा राजपत्रित अधिकारी संघटना |
| २ | महाराष्ट्र कृषि सेवा वर्ग-२ राजपत्रित अधिकारी कल्याणकारी संघटना, पुणे |
| ३ | महाराष्ट्र राज्य कृषि पर्यवेक्षक संघटना, पुणे |
| ४ | महाराष्ट्र राज्य कृषि सहाय्यक संघटना |
| ५ | महाराष्ट्र राज्य कृषि विभाग लिपिक संवर्ग संघटना |
| ६ | महाराष्ट्र राज्य कृषि विद्यापीठ अभियंता व तांत्रिक कर्मचारी संघटना, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर |
| ७ | महाराष्ट्र राज्य कृषि विद्यापीठ अभियंता व तांत्रिक कर्मचारी संघटना, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी |
| ८ | प्रतिनिधी, कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव (कॅम्प), ता. मालेगाव, जि. नाशिक |
| ९ | प्रतिनिधी, जनता कृषि तंत्र विद्यालय, अमरावती |
| १० | प्रतिनिधी, महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालय, कोसबाड, ता.डहाणू, जि.ठाणे |
| ११ | महात्मा फुले कृषि विद्यापीठ कर्मचारी समन्वय संघ, राहुरी, जि.अहमदनगर |
| १२ | महाराष्ट्र राज्य सहकार विभाग राजपत्रित अधिकारी संघटना |
| १३ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग राजपत्रित अधिकारी संघटना |
| १४ | रोजगार व स्वयंरोजगार विभाग कर्मचारी संघटना |
| १५ | अधिदान व लेखा कार्यालय कर्मचारी संघटना |
| १६ | महाराष्ट्र राज्य लेखा व कोषागारे कर्मचारी (गट- क) संघटना, मुंबई |
| १७ | महाराष्ट्र राज्य वित्त व लेखा सेवा राजपत्रित अधिकारी संघटना |
| १८ | लेखा व कोषागारे (तृतीय वर्ग) कर्मचारी संघटना, मुंबई |
| १९ | लेखा व कोषागारे (म.वि.ले.से.) संघटना, मुंबई |
| २० | स्थानिक निधी लेखा महाराष्ट्र राज्य कर्मचारी संघटना |
| २१ | महाराष्ट्र राज्य वित्त व लेखा सेवा अराजपत्रित (गट-ब) अधिकारी संघटना |
| २२ | कास्ट्राईब लेखा व कोषागारे संघटना, महाराष्ट्र राज्य |
| २३ | निरीक्षक वैधमापनशास्त्र महाराष्ट्र राज्य कर्मचारी संघटना |
| २४ | मंत्रालय अधिकारी संघटना |
| २५ | मंत्रालय कर्मचारी संघटना |
| २६ | मंत्रालय लघुलेखक संघटना |
| २७ | महाराष्ट्र स्टेनोग्राफर्स असोसिएशन, नागपूर |
| २८ | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय राजपत्रित अधिकारी संघटना |
| २९ | महाराष्ट्र राज्य आय. टी. आय. निदेशक संघटना |
| ३० | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी संघटना |
| ३१ | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण गट-क कर्मचारी संघटना |
| ३२ | तांत्रिक शिक्षण कर्मचारी संघटना |
| ३३ | महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कर्मचारी महासंघ |
| ३४ | महाराष्ट्र राज्य पोलीस कार्यालयीन कर्मचारी मध्यवर्ती संघटना |
| ३५ | राजपत्रित अधिकारी मध्यवर्ती संघटना |
| ३६ | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयीन कर्मचारी संघटना |
| ३७ | सरकारी अभियोक्ता, गट- अ संघटना |

| | |
|---|---|
| ३८ | प्रतिनिधी, गृहरक्षक दल आणि नागरी संरक्षण |
| ३९ | प्रतिनिधी, शासकीय दस्तऐवज परीक्षक विभाग, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य |
| ४० | प्रतिनिधी, नागरी संरक्षण संचालनालय (गट-क) |
| ४१ | राज्य उत्पादन शुल्क राजपत्रित संघटना |
| ४२ | राज्य उत्पादन शुल्क वर्ग-३ अधिकारी संघटना |
| ४३ | महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क जवान संघटना |
| ४४ | मोटार वाहन विभाग कार्यकारी अधिकारी संघटना |
| ४५ | कामगार आयुक्त कार्यालय राजपत्रित अधिकारी संघटना |
| ४६ | औद्योगिक सुरक्षा व आरोग्य अधिकारी संघटना |
| ४७ | भू-वैज्ञानिक संघटना |
| ४८ | प्रतिनिधी, मंत्रालय विधी व न्याय विभाग अधिकारी संवर्ग |
| ४९ | प्रतिनिधी, लघुवाद न्यायालय मुंबई अधिकारी संवर्ग |
| ५० | प्रतिनिधी, विधी सेवा प्राधिकरण |
| ५१ | शासकिय पदवीधर क्ष-किरण तंत्रज्ञ संघटना (महाराष्ट्र राज्य) |
| ५२ | व्यावसायिक तांत्रिक रुग्णालयीन कर्मचारी संघटना, महाराष्ट्र |
| ५३ | प्रगती (नर्सेस) संघटना |
| ५४ | ट्रेन्ड् नर्सेस असोशिएशन, सांगली |
| ५५ | महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन |
| ५६ | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिकारी / कर्मचारी संघटना |
| ५७ | महाराष्ट्र राज्य शासकीय अधिसेविका संघटना |
| ५८ | महाराष्ट्र राज्य शासकीय कलाकार-छायाचित्रकार संघटना |
| ५९ | दंत आरोग्य तज्ञ संघटना |
| ६० | महाराष्ट्र राज्य शासकीय भौतिकोपचार व व्यवसायोपचार तज्ञ संघटना |
| ६१ | महाराष्ट्र राज्य अन्न निरीक्षक संघटना |
| ६२ | महाराष्ट्र राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटना (आयुर्वेद) |
| ६३ | अर्थ व सांख्यिकी संचालनालय मुंबई राजपत्रित अधिकारी संघटना |
| ६४ | अर्थ सांख्यिकी संचालनालय कर्मचारी संघटना |
| ६५ | आरोग्य सेवा अधिकारी महासंघ |
| ६६ | महाराष्ट्र राज्य वैद्यकीय अधिकारी (गट-ब) संघटना |
| ६७ | शासकीय औषध निर्माता (गट-क) कर्मचारी संघटना, महाराष्ट्र |
| ६८ | महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन |
| ६९ | शासकीय नेत्रचिकीत्सा अधिकारी संघटना |
| ७० | राजपत्रित अभियंता संघटना |
| ७१ | कनिष्ठ अभियंता संघटना |
| ७२ | महाराष्ट्र इंजिनिअरींग सर्व्हिसेस वर्ग-१ संघटना |
| ७३ | तांत्रिक सहाय्यक संघटना महाराष्ट्र राज्य (जलसंपदा विभाग) |
| ७४ | वैज्ञानिक कर्मचारी संघटना (मेरी), नासिक |
| ७५ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संघटना (जलसंपदा विभाग) |
| ७६ | सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य |
| ७७ | महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम कर्मचारी संघटना |

| | |
|---|---|
| ७८ | महाराष्ट्र राज्य रेखाचित्र कर्मचारी संघटना महाराष्ट्र (सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा व इतर विभाग) |
| ७९ | महाराष्ट्र राज्य स्थापत्य अभियांत्रिकी सहायक क्षेत्रिय कर्मचारी संघटना |
| ८० | विदर्भ सार्वजनिक बांधकाम जिल्हा परिषद पाटबंधारे कर्मचारी फेडरेशन, अमरावती |
| ८१ | शासकीय वास्तुशास्त्रीय संघटना |
| ८२ | भांडार शाखा संघटना, सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा विभाग |
| ८३ | फॉरेस्ट रेंजर्स असोसिएशन, महाराष्ट्र |
| ८४ | महाराष्ट्र राज्य राजपत्रित वन अधिकारी संघटना |
| ८५ | महाराष्ट्र राज्य वनरक्षक व पदोन्नत वनपाल संघटना |
| ८६ | महाराष्ट्र राज्य वन व सामाजिक वनीकरण कार्यालयीन कर्मचारी संघटना |
| ८७ | महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख राजपत्रित अधिकारी संघटना |
| ८८ | महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख कर्मचारी संयुक्त संघटना, यवतमाळ |
| ८९ | कास्ट्राईब भूमि अभिलेख कर्मचारी संघटना, अमरावती विभाग, अमरावती |
| ९० | महाराष्ट्र वनरक्षक वनपाल संघटना |
| ९१ | तलाठी / पटवारी महासंघ |
| ९२ | महाराष्ट्र स्टेट गॅझेटेड फॉरेस्ट ऑफीसर्स असोशिएशन |
| ९३ | महाराष्ट्र राज्य सहाय्यक वनसंरक्षक संघटना |
| ९४ | महसूल अधिकारी संघटना |
| ९५ | महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटना |
| ९६ | शासकीय औषधनिर्माता संघटना |
| ९७ | जिल्हा परिषद कर्मचारी युनियन |
| ९८ | जिल्हा परिषद आरोग्य सेवा संघटना |
| ९९ | जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटना |
| १०० | महाराष्ट्र राज्य शिक्षण विस्तार अधिकारी संघटना |
| १०१ | महाराष्ट्र विकास सेवा संघटना |
| १०२ | महाराष्ट्र राज्य पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख सभा |
| १०३ | महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कुष्ठरोग कर्मचारी संघटना |
| १०४ | महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना |
| १०५ | महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी ( पंचायत-समाजकल्याण-आयआरडीपी) संघटना |
| १०६ | प्राथमिक शिक्षक समिती |
| १०७ | पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संभा |
| १०८ | महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ |
| १०९ | अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ |
| ११० | महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ |
| १११ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघ |
| ११२ | मुंबई शिक्षक लोकशाही आघाडी (टीडीएफ) |
| ११३ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा ग्रंथपाल महासंघ |
| ११४ | महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग राजपत्रित प्रशासकीय अधिकारी संघटना |
| ११५ | अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघ, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ११६ | शिक्षक भारती संघटना |
| ११७ | विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ |

| | |
|---|---|
| ११८ | महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद |
| ११९ | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रयोगशाळा कर्मचारी संघ |
| १२० | महाराष्ट्र स्टेट टिचर एज्युकेटर्स असोशिएशन |
| १२१ | महाराष्ट्र राज्य ग्रेड मुख्याध्यापक महासंघ, राज्य शाखा (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा) |
| १२२ | अखिल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ |
| १२३ | अहमदनगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ |
| १२४ | अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त मंडळ |
| १२५ | महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ महामंडळ |
| १२६ | बृहन्मुबई माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघटना |
| १२७ | मुख्याध्यापक संघटना, बृहन्मुबई, पश्चिम जिल्हा |
| १२८ | भा. गुं. पा. सह्याद्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये तालुका संघटना, संगमनेर |
| १२९ | औरंगाबाद जिल्हा मुख्याध्यापक संघ |
| १३० | वैजापूर तालुका मुख्याध्यापक संघ |
| १३१ | आदिवासी विकास विभाग कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य, नाशिक |
| १३२ | भूजल अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य |
| १३३ | महाराष्ट्र राज्य तांत्रिक अधिकारी / कर्मचारी संघटना |
| १३४ | भूजल शास्त्रज्ञ संघटना, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य |
| १३५ | शासकीय वाहन चालक संघटना, मंत्रालय, मुंबई |
| १३६ | राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र |
| १३७ | महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ |

## जोडपत्र - व

## वेतनत्रुटी निवारण समितीची नियुक्ती व मुदतवाढ इत्यादी संबंधीचे शासन निर्णय

---

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतन त्रुटी निवारण समितीची स्थापना.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- वेपुर १२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २१ मे २००९.

वाचा :- शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक : वेपुर-१२०९/प्र.क्र. २७/सेवा-९,
दिनांक २२ एप्रिल २००९.

शासन निर्णय :- सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेच्या अनुषंगाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना उपरोक्त दिनांक २२ एप्रिल, २००९ च्या शासन अधिसूचनेन्वये दिनांक १ जानेवारी, २००६ पासून सुधारित वेतन संरचना विहित करण्यात आली आहे. या सुधारित वेतन संरचनेमध्ये काही त्रुटी राहण्याची शक्यता लक्षात घेवून, त्या त्रुटींचे निवारण करण्यासाठी वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीत विहित करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेमधील त्रुटींचे निवारण करुन, त्यांना सुधारित वेतन संरचनेची शिफारस करण्याकरीता पुढीलप्रमाणे वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग | सदस्य |

२. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

(अ) राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशींच्या अनुषंगाने विहित केलेल्या सुधारित वेतनसंरचनेमधील त्रुटींचे परीक्षण करुन योग्य सुधारित वेतन संरचनेची शिफारस करणे.

(ब) मा.मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाने निर्णय घेवून समितीकडे सोपविलेल्या विनिर्दिष्ट प्रस्तावांबाबत शिफारस करणे.

४. एखादया विशिष्ट संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आहे, असे प्रशासकीय विभागाच्या सचिवांना / विभाग प्रमुखांना ज्या प्रकरणी वाटेल, ती प्रकरणे त्यांनी केंद्र शासनाकडील समतुल्य पद, त्याची सुधारणापूर्व वेतनश्रेणी आणि सुधारित वेतन संरचना, सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊन तपासावित व तपासणीअंती अशा प्रकरणांमध्ये त्रुटी आहे अशी त्यांची खातरजमा झाल्यास, त्यासंबंधीचे प्रस्ताव ४ प्रतींसह समितीकडे आवश्यक त्या समर्थनासह हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत पाठवावे.

५. कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त संघटनेस / महासंघास काही संवर्गाच्या त्रुटीबाबत निवेदने सादर करावयाची असल्यास, ती संबंधित प्रशासकीय विभागामार्फत सादर करावीत. प्रशासकीय विभागाने या निवेदनांची तपासणी करुन वरील अ.क्र.४ मध्ये नमुद केल्यानुसार आपल्या शिफारशीसह प्रस्ताव समितीच्या विचारार्थ सादर करावेत.

६. समिती आपल्या कामासाठी स्वतःची कार्यपध्दती ठरवील आणि नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९०५२१११५२३४००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( विद्याधर कानडे )
प्रधान सचिव (वित्त)

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मा.मंत्री आणि मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला

# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रवंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रवंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,मंवई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई /पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.वावासाहेव आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगावाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीवाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, जि. नागपूर
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

# पत्राने.

----------

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता स्थापन वेतन त्रुटी निवारण समिती त्रुटींचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- वेपुर १२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १० ऑगस्ट, २००९.

वाचा :शासन निर्णय क्रमांक वेपुर १२०९/प्र.क्र.३८/सेवा-९,दिनांक २१ मे, २००९

<u>शासन निर्णय</u> :- दिनांक १ जानेवारी, २००६ पासून विहित करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेमध्ये काही त्रुटी राहण्याची शक्यता लक्षात घेवून, त्या त्रुटींचे निवारण करण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे.

२. प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील एखादया विशिष्ट संवर्गाच्या वेतन संरचनेमध्ये त्रुटी आहे, असे आढळून आल्यास अशी प्रकरणे त्यांनी केंद्र शासनाकडील समतुल्य पद, त्याची सुधारणापूर्व वेतनश्रेणी आणि सुधारित वेतन संरचना, सेवाप्रवेश नियम, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी बाबी विचारात घेऊन अशा प्रकरणांमध्ये त्रुटी आहे अशी त्यांची खातरजमा झाल्यास, त्यासंबंधीचे प्रस्ताव ४ प्रतींमध्ये आवश्यक त्या समर्थनासह संदर्भाधिन आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत समितीकडेसादर करावयाचे होते. सदर प्रस्ताव सादर करण्याची मुदत दिनांक २० जुलै २००९ रोजी संपुष्टात आलेली आहे.

३. समितीकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची संघटनांची मागणी विचारात घेऊन आता, वेतनत्रुटी निवारण समितीकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००९०८१०१८५६५९००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विद्याधर कानडे

( विद्याधर कानडे )
प्रधान सचिव (वित्त)

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

रोटा/एच-१३६४[६०००+५०-८-२००९]-१ [कृ.मा.प.

सर्व ... मंत्री आणि मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई /पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, जि. नागपूर
वित्त विभागातील सर्व कार्यासने
~~निवड~~ नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

.........

# पत्राने.

------------

रच-१३६४ -१३अ

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती मुदतवाढ देण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

शासन निर्णय क्रमांक: वेपुर -१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९

दिनांक:- १ डिसेंबर, २००९.

पहा:- शासन निर्णय क्रमांक: वेपुर -१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९.

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता दि.२१ मे, २००९ च्या शासन निर्णयान्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीला अहवाल सादर करण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांची (दि.२० नोव्हेंबर, २००९ पर्यंत) मुदत देण्यात आली आहे. समितीचे कामकाज अद्याप बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि.३१ मे, २०१० पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९१२०११९१८४८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,मंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई /पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
राज्य महिला आयोग, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

# पत्राने

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतन संरचनेतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती मुदतवाढ देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक:- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
दिनांक:-०७जून, २०१०.

पहा:- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर -१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर -१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१०ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर -१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१डिसेंबर, २०१०

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील ३) येथील आदेशांन्वये दि.३१मे, २०१० पर्यंत मुदत देण्यात आली होती. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत आता संपली असून, समितीचे कामकाज अद्याप बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि.३१ ऑगस्ट, २०१० पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१००६०७१९३६२०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सहायक
सर्व विधानसभा / परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, सर्व
जिल्हा कोषागार अधिकारी.
लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका

मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
राज्य महिला आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,मंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती मुदतवाढ देण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

शासन निर्णय क्रमांक:- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९

दिनांक:- २० ऑगस्ट, २०१०.

पहा:-१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१० ऑगस्ट, २००९

३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१ डिसेंबर, २००९

४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.७ जून, २०१०

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या आनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, हे समितीचे अध्यक्ष आहेत आणि प्रधान सचिव ( वित्तीय सुधारणा), वित्त विभाग हे समितीचे सदस्य आहेत. तथापि, श्री.एस. के. श्रीवास्तव, प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, सदस्य यांची प्रधान सचिव, नियोजन विभाग या पदावर बदली झाली आहे. वेतनत्रुटी निवारण समितीवर श्री.एस. के. श्रीवास्तव, प्रधान सचिव, नियोजन विभाग यांना यापुढे सदस्य म्हणून कायम ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्याचप्रमाणे वेतनत्रुटी निवारण समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील दि.७ जून, २०१० रोजीच्या आदेशांन्वये दि.३१ ऑगस्ट, २०१० पर्यंत मुदत देण्यात आली आहे. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत आता संपत आली असून, समितीचे काही कामकाज अद्याप बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीचे सदस्य म्हणून श्री. एस. के. श्रीवास्तव, प्रधान सचिव, नियोजन विभाग हे यापुढेही कामकाज पाहतील.

तसेच वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि.३० नोव्हेंबर, २०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१००८२०१९३६०८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर

कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व
प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे
कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,
मुंबई/नागपूर/औरंगाबाद
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र,
नागपूर
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत
सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली
क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक,
मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू
रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा
रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला
विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,
लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई /
पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान,
मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरेक
क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन
पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन,
एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी,
जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय)
समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर,
मुंबई-२५
नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल
मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या
सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे निवारण
करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती
मुदतवाढ देण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक:- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
दिनांक:- १ जानेवारी, २०११.

पहा:-१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१० ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१ डिसेंबर, २००९
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.७ जून, २०१०
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २० ऑगस्ट, २०१०

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील ५) येथील आदेशांन्वये दि.३० नोव्हेंबर, २०१० पर्यंत मुदत देण्यात आली होती. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत आता संपली असून, समितीचे कामकाज अद्याप बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करुन अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि.३१ मार्च, २०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०१०११४४०५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे निवारण करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती मुदतवाढ देण्याबाबत....*

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
*मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.*
*शासन निर्णय क्रमांक:- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९*
*दिनांक:- २९ एप्रिल, २०११.*

*पहा:-१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९*
*२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१० ऑगस्ट, २००९*
*३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१ डिसेंबर, २००९*
*४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.७ जून, २०१०*
*५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २० ऑगस्ट, २०१०*
*६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. १ जानेवारी, २०११*

*सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील ६) येथील आदेशांन्वये दि. ३१ मार्च, २०११ पर्यंत मुदत देण्यात आली होती. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत आता संपली असून, समितीचे कामकाज अद्याप बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.*

## शासन निर्णय

*सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी* दि.३० जून, २०११ पर्यंत मुदतवाढ *देण्यात येत आहे.*

*सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या* www.maharashtra.gov.in *या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०४२९१६२०५३००१ असा आहे.*

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,*

*( शि. म. म्हात्रे )*
*उप सचिव, महाराष्ट्र शासन*

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या
सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे निवारण
करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती
मुदतवाढ देण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक:- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
दिनांक:- ६जुलै, २०११.

पहा:-१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१० ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१ डिसेंबर, २००९
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.७ जून, २०१०
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २० ऑगस्ट, २०१०
६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. १ जानेवारी, २०११
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २९ एप्रिल, २०११

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील ७) येथील आदेशांन्वये दि. ३० जून, २०११ पर्यंत मुदत देण्यात आली होती. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत आता संपली असून, समितीचे कामकाज अद्याप बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीचे सदस्य म्हणून श्री. एस. के. श्रीवास्तव, प्रधान सचिव, वित्त विभाग हे यापुढेही कामकाज पाहतील.

तसेच सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि.३१ ऑक्टोबर, २०११ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०७०६१६२२४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर



उप ५४८-४४

उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या
सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे निवारण
करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती
सदस्य नियुक्तीबाबत....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक:- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
दिनांक :- ७सप्टेंबर, २०११.

पहा:-१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१० ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१ डिसेंबर, २००९
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.७ जून, २०१०
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २० ऑगस्ट, २०१०
६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. १ जानेवारी, २०११
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २९ एप्रिल, २०११
८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. ६ जुलै, २०११

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग हे समितीचे अध्यक्ष तर प्रधान सचिव, वित्त विभाग हे समितीचे सदस्य आहेत. प्रधान सचिव, वित्त विभाग यांच्याऐवजी सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांची समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीच्या सदस्यपदी प्रधान सचिव, वित्त विभाग यांच्याऐवजी सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०९०७१२००२८००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक,
मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरेक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या
सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे निवारण
करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती
मुदतवाढ देण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

*मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.*
*शासन निर्णय क्रमांक:- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९*
*दिनांक:- २ नोव्हेंबर, २०११.*

पहा:-१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१० ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१ डिसेंबर, २००९
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.७ जून, २०१०
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २० ऑगस्ट, २०१०
६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. १ जानेवारी, २०११
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २९ एप्रिल, २०११
८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. ६ जुलै, २०११

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील ८) येथील आदेशांन्वये दि. ३१ ऑक्टोबर, २०११ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत आता संपली असून, समितीचे कामकाज अद्याप बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

सुधारित वेतन संरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि.३१ जानेवारी, २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१११०२१६०४०००01 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या
सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे निवारण
करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती
मुदतवाढ देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक :- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
दिनांक :- ५ मार्च, २०१२.

पहा :-१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१० ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१ डिसेंबर, २००९
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.७ जून, २०१०
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २० ऑगस्ट, २०१०
६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. १ जानेवारी, २०११
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २९ एप्रिल, २०११
८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. ६ जुलै, २०११
९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २ नोव्हेंबर, २०११

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील ९) येथील आदेशांन्वये दि. ३१ जानेवारी, २०१२ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत आता संपली असून, समितीचे अहवाल लेखनाचे कामकाज अद्याप बाकी आहे. त्यामुळे उर्वरित कामकाज पूर्ण करून अहवाल सादर करण्यासाठी समितीला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि. ३१ मार्च, २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०३०६०५५५०४३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड. पुणे
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ. दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी समानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरेक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या
सुधारित वेतनसंरचनेतील त्रुटींचे निवारण
करण्याकरीता वेतनत्रुटी निवारण समिती
मुदतवाढ देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक :- वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९
दिनांक :- ३१ मे, २०१२.

पहा :-१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.२१ मे, २००९
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१० ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.१ डिसेंबर, २००९
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि.७ जून, २०१०
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २० ऑगस्ट, २०१०
६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. १ जानेवारी, २०११
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २९ एप्रिल, २०११
८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. ६ जुलै, २०११
९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. २ नोव्हेंबर, २०११
१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: वेपुर-१२०९/प्र.क्र.३८/सेवा-९, दि. ५ मार्च, २०१२

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता वरील १) येथील आदेशांन्वये वेतनत्रुटी निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी वरील १०) येथील आदेशांन्वये दि. ३१ मार्च, २०१२ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. समितीस अहवाल सादर करण्यासाठी दिलेली मुदत संपली आहे. समितीस अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- सुधारित वेतनसंरचनेतील वेतनत्रुटींचे निवारण करण्याकरीता नियुक्त केलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दि. ३१ मे, २०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०५३११७०१५६५५६००१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( शि. म. म्हात्रे )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर

उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
# सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
# सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
# प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
#आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
# सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
#प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
राज्य महिला आयोग, वरळी ,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहू रोड/देवळाली/अहमदनगर
# पत्राने

कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
कुलसचिव, महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद /नाशिक/ अमरावती.
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरेक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-१)

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई